| ९५ | कडू, श्री.बच्चू बाबाराव (अचलपूर) | ८ | १० | ४४.४४% |
| ९६ | काळे, श्री.आशुतोष अशोकराव (कोपरगाव) | १६ | २ | ८८.८८% |
| ९७ | कल्याणकर, श्री.बालाजी देविदासराव (नांदेड उत्तर) | १५ | ३ | ८३.३३% |
| ९८ | कल्याणशेट्टी, श्री.सचिन पंचप्पा (अक्कलकोट) | १७ | १ | ९४.४४% |
| ९९ | कांबळे, श्री.रणजित प्रतापराव (देवळी) | ६ | १२ | ३३.३३% |
| १०० | कांबळे, श्री.सुनिल ज्ञानदेव (पुणे छावणी) | १२ | ६ | ६६.६६% |
| १०१ | कानडे, श्री.लहू नाथा (श्रीरामपूर) | १८ | ० | १००% |
| १०२ | कांदे, श्री.सुहास (आण्णा) द्वारकानाथ (नांदगाव) | १८ | ० | १००% |
| १०३ | कारेमोरे, श्री.राजू माणिकराव (तुमसर) | १३ | ५ | ७२.२२% |
| १०४ | कथोरे, श्री.किसन शंकर (मुरबाड) | १८ | ० | १००% |
| १०५ | केचे, श्री.दादाराव यादवरावजी (आर्वी) | १६ | २ | ८८.८८% |
| १०६ | केदार, श्री.सुनील छत्रपाल (सावनेर) | १३ | ५ | ७२.२२% |
| १०७ | केळकर, श्री.संजय मुकूंद (ठाणे) | १८ | ० | १००% |
| १०८ | केराम, श्री.भिमराव रामजी (किनवट) | १८ | ० | १००% |
| १०९ | खोडके, श्रीमती सुलभा संजय (अमरावती) | १७ | १ | ९४.४४% |
| ११० | खोपडे, श्री.कृष्णा पंचम (नागपूर पूर्व) | १३ | ५ | ७२.२२% |
| १११ | खोसकर, श्री.हिरामण भिका (इगतपूरी) | १४ | ४ | ७७.७७% |
| ११२ | किणीकर, डॉ.बालाजी प्रल्हाद (अंबरनाथ) | ९ | ९ | ५०% |
| ११३ | कोकाटे, ॲड.माणिकराव शिवाजीराव (सिन्नर) | १७ | १ | ९४.४४% |

| अ.क्र.<br><br>(१) | सदस्यांचे नाव<br><br>(२) | उपस्थिती<br><br>(३) | अनुपस्थिती<br><br>(४) | उपस्थितीची टक्केवारी<br>(५) |
|---|---|---|---|---|
| ११४ | कोळंबकर, श्री.कालीदास निळकंठ (वडाळा) | १८ | ० | १००% |
| ११५ | कोरे (सावकर), श्री.विनय विलासराव (शाहूवाडी) | १२ | ६ | ६६.६६% |
| ११६ | कोरगांवकर, श्री.रमेश गजानन (भांडुप पश्चिम) | १८ | ० | १००% |
| ११७ | कोरोटे, श्री.सहसराम मारोती (आमगाव) | १६ | २ | ८८.८८% |
| ११८ | कोटेचा, श्री.मिहीर चंद्रकांत (मुलुंड) | १८ | ० | १००% |
| ११९ | क्षिरसागर, श्री.संदिप रविंद्र (बीड) | १६ | २ | ८८.८८% |
| १२० | कुचे, श्री.नारायण तिलकचंद (बदनापूर) | १६ | २ | ८८.८८% |
| १२१ | कुडाळकर, श्री.मंगेश (कुर्ला) | १७ | १ | ९४.४४% |
| १२२ | कुल, ॲड.राहुल सुभाषराव (दौंड) | १८ | ० | १००% |
| १२३ | कुंभारे, श्री.विकास शंकरराव (नागपूर मध्य) | १४ | ४ | ७७.७७% |
| १२४ | कुणावार, श्री.समीर त्र्यंबकराव (हिंगणघाट) | १८ | ० | १००% |
| १२५ | कुटे, डॉ.संजय श्रीराम (जळगाव जामोद) | १७ | १ | ९४.४४% |
| १२६ | लहामटे, डॉ.किरण यमाजी (अकोले) | १८ | ० | १००% |
| १२७ | लांडे, श्री.दिलीप भाऊसाहेब (चांदीवली) | १२ | ६ | ६६.६६% |
| १२८ | लांडगे, श्री.महेश (दादा) किसन (भोसरी) | १२ | ६ | ६६.६६% |
| १२९ | लंके, श्री.निलेश ज्ञानदेव (पारनेर) | १२ | ६ | ६६.६६% |
| १३० | लटके, श्रीमती ऋतुजा रमेश (अंधेरी) | १८ | ० | १००% |
| १३१ | लव्हेकर, डॉ.भारती (वर्सोवा) | १८ | ० | १००% |
| १३२ | महाले, श्रीमती श्वेता विद्याधर (चिखली) | १८ | ० | १००% |
| १३३ | मलिक, श्री.लखन सहदेव (वाशिम) | १४ | ४ | ७७.७७% |
| १३४ | मलिक, श्री.नवाब (अणुशक्ती नगर) | ० | १८ | ०% |
| १३५ | माने, श्री.यशवंत विठ्ठल (मोहोळ) | १४ | ४ | ७७.७७% |
| १३६ | मते, श्री.मोहन गोपाळराव (नागपूर दक्षिण) | १३ | ५ | ७२.२२% |
| १३७ | मेघे, श्री.समीर दत्तात्रय (हिंगणा) | १२ | ६ | ६६.६६% |

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | उपस्थिती (३) | अनुपस्थिती (४) | उपस्थितीची टक्केवारी (५) |
|---|---|---|---|---|
| १३८ | म्हात्रे, श्रीमती मंदा विजय (बेलापूर) | १२ | ६ | ६६.६६% |
| १३९ | मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश (पर्वती) | १७ | १ | ९४.४४% |
| १४० | मोहिते, श्री.दिलीप दत्तात्रय (खेड आळंदी) | १४ | ४ | ७७.७७% |
| १४१ | मोरे, श्री.शांताराम तुकाराम (भिवंडी ग्रामीण) | १४ | ४ | ७७.७७% |
| १४२ | मुफती श्री.मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगाव मध्य) | ८ | १० | ४४.४४% |
| १४३ | मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (कैज) | ११ | ७ | ६१.११% |
| १४४ | मुंडे, श्री.धनंजय पंडितराव (परळी) | १५ | ३ | ८३.३३% |
| १४५ | मुश्रीफ, श्री.हसन मियालाल (कागल) | ८ | १० | ४४.४४% |
| १४६ | मुटकुळे, श्री.तान्हाजी सखारामजी (हिंगोली) | १४ | ४ | ७७.७७% |
| १४७ | नाईक, श्री.गणेश (ऐरोली) | १८ | ० | १००% |
| १४८ | नाईक, श्री.इंद्रनिल मनोहर (पुसद) | १८ | ० | १००% |
| १४९ | नाईक, श्री.मानसिंग फत्तेसिंगराव (शिराळा) | १५ | ३ | ८३.३३% |
| १५० | नाईक, श्री.शिरीषकुमार सुरुपसिंग (नवापूर) | १५ | ३ | ८३.३३% |
| १५१ | नाईक, श्री.वैभव विजय (कुडाळ) | १३ | ५ | ७२.२२% |
| १५२ | नवघरे, श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत (बसमत) | १३ | ५ | ७२.२२% |
| १५३ | निकम, श्री.शेखर गोविंदराव (चिपळूण) | १७ | १ | ९४.४४% |
| १५४ | निकोले, श्री.विनोद भिवा (डहाणू) | १७ | १ | ९४.४४% |
| १५५ | निलंगेकर-पाटील, श्री.संभाजी दिलीपराव (निलंगा) | १६ | २ | ८८.८८% |
| १५६ | पाचपुते, श्री.बबनराव भिकाजी (श्रीगोंदा) | १४ | ४ | ७७.७७% |
| १५७ | पाडवी, ॲड.के.सी.(अक्कलकुवा) | ५ | १३ | २७.७७% |
| १५८ | पाडवी, श्री.राजेश उदेसिंग (शहादा) | १८ | ० | १००% |
| १५९ | पारवे, श्री.राजू देवनाथ (उमरेड) | १६ | २ | ८८.८८% |
| १६० | पटेल, श्री.अमीन (मुंबादेवी) | १७ | १ | ९४.४४% |

| अ.क्र.<br>(१) | सदस्यांचे नाव<br>(२) | उपस्थिती<br>(३) | अनुपस्थिती<br>(४) | उपस्थितीची टक्केवारी<br>(५) |
|---|---|---|---|---|
| १६१ | पटेल, श्री.राजकुमार दयाराम (मेळघाट) | ८ | १० | ४४.४४% |
| १६२ | पाटील, श्री.अनिल भाईदास (अमळनेर) | १७ | १ | ९४.४४% |
| १६३ | पाटील, श्री.बाबासाहेब मोहनराव (अहमदपूर) | १८ | ० | १००% |
| १६४ | पाटील, श्री.बाळासाहेब उर्फ शामराव (कराड उत्तर) | १८ | ० | १००% |
| १६५ | पाटील, श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी (मुक्ताईनगर) | ११ | ७ | ६१.११% |
| १६६ | पाटील, श्री.चिमणराव रुपचंद (एरंडोल) | १३ | ५ | ७२.२२% |
| १६७ | पाटील, श्री.जयंत राजाराम (इस्लामपूर) | १५ | ३ | ८३.३३% |
| १६८ | पाटील, श्री.किशोर आप्पा (पाचोरा) | १६ | २ | ८८.८८% |
| १६९ | पाटील, श्री.कुणालबाबा रोहिदास (धुळे ग्रामीण) | १७ | १ | ९४.४४% |
| १७० | पाटील (सडोलीकर), श्री.पी.एन.(करवीर) | १५ | ३ | ८३.३३% |
| १७१ | पाटील, श्री.प्रमोद (राजू) रतन (कल्याण ग्रामीण) | १४ | ४ | ७७.७७% |
| १७२ | पाटील, डॉ.राहुल वेदप्रकाश (परभणी) | ९ | ९ | ५०% |
| १७३ | पाटील (यड्रावकर), श्री.राजेंद्र शामगोंडा (शिरोळ) | १० | ८ | ५५.५५% |
| १७४ | पाटील, श्री.राजेश नरसिंगराव (चंदगड) | १८ | ० | १००% |
| १७५ | पाटील, श्री.राजेश रघुनाथ (बोईसर) | १४ | ४ | ७७.७७% |
| १७६ | पाटील, श्री.राणाजगजितसिंह पद्मसिंह (तुळजापूर) | १४ | ४ | ७७.७७% |
| १७७ | पाटील, श्री.रविशेठ (पेण) | १७ | १ | ९४.४४% |
| १७८ | पाटील, श्री.ऋतुराज संजय (कोल्हापूर दक्षिण) | १० | ८ | ५५.५५% |
| १७९ | पाटील, ॲड.शहाजीबापू राजाराम (सांगोले) | ९ | ९ | ५०% |
| १८० | पाटील, श्रीमती सुमनताई आर(तासगावकवठे महांकाळ) | १८ | ० | १००% |
| १८१ | पाटणी, श्री.राजेंद्र सुखानंद (करंजा) | ९ | ९ | ५०% |
| १८२ | पटोले, श्री.नानाभाऊ फाल्गुनराव (साकोली) | १५ | ३ | ८३.३३% |
| १८३ | पवार, श्री.अभिमन्यु दत्तात्रय (औसा) | १८ | ० | १००% |
| १८४ | पवार, श्री.अशोक रावसाहेब (शिरुर) | १४ | ४ | ७७.७७% |

| अ.क्र.<br>(१) | सदस्यांचे नाव<br>(२) | उपस्थिती<br>(३) | अनुपस्थिती<br>(४) | उपस्थितीची टक्केवारी<br>(५) |
|---|---|---|---|---|
| १८५ | पवार, श्री.लक्ष्मण माधवराव (गेवराई) | १६ | २ | ८८.८८% |
| १८६ | पवार, श्री.माधवराव निवृत्तीराव (हदगाव) | १५ | ३ | ८३.३३% |
| १८७ | पवार, श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) (कलवण) | १७ | १ | ९४.४४% |
| १८८ | पवार, श्री.राजेश (नायगांव) | १८ | ० | १००% |
| १८९ | पवार, श्री.रोहित (कर्जत जामखेड) | १३ | ५ | ७२.२२% |
| १९० | पावरा, श्री.काशिराम वेचान (शिरपूर) | १८ | ० | १००% |
| १९१ | फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य) | १५ | ३ | ८३.३३% |
| १९२ | फातर्पेकर, श्री.प्रकाश वैकुंठ (चेंबूर) | १८ | ० | १००% |
| १९३ | पिंपळे, श्री.हरीष मारोतीआप्पा (मूर्तिजापूर) | १६ | २ | ८८.८८% |
| १९४ | पोतनीस, श्री.संजय गोविंद (कलिना) | १३ | ५ | ७२.२२% |
| १९५ | प्रभू, श्री.सुनील (दिंडोशी) | १६ | २ | ८८.८८% |
| १९६ | रहांगडाले, श्री.विजय भरतलाल (तिरोरा) | १६ | २ | ८८.८८% |
| १९७ | राजाळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव) | १४ | ४ | ७७.७७% |
| १९८ | राजपुत, श्री.उदयसिंग सरदारसिंग (कन्नड) | १५ | ३ | ८३.३३% |
| १९९ | राणा, श्री.रवि (बडनेरा) | १३ | ५ | ७२.२२% |
| २०० | राणे, श्री.नितेश नारायण (कणकवली) | १५ | ३ | ८३.३३% |
| २०१ | राणे, श्री.सुनील दत्तात्रय (बोरिवली) | १८ | ० | १००% |
| २०२ | राठोड, श्री.तुषार गोविंद (मुखेड) | १६ | २ | ८८.८८% |
| २०३ | राऊत, डॉ.नितीन (नागपूर उत्तर) | १५ | ३ | ८३.३३% |
| २०४ | राऊत, श्री.राजेंद्र विठ्ठल (बार्शी) | ९ | ९ | ५०% |
| २०५ | राऊत, श्री.सुनिल राजाराम (विक्रोळी) | १७ | १ | ९४.४४% |
| २०६ | रावल, श्री.जयकुमार जितेंद्रसिंह (सिंदखेडा) | १८ | ० | १००% |
| २०७ | रायमुलकर, श्री.संजय भास्कर (मेहकर) | १८ | ० | १००% |
| २०८ | सागर, श्री.योगेश (चारकोप) | १८ | ० | १००% |

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | उपस्थिती (३) | अनुपस्थिती (४) | उपस्थितीची टक्केवारी (५) |
|---|---|---|---|---|
| २०९ | साकोरे-बोर्डीकर, श्रीमती मेघना (जिंतून) | १५ | ३ | ८३.३३% |
| २१० | साळवी, श्री.राजन प्रभाकर (राजापूर) | १८ | ० | १००% |
| २११ | सरनाईक, श्री.प्रताप बाबुराव (ओवळा-माजीवडा) | १८ | ० | १००% |
| २१२ | सरवणकर, श्री.सदा (माहिम) | १८ | ० | १००% |
| २१३ | ससाने, श्री.नामदेव जयराम (उमरखेड) | १६ | २ | ८८.८८% |
| २१४ | साटम, श्री.अमीत भास्कर (अंधेरी पश्चिम) | १८ | ० | १००% |
| २१५ | सातपुते, श्री.राम विठ्ठल (माळशिरस) | १५ | ३ | ८३.३३% |
| २१६ | सावंत, श्री.विक्रमसिंह बाळासाहेब (जत) | १६ | २ | ८८.८८% |
| २१७ | सावरकर, श्री.रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व) | १२ | ६ | ६६.६६% |
| २१८ | सावरकर, श्री.टेकचंद श्रावण (कामठी) | १५ | ३ | ८३.३३% |
| २१९ | सावकारे, श्री.संजय वामन (भुसावळ) | १७ | १ | ९४.४४% |
| २२० | सेल्वन, कॅप्टन आर तामिल (सायन कोळीवाडा) | १७ | १ | ९४.४४% |
| २२१ | शाह, श्री.फारुक अन्वर (धुळे शहर) | १२ | ६ | ६६.६६% |
| २२२ | शाह, श्री.पराग (घाटकोपर पुर्व) | १३ | ५ | ७२.२२% |
| २२३ | शेख, श्री.अस्लम रमजानअली (मालाड पश्चिम) | १४ | ४ | ७७.७७% |
| २२४ | शेख, श्री.रईस कासम (भिवंडी पुर्व) | १८ | ० | १००% |
| २२५ | शर्मा, श्री.गोवर्धन मांगीलाल (अकोला पश्चिम) | ० | १८ | ०% |
| २२६ | शेलार, ॲड.आशिष बाबाजी (वांद्रे पश्चिम) | १७ | १ | ९४.४४% |
| २२७ | शेळके, श्री.सुनिल शंकरराव (मावळ) | १८ | ० | १००% |
| २२८ | शिंदे, श्री.बबनराव विठ्ठलराव (माढा) | १६ | २ | ८८.८८% |
| २२९ | शिंदे, श्री.महेश संभाजीराजे (कोरेगाव) | ११ | ७ | ६१.११% |
| २३० | शिंदे, श्रीमती प्रणिती सुशीलकुमार (सोलापूर शहर मध्य) | १६ | २ | ८८.८८% |
| २३१ | शिंदे, श्री.संजयमामा विठ्ठलराव (करमाळा) | १७ | १ | ९४.४४% |
| २३२ | शिंदे, श्री.श्यामसुंदर (लोहा) | ११ | ७ | ६१.११% |

| अ.क्र.<br>(१) | सदस्यांचे नाव<br>(२) | उपस्थिती<br>(३) | अनुपस्थिती<br>(४) | उपस्थितीची टक्केवारी<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २३३ | शिंगणे, डॉ.राजेंद्र भास्करराव (सिंदखेड राजा) | १५ | ३ | ८३.३३% |
| २३४ | शिरोळे, श्री.सिध्दार्थ अनिल (शिवाजीनगर) | १६ | २ | ८८.८८% |
| २३५ | शिरसाट, श्री.संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम) | १८ | ० | १००% |
| २३६ | सिद्दिकी, श्री.झीशान बाबा (वांद्रे पुर्व) | १३ | ५ | ७२.२२% |
| २३७ | सोळंके, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव) | १७ | १ | ९४.४४% |
| २३८ | सोनवणे, श्रीमती लताबाई चंद्रकांत (चोपडा) | १२ | ६ | ६६.६६% |
| २३९ | सुर्वे, श्री.प्रकाश राजाराम (मागाठाणे) | ७ | ११ | ३८.८८% |
| २४० | तनपुरे, श्री.प्राजक्त प्रसादराव (राहुरी) | १३ | ५ | ७२.२२% |
| २४१ | तापकीर, श्री.भिमराव (अण्णा) धोंडीबा (खडकवासला) | १८ | ० | १००% |
| २४२ | तटकरे, श्रीमती अदिती सुनिल (श्रीवर्धन) | १६ | २ | ८८.८८% |
| २४३ | ठाकरे, श्री.आदित्य उध्दव (वरळी) | १४ | ४ | ७७.७७% |
| २४४ | ठाकरे, श्री.विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम) | ११ | ७ | ६१.११% |
| २४५ | ठाकूर, श्री.हितेंद्र विष्णु (वसई) | ६ | १२ | ३३.३३% |
| २४६ | ठाकूर, श्री.क्षितीज हितेंद्र (नालासोपारा) | ९ | ९ | ५०% |
| २४७ | ठाकूर, श्री.प्रशांत रामशेठ (पनवेल) | १८ | ० | १००% |
| २४८ | ठाकूर, श्रीमती विद्या जयप्रकाश (गोरेगाव) | १५ | ३ | ८३.३३% |
| २४९ | ठाकूर, ॲड.यशोमती चंद्रकांत (तिवसा) | १२ | ६ | ६६.६६% |
| २५० | थोपटे, श्री.संग्राम अनंतराव (भोर) | १५ | ३ | ८३.३३% |
| २५१ | थोरात, श्री.विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब (संगमनेर) | १७ | १ | ९४.४४% |
| २५२ | थोरवे, श्री.महेंद्र सदाशिव (कर्जत) | ९ | ९ | ५०% |
| २५३ | टिंगरे, श्री.सुनिल विजय (वडगाव शेरी) | १८ | ० | १००% |
| २५४ | टोपे, श्री.राजेशभैय्या (घनसावंगी) | १७ | १ | ९४.४४% |
| २५५ | तुपे, श्री.चेतन विठ्ठल (हडपसर) | १८ | ० | १००% |
| २५६ | वनगा, श्री.श्रीनिवास चिंतामण (पालघर) | १६ | २ | ८८.८८% |

| अ.क्र.<br><br>(१) | सदस्यांचे नाव<br><br>(२) | उपस्थिती<br><br>(३) | अनुपस्थिती<br><br>(४) | उपस्थितीची टक्केवारी<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २५७ | वडेट्टीवार, श्री.विजय नामदेवराव (ब्रम्हपुरी) | १६ | २ | ८८.८८% |
| २५८ | वायकर, श्री.रविंद्र दत्ताराम (जोगेश्वरी पूर्व) | १८ | ० | १००% |
| २५९ | वळसे पाटील, श्री.दिलीप दत्तात्रय (आंबेगाव) | ११ | ७ | ६१.११% |
| २६० | वानखडे, श्री.बळवंत बसवंत (दर्यापूर) | १६ | २ | ८८.८८% |
| २६१ | वरपुडकर, श्री.सुरेश अंबादासराव (पाथरी) | ११ | ७ | ६१.११% |
| २६२ | उईके, श्री.अशोक रामाजी (राळेगांव) | १६ | २ | ८८.८८% |
| २६३ | यादव (लोणीकर), श्री.बबनराव दत्तात्रय (परतूर) | १७ | १ | ९४.४४% |
| २६४ | येरावार, श्री.मदन मधुकर (यवतमाळ) | १४ | ४ | ७७.७७% |
| २६५ | झनक, श्री.अमित सुभाषराव (रिसोड) | १७ | १ | ९४.४४% |

# विवरण क्रमांक – ७

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत

### सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३

**सकाळी ११.०० वाजता दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर झालेले माननीय राज्यपालांचे अभिभाषण संपल्यावर २० मिनिटांच्या विश्रांतीनंतर विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

**शुभारंभ** : अधिवेशनाचा शुभारंभ '**वंदे मातरम्**' या गीताच्या समूह गायनाने झाला. त्यानंतर राज्य गीताचे समूह गायन झाले.

**मराठी भाषा गौरव दिनानिमित्त घोषणा –**

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली -

"प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ च्या पहिल्या दिवशी "मराठी भाषा गौरव दिन" येत असून महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयातर्फे "मराठी भाषा गौरव दिन" आज सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मध्यवर्ती सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. माननीय पीठासीन अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मराठी भाषा मंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री तसेच दोन्ही सभागृहातील माननीय विरोधी पक्षनेते यांच्या सन्माननीय उपस्थितीत कार्यक्रम आयोजित केलेला असून 'साहित्याची ज्ञानयात्रा' या कार्यक्रमामध्ये मराठी साहित्यातील 'ज्ञानपीठ पुरस्कार' विजेत्या लेखकांच्या साहित्याचे अभिवाचन आणि सादरीकरण यांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित रहावे. सदर कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका सर्व सन्माननीय सदस्यांना टपाल खणाद्वारे वितरित करण्यात येत आहे."

श्री. छगन भुजबळ वि.स.स. यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासंदर्भात आपले मत मांडले.

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी देखील यासंदर्भात आपले मत मांडले.

**१.** प्रधान सचिवांनी, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** श्री. अतुल भातखळकर वि.स.स. यांनी पुढील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला.

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो."

डॉ. संजय कुटे वि.स.स. यांनी, सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास अनुमोदन दिले.

सदर प्रस्तावावर मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी व बुधवार, दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजी चर्चा होईल. त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येते की, ज्या सन्माननीय सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर सुधारणा द्यायच्या असतील त्यांनी सुधारणांच्या सूचना कटाक्षाने सॉफ्ट कॉपीमध्ये आज सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील या बेताने पाठवाव्यात. तसेच आभार प्रदर्शक प्रस्तावास सन्माननीय सदस्यांकडून देण्यात येणाऱ्या सुधारणा पुस्तिकेचे वितरण सन्माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखीव असलेल्या टपालखणाद्वारे दिनांक १ मार्च, २०२३ रोजी वितरित करण्यात येतील याबाबतच्या सविस्तर सूचना पत्रक भाग २ द्वारे निर्गमीत करण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास अनुमोदन देण्याच्या संदर्भात कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

**३.** उप मुख्यमंत्री सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्या सभागृहात सादर केल्या व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड (३) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्या विचारात घेण्यात याव्यात, अशी शिफारस या सभागृहाला केली आहे असे सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या असून पुरवणी मागण्यांचे विवरणपत्र सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावरून तसेच टपालखणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या मागण्यांवर चर्चा व मतदान दिनांक २ व ३ मार्च, २०२३ रोजी होईल. दिनांक २ मार्च, २०२३ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमात घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक १ मार्च, २०२३ रोजी व दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमात घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना दिनांक २ मार्च, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अजित पवार, वि.स.स. यांनी पुढील कार्यपद्धतीविषयक मुद्दे उपस्थित केले.

(१) विधानसभा सदस्यांनी दाखल केलेला तारांकित प्रश्न स्वीकृत झाला किंवा अस्वीकृत झाला याबाबत संबंधित सन्माननीय सदस्यांना विधिमंडळ सचिवालयाकडून ज्ञापन दिले जाण्याची पद्धत बंद करण्यात आली असणे.

(२) सर्व सन्माननीय सदस्यांना माननीय अध्यक्षांनी मान्य केलेली कपात सूचनांची यादी टपालखणाद्वारे एकत्रितरीत्या पाठवण्याची पद्धत बंद करण्यात आली असणे.

(३) रात्री १०.०० पर्यंत दिवसाच्या कामकाजाचा क्रम विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याची आवश्यकता जेणेकरून मंत्रीमहोदयांना वेळेवर उत्तर देता येईल तसेच सन्माननीय सदस्यांना अधिकचे प्रश्न उपस्थित करण्यास मदत होईल.

श्री. नाना पटोले वि.स.स. यांनी, "नागपूर येथील अधिवेशनामध्ये माननीय अध्यक्षांवर अविश्वास व्यक्त करणाऱ्या प्रस्तावाची सूचना दिली होती, त्यासंदर्भातील कोणतीही माहिती विधानमंडळाकडून देण्यात आली नसणे" इ. बाबत कार्यपद्धती विषयक मुद्दा उपस्थित केला.

उक्त अविश्वास प्रस्तावास देण्यात आलेले रीतसर उत्तर सदस्यांना पाठविण्यात आलेले असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत अधिक खुलासा केला.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या कार्यपद्धतीविषयक मुद्यांच्या संदर्भात सभागृहाचे आजचे कामकाज झाल्यानंतर माननीय संसदीय कामकाज मंत्री व माननीय विरोधी पक्ष नेत्यांसोबत मा. अध्यक्ष महोदयांच्या दालनात बैठक घेऊन या विषयावर योग्य तोडगा काढण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** प्रधान सचिवांनी, विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेल्या खालील विधेयकांची यादी सभागृहास वाचून दाखवली -

(१) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२.

(२) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई विधेयक, २०२२.

प्रधान सचिवांनी, माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या पुढील विधेयकांची यादी सभागृहात वाचून दाखविली –

(१) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२.

(२) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२.

(३) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक,२०२२.

(४) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२.

(५) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२.

(६) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे (सुधारणा) विधेयक, २०२२.

(७) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) विधेयक, २०२२.

(८) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई विधेयक, २०२२.

**५.** माननीय अध्यक्षांनी महाराष्ट्र विधानसभा नियम ८ च्या पोट-नियम (१) अन्वये खालील सन्माननीय सदस्यांची सभाध्यक्षांच्या तालिकेवर नामनियुक्ती केली.

(१) श्री. योगेश सागर, वि.स.स.,

(२) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.,

(३) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स.,

(४) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.,

**६.** पुरः स्थापनार्थ -

(१) उद्योग मंत्र्यांनी सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

(२) ग्रामविकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

**७.** माननीय अध्यक्षांनी, "श्री. लक्ष्मण पांडुरंग जगताप, विद्यमान विधानसभा सदस्य, श्री. मोरेश्वर विठ्ठलराव टेमुर्डे, माजी विधानसभा उपाध्यक्ष, श्री. केशवराव शंकरराव धोंडगे, माजी लोकसभा सदस्य व माजी वि. स. स., सर्वश्री डॉ. देवीसिंह रामसिंह शेखावत, सदाशिवराव शंकरराव माळी, उत्तमराव केशवराव पटवारी-भालेराव, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची बैठक मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३**

**शेतकऱ्यांच्या मालाला कमी भाव मिळत असल्याबाबत –**

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "राज्यातील कापूस, हरभरा, द्राक्ष, सोयाबीन तसेच कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असून त्यांच्या पिकाला योग्य भाव न मिळणे, या बाबत सरकारने हस्तक्षेप करून नाफेड तसेच फेडरेशनच्या मार्फत कांदा खरेदी करण्यास सांगणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याबाबत ॲड. राहुल कुल, श्री. छगन भुजबळ, डॉ. राहुल आहेर, श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनीदेखील आपले म्हणणे मांडले.

मुख्यमंत्र्यांनी उक्त मुद्याबाबत खुलासा केला.

**१.** (अ) (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाला.

(३) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अडतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, 'राज्यात इयत्ता १२वी ची परीक्षा सुरू असताना सुरू झालेल्या शिक्षकांचा संपाच्या गंभीर प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सदरची माहिती गंभीर असून विद्यार्थ्यांच्या पुढील परीक्षा व प्रवेशावर परिणाम होणार असल्याने शासनाने या विषयाची गंभीर नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

या संदर्भात तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन एक बैठक घेऊन अडचणी व त्रुटी दूर करण्यात येतील असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "राज्यातल्या २ लाखाहून अधिक अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मुंबईतल्या आझाद मैदान येथे सुरू असलेले आंदोलन व हिवाळी अधिवेशनादरम्यान देण्यात आलेल्या आश्वासानांची पूर्तता न होणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सदर बाबतीत सरकार सकारात्मक असून आज दुपारी १.३० वाजता त्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करून दिलासा देणारा निर्णय घेण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी, 'बेळगाव-कारवार येथील हजारो लोकांनी मुंबईत धरणे देणे, या प्रकरणी न्यायालयीन निर्णय लागेपर्यंत सीमावर्ती भागातील लोकांना दिलासा देण्याची गरज' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याबाबत मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, 'कृषि महाविद्यालय व तांत्रिक अभ्यासक्रमांच्या एमपीएससीच्या परीक्षेबाबत स्पष्टीकरण देणे' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याबाबत मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले.

**श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी,** 'राज्यात 'मराठी भाषा दिन' साजरा होत असताना गेल्या गुढीपाडव्याला भूमिपूजन झालेल्या मराठी भाषा भवनाचे काम सुरू होण्याची आवश्यकता तसेच समृद्धी महामार्गावरील गावांचे हिंदीमधील फलक मराठीत लिहिण्याची गरज' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे—**

उद्योग मंत्र्यांनी, 'राज्य परिवहन महामंडळातील निवृत्त कर्मचारी व त्यांच्या वारसांना मागील १० वर्षांपासून निवृत्तीवेतन मिळालेले नसणे' या विषयावरील श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३३३८७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) उद्योग मंत्र्यांनी, कोंकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) कृषी मंत्र्यांनी,

(क) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ख) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असली तरी विरोधी पक्षनेत्यांना काही मांडावयाचे असल्यास त्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "राज्यातल्या अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनावर झालेला बेछूट लाठीमार," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी देखील उपरोक्त मुद्यावर आपले म्हणणे मांडले.

**४.** उप मुख्यमंत्री वरिष्ठ सभागृहामध्ये उत्तर देत असल्यामुळे आजच्या दिवसाच्या कामकाजामध्ये दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी क्रमांक १ व २ नंतर घेण्यात येतील, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, "बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. चहल यांनी एक परिपत्रक काढून त्यात यापुढे मुंबईतील जी कामे द्यायची असतील ती पालकमंत्र्यांच्या मार्फत किंवा परवानगीने द्यावीत, असा उल्लेख असणे, कामे देण्याच्या पद्धतीमध्ये झालेल्या बदलाबाबत अवगत करावे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासन योग्य तो निर्णय घेईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री छगन भुजबळ, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, अबू आजमी, डॉ.बालाजी किणीकर, श्री.संजय जगताप, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

'राज्यात सुमारे १६ हजारांपेक्षा जास्त कुष्ठरोगी असल्याची गंभीर बाब दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, कुष्ठरोग मुक्तीसाठी प्रशासकीय पातळीवर सुरू असलेल्या कार्यवाहीस अपयश येत असल्याने सदरची समस्या अधिकच गंभीर होत असणे, पालघर, चंद्रपूर, नाशिक, जळगाव, ठाणे, गडचिरोली, पुणे यासारख्या जिल्ह्यांमध्ये कुष्ठरोग्यांची संख्या प्रचंड असणे, उत्तर महाराष्ट्रात तीन हजारपेक्षा जास्त, मराठवाड्यात दोन हजारपेक्षा जास्त तर पश्चिम महाराष्ट्रात दीड हजारपेक्षा जास्त कुष्ठरोग्यांची संख्या असणे, हजारो कुष्ठरोगी उपचारांसाठी पुढे येत नसणे, शिंकेतून, खोकल्यातून कुष्ठरोगाचे जंतू बाहेर पडले की ते १५ दिवस जिवंत रहात असणे, प्रतिकारशक्ती कमी असलेल्या लोकांना त्यातूनच कुष्ठरोगाची बाधा होत असल्याची चिंताजनक बाब निदर्शनास येणे, हजारो रुग्ण कुष्ठरोग बाधित असल्याची शक्यता विचारात घेता, यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, कुष्ठरोगी व्यक्ती समाजामध्ये राजरोसपणे वावरत असल्याने अनेक नागरिक बाधित होत असल्याने पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असणे, पुढील काळात ही समस्या आणखी उग्र स्वरुप धारण करणार असल्याने, कुष्ठरोग निर्मूलनासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्सर होत असलेले दुर्लक्ष सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, 'कोणत्या खात्याचे मंत्री कोणते आहेत हे सदस्यांना गत दोन्ही अधिवेशनांमध्ये कळलेले नसणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते) यांनी उपरोक्त मुद्याच्या पुष्ट्यर्थ आपले म्हणणे मांडले.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी सदर मुद्यावर आपले मत मांडले.

'दोन्ही सभागृहांच्या कामकाजामध्ये जास्तीत जास्त कसा समन्वय ठेवता येईल याबाबत विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) सर्वश्री अतुल भातखळकर, छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री धनंजय मुंडे, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, दौलत दरोडा, सुनिल प्रभू, अनिल पाटील, अबू आजमी, भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.सुभाष धोटे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"रत्नागिरी जिल्ह्यातील पत्रकार शशिकांत वारीसे यांच्या दुचाकीला धडक लागून अपघातामध्ये त्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, रिफायनरी समर्थकाने वारिसेंची दुचाकी उडवून जीव घेतल्याचा आरोप होत असणे, पत्रकार वारीसे यांच्या हत्येचा कट हा पूर्वनियोजित असल्याचा संशय निर्माण होत असणे, त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करून दोषींवर कडक कारवाई तसेच, पत्रकार वारीसे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, राजेश एकडे, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.संजय जगताप, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (जलसंपदा) लक्ष वेधले.

"१९६८ च्या मूळ आराखड्यानुसार ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गत पैनगंगा नदीवर ईसापूर धरण व कयाधू नदीवर सापळी धरण प्रस्तावित असणे, मूळ मंजुरीनुसार ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या (इसापूर व सापळी) धरणाच्या पाण्यातून नांदेड, हिंगोली, यवतमाळ जिल्ह्याकरिता अंदाजे १,२५,१२६ हेक्टर सिंचन क्षेत्र प्रस्तावित असणे, ईसापूर धरणाचे काम १९८२ या वर्षी पूर्ण होऊनही सापळी धरणाचे काम अद्याप सुरू झालेले नसणे, सन २००८ च्या समरूपता अभ्यासानुसार ऊर्ध्व बाजूस पाण्याचा वापर वाढवल्यामुळे व उपलब्ध सेवा कमी झाल्यामुळे सिंचन

क्षेत्र १,२५,१२६ हेक्टर वरून १,०७,०९० हेक्टर पर्यंत सीमित करण्यात आलेले असणे, तरीही वाशिम व हिंगोली जिल्ह्यासाठी १०५.१३ दलघमी पाणी ईसापूर धरणाच्या येव्यातून उपलब्ध करून दिलेले असणे, सन १९८२ ते २०१७ या दरम्यान ईसापूर धरणात फक्त ३८२ दलघमी येवढाच येवा असल्याने धरणात ५८२ दलघमीची तूट असणे, सापळी धरण न झाल्यामुळे ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाची एकूण तूट ७८१ दलघमी असणे, परिणामतः सापळी धरण वगळून ईसापूर धरणातील पाण्याचा विचार केल्यास केवळ ३१३९६ हे (३९%) क्षेत्र सिंचित होण्याची शक्यता असणे, प्रस्तावित समरूपता अभ्यासानुसार ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाची विश्वासार्हता ७५% वरून ३०% आल्याचे दिसून येणे, आज पर्यंत ईसापूर धरण व वितरण व्यवस्थेच्या कामावर सुमारे रु.३२५० कोटी इतका खर्च झाला असून सिंचन क्षमता १,०७,०९० हे. झाली असणे, दिनांक १३ मार्च, २०१९ च्या पत्राने शासनाने टप्पा-२ अंतर्गत भाग-१ मधील १०९ दलघमी पाणी कयाधू खोऱ्यातून ईसापूर धरणात प्रवाही पद्धतीने वळविण्यासाठी प्रस्तावित कामांना तत्त्वतः मान्यता देणे, तसेच दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ च्या पत्राने उपलब्धतेनुसार अनुज्ञेय पाण्यातून अस्तित्वातील धरणाच्या ऊर्ध्व बाजूस कोणतेही नवीन प्रकल्प न घेण्याची सूचना देणे तरीही खरबी वळण योजनेचे पाणी कमी करून जांभरुन जिल्हा हिंगोली येथील तलावासाठी पाणी उपलब्ध करून देणे बाबत महामंडळाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी अहवाल देणे या परिस्थितीत ऊर्ध्व पैनगंगा, प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातून भविष्यात अन्य प्रकल्पासाठी पाणी न देता पुनर्नियोजन व पुनर्विलोकन करण्यासंबंधी प्रस्तावास मान्यता देण्यास लागणारा विलंब, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक चार वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३ व ५ पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "सध्या सुरू असलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत इंग्रजी, हिंदी या विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये आढळून आलेल्या गंभीर चुका," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

दोन्ही मुद्यांबाबत माहिती घेऊन विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल, असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**५.** माननीय तालिका सभाध्यक्षांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

'राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो'

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी सहभाग घेतला.

(१) डॉ. संजय कुटे (२) श्री. अजित पवार (विरोधी पक्षनेते)

श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी, 'माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील प्रस्तावावर चर्चा सुरू असताना सभागृहात मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री अनुपस्थित असून केवळ एकच मंत्री उपस्थित असणे' इ. बाबत कार्यपद्धतीविषयकत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस) (चर्चा पुढे सुरू) —**

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा पुढे सुरू झाली.
चर्चेत पुढील सदस्यांनी सहभाग घेतला.

(३) श्रीमती यामिनी जाधव (४) श्री. सुरेश वरपुडकर

(५) श्री. रईस शेख (हिंदी भाषण प्रलंबित) (६) श्री. प्रकाश आवाडे (चर्चा अपूर्ण)

**६. (अ) पुरःस्थापनार्थ –**

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ३ – डॉ. बाबासाहेब आंबडेकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे –**

(१) ग्रामविकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(१) श्री. छगन भुजबळ (२) श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते

(३) श्री. रवींद्र वायकर (४) श्रीमती मनिषा चौधरी

(५) श्री. अनिल पाटील

ग्रामविकास मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंड २ ते ३ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.
खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.
खंडशः विचारानंतर सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २ संमत झाले.

(२) उद्योग मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) सार्वजनिक उद्योग व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ५ - महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले व भाषण केले.

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस) (चर्चा पुढे सुरू) -**

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा पुढे सुरू झाली.
चर्चेत पुढील सदस्यांनी सहभाग घेतला.

(७) श्री. रवींद्र वायकर
(८) श्री. दीपक चव्हाण
(९) श्री. अमिन पटेल (हिंदी भाषण प्रलंबित)
(१०) श्री. नितेश राणे
(११) श्री. किशोर जोरगेवार
(१२) श्री. बाबासाहेब पाटील
(१३) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(१४) श्री. सुनील प्रभू
(१५) श्रीमती मनिषा चौधरी

**७.** डॉ. संजय कुटे व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये यांचा प्रस्ताव -

डॉ. संजय कुटे, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला -

‘मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु. ६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु. १२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरित करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दीडपटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना टाळाटाळ करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेऊन महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही आघाडी सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही

प्रयत्न न करणे, परंतु त्याच वेळेस महायुती सरकारने जून २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफूट पाणी मराठवाडा व खानदेशात वळविण्याची घोषणा करणे, परंतु मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भीमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, परंतु महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन, शेतकरी बांधवांच्या शेतीकरिता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, परंतु महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरिता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे, परंतु महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरू करून जिल्ह्या-जिल्ह्यात आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'

(भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची बैठक बुधवार, दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल, असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

## बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३

श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्राच्या विधिमंडळाविषयी श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य यांनी केलेले अपमानास्पद वक्तव्य" इ. बाबत दिलेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनेबाबत ॲड. आशिष शेलार, श्री.अजित पवार, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. भरतशेठ गोगावले, ॲड. आशिष जयस्वाल, श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी उपरोक्त विशेषाधिकारभंगाच्या सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी आज दिलेली हक्कभंगाची सूचना मला प्राप्त झाली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून १३ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून २३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती असल्यामुळे सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नाही त्यामुळे सभागृहाची बैठक ३० मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४३ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक सकाळी १२ वाजून १३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १३ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी उपर्निर्दिष्ट हक्कभंगाच्या सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. संजय शिरसाट, वि.स.स., पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री, सर्वश्री नाना पटोले, नितेश राणे, कालिदास कोळंबकर, वि.स.स. यांनीदेखील सदर हक्कभंगाच्या सूचनेवर आपले मत व्यक्त केले.

सदर प्रकरणी दोन दिवसांत चौकशी करून बुधवार दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी सभागृहास याबाबतचा पुढील निर्णय अवगत करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मोठ-मोठ्याने घोषणा देतच असतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक आता दिवसभराकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

## गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३

श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "विशेषाधिकारभंगाच्या सूचनेबाबत गठित करण्यात आलेल्या समितीचे पुनर्गठन करण्यात यावे" इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

ॲड.आशिष शेलार, सर्वश्री रविंद्र वायकर, अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात आपले मत व्यक्त केले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी उत्तर दिले.

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "सर्वश्री अतुल भातखळकर व भरत गोगावले यांनी उपस्थित केलेली हक्कभंगाची सूचना वाचत असताना माननीय अध्यक्षांनी पुन्हा पुन्हा सदर सूचना महाराष्ट्र विधानसभा नियम २७२ अन्वये असल्याचा केलेला उल्लेख" इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भातील रेकॉर्ड तपासून प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर निर्णय देण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी विधानसभा सदस्यांची विधानसभा विशेषाधिकार समिती घटित केल्याबाबत खालील घोषणा केली –**

याद्वारे सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करू इच्छितो की, विद्यमान सत्रात विशेषाधिकार समितीच्या गठनाची आवश्यकता विचारात घेता सन २०२३-२०२४ या वर्षासाठी मला प्राप्त असलेल्या अधिकारात मी महाराष्ट्र विधानसभा नियम २७८ अन्वये दिनांक १ मार्च, २०२३ रोजी विधानसभा सदस्यांची विधानसभा विशेषाधिकार समिती घटित केली असून त्यावर खालील सन्माननीय विधानसभा सदस्यांची नामनियुक्ती केली आहे.

(१) ॲड. श्री. राहुल कुल, वि.स.स.

(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(३) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(४) श्री. अमित साटम, वि.स.स.

(५) श्री. नितेश राणे, वि.स.स.

(६) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स.

(७) श्री. संजय शिरसाठ, वि.स.स.

(८) श्री. सदा सरवणकर, वि.स.स.

(९) श्री. दिलीप मोहिते पाटील, वि.स.स.

(१०) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.

(११) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स.

(१२) डॉ. नितीन राऊत, वि.स.स.

(१३) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

(१४) श्री. विनय कोरे, वि.स.स.

(१५) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

ॲड. श्री. राहुल कुल, विधानसभा सदस्य हे या समितीचे समिती प्रमुख म्हणून काम पाहतील.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार प्रश्न उत्तरित झाले. (चर्चा अपूर्ण)

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सव्वीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** पाणीपुरवठा व स्वच्छता (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** माननीय अध्यक्षांनी, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येणारे अशासकीय ठराव व अशासकीय विधेयके यांना नेमून देण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजासंबंधीची घोषणा सभागृहात केली.

आज गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ११ सूचना प्राप्त झालेल्या आहेत. परंतु आज सन २०२२-२०२३ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस) असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाही. अतः या सर्व सूचनांना दालनामध्ये अनुमती नाकारली आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांनी, “कांदा उत्पादक शेतकरी अत्यंत अडचणीत आला असणे” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
उपरोक्त मुद्यासंदर्भात उप मुख्यमंत्र्यांनी सविस्तर खुलासा केला.

श्री.धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी, “पीक विमा कंपनीने बीड जिल्ह्यातील १२ हजार शेतकऱ्यांची खाती बेकायदेशीरपणे गोठविणे” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात नोंद घेतली असून शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यात येईल. त्याकरिता जे काही कायदेशीर मार्ग असतील त्यांचा अवलंब करण्यात येईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांवरील चर्चा उद्या सकाळी ९.४५ ते सकाळी १०.४५ पर्यंत सभागृहाच्या विशेष बैठकीत घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, "पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी." असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी, "केंद्र सरकारने मागच्या वर्षभरामध्ये गॅस सिलेंडरच्या किंमतीमध्ये सहा वेळा २०३ रुपयांनी वाढ केलेली आहे तसेच विधानसभेचे अधिवेशन पूर्ण होईपर्यंत कृषी पंपांची वीज जोडणी तोडू नये अशा सूचना दिलेल्या असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

**५. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा – (शेवटचा दिवस).**

**प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.**

**राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला —**

(१) श्री.छगन भुजबळ
(२) ॲड.आशिष शेलार
(३) श्री.रमेश बोरनारे (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री.रोहित पवार, वि.स.स. यांनी, "पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची राहण्याची उत्तम व्यवस्था शासनाने करण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने या संदर्भात नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.
उपरोक्त मुद्याची नोंद घेतली असल्याचे गृह राज्यमंत्र्यानी सांगितले.

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (शेवटचा दिवस).**

**राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –**

(४) श्री.कॅप्टन आर.तमिलसेल्वन
(५) श्री.अशोकराव चव्हाण
(६) श्री.अबु आजमी (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**हरकतीचा मुद्दा –**

श्री.राम सातपुते, वि.स.स. यांनी, "सन्माननीय सदस्य श्री.अबु आजमी यांनी सभागृहात केलेले आक्षेपार्ह वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे" इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भातील रेकॉर्ड तपासून काही आक्षेपार्ह आढळल्यास ते रेकॉर्डवरून काढण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा – (शेवटचा दिवस).**

**राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –**

(७) श्री.जयकुमार रावल

(८) डॉ.जितेंद्र आव्हाड (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नाही त्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ४७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी, "सन्माननीय सदस्य श्री.राम सातपुते यांनी सभागृहात श्री.शरद पवार यांच्याविषयी एकेरी उल्लेख करणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.छगन भुजबळ, वि.स.स., श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते व ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.राम सातपुते, वि.स.स. यांनी दिलगिरी व्यक्त केली.

रेकॉर्ड तपासून आक्षेपार्ह वक्तव्य काढण्यात येईल. आता जे सभागृहामध्ये घडले अथवा ज्यावर हरकत घेतली आहे ते सर्व रेकॉर्ड तपासून घेतल्याशिवाय सदरहू कामकाजाचे प्रक्षेपण केले जाऊ नये असे माननीय अध्यक्षांनी निर्देश दिले.

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (शेवटचा दिवस).**

**राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –**

(९) श्री.भास्कर जाधव (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**७.** (१) गृह विभाग

(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

या विभागांच्या पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील. विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरतो असे सांगून माननीय अधक्षांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

(चर्चा अपूर्ण)

(१) श्री.सुनील केदार, वि.स.स. यांनी, “नागपूर जिल्ह्यांतर्गत कन्हान पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांनी केलेल्या मारहाणीमध्ये एका निष्पाप आदिवासी मुलाचा पोलीस कोठडीत मृत्यू होणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री.सुनिल केदार यांनी सभागृहासमोर मांडलेली माहिती अत्यंत गंभीर असल्यामुळे शासनाने याची नोंद घेऊन त्वरित उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मुद्याची नोंद घेण्यात आली असून यासंदर्भात निवेदन करण्यात येईल असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

(२) प्रा. श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, “धारावी येथे मोठी आग लागून झोपड्यांचे व व्यावसायिक गाळ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्या प्रा.श्रीमती वर्षा गायकवाड यांनी दिलेल्या माहितीची शासनाने नोंद घेऊन उचित उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मुद्याची नोंद घेण्यात आली असून यासंदर्भात निवेदन करण्यात येईल असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री.संजय केळकर, वि.स.स. यांनी, “ठाणे शहरामध्ये बसण्याच्या जागेवरून एका फेरीवाल्याची हत्या झाली असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स. यांनी, “नायगांव-वडाळा विधानसभा क्षेत्रामध्ये विमल डेव्हलपर्स हा विकासक मालमत्तेबाबतचा ६० कोटी रूपयांचा भरणा महापालिकेमध्ये न भरता १ हजार झोपड्यांचा विकास करीत असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री.संदीप क्षीरसागर, वि.स.स. यांनी, “बीडमध्ये काही मंजूर विकासकामांची उद्घाटने कोणत्याही राजकीय पदावर नसलेले लोक करीत असणे आणि त्यांच्यासोबत प्रशासकीय अधिकारी त्या कार्यक्रमांना उपस्थित राहत असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

तपासून समितीकडे पाठविण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२२-२०२३ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस) –**

(चर्चा पुढे सुरू)

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

| | |
|---|---|
| (१) ॲड.अशोक पवार | (२) ॲड.राहुल कुल |
| (३) श्रीमती यामिनी जाधव | (४) श्री.सुनिल केदार |
| (५) श्री. रईस शेख | (६) श्री. रोहित पवार |
| (७) श्री. दादाराव केचे | (८) श्री. रविंद्र वायकर |
| (९) श्री. शिरिषदादा चौधरी | (१०) श्री.राजेश पाटील |
| (११) श्री.संदिप क्षीरसागर | (१२) श्रीमती मोनिका राजळे |
| (१३) श्री.योगेशदादा कदम | (१४) श्रीमती मंजुळा गावित |
| (१५) श्री. लहु कानडे | (१६) श्रीमती मंदा म्हात्रे |
| (१७) श्री.सुनिल शेळके | (१८) श्री.सिद्धार्थ शिरोळे |
| (१९) श्री.चंद्रकांत निंबा पाटील | (२०) श्री. हिरामण खोसकर |
| (२१) श्रीमती गीता जैन | (२२) डॉ. किरण लहामटे |
| (२३) श्री.दिलीप बोरसे | (२४) श्री.रमेश कोरगावकर |
| (२५) कु. आदिती तटकरे | (२६) श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे |
| (२७) श्री.सुरेश भोळे | (२८) श्री.सुनिल राणे |
| (२९) श्रीमती सरोज अहिरे | (३०) डॉ.विश्वजीत कदम |
| (३१) श्री. बाळासाहेब आजबे | (३२) निलेश लंके |

पुरवणी मागण्यावरील चर्चेस पशुसंवर्धन मंत्री, उद्योग मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, कृषी मंत्री, उप मुख्यमंत्री यांनी आपापल्या विभागावरील चर्चेस उत्तर दिले.

आता सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवरील (१) गृह विभाग, (२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, (३) सार्वजनिक बांधकाम विभाग, (४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**८. विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.**

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री अनिल पाटील व धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुनिल केदार व अस्लम शेख, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव, श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सातवा प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा आठवा प्रस्ताव आणि श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा नववा प्रस्ताव अनुक्रमे मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.पृथ्वीराज चव्हाण
(२) श्री.छगन भुजबळ
(३) श्री.रविंद्र वायकर

विधेयकावरील चर्चेस संसदीय कार्य मंत्र्यांनी उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.
उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) (क) उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.**

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा, तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा, चौथा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री.विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, सुनिल केदार व ॲड. यशोमती ठाकूर वि.स.स. यांचा, पाचवा प्रस्ताव सन्माननीय सदस्य, श्री.छगन भुजबळ, वि.स.स., यांचा, सहावा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांचा, सातवा प्रस्ताव सन्माननीय सदस्य, श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा, आठवा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री.बाळासाहेब थोरात, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप व नाना पटोले, वि.स.स. यांचा आहे त्यांनी आपापले प्रस्ताव मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव मतास टाकले जातील ते असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.छगन भुजबळ

(२) श्री.पृथ्वीराज चव्हाण

(३) श्री.रविंद्र वायकर

(४) श्री.अमीन पटेल

(५) ॲड. आशिष शेलार

विधेयकावरील चर्चेस उद्योग मंत्र्यांनी उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.
उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी सकाळी ०९.४५ वाजता पुन्हा भरेल. सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३**

**(१) ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, संजय केळकर, बंटी भांगडिया, मंगेश चव्हाण, योगेश सागर, अतुल भातखळकर, मिहीर कोटेचा, पराग शाह, गणपत गायकवाड, कुमार आयलानी,**

**संतोष दानवे, श्रीमती श्वेता महाले, डॉ.भारती लव्हेकर, श्री.रईस शेख, ॲड. राहुल कुल, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"देशातून निर्यात झालेल्या सदोष कफ सिरपमधील हानिकारक घटकद्रव्यांमुळे ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने निदर्शनास आणून दिल्यानंतरही राज्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या औषधाच्या गुणवत्ता तपासण्या (स्टॅबिलिटी टेस्ट्स) झाल्यानंतरच जागतिक बाजारपेठेत पाठवणे बंधनकारक असताना राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी २००० पेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेताच निर्यात होत असल्याचे फेब्रुवारी २०२३ मध्ये आढळून येणे, त्यामुळे राज्यातील या २०० औषध उत्पादकांची सखोल चौकशी करून त्यांचे परवाने रद्द करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री. प्रकाश आबिटकर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"राज्यात पतसंस्थांची संख्या अंदाजे १३३७९ असून ग्राहक सभासद संख्या १ कोटी ३५ लाखांहून अधिक असून एकूण ठेवींची संख्या अंदाजे ५७३२२ कोटी रुपये असणे, यामध्ये प्रामुख्याने पतसंस्थेतील ठेवींना संरक्षण मिळाले पाहीजे याकरिता शासन स्तरावरून उपाययोजना होणे गरजेचे असणे, दिवसेंदिवस खाजगी फायनांन्स करणाऱ्या विविध कंपन्यांमुळे वाढती स्पर्धा, वसुली करताना येणाऱ्या अडचणी या सर्व आर्थिक परिस्थितीमुळे पतसंस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सध्याच्या परिस्थितीत पतसंस्थेस कारभार चालवण्यासाठी शासनाकडून कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत करण्यात न येणे, त्यामुळे पतसंस्थांचा कारभार त्यांच्या स्वखर्चाच्या बजेट मधून चालू असणे, पतसंस्थांकरिता नव्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये ९७ घटना दुरुस्ती अंतर्गत सहकारी पतसंस्थांना कोणत्याही प्रकारे विचारात न घेता त्यांचे आर्थिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता त्यांना अंशदान अनुदान भरण्याची जाचक अट लागू करणे, अंशदान अनुदानाचा उपयोग कशासाठी होणार आहे याबाबत स्पष्टता नसल्याने सर्व संस्थांनी त्यास विरोध दर्शवून ते न भरण्याचे ठराव केला असणे, तसेच पतसंस्थांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा सवलती लाभत नसणे, या जाचक अटींचा दूरगामी विपरीत परिणाम संस्थेच्या आर्थिक प्रगतीवर होणे, यामध्ये प्रामुख्याने अपसेट प्राईजचा कालावधी वाढविण्याबाबत कार्यवाही करणे, कलम १०१ अन्वये जप्ती दाखल्याच्या विरुध्द पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करणे, पतसंस्थांची विविध मानकांचे नियमित देखरेख करणे, कलम १४४/५ अ नुसार पतसंस्थांना फक्त "अ" वर्ग सभासदांकडूनच ठेवी स्वीकारण्याबाबत बंधन घालण्यात आल्यामुळे संस्थांना व्यवसाय करण्यात अडचणी

येत असून "ब" वर्ग सभासदांकडूनही ठेव स्वीकारण्याच्या अनुषंगाने सुधारणा करणे गरजेचे असणे, कलम १४४/६ अ नुसार संस्थेच्या गरजा व मागणीनुसार अन्य कोणताही व्यापार व सेवा पुरविण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे अशा संस्थांना किमान इतर सेवा करण्यास परवानगी देण्यासह विविध मागण्यांबाबत पतसंस्थांकडून वेळोवेळी मागण्या करण्यात येत असतात, परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री महोदय यांचे स्तरावर दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार कोणतीही कार्यवाही अद्याप न होणे, त्यामुळे पतसंस्थांच्या प्रतिनिधी यांच्यामध्ये शासन विरोधी असंतोष निर्माण होणे, याबाबत शासन पतसंस्था चळवळ टिकावी, वृद्धिंगत व्हावी यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री. ऋतुराज पाटील, डॉ.राहुल पाटील, श्री.लहू कानडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. ऋतुराज पाटील वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्यातील निराधार, अपंग आदींच्या पुनर्वसनासाठी शासनाने 'संजय गांधी', 'श्रावणबाळ' आदी विशेष सहाय्य योजना अंमलात आणल्या असणे, परंतु त्यातील उत्पन्नाची मर्यादा आजच्या काळाशी सुसंगत नसणे, याशिवाय या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी दरवर्षी उत्पन्नाचा दाखला देण्याची जाचक अट असणे, त्यामुळे अनेक गरीब व गरजू या योजनेपासून वंचित राहत असणे, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन या योजनांसाठी आर्थिक उत्पन्नाची मर्यादा ५० हजारांपर्यंत वाढविणे व दरवर्षी उत्पन्नाच्या दाखल्याची अट काढून टाकण्याबाबत आग्रही मागणी होत असणे, परंतु त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सन्माननीय सदस्य श्री. अबू आजमी वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. छगन भुजबळ वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"नाशिक जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू ऑलिम्पियन कविता राऊत, रोईंगपटू दत्तू भोकनळ आणि आंतरराष्ट्रीय धावपटू अंजना ठमके यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचे नाव उज्जवल केले असणे, राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ नुसार आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना

शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असणे, तर दिनांक १ मे, २०११ च्या शासन निर्णयानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली तर शासन सेवेत थेट नियुक्तीची मानके देखील निश्चित केलेली असणे, सदर शासन निर्णयातील वर्ग १ पदासाठी आवश्यक असलेले निकष या तिन्ही खेळाडूंनी पूर्ण केलेले असणे, या खेळाडूंची गट अ पदाकरिता शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी क्रीडा आयुक्तांनी शासनास प्रस्ताव पाठवलेले असणे, शासनाने शासन निर्णय दिनांक २७ डिसेंबर २०१६, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ आणि दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ अन्वये विविध अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना उप जिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, तहसीलदार, जिल्हा क्रीडा अधिकारी यासह विविध गट "अ" पदांवर नियुक्ती दिलेली असणे, मात्र नाशिक जिल्ह्यातील या तिन्ही अत्युच्च गुणवत्ताधारक आणि पात्र खेळाडूंना गट "अ" पदावर शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी अन्याय केला जात असणे, या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या नैपुण्याचा विचार करून शासनाच्या क्रीडा धोरणानुसार त्यांची वर्ग १ पदावर शासकीय सेवेत थेट नेमणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ वा त्या सुमारास आणि यापूर्वी अनेकदा शासनाकडे मागणी केलेली असणे, मात्र शासनाकडून दिरंगाई आणि टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये निर्माण झालेले निराशेचे व चिंतेचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्रीमती सरोज अहिरे वि.स.स. यांनी, 'पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यात एका १० वर्षीय मुलीच्या बलात्काराची दुर्दैवी घटना घडलेली असणे तसेच पनवेल रेल्वे स्थानकामध्ये ३ वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कार झाल्याची घटना घडलेली असणे,' इ. बाबत माहिती विषयक मुद्दा मांडला.

या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी स्थगन प्रस्ताव दिलेला असून प्रश्नोत्तराच्या तासानंतर त्यासंबंधी निर्णय देण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. सदा सरवणकर वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रवक्ते श्री. संदिप देशपांडे शिवाजी पार्कवर चालण्यासाठी गेले असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात येणे,' इ. बाबत माहिती विषयक मुद्दा मांडला.

**१.** (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(१) श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेता) यांनी, 'भंगार आणि नादुरुस्त एसटी बसवर जाहिरात करण्यापेक्षा त्या एसटी बसेस स्क्रॅपमध्ये काढण्याची गरज', इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(२) श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी, ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या श्री. संदीप देशपांडे यांच्यावर झालेला हल्ला यासंदर्भात शासनाने दखल घेण्याची आवश्यकता’, इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, ‘मालाड (पूर्व), पुष्पा पार्क येथील नूर मंजिल सोसायटी ही टेनेंटेड प्रॉपर्टी असून त्याठिकाणी महानगरपालिकेने बजावलेली कलम ३५४ ची नोटीस’ इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(४) श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स. यांनी, ‘सिद्धार्थ नगर झोपडपट्टी तेथील लोकांना घरातून बाहेर काढण्याची कारवाई सुरु असणे’ इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

शासनाने याबाबत त्वरित नोंद घेऊन उपाययोजना कराव्यात असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्र्यांनी नोंद घेतली.

(५) श्री. दिलीप बनकर, वि.स.स. यांनी, ‘माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी नाफेडकडून कांदा खरेदी केली जात आहे असे सांगूनही अद्यापपर्यंत एकाही बाजार समितीमध्ये नाफेडमार्फत कांदा खरेदी केली जात नसणे’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(६) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. यांनी, ‘बिलाअभावी कोणत्याही शेतकऱ्याची वीज जोडणी कापली जाणार नाही असे घोषित करूनही महावितरण वीज कंपनीने शेतकऱ्याला विजेची थकबाकी असल्यामुळे त्याचा वीज पुरवठा तात्पुरता खंडित करण्यात येत असल्याबाबत पत्र देण्यात येणे’ इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(७) ॲड.आशिष जैस्वाल, वि.स.स. यांनी, ‘मंत्रालय इमारतीच्या ७ व्या मजल्यावर सुरू करण्यात आलेले दिव्यांग मंत्रालय सदर इमारतीच्या तळ मजल्यावर सुरु करण्यात यावे’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(८) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, मीरा-भाईंदर महापालिका हद्दीमध्ये महापालिका परिवहन सेवेची बस संबंधित ठेकेदाराने भररस्त्यात थांबवून बसचालकास व वाहकास केलेली मारहाण’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(९) कॅप्ट.आर. तमिल सेल्वन, वि.स.स. यांनी माहितीविषयक मुद्दा मांडला. (हिंदी भाषण प्रलंबित)

(१०) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, ‘हरभरा खरेदीमध्ये विशेष लक्ष घालून यांची नोंदणी व खरेदी प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची आवश्यकता, इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(११) श्री.सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी, ‘सोलापूर शहरामध्ये औद्योगिक वसाहत येथे फेब्रुवारी महिन्यापासून वेगवेगळ्या दिवशी या वसाहतीतील आठ ठिकाणी आग लागण्याच्या घडलेल्या घटना व त्याकडे सोलापूर महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(१२) श्री. मदन येरावार, वि.स.स. यांनी, ‘यवतमाळ येथील बसस्थानकासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(१३) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ‘मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी पोलीस भरती प्रक्रियेसाठी मोठ्या संख्येने येणाऱ्या तरुण-तरुणी यांच्या निवास आणि भोजनाची गैरसोय होत असणे’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१४) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, ‘ठाणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गांभीर्याने घेण्याची आवश्यकता’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेला माहितीचा मुद्दा गंभीर असून शासनाने याची नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(१५) श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, ‘नागपूर जिल्ह्यामध्ये नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्जाची आर्थिक अडचणीमुळे परतफेड न करू शकलेल्या अशा शेतकऱ्यांच्या जवळपास ५५०० जमिनींचे नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने सुरु केलेले लिलाव थांबविण्याची गरज’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(१६) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, ‘राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अकोला, गोंदिया, उमरेड, ब्रम्हपुरी, अलापल्ली आणि गडचिरोलीच्या जंगलात १६ वाघांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले असणे’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(१७) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी, ‘मुंबईतील गोरेगांव येथील जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरील ओबेरॉय मॉलशेजारील ओबेरॉय एक्स्विझिट्स या इमारतीमध्ये राहणाऱ्या इयत्ता ६ वी मधील ११ ते १२ वर्षांच्या मुलाची २० व्या मजल्याहून पडून झालेला मृत्यू’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

शासनाने याची नोंद घेतली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१८) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, ‘खार दांडा या कोळीवाड्याच्या जवळ वांद्रे-वर्सोवा समुद्रमार्गाच्या कामामध्ये असलेल्या connector चे pillers हे खारदांडा येथील बोटींचे जेथून navigation होते त्या भागामध्ये प्रस्तावित केल्यामुळे खारदांडा भागातील कोळी बांधवांना त्यांच्या बोटी समुद्रात नेताना अडचण निर्माण होण्याची शक्यता’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(१९) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी, ‘रोजगार सेवकांचा संप सुरू असल्याने राज्यामध्ये MREGS अंतर्गत सुरू असलेली पण आता ठप्प पडलेली कामे लवकरात लवकर सुरू करण्याची आवश्यकता’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(२०) श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी, ‘मुंबईतील AICT चे कार्यालय दिल्लीला हलविण्यात येत असणे’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(२१) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. यांनी, ‘अकोला जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात बिंदू नामावली अद्ययावत नसल्यामुळे सन २०१९ मध्ये एस.टी. चालक आणि वाहक या पदावर जे उमेदवार पात्र ठरले आहेत, त्यांना अद्याप नोकरी मिळालेली नसल्यामुळे तेथे उपोषणाला बसलेले असणे’ इ.बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

**२.** (१) उद्योग मंत्र्यांनी, (मुख्यमंत्री यांच्याकरिता) महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी विश्वस्त कंपनी मर्यादित यांचा सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल तसेच महाराष्ट्र नागरी पायाभूत विकास कंपनी मर्यादित यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(क) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह).

(ख) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(ग) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखापरीक्षण अहवाल.

(घ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल.

(ङ) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके.

आज प्राप्त झालेल्या एकूण ५ स्थगन प्रस्तावाच्या सूचना आज पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस) व चर्चारोध (गिलोटीन) असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २६० (५) अन्वये घेता येणार नाहीत; तथापि, सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, दिलीपराव वळसे-पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी ‘तलासरी तालुक्यातील डोंगरी येथे दिनांक २ मार्च २०२३ रोजी एका १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून व तिचा गळा दाबून हत्त्या केल्याची क्रूर घटना’ या संदर्भातील जो स्थगन प्रस्ताव दाखल केलेला आहे, त्यातील विषयाचे गांभीर्य लक्षात घेता त्यावर शासनाने निवेदन करावे असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ‘दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी राज्यातील ३० हजार शेतकऱ्यांपैकी १५ हजार शेतकऱ्यांचे पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील भात खरेदी केंद्र शासनाने त्यांना कल्पना न देता अचानक बंद करण्याचा निर्णय घेणे’ इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

**लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २ पुढे ढकलण्याबाबत –**

आजच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक ४ व ५ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २ पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४. (१) श्री. सुनील कांबळे आणि डॉ.बालाजी किणीकर वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री.सुनील कांबळे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मातंग समाजाची वर्गवारी करून अ, ब, क, ड नुसार स्वतंत्र आरक्षण देण्यासह समाजातील विविध मागण्यांसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने शासनास निवेदन देण्यात येणे, मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपूर्ण देशात वास्तव्यास असणे, या समाजातील बहुतांशी नागरिक भूमिहीन असून, मोलमजुरी करून आपले जीवन जगत असणे, उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे, तसेच शासकीय सेवेत देखील या समाजातील युवकांची संख्या अत्यंत अल्प असणे, शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता, मातंग समाजास अ,ब,क,ड अनुसार वर्गवारी करून स्वतंत्र आरक्षण त्वरित लागू करण्याची आवश्यकता, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कार देण्याची आवश्यकता, आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे संगमवाडी (जि. पुणे) येथे भव्य स्मारक करण्यासाठी शासकीय पातळीवर लवकरात लवकर प्रयत्न करण्याची आवश्यकता, मुंबई विद्यापीठास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी शासनाच्या मंजुरीची आवश्यकता,गंजपेठ पुणे येथील देशातील पहिली व्यायाम शाळा सुरू करून तेथे अनेक क्रांतिकारक घडविणाऱ्या लहुजी वस्ताद यांच्या क्रांती शाळेस लहुजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग त्वरित कार्यान्वित करुन, त्यांचे नाव राष्ट्रपुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे थेट कर्ज प्रकरण त्वरित सुरु करणे आणि अण्णाभाऊ साठे महामंडळाचे थकीत कर्ज माफ करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने करण्यात येणे, मातंग समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) डॉ. देवराव होळी वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत विकास योजनेच्या आरक्षण क्रमांक २७ नुसार लालचौकी कल्याण येथील "आर्ट गॅलरी म्युझियम आणि व्यापारी संकुल" प्रकल्प शासनाच्या व मनपाच्या सर्व नियम व अटी पाळून १० वर्षापासून बांधून तयार असणे, परंतु सदर प्रकल्प अद्यापही पूर्णत्वास न गेल्यामुळे मनपाचे तसेच

विकास कामांचे अतोनात नुकसान होणे, सदर प्रकल्पास लागणारे सर्व प्रकारचे सहाय्य करण्यास विकासक बांधील असणे, वरील विषय मान्य करून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका विशेष प्रकल्प /८४ दिनांक २६/८/२०२१ विभागाच्या प्रस्तावानुसार तसे आदेश निर्गमित करण्यासंदर्भात शासन स्तरावर प्रश्न प्रलंबित असणे, यासंदर्भात हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये तारांकित प्रश्न क्रमांक ५१७८५ च्या माध्यमातून शासनाला भूमिका स्पष्ट करण्यासंदर्भात विधानमंडळाकडे सादर असताना त्याच कालावधीत या विपरित विषयाला धरून दिनांक २८/११/२०२२ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे उघडकीस येणे, हे प्रकल्प पूर्णत्वास न नेता केवळ आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त भाऊसाहेब दांडगे, शहर अभियंता अर्जुन अहिरे, लेखा वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, तरुण जुनेजा कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प तथा सदस्य सचिव यांनी जाणीवपूर्वक अडथळा निर्माण करणे, सदरहू प्रकरण अतिशय गंभीर असून मागील अनेक वर्षांपासून प्रकरण प्रलंबित ठेवणाऱ्या दोषींवर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, या कामात केवळ आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने अडथळा निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(3) सर्वश्री. प्रताप सरनाईक, अतुल भातखळकर, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीपराव वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, सुनील टिंगरे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. प्रताप सरनाईक वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्यात लाखो भटके कुत्रे असून त्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असणे, भटक्या कुत्र्यांमुळे नागरिक हैराण झाले असून त्यामुळे शहरातील वातावरण आणि मानवी आरोग्यावर अनेक नकारात्मक परिणाम होत असणे, ठिकठिकाणी श्वानदंशाच्या घटना घडत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य नागरिक यात जखमी होत असणे, तसेच भटके कुत्रे मागे लागल्याने वाहनांचे अपघातही होत असणे, अशा अनेक गोष्टींचा त्रास होत असल्याने "भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा" अशी मागणी नागरिक करीत असणे, याउलट ठिकठिकाणी प्राणीमित्र व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संघटना असल्यामुळे अनेक ठिकाणी नागरिक आणि श्वानप्रेमी यांच्यात संघर्ष होत असल्याचेही आढळून येणे, प्रत्येकाला जगण्याचा अधिकार असून ग्रामीण भागात शेतकऱ्यांना श्वानांची मदत होत असणे, त्यामुळे जखमी आजारी भटक्या कुत्र्यांसाठी शासकीय पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालये, खाजगी पाळीव प्राण्यांचे दवाखाने, श्वान निर्बीजीकरण केंद्रे यांच्या माध्यमातून त्यांच्यावर उपचार करणे व नसबंदीबाबत मार्ग काढणे शक्य असणे, पण असे होताना दिसत नसून अनेक नगरपालिका, महापालिका यांचे याबाबत कोणतेही

धोरण नसणे, यासाठी शासनाने प्रत्येक मोठ्या गावात, शहरात, महानगरात व तालुक्यात श्वान गणना व त्यांची नोंदणी करून भटके व पाळीव कुत्रे किती आहेत याची संख्या निश्चित करून एकही भटका कुत्रा रस्त्यावर राहणार नाही अशी प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत कृती करताना सर्व भटक्या कुत्र्यांची गणना करून, त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे निर्बीजीकरण करणे, जखमी कुत्र्यांवर उपचार करून त्यांना बरे करणे व जेथे श्वान संख्या अधिक आहे त्याठिकाणी त्यांच्यासाठी "श्वानगृहे" तयार करणे अशा पध्दतीत काम होणे आवश्यक असून त्यासाठी निर्बीजीकरण केंद्रे वाढविण्याची आवश्यकता, तसेच प्राणीप्रेमी किंवा दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला दत्तक योजनेच्या माध्यमातून चांगले सुदृढ केलेले श्वान संगोपन करण्यास दत्तक देण्याची आवश्यकता, त्यासाठी श्वानाचे शेवटपर्यंत सांभाळ करण्याविषयी दत्तक घेणाऱ्याकडून शपथपत्र घेऊन नियम कडक करून दत्तक योजनेची स्थानिक प्रशासनाकडून नीट अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, श्वानांसाठी आवश्यक लसी, औषधोपचार हे सरकारी दवाखान्यातून मोफत देणे गरजेचे असणे, हे सर्व करण्यासाठी शासनाने धोरण, नियमावली, कृती कार्यक्रम निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पशुसंवर्धन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**नियम ४७ अन्वये निवेदन –**

मुख्यमंत्र्यांनी, 'शासन सेवेत नियुक्ती देण्यासाठी २ वर्षाची वयोमर्यादा शिथिल करणे' इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा-** (चर्चा पुढे सुरू) (मंत्र्यांचे उत्तर) -

राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्याबाबतचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**५.** (१) ग्रामविकास विभाग

(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग

उपरोक्त विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला सुरुवात झाली.
चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.धनंजय मुंडे (२) श्री. अभिमन्यू पवार

(३) प्रा.श्रीमती वर्षा गायकवाड
(४) श्री. प्रकाश आबिटकर
(५) श्री. विनोद निकोले
(६) श्री. रोहित पवार
(७) श्री.सुनिल राणे
(८) श्री. विक्रमसिंह सावंत
(९) श्री. दिलीप लांडे
(१०) श्री. अबू आजमी
(११) श्री.सुनिल भुसारा
(१२) ॲड. आशिष शेलार
(१३) श्री. हिरामण खोसकर
(१४) श्री.योगेशदादा कदम
(१५) श्री.राजेश पाटील
(१६) श्री.प्रकाश आवाडे
(१७) श्री.अशोक पवार
(१८) श्री.रवि राणा

ग्रामविकास मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा वस्त्रोद्योग मंत्री, सहकार मंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

आजच्या कामकाजपत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**{ चर्चारोध (गिलोटीन) }**

**अनुदानाकरिता पुरवणी मागण्या–**

चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक –

१) महसूल व वन विभाग अनुक्रमांक ७ ते ९,

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अनुक्रमांक १४,

३) नगर विकास विभाग अनुक्रमांक १५ व १६,

४) वित्त विभाग अनुक्रमांक १७ व १९,

५) जलसंपदा विभाग अनुक्रमांक २६ व २७,

६) विधि व न्याय विभाग अनुक्रमांक २८ व २९,

७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अनुक्रमांक ३५,

८) नियोजन विभाग अनुक्रमांक ३६ व ३७,

९) सार्वजनिक आरोग्य विभाग अनुक्रमांक ३८,

१०) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग अनुक्रमांक ३९,

११) आदिवासी विकास विभाग अनुक्रमांक ४० व ४१,

१२) महिला व बाल विकास विभाग अनुक्रमांक ४६,

१३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अनुक्रमांक ४७,

१४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अनुक्रमांक ४८,

१५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग अनुक्रमांक ४९,

१६) इतर मागास बहुजन कल्याण विभाग अनुक्रमांक ५०,

१७) मृद् व जलसंधारण विभाग अनुक्रमांक ५१.

१८) दिव्यांग कल्याण विभाग अनुक्रमांक ५२ ते ५५.

उपरोक्त पुरवणी मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**६. (अ) पुरःस्थापनार्थ, विचार खंडशः विचार व संमत करणे–**

(१) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ७ – महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली असल्याचे सभागृहास सांगितले.

उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ७ – महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी, 'सामना' या वृत्तपत्राच्या सन्माननीय संपादकांनी निवडणूक आयोगास उद्देशून काढलेले उद्‌गार' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

माननीय अध्यक्षांनी याबाबत माहिती दिली.

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे :–**

(२) उद्योग मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ४ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्रीअनिल पाटील व धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री. अजित पवार, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुनिल केदार व अस्लम शेख, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव, श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सातवा प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा आठवा प्रस्ताव आणि श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा नववा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरु झाली.
उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. छगन भुजबळ
(२) श्री. प्रताप अडसड
(३) श्री. धनंजय मुंडे
(४) श्री. अतुल भातखळकर
(५) श्री. संजय सावकारे

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) (क) सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री अनिल पाटील व धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री. अजित पवार, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुनिल केदार व अस्लम शेख, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव, श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सातवा प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, शिरीषदादा चौधरी, संजय जगताप, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा आठवा प्रस्ताव आणि श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा नववा प्रस्ताव सन्मानीय सदस्यांनी अनुक्रमे मांडावेत असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरु झाली.
उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. धनंजय मुंडे (२) श्री. अमिन पटेल

(३) श्री. संजय सावकारे

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३**

विधानसभेची मुंबई येथील विधानसभा सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "गेल्या दोन-तीन दिवसांपासून राज्यातील ठिकठिकाणी झालेली गारपीट व त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, या गारपिटीमुळे भाज्या व पिकांचे झालेले नुकसान, एवढेच नव्हेतर वीज पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या मेंढ्यादेखील मृत्युमुखी पडणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

या विषयावर नियम ९७ अन्वये दिलेली नोटीस प्राप्त झालेली असून प्रश्नोत्तरांच्या तासानंतर त्यावर निर्णय देता येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सर्वश्री. नाना पटोले, छगन भुजबळ, वि.स.स. यांनीदेखील उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

उपमुख्यमंत्र्यांनी, "राज्यात पावसामुळे झालेल्या ठिकाणी तात्काळ मदत करण्यात येईल आणि उर्वरित माहिती घेऊन दुपारनंतर सविस्तर निवेदन केले जाईल," असे आश्वासन दिले.

**१. (अ)** (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) लेखी उत्तरे -

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १२५ ते १३९ सभागृहासमोर ठेवण्यात आली.

श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा मांडला.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे मुद्याशी संबंधित मजकूर प्रलंबित आहे.)

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "औचित्याच्या मुद्यामार्फत प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणे," इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

**२.** अध्यक्षांनी, श्री. सूर्यकांत गंगाराम देसाई, माजी वि.स.स. यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३.** (१) वित्त मंत्र्यांनी, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२०२३ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवले.

(२) सहकार मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**४.** (१) सन्माननीय सदस्य सर्वश्री. छगन भुजबळ व इतर विधानसभा सदस्य यांनी दिनांक ५ व ६ मार्च, २०२३ रोजी "राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाल्याबाबत" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून आज दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाज पत्रिकेच्या क्रमातील बाब क्रमांक ८ व ९ येथे महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये प्रस्तावामध्ये सदरहू विषयाचा अंतर्भाव असल्यामुळे सदर सूचनेस तसेच उर्वरित स्थगन प्रस्तावांच्या सूचनेस मी दालनात अनुमती नाकारलेली आहे," असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सर्वश्री अजित पवार, नाना पटोले, जयकुमार रावल, छगन भुजबळ, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले मत मांडले.

(१) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांना जनहित शेतकरी संघटनेचे पदाधिकारी निवेदन देण्याकरिता गेले असता त्यांचे निवेदन न स्वीकारता त्यांच्यावर सदर बाजार पोलीस ठाणे येथे विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणे" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नसला तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(२) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "यमगे ते मुरगूड, जिल्हा कोल्हापूर या मार्गावर दिनांक ४ मार्च, २०२३ रोजी रस्त्यामध्ये एका महिलेची प्रसुती झाल्यानंतर बाळाची नाळ खुरप्याने कापण्यात येणे" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नसला तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा मांडला.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे मुद्याशी संबंधित मजकूर प्रलंबित आहे.)

शासनाने उपरोक्त मुद्याची नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५. माननीय अध्यक्षांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक महिला धोरण तयार करणे या विषयाच्या अनुषंगाने पुढील प्रस्ताव मांडला –**

"महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व महिलांना सर्व क्षेत्रात समान तसेच सन्मानाचे स्थान मिळावे या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघ पुरस्कृत जागतिक महिला आयोगाचे ६७ वे सत्र दि. ६ मार्च ते १७ मार्च, २०२३ या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या जागतिक महिला आयोगाच्या सत्रामधील निर्धारित निर्णयात भारत सरकारचाही कायम सहभाग असतो. आम्ही आरोग्य विषयक सुविधा, सुरक्षितता, आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरण यासाठी महिलांच्या हितासाठीचे कायदे व त्याची अंमलबजावणीची यंत्रणा उभारण्यासाठी वचनबद्ध आहोत हे अधोरेखित करीत आहोत. "महिला धोरण" सन १९९४, २००२, २०१४ तसेच २०१९ चे प्रस्तावित धोरण व २००१ चे राष्ट्रीय महिला धोरण यांचे एकत्रीकरण करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक महिला धोरण तयार करणे बाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.
प्रस्तावावर पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्रीमती यामिनी जाधव
(२) श्रीमती सुलभा खोडके
(३) श्रीमती माधुरी मिसाळ
(४) श्रीमती सरोज अहिरे
(५) श्री. अबु आजमी
(६) श्रीमती गीता जैन
(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(८) श्रीमती देवयानी फरांदे
(९) श्रीमती ऋतुजा लटके

श्री. सुनील शेळके, वि.स.स. यांनी, "सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अनिल तात्याबा गुंड यांच्या जमिनीचा वाद न्यायलयात सुरू असून निकाल लागेपर्यंत शेतकऱ्याच्या जमिनीचा ताबा आहे त्या परिस्थितीत ठेवण्याबाबत संबंधितांना आदेश देण्याची आवश्यकता" इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**माननीय अध्यक्षांचा प्रस्ताव –** (चर्चा पुढे सुरू)

माननीय अध्यक्षांच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.
चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१०) ॲड. यशोमती ठाकूर
(११) डॉ. भारती लव्हेकर
(१२) श्रीमती मंजुळा गावीत
(१३) श्रीमती अदिती तटकरे
(१४) श्रीमती लताबाई सोनावणे
(१५) श्रीमती प्रणिती शिंदे
(१६) श्रीमती मंदा म्हात्रे
(१७) श्रीमती वर्षा गायकवाड (भाषण अपूर्ण)

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली -

"आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी मॉरिशस देशाचे मंत्री श्री.ॲलन गनु (Hon.Alan Ganoo, Minister of Land Transport and Light Rail, Minister of Foreign Affairs, Regional Integration and International Trade of the Republic of Mauritius) व अन्य उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहे. आपण सर्वजण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करू या."

**माननीय अध्यक्षांचा प्रस्ताव –** (चर्चा पुढे सुरू)

माननीय अध्यक्षांच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.
चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१७) श्रीमती वर्षा गायकवाड (भाषण पूर्ण)
(१८) श्रीमती मनिषा चौधरी
(१९) श्रीमती श्वेता महाले
(२०) सौ. सीमा हिरे
(२१) श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते
(२२) श्री. भास्कर जाधव
(२३) श्री. ज्ञानराज चौगुले
(२४) श्री. हरिभाऊ बागडे
(२५) श्री. छगन भुजबळ
(२६) ॲड. आशिष जैस्वाल
(२७) श्री. दीपक चव्हाण
(२८) श्री. चेतन तुपे

महिला व बाल विकास मंत्र्यांनी प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.
सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

माननीय अध्यक्षांनी, श्री. अतुल भातखळकर व श्री. भरत गोगावले, वि.स.स. यांनी, श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य तथा संपादक, दैनिक 'सामना' यांच्याविरुद्ध विधिमंडळ व विधिमंडळाचे सदस्य यांच्याबद्दल त्यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यासाठी दि. १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेवर दिलेला निर्णय दिला -

"उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेच्या अनुषंगाने श्री. संजय राऊत यांनी आज दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी पत्र पाठवून याप्रकरणी सविस्तर खुलासा सादर करण्याबाबत मुदतवाढ देण्याची विनंती केलेली असल्याने त्यांनी केलेली विनंती मान्य करून त्यांना याप्रकरणी सविस्तर खुलासा सादर करण्यासाठी मी मुदत वाढवून देत असून त्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल."

**६.** (१) श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"कोल्हापूर नगरपालिकेचे सन १९७२ मध्ये महानगरपालिकेत रूपांतर होणे, तब्बल ५० वर्षांपासून कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न प्रलंबित असणे, कोल्हापूरनंतर स्थापन झालेल्या अनेक महानगरपालिकांची एकदा-दोनदा नव्हे, तर अनेकदा हद्दवाढ झालेली असणे, त्यामुळे त्या शहरांचा विकासही झालेला नसणे, कोल्हापूरची हद्दवाढ झालीच पाहिजे अशी जनमानसात असलेली भावना, त्याबाबत सद्यःस्थितीत कोल्हापूर महानगरपालिकेची हद्द ६६.८२ चौरस किलोमीटर असून तब्बल सात लाख लोक राहत असणे, शहराला लागून असलेल्या मोरेवाडी, पाचगाव, कळंबा, कंदलगाव, उजळाईवाडी, गांधीनगर अशा अनेक गावांना महानगरपालिकेच्या केएमटी, पाणीपुरवठा यासारख्या सेवा असणे, परंतु काही ग्रामपंचायतींचे पाच एमएलडी पाणीही शहरात येत असल्यामुळे त्याचाही अतिरिक्त ताण महानगरपालिकेवर पडत असणे, कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने २०१३ पासून २०२१ पर्यंत ४ वेळा कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचे प्रस्ताव सादर केलेला असणे, २०१४ मध्ये १७ गावांचा समावेश असलेला हद्दवाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य शासनाकडे सादर केलेला असणे, २०१७ मध्ये पहिल्या टप्प्यात भौगालिक संलग्नता आणि महानगरपालिकेच्या सुविधा घेणाऱ्या गावांचा शहरात समावेश करण्याच्या मुद्यांवर हद्दवाढ होईल अशी शक्यता वर्तविण्यात येणे, मात्र शासनाने हद्दवाढीला बगल देत ४२ गावांचा समावेश असलेल्या प्राधिकरणाची घोषणा केल्यामुळे शहराची हद्दवाढ मागे पडणे, प्राधिकरणाकडून ग्रामपंचायत हद्दीतील बांधकाम परवान्यासह अन्य परवानगी मिळवताना गावांची दमछाक होत असणे, हद्दवाढ परवडली पण प्राधिकरण नको, अशी म्हणण्याची वेळ ग्रामीण भागावर येणे, त्यात प्राधिकरणाला निधीची आवश्यकता असणे, मागील शासनाने कोल्हापूर महानगरपालिकेकडून हद्दवाढीचा फेरप्रस्ताव मागविण्यात येणे, त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये १८ गावे व दोन एमआयडीसींसह नवीन प्रस्ताव सादर केलेला असणे, हद्दवाढ न झाल्यामुळे कोल्हापूर शहराचा विकास, नवे उद्योग येत नसल्यामुळे त्याचा परिणाम उद्योगांवरही होणे, तसेच राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनेतून निधी मिळविण्यास अडचणी येत असणे, परिणामी शहराचा सर्वांगीण विकास करण्यावर मर्यादा येत असणे, त्यामुळे कोल्हापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हद्दवाढ व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत असणे, परंतु प्रशासनाने या मागणीकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोल्हापूरवासीयांचा शासनाप्रति वाढलेला तीव्र संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"नाशिक महानगरपालिका सर्वे नंबर ४९१ फायनल भूमापन क्रमांक २५१ नगररचना योजना भाग एक ही जागा वर्षानुवर्ष मातंग समाजाची असून या ठिकाणी अनेक वर्षापासून मातंग समाजाच्या नागरिकांचे वास्तव्य

असणे, सातबारावर देखील मातंग समाजाचे नाव असणे, असे असताना, नाशिक महानगरपालिकेने सदर जागा सफाई कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेला नाममात्र भाड्याने देणे, या ठिकाणची जागा रहिवासी प्रयोजनासाठी आरक्षित करण्यासाठी आरक्षणात अंशस्थान बदल करण्याचा प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेने दिनांक २९ मार्च, २००४ रोजी प्रधान सचिव नगर विकास विभाग यांना पाठवलेला असणे, नाशिक महानगरपालिकेकडून याबाबत महासभेत ठराव देखील केलेला असणे, परंतु शासनाकडून मात्र सदर बाबीकडे दुर्लक्ष होत असणे, सदर प्रकरण जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग (मुख्यमंत्र्यांकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“मुंबई वर्सोवा येथील जेव्हीएलआर मार्गावरील बाळासाहेब ठाकरे उडडाणपूल हा एसव्ही रोड ते इन्फिनिटी मॉल लिंक रोड पर्यंतचा विस्तारित पूल व रस्ता हा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे वर्सोवा विभागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला असणे, सदर वाहतूक कोंडीचा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे पूल लिंक रोड पर्यंत विस्तारित करणे गरजेचे असणे, सध्या याच मार्गावरून मेट्रोचे कामदेखील सुरु असणे, हा पूल बनविण्याकरीता मुंबई महानगर पालिकेतर्फे एमएमआरडीए ला ३८४.५० कोटी रुपये (एकूण ७६८.८५ कोटी पैकी रकमेच्या ५० टक्के निधी) निधी देखील वर्ग करण्यात आलेला असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर पुलाचे काम सुरु झालेले नसणे, तरी या पुलाचे व रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“नवी मुंबई महानगरपालिका आस्थापनेवरील करार व कंत्राटी पद्धतीवरील आरोग्य, घनकचरा, शिक्षण, पाणी पुरवठा, मलनिःस्सारण, स्मशानभूमी, परिवहन, विद्युत, उद्यान अशा विविध संवर्गातील सुमारे ६०० ते ७०० कर्मचारी करार व कंत्राटी पद्धतीवर किमान वेतनावर गेल्या १० ते १५ वर्षांपासून प्रामाणिकपणे अविरत सेवा बजावित असणे, सदर कर्मचारी अत्यंत कमी वेतनावर वर्षानुवर्षे कार्यरत असून शासनाने त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोई-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नसणे, कोव्हीड काळात भयंकर परिस्थिती असतानाही त्यांनी

आपल्या सेवा पुरविलेल्या असणे, सद्यःस्थितीत नवी मुंबई महापालिकेतील गेल्या दोन वर्षापासून बहुतांश अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्याने तसेच बहुतांश लिपिक कर्मचाऱ्यांची वरिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती करण्यात आलेली असल्याने लिपिक संवर्गातील बहुतांश पदे रिकामी असणे, याकरिता अधिसंख्य पद निर्माण करण्यास मान्यता देण्याची गरज असून आस्थापना खर्चातून सूट देणे किंवा नवीन आकृतिबंधात ही पदे मंजूर करून देण्याची आवश्यकता, गेली १०-१५ वर्षे सदर कर्मचारी महापालिकेत काम करत असल्याने विशेष बाब म्हणून कायम करण्याची गरज, शासनाने प्रस्ताव सादर करून मंजुरी दिल्यास सदर सर्व कर्मचारी कायमस्वरूपी होण्यास होणारे सहाय्य, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"बुलढाणा हा जिल्हा अत्यंत मागास असून या जिल्ह्यात मोठे उद्योग धंदे नसल्याने प्रचंड बेरोजगारी असणे, खामगाव जालना रेल्वे मार्गाची मागणी अनेक वर्षांपासून असून हा रेल्वे मार्ग झाल्यास बुलढाणा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे सुरू होऊन बेरोजगारी दूर करण्यास मदत होणे, तसेच विदर्भ आणि मराठवाडा हा सुद्धा या रेल्वे मार्गाने जोडला जाणार असणे, तब्बल ११० वर्षांपासून प्रलंबित असलेला खामगाव जालना रेल्वेमार्गाला २०१६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सर्वेक्षणासाठी मान्यता देणे, यासाठी ३००० कोटी रुपयांची तरतूद ही केल्याने खामगाव-जालना रेल्वे मार्ग होण्याच्या जिल्हावासीयांच्या आशा पल्लवित होणे, या संदर्भात बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२० रोजी तारांकित प्रश्न क्र.१७०९ विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित झाल्याने या रेल्वेमार्गात येणाऱ्या अडचणी दूर करून सदर रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी रेल्वे विभागासोबत बैठक घेण्याची ग्वाही तत्कालीन परिवहन मंत्री यांनी दिल्याने दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी रेल्वेच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात येणे, खामगाव-जालना रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणासाठी तांत्रिक टीमकडून बुलढाणा व जालना येथे येऊन पाहणी करून जाणे, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री यांनी सुद्धा याबाबत बुलढाणा जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन या रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी मान्यता देणे, परंतु अद्याप राज्य शासनाने या रेल्वे मार्गासाठी आपला हिस्सा भरण्याची हमी न दिल्याने या मार्गाचे काम रखडून पडणे, त्यामुळे मागास असलेल्या विदर्भ आणि मराठवाडा या दोन प्रदेशांना जोडणारा हा रेल्वे मार्ग रखडल्याने जनतेमध्ये निर्माण होत असणारा तीव्र असंतोष, यासाठी या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाने आपला हिस्सा हमी देऊन बुलढाणा जिल्हावासीयांसोबतच विदर्भ मराठवाडा या विभागांना जोडणाऱ्या या रेल्वेचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र. ६, ७ व माननीय मंत्र्यांच्या विनंतीनुसार लक्षवेधी सूचना क्र. ८ पुढे ढकलण्यात येत असून माननीय विधानसभा अध्यक्षांना विनंती करून सदर लक्षवेधी सूचना उद्या घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्या म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावर एकत्रित चर्चा करण्याचे ठरल्यानुसार त्यावर चर्चा करण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३**

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक १ व ८ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना सांस्कृतिक मंत्री यांच्या विनंतीनुसार पुढे ढकलण्यात येत असून सदर लक्षवेधी सूचना दिनांक १० मार्च, २०२३ रोजी घेण्यात येतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१) डॉ. नितीन राऊत, सर्वश्री बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री संजय जगताप, धीरज देशमुख, बळवंत वानखडे, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, माधवराव पवार, राजेश एकडे, अमीन पटेल, अस्लम शेख, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, रोहित पवार, विनोद निकोले, अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, दौलत दरोडा, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधले -

"राज्यात नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला अधिक महत्त्व देण्यात येणे, त्यासाठी शैक्षणिक पात्रतेमध्येही बदल करण्यात येणे, त्यामुळे अनेक संस्था त्या-त्या समाजातील विद्यार्थ्यांचा संशोधनाचा टक्का वाढविण्यावर भर देत असून यासाठी अनेक योजनाही सुरू करण्यात आलेल्या असणे, मात्र आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच आलेली असणे, राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे संशोधनामध्ये येण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे प्रमाण वाढविण्यासाठी आणि या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने अधिछात्रवृत्ती योजना सुरू करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून सुरू असूनही वित्त विभागाच्या अडथळयांमुळे अधिछात्रवृत्तीचा प्रश्न प्रलंबित असणे, परिणामी पीएचडी करून आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून बार्टी, सारथी

व महाज्योती या तिन्ही संस्थांच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री.धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधले-

"आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी बांधवांच्या खावटी कर्जावर वार्षिक नियोजन अवलंबून असणे, परंतु सन २०२२ मध्ये खावटी कर्ज वाटप न केल्यामुळे राज्यातील आदिवासी बांधवांची घोर निराशा झाली असल्याचे निदर्शनास येणे, चार हजार रुपयाप्रमाणे ११ लाख ५० हजार आदिवासी कुटुंबांना एकूण ४४० कोटी रुपयाचे खावटी कर्ज वितरित करण्याचा शासनाला विसर पडल्याने दऱ्या-खोऱ्यांत आणि दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांना पूरक पोषण आहार न मिळाल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास येणे, आदिवासी विकास विभागाच्या गाफील नियोजनामुळे शासनाचे ४४० कोटी रुपये अखर्चित राहिल्याची गंभीर बाब समोर येणे, अद्यापपर्यंत आदिवासी विकास विभागाकडून नव्याने खावटी कर्ज वितरित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला किंवा कसे याबाबत अस्पष्टता असणे, या गंभीर बाबीकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले —

"पारोळा (जि. जळगाव) येथील उपविभागामध्ये जलसंधारणाच्या विविध कामांमध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये उघडकीस येणे, याबाबत लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी जिल्हाधिकारी, जळगाव तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे तक्रारी करणे, त्यानंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये सदरील तक्रारींमध्ये तथ्य आढळणे, मात्र चौकशी समितीने अनियमितता केल्याच्या नावाखाली सदरील अधिकाऱ्यांना संरक्षण देणे, सदरील कामांवर ठेकेदाराच्या मूळ देयकापेक्षा वाढीव व बनावट देयके अधिकाऱ्यांनी मंजूर करून घेणे, साठवण बंधारा फाफोरे बु।। व साठवण प्र. ऊ. पिंपरी या कामांवर मर्यादेपेक्षा अनुक्रमे १४.५८ लक्ष व ५.५९ लक्ष इतके अतिरिक्त देयके मंजूर करून घेण्यात येणे, परंतु चौकशी समितीद्वारे सदरील खर्च कार्यालयीन बाबींवर केला गेल्याचे नमूद करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न करण्यात येणे, वास्तविक, कार्यालयीन बाबींसाठी जिल्हा नियोजन समितीकडून

स्वतंत्र निधी देण्यात येत असतानाही अधिकाऱ्यांनी केलेली गैरकृत्ये झाकण्यासाठी चौकशी समितीने कार्यालयीन खर्चासाठी निधी वापरल्याचे सांगून शासनाची तसेच लोकप्रतिनिधींची फसवणूक व दिशाभूल करणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद् व जलसंधारण उपविभाग, जळगाव यांच्या चौकशी समितीचा अहवाल अद्यापही प्रलंबित असणे, गैरव्यवहार झालेला उघडकीस येऊनही संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार, सुरेश वरपुडकर, सुनिल केदार, विश्वजित कदम, कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री अमित देशमुख, धिरज देशमुख, अस्लम शेख, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, संजय जगताप, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या ४०० खाटांच्या नूतन इमारतीमध्ये भौतिक सुविधांची कामे व आरोग्य साधनांची पूर्तता तसेच सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये फेज २ इमारतीमध्ये न्युरो सर्जरी व कॅन्सर रुग्णांसाठी केमो थेरपी युनिट तातडीने कार्यान्वित होणे अतिशय गरजेचे असणे, आय.सी.यु., ऑपरेशन थेटर, लेबर वॉर्ड, नवजात शिशु दक्षता विभाग तसेच पहिल्या मजल्यावर प्रस्तावित बाबींचा व नवनिर्माणाधीन इमारतीत स्त्री रुग्ण व नवजात शिशुंकरिता आवश्यक असलेल्या सोयी सुविधांकरिता तसेच फर्निचर व विद्युतीकरण आदी कामे करण्याकरिता निधीची गरज असणे, त्यादृष्टीने या दोन्ही रुग्णालयाच्या सर्व सुविधा कार्यान्वित होवून रुग्णांना त्याचा लाभ व्हावा यादृष्टीने शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची गरज असतांना त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) डॉ.राहुल पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपॅथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे,

राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरू असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतु आयुर्वेद उपचार पद्धतीचे समावेश शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबणा, शासनाने आयुर्वेदिक उपचार महात्मा जोतिबा फुले आरोग्य योजनामध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र. ७ व ८ पुढे ढकलण्यात येत आहेत. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरू होईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १८८ अन्वये पुढील नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली व दृढकथन केले —

(१) श्रीमती अश्विनी लक्ष्मण जगताप

(२) श्री.रविंद्र हेमराज धंगेकर

आज गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अन्वये सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले, वि.स.स. यांची, "शेतकऱ्यांची आत्महत्या" या विषयांवर सूचना प्राप्त झाली असून सूचनेतील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर कुठल्याही बाबीशी निगडित नसल्याने सदर सूचना महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अन्वयेच्या निकषांमध्ये बसत नसल्याचे सांगून माननीय अध्यक्षांनी सदरहू सूचनेस अनुमती नाकारली. मात्र श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी दिलेल्या सूचनेसंबंधी महत्त्वाचे मुद्दे मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सर्वश्री अजित पवार (विरोधी पक्ष नेते), श्री.छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी उपरोक्त स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

**२.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक प्रश्नाचे उत्तर देण्यात आले.

(प्रश्नोत्तरे अपूर्ण)

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात मांडलेल्या मुद्यासंदर्भात, संबंधित जिल्हाधिकारी यांना तातडीने नुकसानीचे युद्ध पातळीवर पंचनामे करून त्याची माहिती पाठविण्यास सूचित केले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी आपले मत व्यक्त केले.

आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीन प्रश्न उत्तरित झाले.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**३.** माननीय अध्यक्षांनी, शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या अशासकीय विधेयके व अशासकीय ठराव यांना नेमून द्यावयाचा वेळ यासंदर्भातील अशासकीय कामकाजाबाबत घोषणा केली.

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी, "राज्यातील तृतीयपंथीय घटकांना शिक्षण व नोकरी या क्षेत्रासह सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री, पुरुष या लिंग पर्यायांसोबत तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करणे" इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(१) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "माहिती व जनसंपर्क विभागाने मुख्यमंत्र्यांची परवानगी न घेता ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या जाहिराती देणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय विरोधी पक्ष नेते यांनी दिलेल्या माहितीची शासनाने दखल घेऊन त्या विषयाबाबत त्वरित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, "स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, ता.हवेली व समाधी स्थळ स्मारक वढु (बु.) शिरुर जि.पुणे विकास आराखड्याचे सुधारित नाव" इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(३) संसदीय कार्य मंत्र्यांनी, "बालसंगोपन रजा घेण्यासाठी दिव्यांग पाल्याची वयोमर्यादा केंद्र शासनाच्या धर्तीवर करणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(४) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, "उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा गणित या विषयाचा पेपर परीक्षा वेळेआधीच प्रसारित होणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) श्री. गुलाबराव पाटील, मंत्री यांनी, "महाराष्ट्रातील राष्ट्रवादी पक्षाने नागालँड राज्यातील भारतीय जनता पार्टीच्या मुख्यमंत्री यांना पाठिंबा देणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी खुलासा केला.

४. (१) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले –

"ठाणे शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून विविध सोसायट्यांना टँकरद्वारे पाणी घेण्यास भाग पाडण्याचे कारस्थान टँकर लॉबी व पाणी पुरवठ्याचे कार्यकारी व उप अभियंता यांच्याद्वारे सुरू असणे. त्यामुळे टँकर लॉबी पोसण्यासाठी कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप ठाणेवासीयांकडून करण्यात येणे, ही बाब दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, तथापि ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा योजनेतून माहे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ पासून झोनिंग पद्धतीने नियोजन करण्याचे निश्चित करणे, त्यामुळे शहरातील घोडबंदर, वागळे इस्टेट, समता नगर, वर्तक नगर, सिद्धेश्वर, जेल तलाव इत्यादी भागात पाणी पुरवठा झाला नसल्याने सबंधित विभागात टँकरने पाणी पुरवठा केला जाणे, या एकूणच प्रक्रियेत नागरिकांची टँकर लॉबीकडून आर्थिक लूट होत असल्याची गंभीर बाब उघड होणे, खाजगी टँकर पालिकेच्या पाणी वितरण व्यवस्थेकडून रु.७००/- प्रमाणे पाणी उचलत असणे, मात्र सोसायट्यांना सदर टँकरचे पाणी घेताना रुपये ४ ते ७ हजार मोजावे लागत असणे, गेल्या आठवडाभर ही संपूर्ण लूट महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी व उप अभियंता व तत्सम अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचे उघड होणे, दरम्यान विविध सोसायट्यांना पाणी पुरवठा होत नसल्याने त्यांना नाईलाजास्तव खाजगी टँकरद्वारे अवाच्या सव्वा रुपये मोजून पाणी विकत घ्यावे लागणे, यामध्ये शेकडो सोसायटीतील नागरिकांची प्रचंड आर्थिक लूट होणे, तथापि टँकर लॉबीकडून होणारी नागरिकांची लूटमार, यावर पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचे जाणूनबुजून दुर्लक्ष होणे, तसेच टँकरच्या झालेल्या फेऱ्या, वितरित केलेले पाणी व नागरिकांची पाण्याची आवश्यकता याबाबतची आकडेवारी व माहिती उपलब्ध नसणे, तथापि ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाणी पुरवठा न होणे व कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न होणे, खाजगी टँकर लॉबीला आर्थिक लाभ मिळवून देणे, या गंभीर बाबी असून याची सक्षम प्राधिकरणाद्वारे चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी टांझानिया देशाचे वाहतूक व दळणवळण विभागाचे माननीय मंत्री श्री. मकामे एम्बारवा, (Hon. Mr. Makame Mbarwa, Ministry of Works & Transport) श्री. प्लॅडयुस एम्बोसा, संचालक, टांझानिया बंदर प्राधिकरण (Mr. Plasduce Mbossa, Director General – Tanzania Ports Authority) व अन्य उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित असून आपण सर्वजण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करूया असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी अभ्यागतांचे टाळ्या वाजवून स्वागत केले.)

(२) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधले -

"महाराष्ट्र राज्यातील बहुतांश नागरिकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असणे, शेतकऱ्यांच्या जमिनीचे सर्वे न. व गट न. चे सर्वेक्षण / मोजणी होऊन बराच कालावधी झालेला असणे, नकाशावरील दर्शवण्यात आलेले शेत / पाणंद रस्ते खूप जुन्या कालावधीतील असणे, शेतकऱ्यांच्या कुटुंबात वाटणी, खरेदी विक्री आदी कारणाने जमिनीचे क्षेत्र कमी झालेले असणे, पूर्वीच्या काळी असलेले मोठे बंधारे अत्यंत लहान झाले असणे, अशा कारणाने शेतकऱ्यांच्या शेतीला दळणवळणासाठी रस्ताच नसल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे,विज्ञान युगात शेतीची जवळपास सर्व कामे यंत्रावर अवलंबून असल्याने शेतीसाठी रस्त्याची नितांत गरज असणे, भविष्यात शेत रस्त्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, महसूल प्रशासनाने विविध कलमाखाली आदेशित केलेले वहिवाटीचे रस्ते, वाटणी पत्रातील नमूद रस्ते, नकाशावर घेतली नसणे, सदरील रस्ते सातबारा वर नोंद करणे गरजेचे असणे, शेत जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीत तसेच कुटुंबाच्या वाटणी फेर मध्ये शेतीला जाणारा रस्त्याचा उल्लेख दर्शविणे व सदरील नोंदी सातबारा व इतर हक्कात घेणे बंधनकारक करण्याबाबत लोकप्रतिनिधींची शासनाकडे होत असलेली मागणी, त्याबाबत उचित कार्यवाही शासन स्तरावरुन झाली नसणे, शेत रस्त्यांचे वाद व प्रकरणे राज्यात महसूल विभाग, पोलीस ठाणे, आणि न्यायालयात सातत्याने दाखल होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यात अनेक शेतकऱ्यांना शेत रस्ता नसल्याने शेतकऱ्यांच्या माल पावसाळ्यात शेतातच पडून असणे, पाऊस व नैसर्गिक आपत्तीत सदरील धान्याच्या नुकसानीच्या अनेक घटना गावोगावी दरवर्षी होत असल्याचे दिसून येणे, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतीला रस्ता देण्यासाठी आवश्यक कार्यवाही राज्य शासनाच्या वतीने करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अनेक तक्रारी वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून होत असणे, रुग्णालयात औषधांचा आवश्यक साठा असतांनाही कृत्रिम तुटवडा निर्माण करून रुग्णांना बाहेरून औषध विकत आणायला सांगण्यात येणे, त्यामुळे रुग्णांना आर्थिक भुरदंड सहन करावा लागणे, तसेच रुग्णालयातील अनेक वॉर्डात पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, परिणामी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकात वाढते असंतोषाचे वातावरण, रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये उक्त रुग्णालयाची सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करणे, सदर पाहणी दरम्यान रुग्णालयात पाण्याअभावी मोतीबिंदूच्या सर्जरीसाठी तीन रुग्णांना वाट पहावी लागण्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, शासनाने यासर्व प्रकरणी चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची चौकशी करून औषधांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून रुग्णांना बाहेरून औषध खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून दुपारी २.०० वाजता पुन्हा सुरू होईल असे
माननीय उपाध्यक्षांनी सांगितले
सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४० मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक दुपारी २.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**५.** उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३-२०२४ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला.

सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प सभागृहासमोर सादर करण्यात आला असून अर्थसंकल्पीय प्रकाशनाचे पेन ड्राईव्ह असलेल्या सूटकेसेस सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे विधान भवन, मुंबई येथील विधान भवनकरिता आरक्षित असलेल्या वाहनतळाच्या मोकळ्या जागेवर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये करण्यात आलेली आहे तसेच सन्माननीय सदस्यांनी वितरणाच्या ठिकाणाहून सदर प्रकाशनाच्या पेन ड्राईव्ह असलेल्या सूटकेसेस प्राप्त करून घ्याव्यात व सदर अर्थसंकल्पीय प्रकाशने महाराष्ट्र विधिमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करून देण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

## शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३

(१) सर्वश्री रोहित पवार, दिपक चव्हाण, हसन मुश्रीफ, बाळासाहेब पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"कोल्हापूर चित्रनगरीत चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे निदर्शनास येणे, सदर बैठकीत चित्रनगरीचा अधिकाधिक विकास आणि आधुनिकीकरणाचे नियोजन करून त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबरोबरच आवश्यक त्या निविदा काढण्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी आदेशित करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, तसेच सदर बैठकीत त्याचबरोबर सौरऊर्जा प्रकल्प बसविणे, बाह्यस्तोत्रावर सुरक्षा रक्षक पुरवणे, कर्मचारी वर्ग पुरविणे, कोल्हापूर चित्रनगरीत आवश्यक तेथे पथदिवे लावणे, पाण्याची उच्चतम टाकी बांधणे याबाबतही चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला असल्याचेही निदर्शनास येणे, सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार त्याबाबत निविदा प्रक्रिया व अन्य तदनुषंगिक कामे करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक २ ही सन्माननीय सदस्य श्री. रवी राणा, वि.स.स. यांची असून ते सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना केव्हा घ्यायची आहे त्याबाबत माननीय अध्यक्ष निर्णय घेतील, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

लक्षवेधी सूचना क्रमांक ३ ही सन्माननीय सदस्य श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. यांची असून ते सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलली गेली असली तरी ती आज चर्चेला येणार नाही. ही लक्षवेधी सूचना शासनाने हुतात्मा श्री. शिवराम हरी राजगुरू यांच्या स्मारकासंबंधातील असून पुढील १५ दिवसात तेथील स्मारकाचे काम सुरु होणार आहे. त्यामुळे ती लक्षवेधी सूचना आज उपस्थित केल्यास राज्यातील जनतेमध्ये चुकीचा संदेश पोहचू नये, अशी माहिती उद्योजकता व नाविन्यता मंत्री यांनी दिली.

(४) प्रा.(श्रीमती) वर्षा गायकवाड, सर्वश्री अमीन पटेल, अस्लम शेख, श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मुंबईतील विक्रोळी कन्नमवार नगर येथील ४५ वर्षांपूर्वी सर्वसामान्य मागासवर्गीय लोकांसाठी मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३१ इमारती शासनाने उपलब्ध करून देणे, येथील बहुसंख्य इमारतींचे अभिहस्तांतरण झालेले असून या इमारती ४५ ते ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या असल्याने या इमारती धोकादायक अवस्थेत असणे, जीर्ण इमारतींमुळे अनेक दुर्घटना घडल्या असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने या इमारतींची तातडीने पुनर्विकास करण्याची आवश्यकता असताना सामाजिक न्याय विभागाने अनेक अटी व शर्ती लावून पुनर्विकासास अडथळे निर्माण करणे, समाज कल्याण विभागाच्या दिनांक २६ फेब्रुवारी, १९८५ च्या आदेशात सभासदांच्या मृत्यूपश्चात नियमानुसार वारसदारांचे सदस्यत्व मंजूर करणे आवश्यक असून सामाजिक न्याय विभागाने पुन्हा वारसदारांचे जातीचे, दाखले, उत्पन्नाचे दाखले, वास्तव्याचे दाखले व इतर कागदपत्रे मागणी करणे, यापूर्वी या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार आयुक्त, समाज कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून या समितीनेही अद्याप कोणत्याच शिफारसी व अहवाल शासनास सादर न करणे, त्यामुळे या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासास बसलेली खीळ, इतर शासकीय गृहनिर्माण संस्थांवरील निर्बंध काही वर्षातच उठविले जातात परंतु मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला जात असल्याची जनमानसात होत असलेली चर्चा, सन १९७८ पासून या गृहनिर्माण संस्थेतील अनेक खरेदी विक्री

व्यवहार हे म्हाडा, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन कार्यालयाच्या माध्यमातून नोंदणी करून व अभिहस्तांतरण झालेल्या गृहनिर्माण संस्थांनी स्वतःच्या अधिकारात व्यवहारांना मान्यता देऊन महाराष्ट्र सहकार कायदा ,१९६० नुसार सर्व कामकाज केले असताना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रानुसार कालबाह्य व गैरलागू अटी व शर्ती लादून धोकादायक इमारतीमध्ये जीव मुठीत ठेवून जीवन जगणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्विकासाला अडचणी निर्माण केल्यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने चौकशी करून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांच्या पत्राबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ५ ही पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"आरे कॉलनी [गोरेगांव (पूर्व), मुंबई] येथील आरे प्रशासनाच्या अखत्यारित येत असलेल्या शासकीय रुग्णालयाचे हस्तांतरण, अंतर्गत रस्ते व प्रवेशद्वाराचे नामकरण, पिकनिक स्पॉट उद्यानाचे सौंदर्यीकरण, आरे तलावाचे सुशोभिकरण, स्टार शौचालय आदी शासन स्तरावर गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे,आरेमधील शासकिय रुग्णालय महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, सदरहू शासकिय रुग्णालय महापालिकेकडे हस्तांतरित केल्यास जोगेश्वरी येथील बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर सेंटर किंवा गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थ मनपा प्रशासनाच्या रुग्णालयाशी जोडल्यास रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होणे, डॉक्टर व कर्मचारी वर्ग उपलब्ध होणे, त्याचबरोबर आरे अंतर्गत ४५ कि.मी. च्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असणे, सदरहू रस्ते दुरुस्तीकरिता दुग्धविकास विभागाकडे निधी उपलब्ध करण्यास होत असलेली चालढकल, आरे अंतर्गत रस्ते करण्यास शासनाकडे निधी नसल्यास शासनाने देखभाल व दुरुस्तीकरिता हे रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची आवश्यकता, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २/११/२०२२ रोजी १७३.०० कोटीचा प्रस्ताव मंजुरीकरिता शासनाकडे सादर करणे,यापैकी ४७ कोटीचा डांबरीकरणाकरिता तांत्रिक मान्यता देण्यात आली असून सदर प्रस्ताव निधी मंजुरीकरिता वित्त विभागाकडे प्रलंबित असणे, स्टार शौचालयास निधी मंजूर व परवानग्या असूनही केवळ शासनाच्या स्थगितीमुळे रखडलेला असणे, तसेच आरे गोरेगांव चेकनाका येथे उभारण्यात येत असलेल्या प्रवेशद्वारास "छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार'' असा नामकरणाचा प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित असणे, आरे परिसरातील मरोळ, पवई व गोरेगांव असे तीन चेकनाका येत असून आरे हे पर्यटनस्थळ असल्याने याठिकाणी राज्यातून / परदेशातून पर्यटक येत असणे, त्यामुळे आरेमधील पिकनिक स्पॉट उद्यानाचे सौदर्यीकरण,आरे तलावाचे सुशोभिकरण तातडीने करण्याची आवश्यकता, सदरहू पर्यटन स्थळे ही देखभाल व दुरुस्तीकरिता संस्थाच्या ताब्यात देतांना सनियंत्रण

समितीच्या कोणत्याही आवश्यक त्या परवानग्या संबंधित यंत्रणेमार्फत घेतलेल्या नसणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून होत असलेल्या अनधिकृत बांधकामांकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे आरे परिसरातील सौंदर्याचा व पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, आरेच्या सौंदर्यात भर घालणारे भव्य असे प्रवेशद्वार उभारण्याबाबतचा प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्याची आवश्यकता, आरे कॉलनीतील प्रलंबित कामासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुनही शासन स्तरावर कार्यवाही होण्यास होत असलेला विलंब, परिणामी स्थानिक नागरिक विकासापासून वंचित होणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर कार्यवाही करून तातडीने निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

दुग्ध विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“भारतीय वन संवर्धन कायदा १९८० लागू होण्यापूर्वी विविध सिंचन प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तसेच ग्रोमोअर योजना, भूमिहीनांच्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी वेगवेगळ्या वन विभागाच्या जमिनीचे वाटप करण्यात आले असणे, ४५-५० वर्षांपेक्षाही जास्त कालावधी या जमिनी सदर शेतकऱ्यांच्या ताब्यात असून, वहिवाटीत असणे, वन संवर्धन कायदा १९८० पूर्वी निर्वनीकरण करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना असणे, निर्वनीकरण न करता वाटप करण्यात आलेल्या शेतजमिनी वन विभागाचे निर्बंध असणे त्यामध्ये अनेक कायदेशीर अडचणी निर्माण झालेल्या असणे, याच जमिनीच्या उत्पन्नावर संबंधित शेतकऱ्यांची उपजीविका सुरू असणे, सद्यःस्थितीत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे वन नसताना व त्या जमिनी या शेतजमीन असताना त्या ठिकाणी शेतकरी व नागरिकांना जमिनीचे हस्तांतर करणे व त्या ठिकाणी वेगवेगळ्या योजना राबविण्यासंदर्भात कायदेशीर अडचणी निर्माण होत असणे, ज्यांच्या जमिनी वेगवेगळ्या शासकीय प्रकल्पासाठी संपादित झालेल्या वर्ग एक जमीन असताना त्यांना वर्ग दोनची जमीन देऊन सदर शेतकऱ्यांवर देखील अन्याय झालेला असणे, त्यामुळे सदर बाबतीमध्ये केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून या जमिनी निर्वनीकरण करण्याची आवश्यकता, राज्यात अनेक ठिकाणी वन विभागाच्या जमिनीतून शेतकऱ्यांच्या व सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांच्या पाईप लाईन जात असणे, शेतकऱ्यांना या पाईपलाईनसाठी पूर्वलक्षी प्रभावाने परवानगी मिळण्याची आवश्यकता, तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर बिबटे व तत्सम हिंस्त्र वन्य प्राण्यांचा धोका निर्माण झाला असणे, यामुळे नागरिक व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीची वातावरण व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

वने मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मु.का.अ.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या प्रमूख उपस्थितीत गुगल मीटिंगमध्ये चंदा बेलसरे व इतर आरोग्यसेविका यांनी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी मांडल्या असणे, अमरावती जिल्ह्यातील अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद आस्थापनेवरील आरोग्यसेविका पुष्पा वानखडे, चंदा बेलसरे, दिपाली शिंदे, पद्मा जाधव, सुनंदा नाथे आदींनी राज्य सरकारकडून खालील मागण्या मंजूर करण्यात याव्यात या मागणीसाठी जिल्हा परिषद, अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा भा. प्र. से. यांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या गुगल मीटिंग मध्ये अमरावती जिल्ह्यातील आरोग्य सेविका यांनी भाग घेऊन मीटिंग मध्ये आरोग्य सेविका कृती समितीच्या वतीने चंदा बेलसरे आरोग्य सेविका पदाधिकारी यांनी आरोग्यसेविकांच्या हिताच्या एकूण १८ मागण्या मांडल्या असणे, त्यातील ज्या मागण्या जि.प. अमरावतीशी संबधित आहेत त्या सोडविल्या जातील असे आश्वासन जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. ढोले यांनी दिले असणे, तर जे सरकारकडील विषय आहेत त्या सरकारचे मंत्रालयीन विभाग यांच्याकडे पाठविल्या असल्याचे त्यांनी सांगितले, अमरावती येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांना वरील मागणीचे निवेदनामार्फत विभागीय आयुक्त कार्यालय,अमरावती यांच्याकडे देऊन त्यांच्या कार्यालयाचे उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक ५९९/२९२३ दिनांक १ मार्च, २०२३ रोजी अवर सचिव, आस्था.८, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट मुंबई, मंत्रालय यांना पाठवले असणे, विशेषतः यापूर्वीही सरकारने या मागणीचा विचार करून निर्णय घेण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत त्यांच्या उपस्थितीत नागपूर अधिवेशनादरम्यान राज्याचे आरोग्य मंत्री यांच्याकडे विधान भवनात तसेच राज्य सरकारचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ०१ ते १८ मागण्यांचे निवेदन दिलेले असणे, ज्या निवेदनामध्ये त्यांनी खालील प्रमाणे मागण्या मांडल्या होत्या त्यामध्ये सन २००५ नंतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका नियमित यांची पदभरती करून त्वरित रिक्त पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य सेवक याप्रमाणे आरोग्य सेविका यांना विना प्रशिक्षण पदोन्नती देण्यात यावी, प्रशिक्षणाची अट रद्द करण्यात यावी, तसेच सर्व आरोग्य सेविकांची ज्येष्ठता सूची लवकरात लवकर प्रशिक्षण पूर्ण करून घ्यावे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन एल. एच. व्हीं. पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य प्राथमिक केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन आरोग्यसेविका पदे भरण्यात यावी, तसेच तालुका स्तरावर आरोग्यसेविका पदनिर्मिती करण्यात यावी, तसेच रिक्त पदाचा उपकेंद्राचा मांडण्याकरिता आरोग्यसेविका यांना अतिरिक्त वेतन देण्यात यावे, तसेच वाढत्या पेट्रोलची महागाई पाहता आरोग्यसेविका यांचा कायम प्रवास भत्ता पंधराशे रुपये भरून तीन हजार रुपये करण्यात यावा, नियमित पदोन्नतीची नस्ती निकाली काढणे व पद रिक्त झाल्याबरोबर दुसरे महिन्यात ज्येष्ठतेच्या यादीनुसार पात्र पदोन्नती देण्यात यावी, तसेच आरोग्य सेविकांना कार्य करण्याचा पाच दिवसांचा आठवडा करण्यात

यावा, तसेच आरोग्य सेविका यांचे कायमस्वरूपी पदे भरण्यात यावी, तसेच कंत्राटी पद्धत बंद करण्यात यावी, तसेच कोरोना संक्रमण महामारीच्या काळात आरोग्य सेविका यांनी जिवाची काळजी न करता अहोरात्र काम केल्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढ देण्यात यावी,आरोग्यसेविका हिला चालू सेवाकाळात GNN ट्रेनिग with salary अशी पद्धत सुरू करणे, निवासस्थान राहणे योग्य नसल्यास आरोग्य सेविकांना घरभाडे भत्ता देण्यात यावा, तसेच सर्व ऑनलाईन पोर्टल जबाबदारी इतर कर्मचारी यांना देण्यात यावे जेणेकरून टेक्निकल कामकाज आरोग्यसेविकेला गुणवत्तापूर्ण सेवा रुग्णांना देता येतील, यासह एक ते १८ प्रकारचे आदींचा समावेश असलेले निवेदन आरोग्य सेविका यांनी राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदन देऊन अवगत केलेले असणे, परंतु अद्यापपर्यंत शासनाकडून वरीलप्रमाणे निर्णय झाला नसणे म्हणून वरील प्रमाणे शासन निर्णय, आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीत तिसऱ्या क्रमांकावर दाखवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३ ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीत आठव्या क्रमांकावर दाखवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८ ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४४ मिनिटांनी स्थगित झाली.**

**सभागृहाची नियमित बैठक माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता सुरु झाली.**

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीन प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकतीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

माननीय अध्यक्षांनी, आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनामध्ये अनुमती नाकारलेली असल्याचे सांगितले.

श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी, ' दिंडोशी विधानसभा मतदारसंघांतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागून असलेल्या न्यू दिंडोशी म्हाडा वसाहतीमध्ये ५०० कुटुंब वास्तव्यास असून मागील दोन दिवसांपासून या परिसरामध्ये मुक्तपणे बिबट्याचा वावर सुरू असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील सार्वजनिक उद्यानांमध्ये योगासने करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने बंदी घालणे' व 'मुंबईतील हवामानाचा दर्जा अतिशय खालावत असणे' इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनांवर आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या सदरहू मुद्यांची दखल घेऊन शासनाने उचित उपाययोजना करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, 'महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीय कामकाजावर लक्षवेधी सूचनांचा परिणाम होणार नसल्याबाबत माननीय अध्यक्षांनी काळजी घेणे' इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, 'सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खत खरेदी करताना जात सांगावी लागत असून त्याची नोंद E-POS मशीनमध्ये केली जाणे' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. सुधीर मनुगंटीवार, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्याच्या पुष्ट्यर्थ आपापले म्हणणे मांडले.

श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, 'विधानसभा व विधान परिषद सभागृहातील लिखित व अलिखित नियमांचे पालन करणे' इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सदरहू विषयाची संपूर्ण माहिती घेऊन जर कुठे चूक झाली असल्यास ती सुधारण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, 'वांद्रे व्हिलेज येथील सीटीएस नंबर ७०९, ७१०, ७११, ७१२ ए, ७१२ बी, ७१२ सी, ८४८, ८५८ या ८७५५.३० स्क्वेअर मीटरची मुंबईचे आर्च बिशप यांच्या मालकीची जागा चॅरिटेबल ट्रस्टच्या नावावर असून ही जागा विकण्याबाबतच्या परवानगीची नोटीस दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी ॲड. जे.पी.त्रिपाठी यांनी वृत्तपत्रामध्ये देणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून शासनाने त्वरित याबाबतची माहिती घेऊन उचित उपाययोजना करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ' सांगली जिल्ह्यातील खत खरेदीसंदर्भातील वक्तव्यात श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी "राईचा पर्वत करणे" असा श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याबाबत उल्लेख करणे' इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सदरहू मुद्दा कार्यपद्धतीविषयक मुद्यात बसत नसून "राईचा पर्वत करणे" हा शब्दप्रयोग असंसदीय असल्याचे संसदीय सभ्याचार आणि शिष्टाचार विषयक आचारसंहितेत नमूद नाही, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, ' महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये पोलीस उप निरीक्षक पदांकरिता व कृषि सेवा परीक्षांकरिता सन २०१९-२०२० चे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र मागण्यात येणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने सदर बाबीची नोंद घ्यावी व उचित कार्यवाही करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(२) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ' सिडकोने लॉटरी प्रक्रिया खाजगी कंपनीच्या माध्यमातून राबविण्यासाठी घेतलेल्या निर्णयात आर्थिक गैरव्यवहार झाल्याची स्थानिकांची भावना असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी, ' मढ मच्छीमार सर्वोदय सहकारी सोसायटी, मढ यांच्या मालकी हक्काच्या जागेला युएलसीची नोटीस दिलेली असून त्याविरोधातात न्यायालयीन दाद मागूनही याबाबतच्या निर्णय आदेशाची प्रत शासनाकडे दोन वर्षांपासून प्रलंबित असणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१) श्री. महेश (दादा) लांडगे, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे विलीनीकरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या संस्थेमध्ये करण्यात येणे, परिणामी प्राधिकरणाच्या जवळपास ३० हजार भूखंडाचे प्रॉपर्टी कार्ड बनविण्याचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सन २०१८ मध्ये सेक्टर २ मधील मिळकतधारकांना प्रायोगिक तत्त्वावर प्रॉपर्टी कार्ड देण्यात आले असणे, सद्यःस्थितीला प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मूळ प्राधिकरण हद्दीचे नकाशे उपलब्ध नसणे, यामुळे प्राधिकरणाची नेमकी हद्द कोणती याबाबत संभ्रम कायम असणे, जागा मालकाचे ७/१२ उताऱ्यावर प्राधिकरण संपादित असा शेरा असल्याने प्राधिकरण जागेत दिवसेंदिवस वाढत असलेले अतिक्रमण व त्यावर उभी राहत असलेली बेकायदेशीर बांधकामे, यामुळे स्थानिक महापालिका प्रशासनाच्या महसुली उत्पन्नावर होणारा परिणाम, त्यानुषंगाने महसूल विभाग व मा.जमाबंदी प्रशासनाने प्राधिकरण हद्दीचे अत्याधुनिक पद्धतीने जीसीपीएस आणि ईटीएस प्रणालीद्वारे हद्द कायम करण्याची आवश्यकता, त्याद्वारे ३० ते ४० हजार भूखंडावरील जागा मालकांना तात्काळ दिलासा देण्याची गरज, यावर शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी ब्राम्हण समाजाने राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करणे, राज्यातील ब्राम्हण समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हलाखीची होणे, सुशिक्षित तरूणांना शासकीय नोकऱ्यांची संधी कमी होणे, पर्यायाने खाजगी नोकरी व व्यवसाय करण्याशिवाय पर्याय नसणे, गरीब कुटुंबातील तरूणांना शैक्षणिक व व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स. यांनी 'वसमत तालुक्यातील टोकाई सहकारी साखर कारखान्यातील शेतकऱ्यांचे २२ कोटी रुपयांचे बिल थकीत असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय मंत्री श्री. रविंद्र चव्हाण यांनी विनंती केल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक -२ तात्पुरत्या वेळेसाठी पुढे ढकलण्यात आलेली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(३) सर्वश्री अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, सन्माननीय सदस्याप्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना -

श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, कुंडलवाडी, (ता. बिलोली, जि. नांदेड) या संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या सभासदांच्या शेतजमिनीच्या सिंचनासाठी कुंडलवाडी, शेळगांव, चन्नापूर आणि पाटोदा आष्टी अशा दोन उपसा जलसिंचन योजनांचे काम सन १९८५ मध्ये सुरू होणे, या कामाकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड यांनी संस्थेला रु.२,०५,२७,८६८/- इतके कर्ज मंजूर करून त्याचा बोजा शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर टाकणे, १९८५ मध्ये सुरू झालेले काम १९९४ मध्ये पूर्ण होणे, सदरची योजना प्रत्यक्षात कार्यान्वित न होणे, योजनेतील ५६९ शेतकरी सभासदांपैकी बहुतांश सभासद मागासवर्गीय व अल्पभूधारक असणे, दोन्ही उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना सिंचनाचा कोणताही लाभ न मिळणे, मात्र, शासनाने २०१४ मध्ये आश्वासन देऊनही शेतकऱ्यांची कर्जाची रक्कम अद्याप माफ न केल्यामुळे ७/१२ वर कर्जाची नोंद असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे जमिनीचे व्यवहार पूर्णपणे ठप्प होऊन शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत जाणे, या बरोबरच राज्य शासनाने दि.२७/१२/२०१९ रोजी जाहीर केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजने अंतर्गत कर्ज मुक्तीसाठी पात्र ठरलेल्या नांदेड जिल्ह्यातील बँक ऑफ बडोदा शाखा कुंडलवाडी, जि. नांदेड या बँकेचे खातेदार असणाऱ्या १२०० शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे पैसे बँकेकडे जमा होणे, त्यापैकी ५३६ शेतकऱ्यांच्या प्रकरणात कर्जमाफीची रक्कम आणि प्राप्त झालेली रक्कम यांचा ताळमेळ जुळत नसणे, त्यामुळे शासन स्तरावरून मार्गदर्शन घेऊन बँकेने सदरची रक्कम परत करणे, बँकेने परत केलेल्या ५३६ शेतकऱ्यांच्या प्रकरणातील कर्जमाफीची निश्चित रक्कम बँकेकडे अद्यापही पुन्हा जमा न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर अजूनही कर्ज दिसत असणे, जुने कर्ज थकीत असल्यामुळे शेतकऱ्यांना बी-बीयाणे व शेतीच्या कामासाठी नव्याने कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होणे, यासंदर्भात जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नांदेड आणि बँक ऑफ बडोदा, शाखा कुंडलवाडी, जि. नांदेड त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधीसह कर्ज मुक्तीसाठी पात्र शेतकऱ्यांकडून सातत्याने पाठपुरावा करूनही कर्ज माफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापही जमा न होणे, या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, कुंडलवाडी, (ता. बिलोली, जि. नांदेड) या संस्थेच्या ५६९ शेतकरी सदस्यांच्या प्रकरणी २०१४ मध्ये दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने त्यांचे कर्ज तातडीने माफ करण्याची आवश्यकता असून महात्मा

ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पात्र ५३६ शेतकऱ्यांची कर्ज माफीची रक्कम त्यांच्या खात्यात तात्काळ जमा होण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून एवढा विलंब होऊनही कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामतः स्थानिक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**३.** पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक ८- महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ' पंढरपूरातील तुळशी वृंदावन बागेची उभारणी व बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या दोषींवर सखोल चौकशी करून शासनाने कारवाई करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"पंढरपूर येथे राज्य सरकारने ३०० कोटी रुपयांचा पंढरपूर कॉरिडॉर विकसित करण्यास सुरुवात केली असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ व मध्य प्रदेशात महाकाल कॉरिडॉर अंतर्गत ज्योतिर्लिंग स्थळी उच्च दर्जाच्या सुविधा व विकासकार्य करण्यात येत असून, महाराष्ट्रातील परळीसह विविध ज्योतिर्लिंग स्थळी रस्ते, दर्शन सभामंडप, पार्किंग, पूरक व्यवसायांना दुकाने, यांसह विविध उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असणे, केंद्र सरकारने तीर्थस्थळांच्या विकास व संवर्धनासाठी सुरू केलेल्या प्रसाद योजनेत परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग समाविष्ट केले जावे, यासाठी राज्य सरकारने केंद्राला परिपूर्ण प्रस्ताव शिफारशीसह पाठविण्याची गरज, परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व महाराष्ट्रातील अन्य सर्वच ज्योतिर्लिंग स्थळी प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा कॉरिडॉर तयार करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केली-

"विधानसभा सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी उत्तर प्रदेश विधानसभेचे माननीय अध्यक्ष श्री. सतीश महाना तसेच हरियाणा विधानसभेचे माननीय अध्यक्ष श्री. ग्यानचंद गुप्ता व उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहेत."

**४.** 'मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्यामुळे व विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही आघाडी सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न केल्यामुळे मागील अडीच वर्षांत शेतकऱ्यांचे

झालेले प्रचंड नुकसान' या विषयाबाबत या विषयावर डॉ. संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, संजय सावकारे, अनिल बाबर, डॉ.प्रा. अशोक उइके, श्री. राजेश पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री तानाजी मुटकुळे, बबनराव लोणीकर, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, महेंद्र थोरवे, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री सुरेश भोळे, जयकुमार रावल, भरतशेट गोगावले, हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, दिलीप बोरसे, योगेश कदम, संतोष दानवे, बबनराव पाचपुते, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री दिलीप लांडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री नितेश राणे, गणेश नाईक, अभिमन्यू पवार, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री महेश शिंदे, प्रकाश आबिटकर, महेंद्र दळवी, विनोद अग्रवाल, राम सातपुते, जयकुमार गोरे, ज्ञानराज चौगुले, सुभाष देशमुख, सर्वश्रीमती मोनिका राजळे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड राहुल कुल, श्री. किसन कथोरे, डॉ. राहुल आहेर, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री हरीष पिंपळे, दादाराव केचे, किर्तीकुमार भांगडीया, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाळे, कृष्णा गजबे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री प्रकाश भारसाखळे, प्रताप अडसड, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री काशिराम पावरा, मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, डॉ. तुषार राठोड, श्री. नारायण कुचे, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, महेश चौगुले, गणपत गायकवाड, योगेश सागर, राम कदम, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, राणा जगजितसिंह पाटील, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याण-शेट्टी, धनंजय गाडगीळ, समाधान अवताडे, प्रकाश आवाडे, रवि राणा, डॉ. विनय कोरे, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, राजेंद्र राऊत, नामदेव ससाणे, भिमराव केराम, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव —

आणि

'अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणे व शेतीमालाचे दर व अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असणे' याबाबत सर्वश्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हसन मुश्रीफ, अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, रईस शेख, विनोद निकोले, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपुरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय

पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील, विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित झनक, राजू पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापुरे, इंद्रनील नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे-पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री माधवराव पवार, धीरज देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये दिलेला प्रस्ताव असे दोन्हीही प्रस्ताव एकत्रितरीत्या चर्चेला घेण्यात येतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी घोषित करून आता विरोधी पक्ष नेत्यांनी आपला प्रस्तावा मांडावा असे सांगितले.

**श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेता यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.**

"राज्यातील शेतकरी अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 'टप्पा-२' मध्ये १ टक्काही रक्कम खर्च केली नसल्यामुळे मोठी रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, कृषि मंत्री यांनी वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय बदल्या, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, केंद्र सरकारकडून मनरेगा पंतप्रधान शेतकरी अनुदान योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून तुषार आणि ठिबकचे अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नसणे, ''ग्रॉस डोमेस्टीक क्लायमेट रिस्क'' या संस्थेच्या अहवालात महाराष्ट्राचाही समावेश असणे, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, कोरोनापश्चात ग्रामीण भागाकडे झालेले स्थलांतर लक्षात घेता स्थलांतरित मजुरांच्या हाताला काम देण्यासाठी जलसंधारण, रोपवाटिका, रोजगार हमीच्या कामांबरोबरच ग्रामविकासाच्या विविध योजना आखण्याची आवश्यकता, तृणधान्यांच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, या शेतकऱ्यांवर सरकारकडून लाठीचार्ज करण्यात आला असणे, पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नाडले जात असताना अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, परिणामी शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाली असणे, केंद्र सरकारची किसान ड्रोन अनुदान योजना कागदावरच राहिली असणे, कृषि मालाच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, पीक कर्ज देण्यासाठी बँकांनी हात आखडता घेतला असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थांच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जांमध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२

फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या काळात वादळाचा तडाखा बसून काजू बी आणि काजू झाडांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाची अंमलबजावणी होत नसणे, फळपीक कर्जासाठीच्या वाढीव व्याजामुळे संत्रा व इतर फळपीक उत्पादकांना तोटा सहन करावा लागत असणे, द्राक्षाची कमी झालेली निर्यात, मराठवाड्याप्रमाणे कोकणातही वानरांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी धडक मोहिम राबवण्याची आवश्यकता, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदीअभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी झाली नसणे, महाराष्ट्र राज्य दूध महासंघ (महानंद) आर्थिक अडचणीत आला असून याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, लॅम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील पशुधन संकटात आले असणे, राष्ट्रीय अंडी समन्वय समितीकडून अंड्याच्या दरात अवाजवी चढ-उतार होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत आला असणे, मच्छीमारांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीचा दर्जा देण्याबाबत होत असलेली मागणी, पर्ससीन मच्छीमार बोटींमुळे निर्माण झालेले मच्छीमारांपुढील संकट, मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली मागणी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील कामे सुरू करण्याबाबत सरकारची धरसोड वृत्ती, परभणी जिल्ह्यात कंत्राटदाराकडून लाच घेताना जलसंधारण विभागाचा उपविभागीय अधिकारी व लिपिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले असणे, व्यवस्थापकीय संचालकांचाही यातील सहभाग उघड झाला असणे, या व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे शेतकरी, शेतमजूर व शेतीवर अवलंबून असलेल्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) डॉ. संजय कुटे (भाषण पूर्ण) | (२) श्री. नाना पटोले
(३) श्री. सुनील प्रभू | (४) श्री. अनिल देशमुख
(५) श्री. राम सातपुते | (६) श्री. लहूजी कानडे
(७) श्री. संजय गायकवाड | (८) श्री. दिलीप मोहिते
(९) श्री. समीर कुणावार | (१०) डॉ. विश्वजित कदम
(११) श्री. भास्कर जाधव (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३**

श्री. जयंत पाटील वि.स.स. यांनी, 'दिनांक १० मार्च,२०२३ रोजी विधीमंडळाने प्रसृत केलेल्या एका पत्रकामध्ये, विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधान परिषदेचे गट नेते पदावर श्री. एकनाथ शिंदे यांची तर श्री .अनिकेत तटकरे

यांची प्रतोद म्हणून माननीय उप सभापतींनी नियुक्ती केल्याचा उल्लेख करण्यात येणे,' इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा मांडला.

'सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी दिलेली माहिती ही विधान परिषदेच्या कामकाजासंदर्भातील असली व त्या सभागृहातील कामकाजाबद्दल इथे चर्चा करता येणार नसली तरीही त्या माहितीमध्ये विधिमंडळाचा उल्लेख केलेला असल्यामुळे या विषयाबाबत त्वरित माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी, "राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३०० रुपये सानुग्रह अनुदान देणे" इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी "शेतीमालाचे दर आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असणे" या विषयाच्या अनुषंगाने म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबतची सूचना दिलेली असून आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेवर सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षाच्या वतीने म.वि.स. नियम २९३ अन्वये दिलेल्या सूचनेमध्ये सदर विषय अंतर्भूत असल्याने त्यावर या सूचनेवरील चर्चेदरम्यान चर्चा करता येईल असे सांगताना उपरोक्त सूचना म.वि.स. नियम ५७ अन्वये च्या निकषात बसत नसल्याचे सांगून माननीय अध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारत असल्याचे घोषित केले व श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी सूचनाधीन विषयावर थोडक्यात आपले मत मांडावे असेही सांगितले.

श्री. छगन भुजबळ वि.स.स. यांनी उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपले मत मांडले.

श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी, मागील दोन दिवसांपासून एका रॅलीतील महिला माजी नगरसेविकेची क्लिप सोशल मिडियांवर व्हायरल होत असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपले मत मांडले.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून १८ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून २८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, 'महिला माजी नगरसेविकेची क्लिप सोशल मिडियांवर व्हायरल होत असणे' इ. बाबत उपस्थित करण्यात आलेल्या विषयाची चौकशी एसआयटी मार्फत करण्याची आवश्यकता' इ. संदर्भात माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, उपरोक्त प्रकरणाबाबत एसआयटी चौकशीची मागणी केली.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते व श्री. अमित साटम वि.स.स. यांनी याबाबत आपले मत मांडले.

शासनाने सभागृहाचे आजचे कामकाज संपण्यापूर्वी या विषयावर निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**१.** (अ) (१) दोन प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, "राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नसल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३९३३२ ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

श्री. अबु आजमी, वि. स.स. यांनी माहितीविषयक मुद्दा मांडला **(हिंदी भाषण प्रलंबित)**

सन्माननीय सदस्य श्री.अबु आजमी यांनी मांडलेल्या माहितीची संपूर्ण चौकशी करून त्यांच्यासोबत एक बैठक घ्यावी व योग्य ती उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

सर्वश्री अजित पवार, विरोधी पक्ष नेते, नाना पटोले, आदित्य ठाकरे, ॲड. आशिष शेलार, वि.स.स यांनी उक्त विषयासंदर्भात आपले मत मांडले.

**२.** मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीतील पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, 'सुमारे २००० माहुलकरांना स्थलांतरित करणे' इ. बाबत मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात आपले मत मांडले.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स यांनी देखील उक्त विषयासंदर्भात आपले मत मांडले.

(१) श्री.संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी, 'त्यांच्या मतदारसंघात समृद्धी महामार्गावरील पुलाजवळ भीषण अपघात होऊन त्यात ६ प्रवाशांचा मृत्यू होऊन ७ प्रवासी गंभीर जखमी होणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते, यांनीदेखील उक्त विषयासंदर्भात आपले मत मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

(२) श्री. समाधान आवताडे, वि.स.स. यांनी, 'दिनांक ९ मार्च,२०२३ रोजी त्यांच्या मतदारसंघातील पंढपूर शहरामध्ये असलेल्या तुळशी वृंदावनातील संत चोखामेळा मंदीर कोसळलेले असणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील नर्सेससाठी असलेली वसतिगृहाची इमारत धोकादायक झाल्यामुळे खाली करण्याचे आदेश आलेले असणे, त्यामुळे शासनाने तातडीने त्यांची राहण्याची व्यवस्था करणे गरजेचे असणे,' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री.किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, 'सन २०२३ वर्षी NEET मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काढलेल्या पुस्तिकेमध्ये पान क्र.२६ वर अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांचे दिनांक १ एप्रिल, २०२२ नंतरचे जात वैधता प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नसल्याचा उल्लेख असणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स. यांनी, 'औरंगाबाद शहराचे नामांतर केल्यानंतर तिथले वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न केला जात असणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी, 'मुंबई शहरामध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरु असून तेथे बांधकाम करताना सुरक्षेचे कोणतेही मापदंड पाळले जात नसणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

**४. (१) सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, अजित पवार, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. चेतन तुपे, सुनिल टिंगरे, रोहित पवार, संजय जगताप, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात महत्त्वाची भूमिका बजावणारे व देशाच्या स्वातंत्र्यासाठी तत्कालीन ब्रिटिश सरकारकडून फाशीची शिक्षा पत्करून जिवाचे बलिदान देणारे हुतात्मा श्री. शिवराम हरी राजगुरु यांचे पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरुनगर) तालुक्यातील खेड हे जन्मस्थळ असणे, या हुतात्म्याचा गावातील हा वाडा राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी १९८० च्या दशकात देशप्रेमींकडून शासनाकडे करण्यात आलेली असणे, सन १९९५ मध्ये या स्मारकाच्या कामास गती मिळाल्याचे दृष्टोत्पत्तीस येणे, तथापि १९९५ पासून तत्कालीन शासनाने स्मारकाच्या कामास वेळोवेळी निधी देण्याचे घोषित करण्यात येणे, परंतु आजतागायत हा वाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम पूर्णत्वास आलेले नसणे, त्यामुळे सदर हुतात्मा स्मारक हे केवळ कागदापुरतेच मर्यादित आहे की काय अशी संभ्रमावस्था निर्माण होणे, तसेच स्मारकाचे काम रखडल्यामुळे त्याठिकाणी अनेकांनी अतिक्रमण केल्याचे आढळून येणे, याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी (खेड-राजगुरुनगर मतदारसंघ) यांनी त्यानंतर आतापर्यंत अनेकदा लेखी पत्राद्वारे व सभागृहात प्रश्न मांडून शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधण्याचा केलेला प्रयत्न, माध्यमांनी देखील त्यांची वेळोवेळी दखल घेणे, परंतु असे असतांनाही हुतात्मा राजगुरू यांचा वाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून अस्तित्वात

न येणे, त्यामुळे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यासह राज्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व उदासीनतेची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करून हुतात्मा राजगुरू यांचे स्मारक उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी (मुख्यमंत्री) यांचेकरीता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

कॅप्टन आर. तमिल सेल्वन वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधले.

"मुंबई तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस कॅन्सर या आजाराच्या विळख्यात अडकणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, कॅन्सरच्या उपचारासाठी येणारा खर्च हा सामान्य व्यक्तीच्या आवाक्या बाहेर असून सध्या मुंबई व परिसरात कॅन्सर करिता सीटी स्कॅनचा खर्च १०,०००/- रुपये, एम.आर.आय करिता १५,०००/- रुपये, बी.आय.ओ.एक्स.बी.एक्स.वाय करिता ५,०००/- रुपये, किमोथेरपी करिता २,००,०००/- रुपये, रेडिएशन करिता १,००,०००/- रुपये, ऑपरेशन करिता २,००,०००/- इतका अंदाजे खर्च येत असणे, सदर खर्च हा सामान्य माणसाच्या आवाक्या बाहेर असून इतका मोठा खर्च शासनाच्या योजने अंतर्गत समाविष्ट करणे शक्य होत नसणे, मुंबई मधील टाटा रुग्णालयात उपचारासाठी संपूर्ण देशभरातून रुग्ण येत असणे, टाटा रुग्णालयात उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांना रुग्णालयात प्रवेश मिळविण्यासाठी ५-६ महिने प्रतीक्षा करावी लागत असणे, खाजगी रुग्णालयात उपचार घेणे हे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे नसणे, मुंबईतील वडाळा बी.पी.टी. च्या क्षेत्रामध्ये नवीन रुग्णालय बांधण्याकरिता आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे निदर्शनास येणे, उपचाराअभावी कॅन्सर या आजाराने मृत्यू होण्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत असून सदर बाब ही गंभीर होत असल्यामुळे मुंबई मध्ये अत्याधुनिक सोयीसुविधा असलेले नवीन रुग्णालय उभारण्याची नितांत आवश्यकता, ही बाब लक्षात घेऊन शासनाने जलदगतीने कृती करून सदर ठिकाणी अद्ययावत कॅन्सर रुग्णालय उभारण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) कुमारी आदिती तटकरे, श्री. अमित साटम, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, भास्कर जाधव, सुनिल प्रभू, संजय पोतनीस, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

कुमारी आदिती तटकरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडल्याने आणि दुरवस्था झालेली असल्याने परिसरातील कोकणवासीय नागरिक व पत्रकारांनी माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्या सुमारास कोलाड नाका येथे मानवी साखळी करत आंदोलन केलेले असणे, या महामार्गाच्या रखडलेल्या चौपदरीकरणाच्या कामाची उच्चस्तरीय समिती गठित करून चौकशी व्हावी आणि दोषी अधिकारी व संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केलेली असणे, डिसेंबर, २०२२ मध्ये पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, महामार्गाच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून दररोज होणारे अपघात रोखणे तसेच महामार्गाचे अनेक वर्षांपासून सुरु असलेले काम पूर्ण करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, सदरची परिस्थिती अधिकच गंभीर बनत चाललेली असणे, महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून अपूर्णावस्थेतील कामांमुळे नागरिकांना त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, महामार्गाच्या दुर्दशेमुळे आतापर्यंत हजारो अपघात झालेले असून शेकडो जणांना आपला जीव गमवावा लागलेला असल्याची माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात गंभीर माहिती उघडकीस येणे, सदर प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी, पत्रकार व सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे अलीकडील काळात वारंवार मागण्या करणे, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोकण परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, दुरावस्थेत असलेल्या महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यांच्यामध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करून अडचणींत असलेल्या वाहनचालकांबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महामार्गाचे काम मार्गी लावून आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्री.धनंजय मुंडे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"पंढरपूर येथे राज्य सरकारने ३०० कोटी रुपयांचा पंढरपूर कॉरिडॉर विकसित करण्यास सुरुवात केली असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ व मध्य प्रदेशात महाकाल कॉरिडॉर अंतर्गत ज्योतिर्लिंग स्थळी उच्च दर्जाच्या सुविधा व विकासकार्य करण्यात येत असून, महाराष्ट्रातील परळीसह विविध ज्योतिर्लिंग स्थळी रस्ते, दर्शन सभा मंडप, पार्किंग, पूरक व्यवसायांना दुकाने, यांसह विविध उच्च दर्जाच्या सोई-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असणे,

केंद्र सरकारने तीर्थ स्थळांच्या विकास व संवर्धनासाठी सुरू केलेल्या प्रसाद योजनेत परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग समाविष्ट केले जावे, यासाठी राज्य सरकारने केंद्राला परिपूर्ण प्रस्ताव शिफारशीसह पाठविण्याची गरज, परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व महाराष्ट्रातील अन्य सर्वच ज्योतिर्लिंग स्थळी प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा कॉरिडॉर तयार करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) सर्वश्री. संग्राम थोपटे, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमित झनक, अमीन पटेल, कुणाल पाटील, संजय जगताप, ॲड. राहूल कुल, वि.स.स., यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. संग्राम थोपटे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्री यांचे लक्ष वेधले.

"राज्यात मोठ्या प्रमाणावर गड किल्ले असून गड किल्ल्यांचे संरक्षण करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली असणे, विविध गड किल्ल्यांवर आवश्यक सोयी-सुविधा नसणे, किल्ल्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झालेली असणे, राजगड, रायरेश्वर, रोहिडेश्वर, तोरणा इत्यादी किल्ल्यावर सुरक्षा रक्षकांकडून गैरवापर करीत असणे, अनेक किल्ल्याच्या पायथ्याशी जाण्यासाठी रस्त्याची सुधारणा अपुरी असणे, अनेक किल्ल्यांवर सातत्याने मागणी करून रोप-वे ची सुविधा उपलब्ध नसणे, पर्यटकांना सोयी-सुविधांची कमतरता भासणे, राज्यातील सर्व किल्ल्यांची पाहणी करून त्रुटी दूर करण्याची आवश्यकता, किल्ल्यांच्या दुरवस्थेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्यातील गड किल्ल्यांची झालेली दुरवस्था दूर करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. जयकुमार (भाऊ) रावल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"धुळे शहरात तोडीपाणी डॉट कॉम या संकेतस्थळावरील +१(५७५)३०८-५९८१ या क्रमांकाच्या मोबाईल वरून शहरातील मुलींचे छुप्या पध्दतीने फोटो काढून त्यांच्या पालकांना व इतरांना पाठवून बदनामी करण्याचा भयंकर प्रकार धुळे शहरात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्या सुमारास उघडकीस येणे, याबाबत धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात येणे, यामुळे धुळे शहरात महिला व महाविद्यालयीन मुलींमध्ये तसेच पालकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या गंभीर प्रकरणाची पोलिसांकडून अद्यापपर्यंत कोणतीही दखल घेण्यात न येणे, उक्त प्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची चौकशी करून तोडीपाणी डॉट कॉम या संकेतस्थळाची चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७) श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"माझगाव मुंबई येथील म्हातार पाखाडी रोड येथील सव्हे क्र.३१८, ३१९, ३२० व ३२२ येथील ४ जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी २३ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव सन २०१० मध्ये तयार करण्यात येणे, मध्यंतरी दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ रोजी या ४ इमारतीस आग लागणे, सन २०२० मध्ये रहिवाश्यांनी जुन्या इमारतींच्या पुनर्विकासास मान्यता देणे, या योजनेमध्ये २३ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव मंजूर असताना विकासकाने न विचारता अतिरिक्त ७ मजले बांधणे, भाडेकरूंच्या संमतीविना विकासकाने बे व्हु बि.न.२ को.ऑ.हौ.सो.लि. नोंदणी करणे, भाडेकरूंना प्रत्येकी रू.२,२५,०००/- कॉर्पस फंड देण्याचे विकासकाने मान्य करून देखील अद्यापपर्यंत न देणे, विकसित केलेल्या बे-व्ह्यू इमारत क्र. २ या इमारती मधील सर्व रहिवाशांच्या फ्लॅट मध्ये व सर्वच भागात पाण्याची गळती असणे, खालील मजल्यावर रहिवासी रहात असताना वरील जादा अनधिकृत मजले बांधल्यामुळे रहिवाशांना धूळ, माती, सिमेंट इत्यादीचा त्रास होत असणे, याबाबत तक्रार करण्यास विकासक बाऊन्सरद्वारे धमकावणे व दहशत निर्माण करणे, एखादी घटना घडल्यास रहिवाशांना इमारतीबाहेर येण्याची सोय उपलब्ध नसणे, मा.गृहनिर्माण मंत्री, सचिव, आयुक्त मुंबई महानगरपालिका व स्थानिक पालिका अधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली असणे, सदर संपूर्ण अनधिकृत बांधकाम व रहिवाशांना होत असलेला त्रास, रहिवाशांत निर्माण झालेले भीतीचे व दहशतीचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) सर्वश्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL) मार्फत वीज वितरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असणे, महाराष्ट्र शासनामार्फत भिवंडी शहरात दिनांक २६ जानेवारी, २००७ ला टोरंट पॉवर लिमिटेड या कंपनीला भिवंडी परिमंडळात महावितरणची वितरण फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, मागील पंधरा वर्षाच्या कालावधीत भिवंडी शहर हे महाराष्ट्रामध्ये वीजबील देयक भरण्याची कामगिरी करणारे राज्यातील सर्वोत्कृष्ट एक शहर असणे, ज्यामुळे महावितरण आणि राज्य सरकारच्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय योगदान देण्यामध्ये भिवंडी शहर क्रमांक एकचे शहर असणे, उक्त विषयी तत्कालीन राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या सोबत दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी वीज ग्राहकांच्या जुन्या थकबाकीवर व्याज आकारणीबाबत या विषयावर बैठक आयोजित करण्यात आलेली असणे, भिवंडीतील

अनेक ग्राहकांकडे महावितरणची जुनी थकबाकी आहे आणि जर व्याज माफी झाल्यास भिवंडीकर हफ्त्याहफ्त्यामध्ये रक्कम भरण्यास तयार असणे, भिवंडी शहरासारखेच शिळ-मुंब्रा-कळवा या ठिकाणी वीज वितरण करण्याकामी खाजगी कंपनी फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, सदर ठिकाणी जो करार झाला आहे त्याअनुषंगाने मूळ रकमेच्या ११०% रक्कम एकाच वेळी भरण्याचा आणि संपूर्ण व्याज माफी मिळविण्याचा पर्याय पी डी ग्राहकांसाठी आधीच संपूर्ण व्याज माफी योजना अस्तित्वात असणे, परंतु भिवंडी मध्ये सदर योजना ५०% असल्याचा फरक काढण्याबाबत प्रामुख्याने मागणी करण्यात येणे, भिवंडीतील ग्राहकांना महावितरणाच्या जुन्या थकबाकीसाठी समान पर्याय उपलब्ध करून देण्यात येणे, शिळ-मुंब्रा-कळवाच्या धर्तीवर योजना थेट ग्राहकांसाठी उपलब्ध करून देणे, जुनी महावितरणाची थकबाकी स्वेच्छेने भरली जाणे, सदर विषयी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांनी महावितरणला या विषयाचा आढावा घेण्यास सांगणे, आणि त्यांना डेटा/तपशील प्रशासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, सद्यःस्थितीत भिवंडी क्षेत्रात ३३००० महावितरणचे ग्राहक असून महावितरणची जुनी थकबाकी सुमारे ५०० कोटी असणे, तसेच थकबाकीवरील व्याज वर्षानुवर्षे वाढत असल्याने महावितरणची थकबाकी सतत वाढणे. त्याअनुषंगाने "अमृत योजना" नावाची योजना सुरू केल्यास (MSEDCL) च्या रखडलेल्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय वाढ होईल, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

५. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २४६ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

६. आत अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरूवात होईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरू झाली.
चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.अजित पवार

(चर्चा अपूर्ण)

श्री. संभाजी निलंगेकर-पाटील वि.स.स. यांनी, 'अवकाळी पावसाची परिस्थिती असूनही लातूरसह महाराष्ट्रातील हरभरा खरेदी केंद्र सुरु करण्यास नाफेड परवानगी देत नसणे, इ. बाबत माहिती मांडली.

उपमुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात तत्काळ सूचना दिल्या असल्याचे सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा –** (चर्चा पुढे सुरू)

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री.अमित साटम (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण..)

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, 'मिठी नदीवरील पुलांच्या नूतनीकरण उद्‌घाटनावेळी आयोजित रॅलीमध्ये श्रीमती शीतल म्हात्रे व श्री. प्रकाश सुर्वे यांच्या व्हिडिओचे झालेले मॉर्फिंग' इ. बाबत निवेदन केले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा – (चर्चा पुढे सुरू)**

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री.अमित साटम (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, 'कुरार व्हिलेज, अप्पा पाडा येथे लागलेल्या आगीसंदर्भात' माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सहकार मंत्र्यांनी या विषयाबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा –** (चर्चा पुढे सुरू)

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री.अमित साटम (भाषण पूर्ण)

(३) श्री.पृथ्वीराज चव्हाण

(४) श्रीमती यामिनी जाधव

(५) श्री. अबु आजमी

(६) श्री. छगन भुजबळ

(७) श्री. समीर कुणावार

(८) श्री. अमिन पटेल

(९) श्री. रविंद्र वायकर

(१०) श्री. धनंजय मुंडे

(चर्चा अपूर्ण)

माननीय उपाध्यक्षांनी पुढील घोषणा केली.

'पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक शहर यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांचे विरोधात सरकारवाडा पो. ठाणे, नाशिक शहर येथे दि. २४/०७/२०१७ रोजी गु.र.नं. २४२/२०१७, भा.दं.वि कलम ३५३, ५०४ प्रमाणे ( सत्र खटला. क्रं. १७६ / २०२१ मध्ये दिनांक ०८/०३/२०२३ रोजी श्री. व्ही. एस. कुलकर्णी, जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक ०१, नाशिक यांचेद्वारे सन्माननीय सदस्यांना सीआरपीसी कलम २३५ (२) अन्वये भादंवि कलम ३५३ मध्ये ०१ वर्षे सश्रम कारावास व ५,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा, भादंवि कलम ५०४ मध्ये ०१ वर्षे सश्रम कारावास व ५,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच मला, पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय सदस्य श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) मधील आदेशाचे उल्लंघन केले म्हणून त्यांचेविरूद्ध पो.स्टे. उस्मानाबाद शहर येथे गु.र.नं. ३८६/२०१५ कलम ३५३, १८६, १४१, १४७, १४९, ५०६ भा.दं.वी सह १३५ म.पो. का. प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयात सेशन कोर्ट केस नंबर ४८/२०२० अन्वये मा. जिल्हा सत्र न्यायालय, उस्मानाबाद यांनी दि. २७.०२.२०२३ रोजी कोर्ट उठेपर्यंत स्थानबद्धतेची शिक्षा आणि रुपये २५००/- इतक्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.'

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा –** (चर्चा पुढे सुरू)

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(११) श्री.अतुल भातखळकर
(१२) श्रीमती मनिषा चौधरी
(१३) श्री. राजेश पवार
(१४) श्री.रमेश कोरगावकर
(१५) श्री. प्रशांत ठाकूर

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक १४ मार्च,२०२३ रोजीची सकाळी ०९.३० वाजता पुन्हा भरेल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३**

(१) श्री. सुभाष देशमुख व कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्यात सोलापूर औद्योगिक वसाहतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे निर्यात क्षम टॉवेल उत्पादन करणाऱ्या मुनोत गारमेंट टेक्स्टाईल व लगतच्या दोन छोट्या कारखान्यांना माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये लागलेल्या आगीत कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास येणे, माहे फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात दर्शन युनिफॉर्म आणि

बालाजी स्पिनिंग मिल ला आग लागून १८ कोटींचे नुकसान झालेले दिसून येणे, दोन्हीही संस्थेमध्ये फायर ब्रिगेडची यंत्रणा सक्षम नसल्यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होत असल्याचे त्या सुमारास निदर्शनास देणे, या कारखान्यातील टॉवेल, सुताचे गठ्ठे अन्य यंत्र सामग्री आगीच्या भक्षस्थानी पडले असणे, याबाबतच्या अहवालानुसार अद्याप टावेल कारखान्याला संपूर्ण नुकसान भरपाई मिळालेली नसणे, १९९३ मध्ये एमआयडीसी सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतर करूनही अद्याप येथे मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध नसणे, त्यात येथे अग्निशामक केंद्र नसल्याने या एमआयडीसीतील अनेक कारखान्यांना आग लागल्याबरोबर अग्निशामन (बंब) गाडी वेळेत न आल्याने कोट्यावधी रुपयाची नुकसान होऊन अनेक कंपन्या नष्ट होत असणे, त्यामुळे एमआयडीसीत आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा सुविधा देण्यासाठी अनेक कारखानदारांनी शासन आणि महानगरपालिकेकडे वारंवार मागणी करून ही याची प्रशासनाने दखल न घेणे, सोलापूर शहरातील ही एमआयडीसी देशात आणि परदेशात कापड उद्योग क्षेत्रात अग्रभागी असून येथे हजारो कामगारांना येथे काम मिळत असणे, एमआयडीसी आणि महानगरपालिका यांच्यात समन्वय नसल्याने अग्निशामन केंद्र कुठे उभारायचे हा प्रश्न वर्षानुवर्षी प्रलंबित असणे, त्यामुळे या एमआयडीसीची सर्वत्र दुर्दशा होत असणे, त्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग आणि नगर विकास विभागाने वेळीच दखल न घेतल्यास अनेक प्रलंबित प्रश्न गंभीर होत असणे, त्यामुळे येथील उद्योजक आणि कामगार तीव्र नाराजी व्यक्त करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. सिद्धार्थ शिरोळे व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे शिवाजीनगर येथील एसटी चे बसस्थानक मेट्रोच्या कामामुळे जुना पुणे-मुंबई रस्त्यालगत वाकडेवाडी येथील शासकीय दुध योजना (आरे) च्या जागेमध्ये स्थलांतरित करण्यात आले असणे, शिवाजीनगर बस स्थानकाची जागा मेट्रोचे काम पूर्ण होईपर्यंत महामेट्रोने तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेणे, सदर जागा ताब्यात घेताना एसटी महामंडळ व महामेट्रो ने सामंजस्य करार करून महामेट्रोने शिवाजीनगर बस स्थानक बांधून द्यावे असा निर्णय या करारातून होणे, सध्या मेट्रोचे काम पूर्ण झालेले असणे, परंतु सामंजस्य करारानुसार ठरल्याप्रमाणे अद्यापही शिवाजीनगर बस स्थानकाचे काम सुरु झालेले नसणे, यामुळे प्रवाशी नागरिकांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होणे, तसेच वाकडेवाडी येथे स्थलांतरीत केलेल्या बस स्थानकामुळे जुना पुणे–मुंबई मार्गावरती सतत वाहतूक कोंडी होणे, त्याठिकाणी राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणे, नागरिकांच्या व प्रवाशांच्या सोयीसाठी जुने शिवाजीनगर बसस्थानकाच्याच जागी नवीन बसस्थानक तयार करून त्याठिकाणाहून बस सेवा पुन्हा पूर्ववत सुरू करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीच्या वेळी दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ३, ४, व ५ पुढे ढकलण्यात आल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीच्या वेळी दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ६, ७ व ८ यांची उत्तरे देण्यासाठी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी स्थगित करित असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ९ वाजून ५६ मिनिटांनी १० मिनिटांनी स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ६ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

( ३ ) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मागील शासनाने राज्यात महात्मा फुले कर्ज माफी ही योजना सुरु करणे, यासाठी २ लाख रुपयांपर्यंत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा करून बऱ्याच शेतकऱ्यांना हे ५० हजार रुपये अनुदानाचे वाटप केलेले असणे, ज्या शेतकऱ्यांकडे २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असून आणि जास्त असलेले कर्ज जर शेतकऱ्यांनी भरले तर त्या शेतकऱ्यांचे २ लाख रुपये कर्ज सुध्दा माफ करण्याचा निर्णय होऊन सुध्दा व बऱ्याच शेतकऱ्यांनी २ लाख रुपयापेक्षा जास्त असलेले कर्ज भरुन सुध्दा त्यांना अद्यापही शासनाकडून २ लाख रुपये देण्यात न येणे, त्यावरील व्याजाचा भार शेतकऱ्यावरती पडणे, त्यावरील व्याज सुध्दा अद्यापही घेण्यात येत असणे, तसेच या योजनेचा लाभ अद्यापही देण्यात आलेला नसणे, परिणामी शेतकऱ्यांना सोसायटीमार्फत मिळत असणारे पीक कर्ज सुध्दा थांबविण्यात आलेले असणे, परिणामी शेतकरी दुहेरी संकटात सापडला असणे, या संदर्भात चौकशी करून नियमित कर्ज परत फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्यापोटी तसेच २ लाख रुपयापेक्षा जास्त असलेले रक्कम ज्या शेतकऱ्यांनी भरलेली आहे अशा शेतकऱ्याचे २ लाख रुपये कर्ज माफ करण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

( ४ ) श्री. सुभाष धोटे व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शासनाने भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या यादीस नुकतीच अर्थात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास मंजुरी दिली असणे, सदरहू यादीत फक्त बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील लाभार्थी असल्याने जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील लाभार्थ्यांवर अन्यायाची भावना व्याप्त

असणे, भटक्या जाती जमाती, इतर मागास बहुजन कल्याण विभागाने दिनांक २४ जानेवारी, २०१८ च्या शासकीय परिपत्रकानुसार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल देण्याचा निर्णय घेणे, त्यानुसार दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ च्या शासकीय परिपत्रकानुसार फक्त बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील लाभार्थ्यांना समाविष्ट केले गेले मात्र जिल्हयातील अन्य ११ तालुक्यात एकाही लाभार्थ्यांला या योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले नसल्याची बाब उघडकीस येणे, ग्रामपंचायतीमधून यशवंतराव चव्हाण घरकुल, धनगर घरकुल, शबरी घरकुल योजनेची यादी मागविण्यात येते, मात्र मंजुरी देताना फक्त आपल्या क्षेत्रातील, मर्जीतील लोकांना घरकुल मंजूर करून ग्रामपंचायतीने तयार केलेल्या यादीतील लोकांना वगळण्यात येत असल्याच्या असंख्य तक्रारी असणे, सदरहू प्रकरणी चौकशी गठीत करून या योजनेतून वगळण्यात आलेल्या जिल्हयातील अन्य ११ तालुक्यातील लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनामार्फत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने या घटकांचा शासनाप्रती वाढता असंतोष, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ८ बाबत संबंधित माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या नियमित बैठकीमध्ये घेण्यासाठी माननीय अध्यक्षांना विनंती केली आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक ९ ही पर्यटन विभागाकडून आता नगरविकास विभागाकडे हस्तांतरित होत आहे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ३४ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१) श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "जुनी पेन्शन लागू करण्यासाठी आजपासून शासकीय कर्मचाऱ्यांनी पुकारलेले आंदोलन, त्यामुळे रुग्णालये यासारख्या अत्यावश्यक सेवांवर झालेला परिणाम, याबाबत शासनाची असलेली भूमिका," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने त्वरित नोंद घेऊन उरित उपाययोजना करावी, असे निर्देश माननीय अध्यक्षांनी दिले.

याबाबत नोंद घेतली असल्याचे उद्योगमंत्र्यानी सांगितले.

**१.** (१) चार प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) एक तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात आला.

(३) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "लक्षवेधी सूचनांसाठी सभागृहाची सकाळी विशेष बैठक बोलावली मात्र या बैठकीला संबंधित विषयाचे मंत्री उपस्थित नसणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

आजच्या कामकाज पत्रिकेत विशेष बैठकीत दर्शविलेल्या लक्षवेधी सूचना झाल्या नसतील त्या नियमित बैठकीत घेतल्या जातील, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

माननीय मुख्यमंत्र्यांनी, याची गंभीर नोंद घेतली असून, संबंधित मंत्रिमहोदयांना योग्य त्या सूचना दिल्या जाईल, असे सांगितले.

(२) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "सोमाटणे, तळेगाव-दाभाडे येथील फाट्याजवळील बेकायदा टोल नाका बंद करण्याच्या मागणीसाठी गेल्या तीन दिवसांपासून ७ जण आमरण उपोषणाला बसले असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय मुख्यमंत्र्यांनी, याबाबत बैठक घेण्यात येऊन त्यामध्ये योग्य तो सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

(३) श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "बाळापूरचे आमदार नितीन देशमुख हे विभानसभा परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पायथ्याशी उपोषणाला बसणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय मुख्यमंत्र्यांनी, ही नवी प्रथा सुरू झाली असून सन्माननीय सदस्यांनी पायऱ्यांवर बसावे, मंत्रिमहोदय त्यांना भेटायला जातील, असे सांगितले.

(४) श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स. यांनी, "देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील सी.टी. स्कॅन मशील कोणतीही सूचना न देता मुखेड येथे हलविण्यात येणे, त्यामुळे रुग्णांना होत असलेला त्रास पाहता संबंधितांना त्वरीत आदेश देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "सनमकुमार पंडीत माने यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केली असून केवळ त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याचा जातीचा दाखला नसल्यामुळे मुलाखत नाकारली जाणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, "केईएम व नायर रुग्णालयातील एमआरआय आणि सीटी-स्कॅन मशीन अनेक वर्षांपासून बंद असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत गांभीर्यपूर्वक कार्यवाही करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(७) श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने लाँग मार्च काढण्यात आला असून ते मुंबईच्या दिशेने येत असणे, शेतकरी नेत्यांसोबतची चर्चेची बैठक मुख्यमंत्र्यांनी रद्द करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. विनोद निकोले, वि.स.स. यांनी आंदोलनाबाबत माहिती दिली.

कृषीमंत्र्यांनी, यासंदर्भात उद्या माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसोबत बैठक होणार आहे, असे सांगितले.

(८) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, “वर्सोवा येथील घासवाला कंपाऊंडमध्ये फर्निचर मार्केटला लागलेली भीषण आग, याबाबत तातडीने पंचनामे करून शासकीय मदत जाहीर करणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. यांनी, “शासकीय कर्मचाऱ्यांचे जुनी पेन्शन लागू करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन, याबाबत तातडीने निर्णय घेणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी, “नागपूरमध्ये मागील ५० दिवसांपासून ५०० महिलांचे साखळी उपोषण सुरू असणे, त्याची दखल घेणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. यांनी, “तिवसा शहरात पान टपरी सुरू करणाऱ्या मुलाला झालेली मारहाण आणि त्याचे वृत्त दिलेल्या पत्रकारालाही झालेली मारहाण,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर माहितीची सखोल चौकशी करण्याचे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(१२) श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, “म्हात्रे-सुर्वे प्रकरणी एसआयटीतर्फे तरुण मुलांना वेळी-अवेळी होत असलेली अटक, अटकेचे कारणही न देणे, त्यामुळे मुलांचे आयुष्य उद्धवस्त होणे,” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**२.** (१) कृषी मंत्र्यांनी,

(क) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल, तसेच

(ख) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) महिला व बाल विकास मंत्र्यांनी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल समभागृहासमोर ठेवला.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, “मुंबईत दिंडोशी येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांना लागलेली आहे,” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

ॲड. आशिष शेलार, श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनीही आपले मत मांडले.

पर्यटन मंत्र्यांनी, २४ तासाच्या आत घटनेचा पंचनामा करून मुख्यमंत्र्यांकडे अहवाल सादर करून योग्य तो निर्णय घेऊ, असे सांगितले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, "पालघर जिल्ह्यात डहाणू तालुक्यात कोहराडी पाडा येथे पाणी भरणाऱ्या महिलेला विवस्त्र करून तिला करण्यात आलेली मारहाण, दोषींवर कठोर कारवाई होणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

हा विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे शासनाने या विषयी त्वरित निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

**४.** सन २०२३-२०२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला कृषि, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धविकास, उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाने दोन्ही प्रस्तावांवर विचार केला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५.** (१) श्रीमती मनिषा चौधरी व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"नवी मुंबई सिडको लि., ने विकसित केलेल्या खारघर नोडला दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते ठराव मंजूर केला गेला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, बहुतांशी सुशिक्षित नागरिकांची वस्ती असलेला खारघर नोड शैक्षणिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला असणे, खारघर नोड विकसित झाल्यापासून एकही दारू विक्रीचे दुकान उक्त परिसरात अस्तित्वात नसणे, अशा परिस्थितीत शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघर परिसरात संबंधित विभागामार्फत दारू विक्रीचा परवाना दिला गेला असणे, उक्त परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी अनेक आंदोलने व निवेदने देवून सुद्धा दारूविक्रीचा परवाना दिलेल्यावर कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे खारघर परिसरात वातावरण गढूळ होऊन नागरिकांच्या विशेषतः महिला वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रचंड असंतोषाबाबत शासनाने खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून घोषित करण्याबाबत तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“जालना जिल्ह्यातील शेगाव ते पंढरपूर पालखी मार्ग (एन एच ५४८ सी) या रस्त्याच्या कामाची रुपये २९७ कोटीची प्रशासकीय मान्यता दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी मिळालेली असून या रस्त्याच्या कामातच पुलांचे काम समाविष्ट असणे, मात्र मेघा इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी व कार्यकारी अभियंता, उपअभियंता हे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्यामुळे संबंधित कंत्राटदार कंपनी व दोषी अधिकारी यांच्यावर शासनस्तरावर कठोर कारवाई करणे अपेक्षित असणे, या रस्त्यावरील मौजे श्रीष्टी ता.परतुर, जि. जालना व मौजे गंगासावंगी, ता. परतुर, जि. जालना येथील पुलाचे काम अपूर्ण असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असणे, पुलाचे काम पूर्ण न झाल्यामुळे येथील प्रवास अत्यंत धोकादायक बनला असणे, सन २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये कसुरा नदीला पूर आला असून या पुरामध्ये एसटी महामंडळाची बस वाहून गेली असणे, या बसमध्ये २३ प्रवासी होते, सुदैवाने गावकऱ्यांच्या समयसूचकता व मदतीमुळे या बसमधील प्रवासी सुखरूप बचावले, मौजे गंगासावंगी येथील पुलाचे काम संबंधित शेतकऱ्याला मावेजा न मिळाल्यामुळे प्रलंबित असणे, येथील नदीपात्रातील काम सुरू करण्यास कोणतीही अडचण नसताना सदरील कंत्राटदार कंपनी शेतकऱ्यांच्या नावाखाली काम करण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ करत असणे, तसेच मौजे श्रीष्टी येथील पुलासाठी संपादित जमिनीचा मावेजा सार्वजनिक बांधकाम विभाग देणार किंवा रस्ते विकास महामंडळ देणार या कारणामुळे काम प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. अमिन पटेल व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“मुंबई महानगरपालिकेच्या ‘स्वच्छ मुंबई–सुंदर मुंबई’ या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असणे, सफाई कर्मचारी वारसा हक्क पद्धतीने पिढ्यान पिढ्या सफाई कामगार म्हणून कार्यरत असणे, विशेषतः कोविड काळात त्यांनी दिलेल्या सेवेला विशेष महत्त्व असणे, सेवेत कार्यरत असेपर्यंत त्यांना महापालिकेच्या वसाहतीमध्ये घरे राहण्यासाठी उपलब्ध होणे, सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर घर खाली करण्यासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यात येणे, सेवानिवृत्तीनंतर त्यांची मुंबईमध्ये राहण्याची पर्यायी व्यवस्था नसणे, त्यामुळे सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळवीत अशी मागणी सफाई कर्मचाऱ्यांकडून वारंवार होत असणे, या मागणीच्या पाठपुरावा करण्यासाठी अधिवेशन काळात वारंवार प्रश्न उपस्थित करणे, सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळवीत यासाठी शासन स्तरावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी सभागृहात देणे, परंतु अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसणे, आश्रय योजना व श्रमसाफल्य योजनेत असणाऱ्या विरोधाभासामुळे सफाई कर्मचारी संभ्रमात असणे, त्यामुळे सफाई कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री महेश बालदी व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणाऱ्या रायगड जिल्ह्यातील न्हावा-शिवडी सेतू प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावा, गव्हाण, घारापुरी हद्दीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे व मच्छीमार बांधवांचे पुनर्वसन अद्यापपर्यंत झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस आले असणे, उक्त प्राधिकरणाने उक्त प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत ग्रामस्थांना याद्या तयार करण्यास सांगितले असणे, प्रकल्पबाधित मच्छीमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटप करण्यासाठी ९ याद्या तयार करण्यात आल्या असणे, उक्त यादीतील काही ग्रामस्थांना नुकसान भरपाईच्या रक्कमेचे वाटप करण्यात आले असून बहुतांशी प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छीमारांना अद्यापही नुकसान भरपाईच्या रक्कमेचे वाटप करण्यात आलेले नसणे, उक्त सेतू मार्गामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या विकासासाठी प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकास निधी देण्याचे दिनांक १५/१०/२०२० रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये मान्य केले असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर ग्रामपंचायतींना निधी वितरित केला गेला नसणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदने व भ्रमणध्वनीद्वारे प्राधिकरणाला अवगत करूनसुद्धा प्राधिकरणामार्फत कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे सेतू मार्ग प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकरी व मच्छीमार बांधवांमध्ये उक्त प्राधिकरणाबाबत प्रचंड चिड निर्माण होत असणे, त्यामुळे सेतु प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छीमार बांधवांना तातडीने नुकसान भरपाईचे वाटप करण्याबाबत तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकासनिधी देण्याबाबत शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. विनोद निकोसे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पालघर जिल्ह्यातून मुंबई - बडोदा सुपर फास्ट हायवेच्या कामासाठी जमीन भूसंपादन सुरू असणे, पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा असणे, ज्या जमिनी भूसंपादन झालेल्या आहेत त्या अधिकतर आदिवासी शेतकरी बांधवांच्या असणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे सदरहू प्रकल्पात जमीन घोटाळा होणे, मोठ्या प्रमाणावर आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक होणे, अधिग्रहित जमिनीचा मोबदला शासनाकडून मिळत असतानाही त्यात दलाल डल्ला मारत असणे, जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, बहुमोल वनसंपत्ती नष्ट होणे, पर्यावरण प्रेमींनी आक्षेप घेणे, पालघर जिल्ह्यातील वसई, वाडा, पालघर विशेषतः तलासरी, डहाणू या तालुक्यातून सदरहू

हायवे जाणार असणे, सर्वच शेतकऱ्यांनी त्यास जमीन देण्यास विरोध करणे, ज्या ठिकाणी जमीन मोजणी पूर्ण झालेली आहे, त्या ठिकाणी मोबदला अतिशय तुटपुंज्या असणे, त्यास ही शेतकऱ्यांचा विरोध असणे, प्रस्तावित मुंबई - बडोदा महामार्गामुळे पालघर जिल्ह्यातील वनसंपत्तीची मोठी हानी होणार असणे, वसई ते तलासरी पर्यंतची सुमारे १८१ हेक्टर वनजमीन या महामार्गासाठी जाणार असणे, शिवाय सुमारे ५१ गावांतील शेतकरी बाधित होणार असणे, या सर्व घटनांमुळे नागरिकांमध्ये पसरलेल्या तीव्र असंतोष लक्षात घेऊन शासनाने याची गंभीर दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मोबदला देण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. लहू कानडे, वि.स.स. यांनी, "श्रीरामपूर येथे गुन्हेगाराचा पोलीस पाठलाग करत असताना त्याने अंगावर पेट्रोल टाकून स्वतःला जाळून घेणे, त्यामध्येच त्याचा मृत्यू होणे, मात्र हा मृत्यू पोलिसांच्या जाचामुळे झाल्याचा पोलिसांवर आरोप होणे, या प्रकरणाची चौकशी करून संबधित अधिकाऱ्यांची तातडीने बदली करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने निवेदन करावे, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपमुख्यमंत्र्यानी, सदरहू प्रकरणी नोंद घेऊन कारवाई करण्यात येईल, असे सांगितले.

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक ४ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ६,७,८ व ९ पुढे ढकलण्यात आल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**६.** (अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे —

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, माननीय मुख्यमंत्र्याकरिता, सन २०२३ चे वि.स.विधेयक क्र. ८, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंड २ ते १३ (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**७.** अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१ ) श्री. बाळासाहेब थोरात

श्री. सुनील शेळके, वि.स.स. यांनी, “मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर मावळ तालुक्यात सोमाठणे येथे सुरू असलेला अवैध टोलनाका बंद करणे,” इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. — (चर्चा पुढे सुरू)

(२) डॉ. संजय रायमूलकर (३) श्री. जयंत पाटील

(४) श्रीमती माधुरी मिसाळ (भाषण अपूर्ण)

“सन्माननीय सदस्य श्री. नितीन देशमुख यांनी विधान मंडळ परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरील पायऱ्यांवर धरणे आंदोलन सुरू करणे, त्याबाबत भेट घेऊन त्यांच्या म्हणण्यानुसार संबंधित कामाला स्थगिती देणे, मात्र तरीही त्यांचे पुतळ्याच्या पायऱ्यांवर आंदोलन सुरू ठेवून प्रथा, परंपरा मोडल्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करेणे,” असे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी सांगितले.

श्री. अशोक चव्हाण, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्यावर आपले मत मांडले.

विधान भवनाच्या आवारात आंदोलन करायचे असेल तर त्याबाबत कोणतेही लिखित नियम नाहीत. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आंदोलन करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे सदर सदस्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करावे. आंदोलनाबाबत कोणतेही लिखित नियम नसले तरी प्रथा, परंपरेनुसार सभागृहाचे कामकाज चालते आणि विधान भवनातील शिस्त पाळण्याची जबाबदारी सर्व सदस्यांवर आहे. त्यामुळे शिस्तीचे पालन करून घेण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी योग्य ती कारवाई करावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. — (चर्चा पुढे सुरू)

(४) श्रीमती माधुरी मिसाळ (भाषण पूर्ण) (५) श्री. नाना पटोले

(६) श्री. ज्ञानराज चौगुले (७) डॉ. विनय कोरे

(८) श्री, सुनील प्रभू (९) श्री. प्रकाश सोळंके

(१०) श्रीमती श्वेता महाले (११) श्री. अमित झनक

(चर्चा अपूर्ण)

मुख्यमंत्र्यांनी, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व त्यांच्याशी संलग्नित असणाऱ्या वेगवेगळ्या कर्मचारी संघटनांनी जुनी निवृत्तीवेत योजना लागू करण्याबाबत केलेली मागणी, इ.बाबत निवेदन केले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. — (चर्चा पुढे सुरू)

(१२) श्रीमती गीता जैन

(१३) श्री. प्राजक्त तनपुरे

श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी, "शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपामध्ये शासकीय मुद्रणालयाचे कर्मचारीही सहभागी झाल्यामुळे अधिवेशनासंबंधीची कामे वेळेवर न होणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

कामकाजाबबतची आवश्यक माहिती सदस्यांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येईल, असे उपाध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. — (चर्चा पुढे सुरू)

(१४) श्री. गणपत गायकवाड

(१५) ॲड. आशिष जैस्वाल

(१६) श्री. विक्रमसिंह सावंत

(१७) श्री. रमेश बोरणारे

(१८) श्री. दिलीप बनकर

(१९) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर

(२०) श्री. रवि राणा

(२१) श्री. सहसराम कोरोटे

(२२) श्री. नामदेव ससाणे

(२३) श्री. अनिल पाटील

(२४) श्री. जयकुमार रावल

(२५) श्री. जितेश अंतापूरकर

(२६) श्री. रोहित पवार

(२७) श्री. सचिन कल्याणशेट्टी

(२८) श्री. मोहनराव हंबर्डे

(२९) श्री. समाधान अवताडे

(३०) डॉ. किरण लहामटे

(३१) श्री. राजू पारवे

(३२) श्री. अतुल बेनके

(३३) श्री. चेतन तुपे

(३४) श्री. सुनील भुसारा

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३**

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक १ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना शेवटी चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**(१) श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्याचे लक्ष वेधले–**

"छत्रपती मालोजीराजे यांचे पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात इंदापूर शहरात वास्तव्य असणारे शिवभारत या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाचा समकालीन इतिहास असणारे संदर्भ ग्रंथ यामधील उल्लेखात हा भुईकोट किल्ला (जुनी तहसील कचेरी) हे वास्तव्याचे ठिकाण असणे, प्रशासकीय दृष्टीने सदरील जागा ही महसूल विभागाकडे दप्तरी नोंद असणे, महसूल विभागाच्या नोंदीमध्ये मालोजीराजांच्या इतिहासाच्या बाबींचा उल्लेख असणे, या किल्ल्यासमोर ग्रामदैवत इंद्रेश्वराचे मंदिर आजही असणे, मालोजीराजे सकाळी आपला दिनक्रम अमरेश्वराच्या दर्शनाने करत असत असाही संदर्भ शिवभारत या शिवरायांच्या राज्यकारभारातील समकालीन लिहला गेलेल्या एकमेव अस्सल साधनात असणे, म्हणून इतिहासाची साक्ष असणाऱ्या इंदापूर शहरातील इतिहासाला उजाळा देण्यासाठी या आजची जुनी कचेरी म्हणजेच मालोजी राजे यांच्या गढीचे शासनाने संवर्धन करून जुने बुरुज गाव वेस भुयारे यांचे पुनर्जीवन करून या कचेरीच्या जागेतच छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचे स्मारक करून मालोजी राजेंच्या पादुका यांच्या साठीही दगडी मूळ स्वरूपाचा चबुतरा उभारून मालोजीराजे भोसले यांचे जीवनचरित्र महाराष्ट्रासमोर आणण्यासाठी पर्यटन विभागाकडून करण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

संसदीय कार्य मंत्र्यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक ३, ५, ६ व ८ पुढे ढकलण्याबाबत विनंती केली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविलेल्या लक्षवेधी सूचना ज्या विभागाच्या आहेत त्या विभागाचे मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे विशेष बैठकीमध्ये केवळ एक लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊन विशेष बैठक तहकूब करीत आहे तसेच सभागृहाचे नियमित कामकाज सकाळी ११.०० वाजता सुरू होईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ९ वाजून ४३ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "आज विशेष बैठकीमध्ये कामकाजपत्रिकेवरील ८ लक्षवेधी सूचनांपैकी ७ लक्षवेधी सूचना मंत्री सभागृहात नसल्यामुळे पुढे ढकलण्यात येणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.
माननीय अध्यक्षांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी, "इतर मागासवर्गीय विभागाने वसतीगृहामध्ये फक्त व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांसाठीच प्रवेश यासंदर्भात काढलेला आदेश" इ. बाबत नियम ५७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे सांगितले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे विभागाला तशा सूचना देण्यात येतील असे उप मुख्यमंत्री यांनी सांगितले.

(अ) मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला व "बुलढाणा जिल्ह्यातील विद्यार्थी स्वाधार योजनेपासून वंचित असल्याबाबत" या विषयावरील श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५८१८३ हा उत्तरित झाला.

(ब) तारांकित प्रश्न -

(१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीन प्रश्न उत्तरित झाले.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सतरा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(क) प्रधान सचिवांनी, बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

२. **(१) उपमुख्यमंत्र्यांनी,**

(क) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे, व

(ख) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या वर्षांचे अनुक्रमे अठरावा, एकोणिसावा व विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) बंदरे आणि खनिकर्म मंत्र्यांनी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, वर्धा, अकोला, सातारा, चंद्रपूर, अमरावती, ठाणे, यवतमाळ, मुंबई उपनगर, रत्नागिरी, कोल्हापूर, तसेच प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना जिल्हा खनिज प्रतिष्ठान, सांगली या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) सहकार मंत्र्यांनी,

(क) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० या वर्षाचे वार्षिक लेखे, आणि

(ख) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०१९-२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, महाराष्ट्र एचआयव्ही व एड्स (लोकपाल व कायदेशीर कार्यवाही) नियम, २०२२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एनिका-२०१८/प्र.क्र.१३३/कु.क., दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ सभागृहासमोर ठेवले.

(१) श्री. अजित पवार, वि.स.स. यांनी, "जुन्या पेन्शन योजनेसंदर्भातील कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाबाबत शासनाने लवकरात लवकर तोडगा काढण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने यासंदर्भात निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ९ सूचना प्राप्त झालेल्या असून आज सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस) असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत असे सांगून आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "पोलिसांवर कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर हल्ले होण्याच्या वाढलेल्या घटना" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने सदर माहितीची नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "नोकरीविषयक जाहीरातीमध्ये मराठी भाषिकांना डावलण्यात येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी दिलेल्या माहितीची शासनाने सखोल चौकशी करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३) श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी, "केंद्र सरकारच्या 'जिओ पारसी' योजनेंतर्गत पारसी समाजाला दिली जाणारी मदत गत पाच महिन्यांपासून न देण्यात येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी काढलेला मोर्चा तसेच भारत कोल कंपाउंड, काळे मार्ग, कमानी, कुर्ला (पश्चिम) मनपा एल विभागाच्या हद्दीतील उद्योजकांना व हजारो कामगारांना त्वरित संरक्षण देण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीची शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(५) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "शासकीय व निमशासकीय कंत्राटी नोकरभरती ९ खाजगी कंपन्यांकडून करण्यासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

(६) श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी, "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथे एका इको-सिस्टिमच्या माध्यमातून कुलगुरुंनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स. यांनी, "बुलढाणा शहर आणि या शहरालगत ग्रामीण भागामध्ये बरेचसे कॅफे असून तेथे अन्य प्रकारचे गैरप्रकार घडत असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. सदा सरवणकर, वि.स.स. यांनी, "श्रीमती शीतल म्हात्रे यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

(९) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, "कान्होजी आंग्रे आणि चिमाजी अप्पा यांचे ऐतिहासिक महत्त्व असलेल्या नागला बंदर किल्ल्याची झालेली दुरवस्था" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय अध्यक्षांनी, सदर माहितीची योग्य ती नोंद घ्यावी व उचित उपाययोजना करावी असे निदेश दिले.

(१०) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी, "खडकवासला येथील दायरी या गावी सायंकाळी भीषण आग लागणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी, " दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी आर्वी येथील मौजे धाडी, तालुका आष्टी येथे एक शेतकरी वामन मडावी यांचा वाघाच्या हल्ल्यामध्ये झालेला मृत्यू" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्रीमती. मनीषा चौधरी, वि.स.स. यांनी, "पालघर जिल्ह्याकरिता पेसा कायदा लागू असून रिक्त असलेली जवळ-जवळ दहा हजार पदे शासनाने भरण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. यांनी, "राज्यामध्ये काही भागात अवकाळी पाऊस व गारपीट " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, "चंद्रपूर महानगरपालिकेमध्ये नवीन कंत्राटदाराने २०६ कामगारऐवजी १०० कामगारांना घेऊन नालेसफाईचे काम सुरू करणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. अजित पवार, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा, कामगार विभागाने दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी ९ पुरवठादारांना मनुष्यबळाच्या वर्गवारीनुसार बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्याची मान्यता देण्यात येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यास उपमुख्यमंत्री यांनी उत्तर दिले.

३. **सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा -** (मंत्र्यांचे उत्तर) -

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी म.वि.स. नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला -

"अर्थसंकल्पातील अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम २५१ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**५.** गृह विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ११ ते २२, जलसंपदा विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ७० ते ७४, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ८० ते ९० आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अनुक्रमांक २३९ ते २४४ चर्चेला घेण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले व सदर चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आले आहेत. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून आता चर्चेला सुरूवात होईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

| | |
|---|---|
| (१) श्री. जितेंद्र आव्हाड | (२) श्री. गणेश नाईक |
| (३) श्री. सुनील केदार | (४) श्री. प्रकाश आबिटकर |
| (५) श्री. संग्राम जगताप | (६) श्रीमती देवयानी फरांदे |
| (७) ॲड. यशोमती ठाकूर | (८) श्री. रविंद्र वायकर |
| (९) ॲड.अशोक पवार (भाषण पूर्ण) | |

(चर्चा अपूर्ण)

आरोग्य मंत्र्यांनी, "इन्फलुएंझा-ए या आजाराचा प्रसार" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान - चर्चा पुढे सुरू

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| (१०) ॲड. राहुल कुल | (११) श्रीमती सुलभा खोडके |

(चर्चा अपूर्ण)

श्री. अबु आजमी, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित)

उपरोक्त मुद्यास उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान - चर्चा पुढे सुरू**

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१२) श्री. अबु आजमी (प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषण प्रलंबित)

(१३) श्री. ज्ञानराज चौगुले (१४) श्री. छगन भुजबळ

(चर्चा अपूर्ण)

श्री. रमेश कोरगावकर, वि.स.स. यांनी, "भांडूप येथील सुभाष नगर (पश्चिम) येथे एमएमआरडीएच्या शिवकृपा सोसायटीमध्ये बी-३/डी विंग मधील लिफ्ट केबल वायर तुटून तळमजल्यावर कोसळणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान - चर्चा पुढे सुरू**

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१५) श्री. दादाराव केचे (१६) श्री. धीरज देशमुख

(१७) श्री. सुनील प्रभू (१८) ॲड.आशिष जयस्वाल

(१९) श्री. अनिल पाटील (२०) श्री. हरिभाऊ बागडे

(२१) श्री. पी.एन.पाटील (२२) श्री. अनिल देशमुख

(२३) श्री. संजय गायकवाड (२४) श्री. सिद्धार्थ शिरोळे

(२५) श्री. रत्नाकर गुट्टे (२६) श्री. शेखर निकम

अनुदानावरील मागण्यांचे उत्तर देऊन त्या मान्य करून घेतल्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांना आपले मागण्यांवर बोलावयाचे असेल ते बोलू शकतील त्यांच्या चर्चेला उद्या उत्तर देण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेस उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील (१) गृह विभाग, (२) जलसंपदा विभाग, (३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात येत आहेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, "सभागृहाच्या विशेष बैठकीस अनुपस्थित असल्याबाबत" वैयक्तिक स्पष्टीकरण केले.

श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान - चर्चा पुढे सुरू

चर्चा पुढे सुरू झाली.

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२७) श्री. राजेश एकडे
(२८) श्रीमती यामिनी जाधव
(२९) श्री. देवेंद्र भुयार
(३०) कु. आदिती तटकरे
(३१) श्रीमती सीमा हिरे
(३२) श्री. हिरामण खोसकर
(३३) श्री. कैलास पाटील
(३४) श्रीमती मंजुळा गावित
(३५) श्री. रोहित पवार
(३६) डॉ. देवराव होळी
(३७) श्री. संजय जगताप
(३८) श्री. विश्वनाथ भोईर
(३९) श्री. आशुतोष काळे
(४०) श्रीमती श्वेता महाले
(४१) डॉ. विश्वजीत कदम
(४२) श्री. रमेश कोरगावकर
(४३) श्री. संदिप क्षीरसागर
(४४) श्री. राम सातपुते
(४५) श्री. मोहनराव हंबर्डे
(४६) श्री. बालाजी कल्याणकर
(४७) श्री. सुनील शेळके
(४८) श्री. समाधान आवताडे
(४९) श्री. सहसराम कोरोटे
(५०) श्री. उदयसिंग राजपूत
(५१) श्री. बाळासाहेब आजबे
(५२) श्री. विक्रमसिंह सावंत
(५३) श्री. किशोर जोरगेवार
(५४) श्री. निलेश लंके
(५५) श्री. बाबासाहेब पाटील
(५६) श्री. राजेश पवार
(५७) श्री. राजेश टोपे
(५८) श्री. जयंत पाटील

(५९) श्री. प्रताप अडसड (६०) श्री. सुरेश भोळे

(६१) श्री. सुनील भुसारा

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी ९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत भरेल व विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येईल तसेच सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३**

(१) सर्वश्री सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनिल केदार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील मे.नानक कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेनी नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत संगनमत करून करोडो रूपयांच्या बांधकामाची कामे मिळविणे, या बांधकामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करणे, संस्थेने या बांधकामासाठी जिल्हा परिषदेत ठेवलेली अनामत रक्कम कोणत्याही अधिकाऱ्यांची परवानगी न घेता मुदतीच्या अगोदरच खोट्या स्वाक्षरी करून संस्थेने उचल करणे, या करोडोच्या व्यवहारात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अंधारात ठेवण्यात येणे, झालेल्या करोडो रूपयांच्या गैरप्रकाराची तक्रार जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागपूर येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणे, नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मे. नानक कंस्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेला काळ्या यादीत टाकण्यात यावे याबाबतचा प्रस्ताव दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी कक्ष अधिकारी (बांध-२), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठवणे, दोन महिन्यांचा कालावधी होऊन सुद्धा अद्यापही सदर प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी पाठविलेल्या प्रस्तावावर कार्यवाही होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री बळवंत वानखडे, मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी पदोन्नतीमधील आरक्षण लागू करण्यास शासन निर्णय दिनांक २५ मे, २००४ रद्द केलेला असणे, एम. नागराज विरूद्ध भारत सरकार (२००६) या निर्णयानुसार मागासलेपणा, अपर्याप्त प्रतिनिधित्व व प्रशासनाची कार्यक्षमता यावर आधारित आकडेवारीचा नवीनतम अहवाल महाराष्ट्र शासनाने सादर न केल्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्यात आलेला असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुद्ध शासनाने महाराष्ट्र शासन विरुद्ध विजय घोगरे (SLP No.२८३०६/२०१७) ही विशेष अनुमती याचिका माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयास सादर केलेली असणे, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी मागासलेपणा सिद्ध करण्याची अट रद्द करून इतर दोन अटींप्रमाणे अभ्यास अहवाल तयार करून त्यानुसार पदोन्नती मधील आरक्षण वैध ठरविले असणे, केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी पदोन्नतीमधील आरक्षण लागू करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या असणे, त्यावर शासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांचा पदोन्नती मधील ३३% वाटा खुल्या प्रवर्गात बेकायदेशीररीत्या वर्ग केलेला असणे, परंतु अशाप्रकारचे कोणतेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले नसणे अथवा मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने दिलेल्या नसणे, दिनांक २८ जानेवारी, २०२२ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपुऱ्या प्रतिनिधित्वाचा संख्यात्मक डाटा गोळा करून पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्याचे अधिकार राज्य शासनास असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले असणे, अपुऱ्या प्रतिनिधित्वाचा अहवाल शासनाने तयार केला असणे व तो सर्वोच्च न्यायालयात सादर केला असणे, परंतु केवळ महाराष्ट्र शासनाची याचिका क्र.२८३०६/२०१७ निकाली निघाली नाही या कारणाखाली अजूनपर्यंत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यात आले नसणे व सेवाज्येष्ठतेनुसार वरिष्ठ असलेल्या मागासवर्गीयांना दिनांक २५ मे, २००४ च्या सेवाज्येष्ठतेची अट घालून त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती मिळणे सुद्धा बंद झाले असणे, त्यामुळे सन २०१७ ते २०२२ या कालावधीत राज्यातील जवळपास ८०,००० अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जाती व विशेष मागास प्रवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित ठरले असणे, त्यातील बरेच कर्मचारी पदोन्नतीविनाच निवृत्त झाले असणे, यामुळे राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रति तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री मिहिर कोटेचा, पराग शाह, अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. छगन भुजबळ, रोहित पवार, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, अबू आजमी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

"मुंबईतील वाढते प्रदूषण ही एक चिंतेची बाब असली तरी आता दिल्लीलाही मागे टाकत मुंबईने जगभरातील प्रदूषित शहरांच्या यादीत दुसरे स्थान मिळवले आहे, 'स्विस एअर ट्रॅकिंग इंडेक्स' नुसार, दिनांक २९ जानेवारी ते

८ फेब्रुवारी दरम्यान जगातील सर्वात प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे, दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई १० व्या स्थानावर होती, दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई दुसऱ्या स्थानावर पोहोचली, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रदूषणाबाबत मुंबईने भारतातील सर्वात प्रदूषित शहर असलेल्या दिल्लीलाही मागे टाकल्याचे स्विस एअर ट्रॅकिंग इंडेक्सनुसार दिसून आले आहे, निरी आणि आयआयटीवीच्या २०२० च्या अभ्यासानुसार, मुंबईच्या हवेतील कणांच्या भारांपैकी ७१ टक्क्यांपेक्षा जास्त रस्ते किंवा बांधकामांचा वाटा आहे, उर्वरित प्रदूषण औद्योगिक आणि ऊर्जा युनिट्स, विमानतळ आणि कचरा डंपमधून होते, हे वाढते प्रदूषण श्वसनाचे आजार असलेल्यांसाठी त्रासदायक ठरू शकते, त्यामुळे अशा व्यक्तींनी व रुग्णांनी काळजी घेण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत आयक्यू एअर, युएनईपी आणि ग्रीन पीस यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील माहितीनुसार मुंबईतील हवेची गुणवत्ता मोजली, तसेच, त्याचे यूएस हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार 'निरोगी' 'अस्वास्थ्यकर' आणि 'धोकादायक' असे वर्गीकरण केले, यानुसार, गेल्या तीन वर्षांच्या हिवाळ्याच्या तुलनेत यावर्षी नोव्हेंबर ते जानेवारी दरम्यान मुंबईतील हवा 'खराब' आणि 'खूप खराब' होती, तज्ज्ञांच्या मते, कार, रस्ते आणि बांधकाम प्रकल्पांमधून सतत होणारी धूळ आणि धूर हे हवेची गुणवत्ता ढासळण्याचे मुख्य कारण आहे, मुंबईतील प्राधिकरणांनी वाहने आणि बांधकाम साइट्समधून उत्सर्जन कमी करण्यासाठी त्वरित पावले उचलली पाहिजेत, राज्य शासनाने वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कठोर नियम लागू करणे आवश्यक असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"महाराष्ट्र जमीन महसूल नियम २०१९ मध्ये भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींना भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्याकरता दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी अधिसूचना काढण्यात येणे, सदर भोगवटादार वर्ग रूपांतरित करण्याकरिता अधिसूचनेमध्ये २ वर्षांचा कालावधी देणे, सदर अधिसूचनेत रूपांतरित करण्याकरिता वर्गवारीनुसार बाजारमूल्याच्या १० ते १५ टक्के रक्कम आकारणे, या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये गृहनिर्माण संस्थांकडून हस्तांतरण करता अर्ज सादर न होणे, दिनांक ८ मार्च, २०२२ ला सदर अधिसूचनेचा कालावधी संपणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ च्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिनांक ७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणे, दोन वर्षांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव असून देखील एकच वर्ष मुदतवाढ मिळणे, हस्तांतरणाच्या प्रक्रियेकरिता सदस्य हस्तांतर होणे गरजेचे असणे, सदस्य हस्तांतरणाच्या कालावधी जास्त वेळ लागणे, पुढील एक वर्षांमध्ये जमीन हस्तांतरण करणे कठीण असणे, तीन ते चार वर्षांची मुदतवाढ मिळावी अशी नागरिकांकडून मागणी असणे व जीर्ण झालेल्या इमारतीच्या गृहनिर्माण संस्थांना दहा ते पंधरा टक्के ऐवजी अडीच टक्के बाजार मूल्याचे शुल्क आकारणे अशी नागरिकांची मागणी असणे, धोरणात त्रुटीअसल्याकारणाने पुनर्विकास होत नसल्याने

जीर्ण असलेल्या इमारतींमध्ये ज्येष्ठ नागरिकांना राहावे लागणे, या सर्व प्रकारामुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"माहे फेब्रुवारी, २०२३ च्या सुमारास माझ्या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील भोसे व इतर ३९ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सन २०२१ पासून बंद असल्याचे निदर्शनास येणे, सदर योजनेस दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत माहे जून, २०१८ मध्ये ही योजना कार्यान्वित झालेली असणे, या योजनेची कामे अपूर्ण असताना देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राजकीय दबावापोटी तत्कालीन निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन सदर योजना सोलापूर जिल्हा परिषदेकडे दिनांक २६/०५/२०२० रोजी हस्तांतर करणे, जिल्हा परिषदेने देखील कोणतीही शहानिशा न करता योजना ताब्यात घेणे,जिल्हा परिषदेने दिनांक ०८/०३/२०२१ रोजी शिखर समितीची स्थापन करणे, सदर शिखर समितीने दिनांक ०५/०४/२०२१ ते १७/०६/२०२१ पर्यंत म्हणजे २ महिने १२ दिवस ही योजना चालविणे, त्यानंतर वीज देयक न भरल्याने दिनांक १८/०६/२०२१ रोजी वीजजोडणी तोडण्यात आलेली असणे, सदरची योजना बंद असली तरी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीकडून वीज बिल मात्र आकारले जात असणे, फेब्रुवारी, २०२३ अखेर रु.१,१७,००,०००/- (अक्षरी एक कोटी सतरा लाख) विद्युत देयक थकीत असणे, सदर योजनेचे थकीत वीज बिल भरल्याशिवाय ही योजना चालू करणे अशक्य असणे, सद्यःस्थितीत सदर योजनेत समावेश असलेल्या ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती साधारण असल्यामुळे इतकी मोठी रक्कम त्यांचे तर्फे भरणे जवळपास अशक्यच असणे, सदरची योजना बंद अवस्थेत असल्याने सदर योजनेतील अनेक गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे ही योजना चालू करणे अत्यंत गरजेचे असणे, म्हणून भोसे व ३९ गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना ता. मंगळवेढा या योजनेचे रु.१,१७,००,०००/- थकीत वीजबिले माफ होण्याबाबत येथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधी या नात्याने केलेली विनंती, यावर शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. सुनिल शेळके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले–

"पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील जागांवर विकासक बांधकामांचे सर्व नियम धाब्यावर बसवून मोठमोठे प्रकल्प उभे करत असल्याचे निदर्शनास येणे, ग्रामपंचायतीच्या पत्रावर किंवा दाखल्याच्या आधारे कुठलीही

शहानिशा न करताच पीएमआरडीए संबंधित विकासकास भोगवटा प्रमाणपत्र देत असून सदर विकासक हा त्या ठिकाणी कोणतीही भौतिक सोईसुविधा पुरवीत नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्याचप्रमाणे या प्रकल्पांमुळे मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीमध्ये प्रदूषण होत असून मानवी आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असणे, पवित्र इंद्रायणी नदीमध्ये प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झालेली असून सदर विषयांकडे शासनाकडून होणारे अक्षम्य दुर्लक्ष व त्यामुळे शासनाविषयी जनतेमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.**

**सभागृहाची नियमित बैठक माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता सुरु झाली.**

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तेवीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

मा. अध्यक्षांनी, शुक्रवार दि. १७ मार्च २०२३ रोजी घेण्यात यावयाच्या अशासकीय ठराव, विधेयके इत्यादींना वेळ नेमून दिलेले वेळापत्रक वाचून दाखविले.

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ' माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या धर्मपत्नी श्रीमती अमृता फडणवीस यांच्याशी संबंधित बातमी 'The Indian Express ' या वृत्तपत्रामध्ये पहिल्याच पानावर छापून येणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत सविस्तरपणे खुलासा केला व या प्रकरणाची योग्य ती चौकशी करण्यात येईल, असे सांगितले.

**२.** (१) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) उपमुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सतरावावार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी घेण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजाबाबतची घोषणा केली.

( १ ) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ‘मौजे टाकळीमानूर तालुका-पाथर्डी, जिल्हा-अहमदनगर येथे जय भवानी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १० वीच्या परीक्षा केंद्रावर कॉपी पुरविणाऱ्या जमावाकडून भरारी पथकावर लाठीहल्ला व दगडफेक करण्यात येणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

( २ ) श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी, ‘ शासनाच्या वतीने सभागृहात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता ५ ते १० वर्षे केली जात नसणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

विधानसभा आश्वासन समिती अस्तित्वात नसल्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी सदरहू समिती घटित करून त्या समितीमार्फत हा पूर्ण रेकॉर्ड सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

( ३ ) श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, ‘ ब्रिटिश सरकारकडून फाशीची शिक्षा पत्करुन प्राणांचे बलिदान देणारे हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या पुणे जिल्ह्यातील खेड राजगुरु नगर तालुक्यात त्यांच्या ज्नमस्थळी असणाऱ्या स्मारक परिसर विकासाचा आराखडा मंजूर करण्याकरिता गठित करावायची समिती’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री यांना यासंदर्भात सूचना केल्या जातील, असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(४) श्री. रोहित पवार, वि.प.स. यांनी, ‘ सिना धरणातून जाणारा ७२ कि.मी.चा कालवा दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी गुरव-पिंपरी रोडजवळ फुटल्यामुळे २२ गावातील शेतकऱ्यांचे नुकसान होणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू मुद्याबाबत तात्काळ माहिती घेण्यात येईल व योग्य सूचना दिल्या जातील, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सर्वश्री. नाना पटोले, अस्लम शेख वि.स.स. यांनी, ‘’बेलापूर ( नवी मुंबई ) येथील विकासक श्री. शाऊजी मंजिरी पटेल या विकासकाची गोळ्या झाडून केलेली हत्या’’ इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या सदरहू मुद्यावर निवेदन करण्यात येईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

( १ ) श्री. सुनिल केदार, वि.स.स. यांनी, ‘ नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात भटक्या कुत्र्यांनी ३ गरीब मुलांच्या गालांचा चावा घेऊन त्यांना गंभीर जखमी करणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना तत्काळ सूचना देण्यात येतील. तसेच सदर प्रकरणीशासकीय खर्चाने उपचार करण्यात येऊन त्यावर कारवाई देखील सूचित करण्यात येईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

( २ ) श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांनी, ‘ राष्ट्रीयीकृत बँका किंवा अन्य बँकांमध्ये पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांची खाती ‘ होल्ड ’ करण्यात आल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजनेच्या लाभाची रक्कम, शासनाने दिलेले अनुदान, विमा रक्कम यांचा लाभ न मिळणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने वारंवार शासन निर्णय निर्गमित केलेले असून एसएलबीसीच्या चेअरमनला यासंदर्भात आजच कळविण्यात येईल व सर्व बँकांनाही कळविण्यात येईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी, 'मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंत्याने आत्महत्या केल्याप्रकरणी श्री. बळवंत वानखेडे यांच्याविरूद्ध पोलीस ठाण्यात तक्रार केलेली असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी, 'नाशिक जिल्ह्यातील मतदारसंघामध्ये संध्याकाळी सात वाजता एका वाघाने चार वर्षांच्या मुलीवर केलेल्या हल्ल्यात मुलीचा मृत्यू होणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू विषय गंभीर असून त्याची तात्काळ माहिती घेऊन कारवाई केली जाईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(५) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी, 'जळगाव जिल्ह्यातील चाळीस वर्षांपूर्वीचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हटविल्यामुळे तेथ बौद्ध समाजाचे पाच-दहा हजार लोक जमणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत नोंद घेतली असल्याचे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(६) श्री. नारायण कुचे , वि.स.स. यांनी, ' जालना जिल्ह्यात पीक विम्यासंदर्भात विमा कंपन्यांकडे तक्रार न केलेले शेतकरी विम्यापासून वंचित राहिल्यामुळे त्यांच्यात प्रचंड असंतोषाची भावना निर्माण होणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी, ' बार्टी संस्थेकडून फेलोशिप मिळविण्याकरिता सुमारे ८६१ विद्यार्थी आझाद मैदान, मुंबई येथे दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ पासून आंदोलन करीत असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. यांनी, ' वसमत जिल्ह्यात व तालुक्यात सर्व ठिकाणी नाफेडची हमी भाव केंद्रे सुरु करण्याची आवश्यकता' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी, 'यूजीसीकडून देशपातळीवर घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता दिनांक १ एप्रिल २०२२ नंतर जातीचा दाखला देण्याचे बंधनकारक करण्यात येणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

४. (१) सर्वश्री सुनिल टिंगरे, संजय जगताप, भिमराव तापकीर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"पुणे महापालिकेत सन २०१७ मध्ये हद्दीलगतच्या ११ गावांचा समावेश करण्यात आला असणे, त्यानंतर पुन्हा सन २०२१ मध्ये आणखी २३ गावांचा समावेश करण्यात आला असणे, गेल्या पाच वर्षांत जवळपास ३४

गावे पुणे महापालिकेत आली असून, ही गावे पालिकेत समाविष्ट करण्याबाबत राज्य सरकारनेच उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले असणे, त्यानुसार ही गावे घेण्यात आली आहे. या समाविष्ट गावांमध्ये पाणी, रस्ते, ड्रेनेज, विद्युत व्यवस्था, उद्याने अशा पायाभूत सोयी-सुविधांची प्रचंड गैरसोय होत असणे, महापालिकेच्या माध्यमातून हे प्रश्न सुटतील अशी येथील नागरिकांची भावना असणे, मात्र, महापालिकेत येऊनही या गावांचा विकास होऊ शकलेला नसणे, पहिल्या टप्प्यात आलेल्या ११ गावांसाठी एक प्रभाग करण्यात आला असणे, त्यात केवळ दोन नगरसेवकांना प्रतिनिधित्व मिळाले मात्र तब्बल ३२ किमीचा भौगोलिक परिसर असलेल्या या गावांच्या प्रभागाला हे नगरसेवक न्याय देऊ शकलेले नसणे, तर उर्वरित २३ गावांना पालिकेचे लोकप्रतिनिधित्व मिळू शकलेले नाही. त्यात गेल्या वर्षभर पालिकेवर प्रशासकाचे राज्य असणे, त्यामुळे अगदी छोट्या-छोट्या समस्याही सुटू शकत नसणे, गावांना सोयी-सुविधा देताना महापालिकेकडून निधी नसल्याची ओरड केली जात असणे, तर राज्य शासनाकडून अद्याप मदत मिळालेली नाही. त्यामुळे या समाविष्ट गावांमध्ये प्रचंड नाराजीची लोकभावना असणे, या गावांना विकासाचा न्याय देण्यासाठी राज्य शासनाने ठोस कार्यवाही करण्याची गरज असणे, तसेच महापालिकेने या गावांसाठी अंदाजपत्रकात स्वतंत्र अशी योजना आणण्याची गरज असणे, या समाविष्ट गावातील नागरीकांमध्ये शासनबाबत नाराजी दिसून येणे, यासंदर्भात शासनास तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"नाशिक मधील त्र्यंबकेश्वर येथील गोदावरी नदीला जाऊन मिळणाऱ्या जलस्त्रोतामध्ये पालिकेचे सांडपाणी सोडले जात असल्यामुळे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, येथे दरवर्षी ४५ ते ५० लाख लीटर सांडपाणी तयार होणे, मात्र १० लाख लीटर सांडपाणी प्रक्रिया करून नदीमध्ये सोडले जाणे व उर्वरित सांडपाण्यामुळे नदीचे पाणी मोठया प्रमाणात प्रदूषित होत असून ते पाण्याच्या गुणवत्तेच्या प्राथमिक निकषानुसार आंघोळीसाठीही योग्य नसल्याची बाब उघडकीस येणे, मात्र येथील नागरिकांना हे दूषित पाणी प्यावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होत असल्याचे आढळून येणे, यामुळे नदीत सांडपाणी सोडण्यास विरोध करण्यात येत असणे, सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी रोखण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष व विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने नदीतील प्रदूषण रोखण्याबाबत तसेच प्रक्रिया न करता सांडपाणी सोडणाऱ्या संबंधितांवर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"नगर शहरातील रामवाडी परिसरातील गेल्या अनेक वर्षांपासून तेथील दलित समाजातील लोकांवर मुस्लिम लोक अत्याचार करत असणे, तसेच तेथील दलित लोकांना रामवाडी वस्तीतून पलायन करण्यास भाग पाडणे, तसेच रामवाडी भागाचे नाव तेथील काही समाजकंटकांनी हिमायतनगर करणे, सदरील सर्व जागा आर्मी कॅन्टोन्मेंटची असणे, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री नगर शहरातील अशोक लोंढे नामक व्यक्तीने औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजी महाराज झाले यासंदर्भात असणाऱ्या पोस्टचे स्टेटस व्हॉट्सॲपला ठेवण्यावरून मुस्लिम जमावाने त्यांच्यावर पूर्वनियोजित एकत्रित होऊन हल्ला करणे, आणि त्याच्या डोक्यात, पोटात व कानामागे तलवारीने वार करणे, त्यानंतर सदर जमाव अशोकच्या बहिणीच्या घरी जाऊन त्यांचा विनयभंग करून घरातील तोडफोड व त्यांना मारहाण करणे, त्यानंतर तेथून सर्व जमाव रोहित जगताप नावाच्या व्यक्तीच्या घरात घुसून त्यांना व घरातील महिलांना मारहाण करून त्यांचा विनयभंग करून घरातील मंदिराची आणि देवी-देवतांची विटंबना करणे, त्यानंतर एक कार्यकर्ता हिंदुत्ववादी काम करणारा कुणाल भंडारी नामक व्यक्ती रस्त्याने जाताना घडलेली घटना बघत असताना थांबला तर हा पण हिंदुत्ववादी कामांमध्ये सक्रिय असतो असे म्हणून तेथील त्या जमावाने कुणालला देखील मारहाण करणे, तसेच त्यातील एका मौलानाने फोन कुणाल भंडारीच्या कानाला धरून अफजल पैलवानसोबत बोलायला सांगणे, परंतु कुणालने अफजल सोबत बोलायला नकार दिल्यानंतर तेथील जमावाने धारदार शस्त्राने कुणालच्या पोटात कोयत्याने वार करून लोखंडी रॉडने मारहाण करणे, त्यानंतर दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री पुन्हा मुकुंद नगर मधील इमरान माव्यावाला याने रामनगर मध्ये येऊन याच जमावाला सोबत घेऊन राजू भोईटे नामक व्यक्तीला जबर मारहाण करून डोक्यात आणि चेहऱ्यावर रॉडचे वार करणे, सदर घटनेतील एका समीर शेख नावाच्या मौलानाच्या - जो या घटनेतील आरोपी आहे - त्याच्या इंस्टाग्राम वरील पोस्ट सर्व हिंदू विरोधी असणे, तसेच अफजल शेख नावाच्या आरोपीने पोलिसांवरती दबाव तंत्राचा उपयोग करत मुस्लिम लोकांना,महिलांना एकत्रित करून पोलीस स्टेशनला पाठवून पोलिसांवर दबाव आणणे, तसेच अफजल शेख मोठ्या प्रमाणात लव्ह जिहाद, लँडजिहाद अशा कारवायांमध्ये सक्रीय असणे, मुस्लिम मुलांना लव्ह जिहाद, देशविरोधी कारवायांसाठी फंडिंग करणे, घटनेतील सर्व आरोपींचा टोळी माफिया प्रमुख अफजल शेख हा असून याचा भाऊ मुदस्सर हा तेथील रामनगर भागाचा नगरसेवक असून याच्याच वडिलांनी शिवजयंतीच्या दिवशी शेवगाव भागातील एका हिंदू कहार समाजाच्या मुलाला घरावर भगवे झेंडे लावले म्हणून मारहाण केलेली असणे,आणि पोलिसांनी कारवाई न करणे, तसेच इतकी गंभीर घटना घडलेली असतांना देखील काही आरोपींना अद्याप पोलिसांनी अटक केलेली नसणे, तसेच साल २०१७ ते २०१८ सुमारास नगर एसपी कार्यालय तोडफोड प्रकरणातील आरोपी अफजल शेख नावाच्या व्यक्तीने एफ.आय.आर मधून नाव वगळण्यासाठी स्थानिक पोलिसांना पैसे देण्याचा प्रयत्न करणे, तसेच संबंधित घटनेच्या विरोधात स्थानिक दलित हिंदू नागरिकांनी नगर शहरात मोर्चा काढणे, परंतु मोर्चात काही मुस्लिम महिलांनी हिंदू दलित महिलांना शिवीगाळ करणे, त्यानंतर हिंदू महिला पोलीस

स्टेशनला तक्रार द्यायला जाणे, मात्र पोलिसांनी ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल करणे अपेक्षित असतांना त्या ठिकाणी साधी एन.सी. देखील न घेणे, तसेच याबाबत कारवाई व्यवस्थित न झाल्यास महाराष्ट्रात तीव्र आंदोलन होणार असल्याचे पत्र शासनास हिंदुत्ववादी संघटनांनी देणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व उपाययोजना.''

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. अमित साटम, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

''मुंबई उपनगरातील अंधेरी (प) जुहू गल्ली येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हा डिएचएफएल कंपनीच्या अंतर्गत असून सदर प्रकल्पामध्ये सुमारे ३६ सोसायट्या व ५२०० पेक्षा अधिक झोपडपट्टीवासीयांचा परिशिष्ट २ तयार असणे, सदर विषयामध्ये किमान ५०० ते १००० घरे ही पुनर्विकासाकरिता तोडली असणे, गेल्या अनेक वर्षांपासून तोडलेल्या घरांच्या घरमालकांना भाडे सुद्धा आकारण्यात आलेली नसणे, तसेच मोठया प्रमाणावर आपल्या घराबाहेर असलेल्या कुटुंबांची हेळसांड होणे, सदर प्रकल्प हा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून डिएचएफएल कंपनीच्या ईडीच्या प्रकरणामध्ये सदर विषय अडकला असणे, डिएचएफल कंपनी ही एनसीएलटी मधून दुसऱ्या एका कंपनीने ताब्यात घेऊन सुद्धा अद्यापपर्यंत सदर झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पाला चालना न मिळाल्यामुळे सदर गलिच्छ वस्तीमधील नागरीक अत्यंत हलाखीचे जीवन जगत असल्यामुळे शासनाने सदर विषयामध्ये मध्यस्थी करून स्वतः शासनाने सदर प्रकल्प आपल्या अखत्यारीमध्ये घेऊन सदर प्रकरणामध्ये असलेल्या सर्व भागधारकांशी चर्चा करणे, वाटाघाटी करून सदर व्यवहार सुरळीतपणे करून ५२०० पेक्षा अधिक झोपडपट्टीवासीयांना स्वतःचे हक्काचे घर तयार करून शासनानेच सदर प्रकल्प पुढे नेण्याची गरज असल्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

उप मुख्यमंत्री मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, 'बोरिवलीतील न्यायालयात एका पोलिसाकडून एका वकिलास झालेली मारहाण' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर बाबतीत तत्काळ सूचना देण्यात येतील असे गृहमंत्र्यांनी सांगितले.

(५) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"सांगली जिल्ह्यातील वाळवा व शिराळा तालुक्यातील बिबट्याचा वावर वाढलेला असून वाळवा तालुक्यात दिनांक १ जानेवारी, २०१९ ते फेब्रुवारी, २०२३ अखेरपर्यंत ७७ बिबट्या व वन्यप्राण्यांसह ५०० पेक्षा अधिक पशुधन ठार केलेले असणे, या पूर्वीसुद्धा ऊसतोड कामगारांच्या लहान मुलांना जखमी करून सुफीयान शमशुद्दीन शेख या १ वर्षाच्या मुलावर हल्ला करणे, या हल्ल्यात बालक मृत्युमुखी पडणे, त्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व पसरलेले भीतीचे वातावरण, आता वन्य प्राण्यांनी विशेषतः मानवावर चढवलेले हल्ले पाहता या वन्य प्राण्यांचा त्वरित बंदोबस्त करण्याची तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, या बिबट्याचा व वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत जलद कृती दल स्थापन करून बिबट्या निवारण केंद्र उभारण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**५.** ॲड. आशिष शेलार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, सदा सरवणकर, अमित साटम, भरतशेठ गोगावले, अतुल भातखळकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री कालिदास कोळंबकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, गणेश नाईक, नितेश राणे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, प्रशांत ठाकूर, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, माधुरी मिसाळ, सर्वश्री महेश चौघुले, मिहिर कोटेचा, राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय केळकर, सुनील राणे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, चिमणराव पाटील, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, योगेश कदम, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव —

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

"जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकिकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभीकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या नावीन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होऊन कामही सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षांत २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी. रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची ६ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कमेची

निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्क ऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भूमिपूजन मा.पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी. मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्यामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत शासनाचे धोरण, मुंबई शहरात दीड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन वाहतूक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षांत मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोव्हिडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांच्या पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळ उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदूषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकीय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठया प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामीटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत

असल्याची बाब येणे, कॅगच्या लेखा परीक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महापालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस रोडावल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढया प्रमाणात व्हेंटिलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महापालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटिलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**प्रस्ताव प्रस्तुत झाला.**

सदरहू चर्चा माननीय अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे आजचे कामकाज संपण्यापूर्वी त्यासंबंधी घोषणा केली जाईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**६.** माननीय तालिका सभाध्यक्षांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ४३ ते ४६, आदिवासी विकास विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २१० ते २१८, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २२७ ते २३४ आणि महिला व बालविकास विभाग या विभागांच्या मागण्या अनुक्रमांक २३५ ते २३८ चर्चेला घेण्यात येतील, असे सांगितले. मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय तालिका सभाध्यक्षांनी विशद केली व विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आलेली असून कपात सूचनांचीउत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरून आता चर्चेला सुरुवात होईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

**उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला–**

(१) प्रा. वर्षा गायकवाड
(२) प्रा. डॉ. अशोक उइके
(३) श्री. चंद्रकांत नवघरे
(४) श्री. प्रकाश आबिटकर
(५) श्री. देवेंद्र भुयार
(६) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(७) श्री. सुनिल राणे
(८) श्री. बाबासाहेब पाटील
(९) श्री. कैलास घाडगे (पाटील)
(१०) श्री. अबु आजमी
(११) श्री. सुभाष धोटे
(१२) श्री.नितेश राणे
(१३) श्री. शेखर निकम
(१४) श्री. ज्ञानराज चौगुले

(१५) श्री.रमेश कोरगावकर
(१६) श्री. बळवंत वानखेडे
(१७) श्री. संजय केळकर
(१८) श्रीमती सरोज अहिरे
(१९) श्री. संजय गायकवाड
(२०) श्री. कुणाल पाटील
(२१) श्रीमती यामिनी जाधव
(२२) कु. अदिती तटकरे
(२३) श्रीमती मनिषा चौधरी
(२४) डॉ. भारती लव्हेकर

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री, महिला व बाल विकास मंत्री, आदिवासी विकास मंत्री, क्रीडा व युवक कल्याण मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री यांनी आपापल्या विभागांच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी उपरनिर्दिष्ट मागण्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**७.** (१) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ९- पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १०- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

(३) सहकार मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ११- महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

**सन २०२३-२०२४ च्या अनुदानाकरिता मागण्या-** (चर्चा पुढे सुरु) -

**सन २०२३-२०२४ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-**
२५) श्री. किरण लहामटे

(चर्चा अपूर्ण)

(१) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स. यांनी, 'नांदेड जिल्हयामध्ये वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणावर गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याने त्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची गरज' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांनी, 'नांदेड तालुक्यात गारपिटीमुळे अतोनात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने नुकसानभरपाई देण्याची गरज' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

**सन २०२३-२०२४ च्या अनुदानाकरिता मागण्या**- (चर्चा पुढे सुरु) -

**सन २०२३-२०२४ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-**

(२६) श्री. श्रीनिवास वनगा
(२७) श्री. राजेश पाटील
(२८) श्रीमती मंजुळा गावित
(२९) श्री. हिरामण खोसकर
(३०) श्री. राजेश पवार
(३१) श्री. दिलीपराव वळसे-पाटील
(३२) श्री. राजेश टोपे
(३३) डॉ. संजय रायमूलकर
(३४) डॉ. विश्वजीत कदम
(३५) श्री. राजेश पाडवी
(३६) श्री. सहसराम कोरोटे
(३७) श्री. निलेश लंके
(३८) श्री. संजय जगताप
(३९) श्री. अशोक पवार
(४०) श्री. जितेश अंतापूरकर
(४१) श्री. मोहनराव हंबर्डे

(चर्चा अपूर्ण)

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३**

**(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

डहाणू नगर परिषदेचा विकास आराखडा सन २०१६ पासून, उर्वरित डहाणू तालुक्याचा प्रादेशिक आराखडा सन २०१९ पासून राज्य सरकारच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत असणे, हे दोन्ही आराखडे मंजूर न झाल्याने डहाणू तालुक्याचा विकास खुंटला जाणे, सुमारे २० वर्षांपूर्वी डहाणू नगर परिषद क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यात आली होती, मात्र व्याकरणदृष्ट्या संवेदनशील व नाजूक असल्याचे कारण सांगून या योजनेला सरकारने मंजुरी दिलेली नसणे, विकास योजनेचा आराखडा केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडे पाठवल्यानंतर तसेच या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीशांच्या समितीसमोर ही बाब पडताळल्यानंतर आराखड्याला राज्य सरकारने

आपल्या स्तरावर मंजुरी देण्याचे निर्देश दिले असणे, सन २०१४-१५ च्या सुमारास या आराखड्यावर हरकती मागवून त्याची सुनावणी घेण्यात येऊन तज्ज्ञ समितीने हा आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेला असणे, तर डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण अस्तित्वात असल्याने या आराखड्याला प्राधिकरणासमोर सादर करून औद्योगिक वापराच्या क्षेत्रावर मर्यादा आखून देऊन आराखडा सशर्त मंजूर करण्यात येणे, परंतु उर्वरित तालुक्यासाठी प्रादेशिक आराखडा मंजूर नसल्याने हे प्रकरण अद्याप प्रलंबित असणे, विकास आराखडे मंजूर न झाल्याने त्याचा फटका डहाणूतील नागरिकांना बसणे, डहाणू नगरपालिका क्षेत्रात यूडीसीपीआर लागू करणे व प्रादेशिक आराखड्याला मंजुरी न दिली गेल्याने डहाणूमधील रहिवासी भागाचा विकास तसेच पर्यटनाला चालना मिळण्यास अडथळे निर्माण झाले असणे, परिणामी, अनधिकृत बांधकाम प्रकार वाढलेले असणे, डहाणूच्या विकास आराखड्यात सर्वसमावेशक आरक्षण (अकामोडेशन रिझर्वेशन) तसेच हस्तांतरित होणारे विकास हक्क (ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राइट्स-टीडीआर) यांचा समावेश केल्यास आरक्षण क्षेत्राचा झपाट्याने विकास होण्याची गरज, मात्र विकास आराखड्याच्या मंजुरीसोबत या तरतुदींना मान्यता मिळण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी (माननीय मुख्यमंत्री यांच्यावतीने) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“राज्यात नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये सर्वे नंबर २५०, मौजे म्हसरूळ शिवार, नाशिक येथील मिळकतीचे नाशिक महापालिकेने भूसंपादन करून त्या बदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र (डी आर सी/ टी डी आर) हे नाव विकास क्षेत्र मूल्यांकन विभाग (१६.१४) च्या बदल्यात मूल्यांकन विभाग (१६.२२) बदल करून अंदाजे ८० करोड चे अतिरिक्त बिल्टअप क्षेत्राचे डीसीआरसी/टीडीआर मूल्यांकन झोन बदलले असल्याचे सन २०१८ मध्ये निदर्शनास येणे, याप्रकरणी नाशिक महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी परस्पर संगनमत करून शासनाची व नाशिक महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचा जनतेमध्ये निर्माण झालेला संशय, यासंदर्भात चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी (माननीय मुख्यमंत्री यांच्या वतीने) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री.हरिभाऊ बागडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“महाराष्ट्रात दुग्धव्यवसाय हा पूर्वी सरकार व सहकार यांच्या माध्यमातून केला जात असणे, शहरात किंवा मोठ्या गावात खाजगी व्यक्ती शेतकरी लोकांची गरज म्हणून गायी, म्हशी पाळून हा व्यवसाय करीत असणे,

आजही काही प्रमाणात हा व्यवसाय चालूच असणे, सहकाराच्या माध्यमातून गावोगाव दूध संकलन सहकारी संस्था स्थापन होऊन हे दूध तालुका संघ, जिल्हा संघामार्फत त्यावर प्रक्रिया करून पिशवी बंद करून मोठ्या प्रमाणात शहरी, निमशहरी भागात विक्री करीत असणे, राज्यातील तालुका संघ, जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ स्थापन होऊन एक महासंघ तयार करण्यात येणे, त्यासाठी शासनाने मोठी जागा देऊन गोरेगाव मुंबई येथे दूध व दुधापासून बनवलेल्या पदार्थांची निर्मिती करून मुंबईत विक्री करीत असणे, या महासंघाची व वेगवेगळ्या जिल्ह्यात जिल्हा संघ व तालुका संघाची मोठी गुंतवणूक असणे, त्याचबरोबर कर्मचाऱ्यांची मोठी संख्या कार्यरत असणे, पण राज्यात खाजगी किंवा कंपनीद्वारे मोठ-मोठे प्लॅन्ट टाकून राज्यभर दूध संकलन करत असणे, यामुळे ज्या गावातून सहकारी दूध संस्था दूध संकलन करीत असे, त्याच गावात एक, दोन, तीन असे वेगवेगळ्या व्यक्ती दुध गोळा करणे, त्याचा परिणाम दूध सहकारी संस्था बंद होत असणे, दूध संस्था बंद होणे म्हणजे तालुका, जिल्हा सहकारी संघ व पर्यायाने महासंघ अडचणीत येणे, त्यामुळे कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक व कर्मचारी वर्ग यांचाही रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होणे, यासाठी सहकार क्षेत्रामार्फत चालविल्या जाणारा दुग्ध व्यवसाय वाचविण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"अमरावती जिल्ह्यातील भातकुली तहसील व इतर कार्यालयासह संबंधित शासकीय कार्यालय तथा कर्मचारी निवासस्थान एका ठिकाणी बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्याच्या संबंधाने राज्यांचे विद्यमान महसूल मंत्री यांनी आदेश जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले असूनही अद्यापपर्यंत सदरचा प्रस्ताव सरकारकडे पाठविला नसल्याबाबत ज्यामध्ये खालील कार्यालयाचा समावेश आहे त्यामध्ये भातकुली तहसील कार्यालय चे ठिकाणी भातकुली जैन येथे तालुकास्तरीय कार्यालये जसे की पंचायत समिती कार्यालय, उपकोषागार कार्यालय, वन विभागाचे कार्यालय, क्रीडा विभागाचे कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, उपविभाग कार्यालय, तालुका भूमी अभिलेख कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, महिला बाल विकास विभाग कार्यालय, तालुका वैद्यकीय अधिकारी विभाग कार्यालय, व तालुक्यासंबंधित इतर कार्यालयाचे बांधकाम कर्मचारी निवासस्थान अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे माननीय महसूल मंत्री यांना डिसेंबर २६, २०२२ रोजी मागणी केली असणे, ही मागणी माननीय महसूल मंत्री महोदयांनी गंभीरतेने घेऊन जिल्हाधिकारी, अमरावती यांना त्यांचे कार्यालयाचे आदेश क्रमांक ८१/२०२३ तारीख दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी, अमरावती यांना तातडीने कार्यवाही करण्यासंबंधी लेखी आदेश दिले असणे, त्यानंतरही अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही दिसून न येणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा

दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी, अमरावती यांना वरील प्रमाणेप्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देशित केले असणे, या अनुषंगाने आज रोजीपर्यंत कोणत्याही कारवाई झाल्याचे दिसून येणे, भातकुली येथील तालुक्याचे स्थळी वंचित असलेल्या शासकीय कार्यालय तथा कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम करण्यासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णयात्मक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) सर्वश्री राजेश टोपे, जयंत पाटील, छगन भुजबळ, संजय बनसोडे, शेखर निकम, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधलेः—

"शासनाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ नंतर राज्यातील नवीन महाविद्यालयाच्या बाबतीत कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारलेले असणे, त्याअनुषंगाने सदर धोरण दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयांना लागू होत नसल्यामुळे ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना सरसकट १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत मागील २२ वर्षांपासून अविरतपणे शासनास निवेदने देऊनही प्रश्न प्रलंबित असणे, याबाबत अनेकवेळा उपोषण व आंदोलने महाराष्ट्र राज्य कृती समितीमार्फत करण्यात येणे, ७८ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी किती महाविद्यालये सुरू असून अनुदानाच्या धोरणानुसार किती महाविद्यालयांनी अनुदानाचे निकष पूर्ण करण्यात आले, याबाबतची पडताळणी झालेली असून आर्थिक भारासह अद्ययावत परिपूर्ण प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी मागील १५ महिन्या पासून आजपर्यंत अनुदान मिळणेबाबत प्रलंबित असणे, तसेच एकीकडे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ६ फेबुवारी, २०२३ अन्वये कायम विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळून तसेच त्रुटी व निकषांची पूर्तता केलेल्या खाजगी प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये वर्ग व तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करून अनुदान मंजूर केलेले असणे तर दुसरीकडे उपरोक्त वरिष्ठ महाविद्यालयांना सर्व त्रुटी व निकषाची पूर्तता करून व अनुदानास पात्र असून देखील अद्यापपर्यंत अनुदान देणेकामी टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास येणे, सर्व ७८ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी ग्रामीण व दुर्गम भागातील असल्याने अनुदान न मिळाल्याने वेतनाअभावी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व पर्यायाने त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या संपूर्ण कुटुंबीय यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्भवणे, परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचे लक्ष वेधले.**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू यांनी मनमानी कारभार करून विद्यार्थ्यांसह विद्यापीठाचे आर्थिक नुकसान केल्याची अत्यंत गंभीर बाब निदर्शनास येणे, कोरोना महामारीच्या काळात पदवी व पदवीत्तर ऑनलाईन परीक्षेचे कंत्राट देताना कुठल्याही नियमांचे पालन न करता आपल्या मर्जीतील कंपनीला आर्थिक व्यवहार करून अव्वाच्याव्सवा दराने कंत्राट दिल्याचेही निदर्शनास येणे, कोरोना महामारीच्या काळात ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतल्या असताना देखील प्रश्नपत्रिका छपाईच्या नावाखाली करोडो रुपये उचलल्याचा गंभीर प्रकार देखील झाला असल्याची बाब निदर्शनास येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाच्या २०१९ क्रीडा महोत्सवासाठी मैदाने तयार करताना खुली निविदा न काढता आपल्या मर्जीतील लोकांना कंत्राट देऊन विद्यापीठाचे मोठे आर्थिक नुकसान करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा प्रकार देखील निदर्शनास येणे, हे सर्व करत असताना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना विश्वासात न घेता स्वतःच्या अधिकारांचा वापर करून आर्थिक गैरव्यवहाराच्या उद्देशाने कुलगुरू यांनी सर्व निर्णय घेतले असल्याची बाब देखील निदर्शनास येणे, या सर्व बाबींची विशिष्ट समितीमार्फत चौकशी करून जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कार्यवाहीची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"केंद्र शासन व महाराष्ट्र शासनातर्फे राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फेत (NRHM) कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असणे, सदर कर्मचारी १५ ते २० वर्षांपासून कंत्राटी पदावर कार्यरत असणे, कोरानामध्ये जीवावर उदार होऊन कामगिरी पार पाडलेली असणे, याच अभियानात गुजरात, राजस्थान मध्ये या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम स्वरुपात सामावून घेतले जात असणे, महाराष्ट्र शासनामार्फत कुठलीही कार्यवाही केली जात नसणे, केंद्रीय व राज्य सरकार मार्फत ६० टक्के व ४० टक्के या कर्मचाऱ्यांना वेतन देत असणे, इतर राज्यात कायमस्वरुपी सेवेत सामील केले असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील या अभियानाच्या कर्मचाऱ्यांना दुजाभावाची वागणूक निर्माण होत असणे, राज्यातील या अभियानात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची शासकीय सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याची मागणी होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथे १०० खाटांचे जिल्हा महिला व बाल रुग्णालयास माहे जानेवारी, २०१३ मध्ये मान्यता देण्यात येणे, तद्‌नंतर माहे जुलै, २०१३ मध्ये सदर रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी १४ कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, सन २०१४ मध्ये इमारतीच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येऊन उक्त रुग्णालयाची इमारत उभारण्यात येणे, त्याच प्रमाणे सदर रुग्णालयाकरीता गट-अ ते गट-क ची नियमित ४२ पदे व काल्पनिक कुशल, अकुशल पदे ३ अशी पदे माहे जुलै, २०१९ मध्ये मंजूर करण्यात येणे, त्यापैकी आतापर्यंत केवळ १८ पदे भरण्यात आली असून उर्वरित तब्बल २९ पदे रिक्त असणे, त्याच प्रमाणे सदर रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी अंतिम टप्प्यातील अनेक कामे निधी अभावी रखडणे, रुग्णालयाच्या या नव्या इमारतीमध्ये रुग्ण सेवेसाठी आवश्यक असलेली उपकरणे, यंत्रसामग्री, फर्नीचर, रुग्णवाहीका, विद्युत पुरवठा, सी.सी.टी.व्ही. उपहारगृह व इतर अनेक कामे निधी अभावी रखडलेले असणे, अपूर्ण असलेली काम करण्याकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच मंजूर असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाकडे वारंवार जिल्हा प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात येणे, तथापि शासनाकडून अद्यापही उक्त प्रस्तावास मंजुर न मिळणे, परिणामी कुडाळ येथील १०० खाटांचे जिल्हा महिला व बाल रुग्णालय रुग्णांच्या सेवेसाठी सक्षमपणे सुरू न होणे, परिणामी जिल्ह्यातील नागरिकांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, शासनाने यासंदर्भात तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करून उक्त रुग्णालयाचे अपूर्ण अवस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची व मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(९) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"पालघर जिल्ह्यातील टेंभा खर्डी जव्हार जामसर बोपदारी रुईघर या हायब्रीड अन्युटी अंतर्गत एमयु-३ प्रकल्प कामाची मूळ किंमत १४६.१६ कोटी असणे, त्याअनुषंगाने कार्यारंभ आदेश दिनांक २३.१०.२०१८ रोजी देण्यात येणे, या प्रकल्पाची दिनांक २३.१०.२०२८ पर्यंत देखभाल दुरुस्तीची मुदत असणे, तसेच दिनांक २९.१२.२०१८ ते २६.१०.२०२१ या कालावधीत संबंधित ठेकेदार यांना १७७.९५ कोटी रुपयांचे बिल अदा केल्याचे निदर्शनास येणे, ही अदा रक्कम मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त असणे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कोकण यांनी दिनांक ०३.०८.२०२१ रोजी या प्रकल्पाचा पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करणे, शासनाने शासन निर्णय दिनांक २१.०२.२०२३ नुसार या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, सदर प्रकल्पासाठी पुन्हा नवीन सुधारित प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये २३५.३९ कोटी रुपयांची

देणे. सदर रस्त्याचे काम पूर्ण झालेले असणे, तसेच बिल अदा केलेले असणे, तसेच दिनांक २३.१०.२०२८ पर्यंत देखभाल दुरुस्ती मुदत असणे असे असताना प्रकल्पाची रक्कम जाणीवपूर्वक फुगवणे तसेच मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त रक्कम ठेकेदारास अदा करणे, या अनियमिततेसाठी मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी जबाबदार असणे, त्यामुळे पालघर जिल्ह्यात या अनियमिततेबाबत चर्चा सुरू असणे, या प्रकल्पावर यापुढील अनियमितता रोखणेसाठी सदर काम रद्द होण्याची आणि संबंधित जबाबदार अधिकारी यांचेवर कार्यवाही करणेची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, राज्यात अचानक पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान होणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, माननीय पिठासीन अधिकारी यांच्या अधिकाराबाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी उपरोक्त मुद्याच्या संदर्भात आपले मत मांडले.

माननीय अध्यक्षांनी याबाबत सविस्तर खुलासा केला.

**१.** (अ) (१) चार प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तेवीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(१) श्री.बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, 'विधानसभेने संमत केलेले विधानसभा विधेयक क्रमांक – ४ विधानपरिषदेमध्ये मागे घेण्यात आले असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

उद्योग मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

'ज्यावेळी विधानसभेने मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेमध्ये मागे घेण्यात येते त्यावेळी विधानपरिषद सभागृहाकडून संदेश प्राप्त होतो व तो विधानसभा सभागृहाला वाचून दाखविण्यात येतो; याप्रकरणीही संदेश प्राप्त झाल्यानंतर तो वाचून दाखविण्यात येईल' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री.अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, ‘राज्याचे सहकार मंत्री यांनी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये नोकर भरती करण्यासाठी परवानगी दिलेली असताना देखील त्या निर्णयास माननीय मुख्यमंत्री यांनी स्थगिती दिलेली असणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(३) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, ‘बारामतीहून कर्नाटकातील चिंतामणी कोल्हार येथून खरेदी केलेल्या गायी आणणाऱ्या शेतकऱ्यांना बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पोलीस प्रकरणात गोवणे तसेच कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या बाबतीत केलेले विधान’ इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, ‘अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयाच्या प्रसाधनगृहात महिलेने केलेली आत्महत्या, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(४) डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स. यांनी, ‘आपल्या मतदारसंघात असलेल्या खडकपूर्णा या धरणातून सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीच्या कामांसाठी नदीपात्रामधून पाणी सोडण्याच्या मागणीकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले दुर्लक्ष’ इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(५) श्री. बाळासाहेब आजबे, वि.स.स. यांनी, ‘बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांची गणना किंवा मोजणी सुरू करण्यात यावी तसेच मोठ्या प्रमाणात ऊसतोड कामगारांचे अपघात घडत असल्यामुळे त्यांचा विमा उतरविण्याची तरतूद करण्याची आवश्यकता’ इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने याची नोंद घ्यावी व उचित उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(६) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ‘राज्यात H3N2 बरोबरच कोरोना रूग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झालेली असणे’ इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते यांनी, ‘मंत्र्यांच्या निर्णयाला मुख्यमंत्र्यांनी स्थगिती देण्याबाबत’ उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी खुलासा केला.

**२.** (१) कृषी मंत्र्यांनी, (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** ‘शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ४ सूचना प्राप्त झालेल्या असल्या तरी आज सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस) असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेण्यात येणार नाहीत’ असे सांगून माननीय अध्यक्षांनी स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांस दालनात अनुमती नाकारली असल्याचे घोषित केले.

**४.** श्री. अजित पवार (विरोधी पक्षनेता) यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

‘’राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात

प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे निवडणुका दीर्घकाळ रखडल्या असणे, राज्यातील महानगरपालिकांत, विशेषतः मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करून निधीची उधळपट्टी होत असणे, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईत विनापरवाना पाणी उपसा करून होणारी विक्री, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, विक्रोळी कन्नमवार नगर येथील ३८ सोसायट्यांच्या पुनर्विकासातील अडथळा दूर करण्याची गरज, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिंडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेल्या अनियमितता, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत झालेला घोटाळा, आपला दवाखान्यांमध्ये असलेला औषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गोखले ब्रीजच्या पाडकामामुळे मुंबईच्या पश्चिम उपनगरात वाहतुकीचा उडालेला बोजवारा, मुंबईत वाढलेले धुळीचे साम्राज्य व प्रदूषण, सफाई कामगारांच्या आश्रय योजनेत निर्माण झालेल्या समस्या, महारेराने ५१ टक्के खरेदीदारांच्या मंजुरीची अट काढून टाकण्याचा घेतलेला धक्कादायक निर्णय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, ठाणे महानगरपालिकेतील मग्रूर व मस्तवाल सहाय्यक आयुक्तांचे गँगस्टरशी असलेले संबंध त्यात त्यांनी अनेक बेकायदेशीर कामे केली असल्याचे तसेच गुंडाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना धमकावत असल्याचे उघडकीस येणे, ठाण्यातील समूह पुनर्विकास योजनेची घोषणा झाली असली तरी अंमलबजावणी होत नसणे, ठाणे शहर सार्वजनिक परिवहन सेवा मोडकळीस आली असणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, नवी मुंबईतील भूमीपुत्रांनी बांधलेली घरे नियमित करण्याचा रखडलेला निर्णय, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे, पुणे महानगरपालिकेत विकासकांचा वाजलेला बोजवारा, मेट्रो सेवेचे विस्तारीकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचा आराखडा, रिंग रोडचे भूसंपादन, यात होत असलेला विलंब, विविध महापालिकांतून वगळलेल्या गावांच्या विकासाचा निर्माण झालेला प्रश्न, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टीसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. छगन भुजबळ (२) श्री. संजय केळकर (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

(७) श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, 'न्यायप्रविष्ट प्रकरणात माननीय मुख्यमंत्री यांनी हस्तक्षेप केल्यामुळे नागपूर न्यायालयाने ताशेरे ओढणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(८) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, 'कल्याण नाशिक मार्ग, भिवंडी बायपास मार्ग या ठिकाणी असलेल्या धाब्यावर हुक्का, ड्रग्ज, कोकेन, हेरॉईनचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

याबाबत शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(९) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, 'त्यांच्या मतदारसंघातील अभिलाष नगर, शास्त्रीनगर, जीवन विद्या मिशन मार्गावरील मंगुभाई दत्तानी ब्रिजच्या उतारावरील झोपडपट्टीधारकांना कांदिवलीमध्येच पुनर्वसित करण्याची आवश्यकता' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने याबाबत त्वरित विचार करावा असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१०) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, 'आप्पा पाडा येथे लागलेल्या आगीमध्ये ३,००० झोपड्या जळाल्या असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने या संदर्भात नोंद घेऊन त्वरित उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(११) श्री.प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांनी, 'शेती पंपाची वीजजोडणी तोडण्याच्या बाबतीत ज्यांनी ५ किंवा ८ वर्ष कोणतेच वीज बिल भरलेले नाही त्यांनी फक्त चालू बिल भरावे असे उर्जा मंत्र्यांनी सांगतल्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

यासंदर्भात शासनाने माहिती घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक ११, १२, १३ आणि १४ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५, ६, ७ आणि ९ या पुढे ढकलण्यात येत असून त्या सोमवारी घेण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५.** (१) डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील स्थानिक रावण टेकडीस्थित डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याला आग लागण्याच्या सातत्याने घटना घडत असून दिनांक १२.२.२०२३ रोजी अचानक मोठ्या प्रमाणात आग लागून धुराचे लोळ परिसरात पसरणे, रावणटेकडी, किसननगर, गोपाळ नगर, घरकूल, घाटपुरी नाका हा परिसर विषारी धुरात हरवल्याने तेथील आबाल-वृद्ध नागरिकांना श्वसनाचा त्रास होणे, वारंवार या डंपिंग ग्राऊंडला आग लागत

असल्याने नागरिकांमध्ये आग लावत असल्याचा निर्माण झालेला संशय, शहरातून कचरा संकलन करून त्या कचऱ्याद्वारे खत निर्मिती करीत असताना गेल्या काही महिन्यापासून कचऱ्यापासून खत तयार करण्यात न येणे, यामुळे या कचऱ्याचे ढीग मोठया प्रमाणात साचणे, या सततच्या आगीच्या घटनांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात येणे, असे असतांनाही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

उद्योग मंत्र्यांनी (माननीय मुख्यमंत्री यांच्या करिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद अग्रवाल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्हा हा नक्षलग्रस्त तथा आदिवासी बहुल जिल्हा असून गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय तथा मुख्य रेल्वे मार्गाने जोडलेले असणे, शहरामध्ये वैद्यकीय महाविद्यालय तथा व्यापारी केंद्र असल्याने जिल्हा सीमेलगतच्या मध्यप्रदेश, छत्तीसगड पररा ज्यांसह शेजारच्या जिल्ह्यांमधुन दररोज हजारो नागरिकांचे कामानिमित्त येणेजाणे असणे, गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय असल्याने तथा जिल्ह्यामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध असल्याने नोकरदार वर्ग तथा कामगार/मजुर वर्गाचे शहरामध्ये वास्तव्याला असणे, शहराची लोकसंख्या २ लक्षपेक्षा जास्त असुन शहरातील नागरिकीकरणामुळे दररोज नव-नविन वसाहतींची भर पडत असतांना मुलभूत सोई-सुविधांचा अभाव असणे, गोंदिया नगर पालिका १०० वर्षे जुनी असुन मुलभूत सोई-सुविधांचा शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास डंपिंग वार्ड किंवा घनकचरा प्रक्रिया व्यवस्थापन प्रकल्प नसणे, शहरामध्ये दररोज १०० टनपेक्षा जास्त कचरा निर्माण होणे, सदर कचर्याची उचल न झाल्याने जागोजागी कचर्यांचे ढिगारे निर्माण होणे, शहरातील साफ-सफाईकडे नगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असणे, नगरपालिकेमध्ये साफ-सफाईकरिता ४००-५०० कर्मचारी असतांनाही दररोज शहरामध्ये साफ-सफाई तथा कचर्याची उचल न होणे, त्यामुळे सर्व धुळीमुळे नागरिकांमध्ये दम्यासारखे आजार होत असणे, दररोज कचरा उचल होत नसल्याने शहरामध्ये दुर्गंधीयुक्त वातावरण निर्माण होऊन नागरिक जीव मुठीत घेऊन जगणे, शहरामध्ये रोगराई पसरणे, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण होऊन नगरपालिकेवर मोर्चा/ आंदोलने नित्याची बाब झाली असणे, नगरपालिका १०० वर्षे जुनी असतांना आजपर्यंत कचरा विल्हेवाटीकरीता कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसणे, शहरातील कचरा शहराबाहेरील मोकळ्या जागेवर फेकण्यास लगतच्या गावातील नागरिकांनी मनाई करणे, कचरा गाड्यांवर प्रतिबंध करणे, राज्य शासन, नगरपालिका प्रशासन तथा स्थानिक लोकप्रतिनिधी विरुद्ध वातावरण निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असणे, शहरातील कचर्यांचे विल्हेवाटीकरिता जागा उपलब्ध नसल्याने एम.आय.डी.सी. तील जागेशिवाय दुसरा पर्याय

नसणे, त्याचप्रमाणे शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था ५० वर्षे जुनी असून शहरामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेल्या नागरिकीकरणामुळे नागरिकांना १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ पाणी मिळत नसणे, शहरामध्ये पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या डांगुर्ली पाणीपुरवठ्यामध्ये उन्हाळ्यामध्ये पाणी उपलब्ध राहत नसल्याने याचा विपरीत परिणाम शहरातील पाणीपुरवठ्यावर होऊन नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरिता भटकंती करावी लागत असणे, डांगुर्लीपाणी पुरवठा योजनेकरिता त्या ठिकाणी डांगुर्ली बॅरेजचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक झाले असणे, नगरपालिका प्रशासनाने वाढीव तथा पर्यायी पाणी पुरवठ्याकरिता धापेवाडा परियोजनेतून अमृत योजने अंतर्गत रू.२७० कोटींचा शासनाला सादर केलेल्या प्रस्तावाला मंजुरी प्राप्त होणे अत्यंत गरजेचे असणे, शहरामध्ये भूमिगत गटार योजने काम सुरू असणे, ठिकठिकाणी गटार योजनेकरिता खोदकाम करण्यात आले असणे, परंतु खोदकाम करीत असताना कोणत्याही मापदंडासह तथा बांधकाम दर्जानुसार करण्यात येत नसणे, सदर योजनेच्या खोदकामामुळे शहरातील रस्त्यांची दुरवस्था झालेली असून नागरिकांना रहदारीकरिता मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, योजनेतील खोदकामाकरिता असताना कंत्राटदार आपली मनमानी करीत असणे, नागरिकांच्या तक्रारीची नगरपालिका प्रशासनाकडून दखल घेण्यात येत नसणे, एकंदरच गोंदिया शहरातील कचऱ्याचे विल्हेवाटीमुळे पसरलेली रोगराई, पिण्याचे पाण्याची कमतरता तथा भूमिगत गटार योजनेच्या खोदकामामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी (माननीय मुख्यमंत्री यांच्या करिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधलेः—

“बृहन्मुंबई विद्युतपुरवठा आणि परिवहन उपक्रम मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर शहरात वीजपुरवठा व बससेवा उपलब्ध करणारी सार्वजनिक क्षेत्रातील ‘बेस्ट’ परिवहन उपक्रम १८४७ मध्ये देश स्वतंत्र होण्याच्या एक आठवडा पूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असणे, दरम्यानच्या कालावधीत बेस्टच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना अल्पदरात सौजन्यपूर्ण सेवा देऊन विद्युत विभागाच्या मार्फत विद्युत सेवाही चोख दिली असणे, सद्यःस्थितीत बेस्ट आस्थापनेवर सुमारे २९ हजार कर्मचारी वर्ग आणि प्रवाशांच्या सोयीकरिता साधारण ३५०० बसेस रस्त्यावर धावत असल्याचे निदर्शनास येणे, सार्वजनिक उपक्रम व्यवस्थेत मुंबईची बेस्ट सेवा अप्रतिम सेवा म्हणून देशांतर्गत सर्व राज्यात ख्याती असणे, अशा या बेस्ट सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेकडून कर्ज घेऊन मासिक वेतन देण्याची वेळ येणे, हा उपक्रम मुंबई महानगरपालिकेंतर्गत चालविण्यात येत असताना याचे खाजगीकरण करण्याची चर्चा सुरु असणे, तथापि बेस्ट उपक्रम हा महानगरपालिकेच्या अंतर्गत ठेवण्याची गरज, मुंबईत या उपक्रमाची ३५० एकर उद्योग संकुल व ७५ एकर निवासी संकुल जागा उपलब्ध असताना व तेथील निवासी संकुलाच्या १२ एकरच्या जमिनीवर वसाहतीची जागा शासकीय भावाने विकून ५०० स्क्वे. फूटची घरे त्या वसाहतीत सध्या रहात असलेल्या कर्मचाऱ्यांना मार्केट भावाने देऊन अन्य जागा विकल्यास बेस्टचा आर्थिक फायदा होऊन कर्मचाऱ्यांनाही फायदा होणार असणे, तसेच त्यांच्या सेवा निवृत्तीनंतर ते बेस्ट वसाहतीत

रहात असलेले निवासस्थान ज्यांचे वारस बेस्ट सेवेत आहेत त्यांच्या नावावर अथवा वारस बेस्ट सेवेत नसल्यास निवृत्त होणाऱ्या बेस्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या नावावर करून देण्यात येणे, म्हणून बेस्ट संघटनांकडून वारंवार होत असलेली मागणी, बेस्टच्या सेवेत उभे आयुष्य खर्च केल्यानंतर मिळणाऱ्या वेतनात मुंबईत स्वतःचे निवासस्थान घेऊ न शकलेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांची संख्या ९० टक्के असून या कर्मचाऱ्यांना मुंबई बाहेरील स्थलांतरित व्हावे लागू नये म्हणून त्यांना मुंबईत अथवा नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर परिसरात बाजारमूल्य दरात स्वतःचे घर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने मुंबई पोलिसांच्या धर्तीवर धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, या कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश कर्मचारी मुंबईच्या मातीतील मूळ रहिवासी असल्याने त्यांना मुंबईत स्वतः निवासस्थान उपलब्ध करण्याकरिता शासनाने उचित निर्णय घेऊन त्यांच्या भविष्याची चिंता दूर करण्याकरिता व बेस्टचे खाजगीकरण न करता कर्मचाऱ्यांना नोकरीची शाश्वती देण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

उद्योग मंत्र्यांनी (माननीय मुख्यमंत्री यांच्या करिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. यांनी, 'टोकाई सहकारी लि., कुरुंद्रा, ता. वसमत, जि. हिंगोली साखर कारखान्याकडील एफआरपीचे प्रलंबित पैसे शेतकऱ्यांना देण्याची आवश्यकता' इ. बाबत दिलेली लक्षवेधी सूचना सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आली नाही.

आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक ३ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ६, ७, ८, ९ पुढे ढकलण्यात येत आहेत असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

६. (१) ग्रामविकास विभाग

(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

माननीय तालिका सभाध्यक्षांनी उपरोक्त विभागाच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रम पत्रिकेबरोबर वितरित केला.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी चर्चेची कार्यपद्धती विशद केली.
उपरोक्त विभागाच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चा सुरू झाली.
चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. राजेश टोपे — (२) ॲड. राहुल ढिकले

(३) श्रीमती सुलभा खोडके — (४) डॉ. संजय रायमूलकर

(चर्चा अपूर्ण)

(१) कॅ. आर.तमिल सेल्वन, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(हिंदी प्रतिवेदकांची पदे रिक्त असल्यामुळे उक्त माहितीच्या मुद्याबाबतचा मजकूर उपलब्ध नाही.)

सरकारने याबाबतची माहिती घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांनी, 'कांदिवली पोलीस स्टेशनमध्ये एका वकिलाला मारहाण करण्यात आल्याने बोरिवली, अंधेरी, माजगाव, दादरसह मुंबईतील सर्व न्यायालयातील वकिलांनी पुकारलेला संप' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याप्रकरणी शासनाने नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.
ग्रामविकास मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.** (चर्चा पुढे सुरू)

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(५) श्री. देवेंद्र भुयार
(६) श्री. राजू कारेमोरे
(७) श्री. दादाराव केचे
(८) श्री. अमिन पटेल
(९) श्रीमती ऋतुजा लटके
(१०) श्री. रईस शेख
(११) श्री. रोहित पवार
(१२) ॲड.आशिष शेलार
(१३) श्री. कैलास गोरंट्याल
(१४) श्री. ज्ञानराज चौगुले
(१५) श्री.किशोर जोरगेवार
(१६) श्री.अशोक पवार
(१७) डॉ. देवराव होळी
(१८) श्री. लहु कानडे
(१९) श्रीमती यामिनी जाधव
(२०) श्री.कृष्णा गजबे
(२१) ॲड.यशोमती ठाकूर
(२२) श्री. जयंत पाटील

(चर्चा अपूर्ण)

मुख्यमंत्र्यांनी, 'शेतकऱ्यांनी लाँग मार्च काढून केलेल्या विविध मागण्या' इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.** (चर्चा पुढे सुरू)

अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२३) श्रीमती मनिषा चौधरी
(२४) श्री. रमेश कोरगावकर
(२५) श्री. नामदेव ससाणे
(२६) श्री. प्राजक्त तनपुरे
(२७) श्री. सुनिल राणे
(२८) श्री. सुनिल भुसारा

(२९) श्री. प्रकाश फातर्पेकर (३०) कॉ. आर.तमिल सेल्वन

(३१) श्री. कैलास पाटील (३२) श्री. संजय सावकारे

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, वैद्यकीय शिक्षण व ग्रामविकास मंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३**

सर्वश्री धनंजय मुंडे, नाना पटोले व छगन भुजबळ, वि.स.स. यांच्या "अवकाळी पावसाने केलेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सध्या सुरू असलेल्या संपामुळे कर्मचारी हजर नसणे तसेच, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानभरपाईसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याची गरज" व "राज्यात जुन्या पेन्शन योजनेसाठी तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपास पाठिंब्यामुळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालये शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार घातल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान" इ. बाबतच्या म.वि.स. नियम ५७ अन्वये चार सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत प्राप्त झालेल्या सूचनांमधील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कोणत्याही बाबींशी निगडित नाही. तसेच प्राप्त झालेल्या सूचना क्रमांक २ ते ४ या विषयावर म.वि.स. नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. सबब, सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या क्रमांक १ ते ४ वरील सूचना म.वि.स. नियम ५७ अन्वयेच्या निकषात बसत नसल्यामुळे सदरहू सूचनांना अनुमती नाकारीत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

यासंदर्भात सर्वश्री अजित पवार (विरोधी पक्ष नेते), जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, धनंजय मुंडे, व सुनील केदार, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात महसूल मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, वने मंत्री यांनी खुलासा केला.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील दोन प्रश्न उत्तरित झाले.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, विधानसभेच्या सन २०२२ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १९ डिसेंबर, २०२२ ते दिनांक ३० डिसेंबर, २०२२ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण २७५ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ९६ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवली.

श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी, "सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे ऑनलाईन

उपलब्ध करून देण्यात येतात की हार्ड कॉपीमध्ये उपलब्ध करून देण्यात येतात" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

'सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी कागदपत्रे हार्ड कॉपी स्वरुपात अस्तात. मात्र सदरहू कागदपत्रे विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याची देखील व्यवस्था असून सन्माननीय सदस्य ते विधिमंडळाच्या संकेतस्थळावर पाहू शकतील' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, "तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या मानधन दरात वाढ करणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, "अकृषि विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विविध रिक्त पदे भरणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(१) श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते) यांनी, "सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यामध्ये गुऱ्हेघर धरण परिसरात मोरणा खोरे येथे श्री. मदन कदम या व्यक्तीने गोळीबार केल्याने दोन व्यक्ती जागेवर मयत व तिसरी व्यक्ती गंभीर जखमी होणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

'शासनाने सदर माहितीची दखल घेऊन त्वरित चौकशी करण्यासंदर्भातील आदेश देऊन योग्य ती उपाययोजना करावी' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३.** (ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(१) (क) सहकार मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. अजित पवार, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव आणि सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा सातवा प्रस्ताव आहे. त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी, "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे" असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

‘अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकासंदर्भातील भावना सभागृहात व्यक्त केल्या असून अनेकांना त्या व्यक्त करायच्या असल्याने यासंदर्भात सर्व गटनेत्यांबरोबर बैठक घेऊन उद्या हे विधेयक पुन्हा मांडावे’ असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, “राज्यात जुन्या पेंशन योजनेसाठी सुरू असलेल्या संपाला दिलेल्या पाठिंब्यामुळे माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार घातल्याने विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

‘सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी दिलेल्या माहितीची सरकारने नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी’ असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, “शहरातील महत्त्वाचे रस्ते किंवा वन-वे वर चुकीच्या दिशेने वाहन चालवण्याचे प्रमाण वाढलेले असणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी, “जोगेश्वरी (पूर्व) येथील अंधेरी गुंफा आणि जोगेश्वरी गुंफांमधून माती काढली जात असणे व त्यायोगे प्राचीन गुंफांना होणारे नुकसान” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबतची नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, “मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांमधील २ हजार ५१ शिक्षकांची पदे मागील ३ ते ४ वर्षापासून रिक्त असणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, “पुणे शहरातील वारजे परिसरात बिबट्या आढळून येणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी, “गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील माल्हेर येथील वीज कोसळून मृत्युमूखी पडलेल्या मुलीच्या कुटुंबास शासनाने मदत करण्याची आवश्यकता तसेच गडचिरोली जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे मका, भाजीपाला पिकांचे नुकसान झाले असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी, “अक्कलकोट तालुक्यातील जेहूर, हदगा, बोरोटी व इतर गावांमध्ये मोठ्या प्रमाणात गारपीट व पाऊस पडल्यामुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा सुरू असताना या विषयावर बोलावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(९) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, “जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात राज्यात आंदोलनामध्ये काही महिला शिक्षिका माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या विरोधात खालच्या दर्जाची टीका करीत असणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. गणपत गायकवाड, वि.स.स. यांनी, "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा अग्निशमन विभागातील २९२ रिक्त पदे भरण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "मुंबईतील खारदांडा परिसरामध्ये जवळपास १२ घरे पुनर्विकासासाठी प्रलंबित असणे." इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते) यांनी, "बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे होणारी मनुष्यहानी थांबविण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या मुद्यासंदर्भात वने मंत्र्यांनी खुलासा केला.

या विषयाची लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेला येणार आहे त्यावेळी मंत्रिमहोदय यावर उत्तर देतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१२) श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी, "सहकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीनुसार चौकशी अथवा योग्य प्रकारे लेखापरीक्षण न करता राज्यातील विविध गावांच्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना अवसायनात काढण्याची प्रक्रिया सहकार विभागाने सुरू करणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी मांडलेल्या माहितीची नोंद घेऊन शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१३) श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांनी, "संपूर्ण राज्यभरात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे जे नुकसान झाले आहे त्याची नोंद करण्यासाठी शासनाने दिलेल्या मोबाईल क्रमांकांवर माहिती पोहचत नसणे, दिलेल्या क्रमांकांवर व्हाटस् ॲप सुरू नसणे तसेच खात्री करण्यासाठी त्या क्रमांकावर फोन लावले तर फोनही उचलले जात नसणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांनी, "निळवंडे धरणाच्या कालव्यांचे काम दोन-चार दिवसांपूर्वी राहुरी तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी बंद पाडल्याची घटना समोर येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) प्रा. श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "धारावी येथील महात्मा गांधी सोसायटी व मांटुगा येथील लेबर कॅम्पमध्ये आग लागण्याच्या घटना घडल्या असून त्यांचे पंचनामे व चौकशी करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, "कोरोना काळामध्ये अनेक युवकांवर कलम ३५३ व १८८ अन्वये गुन्हे दाखल झाले आहेत ते शासनाने मागे घ्यावेत जेणेकरून त्यांना लवकरात लवकर नोकरी किंवा पारपत्र मिळू शकेल." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाने अंत्योदय योजनेंतर्गत पिवळे आणि केशरी रेशनकार्ड धारकांना आनंदाचा शिधा गुढी पाडव्याला देण्याची घोषणा करण्यात आलेला आनंदाचा शिधा सातारा जिल्ह्यात पोहोचला नसणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**४.  (१) श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"केंद्र शासनाने वन अधिनियम, १९७८ मधील काही कलमे निरसित करून वनाचे संवर्धन व संरक्षण करण्यासंबंधी राज्यांनी कायदा व नियम बनवले असे निर्देश दिलेले असणे, त्यानुसार महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम विधानमंडळाने पारित केला असणे, सदर नियमातील सुधारणा कलम २३ (अ) (१) अन्वये मूळ मालकासह चरितार्थासाठी १२ हेक्टर एवढी जमीन पुनःस्थापित करण्याची तरतूद करण्यात आलेली असणे, याबाबत कोर्टाचे अनेक निर्णय असून ज्या खाजगी वन जमिनीचे **राजपत्र** झाले नसेल व वन खात्याने ताबा घेतला नसेल व मोबदला दिला नसेल अशा जमिनी परत करण्याचे आदेश असताना २२ (अ) (१) खाली पुनःस्थापित करावयाच्या व इतर कमी क्षेत्राच्या जमिनीच्या ७/१२ सदरी खाजगी वने व वनेतर कामाव्यतिरिक्त वापरास बंदी असे शेरे दाखल केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी पसरलेली असणे, सबसिडी व शासनाच्या अनेक योजना कर्ज घेण्यात येणारी अडचण, जमीन विकसित करण्यासाठी येणारे अडथळे त्यामुळे वन व महसूल खात्याकडून होणारी प्रचंड पिळवणूक व त्यामध्ये निर्माण होत असलेला उद्रेक, अगदी वडिलोपार्जित अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात मोडणारी जमीन तसेच राज्याच्या विकासासाठी रस्ते व इतर प्रकारच्या शेजारील जमीन वनखात्याच्या शेऱ्यामुळे विकसित न करता येत असल्यामुळे प्रचंड प्रमाणावर पसरलेला संताप, हतबलपणाची भावना व शेतकऱ्यांची खुंटलेली प्रगती याबाबत राज्यानेच पारित केलेल्या अधिनियमातील कलम २ (क) (१) व कलम ३ मध्ये संशोधन करण्याची नितांत गरज असणे, शेतकऱ्यांच्या प्रगती आड येणारी मुख्य वन संरक्षक यांनी पारित केलेली शासन परिपत्रके दिनांक १६/१२/२००४, दिनांक २२/०२/२००५ व दिनांक १४/०७/२००४ ही शासनाच्या दिशाभूल करून व महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम, १९७५ च्या तरतुदी विरुद्ध व न्यायालयीन निर्णयांची अवहेलना करणारी परिपत्रके रद्द करण्याबाबत मा.मंत्री वने हे तातडीने कार्यवाही करतील काय? सदरची पत्रके रद्द करून केंद्र सरकारच्या दिनांक २०/६/२०१७ रोजीच्या बैठकीत जमिनीच्या खरेदी-विक्रीबाबत आक्षेप नसल्याने मा.मंत्री महसूल यांनी तसे परिपत्रक काढून गरजू असलेल्या शेतकऱ्यांना खरेदी-विक्री व्यवहार करणेसाठी परवानगी देतील का याचा खुलासा या सभागृहासमोर करतील काय? याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ३, ८ व १३ पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आता लक्षवेधी सूचना क्रमांक १४ वर चर्चा करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**(२) श्री. राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"धाराशिव जिल्हा अवर्षण प्रवण असून जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरीपेक्षा कमी असणे, औद्योगिकीकरणाचा अभाव व कृषी क्षेत्रासाठी अपुरे शाश्वत सिंचन यामुळे जिल्ह्यात

शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त असणे, या बाबी लक्षात घेऊन निती आयोगाने निवडलेल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये धाराशिव जिल्ह्याचा समावेश असणे, त्यामुळे येथील आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी औद्योगिकीकरणाला चालना देणे आवश्यक असणे, ही बाब लक्षात घेऊन सन २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी महाजनादेश यात्रा दरम्यान धाराशिव जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव येथील कौडगाव औद्योगिक वसाहतीमध्ये टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याची घोषणा केली असणे, या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल देखील सादर करण्याचे आदेशित केले असणे, या अनुषंगाने के.पी.एम.जी. संस्थेच्या माध्यमातून एमआयडीसी ने प्राथमिक अहवाल तयार करणे, परंतु महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यापासून दुर्दैवाने हा विषय प्रलंबित राहिलेला असणे, इतर वस्त्रनिर्मिती उद्योगापेक्षा तांत्रिक वस्त्र (टेक्निकल टेक्सटाईल) उत्पादनाला जगभर अधिकचा वाव असल्याने धाराशिवसारख्या आकांक्षित जिल्ह्यात या प्रकारचा उद्योग उभारल्यास किमान १० हजार रोजगार निर्मितीसह येथील अर्थकारणाला मोठी चालना मिळणार असणे, आकांक्षित जिल्ह्याच्या विकासाबाबत केंद्र सरकार अतिशय सकारात्मक असुन देशाचे पंतप्रधान यांच्यावर विशेष लक्ष असणे, तांत्रिक वस्त्र निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयाकडून नॅशनल टेक्निकल टेक्स्टाईल मिशन ही योजना राबविली जात असणे, कौडगांव, धाराशिव येथे राज्यातील पहिल्या तांत्रिक वस्त्र निर्मिती प्रकल्पाची घोषणा केली असणे, ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी व धाराशिव औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी वस्त्रोद्योग, एमआयडीसी व के.पी.एम.जी. च्या माध्यमातून त्वरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) सर्वश्री. शांताराम मोरे, प्रकाश सोळंके, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

श्री. शांताराम मोरे, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुंज अधिसूचित क्षेत्राकरिता सन १९९१ मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाल्यानंतर सिडकोने सन १९९६ पासून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करणे यासाठी सन १९९८, २००० व २०१२ मध्ये भूसंपादनासाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध होणे, यातील काही जमिनींचे आगाऊ ताबे घेऊन त्यावर विकास कामे करणे, परंतु भूसंपादनाची कार्यवाही अद्यापही पूर्ण न होणे, जमीन मालकांना कोणत्याही प्रकारे मोबदला न देणे, सिडको ने मार्च, २०२० मध्ये ठरावाद्वारे प्रकल्पातील प्रलंबित भूसंपादनाची कार्यवाही परत घेण्याचा आणि नव्याने कोणत्याही जमिनीचे संपादन न करण्याचा निर्णय होणे, परंतु त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणे, जमीनधारकांच्या जमिनी जाणीवपूर्वक संपादनाच्या फेऱ्यात अडकवून ठेवून त्यांना विकास परवानगी न देणे, विकास परवानगी व सोयी-सुविधा मिळवण्यासाठी सिडको कार्यालयासमोर वेळोवेळी आंदोलन होणे, मोर्चे निघणे, संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या जमिनींच्या विकास कामांना परवानगी देणे बाबत शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सिडकोकडून जमीनधारकांना कारण

देणे बऱ्याच जमीनधारकांनी याबाबत माननीय उच्च न्यायालयात धाव घेणे, माननीय उच्च न्यायालयाने प्रलंबित भूसंपादनाबाबत शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पूर्वी निर्णय घ्यावा असे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश देऊनही याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष सिडकोने प्रकल्पाचा आर्थिक व्यवहार्यता अहवाल शासनास सादर करणे, प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसह्य ठरत नसल्याने प्रलंबित असलेल्या १२४ हेक्टर क्षेत्रापैकी केवळ विकास कामे झालेले ७.३० हेक्टर क्षेत्राचे गुण संपादन पूर्ण उर्वरित क्षेत्रातील संपादन न करण्याच्या निर्णयावर सिडको ठाम राहून त्यासाठी शासनाची परवानगी मागणे, शासनाने सन २०२२ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सदर विषयी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना सिडकोच्या सदर निर्णयास सहमती असल्याचे आणि प्रकल्पातील आवश्यक त्या सोयी-सुविधा कालबद्ध वेळेत पूर्ण करण्यासाठी सदर अधिवेशन संपता पंधरा दिवसाच्या आत लोकप्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्याबाबत सभागृहात आश्वासन देणे, परंतु या दोन्ही आश्वासनाची पूर्तता न करणे, माननीय उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच, या सार्वभौम सभागृहात आश्वासन देऊन सुद्धा या प्रलंबित प्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमध्ये शासन सिडको यांच्याबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे व या सभागृहात दिलेले आश्वासनांचे तात्काळ पालन करून या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग (मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री. समीर कुणावार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले —**

"वर्धा जिल्ह्याची हिंगणघाट शहरातील लोकसंख्या १ लाख ३० हजार असणे, हिंगणघाट नगरपरिषदेला अमृत योजने अंतर्गत टप्पा १ त्यासाठी ६१ कोटी ७९ लक्ष रुपये मंजूर होणे, त्यामध्ये २२२ किलोमीटरची पाईप लाईन, नवीन फिल्टर प्लान्ट आणि शहरामध्ये ११ नवीन पिण्याच्या टाक्या बांधून पूर्ण होणे परंतु वणा नदीवर बंधारा नसल्याने पाणी पुरवठा न होणे, मा. प्रधान सचिव नवि-२, यांनी दिनांक २०/०९/२०१७ ला मुंबईत बैठक घेऊन वणा नदी हिंगणघाट येथे नवीन बंधारा बांधकाम करण्याबाबत आदेशित करणे, परंतु अजूनही नदीवर बंधारा मंजूर न होणे, दिनांक १४/०८/२०१९ ला हिंगणघाट नगरपरिषदेने संपूर्ण त्रुटींची पूर्तता करून संपूर्ण अहवाल संचालक नगर प्रशासन संचालनालय यांच्याकडे पाठविणे एकीकडे पाण्याच्या टाक्या, पाईप लाईन, सर्व जल शुद्धीकरण केंद्र नवीन तयार असून बंधारा नसल्यामुळे जनतेचे प्रचंड हाल होत असणे, त्यामुळे वारंवार मोर्चे आंदोलन होत असणे, अद्यापही बंधारा मंजूर न झाल्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग (मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्रीमती नमिता मुंदडा व श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशनयोजनेमधील अनियमिततेबाबत अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली ०६ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालातील दोषीवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प, बीड यांच्याकडे पाठवला असणे, परंतु प्रत्यक्षात बीड जिल्ह्यातील जलजीवन मधील सर्व घोटाळा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या संमतीने झाला असणे, लोकप्रतिनिधी, लोकांच्या तक्रारी, वर्तमानपत्रात वारंवार बातम्या येत असतानाही कार्यवाही करण्याऐवजी दुर्लक्ष करून जलजीवनची कामे देताना संबंधित एजन्सीना गंभीर त्रुटी असतांना कामे वाटप केलेली असणे, तसेच त्याच विभागातील कर्मचाऱ्यांनी निविदा प्रक्रियेत अनियमितता करत स्वतःच्या मर्जीतल्या व नातेवाईकांच्या संस्थाना व ज्यांनी सर्वे व अंदाजपत्रके तयार केली त्या अभियांत्रिकी सल्लागार यांनाच नियमबाह्य कामे दिली असणे, या सर्व अनियमिततेला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी न थांबवता पाठीशी घालून अनियमितता होऊ दिली असणे, त्यामुळे जलजीवनच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराला व अनियमिततेला प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. हे जबाबदार असणे, त्यामुळे त्यांच्यासह अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालातील दोषी अधिकारी, कर्मचारी, कॉन्ट्रॅक्टर, यांच्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) डॉ. राहूल आहेर, वि.स.स. यांनी, 'नाशिक जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे केलेल्या पाणी पुरवठ्याची प्रलंबित देयके अदा करण्याची आवश्यकता' इ. बाबत दिलेली लक्षवेधी सूचना सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आली नाही.

(६) श्री. चंद्रकांत उर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स. यांनी, 'टोकाई सहकारी लि. कुंद्रा, ता. वसमत, जि. हिंगोली यांचेकडील शेतकऱ्यांच्या एफआरपीच्या थकीत रकमेचा प्रश्न' इ. बाबत दिलेली लक्षवेधी सूचना सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आली नाही.

**(७) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"सांगली नजीक कृष्णा नदीत दत्त इंडिया संचालित वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या अनधिकृत डिस्टलरीचे मळी मिश्रित पाणी कृष्णा नदीत मिसळल्याने मोठ्या प्रमाणात नदी प्रदूषित होऊन हरिपूर

अंकली नजीक हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याची घटना समोर येणे, मृत माशांमुळे नदी मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाली असणे, यामुळे सांगली शहरासह जयसिंगपूर, मिरज, अंकली व शिरोळ तालुक्यांतील वीसहून अधिक गावांतील लोकांचे आरोग्य धोक्यात असल्याचे निदर्शनास येणे, कृष्णा नदीतील जलप्रदूषणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष्य, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरलेला तीव्र असंतोष, अनधिकृत डिस्टलरीवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

शालेय शिक्षण मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. यशवंत माने, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"मौजे चिंचोलीकाटी (ता. मोहोळ, जि. सोलापूर) येथील एमआयडीसीमध्ये असलेला बालाजी अमाईन्स या कंपनीने अवैधरीत्या हजारो ब्रास मुरुम व दगड यांचा उपसा केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात चौकशी केल्यानंतर तहसीलदार मोहोळ यांनी सदर कंपनीवर रु. २६ कोटी ५० लाख मुरुम यांचा उपसा केल्याबद्दल व रु. १६ कोटी ९६ लाख दगड काढल्याबाबत असा एकूण रु. ४३ कोटी ४६ लाख इतका दंड भरण्याची नोटीस दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी कंपनीला देणे, अद्यापही या कंपनीला दंडाची रक्कम भरली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदर प्रकरण तहसीलदार मोहोळ यांच्याकडून काढून घेऊन पुढील कार्यवाही करण्यासाठी तहसीलदार दक्षिण सोलापूर यांच्याकडे दिले असल्याचे उघडकीस येणे, हा बदल करण्याची कारणे काय आहेत, असा संभ्रम तेथील नागरिकांत पसरलेला असणे, याबाबत खुलासा करून रु.४३ कोटी ४६ लाख ही दंडाची रक्कम बालाजी अमाईन्स या कंपनीकडून वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय अध्यक्षांनी घोषणा केल्यानुसार लक्षवेधी सूचना क्रमांक ३, ८ आणि १३ पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आता लक्षवेधी सूचना क्रमांक ९ घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**(७) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले–**

"सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातील मैंदर्गी गावाचा सिटी सर्व्हे हा सन २०११-१२ साली विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्यामार्फत नेमण्यात आलेल्या खाजगी कंपनीकडून करण्यात आलेला असणे, सदर सिटी सर्व्हेच्या कामामध्ये ७०% पेक्षा जास्त धारकांच्या नावामध्ये, क्षेत्रामध्ये, नकाशामध्ये व सिटी सर्वेनंतर वाटप केलेल्या सनदांमध्ये चुकीच्या पद्धतीने नोंद होणे, त्यानंतर नागरिकांच्या तक्रारी प्राप्त असणे, उपअधीक्षक, भूमिअभिलेख, अक्कलकोट यांनी मैंदर्गी शहरचा फेरसिटी सर्व्हे करण्याचा प्रस्ताव पाठवला असणे, मलकापुर

शहराचा व मैंदर्गी शहराचा सिटी सर्वे एकाच कंपनीकडून करणे, मलकापुर शहराचा फेर सिटी सर्व्हे केला असणे, मैंदर्गी शहराचा चुकीचा झालेला सिटी सर्वे रद्द करून फेर सिटी सर्व्हे केल्याने सर्वांना न्याय मिळण्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

**श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील रसायनी पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्या तसेच अमेटी युनिव्हर्सिटी, भाताण यांच्यामार्फत मालमत्ता कर त्या त्या हद्दीतील ग्रामपंचायतींना अद्यापपर्यंत मिळाला नसणे, सदर मालमत्ता कर न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतींना विकासकामे करताना अनेक अडचणी निर्माण होत असणे, ग्रामपंचायतींकडे आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्यामुळे कंपन्यांकडून व अमेटी युनिव्हर्सिटीकडून मिळणाऱ्या मालमत्ता करावर ग्रामपंचायतींचा विकास अवलंबून असणे, कंपनी व युनिव्हर्सिटीकडून मालमत्ता कर न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या विकासाला अडथळा निर्माण होत असणे, उक्त परिसरातील ग्रामपंचायतींमधील कामगारांचे वेतन, पाणीपट्टी कराची रक्कम, तसेच अनेक मूलभूत समस्यांना सातत्याने ग्रामपंचायतींना सामोरे जावे लागत असणे, उक्त ग्रामपंचायतींना मूलभूत सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे ग्रामस्थांच्या तीव्र रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे पनवेल तालुक्यातील अमेटी युनिवर्सिटी, भाताण तसेच रसायनी पाताळगंगा परिसरातील कंपन्यांकडून ग्रामपंचायतींना मिळणारा कर तातडीने मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१६) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा मांडला.

(हिंदी प्रतिवेदकांची पदे रिक्त असल्यामुळे उक्त माहितीच्या मुद्याबाबतचा मजकूर उपलब्ध नाही.)

**५.** आता महसूल व वन विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २३ ते ३२, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ३३ ते ४२, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ६१ ते ६९ आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अनुक्रमांक २६८ ते २७२ एकत्रितरीच्या चर्चेला घेण्यात येतील तसेच या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले व सदर चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून चर्चेला सुरुवात करण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(चर्चा अपूर्ण)

(१७) श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी, "गडचिरोली जिल्ह्यामध्ये नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने खंबीर निर्णय घेण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने लक्ष घालावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(१८) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "पुणे-अहमदनगर जिल्ह्यातील पाणी वाद संपुष्टात आणणाऱ्या डिंभे-माणिकडोह बोगदा प्रकल्पाच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री यांनी केलेल्या ट्विटमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी, "माळशिरस तालुक्यातील नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना तत्काळ नुकसानभरपाई देण्यात यावी." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान – चर्चा पुढे सुरू-**

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. जयंत पाटील
(२) श्री. हरिभाऊ बागडे
(३) श्री. सुनील केदार
(४) श्री. प्रकाश आबिटकर
(५) श्रीमती सुमन पाटील
(६) श्री. अबु आजमी

(चर्चा अपूर्ण)

(२०) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "चार महिन्यांपासून वसतीगृहातील विद्यार्थ्यांना डीबीटीच्या माध्यमातून पैसे मिळाले नसणे तसेच शासनामध्ये आदिवासींची पदे अधिसंख्य ठरवून बोगस भरती करण्यात आली असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान** – चर्चा पुढे सुरू-

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(७) श्री. जयकुमार गोरे

(८) श्री. नाना पटोले

(९) श्री. सुनील प्रभू

(१०) श्री. देवेंद्र भुयार

(११) श्री. अनिल देशमुख

(१२) श्री. नितेश राणे

(१३) श्री. बळवंत वानखडे

(१४) डॉ.संजय रायमुलकर

(१५) डॉ.जितेंद्र आव्हाड (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

माननीय मुख्यमंत्री यांनी, "जुनी पेंशन योजना लागू करण्याकरिता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा सुरू असलेला संप शासनाने केलेल्या आवाहनाला संघटनांनी प्रतिसाद देऊन मागे घेतला असणे" इ. बाबत निवेदन केले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान – चर्चा पुढे सुरू-**

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –
डॉ.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी भाषण पूर्ण केले.

(१६) श्री. किशोर जोरगेवार

(१७) श्री. अशोक पवार

(१८) श्री. जयकुमार रावल

(१९) श्री. अमिन पटेल

(२०) श्री. प्रकाश सोळंके

(२१) श्री. अभिमन्यू पवार

(२२) श्रीमती सरोज अहिरे

(चर्चा अपूर्ण)

**६. (अ) पुरःस्थापनार्थ :-**

(१) उद्योग मंत्र्यांनी (उपमुख्यमंत्री यांच्यावतीने) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) उद्योग मंत्र्यांनी (उपमुख्यमंत्री यांच्यावतीने) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान – चर्चा पुढे सुरू -**

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

वने व मत्स्यव्यवसाय मंत्री, महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध विकास मंत्री, कृषी मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील महसूल व वन विभाग विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग या विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**माहितीचे मुद्दे - पुढे सुरू**

(२१) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, “ठाणे महापालिकेअंतर्गत विविध आरोग्य केंद्रात आणि रुग्णालयामध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांच्या कंत्राटी पद्धतीने ठेवून त्यांना वेतनवाढ मिळणे गरजेचे असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, “मुंबई शहरात पंतप्रधान आवास योजना, महाशासन आणि झोपडपट्टीधारकांनी भरावयाची रक्कम याबाबतचे धोरण सरकारने अद्यापपर्यंत न ठरवल्यामुळे अनेकजणांना स्वतःचे घर मिळण्यापासून वंचित राहावे लागणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) श्री. सदानंद सरवणकर, वि.स.स. यांनी, “सिद्धिविनायक मंदिरामध्ये श्री. बागेश्वर महाराज सिद्धिविनायकाचे दर्शन घेण्यासाठी आले असता सिद्धिविनायक मंदिराचे विश्वस्त श्री. संजय सावंत यांनी महाराजांच्या सुरक्षेसाठी मंदिरामध्ये कोणत्याही पोलिसांना प्रवेश दिला नसणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने सदर प्रकरणाची नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२४) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, “जत तालुक्यात मागील आठवड्यामध्ये तीन खून झाले असणे तसेच जत तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गांजाची विक्री केली जात असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. यांनी, “आमगाव नगरपरिषदेतील कर्मचारी आकृतीबंध आराखडा मंजूर न झाल्यामुळे तेथील सर्व कर्मचारी संपावर गेलेले असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, “सन्माननीय सदस्य श्री. सदानंद सरवणकर यांनी उपस्थित केलेला माहितीचा मुद्दा सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावा” इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून घेण्यात येईल व त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी, "तांत्रिक सेवांचा सुधारित अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती सन २०२५ पासून लागू करण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

ॲड. आशिष शेलार व इतर वि.स.स. यांनी, "मुंबई शहरातील विविध समस्या" इ.बाबत उपस्थित केलेल्या म.वि.स. नियम २९३ प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.-

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) प्रा. वर्षा गायकवाड
(२) श्री. योगेश सागर
(३) श्रीमती यामिनी जाधव
(४) श्री. अमिन पटेल
(५) श्री. कालीदास कोळंबकर
(६) श्रीमती मनिषा चौधरी
(७) श्री. झीशान सिद्दिकी
(८) श्री. अतुल भातखळकर
(९) डॉ. भारती लव्हेकर
(१०) श्री. मंगेश कुडाळकर
(११) श्री. अमित साटम
(१२) श्री. मिहिर कोटेचा
(१३) श्री. सुनील राणे (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**

अर्धा तास चर्चेने कामकाजाला सुरूवात करण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(अ) (१) श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी, "राज्यातील छोट्या शहरात आयटी केंद्र उभारणे" या विषयावरील श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२३ मधील प्रश्न क्रमांक ४३००५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

अर्धा तास चर्चा संपली आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २ पुढे ढकलण्यात येत असून आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक ३ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(ब) (३) श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले —

"जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथे मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाचे प्रशासकीय मुख्यालय असून भुसावळ रेल्वे जंक्शन हे भारतातील एक महत्त्वाचे जंक्शन असणे, त्यामुळे या शहरात रेल्वे विभागातील कर्मचारी मोठ्या प्रमाणात असणे, तसेच भुसावळ शहरालगतच्या परिसरामध्ये वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी, दीपनगर पावर जनरेशन, रेल्वेचे रेल्वे झोनल ट्रेनिंग स्कूल, लष्करी तळ असणे, तसेच एम.आय.डी.सी. भुसावळमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी भुसावळ शहरात स्थायिक असणे, त्यामुळे भुसावळ शहरात एकंदरीत कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात असणे, त्या अनुषंगाने भुसावळ शहराची लोकसंख्या व कर्मचारी संख्या विचारात घेता त्यांच्यासाठी सोयी-सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने भुसावळ शहराची हद्दवाढ होणे अत्यंत गरजेचे झाले असणे, हद्दवाढ होत नसल्याने सर्वसामान्य जनतेस आवश्यक सार्वजनिक सोयी-सुविधा पासून वंचित रहावे लागत असून त्याचा ताण भुसावळ शहरावर पडत असणे, भुसावळ ही जळगाव जिल्ह्यातील सर्वात मोठी 'अ' वर्ग नगरपरिषद असून, नगरपरिषदेची स्थापना सन १८८२ रोजी बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट, १८८२ अन्वये झाली असणे, हद्दवाढीच्या प्रस्तावामध्ये भुसावळ, सतारे, कंडारी, साकेगाव, खडके, मिरगव्हाण, खेडी या शिवारांचा भागशः क्षेत्रांचा समावेश केला असून, त्यामध्ये हद्दवाढीचे ६.९४ चौ. कि.मी. क्षेत्र मिळून अंदाजे २०.३२ चौ. कि.मी. क्षेत्र नगरपरिषदेच्या सुधारित हद्दीकरिता प्रस्तावित करण्यात येणे, भुसावळ शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार १,८७,७५० इतकी असणे, या प्रस्तावित लोकसंख्येस मूलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा, रस्ते, गटारे, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन इ. सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने नागरिकांचा रोष वाढत असणे, परिणामी त्याचा ताण नगरपरिषदेवर पडत असणे, नागरिकांना आरक्षणाच्या माध्यमातून बगीचा, दवाखाने, शाळा, कॉलेज, प्ले ग्राऊंड इ. सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच शहराचा सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीकोनातून हद्दवाढ तातडीने होणे गरजेचे असणे, त्याबाबतचे प्रस्ताव नगरपालिकेने नगरविकास विभागाला पाठविले असणे, परंतु अद्याप त्यावर कोणताच निर्णय न घेणे, त्यामुळे भुसावळ नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत शासनाने घ्यावयाचा निर्णय व करावयाची कार्यवाही."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, अनिल पाटील, कुमारी आदिती तटकरे, सर्वश्री. चेतन तुपे, विनोद निकोले, धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना —

डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"राज्यातील विविध शासकीय, अशासकीय आणि अनुदानित आणि विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दरवर्षी विविध व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश दिले जाणे, व्यावसायिक अभ्यासक्रम

जसे बीएस्सी ॲग्री, बी.ई., एम.बी.बी.एस. इत्यादीसाठी प्रवेश देत असतांना जात वैधता प्रमाणपत्र याची मागणी केली जाणे आणि नंतरच प्रवेश दिले जाणे, मात्र अव्यावसायिक अभ्यासक्रम जसे एम.एस्सी., एम.कॉम., एल.एल.एम., इत्यादीसाठी प्रवेश देत असतांना मात्र जात वैधता प्रमाणपत्र मागितले जात नसणे किंवा विचारात घेतले जात नसणे, फक्त जात प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जात असल्याने बोगस उमेदवार यांनी प्रवेश घेऊन खऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवार यांच्यावर अन्याय होणे, यामुळे खरे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता असणे, राज्यात विविध आदिवासी संघटना यांच्याकडून अव्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश देतांना जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य करावे अशी मागणी वेळोवेळी होणे, फक्त जात प्रमाणपत्रा आधारे बोगस आदिवासी उमेदवार यांनी जागा बळकावणे ही बाब गंभीर आणि चिंतनीय असून याबाबत त्वरेने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आपण आजच्या विशेष बैठकीतील लक्षवेधी सूचना क्रमांक १ चर्चेकरिता घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"सन २०१४ मध्ये कोकण व पश्चिम महाराष्ट्रास जोडणारा चिपळूण-कराड रेल्वे मार्ग होण्यास मान्यता देण्यात येणे, प्रकल्पाचा अर्धा खर्च राज्य सरकार करण्याचा निर्णय घेण्यात येणे, दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ रोजी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी भूमिपूजन करणे, कोकण रेल्वे व शापुर्जी पालनजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (एसपीसीपीएल) यांच्यादरम्यान हा सामंजस्य करार झालेला असणे, मात्र अद्याप प्रत्यक्षात काम सुरू न होणे, या सोबतच केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद न केल्याचे दिसून येणे, परिणामी कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील जनतेची घोर निराशा होणे, राज्याकडून या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गाकरिता राज्याच्या अर्थसंकल्पामधून निधीची तरतूद होण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले —

"नवी मुंबई तळोजा येथे मे. डावू केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड या उद्योगाने लॅटेक्स पॉलिमर केक अशास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास येणे, महाराष्ट्र

प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मे. डावू केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड, तळोजा यांना पर्यावरणाची हानी केल्याबाबत रु.२२०.५५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असणे, परंतू अद्याप दंड वसुलीला होत असलेली दिरंगाई, परिणामी स्थानकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून पर्यावरणाची हानी झाल्याने दंडाची रक्कम वसूल करणेबाबत करावयाची कार्यवाही व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

शालेय शिक्षण (मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

“भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली परंतु आजही आदिवासी समाजातील आदिम जनजाती (कातकरी) समाज हा सोयी सुविधांपासून वंचित राहिला असणे, तसेच शासन स्तरावर या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याकरिता अनेक योजना राबविल्या जाणे, परंतु सदरच्या योजना या फक्त कागदावरच राहतात प्रत्यक्षात आदिम कातकरी समाजाला त्याचा कोणताही लाभ मिळत नसल्याचे दिसून येणे, तसेच, हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संबधित समाजाने दिनांक १२ जानेवारी, २०२१ वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनामार्फत मागणी करणे, म्हणजेच आदिम कातकरी समाजाला त्यांच्या घरासाठी त्या त्या गावातील गायरान हक्काची जागा मिळावी तसेच प्रत्येकाला पंतप्रधान आवास योजना किंवा शबरी आवास योजना घरकूल मिळावे, तसेच ज्या धरणात मच्छीमारी करतात त्याच धरणाचा ठेका या आदिम कातकरी समाजाला कमी रकमेत मिळावा, शेळीपालन, कुक्कुट पालन, वीटभट्टी अशा स्वरूपाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, त्याबरोबरच आरोग्याच्या मोठ्या प्रमाणावर समस्या आहेत त्यामुळे त्यांना आयुष्यमान भारत अंतर्गत आरोग्य योजनेचे कार्ड काढून मिळावे, आणि आदिम कातकरी समाज हा शिक्षणापासून वंचित असून त्यांना साक्षर करण्यासाठी त्या त्या वस्तीत बालवाडी चालू कराव्यात, तसेच बऱ्याच महिला विधवा, अपंग, परीव्यक्ता आहेत त्यांना देखील कागदपत्रे नसल्यामुळे याचा लाभ घेता येत नाही, तरी त्यांना याचा लाभ मिळावा आणि या समाजाला सर्व प्रकारची कागदपत्रे मिळावी उदा. आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदानकार्ड, जातीचा दाखला तसेच अनेकांचे जन्माचे दाखले व विवाह नोंदीचे दाखले नोंदणी करून मिळावेत, तसेच दारिद्र्यरेषेखालील रेशनकार्ड मिळावे जेणेकरून त्यांना दारिद्र्यरेषेखालील सरकारी योजनेचा लाभ घेता येईल याबाबत जनजाती कल्याण आश्रम नाशिक संचलित पुणे जिल्हा यांनी व विविध संघटनांनी आदिवासी समाजाचा हक्कासाठी वेळोवेळी शासनास पत्रव्यवहार करणे व शासनाने कोणतीही दखल न घेणे, व या समाजाचे सर्वेक्षण अद्याप न होणे, तसेच मा. आदिवासी विभाग मंत्रालयाने यासंदर्भात अद्याप एकही आढावा बैठक न घेणे, त्यानंतर संबंधित संघटनेने राष्ट्रीय जनजाती आयोग नवी दिल्ली यांना तक्रार करणे, आणि त्यानंतर पुणे जिल्ह्यात मुळशी हवेली प्रांत यांनी दखल घेणे, त्यानंतर दिनांक ३०/११/२०२२ ला आदिवासी कातकरी समाजाचा जातीचा दाखला, आधार कार्ड आदी संदर्भात कॅम्प घेण्यात येणे, मात्र अद्याप एका व्यक्तीला

सुद्धा जातीचे दाखले न मिळणे, तसेच मुळशी खडकवासला हवेली प्रांत श्री.संजय आसवले आणि मुळशी तहसीलदार श्री. अभय चव्हाण यांच्याकडे संबंधित समाजाचे लोक दाखल्याबाबत विचारणा केल्यावर उडवाउडवीची उत्तरे देणे आणि दिवस दिवसभर कार्यालयात बसवून ठेवणे, अर्वाच्य भाषेत संवाद साधणे, याबाबत वेळोवेळी शासनास तक्रार करूनही अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच याबाबत पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, पालघर या जिल्ह्यात प्रामुख्याने अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे असे प्रखरतेने आढळून येणे, यामुळे आदिम जनजाती (कातकरी) समाज हा शासनाच्या सोयी सुविधांपासून अद्याप वंचित राहिलेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) श्री.संतोष दानवे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले –**

“राज्यातील जालना जिल्ह्यासह भोकरदन व जाफराबाद तालुक्यासह संपूर्ण राज्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला नसेल अशा शेतकऱ्यांच्या नावावर पीकविमा भरण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी संबंधित शेतकऱ्यांच्या खोट्या सह्या करून बनावट भाडेपट्टा तयार करीत शेतकऱ्यांच्या नावावर येणारी पीकविम्याची रक्कम स्वतःच्या बँक खात्यावर वळती करून शेतकरी बांधवांना लाखों रुपयांचा गंडा घालणारी टोळी (रॅकेट) उघडकीस येणे, शेतकऱ्यांच्या हक्काचे पीकविमा अनुदान विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी व गावोगावी सक्रिय झालेल्या दलालांशी संगनमत करून लाखों रुपयांचा भ्रष्टाचार करणारी टोळी राज्यात काम करीत असून संबंधित टोळीचा पर्दापाश करून शेतकऱ्यांचे होणारे लाखों रुपयांचे नुकसान टाळण्यासाठी शासनामार्फत कारवाई करण्याची आवश्यकता, सदर टोळीची चौकशी करून संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी विभागातील जनप्रतिनिधी, जागरूक नागरिक यांनी मा.कृषी मंत्री, पीकविमा समितीचे जिल्हाध्यक्ष, जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास केली असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरू होईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक विशेष बैठक सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय ॲड.राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

आज मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून "अवकाळी पावसाने केलेल्या नुकसानाचे पंचनामे करणे" या विषयाबाबत सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांच्याकडून म.वि.स. नियम ९७ अन्वये प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेवरील विषयाशी निगडीत नसल्यामुळे तसेच सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेली सूचना म.वि.स. नियम ९७ अन्वयेच्या निकषात बसत नसल्यामुळे माननीय अध्यक्षांनी सदरहू सूचनेस अनुमती नाकारीत असल्याचे सांगितले.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तारांकित चार प्रश्न उत्तरित झाले.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चौतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(१) श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. शाह फारुख अन्वर हे गृह खात्याशी संबंधित प्रश्नांसाठी विधान भवनच्या पायऱ्यांवर उपोषणास बसले असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.
उक्त मुद्यासंदर्भात श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

(२) श्री. सुनील केदार, वि.स.स. यांनी, "शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणेच संत्रा उत्पादक शेतकऱ्यांबाबत देखील मदत करण्याची भूमिका घेण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भातील माहितीची गंभीरतेने नोंद घेण्यात आली असून त्यासंदर्भात निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी, "नाशिक जिल्ह्यातील वनांवर अनेक भू-माफिया अतिक्रमण करीत असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, 'वस्त्रोद्योग आयुक्त व इतर महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची कार्यालये दिल्ली येथे हलविणे जाणार असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. अजित पवार, वि.स.स. यांनी, "राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध सामन्यांमध्ये अत्युत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या राज्यातील अनेक खेळाडूंना जाहीर झालेली बक्षीसे देऊन त्यांचा सत्कार करण्याचा प्रलंबित समारंभ विनाविलंब घेण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर कार्यक्रम तात्काळ घेण्यात येईल असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(६) श्री.धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी, "हरभरा खरेदी केंद्राच्या प्रलंबित प्रस्तावांना नाफेडशी चर्चा करून तात्काळ परवानगी देण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.

(७) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. यांनी, “जेऊर, ता. अहमदनगर येथील महिला श्रीमती भाग्यश्री मोकाटे हिच्यावर “मोक्का कायदा” लावणे, एम.पी.एस.सी.साठी महिलांच्या शारीरिक तपासणीचे निकष वाढविण्यात येणे तसेच शेतकऱ्यांचा कापूस आणि हरभरा अजूनही त्यांच्या घरातच पडलेला असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.

(८) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी, “महाराष्ट्रात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंतीनिमित्त अनेक आंबेडकरी अनुयायींना शुक्रवार दिनांक १४, शनिवार, दिनांक १५ आणि रविवार, दिनांक १६ एप्रिल, २०२३ या तीन दिवस रात्रौ १२.०० वाजेपर्यंत सामाजिक आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी देण्यात यावी” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री.अबु आजमी, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे उक्त माहितीच्या मुद्यातील हिंदी मजकूर प्रलंबित आहे.)

**२.** (१) उद्योगमंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) खनिकर्म मंत्र्यांनी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे, नांदेड, जळगांव, नंदुरबार, जालना, पालघर, गडचिरोली, हिंगोली, परभणी, वाशिम, औरंगाबाद या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ व जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) कामगार मंत्र्यांनी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचे सन २०१४-२०१५ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ६ सूचना प्राप्त झाल्या आहेत. परंतु आज सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा दिवस) असल्यामुळे म.वि.स. नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत. अतः या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारीत आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी, “श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य यांनी बंदरे व खनिकर्म मंत्र्यांच्या विरोधात ट्विट करणे” इ. बाबत म.वि.स. नियम ४८ अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरण केले.

**३. (अ) पुरःस्थापनार्थ –**

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे –**

(१) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखेडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव आणि सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा सातवा प्रस्ताव आहे. त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

विधानपरिषदेकडून आलेला संदेश प्रधान सचिव वाचून दाखवतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले –

प्रधान सचिवांनी विधान परिषदेकडून आलेला पुढील संदेश वाचून दाखविला –

"महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानसभेच्या माहितीसाठी पाठविला आहे, "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग,

व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम १४९ अन्वये महाराष्ट्र विधानपरिषदेत मागे घेण्यात आले आहे."

श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "श्री.दादाजी भुसे, बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी श्री. शरद पवार यांचा केलेला एकेरी उल्लेख" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

या मुद्यासंदर्भात बंदरे व खनिकर्म मंत्री व गृह राज्यमंत्री यांनी खुलासा केला.
उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

यासंदर्भातील सर्व रेकॉर्ड तपासण्यात येईल. मंत्री महोदयांनी कोणत्याही नेत्यांचा एकेरी उल्लेख केला असेल तर ते आज दिवसभराचे कामकाम संपण्यापूर्वी रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक ३ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**(३) श्री. जयकुमार गोरे, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

**श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"मायणी, ता. खटाव, जि. सातारा येथील रूरल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सेंटर व हॉस्पिटल, मायणी या मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर बोगस कागदपत्रे तयार केली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, सदर मेडिकल ॲडमिशन होत असताना संस्था चालकांनी बारावी पासचे सर्टीफिकेट, मायग्रेशन सर्टीफिकेट, तसेच शाळेचे दाखले बोगस तयार करून विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देऊन प्रक्रिया राबविली असणे, विद्यार्थ्यांना कमी मार्क असताना मेरिटमध्ये येण्यासाठी सर्व बोगस कागदपत्रे तयार करून ती शासनास सादर करून मायणी येथील रूरल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सेंटर हॉस्पिटल येथे ॲडमिशन प्रक्रिया केली असून तेथे बोगस डॉक्टर तयार केले असे निदर्शनास आले असणे, यामध्ये तत्कालीन संस्था चालकांनी संगनमताने हे कृत्य केले असल्याचे निदर्शनास आले असणे, यासंदर्भात दिनांक १८ मे, २०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे तक्रार दाखल केली असून त्यासंदर्भात अद्याप कोणतीही चौकशी केली नसणे, गुन्हा दाखल झालेला असताना तपास अधिकारी यांनी सूत्रधारांना अभय दिलेला असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात मोठा असंतोष पसरलेला असणे, असेच जाळे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी चालू असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या मनात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून गुन्हेगारावर कार्यवाहीची आवश्यकता व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमनासंदर्भात सोयी सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादी आवश्यक त्या सोयी-सुविधांचा समावेश असणे, राज्यातील अव्वल वीजनिर्मिती केंद्रापैकी एकलहरे हा विद्युत प्रकल्प असणे, तसेच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प यापूर्वीच मंजूर केलेला असणे, तथापि, शासकीय अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे हा मंजूर झालेला प्रकल्प रखडलेला असणे, वास्तविक सदर औष्णिक विद्युत प्रकल्प बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला नसणे, असे तत्कालीन मा. ऊर्जा मंत्री यांचेकडून माहे जानेवारी, २०२२ मध्ये सांगण्यात येणे, एकलहरे येथील नवीन प्रकल्प सुरू झाल्यास हजारो कामगार व व्यावसायिकांना रोजीरोटी व व्यवसाय उपलब्ध होणार असल्याचे निदर्शनास येणे, तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरचा मंजूर झालेला नवीन प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत आग्रही मागणी करण्यात येणे, तथापि, आजतागायत शासनाने प्रकल्प सुरू करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी त्या परिसरातील तरुणवर्गामध्ये तसेच व्यावसायिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(११) सर्वश्री बाळासाहेब थोरात, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अशोकराव चव्हाण, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री बळवंत वानखडे, नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. सुरेश वरपुडकर, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री लहू कानडे, संजय जगताप, संग्राम थोपटे, शिरीष चौधरी, कुमारी प्रणिती सुशीलकुमार शिंदे, डॉ.विश्वजित कदम, श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

श्री.बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या अधिनियमातील द.म. सुकथनकर साहेब यांच्या अध्यक्षतेखालील समिती काळातील १९९४ ते २२/८/२००४ अखेरपर्यंत एकूण १६८७ कर्मचारी संस्थानामध्ये काम करीत असून सन २००० पासून शिर्डी संस्थानामध्ये कार्यरत असलेल्या ५९८ कर्मचारी संस्थानामध्ये काम करीत असून सन २००० पासून शिर्डी संस्थानामध्ये कार्यरत असलेल्या ५९८ कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करीत असणे, या पगारावर घरखर्च तसेच मुलांचे शिक्षण करणेही जिकरीचे झाले असणे, गेल्या २० वर्षांपासून हे कामगार अन्याय सोसत असून त्यातील काही रिकाम्या सेवानिवृत्तही झाले असणे, कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या ५९८ कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमातील कलम १६ अन्वयेच्या

तरतुदीनुसार शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार कायमस्वरुपी स्थायी कर्मचारी घेण्याबाबत कर्मचाऱ्यांकडून मागणी होत असून यापूर्वी कायम केलेल्या १०५२ कामगारांचे निकष लावून श्री. साईबाबा संस्थान आस्थापनेवर वा ५९८ कामगारांपैकी जे पात्र आहेत त्यांना श्री. साईबाबा संस्थान आस्थापनेवर कायमस्वरूपी स्थायी कर्मचारी म्हणून कायम करण्याबाबत मागणी होत असून अद्यापही याबाबत कार्यवाही करण्यात न आल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात यावी, तसेच मंजूर आकृतीबंधाप्रमाणे माहे ऑगस्ट, २००९ पूर्वलक्षी प्रभावाने वेतनाचा फरक देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. भिमराव तापकीर, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

**श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –**

“पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे वाढत असणे, अतिक्रमणांचे पुनर्सर्वेक्षण होण्याची आवश्यकता, पाटबंधारे विभागाकडे अतिक्रमणांची अद्ययावत माहिती उपलब्ध नसणे, जलसंपदा विभागाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राबाहेरील पाटबंधारे विभागाच्या जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे कोट्यवधी रुपयांचे चलने भरून तसा वारंवार पाठपुरावा करून देखील मोजणी प्रक्रिया सुरू झालेली नसणे, मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणक्षेत्रातील जमिनींवरील अतिक्रमणांना पाठबळ मिळत असणे, जमिनीच्या मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणाच्या पाणलोटक्षेत्रात जलसंपदा विभागाची नेमकी कोठे व किती जमीन आहे याची माहिती मिळत नसल्याने जलसंपदा विभागाच्या बहुतांश जमिनीवर, ओढ्या-नाल्यावर खाजगी व्यावसायिक स्वरूपाची अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास येत असणे, आजमितीस बहुतांश पूररेषा आणि पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे, बांधकामे झाली असणे, तसेच खडकवासला धरणाचे जलप्रदूषणात देखील वाढ झाली असून धरण व पाणलोटक्षेत्र व परिसरात कंपन्या, रेस्टॉरंट, रिसोर्ट व इतर व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांमध्ये पूर्ण क्षमतेने सीवेज ट्रिटमेंट प्लांट व तदनुषंगिक आवश्यक असणाऱ्या उपाययोजना न केल्याने राजरोसपणे सांडपाणी आणि कचरा व राडारोडा मिसळला जात असणे, धरणाचे जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापनाकरिता कृती आराखडा करण्यात आला नसल्याने जलप्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होणे, दूषित पाण्यामुळे त्यावर अवलंबून असलेले नागरिक व वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, धरणाच्या व धरणाकडे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर झाला असणे, धरणाची हद्द संरक्षित नसल्यामुळे जलप्रवाह आणि पाणलोटक्षेत्रात व कॅनॉलमध्ये बुडून अनेकांचा बळी गेला असणे, खडकवासला धरण हे सुरक्षित नसून धरणाच्या

सुरक्षेकडे दुर्लक्ष करत जलसंपदा विभाग पुणेकरांच्या जीवाशी खेळत असणे, सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक, माहिती फलक, संरक्षण जाळी, संरक्षण भिंतीसारख्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येत असणे, जलसंपदा विभागाचा लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय नसणे याकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री.दादाराव केचे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"आर्वी विधानसभा मतदारसंघातील मौजा थार, चामला, बांबर्डा, बोरखेडी, बोटोणा, पारडी, एकांबा, किन्ही मोई, मुबारकपुर ही गावे पहाडी व डोंगराळ भागात बसलेली असणे, त्या ठिकाणी पर्जन्यमान हे अत्यंत कमी असणे, त्यामुळे या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची व शेतीकरिता सिंचनाचा अत्यंत तुटवडा जाणवत असणे, सदर गावे ही दुष्काळग्रस्त असून त्या गावातील जनतेचा उदरनिर्वाह हा शेतीचे उत्पन्नावर अवलंबून असणे, तसेच गावातील शेतकरी शेतीसोबत जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करणे, परंतु पाण्याच्या तुटवड्यामुळे त्यांना जनावरांचे स्थलांतर बाहेर गावी करावे लागणे, त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थितीचा सुद्धा सामना करावा लागणे, बारमाही पाणी साठवणुकीकरिता कुठलीही व्यवस्था नसल्यामुळे दरवर्षी पाण्याचा दुष्काळ पडत असणे, त्या गावात जानेवारी महिन्यानंतर पिण्याकरिता पाणी उपलब्ध राहत नसणे, करिता या भागातील शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी व सिंचनाची सोय होण्याच्या दृष्टीने जाम नदीवर नवनिर्मित मध्यम सिंचन प्रकल्प मंजूर करण्याकरिता जनतेचे मागणी तात्काळ मंजूर करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७) ॲड. अशोक पवार, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –**

**ॲड.अशोक पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –**

"पुणे जिल्ह्यातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाच्या अभावी आवर्तनाच्या वेळी लाखो लिटर पाणी वाया जाणे, चासकमान कॅनोलमध्ये दगड माती पडून कॅनोलची रुंदी व खोली कमी होणे तसेच झाडाझुडपांनी अनेकांच्या पोटचाऱ्या गाडून टाकणे, सदरचा कालवा हा रोजगार हमी योजनेतून झाला असल्याने प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण होणे गरजेचा असणे, कॅनोलमधील पाणी गळतीचे प्रमाण ४५ ते ४७ टक्के होत असून कालव्याच्या मुखातून सद्यःस्थितीत ५५० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून टेल भागात अंदाजे ७० ते ९० क्युसेकने

(पावसाळ्या व्यतिरिक्त) पाणी मिळणे, यामुळे हेड व टेल या दोन्ही भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, टेलच्या भागापर्यंत पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यासाठी व कॅनोलची गळती रोखण्यासाठी तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी, जलसेतू अस्तरीकरणासाठी, चाऱ्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-**

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असणे, महानगरपालिकेतील मुळ क्षेत्रासह २७ गावांमध्ये लोढा, रुणवाल, रिजन्सी, पॅराडाईज सारखे शेकडो एकरांमध्ये सुरू असलेले मोठमोठे गृहप्रकल्प, म्हाडाच्या माध्यमातूनही अनेक बांधकामे सुरू असणे, या प्रकल्पाच्या माध्यमातून लाखो घरांची सुरु असलेली निर्मिती, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, मुळ महानगरपालिका क्षेत्रासह विस्तार झालेला असणे, निवासी विभाग औद्योगिक विभागासह मनपा क्षेत्रातील सर्व निवासी विभाग एम.आय.डी.सी. च्या बारवी डॅमवर अवलंबून असून पुरेसा पाणी कोटा व पुरवठा होत नसल्यामुळे सध्या २७ गावांसह संपूर्ण मनपा क्षेत्रात होत असलेली पाणी टंचाई, बारवी व्यतिरिक्त पाणी पुरवठ्यासाठी कोणताही इतर प्रकल्प सध्या सुरू नसल्याने भविष्यात पाण्याची परिस्थिती अधिकच बिकट होण्याची शक्यता, त्यामुळे कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करून उल्हास नदीच्या खोऱ्यामध्ये होणाऱ्या जलसाठ्यावर पाणी आरक्षण मिळावे व वाढीव कोटा मिळावा यासाठी सुरू असलेले प्रयत्न, याबाबत वारंवार बैठका घेऊनही निर्णय घेतला जात नसणे, कडोंमपा मधील नागरिकांचे पाणी टंचाईमुळे होत असलेले हाल पाहता या प्रकरणी तातडीने लक्ष घालून कल्याण-डोंबिवली साठी आवश्यक असलेला पाणी कोटा वाढवून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(९) ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-**

"राज्याच्या अर्थसंकल्पात प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजनेतून मोठा निधी पायाभूत सुविधेवर खर्च होणे, प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजनेत वाढ होणे व त्यातून सामूहिक विकासाची व कायमस्वरूपी मालमत्ता

निर्माण करणाऱ्या योजना राबविण्यात येणे, परंतु उपरोक्त विकास कामे घेताना रोजगार निर्मितीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, एकूण विकास कामे करताना दरडोई उत्पन्न वाढविणाऱ्या योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यात शासनाचे झालेले दुर्लक्ष, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून ही मोठ्या योजना अंमलात आणताना साधारणतः १२.५० टक्के व ९.६ टक्के निधी खर्च होणे, परंतु त्यातूनही मोठा निधी फक्त पायाभूत सुविधेवरच खर्च होणे, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्र्यात जीवन जगत असलेल्या कुटुंबीयांच्या जीवनात उत्थान करण्याच्या शासनाच्या उद्देशाची पूर्तता होण्यास विलंब होणे, राज्यात राहणाऱ्या लोकांची रोजगार निर्मिती व उत्पन्नवाढ याकडे शासनाने प्राधान्य देण्याची गरज, मागील ७५ वर्षात राज्यात मोठी पायाभूत सुविधा निर्माण झाली असतानाही आता पुन्हा बहुतांश निधी हा नागरिकांच्या गरजेनुसार न होता शासनाच्या प्रचलित योजनेवरच खर्च होत असल्याने याबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता, राज्याच्या मनुष्यबळाचा विचार करून त्या मनुष्यबळाचा वापर होण्याच्या दृष्टीने व राज्याची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने राज्यात लागणारे सर्व वस्तूंचे उत्पादन राज्यातच होण्याच्या दृष्टीने व राज्याला आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याची आवश्यकता, याकडे नियोजन विभागाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने पायाभूत सुविधेसोबत रोजगार निर्माण करण्याच्या योजनेसाठीही ठरावीक निधी खर्च करण्याची आवश्यकता, याकडे शासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारांची संख्या वाढत असल्याने उद्भवणाऱ्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने विचार करून नियोजन करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मुंबईतील धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असणे, विभिन्न जाती आणि धर्मांचे गरीब व मध्यमवर्गीय परिवार धारावीत गेली कित्येक दशकं एकजुटीने राहत असणे, या ठिकाणी अनेक लघु व मध्यम उद्योगधंदे कार्यरत असणे, या सर्वांमुळे धारावीची एक वेगळी ओळख निर्माण होणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प असणे, ६०,००० पेक्षा अधिक परिवारांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या प्रकल्पावर अवलंबून असणे, २०१८ मध्ये संपन्न झालेल्या निविदा प्रक्रियेला बाजूला सारून शासनाने नव्याने धारावी पुनर्विकास निविदा काढणे, नव्याने बोलावलेल्या प्रक्रियेत पात्रता निकष आणि कामाच्या अनुभवाच्या अटी व शर्तींमध्ये मोठे बदल होणे, त्या विरोधात मा. उच्च न्यायालयात मागील निविदा लागलेले लोक दाद मागणे, हिंडनबर्गच्या (Hindenburg) अहवालामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेल्या अदानी समूह नवीन निविदा प्रक्रिया जिंकणे, सद्यःस्थितीत अदानी समूहाला बाजारातून पतपुरवठा उपलब्ध करणे कठीण असणे, या पार्श्वभूमीवर धारावी पुनर्वसन प्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे स्थानिकांत प्रकल्पाविषयी चिंता, असंतोष आणि भीतीचे वातावरण निर्माण होणे, सद्यःस्थितीत अदानी समूहावर होत असलेले आरोप आणि त्यांची अस्थिर आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना कामाचे आदेश (Work Order) न देणे आणि

निविदेचे पुनर्विलोकन करण्याची तातडीची गरज असणे, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलेले असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने लक्ष घालून पुनर्विकास निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबवण्यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"बोदवड तालुक्यातील (जि. जळगांव) जलचक्र खुर्द येथील २८/२ मध्ये मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर धारकाने सन २०१७ ते माहे डिसेंबर, २०१९ दरम्यान सदरील जमिनीतून लाखो ब्रास उत्खनन करून अवैध विक्री करणे, वास्तविक पाहता जलचक्र खुर्द येथील २८/२ ही वर्ग २ ची जमीन असून शेती प्रयोजनार्थ वापर करणे बंधनकारक असतांना त्या जमिनीचा वाणिज्य वापर करण्यात येणे, तसेच सदरील प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी करून केवळ ४२९४.२१ ब्रासच्या उत्खन्नांवर दंड आकारण्यात येऊन संबंधित क्रशर धारकांला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणे, त्याचबरोबर स्टोनक्रशर धारकांवर गौण खनिज चोरी प्रकरणी दंडात्मक कारवाई अपेक्षित असतांना प्रांत व बोदवड तहसीलदार यांची फक्त स्वामित्वधन फरकाची रक्कम वसूल करणे, प्रशासनातील अधिकारी सदर क्रशर अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करून शासनाच्या करोडोचा महसूल बुडवित असल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून संबधित क्रशर धारकांकडून दंडाची रक्कम वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१२) सर्वश्री अमीन पटेल, अस्लम शेख, सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.) मागील अंदाजे १२ ते १५ वर्षांपासून अस्थायी म्हणून काम करीत असणे, दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवेला सलग दोन वर्षे झालेली असणे, या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोविड काळात देखील आपल्या जिवाची पर्वा न करता फ्रंटलाईन वर्क केलेले असणे, त्यांच्या सरळ सेवेमधील समावेशाचा प्रस्ताव सचिव कार्यालय, वैद्यकीय शिक्षण विभाग येथे प्रलंबित असणे, महाराष्ट्रातील लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मॅट कोर्ट, छत्रपती संभाजीनगर

येथे सदरील विषयावर अपील केलेले असणे, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी मॅट कोर्टाने सदरील वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करून घेण्याचे आदेश दिलेले असणे, सचिव कार्यालयातील प्रलंबित प्रस्तावामध्ये ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासन सेवेमध्ये दोन वर्षापेक्षा अधिक कार्यकाळ काम केलेले असणे, अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सरळ वैद्यकीय सेवेत समावेश करण्यात यावे असे नमूद असणे, वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये या पूर्वीही ज्या सहाय्यक प्राध्यापक डॉक्टरांनी २ वर्षापेक्षा अधिक काम केलेले आहे त्यांचे सलग चार वेळा समावेश केले आहे, निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आजमितीपर्यंत एकदाही समावेश करण्यात आलेला नसणे, महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मॅट कोर्ट, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्णयानुसार समावेश करण्यात यावे अशी निवासी वैद्यकीय अधिकारी यांची मागणी असणे, परंतु अद्यापही या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सरळसेवेत समावेश करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**४. सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान - (पाचवा दिवस)**

आता नगरविकास विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ४७ ते ५२, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागण्या अनुक्रमांक १०३ ते १०९, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २२३ ते २२६ आणि कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग या विभागांच्या मागण्या अनुक्रमांक २४५ व २४६ चर्चेला घेण्यात येतील तसेच या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले व सदर चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आले आहेत. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून चर्चेला सुरुवात करण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(चर्चा अपूर्ण)

(१०) श्री.बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांनी, "कोयनानगर येथे कोयना नदीवर धरण बांधून ६२ वर्षे पूर्ण होऊन देखील तेथील विस्थापितांचे प्रश्न प्रलंबित असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी, असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान –** (पुढे सुरू)

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. रोहित पवार

(चर्चा अपूर्ण)

(११) श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी, "माझ्या मतदारसंघामध्ये दोन गटात झालेल्या हाणामारीमध्ये श्री. आशिष नायर या व्यक्तीवर प्राणघातक हल्ला करण्यात येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर प्रकरणाची शासनाने दखल घ्यावी असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१२) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी, "जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवर दुर्गानगर मागील सारीपूत नगर येथे मॉडर्न बेकरी ते दुर्गा नगरपर्यंत आरेच्या जागेमध्ये अनेक अनधिकृत बांधकामे सुरू असणे तसेच त्याठिकाणी असलेली उच्च दाब विद्युत वाहिनी तुटून अनेकांची जीवितहानी होण्याची शक्यता" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने दखल घ्यावी, असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.
याची दखल घेण्यात येईल असे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी सांगितले.

(१३) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, "राज्यामध्ये कोरोना रूग्णसंख्येत वाढ होत असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "मुंबईमध्ये गुढीपाडव्याच्या निमित्ताने रॅली निघत असतात त्यामुळे धारावी येथील रस्ते चांगले करण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान –** (पुढे सुरू)

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.
चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(२) श्री. अतुल भातखळकर
(३) श्री. रविंद्र धंगेकर
(४) श्री. ज्ञानराज चौगुले
(५) श्री. कैलास पाटील

(चर्चा अपूर्ण)

(१५) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "पुणे येथे कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या विदर्भातील इंजिनिअर झालेल्या मुलींचे आत्महत्त्या करण्याचे प्रमाण गेल्या वर्षामध्ये वाढलेले असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित केला असून सरकारने यावर निवेदन करावे असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान –** (पुढे सुरू)

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(६) श्री.रईस शेख
(७) श्री.शेखर निकम
(८) कॅप्ट.आर.तमिल सेल्वन
(९) श्री. सुनील केदार
(१०) श्री.रमेश कोरगावकर
(११) श्री.देवेंद्र भुयार
(१२) श्रीमती मंदा म्हात्रे
(१३) श्री.विकास ठाकरे
(१४) श्री.संजय रायमुलकर
(१५) श्री.प्रकाश आवाडे
(१६) कु. आदिती तटकरे
(१७) श्री.जयकुमार रावल
(१८) श्रीमती सुलभा खोडके
(१९) श्री.रविंद्र वायकर
(२०) श्री.गणेश नाईक
(२१) श्री.छगन भुजबळ
(२२) श्रीमती. यामिनी जाधव
(२३) श्री.सहसराम कोरोटे
(२४) श्री.कैलास गोरंट्याल
(२५) श्री.अशोक पवार
(२६) प्रा.वर्षा गायकवाड
(२७) श्रीमती श्वेता महाले
(२८) डॉ.देवराव होळी
(२९) श्री.विश्वनाथ भोईर
(३०) श्री.जितेश अंतापुरकर
(३१) श्री.विक्रमसिंह सावंत
(३२) श्री.राजू पारवे
(३३) श्री.कुणाल पाटील
(३४) श्री.लहू कानडे
(३५) सुनील राणे

अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, वस्त्रोद्योग मंत्री, उद्योग मंत्र्यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

याबद्दलचे उत्तर मंत्रिमहोदय पुढील अधिवेशनात देतील तसेच आता नगरविकास विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ४७ ते ५२, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागण्या अनुक्रमांक १०३ ते १०९, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २२३ ते २२६ आणि कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग या विभागांच्या मागण्या अनुक्रमांक २४५ व २४६ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**५.** सर्वश्री अजित पवार व इतर वि.स.स. यांचा, "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांमधील विविध समस्या" इ.बाबतचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

| | |
|---|---|
| (१) श्री.जयंत पाटील | (२) श्री.सुनील राणे |
| (३) श्री.रविंद्र वायकर | (४) श्री.रईस शेख |
| (५) श्री.प्रशांत ठाकूर | (६) श्री.जितेंद्र आव्हाड (भाषण अपूर्ण) |

(चर्चा अपूर्ण)

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३**

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सोळा प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, ' स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याविरुद्ध कॉंग्रेस पक्षाचे तथाकथित नेते श्री. राहुल गांधी यांनी वारंवार अपशब्द वापरणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सभागृहात गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे माननीय अध्यक्षांनी सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०७ मिनिटांनी १० मिनिटांकरिता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे माननीय अध्यक्षांनी सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १९ मिनिटांनी अर्ध्या तासाकरिता स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ४९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

दोन : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १४० ते १५१ सभागृहाच्या पटलावर ठेवणे-

प्रधान सचिवांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १४० ते १५१ सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**३.** उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, 'मुंबई येथील के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स ॲन्ड कॉमर्स महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राध्यापकाने केलेली मारहाण ' या विषयावरील श्री.अजित पवार व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ५६७८४ ला दिनांक ०२ मार्च, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळेस दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**४.** (१) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी, (क) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ या कायद्याच्या अंमलबजावणीविषयक सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल आणि (ख) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९-२०२० वसन२०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा सभागृहासमोर ठेवला.

(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, (क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड यांचे सन २०१२-२०१३ ते २०१५-२०१६ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल आणि (ख) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१९-२०२० ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(४) आदिवासी विकास मंत्र्यांनी, "शहरीकरणाने व्यापलेल्या ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघामध्ये २७ आदिवासी पाडे असून कधी वनखात्याची अडचण तर कधी शासकीय अधिकाऱ्यांची अनास्था असल्यामुळे ह्या आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, पाणी पुरवठा, शौचालय, वीज पुरवठा इ. अनेक कामे न होणेबाबत" या विषयावरील श्री.प्रताप सरनाईक व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी उत्तरित झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळेस दिलेल्या आश्वासना नुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

(५) महिला व बालविकास मंत्र्यांनी, (क)महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल आणि (ख) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१) श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेता यांनी, 'उपमुख्यमंत्र्यांनी सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पात सर्व महिलांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस प्रवास भाड्यामध्ये ५० टक्के सवलत देण्याबाबतचा निर्णय घेणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेता यांनी, 'शासनाची नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर देण्याचा निर्णय घेणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेता यांनी, 'मुंबईमध्ये कोविड आणि एच३एन३ रुग्णांची संख्या वाढत असल्याने राज्य शासनाने याबाबत गांभीर्याने विचार करून जनतेला दिलासा देणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू ३ मुद्यांची नोंद घेण्यात आली असून पहिल्या मुद्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. तसेच दुसऱ्या मुद्यासंदर्भात शासनाने निधी राखून ठेवलेला असून तिसऱ्या मुद्याबाबत सविस्तर निवेदन करण्यात येईल, असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**५.** (१) श्री. श्यामसुंदर शिंदे, वि.स.स.यांनीपुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"नांदेड जिल्ह्यातील शंकररावजी चव्हाण विष्णूपुरी प्रकल्प सन १९८९ साली पूर्ण झालेला असणे, सदर प्रकल्पाचे सुधारित लाभक्षेत्र २८,३४० हेक्टर असणे, त्यापैकी लोहा तालुक्यात १५,९२७ हेक्टर व कंधार तालुक्यात

२१०० हेक्टर लाभक्षेत्र असणे, शंकररावजी चव्हाण विष्णूपुरी प्रकल्प उपसा सिंचन प्रकल्प असून ३२ वर्षांपासून कार्यान्वित असणे, प्रकल्प पंपग्रहात ८५० अश्वशक्तीचे १४ पंप असणे, सदर पंपांचे आयुर्मान १५ वर्षे असणे, परंतु प्रत्यक्षात मूळ आयुर्मानापेक्षा सदर पंपांना १७ वर्षे जास्त कालावधी झालेला असणे, तसेच प्रकल्पासाठी ३८७० मीटर लांबीची उद्धरण नलिका असून त्याचे आयुर्मान संपलेले असणे, त्यामुळे पंपाची उद्धरण नलिकेचे मोठ्या प्रमाणात झीज झालेली असून पंप बंद पडणे, उद्धरण नलिकेचे फुटणे हे प्रकार घडत असल्यामुळे पूर्ण क्षमतेने विसर्ग मिळत नसणे, सद्यःस्थितीत ६ पंप चालू असून एकूण विसर्गाच्या ३० % विसर्ग मिळत असणे, जलसंपदा खात्याकडून १४ पंप व उद्धरण नलिका नव्याने बसविण्याकरता राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असणे, सदर काम लवकर पूर्ण झाले नाही तर प्रकल्प बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नसणे, जलसंपदा खात्याकडून १४ पंप व उद्धरण नलिका नव्याने बसवण्यासंबंधी प्रस्तावास मान्यता देण्यास लागणारा विलंब, परिणामी शेतकऱ्यांस सिंचनाचे पाणी मिळणार नसून त्यांचा आक्रोश वाढणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. उदयसिंग राजपूत, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“कन्नड-सोयगांव विधानसभा मतदारसंघात नेहमीच अतिवृष्टीमुळे नदीलगतच्या असलेल्या गावात पावसाळ्यात पुराचे पाणी घुसून जीवित व वित्त हानी होत असल्याने नदीलगत असलेल्या गावांमध्ये संरक्षण भिंत बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे करण्यात येणे परंतु अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही होत नसल्याने या नदीलगतच्या गावांना नेहमीच पुराचा फटका बसून जीवित व वित्त हानी होणे, परिणामी या नदीलगतच्या गावांतील गावकऱ्यांमध्ये शासनाच्या उदासीनतेबाबत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अनिल बाबर, वि. स. स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“सांगली-सातारा-सोलापूर जिल्ह्यातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षांपासून सुरू असणे, सदर दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न अद्यापि प्रलंबित असणे, सदरच योजनेचे काम तातडीने केल्यास या योजनेअंतर्गत तीन जिल्ह्यांतील सात तालुक्यांमधील २१७ गावांना फायदा होणार असून त्यामुळे या गावातील पिण्याच्या पाण्याची

तसेच शेतीच्या पाण्याची अडचण दूर होणे, शेतीमालाचे उत्पादन वाढून दर्जा वाढेल, कारखाने जोमाने चालतील, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल, सदर योजनेमध्ये खानापूर-आटपाडी-तासगांव, जत, माण, खटाव तालुक्यातील वंचित गावाचा समावेश करण्याची होत असलेली मागणी, यासाठी टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये वंचित गावाचा समावेश करून ६ टप्पा नियोजित असणे, याबाबत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी बैठक झालेली असून तीन महिन्यांमध्ये वंचित गावांचा समावेश करण्याचा आदेश दिलेला असणे, त्यानुसार शासनाने दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी टेंभू योजनेच्या विस्तारित योजनेसाठी वाढीव ८ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्यात येणे, याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री (जलसंपदा) मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे विस्तारित योजनेसाठी प्रशासकीय मान्यता व निविदा लवकरात लवकर काढण्याची केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी दुष्काळी तालुक्यातील वंचित गावामधील जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, जनतेला पिण्यासाठी व शेतीला पाणी देण्याकरिता शासन स्तरावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय मंत्री श्री. दीपक केसरकर सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या विभागाशी संबंधित तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात येत असून तो नंतर चर्चेला घेण्यात येणार असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, ' महाराष्ट्रातील सोलापूर आणि कर्नाटक सीमेवरील मरगूर, इंडी व इतर दोन-तीन ठिकाणी कर्नाटक सरकारने विनासंमती नवीन पंप हाऊस बांधल्याने सोलापूर शहराला नियमित पाणीपुरवठा होत नसणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, ' बार्टी प्रशासनाने राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्तींतर्गत सर्व पात्र ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, ' सध्या महाराष्ट्रातील बेदाण्यांच्या किंमती अतिशय कमी झालेल्या असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांनी, ' राज्यातील 'शिवभोजन थाळी' केंद्रे चालविणाऱ्यांना पाच ते सहा महिने पैसे मिळालेले नसणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू मुद्याबाबत पुन्हा चौकशी करण्यात येईल, असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(५) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये १० मार्च, २०२३ रोजी भीषण आग लागून जवळपास ४-५ स्टुडिओ जळणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ‘ समृद्धी महामार्गावर दिनांक ११ डिसेंबर, २०२२ ते २९ मार्च, २०२३ या १०० दिवसांच्या कालावधीत अपघातात ९०० हून अधिक लोक जखमी होऊन ३१ हून अधिक लोक मृत्युमुखी पडणे ‘ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी, ‘ आरोग्य उपकेंद्रातील महिला परिचारकांना किमान वेतन देण्याबाबत किमान वेतन कायदा अंतर्गत दिनांक ८.२.२०२३रोजी माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल याचिका क्रमांक २३२०/२००५ यामध्ये निकाल दिलेला असून देखील शासनाने याबाबत दखल घेतलेली नसणे’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, ‘मुंब्रा-कळवा मतदारसंघामधील ऊर्दू शाळेतील शिक्षक भरतीची निकड विचारात घेता महापालिकेने तेथे त्वरित शिक्षक भरती करणे तसेच त्या भागात आणखी २ शाळा बांधण्यात येतील या दृष्टीने राज्य शासनाने महापालिकेला आदेश देणे ‘ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, ‘ सोलापूर शहराला ६ दिवसांआड पाणीपुरवठा होत असल्याने त्यामध्ये माननीय उपमुख्यमंत्री यांनी लक्ष देऊन ताबडतोब NTPC कडून दुहेरी पाईपलाईनचे काम त्वरित सुरू करण्याचे आदेश देणे.’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी, ‘धुळे जिल्ह्यातील साईनी गावातील मेंढपाळ त्यांच्या मेंढयाना घेऊन २१ मार्च, २०२३ रोजी धरणगाव तालुक्यात गेल्यानंतर मेंढयांनी तेथे काहीतरी बुरशीजन्य पदार्थ खाल्ल्यामुळे त्या मृत्युमुखी पडल्याने शासनाने शेतकऱ्यांना तात्काळ मदत देणे.’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांनी, ‘चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यात जगन्नाथबाबा मंदिरातील दानपेटी चोरणाऱ्या चोरांनी गावकऱ्यांचा खून केल्याप्रकरणी सखोल चौकशी करून आरोपींना अटक करणे.’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी, ‘ अचलपूर तालुक्यातील वाढोणा गावात गेल्या ३ तारखेला बिबटयाने स्वप्नील नाणे नावाच्या शेतकऱ्यावर केलेल्या हल्ल्यामध्ये तो गंभीर जखमी झालेला असूनही वन विभागाने त्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे.’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. आदित्य ठाकरे , वि.स.स. यांनी, ‘ पुण्याच्या River Front Development साठी ६ हजार झाडे कापली जाणार असल्याच्या प्रकरणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एक बैठक आयोजित करून दोन्ही बाजू ऐकून योग्य तो निर्णय देणे.’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू प्रकरणी सन्माननीय सदस्य श्री.आदित्य ठाकरे यांनी दिलेल्या माहितीची शासनाने नोंद घेऊन उचित उपाययोजना कराव्यात, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(१४) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी, ‘ मेट्रो मार्गिका क्रमांक ६ प्रतापनगर ते श्यामनगर JVLR रोडवर

सुरू असल्याने गार्डन विभागाच्या माध्यमातून Delhi Metro Rail Corporation यांनी मधली ९३८ झाडे तोडण्यासाठी परवानगी मागितल्या प्रकरणी चौकशी करणे. ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू प्रकरणी सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीची शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी , 'मुंबई महानगरपालिकेच्या पी-उत्तर विभागाचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ चे परिपत्रकानुसार २० देयकांची बचत करण्यासाठी विभागातील उद्याने आणि मैदानातील दिवे रात्री १०.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत बंद करण्याचे आदेश देऊनही एका बाजूला मुंबई सौंदर्यीकरणाच्या प्रकल्पामध्ये रस्त्यावर अतिरिक्त वीजपुरवठा करण्यात येणे ' इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) डॉ. भारती लव्हेकर , वि.स.स. यांनी, ' वर्सोवा मतदारसंघामध्ये अमरनाथ टॉवर ते अच्युतराव पटवर्धन हा प्रस्तावित १२० मीटरचा पूल महानगरपालिकेकडून बांधण्यासाठी तेथील झोपडपट्टी निष्कासित करून हा पूल त्वरित बांधण्यात येण्याचे आदेश शासनाला देणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी, ' मुलुंड येथे डम्पर, डेब्रीज उचलणाऱ्या कंन्स्ट्रक्शन साईटच्या गाडया खूप वेगाने धावून सर्व वाहतूकविषयक नियमांचे उल्लंघन करत असल्याप्रकरणी शासनाने एक आदेश काढून या सगळ्यांवर चाप बसविणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, ' एमयुटीपी २ ब अंतर्गत ५ आणि ६ क्रमांकाच्या रेल्वे लाईनचे काम सुरु होणार असून यामुळे बाधित ६०० घरांमधील लोकांचे नाहूर किंवा धारावी येथे स्थलांतर करणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**६.** माननीय अध्यक्षांनी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २५० ते २५५, अल्पसंख्याक विकास विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २५६ ते २५८, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २६४ ते २६७ आणि दिव्यांग कल्याण विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २७३ ते २७६ चर्चेला घेण्यात येतील. सदर विभागांच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रम पत्रिकेसोबत वितरित केला आहे, असे सांगून माननीय अध्यक्षांनी चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

| | |
|---|---|
| (१) श्री. छगन भुजबळ | (२) डॉ. संजय कुटे |
| (३) श्री. अमित देशमुख | (४) श्री. प्रकाश आबिटकर |
| (५) श्री. बच्चू कडू | (६) श्री. शेखर निकम |
| (७) श्रीमती मनिषा चौधरी | (८) श्री. अमिन पटेल |
| (९) श्री. रमेश कोरेगावकर | (१०) ॲड. आशिष जैस्वाल |

(११) श्री. अबु आझमी (१२) कु. आदिती तटकरे

(१३) श्रीमती अश्विनी जगताप (१४) श्री. विक्रमसिंह सावंत

(१५) श्रीमती यामिनी जाधव

(चर्चा अपूर्ण)

श्री. अबु आझमी, वि.स.स. यांचा माहितीचा मुद्दा

(हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे उक्त मुद्यातील हिंदी मजकूर प्रलंबित आहे.)

सन २०२३-२०२४ च्या अनुदानाकरिता मागण्या- (सहावा व शेवटचा दिवस) (चर्चा पुढे सुरू)

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१६) श्री. रवि राणा (१७) श्री. निलेश लंके

(१८) श्रीमती सीमा हिरे (१९) डॉ. विश्वजित कदम

सांस्कृतिक कार्यमंत्री, महिला व बालकल्याण मंत्री ,राज्य उत्पादन शुल्क मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांनी आपापल्या विभागांशी संबंधित चर्चेला उत्तर दिले.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २५० ते २५५, अल्पसंख्याक विकास विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २५६ ते २५८, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २६४ ते २६७, दिव्यांग कल्याण विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २७३ ते २७६ दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

(चर्चारोध)

चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक - १) सामान्य प्रशासन विभाग अनुक्रमांक १ ते १०, २) वित्त विभाग अनुक्रमांक ५३ ते ६०, ३) विधि व न्याय विभाग अनुक्रमांक ७५ ते ७९, ४) नियोजन विभाग अनुक्रमांक ११० ते १९३, ५) संसदीय कार्य विभाग अनुक्रमांक १९४ ते १९६, ६) गृहनिर्माण विभाग अनुक्रमांक १९७ ते २००, ७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग अनुक्रमांक २१९ ते २२२, ८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अनुक्रमांक २४७ ते २४९, ९) मराठी भाषा विभाग अनुक्रमांक २५९ ते २६३ दिवसांच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

७. **(पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे)**

**(१) विनियोजन विधेयक -**

उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक १६- महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२३ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली असल्याचे सांगितले.

उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक १६- महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयकात सुधारणेसंदर्भात देण्यात आलेल्या सूचना सन्माननीय सदस्यांनी मांडाव्यात असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते) यांनी विधेयकातील सुधारणेसाठी दिलेल्या सूचनांसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

प्राप्त झालेल्या एकूण सूचनांपैकी ९ सूचना मान्य करण्यात आलेल्या असून उर्वरित ४ सूचना नाकारल्या आहेत असे उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी, विद्यमान सत्र कालावधीत प्राप्त झालेल्या कपात सूचनांच्यासंबंधी बैठक लावण्याबाबत माननीय अध्यक्षांना विनंती केली.

सदरहू विषयाबाबत एखाद्या अपवादात्मक परिस्थितीतच बैठक घेता येईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

माननीय अध्यक्षांनी, शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी सभागृहात घेण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजासंबंधी पुढील घोषणा केली—

" शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी अशासकीय कामकाज घेण्यात येणार आहेत. शुक्रवार, दिनांक १० मार्च,२०२३ रोजी कामकाजाच्या क्रमात दर्शविलेली तथापि, उक्त दिवशी अशासकीय कामकाज न झाल्याने

विचारार्थ प्रलंबित एकूण ०८ अशासकीय विधेयके चर्चेकरिता घेण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत. अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक २४ मार्च,२०२३ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी ३० मिनिटांचा वेळ पुरःस्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १२० मिनिटांचा वेळ खालील नमूद असलेल्या एकूण ०८ अशासकीय विधेयकांना चर्चेकरिता देत आहे. १) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०१९ श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. २) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. ३) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. ४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० महाराष्ट्र चिकित्सालयीनआस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. ५) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रति जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल या सबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - श्री.अमित साटम,वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. ६) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तिवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - श्री. प्रकाश आबिटकर,वि.स.स. यांचे१५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. ७) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. ८) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचे १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. "

**( विचार, खंडशः विचार व संमत करणे)**

(१) उद्योग मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्रीमती आदिती तटकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखेडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव, श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सातवा प्रस्ताव आणि सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा आठवा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १४ - सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखेडे, शिरीषदादा चौधरी व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव, श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी खालील प्रस्ताव मांडला -

> 'सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १४ - सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.'

विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्नव विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल व त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी सहभाग घेतला.

| | |
|---|---|
| (१) श्री. रविंद्र वायकर, | (२)श्री.पृथ्वीराज चव्हाण, |
| (२) ॲड.(श्री.)आशिष जैस्वाल, | (४) श्रीमती माधुरी मिसाळ, |

यांनी उपरोक्त विधेयकावरील एकत्रित चर्चेत सहभाग घेतला.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

८. "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांमधील विविध समस्या ' या विषयावर सर्वश्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनील प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, विनोद निकोले, रईस शेख, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनील शेळके, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपुरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दीपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजू आवळे, पी. एन. पाटील (सडोलीकर), विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहुल पाटील, अमित झनक, राजू पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापुरे, इंद्रनील नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे-पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री माधवराव पवार, धिरज देशमुख, रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव. (चर्चा पुढे सुरू)-

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.
चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) डॉ. जितेंद्र आव्हाड
(२) श्री. मिहिर कोटेचा
(३) श्री. सुनील प्रभू
(४) श्री. चेतन तुपे

(चर्चा अपूर्ण)

माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केली-

"आपणांस विदित आहेच की, एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे या संस्थेतर्फे भारतातील संसदीय लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी "भारतीय छात्र संसदे"सारखे विविध उपक्रम राबविले जातात. सर्व समाजघटकांचा लोकशाही प्रक्रियेत सहभाग वाढावा आणि निर्णय प्रक्रिया सर्वसमावेशी व्हावी या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व आणि योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे. मला आपणांस कळविण्यास अतिशय आनंद होतो की, याच संस्थेतर्फे दिनांक १५ ते १८ जून, २०२३ दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पहिल्या "राष्ट्रीय विधायक संमेलना" चे (1st NATIONAL LEGISLATORS CONFERENCE) आयोजन करण्यात आले आहे. देशातील राज्य विधानमंडळाचे सन्माननीय सदस्य या परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या संमेलनामुळे संसदीय लोकशाही बळकट होण्यास मदत होईल. हे संमेलन महाराष्ट्रात होत असल्यामुळे आपण सर्वांनी देखील या राष्ट्रीय विधायक संमेलनात सहभागी व्हावे असे मी आपणांस आवाहन करीत आहे. "

८. **म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव** – (चर्चा पुढे सुरू)-

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांमधील विविध समस्या" या विषयावर सर्वश्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनील प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, विनोद निकोले, रईस शेख, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, श्री. राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनील शेळके, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री सुनील राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनील टिंगरे, प्राजक्त तनपुरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दीपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजू आवळे, पी. एन. पाटील (सडोलीकर), विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहुल पाटील, अमित झनक, राजू पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनील नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे-पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश

अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री. माधवराव पवार, धीरज देशमुख, रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव. (चर्चा पुढे सुरु)-

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.
चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(४) श्री. महेश बालदी (५) श्री. संजय केळकर

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा संपल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी घोषित केले.

**९.** श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. भरतशेठ गोगावले, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री चिमणराव पाटील, भिमराव तापकीर, अनिल बाबर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री महेश लांडगे, प्रताप सरनाईक, सिध्दार्थ शिरोळे, ज्ञानराज चौगुले, श्रीमती सीमा हिरे, श्री प्रशांत बंब, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, ॲड. शहाजीबापू पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल कांबळे, प्रकाश आबिटकर, सुहास कांदे, ॲड. राहूल कुल, डॉ. राहुल आहेर, डॉ. संजय रायमुलकर, श्री संजय गायकवाड, सर्वश्रीमती श्वेता महाले, अश्विनी जगताप, सर्वश्री महेश शिंदे, रमेश बोरनारे, रणधीर सावरकर, दिलीप बोरसे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, समीर कुणावार, डॉ. पंकज भोयर, श्री योगेश कदम, श्रीमती लता सोनावणे, सर्वश्री बबनराव लोणीकर, संजय सावकारे, हरिभाऊ बागडे, किसन कथोरे, संजय केळकर, दिलीप लांडे, सदा सरवणकर, मंगेश चव्हाण, नितेश राणे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, योगेश सागर, सुनिल राणे, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर सर्वश्री अभिमन्यू पवार, राणाजगजीतसिंह पाटील, रवि राणा, सुभाष देशमुख, प्रकाश आवाडे, रत्नाकर गुट्टे, महेश बालदी, राम सातपुते, समाधान अवताडे, जयकुमार गोरे, नामदेव ससाणे, अमित साटम, गणपत गायकवाड, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री मिहीर कोटेचा, राजेश पवार, लक्ष्मण पवार, विजयकुमार देशमुख, डॉ. विनय कोरे, सर्वश्री संभाजी पाटील-निलंगेकर, सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांचा प्रस्ताव

श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव मांडला व भाषण केले --

''राज्यातील पुणे व नाशिक ही शहरे व्यापारी केंद्र असल्याने मुंबई, नागपूर, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राशी जोडलेली असणे, या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता स्वतंत्र विकास आराखडा तयार असणे मात्र त्यादृष्टीने शासनाकडून विकासात्मक कार्यवाही गतिमान करण्याची आवश्यकता असणे, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता असणे, पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिकेतील ३४ गावांचा सिटी सर्व्हे करून विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध व कालबद्ध आराखडा तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने विचार करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते डेक्कन आणि हिंजवडी ते कात्रज मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी मुंबई-बेंगलोर महामार्गावरील स्वामी नारायण मंदिर ते

नरे जंक्शन उड्डाणपूल करण्याची आवश्यकता, हवेली तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची आवश्यकता, जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असणे, सन २०२७ मध्ये नाशिक शहरात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी आतापासून करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतिमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी घरे विकसित करण्याची व नाशिकमधील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, परराज्यातून येणारे उद्योग नाशिक शहरात आणण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता, पुणे व नाशिक येथील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पुर्नविकास करण्याची आवश्यकता असून सहकार अधिनियमातील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता असणे, पुणे व नाशिक येथील वाहतूक समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याने व प्रवाशांना तासनतास रस्त्यावर खोळंबून रहावे लागत असल्याने यावर तोडगा काढण्याकरिता वाहतूक समस्येचा अभ्यास करून वाहतूक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहराचे डीपी प्लॅन नव्याने तयार करण्याची आवश्यकता, कॅन्टोनमेन्ट एरिया पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने सुरु असलेली कार्यवाही अधिक गतिमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्टीची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे-नाशिक रेल्वेची सुविधा करण्याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करून पाठपुरावा करण्याची आवश्यकता, राज्यात दारु व दूध भेसळीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने अन्नभेसळ अधिनियमातील शिक्षेची तरतूद कठोर करण्याची आवश्यकता, केंद्राने सहकाराला बळकटी देण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नाला राज्य व केंद्र शासनाने परस्पर सामंजस्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता, राज्यातील बंद पडत असलेल्या सहकारी बँका, कृषी सहकारी संस्था यांना बळकटी देऊन उर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता, प्रायमरी अँग्री क्रेडिट सोसायट्या गावपातळीवर काढण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात जलदगतीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना पाठबळ देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण संस्थांच्या स्वयं पुनर्विकासासंबंधात स्वतंत्र धोरण आणण्याची आवश्यकता, राज्यातील सहकारी चळवळ बळकट करण्याची व पतपेढयांमधील ५ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याची आवश्यकता, राज्यातील प्रगत शिक्षण संस्थांपैकी काही संस्था राजकीय अड्डे बनले असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा विपरीत परिणाम, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(१) श्रीमती माधुरी मिसाळ (२) श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते

(३) श्रीमती देवयानी फरांदे (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी, एच१एन१, एच३एन२ व कोव्हिड यांच्या वाढत्या प्रादुर्भावासंदर्भात म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव** – (चर्चा पुढे सुरू) -

श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. भरतशेठ गोगावले, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री चिमणराव पाटील, भिमराव तापकीर, अनिल बाबर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री महेश लांडगे, प्रताप सरनाईक, सिध्दार्थ शिरोळे, ज्ञानराज चौगुले, श्रीमती सीमा हिरे, श्री प्रशांत बंब, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, ॲड. शहाजीबापू पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल कांबळे, प्रकाश आबिटकर, सुहास कांदे, ॲड. राहुल कुल, डॉ. राहुल आहेर, डॉ. संजय रायमुलकर, श्री संजय गायकवाड, सर्वश्रीमती श्वेता महाले, अश्विनी जगताप, सर्वश्री महेश शिंदे, रमेश बोरनारे, रणधीर सावरकर, दिलीप बोरसे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, समीर कुणावार, डॉ. पंकज भोयर, श्री योगेश कदम, श्रीमती लता सोनावणे, सर्वश्री बबनराव लोणीकर, संजय सावकारे, हरिभाऊ बागडे, किसन कथोरे, संजय केळकर, दिलीप लांडे, सदा सरवणकर, मंगेश चव्हाण, नितेश राणे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, योगेश सागर, सुनिल राणे, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर सर्वश्री अभिमन्यू पवार, राणाजगजीतसिंह पाटील, रवि राणा, सुभाष देशमुख, प्रकाश आवाडे, रत्नाकर गुट्टे, महेश बालदी, राम सातपुते, समाधान अवताडे, जयकुमार गोरे, नामदेव ससाणे, अमित साटम, गणपत गायकवाड, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री मिहीर कोटेचा, राजेश पवार, लक्ष्मण पवार, विजयकुमार देशमुख, डॉ. विनय कोरे, सर्वश्री संभाजी पाटील-निलंगेकर, सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांचा प्रस्ताव -

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी सहभाग घेतला.

(३) श्रीमती देवयानी फरांदे (भाषण पूर्ण)
(४) श्री. छगन भुजबळ
(११) श्रीमती अश्विनी जगताप
(१२) श्री. संजय जगताप
(१३) श्री. सिद्धार्थ शिरोळे
(१४) श्री. सुनील टिंगरे
(१५) भीमराव (आण्णा) तापकीर
(१६) श्री. चेतन तुपे

**शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३**

**(१) सर्वश्री. राजन साळवी, भास्कर जाधव, वैभव नाईक वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. राजन साळवी वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"स्वातंत्र्यानंतर अनेकवेळा तिल्लोरी कुणबी या समाजाच्या सर्वेक्षणासाठी अनेक वेळा अभ्यास समिती नेमण्यात येणे, त्यानुसार सन १९९६ च्या राज्य अध्यादेशात ओबीसी यादीमध्ये ८३-तिल्लोरी कुणबी समाजाचा समावेश करण्यात येणे, असे असतांनाही घटनाबाह्य हिंदू-कुणबीचे पुराव्यांची मागणी जिल्हा प्रशासनाकडून मनमानी पध्दतीने करण्यात येणे, त्यामुळे समाजाचे मिळणारे आरक्षण आज संकटात सापडलेले असणे, माहे जानेवारी, २०२३ पासून रत्नागिरी जिल्ह्यातील तिल्लोरी कुणबी उल्लेख असलेल्या कुणबी समाजाला दाखले

देणे जिल्हा प्रशासनाने पूर्णपणे बंद करणे, सध्या राज्यात दहावी, बारावीच्या परीक्षा सुरु असणे, परीक्षेनंतर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे प्रवेश घेण्यासाठी जातीचे दाखले आवश्यक असतांना मात्र रत्नागिरी जिल्ह्यातील तिल्लोरी कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांना दाखले देणे बंद केल्यामुळे या समाजातील विद्यार्थ्यांना पुढे प्रवेश मिळण्यास अडचण निर्माण होणार असणे, परिणामी त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असणे, तसेच जिल्ह्यात पुढील कालावधीत ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये उमेदवार, सदस्यांचे दाखले, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका लागणार असणे, त्यासाठी उमेदवारांना आवश्यक जातीचे दाखले लागणार असणे, परंतु जिल्ह्यात तिल्लोरी कुणबी समाजाच्या नागरिकांना दाखलेच देणे बंद केल्यामुळे या समाजातील नागरिकांना निवडणुकीच्या वेळी उमेदवारी मिळण्यासाठी मोठी समस्या निर्माण होणे, कुणबी समाज हा ओबीसी वर्गात येत असणे, तसा शासनाचा शासन निर्णयही असणे, त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून दाखले देणे बंद करण्यात आल्याने कुणबी समाजातील नागरिकांमध्ये वाढलेला तीव्र असंतोष, शासनाने यासंदर्भात तात्काळ चौकशी करून रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा प्रशासनाने बंद केलेले ओबीसी प्रवर्गातील ८३-तिल्लोरी कुणबी समाजातील नागरिक, विद्यार्थ्यांना जातीचे दाखले पूर्ववत सुरु करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) सर्वश्री. छगन भुजबळ, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. छगन भुजबळ वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले.

"जळगाव शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या मेहरूण गट नं. ७८ व ७९ या अनुक्रमे ६.१० व ५.११ आर.चौ.मी जागेचा खाजगी विकासकाकडून लग्न समारंभासाठी भाड्याने देऊन वाणिज्यिक वापर करण्यात येत असल्यामुळे जळगाव महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर मिळकत ही महानगरपालिकेची मालमत्ता असल्यामुळे ही मिळकत ताब्यात घेण्याबाबत दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी नागरिकांनी जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिलेले असणे, या प्रकरणाची जिल्हाधिकारी जळगाव यांचे समोर सुनावणी चालू असणे, सुनावणी दरम्यान जळगाव जिल्हाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी गट नंबर ७८ व ७९ चा ले-आऊट रद्द करण्याचे निर्देश दिलेले असणे, मात्र महानगरपालिका आयुक्तांकडून ले-आऊट करण्यासाठी दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असणे, महानगरपालिका आयुक्तांनी हा ले-आऊट रद्द करावा किंवा ही ॲमेनिटी ताब्यात घेण्याची आवश्यकता असणे, मात्र याबाबत दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांच्या वतीने) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री. गणपत गायकवाड, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. कुमार आयलानी, किसन कथोरे, प्रमोद पाटील, अस्लम शेख, अमीन पटेल, नानाभाऊ पटोले, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, विकास ठाकरे, संजय जगताप, सुनिल केदार, सुरेश वरपुडकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री.गणपत गायकवाड वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले.

"ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील भू माफिया व विकासकांकडे ग्रामपंचायतीच्या तसेच पालिकेच्या नगररचना विभागाच्या बांधकाम परवानग्यांची बनावट कागदपत्रे असणे, या बनावट कागदपत्रांच्या आधारे भूमाफिया व विकासक यांनी कल्याण-डोंबिवली परिसरातील २७ गावाच्या भागातील पालिकेची आरक्षणे, सरकारी जमिनीवर शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या महसूल बुडवून बेकायदा बांधकामे उभी केलेली असणे, यातील बहुतेक बांधकामे ही २७ गावात होणे, बनावट कागदपत्राच्या आधारे ग्रामपंचायतीचे खोटे प्रमाणपत्र तसेच खोटे रेरा नोंदणी पत्र मिळवत नागरिक, शासन व पालिका प्रशासनाची फसवणूक करणाऱ्या सुमारे विकासकांवर कारवाईची टांगती तलवार असताना ४० विकासकांची खाती एसआयटी ने गोठवलेली असणे, एसआयटीने तहसीलदार, जिल्हाधिकारी आणि पालिका प्रशासनासह रजिस्टारला या मालमत्ता संदर्भातील व्यवहार थांबवून चौकशी करण्याचे आदेश देण्यात येणे, आतापर्यंत चौकशी अहवाल सादर झालेला नसणे, परंतु बेकायदेशीरपणे इमारती बांधून विकासक व भूमाफीया इमारतीमधील सदानिका विकून मोकळे होणे, परंतु कामात कसूर करून अनधिकृत बांधकाम सुरु असतांना त्यावर कोणतीही कारवाई न करणाऱ्या अथवा अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) **श्री. पी. एन. पाटील, वि.स.स. यांनी, 'करवीर मतदार संघातील मौजे वडणगे (ता. करवीर, जि. कोल्हापूर) येथे तलाव संवर्धनाच्या कामामध्ये झालेली अनियमितता' इ. बाबत दिलेली लक्षवेधी सूचना सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आली नाही.**

(५) **ॲड. राहुल कुल वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"राज्यात ६२२ कोटी लिटर पेक्षा दररोज जास्त सांडपाणी थेट नद्यांमध्ये मिसळत असल्याने जलजीवांसह मानवी आरोग्यावर तसेच ग्रामीण भागातील शेतीवर घातक परिणाम होत असणे, पुणे शहरात दररोज एक हजार दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाण्याची निर्मिती होत असताना पुणे महापालिकेने केवळ ७५० एमएलडी सांडपाणी नदीत सोडले जात असल्याचे कागदोपत्री दाखवले असणे, राष्ट्रीय हरित लवादाने नदी प्रदूषणावर उपाययोजनांचा कृती आराखडा मागितला असणे, सन २०१८ मध्ये विशेष अधिसूचना काढून नदीकाठावरील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करणे अनिवार्य करण्यात आले असताना व त्याचा कालबद्ध कार्यक्रमही आखण्यात आला असून देखील हरित लवादाचे निर्देश व खात्याचे आदेश असून देखील राज्यभरातील नदीकाठच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीला गती मिळालेली नसणे, सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया व्हावी, त्यानंतरच हे पाणी नदीत सोडण्यास सांगितले असताना देखील त्याचे उल्लंघन झाल्यास हरित लवादाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ दंड ठोठावणार असल्याचे आदेशात नमूद असणे, त्यानुसार ही मुदत पुढील काही महिन्यात संपुष्टात येत असून देखील केवळ ३० संस्थांनी या आदेशाची अंमलबजावणी केली असणे, राज्यात नदीकाठची गावे आणि शहरांमध्ये दररोज निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रकिया करण्याचे प्रमाण कसे वाढवता येईल याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले असणे, मौजे कुरकुंभ, ता. दौंड येथे मोठी रासायनिक औद्योगिक वसाहत असणे, यामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर प्रदूषित व रसायनमिश्रित पाणी तयार होत असणे हे प्रदूषित सांडपाणी उद्योगांकडून अनेक वेळा मोकळ्या शेतात, ओढ्यात, नाल्यात किंवा बोअरवेल मध्ये सोडले जात असणे, यामुळे आजूबाजूच्या सुमारे १० ते १५ किमी अंतरावर याचा परिणाम होत असणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी शासनाकडून अनुदान देखील मिळत असणे कुरकुंभ, ता. दौंड येथे प्रदूषण मधून मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे बैठका व पाठपुरावा करण्यात आला असणे, या बाबतीत अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे केमिकलचे स्फोट होऊन देखील मोठ्या प्रमाणावर अपघात घडले असणे, विना प्रक्रिया सांडपाणी शेतात, ओढ्यात, नाल्यात बोअरवेल मध्ये तसेच नदीमध्ये सोडले जात असणे, यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व शेतपिकांचे नुकसान होत असल्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांच्या वतीने) यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) सर्वश्री प्रताप अडसड, ॲड. आकाश फुंडकर, श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"अमरावती जिल्ह्यातील धानोरा गुरव नांदसावंगी पापड वाढोणा रस्त्याचे बांधकाम एम.डी.आर २६ कि.मी. ०/०० ते २१/०० तालुका नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती सीआरएफ योजनेअंतर्गत मंजूर कामाची निविदा दिनांक १०/०३/२२ रोजी झाली असणे, निवीदा १५/०६/२२ उघडण्यात येऊन सदर व कामाचा कार्यारंभ आदेश

दिनांक १०/०८/२२ ला देण्यात आला असणे, सदर कामाची किंमत १६ कोटी ७९ लाख ७७ हजार ५४८ असून सदरहू काम १० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे असल्याने सदर कामाच्या अटी व शर्तींमध्ये एम ओ आर टी एच (MORTH) नियमानुसार प्लांट कामाच्या ठिकाणापासून साठ किलोमीटर अंतरात असणे किंवा काम मिळाल्यानंतर लावणे बंधनकारक असणे, निविदेच्या अटी शर्तीनुसार कंत्राटदारांचा बॅच मिक्स प्लांट ६० किलोमीटरच्या आत असल्यामुळे २५ लक्ष रुपयांची एफ.डी. आर निविदेसोबत जोडला असणे परंतु संबंधित कंत्राटदाराने कामापासून ६० किलोमीटरच्या आत बॅच मिक्स प्लान न लावताच अधिकाऱ्यांच्या संगनमताने २५ लक्ष रूपांचा एफ डी आर परत घेऊन शासनाची फसवणूक केली असणे, तसेच कामाच्या ठिकाणापासून ६५ ते ७० किलोमीटर दूर असलेल्या ड्रम मिक्स प्लॅन वरून संबंधित काम अधिकाऱ्यांच्या संगनमताने करून घेतले असणे, याबाबत कार्यकारी अभियंत्यांना विचारणा केली असता धर्मेश प्लांट पासूनचे अंतर हे गुगल मॅप नुसार ६० किलोमीटरच्या आत असल्याची खोटी माहिती माननीय लोकप्रतिनिधींना दिली असणे, संबंधित कामाच्या अटी व शर्तींमध्ये बॅच मिक्स प्लांटची (SCADA) तरतूद असणे परंतु संबंधित कंत्राटदाराने बांधकाम विभागासोबत संगनमत करून त्याकडे दुर्लक्ष केले असणे, संबंधित कामाला लागणारे डांबर हे शासकीय रिफायनरी ते प्लांट चे ई-वे बिल व टॅक्स इन्व्हॉईस खात्याने तपासलेले नसणे व त्याची खातर जमा चुकीच्या पद्धतीने केलेली असण्याची शक्यता असणे, संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी त्यांचे अधीनस्त उपअभियंता यांना प्लान चालू असताना प्लांटवर पाठवणे आवश्यक असणे परंतु संगनमत असल्यामुळे ही प्रक्रिया सुद्धा केली गेली नाही, यामुळे संबंधित कामांमध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता असणे, कामाचा दर्जा सुद्धा राखला गेला नसणे, तसेच या अधिकाऱ्यांनी यापूर्वी झालेल्या कामांमध्ये सुद्धा अशाच पद्धतीने कंत्राटदारांशी संगनमत करून शासनाची फसवणूक केली असण्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७) श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“शिंगवे केशव (ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) येथील शेतकऱ्यांनी शेतीसाठी पाणी पुरवठा होण्याकरिता सामूहिकरीत्या पुर्ण केलेली सुमारे १२ कि.मी. लांबीची पी.व्ही.सी पाईपलाईन, यासाठी त्यांचा सुमारे अडीच कोटी रुपयांचा खर्च, ही रक्कम त्यांनी कर्जाऊ घेतलेली असणे, काम पूर्ण होऊन झालेला दोन वर्षाचा कालावधी, परंतु क्रिती इंडस्ट्रीज इंडिया लि., पीथमपुर, मध्य प्रदेश या पी.व्ही.सी. पाईप पुरविलेल्या कंपनीकडून झालेला सदोष मालाचा पुरवठा, सदोष पाईप असल्यामुळे ते सातत्याने फुटत असून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पुरवठा होत नसल्याने त्यांचे शेती उत्पन्न बंद होणे, परंतु कर्जाचा बोजा वाढत असल्याने त्यांच्यावर आलेले आर्थिक संकट, शेतकऱ्यांच्या तक्रारींना कंपनीकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे, कंपनीने केलेल्या फसवणुकीमुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी, ‘सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातील मातोश्री ग्राम समृद्धी शेत / पाणंद रस्त्यांच्या कामांबाबत’ दिलेली लक्षवेधी सूचना सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आली नाही.**

**(९) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“महाराष्ट्र दारूबंदी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी तसेच दोषसिद्धीच्या प्रमाणामध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडून कार्यवाही होत आलेली असणे, परंतु महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचा विचार करता दरवर्षी महाराष्ट्रामध्ये सरासरी १ लक्ष गुन्हे दाखल होत असून फक्त नागपूर परिक्षेत्राचा विचार करता सरासरी २४,००० गुन्हे दाखल होत असून या कायद्यामध्ये दोषसिद्धी चे प्रमाण लक्षात घेता १ % पेक्षा कमी असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली दाखल झालेल्या प्रत्येक सौम्य / गंभीर गुन्हयामध्ये एफ.आय.आर., पंचनामा, मुद्देमाल जप्ती, FSL रिपोर्ट प्राप्त करणे व गुन्ह्यांचा सविस्तर तपास करून न्यायालयामध्ये दोषारोप घटनास्थळ पत्र सादर करावे लागत असणे, त्याचबरोबर न्यायालयाकडून प्रत्येक गुन्हयाचा निपटारा करण्यात येत असणे, गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास करण्याकरिता काही दिवस ते काही महिन्याचा कालावधी लागत असणे, न्यायालयामध्ये सदर गुन्ह्याची केस चालविण्यासाठी काही महिन्याचा कालावधी लागत असणे, त्याचबरोबर केसची न्यायालयीन सुनावणी होऊन निकाल लागेपावेतो काही महिन्याचा कालावधी लागणे, या संपूर्ण प्रकियेदरम्यान जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये जमा असणे, या प्रकियाकरिता बराच कालावधी जात असुन सुध्दा विविध कारणास्तव गुन्हे शाबीतीचे प्रमाण ०.५ % याप्रमाणे अल्प असणे, यावरुन प्रचलित कार्यपध्दतीद्वारे करण्यात येणारी कार्यवाही प्रभावी ठरत नसल्याचे दिसून येत असणे, या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यामध्ये अपराध हे कोणतीही जोखीम न पत्करता उच्च लाभ मिळविण्याचे झालेले असल्याने अडचणी निर्माण होत असणे, त्याचप्रमाणे मोठ्या संख्येमध्ये दाखल होणाऱ्या दारुबंदी गुन्हयामुळे गंभीर गुन्हयाचा तपासाच्या व अभियोग चालविण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होत असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायदा हा एक सामाजिक कायदा असुन जेव्हा संघटीत गुन्हेगारी टोळया करून मोठ्या प्रमाणात दारुची निर्मिती, विक्री, वाहतुक व तस्करी संघटीतरित्या केली जाते, तेव्हा त्यांचेविरुध्द कटोरपणे कार्यवाही करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर अशा गुन्हयाचे गांभीर्यपूर्वक व गुणात्मक तपास करून गुन्हेगारांना कडक शिक्षा होणे आवश्यक असणे, तथा लहान गुन्ह्याकरिता एफ.आय.आर. दाखल करणे, तपास करणे, दोषारोपपत्र न्यायालयात पाठविणे व खटला चालविणे याकरिता लागणारे मनुष्यबळ कमी करून गुन्हे शाबीतीचे प्रमाण कमीतकमी ६० % ते ८० % नी वाढविणे, शिक्षेच्या सुनिश्चिततेची खात्री करणे, लोकांना दारूबंदी कायद्याचे तरतुदीचे उल्लंघन करण्यापासून थांबविण्यासाठी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक असणे, दारूबंदी कायद्याखालील अपराध हे केवळ कमी जोखमीचे व उच्च लाभ मिळविण्याकरिता न राहता

कोणतेही जोखीम न पत्करता फक्त लाभ मिळविण्याचे झालेले असणे, ज्यामुळे, गुन्हेगारांमध्ये शिक्षा होण्याचा धाक नाहीसा झाल्याने दिवसेंदिवस त्यांचे धाडस वाढत असणे, त्यामुळेच, दारूबंदी कायद्यामधील तरतुदींचे योग्य आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षेच्या सुनिश्चिततेची खात्री करणे आणि या कायद्याचे तरतुदींमध्ये सुधारणा करणे सद्यःस्थितीचा विचार करता अधिक महत्त्वाचे झालेले असणे, दारूबंदी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून दारूबंदी कायद्याखाली दाखल गुन्ह्यांत अभियोगांच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणणे, गंभीर / गुणात्मक आणि किरकोळ / लहान प्रकरणामध्ये भेद करणे तसेच किरकोळ / लहान प्रकरणाकरिता अभियोगाची क्रियारीती सुकर करणे, उपलब्ध माहितीचे आधारावर विश्लेषण करून पोलीस, अभियोजन पक्ष व न्यायालय या संस्थेवरील कामाचा भार कमी करणे या आणि इतर सुधारणा करणे गरजेचे असणे, तसेच सामाजिकदृष्ट्या विचार करता राज्यातील प्रत्येक गावातील अनेक कुटुंबांत दारूचे वाढते प्रमाण व गैर प्रसार यामुळे उद्ध्वस्त झाली असून गावातील महिलांचा दारू बंदी व दारूच्या वाढत्या प्रसाराला नेहमी विरोध राहीला असणे, यादृष्टीने शासनाने तातडीने महाराष्ट्र दारूबंदी कायदा-१९४९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(१०) श्री. धनंजय मुंडे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय वने मंत्र्याचे लक्ष वेधले.**

"राज्यात वन संवर्धन कायदा लागू नसणाऱ्या ग्रामीण भागातील वृक्षतोड करण्यासाठी 'महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ व महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादी बाबींचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७ या कायद्यातील तरतुदीनुसार वन अधिकाऱ्यांना वृक्षतोडीचे अधिकार नसणे, तथापि, वाढत्या नागरीकरणामुळे मोठ्या शहरांभोवतालच्या गावांमध्ये सुनियोजित विकास करण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई एक्स्प्रेस महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या २ किमी परिसरासाठी रस्ते विकास महामंडळ, नवी मुंबई एअरपोर्टच्या २० कि.मी. परिसरासाठी नैना प्राधिकरणाची स्थापना होणे, सदरचे प्राधिकरणे स्थापित झाल्यानंतर त्यांचा कोणताही विकास आराखडा अद्याप मंजूर न होणे, अशा नियोजन प्राधिकरणाच्या अखत्यारीत अनेक गावांचा व तालुक्यांचा समावेश असणे, या भागात अनेक शेतजमिनी असतांना सदर क्षेत्र जणू काही ते नागरी क्षेत्र आहे असे समजून वृक्ष तोडीस वन अधिकाऱ्यांनी परवानगी नाकारणे व सबंधित नियोजन प्राधिकरणाकडे महाराष्ट्र नागरी क्षेत्र (झाडांचे रक्षण व जतन) अधिनियम, १९७५ अंतर्गत अर्ज करण्यासाठी सूचित करणे, वास्तविक पाहता महाराष्ट्र नागरी क्षेत्र (झाडांचे रक्षण व जतन) अधिनियम, १९७५ च्या तरतुदी केवळ नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नैना अशा विविध प्राधिकरणातील ग्रामीण भागातील शेतजमिनीवरील झाडे तोडण्यासाठी सदर अधिनियम लागू असण्याचा अवाजवी आग्रह धरणे, यामुळे ग्रामीण

भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना विनाकारण त्रास होणे, वास्तविक पाहता ज्या क्षेत्रासाठी विकास योजना अंतिम झाली नाही असे क्षेत्र सद्य:स्थितीत ग्रामीण क्षेत्र समजून अशा क्षेत्राकरिता 'महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ व महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादी बाबींचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७ नुसार यापूर्वी वन अधिकाऱ्यांकडून परवानगी देण्यात येत होती त्याच प्रचलित पध्दतीप्रमाणे परवानगी देण्याच्या संदर्भात शासन स्तरावरून सुस्पष्ट मार्गदर्शन नसल्याने अधिकाऱ्यांमध्ये असलेल्या संभ्रमाच्या परिणामी नागरिकांना होणारा त्रास, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४६ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, विधान भवन इमारतीच्या आवारात घडलेल्या घटनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ०८ मिनिटांनी स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून २८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४३ मिनिटांनी स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

विधिमंडळाच्या आवारात सन्माननीय सदस्यांची वर्तणूक किंवा आचारसंहिता कशी असावी, यासंदर्भात एक प्रमाण कार्यपद्धती (एसओपी) पुढील काही दिवसात तयार करण्यात येईल. ती प्रमाण कार्यपद्धती (एसओपी) सर्व सन्माननीय सदस्यांसाठी बंधनकारक असेल; तसेच त्याचे उल्लंघन झाले तर कोणती कारवाई केली जाईल याची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी देखील यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट केली.

**१.** (१) राज्य उत्पादन शुल्क मंत्री (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) संसदीय कार्ये मंत्र्यांनी, (अ) लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२३-२०२४ हे प्रकाशन व (ब) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवले.

( ३ ) बंदरे आणि खनिकर्म मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठ्ठेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**२.** विधानसभा सदस्य अनुपस्थिती समिती गठित करण्याची प्रक्रिया सुरु असल्याने विधानसभा सदस्यांच्या अनुपस्थितीबाबतचा प्रस्ताव माननीय संसदीय कार्य मंत्री महोदयांनी मांडावा असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, विधानसभा सदस्यांच्या अनुपस्थितीबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडला.

**३.** श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांनी, ''भुसावळ नगरपालिका हद्दीत अमृत योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत'' या विषयासंबंधीचा विनंती अर्ज सभागृहास सादर केला.

**स्थगन प्रस्तावाच्या सूचनांबाबत –**

आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे. तथापि, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.अजित पवार, विरोधी पक्ष नेते यांनी, 'राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व माजी केंद्रीय राज्य मंत्री श्री. हंसराज अहिर यांचा पुतण्या महेश अहिर व त्यांचे मित्र हरीश धोटे यांचे मृतदेह चंदीगड नजीकच्या जंगलात फासावर लटकवलेल्या अवस्थेत आढळून येणे' इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेल्या माहितीची सरकारने गंभीरपणे नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**(११) सर्वश्री. अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"लातूरपासून नांदेड पर्यंतच्या क्षेत्रातील स्थानिक जनतेच्या सुविधेसाठी लातूर ते नांदेड पर्यंत ब्रॉडगेज विद्युतीकरणासह नवीन रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर व्यवहार्यता अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी राज्य शासनास सादर केलेला असणे, मात्र सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या सहमतीची आवश्यकता असणे, या करिता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या व्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे सहमती करिता सादर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे मात्र असे असूनही राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे सहमतीसाठीचा प्रस्ताव पाठविण्याकरिता होणारी टाळाटाळ व दिरंगाई, यामुळे जनतेची होणारी हेळसांड आणि गैरसोय, परिणामतः स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाकडून करण्यात यावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(१२) ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

ॲड.आशिष शेलार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले.

"मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक १ मे, २०२२ रोजी मुंबईत सर्वांसाठी पाणी या धोरणाची घोषणा करण्यात येणे, मुंबईकरांना २४ तास पाणी देण्याचे स्वप्न महानगरपालिका दाखवित असतानाच आजही सुमारे १३ ते १४ लाख नागरिक कायदेशीर पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव उघड होणे, मुंबईतील नागरिकांना अनौपचारिक पाणी मिळविण्यासाठी महिन्याला हजारो रुपये खर्च करावे लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, आपण जे शुद्ध पाणी वापरतो ते आपला मळ–कचरा घेऊन सरळ निघून समुद्रात सोडले जात असणे, या वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून या पाण्याचा पुनर्वापर करणे ही संकल्पना केवळ कागदावरच राहिली असणे, काही खाजगी संस्थांनी हा प्रयोग करून पुनर्वापरासाठी पाणी दिले असले तरी महानगरपालिकेकडे व्यवस्था नसल्याचे कोरडे उत्तर महापालिका प्रशासनाकडून दिले जात असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, पाणी वितरण व्यवस्थेत दररोज ३० टक्के बेहिशेबी पाणी वाया जात असून हे पाणी हॉटेल, निवासी आणि खाजगी क्रीडा संकुलांना अवैध जोडण्या देऊन वितरित केले जात असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईच्या भौगोलिक हद्दीत केवळ ३ टक्के पाणी स्त्रोत असून मुंबईला ९७ टक्के पाणी मुंबई बाहेरून आणावे लागत असणे, मुंबईतील पाण्याचे स्त्रोत विकासाच्या नावाखाली नष्ट झाल्या असून हे स्त्रोत बुजवून जमीन विकसित करताना, काँक्रिटीकरण करताना भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत नाहीसे झाले असणे, मुंबईतील पाणी चोरी रोखण्यासाठी नियमित वॉटर ऑडीट करण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे मुंबईतील पाणी समस्या लक्षात घेता मुंबईतील पाण्याचे संवर्धन करण्यासाठी मुंबईतील दहिसर, पोयसर आणि ओशिवरा या नद्यांसह, नैसर्गिक पाण्याचे स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांच्या वतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी, सिडकोने ताब्यात घेतलेल्या जागेवर भू-माफिया कंटेनर यार्ड चालवित असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे त्याची शासनाने त्वरित नोंद घेऊन सिडकोच्या महाव्यवस्थापक व संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश द्यावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उद्योग मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली.

४. सर्वश्री अजित पवार व इतर वि.स.स. यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव.

श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते) यांनी म.वि.स. २९२ अन्वये पुढील अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारे हल्ले व सूडबुद्धीने होणारी कारवाई, राज्यात संचार आणि विचार स्वातंत्र्याचा होत असलेला संकोच, पत्रकारांची झालेली हत्या, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यात सरकारला आलेले अपयश, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, शक्ती कायद्याची रखडलेली अंमलबजावणी, हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आलेले अपयश, मोठ्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली दादागिरी, गँगस्टरशी संबंध असलेल्या ठाणे महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्तावर पोलिसी कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई झाली असणे, राज्यात लोकप्रतिनिधी व खाजगी व्यक्तींकडून झालेला गोळीबार, जनतेतून तीव्र विरोध होत असल्याने आंतरधर्मीय समिती बरखास्त करण्याची आवश्यकता, सरकारने कॉपीमुक्त अभियानाची घोषणा केली असली तरी दहावी व बारावी परिक्षेत मोठ्याप्रमाणावर कॉपी व प्रश्नपत्रिका फोडण्याचे उघडकीस आलेले प्रकार, खंडणी टोळ्या सक्रीय झाल्याने उद्योजक, व्यावसायिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, बालविवाहाला प्रतिबंध घालण्यात सरकारला येत असलेले अपयश, छत्रपती संभाजीनगरमध्ये कोयता गँगची पसरलेली दहशत, आंतरधर्मीय कुटुंबात घरगुती हिंसाचाराला वेगळे स्वरुप दिले जात असल्याने सामाजिक अशांतता निर्माण झाली असणे, नामांतर वादातून समाजभावना भडकावण्याचा होत असलेला प्रयत्न, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, तसेच, राज्यात येणारी परकीय गुंतवणूक, उद्योग, शासकीय आस्थापना परराज्यात जाण्याचे न थांबलेले सत्र, अन्य राज्यांच्या तुलनेत विजेचे दर जास्त असल्याने राज्याच्या उद्योग क्षेत्रावर झालेले परिणाम, लघु व मध्यम उद्योग वाढीसाठी सुयोग्य वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता, तसेच, राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणे उघडकीस येऊनही सरकार चौकशी करण्याबाबत सकारात्मक नसणे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या कामात हजारो कोटी रुपयांच्या उघडकीस आलेल्या गौण खनिज घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मदतकार्ये व पुनर्वसन विभागात आपत्कालीन कामाच्या नावाखाली झालेला ७७०० कोटींच्या कामाचा घोटाळा, जळगावातील कुबेर ऑनलाईन मटका रॅकेट, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारी उपायुक्त व अतिरिक्त आयुक्तांना सेवेत घेऊन कार्यकारी पदावर केलेली नेमणूक, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

चर्चा अपूर्ण.

श्री.नाना पटोले, वि.स.स. यांनी, 'माननीय श्री. राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याचा निर्णय माननीय लोकसभा अध्यक्ष यांच्या माध्यमातून झालेला असून या घटनेचा आम्ही निषेध व्यक्त करून सभात्याग करतो' असे सांगितले.

(विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांनी घोषणा देत बहिर्गमन केले.)

डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी, 'मेहकर डेपोला नवीन गाड्या देणे व जुन्या गाड्या स्क्रॅप करण्याची आवश्यकता', इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

"राज्यात ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती" इ. बाबत दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. बच्चू कडू
(२) श्री. संजय गायकवाड
(३) श्री. विनय कोरे
(४) श्रीमती गीता जैन
(५) श्री. नाना पटोले
(६) श्री.रवि राणा
(७) डॉ. जितेंद्र आव्हाड
(८) श्री.रविंद्र वायकर
(९) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(१०) श्री.अमित साटम
(११) ॲड. (श्री.) आशिष जैस्वाल
(१२) श्री.अनिल देशमुख
(१३) ॲड. आशिष शेलार
(१४) श्री. सुनिल केदार
(१४) श्री. सुनिल प्रभू

(चर्चा अपूर्ण)

**५.** (ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे –

(१) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखेडे, विकास ठाकरे, शिरीषदादा चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, श्री. बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव आणि सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी अनुकमे मांडावेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. अजित पवार, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखेडे, विकास ठाकरे, शिरीषदादा चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव, श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचा चौथा प्रस्ताव, श्री. बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा पाचवा प्रस्ताव आणि सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीपराव वळसे-पाटील, वि.स.स. यांचा सहावा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी अनुक्रमे मांडावेत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तदनंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल; आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरूवात करावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. दिलीपराव वळसे पाटील वि.स.स. यांनी उपरोक्त विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नासंदर्भात आपले मत मांडले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**६.** संसदीय कार्य मंत्र्यांनी, "महाराष्ट्र विधानसभा नियम १८३ च्या पोटनियम (१) अन्वये, "राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत" या विषयावर गठित करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत सहा महिन्यांपर्यंत वाढवून देण्यात यावी", असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

"राज्यात ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती" इ. बाबत दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१५) श्री. रईस शेख

(१६) प्रा.श्रीमती वर्षा गायकवाड

(१७) श्री.संजय केळकर

(१८) डॉ. किरण लहामटे

(१९) श्रीमती मनीषा चौधरी

(२०) श्री. इंद्रनील नाईक

(२१) श्री.अभिमन्यू पवार

(२२) डॉ.विश्वजीत कदम

(२३) ॲड. राहुल कुल

(२४) श्री. प्राजक्त तनपुरे

(२५) डॉ. देवराव होळी

(चर्चा अपूर्ण)

श्री. जयकुमार रावल, वि.स.स. यांनी, "मार्केट कमिटीच्या निवडणुका पुढे ढकलण्याची आवश्यकता" इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

उक्त प्रकरणी शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**अंतिम आठवडा प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू..)**

"राज्यात ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती" इ. बाबत दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

(२७) श्री. गिरीषदादा चौधरी

(२८) ॲड. राहुल ढिकले

(२८) श्री. चेतन तुपे

(२९) श्री. महेश (दादा) लांडगे

(३०) श्री. सुनील भुसारा

(३१) श्री. जयंत पाटील (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**(१३) श्री. समाधान आवताडे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

ॲड.आशिष शेलार वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"बृहन्मुंबई मनपाचे एस वॉर्ड मध्ये अनधिकृत बांधकामात प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, याबाबत एस वॉर्डचे सहाय्यक आयुक्त यांना लोकप्रतिनिधींमार्फत तक्रार करूनही त्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, किंबहुना सदर अनधिकृत बांधकामांना वाढीस वाव मिळेल अशा पध्दतीने सहाय्यक आयुक्तांचा कारभार सुरुच असणे, सहाय्यक आयुक्त, एस वॉर्ड यांच्या मनमानी कामकाजाबाबत,

बेजबाबदार वर्तनाबाबत तसेच अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्याच्या गैरकृत्याबाबत नागरिकांनी वरिष्ठांना दिलेली निवेदने, तरीही सहाय्यक आयुक्त, एस वॉर्ड यांच्याविरुद्ध तक्रारींची वरिष्ठांकडून दखल न घेणे, पर्यायाने नागरिकांना अन्यायाविरुद्ध दाद मागण्यास कोणताही पर्याय नसणे, सहाय्यक आयुक्तांचा अरेरावीपणा, मनमानी कारभार, बेकायदेशीर कामकाज याबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, सदरहू अनधिकृत बांधकामांची सखोल चौकशी सनदी अधिकाऱ्यांमार्फत करण्याची नितांत आवश्यकता, तसेच दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करून, उपरोक्तबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांच्या वतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(१४) श्री. रमेश कोरगांवकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

**ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"भांडुप (प.) विधानसभा क्षेत्रातील ईस्टन सबर्ब डीपी शीट क्रमांक ४५ मधील सी.टी. एस. क्र. १ (ई.पी क्र. ईपी –एस १२९ ) या क्षेत्राला एनडी झोन मधून वगळून विशेष विकास क्षेत्र म्हणून २०३४ च्या विकास आराखड्यात दर्शवून ईपीएस-१२९ नुसार प्रस्तावित करण्यात येणे, या क्षेत्रामध्ये गेल्या ५० ते ६० वर्षांपासून गोरगरीब व मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे नागरिक वास्तव्यास असणे, या नागरिकांना महाराष्ट्र विद्युत वितरणामार्फत विद्युत पुरवठा, जलजोडणी महानगरपालिकेकडून देण्यात येणे, त्याचबरोबर मतदारयादीत या नागरिकांची नांवे असून वर्षानुवर्षे मतदानाचा हक्क बजावीत असणे, या क्षेत्राचा विकास व्हावा याकरिता लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा करून तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शासनाकडे पत्रव्यवहार, पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, सदरहू नागरिक आपल्या मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असणे, सदर जागेवर नागरिकांच्या सुविधांकरिता शाळा, हॉस्पिटल, उद्यान इत्यादी प्रकल्प शासनातर्फे राबविण्याची गरज, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सदर भूखंडावर विकास आराखडा २०३४ मध्ये दर्शविण्यात आलेले ईपी-एस-१२९ वगळण्याबाबत योग्य ते आदेश होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांच्या वतीने) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(१५) सर्वश्री प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले.

"पनवेल (ता.पनवेल) येथील अतिशय महत्त्वाचे मानले जाणारे राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाला मंजुरी मिळून बराच कालावधी होवून सुद्धा अद्यापपर्यंत नूतनीकरणाच्या कामाला सुरूवात झाली नसल्याचे माहे मार्च, २०२३ रोजी निदर्शनास येणे, अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या या बस आगारात अनेक प्राथमिक पायाभूत सुविधांअभावी बस चालक, प्रवासी तसेच नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे, कोविड १९ च्या पूर्वी तसेच कोविड १९ च्या काळात जवळपास दोन वर्षे बस आगाराच्या नूतनीकरणाचे काम ठप्प झालेले असणे, सद्यःस्थितीत सर्वच व्यवहार व विकासकामे सुरू झाली असणे परंतु मंजुरी मिळालेल्या पनवेल बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाला सुरूवात झाली नसणे, सदर बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनसुद्धा संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळेच बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाला विलंब होत असणे, त्यामुळे बस आगारातील अनेक गैरसोयींमुळे नागरिक व प्रवाशांमध्ये पसरलेल्या चिडीच्या व असंतोषाच्या भावना, शासनाने तातडीने लक्ष घालून पनवेल बस आगाराचे नूतनीकरण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री [मुख्यमंत्री यांच्याकरिता (परिवहन)] यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी क्र. ६ उद्या चर्चेस घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**(१६) श्री. भीमराव केराम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीला पौराणिक इतिहास असणे, आदिवासी संस्कृतीचे जतन करण्यासाठी व समाजातील युवकांना आदिवासींची अस्मिता, परंपरा व रितीरिवाज माहीत व्हावेत याकरिता संग्रहालयाची आवश्यकता असणे, आदिवासींचे जीवन व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या मौल्यवान व दुर्मीळ वस्तू, आदिवासींचे दागदागिने, देवदेवता, मुखवटे, शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू व पारंपरिक पोशाख यांचे संवर्धन करण्याकरिता संग्रहालयाची आवश्यकता असणे, केंद्र शासनाने संग्रहालयाच्या उभारणी करिता दोन टप्प्यात सुमारे २१ कोटी रुपये मंजूर असणे, तथापि जागेअभावी संग्रहालयाचे काम रखडले असल्याचे निदर्शनास येणे, मिळालेल्या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्या जागेला सुरक्षा भिंत बांधण्याची आवश्यकता, आदिवासींना संग्रहालयापासून वंचित ठेवण्यात आल्याने समस्त आदिवासींमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३**

**(अ) (१) श्री. महेश शिंदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"महाराष्ट्राचे दैवत असलेल्या खंडोबा व ज्योतिबा आणि इतर देवस्थाने ही लाखो भाविकांची श्रद्धास्थाने असणे, या देवतांची पूजा ही भंडाऱ्याची आणि गुलालाची उधळण करत करणे, परंतु पिवळ्या व लाल रंगाच्या घातक केमिकलचा वापर भंडारा व गुलालामध्ये करण्यात येणे, या भंडाऱ्याची विक्री ही देवस्थानाच्या बाहेर करण्यात येत असून सदरचा भंडारा हा हळद समजून भंडाऱ्याचा वापर पूजेला व अंगावर लावण्यासाठी करण्यात येणे, परंतु सदरचा भंडारा हा शरीरासाठी अपायकारक असून लाकडाच्या भुश्श्यामध्ये अत्यंत घातक अशी रसायने त्यामध्ये मिसळून पिवळा व लाल रंग आणण्यात येणे, सदरची रसायने ही कॅन्सरला आणि श्वसनाच्या रोगाला उद्युक्त करणारी असून यावरती तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, भंडाऱ्याच्या जागेवर शेतकऱ्यांनी पिकविलेली खरी हळद वापरली तर हळदीच्या गुणधर्मांनुसार सदर भक्तांच्या शरीरावर चांगला परिणाम होईल आणि शेतकऱ्यांच्या हळदीला एक चांगली बाजारपेठ मिळून शेतकऱ्यांना याचा फायदा होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"मुंबईतील विभागांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात नाल्याचे रुंदीकरण व डी.पी.रोड रुंदीकरणामध्ये अनेक झोपडपट्टीधारक बाधित झालेले असणे, सदर झोपड्या या सन २०११ च्या झोपडपट्टी नियमात (सशुल्क) पात्र असणे, सदर नियम २०११ च्या झोपडपट्टीधारकांना (एस.आर.ए.) लागू होत असणे, परंतु सदर प्रकल्पबाधित सशुल्क पात्र झोपडीधारकांना त्यांची अनामत रक्कम किती याबाबत माहिती देण्यात आलेली नसणे, पंतप्रधान आवास योजनेतून किती रक्कम मिळणार, महाराष्ट्र शासनाकडून किती रक्कम देण्यात येणार व झोपडीधारकांकडून किती रक्कम अनामत घेण्यात येणार याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतलेला नसल्यामुळे उक्त बाधित झोपडीधारक अद्यापही संभ्रमात असणे, मालाड येथील पोयसर नदी व डी.पी. रोड रुंदीकरण बाधित झोपडीधारक हे पात्र असतांनाही केवळ शासनाने सशुल्क पात्रतेसाठीचे शुल्क निश्चित केले नसल्यामुळे सदर झोपडीधारक हक्काच्या घरापासून वंचित असणे, शासनाने यासंदर्भात तात्काळ निर्णय घेऊन मालाड येथील उक्त झोपडीधारकांना हक्काचे घरे देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. राहुल आहेर, वि.स.स. यांनी, "ग्रामीण भागांमध्ये रुग्णवाहिकेमधून शव नेण्यासाठी परवानगी देण्याबाबत शासन निर्णय घेणे" इ. बाबत दिलेली लक्षवेधी सूचना नगरविकास विभागाऐवजी चुकून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे गेल्यामुळे सार्वजनिक आरोग्य मंत्री त्याबाबत सभागृहाला थोडक्यात माहिती देतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेतील विषयाबाबत माहिती दिली.

सदर विषयातील बाब शासनाने तपासून घ्यावी असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**(३) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"अमरावती शहर "ड" वर्ग महानगरपालिका असून आजची लोकसंख्या ८ लक्ष असून सन १९८३ पासून अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मजीप्रा मार्फत पाणीपुरवठा करण्यात येत असणे, अमरावती शहरापासून ५५ कि.मी. दूर असलेल्या अप्पर वर्धा धरण, मोर्शी येथून शहराकरिता पाणीपुरवठा करण्यात येत असणे, अस्तित्वातील योजना सन १९८६ मध्ये मंजूर झाली असून १९९४ ला कार्यान्वित करण्यात येणे, अमृत १.० मध्ये केवळ शहरांतर्गत वितरण व्यवस्था, जलशुद्धीकरण केंद्र व उंच साठवण टाक्या अस्तित्वातील १५६ दशलक्ष प्रवाह क्षमतेची जलवाहिनी विचारात घेवुन प्रस्तावित करण्यात येणे, यामुळे योजनेतील ३१ कि.मी. लांब पी.एस.सी. गुरुत्ववाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्यमान सन २०२४ मध्ये संपत असून ही पाईपलाईन कमकुवत झाल्यामुळे वारंवार फुटत असून व दुरुस्तीकरिता शहराचा पाणीपुरवठा ३-४ दिवस खंडित राहत असल्याने ही योजना अमृत २.०० योजनेतून करण्यासाठी मागील ३ वर्षापासून वारंवार मागणी करूनही व जिल्हा स्तरावर याबाबतचा प्रस्ताव दोन वेळेला राज्य शासनाकडे पाठवूनही या प्रस्तावाला मान्यता देण्यात न येणे, जुनी जीर्ण झालेले आयुष्यमान संपुष्टात आलेली सिमेंटची गुरुत्ववाहिनी बदलणे अत्यावश्यक असून त्या सोबतच अतिरिक्त ऊर्ध्ववाहिनी क्षमता वाढविण्याकरीता अंथरणे आवश्यकता असताना या योजनेला अमृत २.०० या मधून मान्यता मिळत नसल्यामुळे ही योजना पूर्ण करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे अमरावती शहराला पाणी पुरवठ्यापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली भीती, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून अमरावती शहरासाठी नियोजित पाणीपुरवठा योजनेला अमृत २ अंतर्गत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून सदर योजना तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"नाशिक जिल्ह्यातील सिन्नर नगरपरिषदेतर्फे शहरात करण्यात आलेल्या विविध विकास कामांमध्ये निकृष्ट दर्जाची कामे करणे, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष कामे न करताच कागदोपत्री पूर्ण केल्याचे दाखविणे, तर काही कामे पूर्ण होण्याआधीच ठेकेदाराला आगाऊ निधी अदा करून नगरपालिका मुख्याधिकारी श्री.केदार व सबंधित

अधिकारी, कर्मचारी यांनी शासकीय निधी हडप करून भ्रष्टाचार केल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, पाणी पुरवठा योजनेच्या देखभालीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक अवास्तव प्रमाणात ७२ लाख रुपये खर्च मंजूर करणे, नगरपरिषद हद्दीत सूर्योदय संकुलाचे इमारतीस पार्किंगची व्यवस्था न करता आर्थिक संगनमत करून बांधकाम करण्यास परवानगी देणे व पूर्णत्वाचा दाखल घेणे, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जमीन खरेदीत मर्जीतल्या लोकांनी सन २०१७ मध्ये ८७ लाख ५० हजार रुपयाला घेतलेली जमीन याच लोकांकडून अवघ्या दोन महिन्यात १ कोटी ८४ लाख ९२ हजार किंमतीला नगरपालिकेला विक्री करून ९७ लाख ४२ हजार रुपये निधीचा अपहार करणे, शहरातील सरस्वती नदीपात्राचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या १.७५ लाख रुपये इतका निधी कोणतेही काम न करता ठेकेदारास देयक अदा करणे, सौंदर्यीकरण कामाऐवजी नदीपात्रात अतिक्रमण करून नदीचे पात्र छोटे केल्याचा प्रकार घडणे, दयानंद बारादरी मठ दशक्रिया विधीच्या जागेवर शेडचे काम न करताच मंजूर केलेला ४८ लाख रुपये निधी हडप करणे, घनकचरा उचलण्यासाठी पालिकेने खरेदी केलेल्या टाटाच्या ४०७ गाड्यांचा वापर न करता ५० हजार रुपये दरमहा भाड्याने ट्रॅक्टरने कचरा उचलण्यात येऊन याद्वारे शासकीय निधी हडप करून भ्रष्टाचार करणे, शहर हद्दीतील स्ट्रीट लाईटचे काम निकृष्ट दर्जाचे मटेरिअल वापरल्यामुळे वारंवार लाईट खराब होणे, धनलक्ष्मी पतसंस्थेजवळच १८ लाख रुपये खर्च करून तयार करण्यात आलेला रस्ता पूर्णपणे निकामी झाला असून त्याची क्वॉलिटी कंट्रोलकडून ऑडिट करण्याची होत असलेली मागणी, सदरहू भ्रष्टाचार प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांना दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी लेखी तक्रार देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, महिला कर्मचाऱ्यांशी अत्यंत उद्धटपणे वागणे, विचारलेल्या प्रश्नांची चुकीची उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभूल करणे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून नगरपरिषदेच्या सबंधित दोषी अधिकारी यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“शहरातील स्व. श्रीमती इंदिरा गांधी स्मृती उप जिल्हा रुग्णालयात ॲडमिट केलेल्या ९ महिन्यांच्या गर्भवती सविता दिनेश यादव यांचा रुग्णालयातील डॉक्टरांच्या व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी मृत्यू होणे, दिनांक १७ नोव्हेंबर रोजी नैसर्गिक बाळंतपणाची वाट न बघता चुकीच्या पद्धतीने सीझेरियन केल्यामुळे केल्यामुळे व बाळंतपणानंतर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी आई व बाळाची नर्सिंग केअर नीट न घेतल्यामुळे मृत्यू ओढावणे, ९९% रुग्णाची तब्येत खराब झाल्यानंतर त्यांना कळवा हॉस्पिटलला रेफर करण्यात येणे, कळवा रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णाची पूर्ण तपासणी केल्यानंतर बाळंतपणानंतरच्या देखभाल करण्यात

दिरंगाई केल्याने मृत्यू झाल्याचा उल्लेख असणे, स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे असे प्रकार वारंवार घडत असणे, तसेच मागे एकदा रुग्णालयातील प्रसूती विभागातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून गर्भवती महिलेला रुग्णालयात भरती न केल्याने गर्भवती महिलेला इतरांनी सहाय्य केल्यामुळे रात्री ११.०० वाजता रुग्णालय आवारात प्रसूती होणे, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेनंतर बाळंतीण आईची स्थिती गंभीर झाल्यावर तिला मुंबई येथील रुग्णालयात दाखल करावे लागणे, सदर प्रकरणी महिलेचे पती श्री. अफसर शेख यांनी रुग्णालयातील कर्मचारी व डॉक्टर यांच्या हलगर्जीपणाविरुद्ध शांतीनगर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करणे, स्व. श्रीमती इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय परिसरातील रुग्णांच्या सेवेकरिता अपुरे असल्याने इमारतीचे विस्तारीकरण नूतनीकरण व दुरुस्ती इत्यादी कामे करण्याचा रु.२२.९५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असणे, इमारतीचे दरवाजे खिडक्या बदलणे, इमारतीच्या तळमजल्याची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याची व सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे, इमारतीच्या परिसरात पेवर ब्लॉक बसविणे, कंपाऊंड वॉल तयार करणे, इमारतीचा दर्शनी भाग तसेच इमारतीच्या आवारातील रस्ते व संरक्षण भिंत तयार करणे इ. स्थापत्य कामांकरिता रु.१२.२६ कोटी रुपयांची तरतूद असणे व इमारतीतील विद्युत कामांकरिता रु.१०.५९ कोटी रुपयांची तरतूद झालेली असणे, कामे करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या सुचविलेला इमारत नकाशा वास्तुशास्त्रज्ञ महाराष्ट्र शासन मुंबई यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ च्या पत्रान्वये मंजूर केला असून रुग्णालयाच्या दुरवस्थेसह नागरिकांना उत्तम सेवा सुविधा मिळण्याकरिता शासन स्तरावर करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

"जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे एन.एल. हेल्थ केअर सोलापूर या संस्थेला सन २०२२-२३ मॉड्युलर ओ.टी. व लेबर रुमचा २३ कोटी रुपयांचा पुरवठा आदेश देण्यात आलेला असणे, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी कुठल्याही प्रकारे निविदेद्वारे खरेदी न करता ८०% आगाऊ रक्कम देणे, कंत्राटदार सोबत संगनमत करून शासनाची करोडो रुपयांची केलेली तफावत, निकृष्ट साहित्य देणे, खोटे बिल सादर करणे, कोव्हिड काळात निष्काळजीपणा करणे, ही बाब लक्षात घेता दिनांक २६/२/२०२३ ला कंत्राटदार यांना सक्तीची नोटीस बजावणे, कंत्राटदार व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी मोठ्या प्रमाणामध्ये बिले काढणे, पुन्हा या वर्षाचा सन २०२३ चा कंत्राट त्यांनाच देणे, याबाबत तातडीने मागील वर्षाची चौकशी करून या वर्षाचा कार्यारंभ आदेश रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्याच्या २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी सुमारे २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, तरी वर्षभरात एकूण तरतुदीच्या ५० टक्केही खर्च झालेला नसल्याची धक्कादायक बाब दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध शैक्षणिक योजनांवरील खर्चातही घट झाल्याचे समोर येणे, राज्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक यांच्यासाठी आर्थिक व शैक्षणिक उन्नतीच्या २३० योजना राबविल्या जात असणे, त्यात १५४ राज्य शासन अर्थसहाय्याचे व ७६ केंद्रीय अर्थसहाय्याच्या योजना असणे, राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर या योजना राबविल्या जात असणे, २०२०-२१ मध्ये अनुसूचित जातींसाठी ९ हजार ६६८ कोटी रुपये तरतूद करण्यात येणे, त्या वर्षात खर्च ६ हजार ४६१ कोटी ८४ लाख रुपये झालेला असणे, २०२१-२२ मध्ये तरतूद १० हजार ६३५ कोटी, खर्च ८ हजार ८२८ कोटी ४९ लाख करण्यात येणे, २०२२-२३ मध्ये (चालू अर्थसंकल्प) १२ हजार २३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, परंतु १५ फेब्रुवारीपर्यंत ४ हजार ५८१ कोटी रुपये खर्च झाला असणे, म्हणजे ५० टक्क्याहून कमी खर्च झाला असल्याचे उघडकीस येणे, अनुसूचित जातींसाठी विविध शैक्षणिक योजना राबविल्या जात असणे, त्यापैकी देशांतर्गत व परदेशातील विद्यापीठांमधून उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती या नावाने दिली जात असणे,२०२१-२२ मध्ये देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी १४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे त्यावर ३ कोटी रुपये खर्च करण्यात येणे. २०२२-२३ मध्ये मात्र लाभार्थी विद्यार्थी संख्येत घट झाली असून या वर्षात ७० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे, त्यावर ९८ लाख रुपये खर्च करण्यात येणे, परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठी २०२१-२२ मध्ये २१० विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवर ५३ कोटी रुपये खर्च करण्यात आला असल्याचे उघडकीस येणे, त्यामुळे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना व विद्यार्थ्यांना विकासापासून रोखण्याचा केला जात असलेला जाणीवपूर्वक प्रयत्न, अनुसूचित जाती व जमातीच्या वर्गामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व असुरक्षिततेची भावना,याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

८) श्री. बच्चू कडू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"अचलपूर जिल्हा अमरावती येथील फिनले मिल कोविड १९ चे कारण देऊन सन २०२० पासून बंद असणे, मिल मधील कामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली असणे, राष्ट्रीय मिल मजदूर संघ व स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी वारंवार केंद्र व राज्य शासनास फिनले मिल सुरु करणे बाबत निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही हालचाल न होणे, फिनले मिलचे कामगार याबाबत वारंवार आक्रमक होत आंदोलन करीत

असून कामगारांमध्ये मिल सुरू होत नसल्याने निर्माण झालेला प्रचंड असंतोष, मिल कामगारांच्या कुटुंबीयांची मोठया प्रमाणात होत असलेली परवड, राज्य शासनाने याप्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून मिल तातडीने सुरू व्हावी यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता, मागील अधिवेशनात फिनले मिल, अचलपूर सुरु करणे बाबत शासनाद्वारे आश्वासन मिळणे, आश्वासनावर शासनाद्वारे आजपर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे फिनले मिल कामगारांत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वस्त्रोद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. कैलास पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असणे, राज्य उत्पादन विभागांनी या दारू विक्रीकडे दुर्लक्ष करणे, यामुळे अवैध दारू विक्रीचे पेव फुटणे, या अवैध दारूमध्ये काही गुन्हे गोवा बनावटीची तसेच स्थानिक डुप्लिकेट दारू विक्रीस उपलब्ध असणे, यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणे, तसेच शासनाचा महसूलही बुडत असणे, जिल्ह्यात चौका चौकात अवैध दारू विक्री सुरु असणे, ड्राय डे च्या दिवशी बरेच नागरिक अवैधपणे दारू विकत असणे, या अवैध दारू विक्रीमध्ये बनावट तसेच गोवा बनावटीची दारू विक्रीसाठी उपलब्ध होत असणे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे या सर्व प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, पोलीस विभागाने याबाबत धडक मोहीम करत गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून अवैध दारू विक्री बंद करणे, पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात मर्यादा असल्यामुळे या अवैध दारू विक्रीला आळा घालण्याचे काम राज्य उत्पादन शुल्काचे असणे, परंतु राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अवैध दारू विक्रेत्यांकडून हफ्ते वसुली करण्यात येत असल्याचे उघडकीस येणे, तसेच काही ठिकाणी खाजगी व्यक्तींची अवैध दारू विक्रेत्यांकडून हप्ते वसुलीसाठी नियुक्ती करण्यात येणे, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी मुख्यालयी न राहता अन्य ठिकाणी वास्तव्यास असणे, यामुळे कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्यामुळे दिवसेंदिवस अवैध दारू विक्रेते निर्माण होणे, जिल्ह्यात नवीन ७५ परमिट रूम व बीअर शॉपी वितरित करणे, यामध्ये जवळपास पाच कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येणे, याबाबत जिल्ह्यातील नागरिकाकडे ऑडिओ क्लिप उपलब्ध असणे, यामुळे राज्य उत्पादन विभागाची प्रतिमा मलिन होणे, या भ्रष्टाचार प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असणे, शासनाने उक्त सर्व प्रकरणी तात्काळ चौकशी करून धाराशिव जिल्ह्यातील अवैध दारू विक्रीला आळा घाण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) सर्वश्री. कॅप्टन आर. तमिल सेल्वन व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महाराष्ट्र राज्याची सध्याची लोकसंख्या ही अंदाजे ११ कोटीच्या जवळपास असणे, राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी २.५ कोटी कुटुंब हे रेशनकार्ड धारक असणे, एकूण रेशनकार्ड धारकांपैकी १.७१ कोटी केशरी कार्ड धारक व ६२.६० लाख कुटुंब हे पिवळे रेशनकार्ड धारक असणे, यामधील अंदाजे ६५.३४ लाख कुटुंब हे केंद्र व राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत धान्य घेत असणे, केंद्र व राज्य सरकारकडून वेळोवेळी स्थानिक रेशन कार्यालयामार्फत आवश्यक रेशन सामग्री (धान्य) उपलब्ध होत असणे, परंतु काही रेशन दुकानदार हे फक्त ६०% नागरिकांना रेशन सामग्रीचे वाटप करीत असून उर्वरित ४०% नागरिक हे पात्र असून त्यांना रेशन मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, बहुतांश वेळा मशिनच्या तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांचे अंगठ्याचे ठसे स्वीकारले न गेल्यामुळे त्यांना रेशन मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, सदर बाबतीत नागरिकांची काही एक चूक नसताना देखील निव्वळ तांत्रिक कारणांमुळे त्यांना रेशन पासून वंचित रहावे लागत असणे, रेशन वाटपाच्या धोरणानुसार एकाद्या रेशन कार्डधारकाने काही कारणास्तव सलग ३ महिने रेशन न घेतल्यास त्यांचे रेशन मिळणे बंद होत असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात सरकार विषयी निर्माण होणारी अविश्वासाची भावना, रेशन वाटपाबाबतच्या सरकारच्या सदरच्या धोरणात बदल करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मौजे जिंती (ता. फलटण, जि.सातारा) येथील रयत शिक्षण संस्थेने जिंती येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची २ एकर जमीन सदर विद्यालयास जागेची अडचण असल्याने शाळेची इमारत व क्रीडांगणासाठी दिनांक १२ फेब्रुवारी, १९९० रोजी १६ हजार रुपयांत विकत घेतलेली असणे, कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १८/०२/१०९१ रोजी जिंती येथील जमीन शिक्षण संस्थेला देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली असणे, मा.खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी या प्रस्तावास स्थगिती आदेश दिला असतांना रयत शिक्षण संस्थेला ही जमीन देण्यात आलेली नसणे, परंतु आता मा.खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी स्थगिती आदेश उठविल्यामुळे मंडळ अधिकारी व तालुका फलटण यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी तहसीलदार, फलटण यांना २ एकर जागेचा ताबा रयत शिक्षण संस्थेस देण्याचे दिलेले निदेश, परंतु प्रांत अधिकारी, फलटण यांनी सदरची जागा शिक्षण संस्थेस देण्यास सुरु केलेली टाळाटाळ, त्यामुळे शाळेतील

विद्यार्थ्यांत व त्यांच्या पालकांत पसरलेली भीतीची भावना, सदर जागेचा ताबा रयत शिक्षण संस्थेस देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५१ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**सन्माननीय सदस्यांच्या सभागृह तसेच विधान भवन प्रसीमेमधील वर्तनाची मानके निश्चित करण्याच्या अनुषंगाने द्यावयाचा निर्णय तसेच सत्र कालावधीत मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्ताने विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सभागृहात ठराव संमत करणे याबाबत**

उपरोक्त मुद्याबाबत सर्वश्री अशोक चव्हाण, अजित पवार, हरिभाऊ बागडे, अभिमन्यू पवार, प्रकाश सोळंके, नाना पटोले, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका मांडली.

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त प्रस्तावावरील चर्चेमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांना सहभाग घेता आला पाहिजे आणि तो प्रस्ताव या सभागृहामध्ये एकमताने मंजूर झाला पाहिजे. त्यामुळे हा प्रस्ताव पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यामध्ये हा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल; तसेच दुसरी बाब अशी आहे की, दोन दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या आवारामध्ये घडलेल्या घटनेसंदर्भात उपसभापती, विधान परिषद यांच्याशी चर्चा करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल व तो सभागृहाला अवगत करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**१.** (अ) (१) एक तारांकित प्रश्नचे उत्तरे देण्यात आले. (उपप्रश्न अपूर्ण)

श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी, "दोन दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या आवारामध्ये घडलेल्या आंदोलनाप्रकरणी निरपेक्ष निर्णय देण्याची आवश्यकता" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

'याबाबत पीठासीन अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन संयुक्तरीत्या निर्णय घेतला जाईल' असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) प्रधान सचिवांनी, शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

(क) (१) महसूल मंत्र्यांनी, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.दौलत दरोडा, वि.स.स. यांचा "आमगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील जमीनदाराने इनामात मिळालेली जागा शासनाची पूर्वपरवानगी न घेता विकल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३९३५४ ला उत्तर देताना दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(२) उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.राजन साळवी, वि.स.स. यांचा "ओणी-अणुस्कुरा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ५७४३३ ला उत्तर देताना दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) उपमुख्यमंत्र्यांनी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) महाराष्ट्र शासनाद्वारे लोकसेवांचे वितरण यावरील अहवाल तसेच (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीतल्या विशेष लेखापरीक्षणाचा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) वने मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या. (उपकंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचे सन २०१९-२०२० चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** प्रधान सचिवांनी, विधान परिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेली ९ विधेयके तसेच विधान परिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केलेली ४ विधेयके आणि राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या ४ विधेयकांची यादी सभागृहाला वाचून दाखविली.

**४.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, बीबीसीने प्रकाशित केलेल्या माहितीपटाबाबत पुढील निंदाव्यंजक ठराव मांडला.

"दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी बीबीसीने आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान आणि भारतीय प्रजासत्ताकावर हल्ला करण्याच्या एकमेव कारणास्तव प्रकाशित केलेल्या लाजिरवाण्या माहितीपटाचा भाग प्रसिद्ध केला. हे सभागृह या माहितीपटाच्या प्रकाशनाचा तीव्र निषेध करते. या सभागृहाच्या सदस्यांचा असा विश्वास आहे की, गुजरात येथे सन २००२ मध्ये घडलेल्या घटनांचे खोटे व काल्पनिक चित्रण करून बीबीसी ने भारताच्या न्यायिक संस्थांना तडजोडीच्या संस्था म्हणून रंगवले आहे. हे सभागृह ठामपणे प्रतिपादन करते की, भारताची न्यायव्यवस्था त्याच्या

सर्वोच्च न्यायालयापासून ते त्याच्या अधीनस्त न्यायालयांपर्यंत अत्यंत मुक्तपणे प्रकरणांचा निवाडा करते. तथापि, दिनांक २४ जून, २०२२ रोजीच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडे पूर्णतः दुर्लक्ष करून बीबीसी खोट्या कथांचा छडा लावत आहे. अशी कृती म्हणजे भारताच्या न्यायिक अधिकाराच्या अखंडतेवर थेट हल्ला आहे. बीबीसी ने भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या तुलनेत न्यायिक शहाणपण असलेले अपीलीय न्यायाधिकरण म्हणून स्वतःला प्रभावीपणे लादण्याचा प्रयत्न केला आहे. बीबीसीचा हा माहितीपट न्यायालयाचा पूर्ण अवमान मानला जातो. कारण त्याने न्यायालयाच्या तर्कशक्ती आणि क्षमतांना खारीज केलेले आहे व धोक्यात आणलेले आहे. भारताची अखंडता धोक्यात आणण्याचासुद्धा या माहितीपटाचा हेतू आहे. त्यामुळे हे सभागृह सदर माहितीपटाचा आणि बीबीसीचा या ठरावाद्वारे तीव्र निषेध करीत आहे.”

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी, “कॅग अहवालातील काही विशेष निरीक्षणे किंवा वैशिष्ट्ये सभागृहासमोर ठेवणे,” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपमुख्यमंत्र्यांनी कॅग अहवालाबाबत थोडक्यात मुद्दे मांडले.

**५. (अ) पुरःस्थापनार्थ –**

उपमुख्यमंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे –**

(१) गृह मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव श्रीमती आदिती तटकरे, वि.स.स. यांचा, तिसरा प्रस्ताव श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा, चौथा प्रस्ताव सर्वश्री अमित झनक, संग्राम थोपटे, संजय जगताप, विकास ठाकरे, शिरीषदादा चौधरी, अमिन पटेल, डॉ.नितीन राऊत व श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा, पाचवा प्रस्ताव श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा, सहावा प्रस्ताव सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, धनंजय मुंडे व अनिल पाटील वि.स.स. यांचा, सातवा प्रस्ताव श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा, आठवा प्रस्ताव श्री.बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा व नववा प्रस्ताव सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचे असे सर्व प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत कोणीही भाग घेतला नाही.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंड २ ते ६ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(ब) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे –**

(१) सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा, तिसरा प्रस्ताव श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा, चौथा प्रस्ताव श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा, पाचवा प्रस्ताव सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा, सहावा प्रस्ताव श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचा व सातवा प्रस्ताव श्री. सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत कोणीही भाग घेतला नाही.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंड २ व ३ (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**६.** (१) श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पश्चिम येथील जुन्नत नगर, समता नगर व खजूरवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा अंतर्गत ई-मेल अशोक इंटरप्राईजेस व झोपडपट्टीधारक यांच्या १९९६ साली विकासकरारनामा झालेला असणे, १९९८ साली विकासकांनी स्वतः झोपडीधारकांना विश्वासात न घेता बसायरा घर निर्माण संस्था प्रस्तावित नामक संस्था स्थापन केलेली अस्णे, सदर जागा ही खाजगी असून जागेच्या मूळ मालकाची ना हरकत किंवा खरेदी पत्र न केलेले असणे, २००३ साली सदर विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला प्रस्ताव सादर करून सदर ठिकाणी परिशिष्ट दोन तयार करत असताना कोणत्याही प्रकारची स्थळ पाहणी किंवा बायोमेट्रिक सर्वे जागेवरती न केलेला

असणे, सदर विषयावर मा.उच्च न्यायालयामध्ये स्टे ऑर्डर असतानाही जागेवर ४० पेक्षा अधिक झोपड्या तोडून सदर ठिकाणी अनधिकृत ट्रान्झिट कॅम्प उभा केलेला असणे, सदर प्रकल्प हा २०१९ साल पर्यंत प्रलंबित असून त्यामध्ये कोणतेही कारवाई न होणे, स्थानिक झोपडपट्टी धारकांनी २०१९ साली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला तक्रार केलेली असल्यामुळे परिशिष्ट दोनच्या विषयी तक्रार केलेली असून तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी जाहीर नोटीस काढून सदर परिशिष्ट दोनची पुनर्पडताळणी केलेली असणे व त्या पुनर्पडताळणी मध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी व चुका आढळल्या असून जागेवरची परिस्थिती व तयार केलेले परिशिष्ट दोन यामध्ये मोठी तफावत आढळून आलेली असणे, जागेवर घरे नसताना बोगस घरे परिशिष्ट दोन मध्ये दाखवण्यात आलेली असणे हे निष्पन्न होणे, ३०० झोपडपट्टीधारक आजतागायत त्या जागेवर असणे, ९५६ च्या परिशिष्ट दोन मधील फक्त ३०० मूळ झोपडपट्टी-धारक जागेवर बसले आहे अशी बाब लक्षात आल्यामुळे सदर परिशिष्ट दोनच्या आधारावरती सदर पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात अशक्य असणे, आणि त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सचिव यांनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये नव्याने बायोमेट्रिक सर्वे करण्याचे आदेश दिले असता जून २०२२ मध्ये सदर विभागाचा बायोमेट्रिक सर्वे पूर्ण होऊन नवीन बायोमेट्रिक सर्व्हे नुसार नवीन परिशिष्ट दोन तयार करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर जुने परिशिष्ट दोन रद्द करून सदर प्रकल्पाला चालना देण्यासंदर्भामध्ये शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. सुनील राणे व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनील राणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबईतील बंद पडलेल्या ५८ गिरण्यांमधील कामगारासाठी व त्यांच्या वारसासाठी सवलतीच्या दरात घरे कामगारासाठी करून देण्याच्या दृष्टिने आता पर्यंत सन २०१२, २०१६ व सन २०२० अशी तीन वेळा १७ हजार घरांची सोडत देणे, उर्वरित १ लाख ७० हजार गिरणी कामगार हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत असून बंद पडलेल्या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांना म्हाडाने बांधलेल्या घरापैकी ६९२५ घराची पहिली सोडत दिनांक २८ जून, २०१२ मध्ये काढण्यात आली व घराचे वाटप केले परंतु सन २०२० मधील सोडतीपैकी घराचे वाटप अजूनही झालेले नसणे, कोनगाव, पनवेल येथील घरासाठी डिसेंबर, २०१६ मध्ये सुमारे २ हजार घरासाठी पैसे भरून ही अनेकांना घरे मिळालेले नसणे, गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना घरे मिळण्यासाठी व गिरणी कामगारांच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी गिरणी कामगार संघटना गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष करीत असून, अर्ज केलेल्या १ लाख ७० हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी ठोस आराखडा तयार एन टी सी मिलच्या गिरण्यांची जमीन घरासाठी उपलब्ध करून देणे, श्रीनिवास आणि श्रीराम मिलच्या गिरणी कामगारांची कायदेशीर देणी देणे, स्वानच्या तिन्ही गिरण्यातील कामगारांना लवकर घरे देणे, खटाव मिलची जमीन डी.सी.आर प्रमाणे घरांसाठी देणे, कोनगाव पनवेल येथील घरे २ हजार ४१७ गिरणी कामगारांना वितरित करणे, बॉम्बे डाईंग व

श्रीनिवास मिलच्या कामगाराची पात्रता निश्चित करून घरांचा ताबा देणे, न्यू ग्रेट हिंदुस्थान व मुकेश मिलची जागा डीसीआर प्रमाणे घरासाठी देणे, गिरण्या चाळीतील रहिवाशांचे पुनर्वसन त्वरित करणे त्यामुळे तातडीने दखल देऊन गिरणी कामगारांना न्याय देण्याची मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील १२ गावांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने कळमजाई शेती जलउपसा सिंचन परियोजना भीमाशंकर योजनेचे सर्वेक्षण करण्यात येणे, त्यानुषंगाने सर्वेक्षण पूर्ण होऊनही गेल्या ८ महिन्यांपासून योजनेचे काम अद्याप सुरू झाले नसणे, डिंभे धरणातील पाणी ६ टक्के प्रवाही उपसा सिंचनासाठी व १४ टक्के ठिबक तुषार उपसा सिंचनासाठी एकूण २० टक्के प्रकल्पीय पीक रचनेच्या क्षेत्रानुसार १ हजार २ हेक्टर प्रवाही आणि ६९४ हेक्टर ठिबक द्वारे देण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाकडून मंजुरी मिळाली असणे, गोहे खु., गोहे बु., राजेवाडी, पोखरी, चिखली, जांभोरी, नंदरकिचीवाडी, फळोदे, तळेघर, राजपूर, गाडेवाडी, तेरूगण, निगडाळे या गावांतील सिंचनाला फायदा होणार असून सदरची गावे आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण परिसरातील १०० टक्के आदिवासी बहुल गावे असणे, कळमजाई शेती जलउपसा सिंचन परियोजना भीमाशंकर ही योजना त्वरित सुरू झाल्यास आदिवासी बांधवांना सामाजिक न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी मदत होणार असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) डॉ. पंकज भोयर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"जिल्ह्यात बोर व धाम हे सिंचनाच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाचे प्रकल्प असणे, दोन्ही प्रकल्पांचा वर्धा जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना लाभ होत असणे, दोन्ही प्रकल्प जवळ जवळ ५० वर्षापेक्षा जास्त जुने असल्याने कालवे व वितरण प्रणाली जीर्ण झाली असणे, सदर प्रकल्पाची सिंचन क्षमता १६१९४ हे. असून देखील आजमितीस फक्त ११५८८ हे. पर्यंतच प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळत असणे, सदर कालवे जागोजागी फुटल्याचे निदर्शनास येणे, कालव्याचा प्रवाह विरुद्ध दिशेस होणे, शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असणे, कालवे प्रणाली जीर्ण झाल्यामुळे सिंचन क्षमता कमी झालेली असणे, कालव्यांची अस्तर प्रणाली जीर्ण झाल्यामुळे व गाळ साचल्यामुळे ४० टक्के पाणी पाझरात असणे, अस्तर प्रणालीची स्थिती बरोबर नसल्यामुळे पाण्याला शेवटपर्यंत जाण्यासाठी अडथळा येत असणे, त्यामुळे बरेचसे शेतकरी सिंचनापासून वंचित राहत असणे, यामुळे

पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असणे, करिता धरणातील गाळ काढणे आवश्यक असणे, धरणांची दुरुस्ती तसेच कालवे व वितरण प्रणालीची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, सदर प्रकल्पांतील पाणी सोडल्याने नदीकाठावरील बऱ्याचशा गावात पुराचे पाणी शिरत असणे, बऱ्याच वेळा गावातील लोकांच्या घरांमध्ये पाणी शिरुन जीवित व वित्त हानी होत असणे, प्रभावित गावांना सुरक्षित करण्याकरिता पुर संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक असणे, नदीपात्राचे खोलीकरण करणे आवश्यक असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत शासनाला वेळोवेळी निवेदनांद्वारे कळविण्यात येणे, सदर प्रकल्पांचे सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मुंबई उपनगरातील मागाठाणे, बोरिवली येथील महाकाली गृहनिर्माण संस्था व देवीपाडा गृहनिर्माण संस्था हा प्रकल्प गेल्या कित्येक वर्षापासून पुनर्विकासापासून वंचित असून सर्व झोपडीधारकांची घरे तोडण्यात येणे, तसेच या झोपडीधारकांना गेल्या कित्येक वर्षापासून भाडेही देण्यात न येणे, परिणामी झोपडीधारकांची आर्थिक ओढाताण होत असून करोना महामारीमुळे अत्यंत दयनीय अवस्था होणे, दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण भरणे अशक्य होत असल्याने आर्थिक विवंचनेतून दोन झोपडीधारकांनी आत्महत्या केली असून परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदरील प्रकल्प शासनाने हस्तांतरित करून नागरिकांना न्याय देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे केलेली मागणी, शासनाने संबंधित विकासकांवर कारवाई करून संबधित झोपडीधारकांना भाडे देण्याचे आश्वासन देऊनही अद्यापही संबधित विकासकांवर कारवाई करण्यात आली नाही तसेच झोपडीधारकांना भाडेही देण्यात आलेले नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. सुनील कांबळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"पुणे शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये निर्माण झालेल्या अडचणी विषयी बैठक लावण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त पुणे यांना दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजी विभागीय आयुक्त पुणे यांना पत्र देणे, परंतु सदर बैठकीचे आयोजन अद्याप पर्यंत न होणे. पुणे शहरात काशेवाडी, मंगळवार पेठ, लोहिया नगर, ताडीवाला रोड, नाना पेठ इत्यादी ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम

चालू असणे. यापैकी बरेच प्रकल्प अर्धवट अवस्थेत असणे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करणाऱ्या विकासकांच्या प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या हितसंबंधांमुळे प्रत्यक्ष झोपडपट्टी धारकांची विकासकाकडून वेगवेगळ्या प्रकारे अडवणूक करणे व पात्र असणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना सुद्धा घरापासून वंचित राहावे लागणे प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये सदर प्रकल्पावर देखरेख व तांत्रिक तपासणी करण्यासाठी स्वतःचे योग्य ते मनुष्यबळ नसल्यामुळे सदर प्रकल्पाच्या बांधकामाची तांत्रिक दृष्ट्या तपासणी न होणे, लोहियानगर येथील झोपडपट्टी धारकांना बिबवेवाडी येथे तात्पुरती राहायची व्यवस्था केली असतानाही त्या ठिकाणी सदर झोपडपट्टीधारकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे व लोहियानगर येथे होत असलेल्या प्रकल्पाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडलेले असणे, त्यामुळे येथील रहिवाशांना स्वतःचे घर मिळण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागणे, नाना पेठेतील प्रकल्प पूर्ण झालेला असून तेथे लाभधारकांना मिळालेल्या घरांमध्ये कोणत्याही सोयीसुविधा नसणे ताडीवाला रोड येथील पानमळा प्रकल्पातील झोपडपट्टी धारकाला विकसक व अधिकाऱ्यांच्या असलेल्या संगनमतामुळे पात्र असूनही अनेक वर्ष हेलपाटे मारायला लावून ही अद्यापपर्यंत त्यांना स्वतःच्या हक्काचे घर न मिळणे, या सर्व गोष्टींची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व गरीब झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री. राजेश एकडे व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ. संजय कुटे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“जिगाव प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्या अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील जिगाव गावाजवळ पूर्णा नदीवर प्रगतीपथावर असणे, प्रकल्पामध्ये १५ उपसा सिंचन योजना असणे, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव, शेगाव, जळगाव जामोद, संग्रामपूर, मलकापूर आणि नांदुरा या सहा तालुक्यातील २६८ गावातील व अकोला जिल्ह्यातील बाळापुर व तेल्हारा या दोन तालुक्यातील १९ गावातील असे एकूण ७८ हजार ५८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित असणे, मलकापूर विधानसभा क्षेत्रातील नांदुरा तालुक्यामधील हा प्रकल्प असून सुद्धा नांदुरा तालुक्यातील १४ गावे लाभक्षेत्रापासून वंचित असल्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने सदर १४ गावांचा लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याबाबत माननीय मंत्री जलसंपदा यांना निवेदनाद्वारे विनंती करणे, १४ वंचित गावांचा लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात दिनांक ५ मे, २०२२ रोजी तत्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीमध्ये जिगाव प्रकल्पाअंतर्गत मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील १४ गावांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव तपासून नियामक मंडळाची मान्यता घेऊन शासनास तीन महिन्यात सादर करण्याबाबतचे आदेश तत्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांचे मार्फत देण्यात येणे, परंतु आज रोजी पर्यंत यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न

झाल्यामुळे १४ गावांतील शेतकरी व नागरिक यांच्यामध्ये शासनाप्रति असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ज्यांच्या मतदारसंघात निम्न पेढी प्रकल्प येतो त्या लोकप्रतिनिधीने दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंधारण मंत्री यांना पत्र देऊन निम्न पेढी प्रकल्प तालुका भातकुली जिल्हा अमरावती या प्रकल्पाला उमा बॅरेजः प्रकल्पाला जिल्हा अकोला ज्याप्रमाणे रुपये ०८:२६ लक्ष रूपये विशेष बाब म्हणून लागू केले, त्याअनुषंगाने हे धोरण निम्न पेढी प्रकल्प या प्रकल्पास लागू करणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून शासन स्तरावरील त्याबाबत निर्णय घेण्याबाबत पत्र दिले असणे, शासनाने ही बाब गांभीर्याने घेऊन शासनाने संबंधित मागणी लक्षात घेता जलसंपदा विभाग या कार्यालयाचे व्हीआयपी पत्र क्रमांक २०२२/१९८/पत्र क्रं.३२८/मो प्र.-२/ दिनांक १४/१२/२०२२ रोजी च्या पत्रान्वये कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर, मुख्य अभियंता जलसंपदा विशेष प्रकल्प अमरावती व जिल्हाधिकारी अमरावती यांना वरील विषय प्रकरणी अहवाल मागवला असणे, कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्रमांक एक अमरावती यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक दिनांक २०/१२/२०२३ रोजीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पत्र पाठवून त्यांनी सदरची बाब ही जिल्हाधिकारी अमरावती यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावे असे शासनाचे निर्देश असल्याने त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव निर्णयात्मक व पुढील कार्यवाहीकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सविनय सादर करण्यात आला असणे, परंतु अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी अमरावती व कार्यकारी संचालक कार्यालय, नागपूर यांच्याकडून सदर प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला नसणे, ज्यामुळे वारंवार निम्न पेढी प्रकल्पग्रस्त शेतकरी यांनी संबंधित लोकप्रतिनिधी यांच्याकडे सातत्याने तगादा लावला असणे, सदर बाब ही निर्णयात्मक असल्याने तातडीने दोन्ही विभागाकडून प्रस्ताव प्राप्त करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाने निर्णयात्मक आदेश काढण्याची कार्यवाही या संबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, "गरीब रुग्णावरील उपचारात हलगर्जीपणा झाल्यास सभागृहाचा अवमान समजून कडक कारवाई करण्याचे माननीय अध्यक्षांनी दिलेले निदेश" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते) यांनी “राज्यातील महिलांच्या आरोग्य विषयक सुविधा’ इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस अनुलक्षून म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(९) श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“जळगाव जिल्ह्यातील अमळनेरसह ५ तालुक्यांसाठी महत्त्वाचा असलेल्या निम्न तापी पाडळसे प्रकल्प गेल्या २५ वर्षांपासून रखडलेला असणे, १९९७-९८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रकल्प रखडल्यामुळे प्रकल्पाचा खर्च पाचपटीने वाढलेला असणे, प्रकल्प रखडल्यामुळे दरवर्षी १०,००० दशलक्ष घनमीटर पाणी वाहून जाणे, ४२० दशलक्ष घनमीटर क्षमतेचा हा प्रकल्प पूर्ण झाल्यास ५४९३६ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार असणे, पाडळसे प्रकल्प स्थळावर सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नसणे, २९ डिसेंबर, २०२२ रोजी वाळू, खडी, डबर, माती, डिझेल, डीपी, लोखंड अशा ५ लाख रुपयांच्या साहित्याची चोरी होणे, तत्कालीन युती सरकारने या प्रकल्पासाठी नाबार्ड कडून १५०० कोटी कर्ज उपलब्ध झाल्याची घोषणा करणे मात्र ती फसवी ठरणे, या प्रकल्पासाठी सन २०२०-२१ आणि २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात २०० हून अधिक कोटी रुपयांची तरतूद केलेली असणे, यातून किरकोळ कामे सुरू असणे मात्र धरणाच्या मुख्य पिलरचे काम अद्याप सुरू झालेले नसणे, सद्यःस्थितीत प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असणे त्यासाठी ५३०० कोटी रुपये तरतूद करण्याची गरज, प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

१०) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“केंद्र व राज्य शासनाने कांदळवनाबाबत आपली भूमिका स्पष्ट केलेली असून पर्यावरणाची हानी होऊ नये याकरिता ज्या ठिकाणी कांदळवने असतील त्या ठिकाणी त्यांचे रक्षण करणे व जतन करणे याची जबाबदारी वन खाते व पर्यावरण खात्यामार्फत केंद्र व राज्य शासन करीत असणे, परंतु, काही ठिकाणी कांदळवनाचे संरक्षण होत असल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात विकास कामे करीत असताना फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, कारण त्यातील काही कांदळवनांची सीमा निश्चित केल्यानंतर पावसाळ्यामध्ये, अवकाळी पावसामुळे अथवा सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कांदळवनाच्या बिया शेतकरी शेती करीत असलेल्या शेताच्या काही भागामध्ये पसरल्यामुळे त्या ठिकाणी कांदळवनाची फार मोठ्या प्रमाणात वाढ असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करताना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असणे, त्याचबरोबर काही कच्च्या रस्त्यावर व अविकसित

भूखंडावर या बिया गेल्यामुळे शासनाच्या कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे सदरचा भूखंड विकसित होऊ शकत नसणे, अथवा रस्त्यांचे रुंदीकरणही होऊ शकत नसणे, तसेच ज्या भूखंडावर ही कांदळवने पसरली जातात त्या भूखंडधारकांना भूखंडाचा मोबदला हा टी.डी.आर. च्या स्वरूपात अथवा आर्थिक स्वरूपात मिळण्यासाठी देखील अडचणी निर्माण होत असणे, माझ्या ओवळा - माजिवडा विधानसभा मतदारसंघातील कांदळवनाच्या बाबतीत विचार केला तर मेट्रो-४ व मेट्रो-९ चे काम असो अथवा घोडबंदर किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारणीचे काम असो, त्याचबरोबर दहिसर-भाईंदर कोस्टल रोडचे काम असो अथवा गायमुख - कोलशेत कोस्टल रोडचे काम, एम.एम.आर.डी.ए. करीत असलेल्या घोडबंदर जेसलपार्क चौपाटी या ६० मीटर रस्त्याचे काम असो अथवा नागला बंदर व घोडबंदर खाडी किनारा विकसित करण्याचे काम, सुभाषचंद्र बोस मैदान विकसित करण्याचे काम असो अथवा घोडबंदर परिसरातील जेट्टीचे काम या सर्व विकास कामांना कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होणे, यावर उपाययोजना म्हणून शहरी भागातील या कांदळवनाची पूर्वीची सीमा रेषा निश्चित करून या कांदळवनांची वाढ भविष्यामध्ये विकास कामांवर परिणाम होऊ देऊ नये तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये किंवा भूखंड मालकांच्या खासगी भूखंडावर ही कांदळवने निर्माण झालेली आहेत त्यांना इतर शेतकऱ्यांप्रमाणे व इतर खाजगी भूखंड मालकांप्रमाणे आर्थिक व टी.डी.आर. स्वरूपातील मोबदला देण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्य व्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“मुंबई-वर्सोवा येथील वर्सोवा खाडीमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला असणे, तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी वर्सोवा खाडीतील गाळ काढण्यास ४.०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून गाळ काढण्यात येणे परंतु अंदाजे ५५ ते ६० लाख क्युबिक मीटर गाळ काढायचा राहिलेला असून सदर गाळामुळे मच्छिमारांना मासेमारी करणे कठीण जात असून बोटींच्या होणाऱ्या अपघातामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असणे, त्यामुळे सदरचा गाळ नियमित काढणे महत्त्वाचे असून वर्सोवा खाडीतील उर्वरित गाळ लवकरात लवकर काढण्याबाबत तसेच त्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

मत्स्य व्यवसाय मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१२) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"जळगाव महानगरपालिकेत असणारी अनुकंपा भरती दहा वर्षापासून रखडलेली असून अनुकंपा भरती यासंदर्भात मयत कर्मचाऱ्यांचे वारसदार खूप वर्षापासून मंत्रालय नगरविकास खात्याकडे पाठपुरावा करीत असणे, जळगाव महानगरपालिकेत सध्या कर्मचारी हे स्थायी आस्थापना व कर्मचारी असून कर्मचारी वीस ते पंचवीस वर्ष त्या ठिकाणी काम करून सुद्धा त्यांच्या वारसांना इतक्या वर्षांपासून त्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित ठेवण्यात आलेले असणे, जळगाव महानगरपालिकेला मंत्रालयामधून प्राप्त होत असणारा निधी याचे मनपा मधून वेळोवेळी दखल घेतली जात नसणे, जळगाव महानगर-पालिकेमध्ये नवी आकृतिबंधाचा प्रस्ताव अजून पर्यंत प्रलंबित असणे, तसेच मनपा मधील रिक्त पदे सध्या मनपा मध्ये १५०० हून अधिक पदे रिक्त असल्याचे आस्थापना विभागाकडून माहिती देण्यात आलेली असणे, या कामासाठी कर्मचारी नसल्यामुळे शहरातील नागरिकांचे गैरसोय होत आहे व त्याचा परिणाम महानगरपालिकेवर होत असणे, त्यामुळे नवीन सरळ सेवा भरती करणे शक्य होत नसल्यामुळे महानगरपालिकेमधील कामकाजावर त्याचा परिणाम होत असणे, तरी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी क्रमांक १५, १९, २० या सदस्य अनुपस्थितीमुळे मांडण्यात आल्या नाहीत.

(१३) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी उजनी धरण जलाशय उद्‌भव धरून पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आलेली असणे सदर योजनेद्वारे सोलापूर शहरास दररोज १७० द.ल.ली पाणी उपलब्ध होणार असणे सदर योजनेत मुख्यत्वे धरण क्षेत्रात जॅकवेल बांधणे, पंपींग स्टेशन व पंपींग मशिनरी, रायझिंग मेन, बी.पी.टी. ग्रॅव्हीटी मेन इ. कामांचा समावेश असणे, सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (उजनी धरण उद्‌भव-१७० द.ल.ली. क्षमता) असणे, लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग सर्व्हिसेस प्र.लि. कोल्हापूर यांना दि.२७.१०.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले होते परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२४.११.२०२२ रोजी जागेवरील काम थांबविण्याबाबत आदेश दिलेले असणे तसेच मागील ठेकेदार पोचमपाड कंपनी यांनी उर्वरित काम रु.६१५ कोटी मध्ये करण्यास इच्छुक असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. यांच्याकडे दि.५.१२.२०२२ पत्रांनी कळविले असून याबाबत दि. १५.१२.२०२२ रोजीच्या ३२ वी संचालक मंडळाची बैठकीमध्ये कायदेशीर मत घेणेबाबत ठरले, तसेच तो पर्यत ठेकेदार लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग सर्व्हिसेस प्रा.लि. यांना काम थांबविण्याचे निर्देश दिलेले असणे, कामाच्या अंमलबजावणी दरम्यान, कोव्हिड परिस्थितीच्या

प्रभावामुळे स्टील, सिमेंट आणि इंधनाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे कंत्राटदाराने काम सुरू ठेवण्यास असमर्थता दर्शविली, त्यामुळे, निविदेमध्ये कलमाचा समावेश न केल्यामुळे, दि.११.११.२०२१ रोजी सोलापूर स्मार्ट सिटीच्या २७ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत करार संपुष्टात आणण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, दि.२९.१२.२०२१ रोजी सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे कंत्राटदाराला अंतिम समाप्तीची नोटीस बजावण्यात येणे, याप्रकरणी ठेकेदार लवादाकडे गेलेले असणे, पुणे येथे लवादाची प्रक्रिया सुरू असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१४) श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ इतकी असणे, त्यापैकी आदिवासी जमातीची लोकसंख्या ही १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असणे, म्हणजेच राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के आदिवासींची लोकसंख्या असणे, अनुसूचित जमातीच्या यादीत ४५ जमाती शासनाच्या सवलती पात्र असताना देखील प्रत्यक्षात १२ जमातींनाच याचा लाभ मिळत असणे, त्यामुळे इतर जमातींकडून आदिवासी मंत्रालय व त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केला जात असणे, राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ९.३५ टक्के निधीची तरतूद दरवर्षी केली जात असणे, राज्याच्या लोकसंख्येप्रमाणे आदिवासी समाजास राजकीय आरक्षण ९ टक्के दिले असणे व शैक्षणिक आरक्षण ७ टक्के दिले असणे, परंतु पुणे, ठाणे, नाशिक, रायगड, अहमदनगर या पाच जिल्ह्यांतील ३८ तालुक्यांतील आदिवासी जमातींना खरे आदिवासी समजून कोणतेही पुरावे न पाहता, दक्षता पथक न पाठवता, कोणतीही सखोल चौकशी न करता जात वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, उर्वरित महाराष्ट्राच्या विस्तारित क्षेत्रातील एकाही आदिवासी जमातीला जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीने न देता कितीही पुरावे दिले तरी जात पडताळणी प्रमाणपत्र देताना वेगवेगळ्या पुराव्याची माहिती मागवून अडवणूक केली असणे,विशेषतः सोलापूर जिल्ह्यासहित संपूर्ण राज्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी, डोंगर कोळी ह्या सर्व जमाती आदिवासी समाजात मोडत असताना त्यांची वारंवार अडवणूक होत असणे, पडताळणी समितीच्या निर्णयाच्या विरोधात जे लोक मा.उच्च न्यायालयात जातात, त्यांना मात्र जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जातवैधता प्रमाणपत्र देत असणे, एकट्या सोलापूर जिल्ह्यात महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी,डोंगर कोळी लोकसंख्या ७७ हजार ५१३ इतकी असून यापैकी १०० लोकांनाही जातवैधता प्रमाणपत्र अद्याप दिलेले नसणे, यामुळे आदिवासी असून देखील या जमातींना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित रहावे लागत असणे, तसेच याचा फटका त्यांना राजकीय, शासकीय नोकऱ्या व शैक्षणिक, व अनेक शासकीय योजनांचा लाभ घेताना बसत असणे, यामुळे एकूण लोकसंख्येच्या ५.०४% म्हणजेच तब्बल ६१३८२०६ इतक्या लोकांमध्ये शासन व प्रशासन विषयी असंतोषाची भावना निर्माण होत असणे,याबाबत शासनाने ह्या जमातींना जात वैधता प्रमाणपत्र व इतर सर्व योजनांचा विनासायास लाभ देण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील भूमापन क्रमांक ६७०, ही जागा खाणीसाठी आरक्षित असणे, नोंद क्रमांक ११०८ प्रमाणे सदर जागा कराराने गौण खनिज काढण्यासाठी श्री.भागवत यांना ९९ वर्षाच्या कराराने देण्यात येणे, सदर जागा कराराने दिलेली असताना देखील सदर जागेवर गौण खनिजाचे उत्खनन न करता रहिवासी प्रयोजनासाठी वापर करणे, सदर जागेवरील महाराष्ट्र शासनाचे नाव कमी करून बेकायदेशीररित्या खाजगी व्यक्तींचे नाव समाविष्ट करणे, सदर जागेची परस्पर विक्री करणे, यासारखी बाबी झाल्यामुळे शर्तभंगाचा प्रस्ताव करून सदर जमीन शासन जमा करण्याची असणारी आवश्यकता, स्थानिक लोकप्रतिनिधी कडून वारंवार मागणी करून देखील, सदर जमीन शासन जमा करण्यास होत असणारा विलंब, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांचे या बाबीकडे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, सदर प्रकरणात झालेला मोठ्या प्रमाणावरील गैरव्यवहार, या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना, शासनाच्या सर्वांसाठी घरे या धोरणानुसार, हक्काची घरे उपलब्ध करून देण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, सदर जागा शासन जमा करून घेण्यासाठी तत्काळ शर्तभंगाचा प्रस्ताव तयार करून कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

महसूल मंत्र्यांनी, सदर लक्षवेधी सूचनेतील विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांच्या स्तरावर बैठक घेऊन निर्णय घेणे सुलभ होईल, असे सांगितले.

सदर मुद्याबाबत माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांच्या स्वतंत्र बैठक आयोजित करून त्याला संबंधित सन्माननीय सदस्यांनादेखील निमंत्रित करण्याची सूचना माननीय तालिका सभाध्यक्षांनी केली.

(१६) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"अहमदनगर शहरामध्ये स्थित दो बोटी चीरा मस्जिद जी एतिहासिक आहे व सदर मस्जिद नोंदणीकृत असणे, शहराच्या मधोमध असून मस्जिदीमध्ये न्यायालय असणे, न्यायालयाकरिता नवीन इमारत बांधून तेथे न्यायालयाचे स्थलांतर करूनही अद्यापर्यंत सदरची जागा मस्जीदिच्या संस्थेला देण्यात न येणे, हुसैनी मस्जिद, दो बोटी चिरा मस्जिद यांच्यामध्ये ५० फुटाचे अंतर असणे, सदर मस्जीदीच्या मध्ये अहमदनगर कोतवाली पोलीस स्टेशन

चालविण्यात येणे, तसेच याच वक्फच्या जागेवर नवीन कोतवाली पोलीस स्टेशन बनविण्यात येणे व अद्यापपर्यंत जुन्या मस्जीदीचा ताबा देण्यात न येणे, हातमपुरा अहमदनगर मधील बाबा बंगाली दरगाह जवळ २२ क्रमांकाची मस्जिदीच्या जागेवर जुने जिल्हाधिकारी कार्यालय बनविण्यात आलेले असणे, नवी इमारत बनून हि सदरची जागा अद्यापपर्यंत मस्जीदिच्या ताब्यात न देणे, तारकपूर, अहमदनगर मधील रुमी खान मस्जिद आणि दरगाह च्या जागेवर शहरामधील काही ताकतवर नेत्यांनी कब्जा केलेला असून सदर जागेवर कोणालाही येण्या-जाण्यास मनाई करण्यात येणे, सदर विषयी शासनाकडे वारंवार संबंधितावर कारवाई करून सदर ची जागा संबंधित संस्थांना देण्यात यावी अशी मागणी करूनही कोणतीही कारवाई करण्यात न येणे, सदर विषयी जनसामान्यांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(१७) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"कर्नाटक राज्याला वीज निर्मितीसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील बरांज मोकासा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करून कोळसा उत्खननाकरिता देण्यात येणे, सन २००८ मध्ये बरांज मोकासा, चेक बरांज, कढोली, किलोनी, चीचोर्डी, सोमनाला व अन्य अश्या ७ गावच्या शेतकऱ्यांच्या १४५७.६० हेक्टर आर (अंदाजे ३६००.३२ एकर) जमिनीचे भुसंपादन करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी प्रत्येक शेतकऱ्यांना जमिनीचा ५० % आर्थिक मोबदला अदा करण्यात आला असून उर्वरित ५० % आर्थिक मोबदला मागील १४ वर्षापासून कर्नाटका पावर कॉर्पोरेशन तर्फे अद्यापही शेतकऱ्यांना देण्यात आलेला नसणे, KPCL तर्फे कोळसा उत्खनन केल्यानंतर शेतकऱ्यांची शेती कसदार करून त्यांना परत करण्याच्या अटी व शर्तींसह करार करण्यात आले असणे, तसे R & R policy - २०१६ बिंदू क्र. २.६ मध्ये नमूद असणे, परंतु मागील १४ वर्षात कोळसा उत्खनन करूनही अद्यापही पीडित शेतकऱ्यांना शेती सुधारणा करून शेतजमीन करारानुसार परत न देणे, सदर करारनामा मध्ये तांत्रिक शब्दाचा वापर करून बरांज व अन्य ७ गावच्या शेतकऱ्यांचे अंदाजित १४७ कोटी रुपये मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे प्रकल्पग्रस्त पीडित शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देण्याकरिता जमा केलेला नसणे, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची KPCL कंपनीकडून आर्थिक फसवणूक करण्यात येत असणे, KPCL कंपनी तर्फे शेतकऱ्यांचे ५० % जमिनीचा आर्थिक मोबदला अदा न केल्याने आणि करारानुसार जमीन परत न करत असल्याने जिल्हा चंद्रपूर ता.भद्रावती येथील बरांज मोकासा कोळसा खाण करिता शेतकऱ्यांची अधिग्रहित १४५७.६० हेक्टर आर जमिनीचे सर्व फेरफार रद्द करण्यात यावेत अथवा संपूर्ण शेतकऱ्यांचे सद्यःस्थितीत बाजार मूल्य नुसार नवीन दराने ५० % जमिनीचा आर्थिक मोबदला व्याजासह मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

खनिकर्म मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

'सभागृहात चर्चेला न आलेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे व सत्र समाप्तीनंतर सदर जोडपत्र सदस्यांना वितरित करण्यात येईल' असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**७.** (१) श्री. तुषार राठोड, वि.स.स. यांनी, "राज्यातील राजपूत भामटा या जमातीच्या नावातील 'भामटा' हा शब्द कमी न करता ते नाव तसेच ठेवणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, "मुंबईत वर्सोवा इथे एसव्हीपी नगर येथे सेंट मेरी हायस्कूलजवळ असलेले दारूचे दुकान अन्यत्र हलविणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(३) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी, "पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांवर आकारण्यात आलेला वाढीव दोन पट मालमत्ता कर माफ करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(४) श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. यांनी माहितीचा मुद्दा उपस्थित केला. (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी भाषणातील मजकूर प्रलंबित आहे.)

(५) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, "झरीजामणी येथील वन जमीन परस्पर लीजवर देणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

सदरह प्रकरणाची शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

सदर मुद्याची नोंद घेतली असल्याचे कृषी मंत्र्यांनी सांगितले.

(६) श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी, "बिबट्याचा त्रास होऊ नये म्हणून पिंजरा लावणाऱ्या व्यक्तीवर कोणतीही कारवाई न करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(७) श्री. राजेश पवार, वि.स.स. यांनी, "कांदा अनुदानातून नांदेड जिल्ह्याला वगळणे, मात्र जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही अनुदान मिळावे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(८) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, "दहिसर भागातील कपिलकुंज, चंद्रकिरण आणि सूर्यकिरण या इमारती शासनाने म्हाडामार्फत विकसित करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(९) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, "श्री. बेहरामजी जीजीभाई या शाळेला हेरिटेज दर्जा देणे आणि ती पूर्ववत सुरू करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१०) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांनी, "मंत्रालय व विधिमंडळामध्ये सर्व महिला आमदारांना बसण्याची आणि स्वच्छतागृहाची सोय करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.
शासनाने नोंद घेतली असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

(११) ॲड. आशिष जैस्वाल, वि.स.स. यांनी, "कांदा उत्पादकांप्रमाणे गव्हाच्या उत्पादकांना योग्य भाव देणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१२) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी, "पीक पेरा भरण्याची अंतिम तारीख वाढवून मे महिन्यापर्यंत करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१३) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र परिचारिका परिषदेमधील अनियमिततेबाबत शासनाने कारवाई करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून कार्यवाही करण्याचे, तसेच सर्व पदाधिकाऱ्यांना कामकाजापासून बाजूला ठेवण्याच्या सूचना देण्याचे आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी दिले.

(१४) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी, "पनवेल तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१५) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स. यांनी, "एस टी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ५०० रुपयांचा ६ महिन्यांचा पास १ वर्षांचा करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१६) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. यांनी, "बार्शी टाकळी नगर पंचायत केल्यामुळे त्यासाठीच्या मूलभूत कामांसाठी निधी उपलब्ध करून देणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१७) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांनी, "ऑगस्ट २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीच्या मदतीपासून शएवगाव पाथर्डी तालुक्यातील ४० गावांतील १६ ते १७ हजार शेतकरी वंचित राहणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(१८) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी, "खडकवासला धरणाच्या बाजूला जलसंपदा विभागाची मोकळी जागा असून त्यावर बगीचा, क्रीडांगण, जॉगिंग ट्रॅक उभारणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१९) श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी, "लांजा तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या जागेसाठी कोणताही शहानिशा न करता मोबदला देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.
नोंद घेतली असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

(२०) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, "एसटी महामंडळात अर्धवेळ कर्मचाऱ्यांना पूर्ण वेळ कर्मचारी करणे तसेच मोताळा तालुक्यातील उरा व आवागावात एसटीच्या पत्र्यामुळे अपघात झालेल्या दोघांच्या पाल्यांना एसटी महामंडळात नोकरी देणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

नोंद घेतली असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

(२१) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स. यांनी, "मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी छत्रपती संभाजी नगर येथे दरवर्षी मंत्रिमंडळाची बैठक घेणे तसेच विशेष कार्यक्रमाकरिता प्रस्ताव मंजूर करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२२) श्री. विश्वनाथ भोईर, वि.स.स. यांनी, "कल्याण येथील आधारवाडी येथील डंम्पिंग ग्राऊंड बंद करणे, तसेच महानगरपालिकेतील सापाडे गावाचा एकमेव अरुंद रस्ता एका व्यक्तीने बंद केल्यामुळे त्याबाबत कारवाई करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

सदर मुद्याची नोंद घेतली असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

(२३) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. यांनी, "लोणारी समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(२४) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "प्रबोधनकार ठाकरे नगरातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करणे, तसेच माथाडी कामगारांना त्यांची घरे देणे," इ.बाबत माहिताचा मुद्दा मांडला.

प्रधान सचिवांनी, विधानपरिषदेकडून आलेला पुढील संदेश वाचून दाखविला.

"महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानसभेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १२५ व १९३ (२) अन्वये पाठविण्याचा मला निदेश देण्यात आला आहे.

**प्रस्ताव**

सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६-विवक्षित प्रकरणांमध्ये, महाराष्ट्र शासनाने अथवा महाराष्ट्र राज्यातील विवक्षित सार्वजनिक प्राधिकरणांनी किंवा त्यांच्या वतीने केलेल्या प्रशासकीय कारवायांची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्या विरूद्धच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी व अन्वेषण करण्याकरिता लोक आयुक्त संस्थेची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक, विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांतील १९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला.

"सन २०२२ चे वि. स. वि. क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांतील १९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, विधानपरिषदेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा प्रस्ताव मांडला.

**१.** ॲड. आशिष शेलार, वि.स.स.

**२.** डॉ. संजय कुटे, वि.स.स.

**३.** श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

**४.** श्री. संभाजी निलंगेकर, वि.स.स.

**५.** श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स.

**६.** श्री. अनिल बाबर, वि.स.स.

**७.** श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

**८.** प्रा. रमेश बोरनारे, वि.स.स.

**९.** श्री. दिलीपराव वळसे पाटील, वि.स.स.

**१०.** श्री. छगन भुजबळ, वि.स.स.

**११.** श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स.

**१२.** श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

'श्री. अतुल भातखळकर व श्री. भरत गोगावले, वि.स.स. यांनी, श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य तसेच दैनिक 'सामना' या वृत्तपत्राचे संपादक यांनी विधानमंडळ व विधानमंडळाचे सदस्य यांच्याबद्दल केलेले आक्षेपार्ह वक्तव्य याविरुद्ध विशेष हक्कभंगाची सूचना दिली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले व सदर हक्कभंगाच्या सूचनेबाबत थोडक्यात उहापोह करून सदर सूचना राज्यसभेचे माननीय सभापती तथा माननीय उपराष्ट्रपती यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता पाठविण्यात येत आहे' असे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली -

"येणाऱ्या काळात सभागृहाच्या प्रतिष्ठेची जपणूक करण्यासाठी सदस्यांसाठीची वर्तणुकीची मानके अर्थात (SOP) १५ दिवसात निश्चित करून मी सर्व सदस्यांना वितरित करीन आणि या मार्गदर्शक मानकांचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत यथोचित कारवाई देखील करण्याची तजवीज मी ठेवत आहे. याची सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

त्यानुसार सन्माननीय सदस्यांनी त्यांचे एकूणच वर्तन विधानसभेचे सदस्य म्हणून साजेसे असे ठेवावे व त्यातून सांविधानिक सभागृहाच्या प्रतिष्ठा, उज्जवल परंपरा व सभागृहाची गरिमा सदैव उन्नत ठेऊन लोकशाहीच्या पवित्र मंदिराचा यथार्थ सन्मान व आदर ठेवावा."

ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्र राज्याचे अराध्य दैवत, प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराजांचा विधान भवनाच्या समोर जो सिंहासनाधिष्ठित पुतळा आहे, तो पुतळा बदलून तेथे अश्वारूढ पुतळा बसविण्याच्या मागणीवर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे' तसेच 'मंत्रालय व विधान भवन यांचा जोडणारा पूल बांधण्याची आवश्यकता' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

'छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासंदर्भात समिती स्थापन करून त्या समितीची पहिली बैठक झाली आहे. त्या समितीच्या बैठकीमध्ये जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे अधिष्ठाता आणि मेटल वर्क्स विभागाचे विभाग प्रमुख यांना बोलविण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा उचित उंचीचा व आकाराचा अप्रतिम असा पुतळा उभारण्याची कार्यवाही सुरु केली आहे' अशी माहिती माननीय अध्यक्षांनी दिली.

**८. म.वि.स. नियम २९२ अन्वये श्री. अजित पवार व इतर वि.स.स. यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव तसेच**

**म.वि.स. नियम २९३ अन्वये श्री. अजित पवार (विरोधी पक्ष नेते), श्रीमती माधुरी व श्री. आशिष शेलार व इतर वि.स.स. यांच्या प्रस्तावांवरील एकत्रित चर्चा - (मंत्र्यांचे उत्तर) -**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांमधील विविध समस्या, पुणे व नाशिक जिल्ह्यांतील विविध समस्या तसेच मुंबई शहरातील विविध समस्या," इ. बाबतच्या प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

अंतिम आठवडा प्रस्ताव व इतर प्रस्तावांवर सभागृहाने चर्चा केली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केल्या -

(१) "एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे या संस्थेमार्फत दिनांक १५ ते १८ जून, २०२३ दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पहिल्या राष्ट्रीय विधिमंडळ सदस्य (विधायक) संमेलनाचे (FIRST NATIONAL LEGISLATORS' CONFERENCE) आयोजन करण्यात आले आहे. देशातील राज्य विधीमंडळाचे सन्माननीय सदस्य या परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या संमेलनामुळे संसदीय लोकशाही बळकट होण्यास मदत होईल. हे संमेलन महाराष्ट्रात होत असल्यामुळे आपण सर्वांनी देखील या राष्ट्रीय विधिमंडळ सदस्य (विधायक) संमेलनात सहभागी व्हावे."

(२) "दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी विधान भवनाच्या आवारात काही सदस्यांद्वारे आक्षेपार्ह्य, अप्रिय वर्तन घडले आहे. त्यासंदर्भात सभागृहात सन्माननीय विरोधी पक्ष नेता व काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने संबंधित जबाबदार सन्माननीय सदस्यांना मी लेखी पत्राद्वारे सक्त ताकीद देणार आहे. तसेच सभागृहात

देश व राज्य पातळीवरील संविधानिक पदे धारण करणाऱ्या काही मान्यवरांबद्दल सभागृहात आक्षेपार्ह्य वक्तव्य करणाऱ्या संबंधित सदस्यांनादेखील मी आवश्यक अशाच प्रकारे लेखी सक्त ताकीद देणार आहे."

माननीय अध्यक्षांनी, अर्थसंकल्पीय अधिवेशन काळातील कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी, 'महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ पासून बोलवावे अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे' असे घोषित केले.

माननीय अध्यक्षांनी सत्र समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला -

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी रमेश बैस, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजीच्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्ती बरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे सत्र संस्थगित करीत आहे."

विधानसभेचे अधिवेशन सायंकाळी ५ वाजून १७ मिनिटांनी संस्थगित झाले.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून १७ मिनिटांनी स्थगित झाली.)

**विधान भवन,**
मुंबई,
२५ मार्च, २०२३.

**राजेंद्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

## विवरण क्रमांक - ८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ (१) अन्वये सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी नामनिर्देशित केलेली सभाध्यक्षांची तालिका :—

(१) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(२) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

(३) श्री.सुनिल भुसारा, वि.स.स.

(४) श्री.सुभाष धोटे, वि.स.स.,

# विवरण क्रमांक -९

## विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर

## सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

निरंक

***

# विवरण क्रमांक – १०

## विविध समित्यांच्या बैठकी

| अ.क्र.<br>(१) | समितीचे नाव<br>(२) | बैठकीचा वार व दिनांक<br>(३) | बैठकीत झालेले कामकाज<br>(४) |
|---|---|---|---|
| (१) | कामकाज सल्लागार समिती | **बुधवार दि. ८ फेब्रुवारी, २०२३** | विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक बुधवार दि. ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले :—<br>:: निर्णय ::<br>(१) सन २०२३ च्या प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजीपर्यंतचे कामकाज निश्चित करण्यात आले.<br>(२) सन २०२३ च्या प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजाची सुरुवात "**वंदे मातरम्**" हे राष्ट्रगान व त्यानंतर "**जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा**" या राज्यगीताने करण्यात येईल.<br>(३) अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सोमवार, दिनांक १३ मार्च व मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ अशी दोन दिवस होईल व बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी उक्त सर्वसाधारण चर्चेस मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री उत्तर देतील.<br>(४) सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी "**मराठी भाषा दिनाचे**" औचित्य साधून मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.<br>(५) बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी "आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे" औचित्य साधून सभागृहात चर्चा घेण्यात येईल.<br>(६) मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या ऐतिहासिक अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्तीसंग्रामातील सर्व स्वातंत्रसेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी सभागृहात अभिवादनपर प्रस्ताव मांडण्यात येईल.<br>(७) शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सभागृहाची बैठक घेण्यात येईल.<br>(८) अधिवेशनातील कामकाजाचा आढावा घेऊन आवश्यकता भासल्यास, कामकाज सल्लागार समितीची बैठक शेवटच्या आठवड्यात आयोजित करण्यात येईल. |

# विवरण क्रमांक ११

## शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| (१) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२. | कामगार | डॉ. सुरेश खाडे | २१/१२/२०२२ | २१/१२/२०२२ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २२/१२/२०२२ | २०/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा २० | |
| (२) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२. | सामान्य प्रशासन | श्री. एकनाथ शिंदे | २६/१२/२०२२ | २६/१२/२०२२ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २८/१२/२०२२ | --- | --- | --- | --- | --- | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी विधानपरिषद-मध्ये संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. |
| (३) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२. | उच्च व तंत्र शिक्षण | श्री. चंद्रकांत पाटील | २६/१२/२०२२ | २६/१२/२०२२ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २६/१२/२०२२ | --- | --- | --- | --- | --- | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (४) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ | नगर-विकास | श्री.एकनाथ शिंदे | २७/०२/२०२३ | २७/०२/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २/०३/२०२३ | १३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १४ | |
| (५) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ | ग्राम-विकास | श्री.गिरीश महाजन | २७/०२/२०२३ | २७/०२/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २८/०२/२०२३ | १३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १५ | |
| (६) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ | उच्च व तंत्र शिक्षण | श्री. चंद्रकांत (दादा) पाटील | २८/०२/२०२३ | २८/०२/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २/०३/२०२३ | १५/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १६ | |
| (७) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ | उद्योग | श्री.उदय सामंत | २८/०२/२०२३ | २८/०२/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ०३/०३/२०२३ (विधान-परिषदेमध्ये विधेयक मागे घेण्यात आल्याबाबतची घोषणा विधानसभेमध्ये दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी करण्यात आली.) | --- | --- | --- | --- | --- | दिनांक १३/०३/२०२३ रोजी विधानपरिषदेमध्ये विधेयक मागे घेण्यात आले. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (८) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ | सार्वजनिक आरोग्य | श्री.तानाजी सावंत | २८/०२/२०२३ | २८/०२/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ३/०३/२०२३ | ८/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १३ | |
| (९) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ | गृह | श्री.देवेंद्र फडणवीस | २५/०३/२०२३ | २५/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २५/०३/२०२३ | २५/०३/२०२३ | --- | --- | --- | --- | |
| (१०) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३. | वित्त | श्री.देवेंद्र फडणवीस | ३/०३/२०२३ | २/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | ३/०३/२०२३ | ३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १२ | |
| (११) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३. | सामान्य प्रशासन | श्री. एकनाथ शिंदे | १०/०३/२०२३ | १०/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १४/०३/२०२३ | १४/०३/२०२३ | --- | --- | --- | --- | |
| (१२) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३. | विधी व न्याय | श्री. देवेंद्र फडणवीस | १६/०३/२०२३ | १६/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २१/०३/२०२३ | २३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा २५ | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१३) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ | नगर विकास | श्री. एकनाथ शिंदे | १६/०३/२०२३ | १६/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २३/०३/२०२३ | २४/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा २४ | |
| (१४) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ | सहकार | श्री. अतुल सावे | १६/०३/२०२३ | १६/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २५/०३/२०२३ | २५/०३/२०२३ | --- | --- | --- | --- | |
| (१५) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२३ | वित्त | श्री.देवेंद्र फडणवीस | २०/०३/२०२३ | २०/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २१/०३/२०२३ | २३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १८ | |
| (१६) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३ | वित्त | श्री.देवेंद्र फडणवीस | २०/०३/२०२३ | २०/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २१/०३/२०२३ | २३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १९ | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१७) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ | उच्च व तंत्र शिक्षण | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील | २१/०३/२०२३ | २१/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २३/०३/२०२३ | २४/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा २१ | |
| (१८) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२३ | उच्च व तंत्र शिक्षण | श्री.चंद्रकांत (दादा) पाटील | २३/०३/२०२३ | २३/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २४/०३/२०२३ | २४/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा २२ | |
| (१९) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२३ | वित्त | श्री.देवेंद्र फडणवीस | २३/०३/२०२३ | २२/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २३/०३/२०२३ | २३/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा १७ | |
| (२०) | सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३ | पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास | श्री. राधाकृष्ण विखे पाटील | २३/०३/२०२३ | २३/०३/२०२३ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २४/०३/२०२३ | २५/०३/२०२३ | --- | --- | --- | सन २०२३ चा २३ | |

***

# विवरण क्रमांक - १२

## संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव.

**निरंक**

***

# विवरण क्रमांक - १३

## पुरःस्थापित अशासकीय विधेयके

**निरंक**

*****

**टीप :—** खालील अशासकीय विधेयके पुरःस्थापनार्थ शुक्रवार, दिनांक ०३,१०,१७ व २४ मार्च,२०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली होती. परंतु उक्त दिवसाचे अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात आल्याने सदरहू कामकाज होऊ शकले नाही.

| | |
|---|---|
| (१) | सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१ - श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे |
| (२) | सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक - युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक,२०२१ - श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे |
| (३) | सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ श्री. सुहास (अण्णा) कांदे, वि.स.स. यांचे |
| (४) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे |
| (५) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२२ - ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे |
| (६) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४- महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ - श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे |
| (७) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे |
| (८) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२- श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे |
| (९) | सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ - डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील यांचे |

***

# विवरण क्रमांक - १४

## विचारात घेण्यात आलेली अशासकीय विधेयके

**निरंक**

************

**टीप :—** खालील अशासकीय विधेयके विचारार्थ शुक्रवार, दिनांक १० व २४ मार्च,२०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली होती. परंतु उक्त दिवसाचे अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात आल्याने सदरहू कामकाज होऊ शकले नाही.

| | |
|---|---|
| (१) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०१९ - श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे |
| (२) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ - श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे |
| (३) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे |
| (४) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे |
| (५) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - श्री.अमित साटम, वि.स.स. यांचे |
| (६) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तिवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - श्री. प्रकाश आबिटकर,वि.स.स. यांचे |
| (७) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे |
| (८) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. सुनिल प्रभू,वि.स.स. यांचे |

***

# विवरण क्रमांक - १५

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) व म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव

**निरंक**

***

# विवरण क्रमांक - १६

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२-२०२३ च्या

## पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक २ व ३ मार्च, २०२३ रोजी मागण्या मंजूर झाल्या.

### पुरवणी मागण्यांवर चर्चेसाठी प्राथम्यक्रमात असलेले विभाग

| अ.क्र | विभागाचे नाव | एकूण मागण्या | मागण्यावर चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| **(अ)** | | | |
| (१) | गृह विभाग | ६ | दि. २ मार्च, २०२३ |
| (२) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ४ | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ६ | |
| (४) | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ३ | दि. ३ मार्च, २०२३ |
| (५) | ग्रामविकास विभाग | २ | |
| (६) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | २ | |
| (७) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | २ | |
| | **एकूण** | **२५** | |

**(ब) दिनांक०३ मार्च, २०२३ रोजी चर्चारोधानंतर मतास टाकण्यात आलेल्या पुरवणी खर्चाच्या मागण्या**

| अ.क्र | विभागांची नावे | एकूण मागण्या |
|---|---|---|
| (१) | महसूल व वन विभाग | ३ |
| (२) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १ |
| (३) | नगरविकास विभाग | २ |
| (४) | वित्त विभाग | ३ |
| (५) | जलसंपदा विभाग | २ |
| (६) | विधि व न्याय विभाग | २ |

| अ.क्र | विभागांची नावे | एकूण मागण्या |
|---|---|---|
| (७) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १ |
| (८) | नियोजन विभाग | २ |
| (९) | सार्वजनिक आरोग्य विभाग | १ |
| (१०) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | १ |
| (११) | आदिवासी विकास विभाग | २ |
| (१२) | महिला व बालविकास विभाग | १ |
| (१३) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | १ |
| (१४) | कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | १ |
| (१५) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | १ |
| (१६) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | १ |
| (१७) | मृद व जलसंधारण विभाग | १ |
| (१८) | दिव्यांग कल्याण विभाग | ४ |
| | **एकूण मागण्या** | **३०** |
| | **एकूण : (अ) २५ + (ब) ३०** | **५५** |

# विवरण क्रमांक - १७

## सन २०२२-२०२३ च्या पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील कपात सूचना

| अ. क्र. | विभाग | एकूण | मान्य | अमान्य | चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | गृह विभाग | २७ | २० | ७ | दि.. २ मार्च, २०२३ |
| (२) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | २० | ११ | ९ | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ४१ | २८ | १३ | |
| (४) | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ११ | ४ | ७ | दि. ३ मार्च, २०२३ |
| (५) | ग्रामविकास विभाग | १३ | ७ | ६ | |
| (६) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ८ | ७ | १ | |
| (७) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ६ | ३ | ३ | |
| | **एकूण** | **१२६** | **८०** | **४६** | |

# विवरण क्रमांक - १८

## सन २०२२ - २०२३ च्या पुरवणी विनियोजन विधेयक

## (पुरवणी विनियोजन विधेयक दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी संमत झाले)

## पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे

| सदस्यांचे नाव | स्विकृत | अस्विकृत | एकूण |
|---|---|---|---|
| श्री.अजित पवार, वि.स.स. | ५ | ३ | ८ |
| श्री.नाना पटोले, वि.स.स. | ६ | ० | ६ |
| श्री.विजय वडेट्टिवार, वि.स.स. | १ | ० | १ |
| **एकूण** | **१२** | **३** | **१५** |

# विवरण क्रमांक - १९

## सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील मागण्या

| अ. क्र. (१) | विभागाचे नाव (२) | एकूण मागण्या (३) |
|---|---|---|
| **(अ)** | | |
| (१) | सामान्य प्रशासन विभाग | १० |
| (२) | गृह विभाग | १२ |
| (३) | महसूल व वन विभाग | १० |
| (४) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | १० |
| (५) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ४ |
| (६) | नगरविकास विभाग | ६ |
| (७) | वित्त विभाग | ८ |
| (८) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ९ |
| (९) | जलसंपदा विभाग | ५ |
| (१०) | विधि व न्याय विभाग | ५ |
| (११) | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ११ |
| (१२) | ग्रामविकास विभाग | ६ |
| (१३) | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ६ |
| (१४) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ७ |
| (१५) | नियोजन विभाग | ८४ |
| (१६) | संसदीय कार्य विभाग | ३ |
| (१७) | गृहनिर्माण विभाग | ४ |
| (१८) | सार्वजनिक आरोग्य विभाग | ४ |
| (१९) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ५ |
| (२०) | आदिवासी विकास विभाग | ९ |
| (२१) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | ४ |
| (२२) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ४ |

| अ. क्र. | विभागाचे नाव | एकूण मागण्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (२३) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ८ |
| (२४) | महिला व बाल विकास विभाग | ४ |
| (२५) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ६ |
| (२६) | कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | २ |
| (२७) | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | ३ |
| (२८) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ६ |
| (२९) | अल्पसंख्याक विकास विभाग | ३ |
| (३०) | मराठी भाषा विभाग | ५ |
| (३१) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | ४ |
| (३२) | मृद व जलसंधारण विभाग | ५ |
| (३३) | दिव्यांग कल्याण विभाग | ४ |
| | **एकूण** | **२७६** |

# विवरण क्रमांक - २०

## सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील मागण्यांवरील कपात सूचना

| अ.क्र. | विभाग | एकूण | मान्य | अमान्य | चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | गृह विभाग | ६४ | ४६ | १८ | दि. १५ मार्च, २०२३ |
| (२) | जलसंपदा विभाग | ४० | ३४ | ६ | |
| (३) | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २९ | २४ | ५ | |
| (४) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ९ | ७ | २ | |
| (५) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ६२ | ४१ | २१ | दि. १६ मार्च, २०२३ |
| (६) | आदिवासी विकास विभाग | ४२ | २८ | १४ | |
| (७) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १७ | ११ | ६ | |
| (८) | महिला व बाल विकास विभाग | १७ | १६ | १ | |
| (९) | ग्रामविकास विभाग | ८२ | ६७ | १५ | दि. १७ मार्च, २०२३ |
| (१०) | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | २७ | २१ | ६ | |
| (११) | सार्वजनिक आरोग्य विभाग | ५३ | ४५ | ८ | |
| (१२) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | १४ | १३ | १ | |
| (१३) | महसूल व वन विभाग | ६८ | ५४ | १४ | दि. २० मार्च, २०२३ |
| (१४) | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ५३ | ४४ | ९ | |
| (१५) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ८३ | ६० | २३ | |
| (१६) | मृद व जलसंधारण विभाग | २८ | २३ | ५ | |
| (१७) | नगरविकास विभाग | १०२ | ९० | १२ | दि. २१ मार्च, २०२३ |
| (१८) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ४० | ३१ | ९ | |
| (१९) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ३१ | २९ | २ | |
| (२०) | कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | १३ | १२ | १ | |

| अ.क्र. | विभाग | एकूण | मान्य | अमान्य | चर्चा व मतदानाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (२१) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ८२ | ६४ | १८ | दि. २३ मार्च, २०२३ |
| (२२) | अल्पसंख्यांक विकास विभाग | ४६ | ४२ | ४ | |
| (२३) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | ४० | ३६ | ४ | |
| (२४) | दिव्यांग कल्याण विभाग | १२ | ११ | १ | |
| | **एकूण** | **१०५४** | **८४९** | **२०५** | |

| अ.क्र. | प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे | |
|---|---|---|
| (१) | सामान्य प्रशासन विभाग | सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्वीकारण्यात आल्या नाहीत. |
| (२) | वित्त विभाग | |
| (३) | विधी व न्याय विभाग | |
| (४) | नियोजन विभाग | |
| (५) | संसदीय कार्य विभाग | |
| (६) | गृहनिर्माण विभाग | |
| (७) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | |
| (८) | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | |
| (९) | मराठी भाषा विभाग | |

# विवरण क्रमांक - २१

## सन २०२३ - २०२४ च्या अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयक

## (अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयक दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी संमत झाले)

## अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयकावरील मुद्दे

| सदस्यांचे नांव | स्विकृत | अस्विकृत | एकूण |
|---|---|---|---|
| श्री. अजित पवार, वि.स.स. | ९ | ० | ९ |
| श्री.नाना पटोले, वि.स.स. | ० | २ | २ |
| श्री. अस्लम शेख, वि.स.स. | १ | ० | १ |
| श्री.प्रकाश सोळंके, वि.स.स. | ० | ७ | ७ |
| **एकूण** | **१०** | **९** | **१९** |

# विवरण क्रमांक - २२

## अध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

**(म.वि.स. नियम ११ अन्वये)**

**निरंक**

***

# विवरण क्रमांक - २३

## उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

निरंक

***

# विवरण क्रमांक २४

## निंदाव्यंजक प्रस्ताव

## (म.वि.स. नियम २३ अन्वये )

| अ.क्र. | सदस्याचे नांव | विषय | सभागृहात मांडल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. | "ब्रिटीश ब्रॉडकास्टिंग कंपनीवर केंद्र शासनाकडून बंदी घालण्यात आली आहे. सदरहू कंपनीच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या माहितीपटाव्दारे धार्मिक समुदायांना भडकविण्याचा आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून भारताची न्यायव्यवस्था, सर्वोच्च न्यायालयापासून ते त्याच्या अधिनस्त न्यायालयांपर्यंत न्यायालनीय प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून "बीबीसीच्या या कृतीच्या विरुध्द" | २५ मार्च, २०२३ |

## विवरण क्रमांक २५

### एखाद्या व्यक्तीविरुध्द करावयाच्या अभिकथनासंबंधी दिलेल्या सूचना

**(म.वि.स. नियम ३५ अन्वये)**

**निरंक**

***

# विवरण क्रमांक २६

## म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्र्यांनी केलेली निवेदने

| अ.क्र. | मंत्री | विषय | सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. गुलाबराव पाटील, मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री (मा. मुख्यमंत्री यांच्याकरिता) | शासन सेवेत नियुक्ती देण्यासाठी २ वर्षांची वयोमर्यादा शिथील करणे. | ३ मार्च, २०२३ |
| २. | श्री. संजय राठोड, मा. अन्न व औषधी द्रव्य प्रशासन मंत्री | राज्यातील तृतीयपंथीय या घटकातील वर्गास शिक्षण व नोकरी या क्षेत्रासह सर्व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्यायामध्ये स्त्री, पुरुष या पर्यायासोबत तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत | ९ मार्च, २०२३ |
| (४) | "देशातून निर्यात झालेल्या सदोष कफसीरपमधील हानीकारक घटकद्रव्यांमुळे ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने निदर्शनास आणून दिल्यानंतरही राज्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या औषधाच्या गुणवत्ता तपासण्या (स्टॅबिलिटी स्टेट) झाल्यानंतरच जागतिक बाजारपेठेत पाठवणे बंधनकारक असताना राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी २००० पेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेताच निर्यात होत असल्याचे फेब्रुवारी, २०२३ मध्ये आढळून येणे, त्यामुळे राज्यातील या २०० औषध उत्पादकांची सखोल चौकशी करून त्यांचे परवाने रद्द करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, संजय केळकर, बंटी भांगडिया, मंगेश चव्हाण, योगेश सागर, अतुल भातखळकर, मिहीर कोटेचा, पराग शाह, गणपत गायकवाड, कुमार आयलानी, संतोष दानवे, श्रीमती श्वेता महाले, डॉ.भारती लव्हेकर, श्री.रईस शेख, ॲड. राहुल कुल, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (५) | “नाशिक जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू ऑलिम्पियन कविता राऊत, रोईंगपटू दत्तू भोकनळ आणि आंतरराष्ट्रीय धावपटू अंजना ठमके यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचे नाव उज्वल केले असणे, राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ नुसार आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असणे, तर दिनांक १ मे, २०११ च्या शासन निर्णयानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली तर शासन सेवेत थेट नियुक्तीची मानके देखील निश्चित केलेली असणे, सदर शासन निर्णयातील वर्ग १ पदासाठी आवश्यक असलेले निकष या तीन्ही खेळाडूंनी पूर्ण केलेले असणे, या खेळाडूंची गट अ पदाकरिता शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी क्रीडा आयुक्तांनी शासनास प्रस्ताव पाठवलेले असणे, शासनाने शासन निर्णय दिनांक २७ डिसेंबर २०१६, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ आणि दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ अन्वये विविध अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना उप जिल्हाधिकारी, पोलीस उप अधीक्षक, तहसिलदार, जिल्हा क्रीडा अधिकारी यासह विविध गट “अ” पदांवर नियुक्ती दिलेली असणे, मात्र नाशिक जिल्ह्यातील या तिन्ही अत्युच्च गुणवत्ताधारक आणि पात्र खेळाडूंना गट “अ” पदावर शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी अन्याय केला जात असणे, या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या नैपुण्याचा विचार करून शासनाच्या क्रीडा धोरणानुसार त्यांची वर्ग १ पदावर शासकीय सेवेत थेट नेमणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ वा त्या सुमारास आणि यापूर्वी अनेकदा शासनाकडे मागणी केलेली असणे, मात्र शासनाकडून दिरंगाई आणि टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये निर्माण झालेले निराशेचे व चिंतेचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | सर्वश्री. छगन भुजबळ, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अबू आजमी, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (६) | “राज्यात पत संस्थांची संख्या अंदाजे १३३७९ असून ग्राहक सभासद संख्या १ कोटी ३५ लाखांहून अधीक असून एकुण ठेवींची संख्या अंदाजे ५७३२२ कोटी रुपये असणे, यामध्ये प्रामुख्याने पतसंस्थेतील ठेवींना संरक्षण मिळाले पाहीजे याकरीता शासन स्तरावरुन उपाययोजना होणे गरजेचे असणे, दिवसेंदिवस खाजगी फायनांन्स करणाऱ्या विविध कंपन्यांमुळे वाढती स्पर्धा, वसुली करताना येणाऱ्या अडचणी या सर्व आर्थिक परिस्थितीमुळे पतसंस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ | श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सध्याच्या परिस्थितीत पतसंस्थेस कारभार चालवण्यासाठी शासनाकडून कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत करण्यात न येणे, त्यामुळे पतसंस्थांचा कारभार त्यांच्या स्वखर्चाच्या बजेट मधून चालू असणे, पतसंस्थांकरिता नव्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये ९७ घटना दुरुस्तीअंतर्गत सहकारी पतसंस्थांना कोणत्याही प्रकारे विचारात न घेता त्यांचे आर्थिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता त्यांना अंशदान अनुदान भरण्याची जाचक अट लागू करणे, अंशदान अनुदानाचा उपयोग कशासाठी होणारे आहे याबाबत स्पष्टता नसल्याने सर्व संस्थांनी त्यास विरोध दर्शवून ते न भरण्याचे ठराव केला असणे, तसेच पतसंस्थांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा सवलती लाभत नसणे, या जाचक अटींचा दूरगामी विपरीत परिणाम संस्थेच्या आर्थिक प्रगतीवर होणे, यामध्ये प्रामुख्याने अपसेट प्राईजचा कालावधी वाढविण्याबाबत कार्यवाही करणे, कलम १०१ अन्वये जप्ती दाखल्याच्या विरुद्ध पुर्नरिक्षण अर्ज दाखल करणे, पतसंस्थांची विविध मानकांचे नियमित देखरेख करणे, कलम १४४/५ अ नुसार पतसंस्थांना फक्त “अ” वर्ग सभासदांकडूनच ठेवी स्वीकरण्याबाबत बंधन घालण्यात आल्यामुळे संस्थांना व्यवसाय करण्यात अडचणी येत असून “ब” वर्ग सभासदांकडूनही ठेव स्वीकरण्याच्या अनुषंगाने सुधारणा करणे गरजेचे असणे, कलम १४४/६ अ नुसार संस्थेच्या गरजा व मागणीनुसार अन्य कोणताही व्यापार व सेवा पुरविण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे अशा संस्थांना किमान इतर सेवा करण्यास परवानगी देणेसह विविध मागण्यांबाबत पतसंस्थांकडून वेळोवेळी मागण्या करण्यात येत असतात, परंतू याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री महोदय यांचेस्तरावर दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतीवृत्तानुसार कोणतीही कार्यवाही अद्याप न होणे, त्यामुळे पतसंस्थांच्या प्रतिनिधी यांच्यामध्ये शासन विरोधी असंतोष निर्माण होणे, याबाबत शासन पतसंस्था चळवळ टिकावी, वृध्दीगत व्हावी यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना.” | | |
| (७) | “राज्यातील निराधार, अपंग आदींच्या पुनर्वसनासाठी शासनाने संजय गांधी, श्रावणबाळ आदी विशेष सहाय्याच्या योजना अंमलात आणल्या असणे, परंतु त्यातील उत्पन्नाची मर्यादा आजच्या काळाशी सुसंगत नसणे, याशिवाय या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी दरवर्षी उत्पन्नाचा दाखला देण्याची जाचक अट असणे, त्यामुळे अनेक गरीब व गरजू या योजनेपासून वंचित राहत असणे, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन | श्री. ऋतुराज पाटील, डॉ. राहूल पाटील, श्री. लहू कानडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | या योजनांसाठी आर्थिक उत्पन्नाची मर्यादा ५० हजारांपर्यंत वाढविणे व दरवर्षी उत्पन्नाच्या दाखल्याची अट काढून टाकण्याबाबत आग्रही मागणी होत असणे, परंतु त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (८) | "मातंग समाजाची वर्गवारी करून अ, ब, क, ड नुसार स्वतंत्र आरक्षण देण्यासह समाजातील विविध मागण्यांसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने शासनास निवेदन देण्यात येणे, मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात वास्तव्यास असणे, या समाजातील बहुतांशी नागरिक भूमीहीन असून, मोलमजुरी करून आपले जीवन जगत असणे, उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे, तसेच शासकीय सेवेत देखील या समाजातील युवकांची संख्या अत्यंत अल्प असणे, शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता, मातंग समाजास अ,ब,क,ड अनुसार वर्गवारी करून स्वतंत्र आरक्षण त्वरित लागू करण्याची आवश्यकता, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची आवश्यकता, आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे संगमवाडी (जि. पुणे) येथे भव्य स्मारक करण्यासाठी शासकीय पातळीवर लवकरात लवकर प्रयत्न करण्याची आवश्यकता, मुंबई विद्यापिठास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी शासनाच्या मंजुरीची आवश्यकता,गंजपेठ पुणे येथील देशातील पहिली व्यायाम शाळा सुरू करून तेथे अनेक क्रांतिकारक घडविणाऱ्या लहुजी वस्ताद यांच्या क्रांती शाळेस लहुजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग त्वरित कार्यान्वित करून, त्यांचे नाव राष्ट्रपुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे थेट कर्ज प्रकरण त्वरित सुरु करणे आणि अण्णाभाऊ साठे महामंडळाचे थकीत कर्ज माफ करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने करण्यात येणे. मातंग समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री.सुनिल कांबळे, डॉ.बालाजी किणीकर, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९) | "कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत विकास योजनेच्या आरक्षण क्रमांक २७ नुसार लालचौकी कल्याण येथील "आर्ट गॅलरी म्युझियम आणि व्यापारी संकुल" प्रकल्प शासनाच्या व मनपाच्या सर्व नियम व अटी पाळून १० वर्षांपासून बांधून तयार असणे, परंतु सदर प्रकल्प अद्यापही पूर्णत्वास न गेल्यामुळे | डॉ.देवराव होळी, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मनपाचे तसेच विकास कामांचे अतोनात नुकसान होणे, सदर प्रकल्पास लागणारे सर्व प्रकारचे सहाय्य करण्यास विकासक बांधील असणे, वरील विषय मान्य करून कल्याण डोंबिवली महानगरपालिका विशेष प्रकल्प /८४ दिनांक २६/८/२०२१ विभागाच्या प्रस्तावानुसार तसे आदेश निर्गमित करण्यासंदर्भात शासन स्तरावर प्रश्न प्रलंबित असणे, यासंदर्भात हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये तारांकित प्रश्न क्रमांक ५१७८५ च्या माध्यमातून शासनाला भूमिका स्पष्ट करण्यासंदर्भात विधानमंडळाकडे सादर असताना त्याच कालावधीत या विपरीत विषयाला धरून दिनांक २८/११/२०२२ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे उघडकीस येणे, हे प्रकल्प पूर्णत्वास न नेता केवळ आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त भाऊसाहेब दांडगे, शहर अभियंता अर्जुन अहिरे, लेखा वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, तरुण जुनेजा कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प तथा सदस्य सचिव यांनी जाणीव पूर्वक अडथळा निर्माण करणे, सदरहू प्रकरण अतिशय गंभीर असून मागील अनेक वर्षांपासून प्रकरण प्रलंबित ठेवणाऱ्या दोषींवर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, या कामात केवळ आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने अडथळा निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१०) | "मौजे मोरमारेवाडी (ता.मावळ,जि.पुणे) हे महसूली गांव ग्रुप ग्रामपंचायत करंजगाव अंतर्गत असणे, या गावातील धनगरपाडयावर एकूण ११ कुटुंबातील ग्रामस्थ असून गावालगतच्या उंच डोंगर पठारावर त्यांची एकूण ११ घरे, गोठे आणि लागवडी योग्य शेतजमीन, निवासी घरे, गोठे, शेती यासह शेकडो वर्षापासून सदर कुटुंबे वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास येणे, सदर कुटुंबिय ग्रामस्थांना इंग्रजकालीन राजवटीपूर्वी मावळ तालुक्यातील अनेक गावे/भूखंड तत्कालीन राजकीय व प्रशासकीय व्यक्ती व संस्थांना वतने म्हणून बहाल करण्यात येणे व त्यामध्ये श्री.कर्वे, इनामदार परिवाराला मिळालेल्या वतनावरील मोरमारेवाडी येथील धनगरपाड्याला देखील वतन मिळाले असणे, त्यानंतर सन १९६८ साली ग्रामपंचायत करंजगाव अस्तित्वात येऊन धनगरवाडयातील सर्व घरांची नोंद ग्रामपंचायत दप्तरी असून या सर्व घरांचा व शेतीचा शासकीय कर, पट्टया इत्यादी कर तेव्हांपासून सदर ग्रामस्थ शासनास अदा करीत असणे, तथापि सन १९५७ च्या | श्री.सुनिल शेळके, वि.स.स. | दिनांक<br>३ मार्च, २०२३<br>रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | कुळ कायद्याअंतर्गत सदर कुटुंबियांची नावे त्यावेळी ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद झालेली नसणे, तथापि सन १९६८ साली त्यापैकी काही कुटुंबाचा कूळ म्हणून ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद असल्याचे निदर्शनास येणे, परंतु सन २००६ यावर्षी श्री कर्वे, इनामदार (वतनदार) यांनी सदर ग्रामस्थांच्या वहिवाटीच्या जमिनीसह सर्व जागा मुंबईतील ओझोन लँड प्राईव्हेट लिमिटेड या कंपनीला परस्पर विकल्याचे निदर्शनास येणे व त्यासाठी कंपनीने प्रस्तुत गटाच्या सातबारा उताऱ्यावरील नोंद देखील दुरुस्थ (काढून टाकल्याने) केल्याचेही निदर्शनास येणे, याप्रकरणी सदर ग्रामस्थांनी दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी मा.महसूल मंत्री यांना सविस्तर लेखी निवेदन देऊन वहिवाटीच्या हक्काची जमीन त्यांच्या नावे शासनाने करून देण्याची मागणी करण्यात येणे, परंतु अद्यापही शासनाकडून कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी संबंधित सर्व ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (११) | "कोल्हापूर नगरपालिकेचे सन १९७२ मध्ये महानगरपालिकेत रूपांतर होणे, तब्बल ५० वर्षांपासून कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न प्रलंबित असणे, कोल्हापूरनंतर स्थापन झालेल्या अनेक महानगरपालिकांची एकदा-दोनदा नव्हे, तर अनेकदा हद्दवाढ झालेली असणे, त्यामुळे त्या शहरांचा विकासही झालेला नसणे, कोल्हापूरची हद्दवाढ झालीच पाहिजे अशी जणमाणसात असलेली भावना, त्याबाबत सद्य:स्थितीत कोल्हापूर महानगरपालिकेची हद्द ६६.८२ चौरस किलोमीटर असून तब्बल सात लाख लोक राहत असणे, शहराला लागून असलेल्या मोरेवाडी, पाचगाव, कळंबा, कंदलगाव, उजळाईवाडी, गांधीनगर अशा अनेक गावांना महानगरपालिकेच्या केएमटी, पाणीपुरवठा यासारख्या सेवा असणे, परंतु काही ग्रामपंचायतींचे पाच एमएलडी पाणीही शहरात येत असल्यामुळे त्याचाही अतिरिक्त ताण महानगरपालिकेवर पडत असणे, कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने २०१३ पासून २०२१ पर्यंत ४ वेळा कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचे प्रस्ताव सादर केलेला असणे, २०१४ मध्ये १७ गावांचा समावेश असलेला हद्दवाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य शासनाकडे सादर केलेला असणे, २०१७ मध्ये पहिल्या टप्प्यात भौगालिक संलग्नता आणि महानगरपालिकेच्या सुविधा घेणाऱ्या गावांचा शहरात समावेश करण्याच्या मुद्द्यांवर हद्दवाढ होईल अशी शक्यता वर्तविण्यात येणे, मात्र शासनाने हद्दवाढीला बगल देत ४२ गावांचा समावेश असलेल्या | श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. | दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | प्राधिकरणाची घोषणा केल्यामुळे शहराची हद्दवाढ मागे पडणे, प्राधिकरणाकडून ग्रामपंचायत हद्दीतील बांधकाम परवान्यासह अन्य परवानगी मिळवताना गावांची दमछाक होत असणे, हद्दवाढ परवडली; पण प्राधिकरण नको, अशी म्हणण्याची वेळ ग्रामीण भागावर येणे, त्यात प्राधिकरणाला निधीची आवश्यकता असणे, मागील शासनाने कोल्हापूर महानगरपालिकेकडून हद्दवाढीचा फेरप्रस्ताव मागविण्यात येणे, त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये १८ गावे व दोन एमआयडीसींसह नवीन प्रस्ताव सादर केलेला असणे, हद्दवाढ न झाल्यामुळे कोल्हापूर शहराचा विकास, नवे उद्योग येत नसल्यामुळे त्याचा परिणाम उद्योगांवरही होणे, तसेच राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनेतून निधी मिळविण्यास अडचणी येत असणे, परिणामी शहराचा सर्वांगीण विकास करण्यावर मर्यादा येत असणे, त्यामुळे कोल्हापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हद्दवाढ व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत असणे, परंतु प्रशासनाने या मागणीकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेला तीव्र संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१२) | "नाशिक महानगरपालिका सर्वे नंबर ४९१ फायनल भूमापन क्रमांक २५१ नगररचना योजना भाग एक ही जागा वर्षानुवर्ष मातंग समाजाची असून या ठिकाणी अनेक वर्षापासून मातंग समाजाच्या नागरिकांचे वास्तव्य असणे, सातबारावर देखील मातंग समाजाचे नाव असणे, असे असताना, नाशिक महानगरपालिकेने सदर जागा सफाई कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेला नाममात्र भाड्याने देणे, या ठिकाणची जागा रहिवासी प्रयोजनासाठी आरक्षित करण्यासाठी आरक्षणात अंशस्थान बदल करण्याचा प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेने दिनांक २९ मार्च, २००४ रोजी प्रधान सचिव नगर विकास विभाग यांना पाठवलेला असणे, नाशिक महानगरपालिकेकडून याबाबत महासभेत ठराव देखील केलेला असणे, परंतु शासनाकडून मात्र सदर बाबीकडे दुर्लक्ष होत असणे, सदर प्रकरण जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. | दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१३) | "मुंबई वर्सोवा येथील जेव्हीएलआर मार्गावरील बाळासाहेब ठाकरे उडडाणपूल हा एसव्ही रोड ते इन्फिनिटी मॉल लिंक रोड पर्यंतचा विस्तारित पूल व रस्ता हा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे वर्सोवा विभागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला असणे, सदर वाहतूक कोंडीचा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे पूल लिंक रोड पर्यंत विस्तारित करणे गरजेचे असणे, सध्या याच मार्गावरून मेट्रोचे कामदेखील सुरु असणे, हा पुल बनविण्याकरीता मुंबई महानगर पालिकेतर्फे एमएमआरडीए ला ३८४.५० कोटी रुपये (एकूण ७६८.८५ कोटी पैकी रकमेच्या ५० टक्के निधी) निधी देखील वर्ग करण्यात आलेला असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर पुलाचे काम सुरू झालेले नसणे, तरी या पुलाचे व रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. | दिनांक<br>८ मार्च, २०२३<br>रोजी चर्चा झाली |
| (१४) | "नवी मुंबई महानगरपालिका आस्थापनेवरील करार व कंत्राटी पद्धतीवरील आरोग्य, घनकचरा, शिक्षण, पाणी पुरवठा, मलनिसःरण, स्मशानभूमी, परिवहन, विद्युत, उद्यान अशा विविध संवर्गातील सुमारे ६०० ते ७०० कर्मचारी करार व कंत्राटी पद्धतीवर किमान वेतनावर गेल्या १० ते १५ वर्षांपासून प्रामाणिकपणे अविरत सेवा बजावित असणे, सदर कर्मचारी अत्यंत कमी वेतनावर वर्षानुवर्षे कार्यरत असून शासनाने त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोई-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नसणे, कोव्हीड काळात भयंकर परिस्थिती असतानाही सेवा पुरविलेल्या असणे, सद्यःस्थितीत नवी मुंबई महापालिकेतील गेल्या दोन वर्षांपासून बहुतांश अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्याने तसेच बहुतांश लिपिक कर्मचाऱ्यांची वरिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती करण्यात आलेली असल्याने लिपिक संवर्गातील बहुतांश पदे रिकामी असणे, याकरिता अधिसंख्या पद निर्माण करण्यास मान्यता देण्याची गरज असून आस्थापना खर्चातून सूट देणे किंवा नवीन आकृतीबंधात ही पदे मंजूर करून देण्याची आवश्यकता, गेली १०-१५ वर्षे सदर कर्मचारी महापालिकेत काम करत असल्याने विशेष बाब म्हणून कायम करण्याची गरज, शासनाने प्रस्ताव सादर करून मंजुरी दिल्यास सदर सर्व कर्मचारी कायमस्वरूपी होण्यास होणारे सहाय्य, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.गणेश नाईक, वि.स.स. | दिनांक<br>८ मार्च, २०२३<br>रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (१५) | “बुलढाणा हा जिल्हा अत्यंत मागास असून या जिल्ह्यात मोठे उद्योग धंदे नसल्याने प्रचंड बेरोजगारी असणे, खामगाव जालना रेल्वे मार्गाची मागणी अनेक वर्षापासून असून हा रेल्वे मार्ग झाल्यास बुलढाणा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे सुरू होऊन बेरोजगारी दूर करण्यास मदत होणे, तसेच विदर्भ आणि मराठवाडा हा सुद्धा या रेल्वे मार्गाने जोडले जाणे, तब्बल ११० वर्षांपासून प्रलंबित असलेला खामगाव जालना रेल्वेमार्गाला २०१६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सर्वेक्षणासाठी मान्यता देणे, यासाठी ३००० कोटी रुपयांची तरतूद ही केल्याने खामगाव-जालना रेल्वे मार्ग होण्याच्या जिल्हावासीयांच्या आशा पल्लवित होणे, या संदर्भात बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२० रोजी तारांकित प्रश्न क्र.१७०९ विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित झाल्याने या रेल्वेमार्गात येणाऱ्या अडचणी दूर करून सदर रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी रेल्वे विभागासोबत बैठक घेण्याची ग्वाही तत्कालिन परिवहन मंत्री यांनी दिल्याने दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी रेल्वेच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात येणे, खामगाव-जालना रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणासाठी तांत्रिक टीमकडून बुलडाणा व जालना येथे येऊन पाहणी करून जाणे, केंद्रिय रेल्वे राज्यमंत्री यांनी सुद्धा याबाबत बुलडाणा जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन या रेल्वे मार्गाचा सर्व्हेक्षण करण्यासाठी मान्यता देणे, परंतु अद्याप राज्य शासनाने या रेल्वे मार्गासाठी आपला हिस्सा भरण्याची हमी न दिल्याने या मार्गाचे काम रखडून पडणे, त्यामुळे मागास असलेल्या विदर्भ आणि मराठवाडा या दोन प्रदेशांना जोडणारा हा रेल्वे मार्ग रखडल्याने जनतेमध्ये निर्माण होत असणारा तीव्र असंतोष, यासाठी या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाने आपला हिस्सा हमी देऊन बुलडाणा जिल्हा वासियांसोबतच विदर्भ मराठवाडा या विभागांना जोडणाऱ्या या रेल्वेचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. | दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| (१६) | “राज्यात नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला अधिक महत्त्व देण्यात येणे, त्यासाठी शैक्षणिक पात्रतेमध्येही बदल करण्यात येणे, त्यामुळे अनेक संस्था त्या-त्या समाजातील विद्यार्थ्यांचा संशोधनाचा टक्का वाढविण्यावर भर देत असून यासाठी अनेक योजनाही सुरू करण्यात आलेल्या असणे, मात्र आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच आलेली असणे, राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे संशोधनामध्ये येण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे प्रमाण वाढविण्यासाठी आणि या प्रवर्गातील | डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, सुरेश वरपुडकर, अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे' ने अधिछात्रवृत्ती योजना सुरू करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून सुरू असूनही वित्त विभागाच्या अडथळ्यांमुळे अधिछात्रवृत्तीचा प्रश्न प्रलंबित असणे, परिणामी पीएचडी करून आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून बार्टी, सारथी व महाज्योती या तिन्ही संस्थांच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संजय जगताप, धिरज देशमुख, बळवंत वानखडे, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, माधवराव पवार, राजेश एकडे, अमीन पटेल, अस्लम शेख, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, रोहित पवार, विनोद निकोले, अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, दौलत दरोडा, वि.स.स. | |
| (१७) | "आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी बांधवांच्या खावटी कर्जावर वार्षिक नियोजन अवलंबून असणे, परंतू सन २०२२ मध्ये खावटी कर्ज वाटप न केल्यामुळे राज्यातील आदिवासी बांधवांची घोर निराशा झाली असल्याचे निदर्शनास येणे, चार हजार रुपयांप्रमाणे ११ लाख ५० हजार आदिवासी कुटूंबाला एकूण ४४० कोटी रुपयाचे खावटी कर्ज वितरीत करण्याचा शासनाला विसर पडल्याने दऱ्या-खोऱ्यांत आणि दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांना पुरक-पोषण, आहार न मिळाल्याने कुपोषनाचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास येणे, आदिवासी विकास विभागाच्या गाफील नियोजनामुळे शासनाचे ४४० कोटी रुपये अखर्चित राहिल्याची गंभीर बाब समोर येणे, अद्यापपर्यंत आदिवासी विकास विभागाकडून नव्याने खावटी कर्ज वितरीत करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला किंवा कसे याबाबत अस्पष्टता असणे, या गंभीर बाबी कडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| (१८) | "पारोळा (जि.जळगाव) येथील उप विभागामध्ये जलसंधारणाच्या विविध कामांमध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये उघडकीस येणे, याबाबत लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी जिल्हाधिकारी, जळगाव तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे | श्री.अनिल पाटील, वि.स.स. | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तक्रारी करणे, त्यानंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये सदरील तक्रारींमध्ये तथ्य आढळणे, मात्र चौकशी समितीने अनियमितता केल्याच्या नावाखाली सदरील अधिकाऱ्यांना संरक्षण देणे, सदरील कामांवर ठेकेदाराच्या मूळ देयकापेक्षा वाढीव व बनावट देयके अधिकाऱ्यांनी मंजूर करून घेणे, साठवण बंधारा फाफोरे बु व साठवण प्र ऊ पिंपरी या कामांवर मर्यादेपेक्षा अनुक्रमे १४.५८ लक्ष व ५.५९ लक्ष इतके अतिरिक्त देयके मंजूर करून घेण्यात येणे, परंतु चौकशी समितीद्वारे सदरील खर्च कार्यालयीन बाबींवर केला गेल्याचे नमूद करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न करण्यात येणे, वास्तविक, कार्यालयीन बाबींसाठी जिल्हा नियोजन समितीकडून स्वतंत्र निधी देण्यात येत असतानाही अधिकाऱ्यांनी केलेली गैर कृत्ये झाकण्यासाठी चौकशी समितीने कार्यालयीन खर्चासाठी निधी वापरल्याचे सांगून शासनाची तसेच लोकप्रतिनिधींची फसवणूक व दिशाभूल करणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जळगाव यांनी नेमलेल्या उप विभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उप विभाग, जळगाव यांच्या चौकशी समितीचा अहवाल अद्यापही प्रलंबित असणे, गैरव्यवहार झालेला उघडकीस येऊनही संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१९) | "अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या ४०० खाटांच्या नुतन इमारतीमध्ये भौतिक सुविधांची कामे व आरोग्य साधनांची पुर्तता तसेच सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये फेज २ इमारतीमध्ये न्युरो सर्जरी व कॅन्सर रुग्णांसाठी केमो थेरपी युनिट तातडीने कार्यान्वित होणे अतिशय गरजेचे असणे, आय.सी.यु., ऑपरेशन थेटर, लेबर वॉर्ड, नवजात शिशु दक्षता विभाग तसेच पहिल्या मजल्यावर प्रस्तावित बाबींचा व नवनिर्माणाधिन इमारतीत स्त्री रुग्ण व नवजात शिशुंकरिता आवश्यक असलेल्या सोयी सुविधांकरिता तसेच फर्निचर व विद्युतीकरण आदी कामे करण्याकरिता निधीची गरज असणे, त्यादृष्टीने या दोन्ही रुग्णालयाच्या सर्व सुविधा कार्यान्वित होऊन रुग्णांना त्याचा लाभ व्हावा यादृष्टीने शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची गरज असतांना त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार, सुरेश वरपुडकर, सुनिल केदार, विश्वजित कदम, कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री अमित देशमुख, धिरज देशमुख, अस्लम शेख, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, संजय जगताप, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२०) | "महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपॅथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पध्दतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे, राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरू असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतू आयुर्वेद उपचार पध्दतीचे समावेश शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबणा, शासनाने आयुर्वेदीक उपचार महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजनामध्ये समाविष्ठ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ.राहूल पाटील, वि.स.स. | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली. |
| (२१) | "ठाणे शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून विविध सोसायट्यांना टँकरद्वारे पाणी घेण्यास भाग पाडण्याचे कारस्थान टँकर लॉबी व पाणी पुरवठ्याचे कार्यकारी व उप अभियंता याच्याव्दारे सुरू असणे. त्यामुळे टँकर लॉबी पोसण्यासाठी कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप ठाणे वासियांकडून करण्यात येणे, ही बाब दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, तथापि, ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा योजनेतून माहे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ पासून झोनिग पद्धतीने नियोजन करण्याचे निश्चित करणे, त्यामुळे शहरातील घोडबंदर, वागळे इस्टेट, समतानगर, वर्तक नगर, सिद्धेश्वर, जेल तलाव इत्यादी भागात पाणी पुरवठा झाला नसल्याने सबंधित विभागात टँकरने पाणी पुरवठा केला जाणे, या एकूणच प्रक्रियेत नागरिकाची टँकर लॉबीकडून आर्थिक लुट होत असल्याची गंभीर बाब उघड होणे, खाजगी टँकर पालिकेच्या पाणी वितरण व्यवस्थेकडून रु.७००/- प्रमाणे पाणी उचलत असणे, मात्र सोसायट्यांना सदर टँकरचे पाणी घेताना रुपये ४ ते ७ हजार मोजावे लागत असणे, गेल्या आठवडाभर ही संपूर्ण लुट महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी व उप अभियंता व तत्सम अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचे उघड होणे, दरम्यान विविध सोसायट्यांना पाणी पुरवठा होत नसल्याने त्यांना नाईलाजास्तव खाजगी टँकरव्दारे अवाचेसव्वा रुपये मोजून पाणी विकत घ्यावे लागणे, यामध्ये शेकडो सोसायटीतील नागरिकांची | श्री. संजय केळकर, वि.स.स. | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली. |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रंचड आर्थिक लुट होणे, तथापि टँकर लॉबीकडून होणारी नागरिकांची लुटमार, यावर पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचे जाणूनबुजून दुर्लक्ष होणे, तसेच टँकरच्या झालेल्या फेऱ्या, वितरीत केलेले पाणी व नागरिकांची पाण्याची आवश्यकता याबाबतची आकडेवारी व माहिती उपलब्ध नसणे, तथापि ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाणी पुरवठा न होणे व कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न होणे, खाजगी टँकर लॉबीला आर्थिक लाभ मिळवून देणे, या गंभीर बाबी असून याची सक्षम प्राधिकरणाव्दारे चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (२२) | “महाराष्ट्र राज्यातील बहुतांश नागरिकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असणे, शेतकऱ्यांच्या जमिनीचे सर्वे नं. व गट नं. चे सर्वेक्षण / मोजणी होऊन बराच कालावधी झालेला असणे,नकाशावरील दर्शवण्यात आलेले शेत / पाणंद रस्ते खूप जुन्या कालावधीतील असणे, शेतकऱ्यांच्या कुटुंबात वाटणी, खरेदी-विक्री आदि कारणाने जमिनीचे क्षेत्र कमी झालेले असणे, पूर्वीच्या काळी असलेले मोठे बंधारे अत्यंत लहान झाले असणे, अशा कारणाने शेतकऱ्यांच्या शेतीला दळणवळणासाठी रस्ताच नसल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे, विज्ञान युगात शेतीची जवळपास सर्व कामे यंत्रावर अवलंबून असल्याने शेतीसाठी रस्त्याची नितांत गरज असणे, भविष्यात शेत रस्त्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, महसूल प्रशासनाने विविध कलमाखाली आदेशित केलेली वहिवाटीचे रस्ते, वाटणी पत्रातील नमूद रस्ते, नकाशावर घेतली नसणे, सदरील रस्ते सातबारा वर नोंद करणे गरजेचे असणे, शेत जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणीत तसेच कुटुंबाच्या वाटणी फेर मध्ये शेतीला जाणारा रस्त्याचा उल्लेख दर्शविणे व सदरील नोंदी सातबारा व इतर हक्कात घेणे बंधनकारक करण्याबाबत लोकप्रतिनिधींची शासनाकडे होत असलेली मागणी, त्याबाबत उचित कार्यवाही शासन स्तरावरुन झाली नसणे, शेत रस्त्यांचे वाद व प्रकरणे राज्यात महसूल विभाग, पोलिस ठाणे, आणि न्यायालयात सातत्याने दाखल होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यात अनेक शेतकऱ्यांना शेत रस्ता नसल्याने शेतकऱ्यांच्या माल पावसाळ्यात शेतातच पडून असणे, पाऊस व नैसर्गिक आपत्तीत सदरील धान्याच्या नुकसनीच्या अनेक घटना गावोगावी दरवर्षी होत असल्याचे दिसून येणे, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतीला रस्ता देण्यासाठी आवश्यक कार्यवाही राज्य शासनाच्या वतीने करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. | दिनांक<br>९ मार्च, २०२३<br>रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२३) | "चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अनेक तक्रारी वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून होत असणे, रुग्णालयात औषधांचा आवश्यक साठा असतांनाही कृत्रिम तुटवडा निर्माण करुन रुग्णांना बाहेरुन औषध विकत आणायला सांगण्यात येणे, त्यामुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन कराव लागणे, तसेच रुग्णालयातील अनेक वार्डात पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, परिणामी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकात वाढते असंतोषाचे वातावरण, रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये उक्त रुग्णालयाची सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करणे, सदर पाहणी दरम्यान रुग्णालयात पाण्याअभावी मोतीबिंदूच्या सर्जरीसाठी तीन रुग्णांना वाट पहावी लागण्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, शासनाने यासर्व प्रकरणी चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची चौकशी करुन औषधांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन रुग्णांना बाहेरुन औषध खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. | दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (२४) | "कोल्हापूर चित्रनगरीत चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे निदर्शनास येणे, सदर बैठकीत चित्रनगरीचा अधिकाधिक विकास आणि आधुनिकीकरणाचे नियोजन करुन त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबरोबरच आवश्यक त्या निविदा काढण्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी आदेशित करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, तसेच सदर बैठकीत त्याचबरोबर सौरऊर्जा प्रकल्प बसविणे, बाहयस्तोत्रावर सुरक्षा रक्षक पुरवणे, कर्मचारी वर्ग पुरविणे, कोल्हापूर चित्रनगरीत आवश्यक तेथे पथदिवे लावणे, पाण्याची उच्चतम टाकी बांधणे याबाबतही चर्चा होऊन निर्णय घेण्यांत आला असल्याचेही निदर्शनास येणे, सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार त्याबाबत निविदा प्रक्रिया व अन्य तद्नुषंगिक कामे करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री.रोहित पवार, दिपक चव्हाण, हसन मुश्रीफ, बाळासाहेब पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२५) | “मु.का.अ.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या प्रमूख उपस्थितीत गुगल मीटिंगमध्ये चंदा बेलसरे व इतर आरोग्य सेविका यांनी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी मांडल्या असणे, अमरावती जिल्ह्यातील अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद आस्थापनेवरील आरोग्यसेविका पुष्पा वानखडे, चंदा बेलसरे, दिपाली शिंदे, पद्मा जाधव, सुनंदा नाथे, आदींनी राज्य सरकारकडून खालील मागण्या मंजूर करण्यात यावे या मागणीसाठी जिल्हापरिषद, अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा भा. प्र. से. यांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले यांच्या प्रमूख उपस्थितीत झालेल्या गुगल मीटिंग मध्ये अमरावती जिल्ह्यातील आरोग्य सेविका यांनी भाग घेऊन मीटिंग मध्ये आरोग्य सेविका कृती समितीच्या वतीने चंदा बेलसरे आरोग्य सेविका पदाधिकारी यांनी आरोग्य सेविकांच्या हिताच्या एकूण १८ मागण्या मांडल्या असणे, ज्या जी.प. अमरावती संबधित आ हेत त्या सोडविल्या जातील असे आश्वासन जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. ढोले यांनी दिले असणे, तर जे सरकारकडील विषय आहेत त्या सरकारचे मंत्रालयीन विभाग यांच्याकडे पाठविल्या असल्याचं त्यांनी सांगितले, अमरावती येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, | श्री. रवि राणा, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| | सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांना वरील मागणीचे निवेदनामार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्याकडे देऊन त्यांचें कार्यालयाचे उप आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक ५९९/२९२३ दिनांक १ मार्च, २०२३ रोजी अवर सचिव, आस्था.८, ग्राम विकास विभाग , बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट मुंबई, मंत्रालय यांना पाठवले असणे, विशेषतः यापूर्वीही सरकारने या मागणीचा विचार करून निर्णय घेण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील स्थानीक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत त्यांच्या उपस्थितीत नागपूर अधिवेशनादरम्यान राज्याचे आरोग्य मंत्री यांच्याकडे विधान भवनात तसेच राज्य सरकारचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ०१ ते १८ मागण्यांचे निवेदन दिलेले असणे, ज्या निवेदनामध्ये त्यांनी खालील प्रमाणे मागण्या मांडल्या होत्या त्यामध्ये सन २००५ नंतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका नियमित यांची पदभरती करून त्वरित रिक्त पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य सेवक याप्रमाणे आरोग्य सेविका यांना विना प्रशिक्षण पदोन्नती देण्यात यावी, प्रशिक्षणाची अट रद्द करण्यात यावी, तसेच सर्व आरोग्य | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | सेविकांची ज्येष्ठता सूची लवकरात लवकर प्रशिक्षण पूर्ण करून घ्यावे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन एल. एच. व्हीं. पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य प्राथमिक केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन आरोग्यसेविका पदे भरण्यात यावी, तसेच तालुका स्तरावर आरोग्यसेविका पदनिर्मिती करण्यात यावी, तसेच रिक्त पदाचा उपकेंद्राचा मांडण्याकरिता आरोग्य सेविका यांना अतिरिक्त वेतन देण्यात यावे, तसेच वाढत्या पेट्रोलची महागाई पाहता आरोग्य सेविका यांचा कायम प्रवास भत्ता पंधराशे रुपये भरून तीन हजार रुपये करण्यात यावा, नियमित पदोन्नतीची नस्ती निकाली काढणे व पद रिक्त झाल्याबरोबर दुसरे महिन्यात ज्येष्ठतेच्या यादीनुसार पात्र पदोन्नती देण्यात यावी, तसेच आरोग्य सेविकांना कार्य करण्याचा पाच दिवसाचा आठवडा करण्यात यावा, तसेच आरोग्य सेविका यांचे कायमस्वरूपी पदे भरण्यात यावी, तसेच कंत्राटी पद्धत बंद करण्यात यावी, तसेच कोरोना संक्रमण महामारीच्या काळात आरोग्य सेविका यांनी जिवाची काळजी न करता अहोरात्र काम केल्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढ देण्यात यावी, आरोग्य सेविका हिला चालू सेवाकाळामद्ये GNN ट्रेनिग with salary अशी पद्धत सुरु करणे, निवासस्थान राहणे योग्य नसल्यास आरोग्य सेविकांना घरभाडे भत्ता देण्यात यावा, तसेच सर्व ऑनलाईन पोर्टल जबाबदारी इतर कर्मचारी यांना देण्यात यावे जेणेकरून टेक्निकल कामकाज आरोग्य सेविकेला गुणवत्तापूर्वक सेवा रुग्णांना देता येतील, यासह एक ते १८ प्रकारचे आदींचा समावेश असलेले निवेदन आरोग्य सेविका यांनी राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदन देऊन अवगत केलें असणे, परंतु अद्याप पर्यंत शासनाकडून वरीलप्रमाणे निर्णय झाला नसणे म्हणुन वरील प्रमाणे शासन निर्णय, आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२६) | "मुंबईतील विक्रोळी कन्नमवार नगर येथील ४५ वर्षांपूर्वी सर्वसामान्य मागासवर्गीय लोकांसाठी मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३१ इमारती शासनाने उपलब्ध करून देणे, येथील बहुसंख्य इमारतींचे अभिहस्तांतरण झालेले असून या इमारती ४५ ते ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या असल्याने या इमारती धोकादायक अवस्थेत असणे, जीर्ण इमारतींमुळे अनेक दुर्घटना घडल्या असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने या इमारतींची तातडीने पुनर्विकास करण्याची आवश्यकता असताना सामाजिक न्याय विभागाने अनेक अटी व शर्ती लावून पुनर्विकासास अडथळे निर्माण करणे, समाज कल्याण विभागाच्या | प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | दिनांक २६ फेब्रुवारी, १९८५ च्या आदेशात सभासदांच्या मृत्यूपश्चात नियमानुसार वारसदारांचे सदस्यत्व मंजूर करणे आवश्यक असून सामाजिक न्याय विभागाने पुन्हा वारसदारांचे जातीचे, दाखले, उत्पन्नाचे दाखले, वास्तव्याचे दाखले व इतर कागदपत्रे मागणी करणे, यापूर्वी या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार आयुक्त, समाज कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून या समितीनेही अद्याप कोणत्याच शिफारसी व अहवाल शासनास सादर न करणे, त्यामुळे या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासास बसलेली खीळ, इतर शासकीय गृहनिर्माण संस्थांवरील निर्बंध काही वर्षातच उठविले जातात परंतु मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला जात असल्याची जनमानसात होत असलेली चर्चा, सन १९७८ पासून या गृहनिर्माण संस्थेतील अनेक खरेदी विक्री व्यवहार हे म्हाडा, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन कार्यालयाच्या माध्यमातून नोंदणी करून व अभिहस्तांतरण झालेल्या गृहनिर्माण संस्थांनी स्वतःच्या अधिकारात व्यवहारांना मान्यता देऊन महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार सर्व कामकाज केले असताना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रानुसार कालबाह्य व गैरलागू अटी व शर्ती लादून धोकादायक इमारतीमध्ये जीव मुठीत ठेवून जीवन जगणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्विकासाला अडचणी निर्माण केल्यामुळे जनमाणसात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने चौकशी करून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांच्या पत्राबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (२७) | “पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे विलिनिकरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या संस्थेमध्ये करण्यात येणे, परिणामी प्राधिकरणाच्या जवळपास ३० हजार भूखंडाचे प्रॉपर्टीकार्ड बनविण्याचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सन २०१८ मध्ये सेक्टर २ मधील मिळकतदारांना प्रायोगिक तत्वावर प्रॉपर्टीकार्ड देण्यात आले असणे, सद्य स्थितीला प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मूळ प्राधिकरण हद्दीचे नकाशे उपलब्ध नसणे, यामुळे प्राधिकरणाची नेमकी हद्द कोणती याबाबत संभ्रम कायम असणे, जागा मालकाचे ७/१२ उताऱ्यावर प्राधिकरण संपादित असा शेरा असल्याने प्राधिकरण जागेत दिवसेंदिवस वाढत असलेले अतिक्रमण व त्यावर उभी राहत असलेली बेकायदेशीर बांधकामे, यामुळे स्थानिक महापालिका प्रशासनाच्या | श्री.महेश लांडगे, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | महसूली उत्पन्नावर होणारा परिणाम, त्यानुषंगाने महसूल विभाग व मा.जमाबंदी प्रशासनाने प्राधिकरण हद्दीचे अत्याधुनिक पद्धतीने जीसीपीएस आणि ईटीएस प्रणालीद्वारे हद्द कायम करण्याची आवश्यकता, त्याद्वारे ३० ते ४० हजार भूखंडावरील जागा मालकांना तात्काळ दिलासा देण्याची गरज, यावर शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२८) | "आरे कॉलनी (गोरेगांव (पूर्व), मुंबई) येथील आरे प्रशासनाच्या अखत्यारित येत असलेल्या शासकीय रुग्णालयाचे हस्तांतरण, अंतर्गत रस्ते व प्रवेशद्वाराचे नामकरण, पिकनिक स्पॉट उदयानाचे सौंदर्यीकरण, आरे तलावाचे सुशोभिकरण, स्टार शौचालय आदि शासन स्तरावर गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, आरेमधील शासकिय रुग्णालय महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, सदरहू शासकिय रुग्णालय महापालिकेकडे हस्तांतरित केल्यास जोगेश्वरी येथील बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर सेंटर किंवा गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थ मनपा प्रशासनाच्या रुग्णालयाशी जोडल्यास रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होणे, डॉक्टर व कर्मचारी वर्ग उपलब्ध होणे, त्याचबरोबर आरे अंतर्गत ४५ कि.मी. च्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, सदरहू रस्ते दुरुस्तीकरिता दुग्धविकास विभागाकडे निधी उपलब्ध करण्यास होत असलेली चालढकल, आरे अंतर्गत रस्ते करण्यास शासनाकडे निधी नसल्यास शासनाने देखभाल व दुरुस्तीकरिता हे रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची आवश्यकता, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २/११/२०२२ रोजी १७३.०० कोटीचा प्रस्ताव मंजुरीकरिता शासनाकडे सादर करणे, यापैकी ४७ कोटीचा डांबरीकरणाकरिता तांत्रिक मान्यता देण्यात आली असून सदर प्रस्ताव निधी मंजुरीकरिता वित्त्त विभागाकडे प्रलंबित असणे, स्टार शौचालयास निधी मंजुर व परवानग्या असूनही केवळ शासनाच्या स्थगितीमुळे रखडलेला असणे, तसेच आरे गोरेगांव चेकनाका येथे उभारण्यात येत असलेल्या प्रवेशद्वारास "छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार" असा नामकरणाचा प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित असणे, आरे परिसरातील मरोळ, पवई व गोरेगांव असे तीन चेकनाका येत असून आरे हे पर्यटनस्थळ असल्याने याठिकाणी राज्यातून / परदेशातून पर्यटक येत असणे, त्यामुळे आरेमधील पिकनिक स्पॉट उद्यानाचे सौदर्यीकरण, आरे तलावाचे सुशोभिकरण तातडीने करण्याची आवश्यकता, सदरहू पर्यटन स्थळे ही देखभाल व दुरुस्तीकरिता संस्थाच्या | श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | ताब्यात देतांना सनियंत्रण समितीच्या कोणत्याही आवश्यक त्या परवानग्या संबंधित यंत्रणेमार्फत घेतलेल्या नसणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन होत असलेल्या अनधिकृत बांधकामांकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे आरे परिसरातील सौंदर्याचा व पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, आरेच्या सौदर्यात भर घालणारे भव्य असे प्रवेशद्वार उभारण्याबाबतचा प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्याची आवश्यकता, आरे कॉलनीतील प्रलंबित कामासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुनही शासन स्तरावर कार्यवाही होण्यास होत असलेला विलंब, परिणामी स्थानिक नागरिक विकासापासून वंचित होणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर कार्यवाही करुन तातडीने निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२९) | "भारतीय वन संवर्धन कायदा, १९८० लागू होण्यापूर्वी विविध सिंचन प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तसेच ग्रोमोअर योजना, भूमिहीनांच्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी वेगवेगळ्या वन विभागाच्या जमिनीचे वाटप करण्यात आले असणे, ४५-५० वर्षापेक्षाही जास्त कालावधी या जमिनी सदर शेतकऱ्यांच्या ताब्यात असून, वहिवाटीत असणे, वन संवर्धन कायदा, १९८० पूर्वी निर्वनीकरण करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना असणे, निर्वनीकरण न करता वाटप करण्यात आलेल्या शेतजमिनी वन विभागाचे निर्बंध असणे त्यामध्ये अनेक कायदेशीर अडचणी निर्माण झालेल्या असणे, याच जमिनीच्या उत्पन्नावर संबंधित शेतकऱ्यांची उपजीविका सुरु असणे, सद्यःस्थितीत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे वन नसताना व त्या जमिनी या शेतजमीन असताना त्या ठिकाणी शेतकरी व नागरिकांना जमिनीचे हस्तांतर करणे व त्या ठिकाणी वेगवेगळ्या योजना राबविणेसंदर्भात कायदेशीर अडचणी निर्माण होत असणे, ज्यांच्या जमिनी वेगवेगळ्या शासकीय प्रकल्पासाठी संपादित झालेल्या वर्ग एक जमीन असताना त्यांना वर्ग दोनची जमीन देऊन सदर शेतकऱ्यांवर देखील अन्याय झालेला असणे, त्यामुळे सदर बाबतीमध्ये केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून या जमिनी निर्वनीकरण करण्याची आवश्यकता, राज्यात अनेक ठिकाणी वन विभागाच्या जमिनीतून शेतकऱ्यांच्या व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांच्या पाईप लाईन जात असणे, शेतकऱ्यांना या पाईपलाईनसाठी पूर्वलक्षी प्रभावाने परवानगी मिळण्याची आवश्यकता, | ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर बिबटे व तत्सम हिंस्त्र वन्य प्राण्यांचा धोका निर्माण झाला असणे, यामुळे नागरिक व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपयोजना." | | |
| (३०) | "परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी ब्राम्हण समाजाने राज्यात विविध ठिकाणी अंदोलन करणे, राज्यातील ब्राम्हण समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हलाकीची होणे, सुशिक्षित तरूणांना शासकीय नोकऱ्यांची संधी कमी होणे, पर्यायाने खाजगी नौकरी व व्यवसाय करण्यासाठी पर्याय नसणे, गरीब कुटुंबातील तरूणांना शैक्षणिक व व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.प्रकाश सोळंके, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (३१) | "कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, कुंडलवाडी, (ता.बिलोली, जि.नांदेड) या संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या सभासदांच्या शेतजमिनीच्या सिंचनासाठी कुंडलवाडी, शेळगांव, चन्नापूर आणि पाटोदा आष्टी अशा दोन उपसा जलसिंचन योजनांचे काम सन १९८५ मध्ये सुरु होणे, या कामाकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड यांनी संस्थेला रु.२,०५,२७,८६८/- इतके कर्ज मंजूर करुन त्याचा बोजा शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर टाकणे, १९८५ मध्ये सुरु झालेले काम १९९४ मध्ये पूर्ण होणे, सदरची योजना प्रत्यक्षात कार्यान्वीत न होणे, योजनेतील ५६९ शेतकरी सभासदांपैकी बहुतांश सभासद मागासवर्गीय व अल्पभुधारक असणे, दोन्ही उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना सिंचनाचा कोणताही लाभ न मिळणे, मात्र, शासनाने २०१४ मध्ये आश्वासन देऊनही शेतकऱ्यांची कर्जाची रक्कम अद्याप माफ न केल्यामुळे ७/१२ वर कर्जाची नोंद असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे जमिनीचे व्यवहार पुर्णपणे ठप्प होऊन शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत जाणे, या बरोबरच राज्य शासनाने दि.२७/१२/२०१९ रोजी जाहीर केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजने अंतर्गत कर्ज मुक्तीसाठी पात्र ठरलेल्या नांदेड जिल्हातील बँक ऑफ बडोदा शाखा, कुंडलवाडी, जि. नांदेड या बँकेचे खातेदार असणाऱ्या १२०० शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे पैसे बँकेकडे जमा होणे, त्यापैकी ५३६ शेतकऱ्यांच्या प्रकरणात कर्जमाफीची रक्कम आणि प्राप्त झालेली रक्कम यांचा ताळमेळ जुळत नसणे, त्यामुळे शासन स्तरावरुन मार्गदर्शन घेऊन | सर्वश्री अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. | दिनांक १० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | बँकेने सदरची रक्कम परत करणे, बँकेने परत केलेल्या ५३६ शेतकऱ्यांच्या प्रकरणातील कर्जमाफीची निश्चित रक्कम बँकेकडे अद्यापही पुन्हा जमा न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर अजूनही कर्ज दिसत असणे, जुने कर्ज थकीत असल्यामुळे शेतकऱ्यांना बी-बीयाणे व शेतीच्या कामासाठी नव्याने कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होणे, यासंदर्भात जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नांदेड आणि बँक ऑफ बडोदा, शाखा कुंडलवाडी, जि. नांदेड त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधीसह कर्ज मुक्तीसाठी पात्र शेतकऱ्यांकडून सातत्याने पाठपुरावा करुनही कर्ज माफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापही जमा न होणे, या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, कुंडलवाडी, (ता. बिलोली, जि. नांदेड) या संस्थेच्या ५६९ शेतकरी सदस्यांच्या प्रकरणी २०१४ मध्ये दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने त्यांचे कर्ज तातडीने माफ करण्याची आवश्यकता असून महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजने अंतर्गत पात्र ५३६ शेतकऱ्यांची कर्ज माफीची रक्कम त्यांच्या खात्यात तात्काळ जमा होण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून एवढा विलंब होऊनही कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामतः स्थानिक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३२) | "देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात महत्वाची भूमिका बजावणारे व देशाच्या स्वातंत्र्यासाठी तत्कालीन ब्रिटीश सरकारकडून फाशीची शिक्षा पत्करुन जिवाचे बलिदान देणारे हुतात्मा श्री. शिवराम हरी राजगुरु यांचे पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरुनगर) तालुक्यातील खेड हे जन्मस्थळ असणे, या हुतात्माचा गावातील हा वाडा राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी १९८० च्या दशकात देशप्रेमींकडून शासनाकडे करण्यात आलेली असणे, सन १९९५ मध्ये या स्मारकाच्या कामास गती मिळाल्याचे दृष्टोत्पतीस येणे, तथापि १९९५ पासून तत्कालीन शासनाने स्मारकाच्या कामास वेळोवेळी निधी देण्याचे घोषित करण्यात येणे, परंतु आजतागायत हा वाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम पुर्णत्वास आलेले नसणे, त्यामुळे सदर हुतात्मा स्मारक हे केवळ कागदापुरतेच मर्यादीत आहे की काय अशी संमभ्रमावस्था निर्माण होणे, तसेच स्मारकाचे काम रखडल्यामुळे त्याठिकाणी अनेकांनी अतिक्रमण केल्याचे आढळून येणे, याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी (खेड-राजगुरुनगर मतदारसंघ) यांनी त्यानंतर आतापर्यंत अनेकदा लेखी पत्राद्वारे व सभागृहात प्रश्न मांडून शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधण्याचा केलेला प्रयत्न, माध्यमांनीदेखील त्यांची वेळोवेळी दखल घेणे, परंतु | सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, अजित पवार, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. चेतन तुपे, सुनिल टिंगरे, रोहित पवार, संजय जगताप, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असे असतांनाही हुतात्मा राजगुरु यांचा वाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून अस्तित्वात न येणे, त्यामुळे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यासह राज्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व उदासिनतेची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करुन हुतात्मा राजगुरु यांचे स्मारक उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३३) | "मुंबई तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस कॅन्सर या आजाराच्या विळख्यात अडकणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असल्याची गंभीर बाब निदर्शनात येणे, कॅन्सरच्या उपचारासाठी येणारा खर्च हा सामान्य व्यक्तीच्या आवाक्याबाहेर असून सध्या मुंबई व परिसरात कॅन्सरकरिता सिटीस्कॅन चा खर्च १०,०००/- रुपये, एम.आर.आय करिता १५,०००/- रुपये, बी. आय.ओ.एक्स.बी.एक्स.वाय करिता ५,०००/- रुपये, किमोथेरपी करिता २,००,०००/- रुपये, रेडिएशन करिता १,००,०००/- रुपये, ऑपरेशन करिता २,००,०००/- इतका अंदाजे खर्च येत असणे, सदर खर्च हा सामान्य माणसाच्या आवाक्या बाहेर असून इतका मोठा खर्च शासनाच्या योजने अंतर्गत समाविष्ट करणे शक्य होत नसणे, मुंबई मधील टाटा रुग्णालयात उपचारासाठी संपूर्ण देशभरातून रुग्ण येत असणे, टाटा रुग्णालयात उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांना रुग्णालयात प्रवेश मिळविण्यासाठी ५-६ महिने प्रतीक्षा करावी लागत असणे, खाजगी रुग्णालयात उपचार घेणे हे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे नसणे, मुंबईतील वडाळा बी.पी.टी. च्या क्षेत्रामध्ये नवीन रुग्णालय बांधण्याकरिता आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे निदर्शनात येणे, उपचारा अभावी कॅन्सर या आजाराने मृत्यू होण्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत असून सदर बाब ही गंभीर होत असल्यामुळे मुंबई मध्ये अत्याधुनिक सोयी सुविधा असलेले नवीन रुग्णालय उभारण्याची नितांत आवश्यकता, ही बाब लक्षात घेऊन शासनाने जलदगतीने कृती करून सदर ठिकाणी अद्ययावत कॅन्सर रुग्णालय उभारण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (३४) | "मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडल्याने आणि दुरावस्था झालेली असल्याने परिसरातील कोकणवासीय नागरिक व पत्रकारांनी माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्यासुमारास कोलाड नाका येथे मानवी साखळी करत आंदोलन केलेले असणे, या महामार्गाच्या रखडलेल्या चौपदरीकरणाच्या कामाची उच्चस्तरिय समिती गठीत करुन चौकशी व्हावी आणि दोषी अधिकारी व संबधितांवर कारवाई करण्याची मागणी केलेली | कुमारी आदिती तटकरे, श्री.अमित साटम, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. छगन | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | असणे, डिसेंबर, २०२२ मध्ये पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, महामार्गाच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून दररोज होणारे अपघात रोखणे तसेच महामार्गाचे अनेक वर्षांपासून सुरु असलेले काम पुर्ण करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, सदरची परिस्थिती अधिकच गंभीर बनत चाललेली असणे, महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून अपुर्णावस्थेतील कामांमुळे नागरिकांना त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, महामार्गाच्या दुर्दशेमुळे आतापर्यंत हजारो अपघात झालेले असून शेकडो जणांना आपला जीव गमवावा लागलेला असल्याची माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात गंभीर माहिती उघडकीस येणे, सदर प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी, पत्रकार व सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री यांचेकडे अलिकडील काळात वारंवार मागण्या करणे, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोकण परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, दुरावस्थेत असलेल्या महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यांचेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करुन अडचणींत असलेल्या वाहनचालकांबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महामार्गाचे काम मार्गी लावून आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, भास्कर जाधव, सुनिल प्रभू, संजय पोतनीस, वि.स.स. | |
| (३५) | "पंढरपूर येथे राज्य सरकारने ३०० कोटी रुपयांचा पंढरपूर कॉरिडॉर विकसित करण्यास सुरुवात केली असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ व मध्य प्रदेशात महाकाल कॉरिडॉर अंतर्गत ज्योतिर्लिंग स्थळी उच्च दर्जाच्या सुविधा व विकासकार्य करण्यात येत असून, महाराष्ट्रातील परळी सह विविध ज्योतिर्लिंग स्थळी रस्ते, दर्शन सभा मंडप, पार्किंग, पूरक व्यवसायांना दुकाने, यांसह विविध उच्च दर्जाच्या सोई-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असणे, केंद्र सरकारने तीर्थ स्थळांच्या विकास व संवर्धनासाठी सुरू केलेल्या प्रसाद योजनेत परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग समाविष्ट केले जावे, यासाठी राज्य सरकारने केंद्राला परिपूर्ण प्रस्ताव शिफारशीसह पाठविण्याची गरज, परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व महाराष्ट्रातील अन्य सर्वच ज्योतिर्लिंग स्थळी प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा कॉरिडॉर तयार करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया." | श्री.धनंजय मुंडे, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३६) | "राज्यात मोठ्या प्रमाणावर गड किल्ले असून गड किल्ल्यांचे संरक्षण करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली असणे, विविध गड किल्ल्यांवर आवश्यक सोयी-सुविधा नसणे, किल्ल्यांची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झालेली असणे, राजगड, रायरेश्वर, रोहिडेश्वर, तोरणा, इत्यादी किल्यावर सुरक्षा रक्षकांकडून गैरवापर करीत असणे, अनेक किल्ल्याच्या पायथ्याशाी जाण्यासाठी रस्त्याची सुधारणा अपुरी असणे, अनेक किल्ल्यांवर सातत्याने मागणी करून रोप-वे ची सुविधा उपलब्ध नसणे, पर्यटकांना सोयी-सुविधांची कमतरता भासणे, राज्यातील सर्व किल्ल्यांची पहाणी करून त्रुटी दूर करण्याची आवश्यकता, किल्ल्यांच्या दुरावस्थेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्यातील गड किल्ल्यांची झालेली दुरावस्था दूर करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. संग्राम थोपटे, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमित झनक, अमीन पटेल, कुणाल पाटील, संजय जगताप, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (३७) | "धुळे शहरात तोडीपाणी डॉट कॉम या संकेतस्थळावरील +१(५७५)३०८-५९८१ या क्रमांकाच्या मोबाईल वरून शहरातील मुलींचे छुप्या पध्दतीने फोटो काढून त्यांच्या पालकांना व इतरांना पाठवून बदनामी करण्याचा भयंकर प्रकार धुळे शहरात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्या सुमारास उघडकीस येणे, याबाबत धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात येणे, यामुळे धुळे शहरात महिला व महाविदयालयीन मुलींमध्ये तसेच पालकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या गंभीर प्रकरणाची पोलिसांकडून अदयापपर्यंत कोणतीही दखल घेण्यात न येणे, उक्त प्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची चौकशी करून तोडीपाणी डॉट कॉम या संकतेस्थळाची चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री.जयकुमार रावल, रईस शेख, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (३८) | "माझगाव मुंबई येथील म्हातार पाखाडी रोड येथील सव्हे क्र.३१८, ३१९, ३२० व ३२२ येथील ४ जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी २३ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव सन २०१० मध्ये तयार करण्यात येणे, मध्यतंरी दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ रोजी या ४ इमारतीस आग लागणे, सन २०२० मध्ये रहिवाश्यांनी जुन्या इमारतींच्या पुर्निविकासास मान्यता देणे, या योजनेमध्ये २३ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव मंजूर असताना विकासकाने न विचारता अतिरीक्त ७ मजले बांधणे, भाडेकरूंच्या संमतीविना विकासकाने बे व्हु बि.न.२ को.आ.है.सो.लि. नोंदणी करणे, भाडेकरूंना प्रत्येकी रू.२,२५,०००/- कॉर्पस फंड देण्याचे विकासकाने मान्य करून देखील अद्यापपर्यंत न देणे, विकसित केलेल्या बे व्हु बि. २ इमारती मधील सर्व रहिवाश्यांच्या | श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | फ्लॅट मध्ये व सर्वच भागात पाण्याची गळती असणे, खालील मजल्यावर रहिवाशी रहात असताना वरील जादा अनधिकृत मजले बांधल्यामुळे रहिवाशांना धूळ, माती, सिमेंट इत्यादीचा त्रास होत असणे, याबाबत तक्रार करण्यास विकासक बाऊन्सरद्वारे धमकावणे व दहशत निर्माण करणे, एखादी घटना घडल्यास रहिवाश्यांना इमारतीबाहेर येण्याची सोय उपलब्ध नसणे, मा.गृहनिर्माण मंत्री, सचिव, आयुक्त, मुंबई महानगरपालिका व स्थनिक पालिका अधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली असणे, सदर संपुर्ण अनधिकृत बांधकाम व रहिवाशांना होत असलेला त्रास, रहिवाशांत निर्माण झालेले भीतीचे व दहशताचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाची भुमिका व प्रतिक्रिया." | | |
| (३९) | "महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL) मार्फत वीज वितरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असणे, महाराष्ट्र शासनामार्फत भिवंडी शहरात दिनांक २६ जानेवारी, २००७ ला टोरंट पॉवर लिमिटेड या कंपनीला भिवंडी परिमंडळात महावितरणची वितरण फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, मागील पंधरा वर्षाच्या कालावधीत भिवंडी शहर हे महाराष्ट्रामध्ये वीजबील देयक भरण्याची कामगिरी करणारे राज्यातील सर्वोत्कृष्ट एक शहर असणे, ज्यामुळे महावितरण आणि राज्य सरकारच्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय योगदान देण्यामध्ये भिवंडी शहर क्रमांक एकचे शहर असणे, उक्तविषयी तत्कालीन राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या सोबत दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी वीज ग्राहकांच्या जुन्या थकबाकीवर व्याज आकारणीबाबत या विषयावर बैठक आयोजित करण्यात आलेली असणे, भिवंडीतील अनेक ग्राहकांकडे महावितरणची जुनी थकबाकी आहे आणि जर व्याज माफी झाल्यास भिवंडीकर हफ्त्याहफ्त्यामध्ये रक्कम भरण्यास तयार असणे, भिवंडी शहरा सारखेच शिळ-मुंब्रा-कळवा या ठिकाणी वीज वितरण करणेकामी प्रॉयव्हेट कंपनी फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, सदर ठिकाणी जो करार झाला आहे त्याअनुषंगाने मूळ रकमेच्या ११०% रक्कम एकाच वेळी भरण्याचा आणि संपूर्ण व्याज माफी मिळविण्याचा पर्याय पी डी ग्राहकांसाठी आधीच संपूर्ण व्याज माफी योजना अस्तित्वात असणे, परंतु भिवंडी मध्ये सदर योजना ५०% असल्याचा फरक काढण्याबाबत प्रामुख्याने मागणी करण्यात येणे, भिवंडीतील ग्राहकांना महावितरणाच्या जुन्या थकबाकीसाठी समान पर्याय उपलब्ध करून देण्यात येणे, शिळ-मुंब्रा-कळवाच्या धर्तीवर योजना थेट ग्राहकांसाठी उपलब्ध करून देणे, जुनी महावितरणाची | श्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. | दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | थकबाकी स्वेच्छेने भरली जाणे, सदर विषयी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांनी महावितरणला या विषयाचा आढावा घेण्यास सांगणे, आणि त्यांना डेटा/तपशील प्रशासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, सद्यस्थितीत भिवंडी क्षेत्रात ३३००० महावितरणाचे ग्राहक असून महावितरणची जुनी थकबाकी सुमारे ५०० कोटी असणे, तसेच थकबाकींवरील व्याज वर्षानुवर्षे वाढत असल्याने महावितरणची थकबाकी सतत वाढणे. त्याअनुषंगाने "अमृत योजना" नावाची योजना सुरू केल्यास (MSEDCL) च्या रखडलेल्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय वाढ होईल, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना." | | |
| (४०) | "राज्यात सोलापूर औद्योगिक वसाहतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे निर्यात क्षम टॉवेल उत्पादन करणाऱ्या मुनोत गारमेंट टेक्स्टाईल व लगतच्या दोन छोट्या कारखान्यांना माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये लागलेल्या आगीत कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास येणे, माहे फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात दर्शन युनिफॉर्म आणि बालाजी स्पिनिंग मिल ला आग लागून १८ कोटींचे नुकसान झालेले दिसून येणे, दोन्हीही संस्थेमध्ये फायर ब्रिगेडची यंत्रणा सक्षम नसल्यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होत असल्याचे त्या सुमारास निदर्शनास देणे, या कारखान्यातील टॉवेल, सुताचे गठ्ठे अन्य यंत्र सामग्री आगीच्या भक्षस्थानी पडले असणे, याबाबतच्या अहवालानुसार अद्याप टावेल कारखान्याला संपूर्ण नुकसानभरपाई मिळालेली नसणे, १९९३ मध्ये एमआयडीसी सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतर करूनही अद्याप येथे मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध नसणे, त्यात येथे अग्निशामक केंद्र नसल्याने या एमआयडीसीतील अनेक कारखान्यांना आग लागल्याबरोबर अग्निशामन (बंब) गाडी वेळेत न आल्याने कोट्यावधी रुपयाची नुकसान होऊन अनेक कंपन्या नष्ट होत असणे, त्यामुळे एमआयडीसीत आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा सुविधा देण्यासाठी अनेक कारखानदारांनी शासन आणि महानगरपालिकेकडे वारंवार मागणी करून ही याची प्रशासनाने दखल न घेणे, सोलापूर शहरातील ही एमआयडीसी देशात आणि परदेशात कापड उद्योग क्षेत्रात अग्रभागी असून येथे हजारो कामगारांना येथे काम मिळत असणे, एमआयडीसी आणि महानगरपालिका यांच्यात समन्वय नसल्याने अग्निशामन केंद्र कुठे उभारायचे हा प्रश्न वर्षानुवर्षी प्रलंबित असणे, त्यामुळे या एमआयडीसीची | श्री. सुभाष देशमुख, कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. | दिनांक<br>१४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | सर्वत्र दुर्दशा होत असणे, त्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग आणि नगरविकास विभागाने वेळीच दखल न घेतल्यास अनेक प्रलंबित प्रश्न गंभीर होत असणे, त्यामुळे येथील उद्योजक आणि कामगार तीव्र नाराजी व्यक्त करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना" | | |
| (४१) | "पुणे शिवाजीनगर येथील एसटी चे बसस्थानक मेट्रोच्या कामामुळे जुना पुणे-मुंबई रस्त्यालगत वाकडेवाडी येथील शासकीय दुध योजना (आरे) च्या जागेमध्ये स्थलांतरित करण्यात आले असणे, शिवाजीनगर बस स्थानकाची जागा मेट्रोचे काम पूर्ण होईपर्यंत महामेट्रोने तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेणे, सदर जागा ताब्यात घेताना एसटी महामंडळ व महामेट्रो ने सामंजस्य करार करून महामेट्रोने शिवाजीनगर बस स्थानक बांधून द्यावे असा निर्णय या करारातून होणे, सध्या मेट्रोचे काम पूर्ण झालेले असणे, परंतु सामंजस्य करारानुसार ठरल्याप्रमाणे अद्यापही शिवाजीनगर बस स्थानकाचे काम सुरु झालेले नसणे, यामुळे प्रवाशी नागरिकांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होणे, तसेच वाकडेवाडी येथे स्थलांतरीत केलेल्या बस स्थानकामुळे जुना पुणे–मुंबई मार्गावरती सतत वाहतूक कोंडी होणे, त्याठिकाणी राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणे, नागरिकांच्या व प्रवाशांच्या सोयीसाठी जुने शिवाजीनगर बसस्थानकाच्याच जागी नवीन बसस्थानक तयार करून त्याठिकाणाहून बस सेवा पुन्हा पूर्ववत सुरू करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (४२) | "मागील शासनाने राज्यात महात्मा फुले कर्ज माफी ही योजना सुरु करणे, यासाठी २ लाख रुपयांपर्यंत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा करून बऱ्याच शेतकऱ्यांना हे ५० हजार रुपये अनुदानाचे वाटप केलेले असणे, ज्या शेतकऱ्यांकडे २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असून आणि जास्त असलेले कर्ज जर शेतकऱ्यांनी भरले तर त्या शेतकऱ्यांचे २ लाख रुपये कर्ज सुध्दा माफ करण्याचा निर्णय होऊन सुध्दा व बऱ्याच शेतकऱ्यांनी २ लाख रुपयापेक्षा जास्त असलेले कर्ज भरून सुध्दा त्यांना अद्यापही शासनाकडून २ लाख रुपये देण्यात न येणे, त्यावरील व्याजाचा भार शेतकऱ्यावरती पडणे, त्यावरील व्याज सुध्दा अद्यापही घेण्यात येत असणे, तसेच या योजनेचा लाभ अद्यापही देण्यात आलेला नसणे, परिणामी शेतकऱ्यांना सोसायटीमार्फत मिळत असणारे पीक कर्ज सुध्दा थांबविण्यात आलेले असणे, परिणामी शेतकरी दुहेरी संकटात सापडला असणे, | श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | यासंदर्भात चौकशी करून नियमित कर्ज परत फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्यापोटी तसेच २ लाख रुपयापेक्षा जास्त असलेले रक्कम ज्या शेतकऱ्यांनी भरलेली आहे अशा शेतकऱ्याचे २ लाख रुपये कर्ज माफ करण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४३) | "शासनाने भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या यादीस नुकतीच अर्थात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास मंजुरी दिली असणे, सदरहू यादीत फक्त बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील लाभार्थी असल्याने जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील लाभार्थ्यांवर अन्यायाची भावना व्याप्त असणे, भटक्या जाती जमाती, इतर मागास बहुजन कल्याण विभागाने दिनांक २४ जानेवारी, २०१८ च्या शासकीय परिपत्रकानुसार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुल देण्याचा निर्णय घेणे, त्यानुसार दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ च्या शासकीय परिपत्रकानुसार फक्त बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील लाभार्थ्यांना समाविष्ट केले गेले मात्र जिल्हयातील अन्य ११ तालुक्यात एकाही लाभार्थ्याला या योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले नसल्याची बाब उघडकीस येणे, ग्रामपंचायतीमधून यशवंतराव चव्हाण घरकुल, धनगर घरकुल, शबरी घरकुल योजनेची यादी मागविण्यात येते, मात्र मंजुरी देताना फक्त आपल्या क्षेत्रातील, मर्जीतील लोकांना घरकुल मंजूर करून ग्रामपंचायतीने तयार केलेल्या यादीतील लोकांना वगळण्यात येत असल्याच्या असंख्य तक्रारी असणे, सदरहू प्रकरणी चौकशी गठीत करून या योजनेतून वगळण्यात आलेल्या जिल्ह्यातील अन्य ११ तालुक्यातील लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनामार्फत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने या घटकांचा शासनाप्रति वाढता असंतोष, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. सुभाष धोटे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (४४) | "नवी मुंबई सिडको लि., ने विकसित केलेल्या खारघर नोडला दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते ठराव मंजूर केला गेला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, बहुतांशी सुशिक्षित नागरिकांची वस्ती असलेला खारघर नोड शैक्षणिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला असणे, खारघर नोड विकसित झाल्यापासून एकही दारू विक्रीचे दुकान उक्त परिसरात अस्तित्वात नसणे, अशा परिस्थितीत शैक्षण हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या | सर्वश्री प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, अतुल भातखळकर, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | खारघर परिसरात संबंधित विभागामार्फत दारू विक्रीचा परवाना दिला गेला असणे, उक्त परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी अनेक आंदोलने व निवेदने देवुन सुद्धा दारूविक्रीचा परवाना दिलेल्यावर कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे खारघर परिसरात वातावरण गढूळ होऊन नागरिकांच्या विशेषतः महिला वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रचंड असंतोषाबाबत शासनाने खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून घोषित करण्याबाबत तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४५) | "मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छ मुंबई–सुंदर मुंबई या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असणे, सफाई कर्मचारी वारसा हक्क पद्धतीने पिढ्यान पिढ्या सफाई कामगार म्हणून कार्यरत असणे, विशेषतः कोविड काळात त्यांनी दिलेल्या सेवेला विशेष महत्त्व असणे, सेवेत कार्यरत असेपर्यंत त्यांना महापालिकेच्या वसाहतीमध्ये घरे राहण्यासाठी उपलब्ध होणे, सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर घर खाली करण्यासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यात येणे, सेवानिवृत्तीनंतर त्यांची मुंबईमध्ये राहण्याची पर्यायी व्यवस्था नसणे, त्यामुळे सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळवीत अशी मागणी सफाई कर्मचाऱ्यांकडून वारंवार होत असणे, या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी अधिवेशन काळात वारंवार प्रश्न उपस्थित करणे, सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळावीत यासाठी शासन स्तरावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी सभागृहात देणे, परंतु अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसणे, आश्रय योजना व श्रमसाफल्य योजनेत असणाऱ्या विरोधाभासामुळे सफाई कर्मचारी संभ्रमात असणे, त्यामुळे सफाई कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री अमीन पटेल, अशोकराव चव्हाण, बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, अमित देशमुख, संग्राम थोपटे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अस्लम शेख, झीशान सिद्दिकी, कुणाल पाटील, अमित झनक, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (४६) | "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणाऱ्या रायगड जिल्ह्यातील न्हावा-शिवडी सेतु प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावा, गव्हाण, घारापुरी हद्दीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे व मच्छिमार बांधवांचे पुर्नवसन अद्यापपर्यंत झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस आले असणे, उक्त प्राधिकरणाने उक्त प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत | सर्वश्री महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | ग्रामस्थांना याद्या तयार करण्यास सांगितले असणे, प्रकल्पबाधित मच्छिमार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटप करण्यासाठी ९ याद्या तयार करण्यात आल्या असणे, उक्त यादीतील काही ग्रामस्थांना नुकसान भरपाईच्या रकमेचे वाटप करण्यात आले असून बहुतांशी प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छिमारांना अद्यापही नुकसान भरपाईच्या रकमेचे वाटप करण्यात आलेले नसणे, उक्त सेतू मार्गामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या विकासासाठी प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकास निधी देण्याचे दिनांक १५/१०/२०२० रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये मान्य केले असणे, परंतु अद्यापपर्यंत सदर ग्रामपंचायतींना निधी वितरीत केला गेला नसणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदने व भ्रमणध्वनीद्वारे प्राधिकरणाला अवगत करूनसुद्धा प्राधिकरणामार्फत कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे सेतु मार्ग प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकरी व मच्छिमार बांधवांमध्ये उक्त प्राधिकरणाबाबत प्रचंड चिड निर्माण होत असणे, त्यामुळे सेतु प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छिमार बांधवांना तातडीने नुकसान भरपाईचे वाटप करण्याबाबत तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकासनिधी देण्याबाबत शासनाने त्वरित करावयाची आवश्यक ती कार्यवाही व करावयाची उपाययोजना." | | |
| (४७) | "पालघर जिल्ह्यातून मुंबई - बडोदा सुपर फास्ट हायवे च्या कामासाठी जमीन भूसंपादन सुरू असणे, पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा असणे, ज्या जमिनी भूसंपादन झालेल्या आहेत त्या अधिकतर आदिवासी शेतकरी बांधवांच्या असणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे सदरहू प्रकल्पात जमीन घोटाळा होणे, मोठ्या प्रमाणावर आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक होणे, अधिग्रहित जमिनीचा मोबदला शासनाकडून मिळत असतानाही त्यात दलाल डल्ला मारत असणे, जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, बहुमोल वनसंपत्ती नष्ट होणे, पर्यावरण प्रेमींनी आक्षेप घेणे, पालघर जिल्ह्यातील वसई, वाडा, पालघर विशेषतः तलासरी, डहाणू या तालुक्यातून सदरहू हायवे जाणार असणे, सर्वच शेतकऱ्यांनी त्यास जमीन देण्यास विरोध करणे, ज्या ठिकाणी जमीन मोजणी पूर्ण झालेली आहे, त्या ठिकाणी मोबदला अतिशय तुटपुंजा असणे, त्यास ही शेतकऱ्यांचा विरोध असणे, प्रस्तावित मुंबई - बडोदा महामार्गामुळे पालघर जिल्ह्यातील वनसंपत्तीची मोठी हानी होणार असणे, वसई ते तलासरी पर्यंतची सुमारे १८१ हेक्टर वनजमीन या महामार्गासाठी जाणार | श्री. विनोद निकोले, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | असणे, शिवाय सुमारे ५१ गावांतील शेतकरी बाधित होणार असणे, या सर्व घटनांमुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष लक्षात घेऊन शासनाने याची गंभीर दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मोबदला देण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (४८) | “जालना जिल्ह्यातील शेगाव ते पंढरपूर पालखी मार्ग (एन एच ५४८ सी) या रस्त्याच्या कामाची रुपये २९७ कोटींची प्रशासकीय मान्यता दिनांक १ ऑगस्ट २०१७ रोजी मिळालेली असून या रस्त्याच्या कामातच पुलांचे काम समाविष्ट असणे, मात्र मेघा इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी व कार्यकारी अभियंता, उपअभियंता हे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्यामुळे संबंधित कंत्राटदार कंपनी व दोषी अधिकारी यांच्यावर शासनस्तरावर कठोर कारवाई करणे अपेक्षित असणे, या रस्त्यावरील मौजे श्रीष्टी, ता. परतुर, जि. जालना व मौजे गंगासावंगी, ता. परतुर, जि. जालना येथील पुलाचे काम अपूर्ण असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असणे, पुलाचे काम पूर्ण न झाल्यामुळे येथील प्रवास अत्यंत धोकादायक बनला असणे, सन २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये कसुरा नदीला पूर आला असून या पुरामध्ये एसटी महामंडळाची बस वाहून गेली असणे, या बसमध्ये २३ प्रवासी होते, सुदैवाने गावकऱ्यांच्या समयसूचकता व मदतीमुळे या बसमधील प्रवासी सुखरूप बचावले, मौजे गंगासावंगी येथील पुलाचे काम संबंधित शेतकऱ्याला मावेजा न मिळाल्यामुळे प्रलंबित असणे, येथील नदीपात्रातील काम सुरू करण्यास कोणतीही अडचण नसताना सदरील कंत्राटदार कंपनी शेतकऱ्यांच्या नावाखाली काम करण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ करत असणे, तसेच मौजे श्रीष्टी येथील पुलासाठी संपादित जमिनीचा मावेजा सार्वजनिक बांधकाम विभाग देणार किंवा रस्ते विकास महामंडळ देणार या कारणामुळे काम प्रलंबित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. | दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (४९) | “छत्रपती मालोजीराजे यांचे पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात इंदापूर शहरात वास्तव्य असणारे शिवभारत या शिवाजी महाराज यांच्या जीवनाचा समकालीन इतिहास असणारे संदर्भ ग्रंथ यामधील उल्लेखात हा भुईकोट किल्ला (जुनी तहशील कचेरी) हे वास्तव्याचे ठिकाण असणे, प्रशासकीय दृष्टीने सदरील जागा ही महसूल विभागाकडे दप्तरी नोंद असणे, महसूल विभागाच्या नोंदीमध्ये मालोजीराजांच्या इतिहासाच्या बाबींचा उल्लेख असणे, या किल्ल्यासमोर ग्रामदैवत इंद्रेश्वराचे मंदिर आजही असणे, मालोजीराजे सकाळी | श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. | दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | आपला दिनक्रम अमरेश्वराच्या दर्शनाने करत असत असाही संदर्भ शिवभारत या शिवरायांच्या राज्यकारभारातील समकालीन लिहला गेलेल्या एकमेव अस्सल साधनात असणे, म्हणून इतिहासाची साक्ष असणाऱ्या इंदापूर शहरातील इतिहासाला उजाळा देण्यासाठी या आजची जुनी कचेरी म्हणजेच मालोजी राजे यांच्या गढीचे शासनाने संवर्धन करून जुने बुरुज गाव वेस बुद्धरे यांचे पुनर्जीवन करून या कचेरीच्या जागेतच छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचे स्मारक करून मालोजी राजेंच्या पादुका यांच्या साठीही दगडी मूळ स्वरूपाचा चबुतरा उभारून मालोजीराजे भोसले यांचे जीवनचरित्र महाराष्ट्रासमोर आणण्यासाठी पर्यटन विभागाकडून करणेबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (५०) | “नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील मे.नानक कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेने नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत संगनमत करून करोडो रुपयांच्या बांधकामाची कामे मिळविणे,या बांधकामात मोठया प्रमाणात गैरप्रकार करणे, संस्थेने या बांधकामासाठी जिल्हा परिषदेत ठेवलेली अनामत रक्कम कोणत्याही अधिकाऱ्यांची परवनगी न घेता मुदतीच्या अगोदरच खोट्या स्वाक्षरी करून संस्थेने उचल करणे, या करोडोच्या व्यवहारात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अंधारात ठेवण्यात येणे, झालेल्या करोडो रुपयांच्या गैरप्रकाराची तक्रार जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागपूर येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येणे,नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मे. नानक कंस्ट्रक्शन (भागीदारी संस्था) या संस्थेला काळ्या यादीत टाकण्यात यावे याबाबतचा प्रस्ताव दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी कक्ष अधिकारी (बांध-२), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात येणे, दोन महिन्यांचा कालावधी होऊन सुध्दा अद्यापही सदर प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकांत पसरलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी पाठविलेल्या प्रस्तावावर कार्यवाही होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | सर्वश्री सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| (५१) | "मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी पदोन्नती मधिल आरक्षण लागू करण्यास शासन निर्णय दिनांक २५ मे, २००४ रद्द केलेला असणे, एम. नागराज विरुद्ध भारत सरकार (२००६) या निर्णयानुसार मागासलेपणा, अपर्याप्त प्रतिनिधित्व व प्रशासनाची कार्यक्षमता यावर आधारित आकडेवारीचा नविनतम अहवाल महाराष्ट्र शासनाने सादर न केल्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्यात आलेला असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुद्ध शासनाने महाराष्ट्र शासन विरुद्ध विजय घोगरे (SLP No.२८३०६/२०१७) ही विशेष अनुमती याचिका माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयास सादर केलेली असणे, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी मागासलेपणा सिद्ध करण्याची अट रद्द केली व इतर दोन अटींप्रमाणे अभ्यास अहवाल तयार करून त्यानुसार पदोन्नती मधिल आरक्षण वैध ठरविले असणे, केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी पदोन्नतीमधिल आरक्षण लागू करण्यासाठी मार्गदर्शक सुचना जारी केलेल्या असणे त्यावर शासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नसणे दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांचा पदोन्नती मधिल ३३% वाटा खुल्या प्रवर्गात बेकायदेशिररित्या वर्ग केलेला असणे, परंतु अशाप्रकारचे कोणतेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले नसणे अथवा मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाने दिलेल्या नसणे, दिनांक २८ जानेवारी, २०२२ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपुऱ्या प्रतिनिधीत्वाचा संख्यात्मक डाटा गोळा करून पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्याचे अधिकार राज्य शासनास असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले असणे, अपुऱ्या प्रतिनिधीत्वाचा अहवाल शासनाने तयार केला असणे व तो सर्वोच्च न्यायालयात सादर केला असणे, परंतु केवळ महाराष्ट्र शासनाची याचिका क्र.२८३०६/२०१७ निकाली निघाली नाही या कारणाखाली अजूनपर्यंत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना / अधिकाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यात आले नसणे व सेवाज्येष्ठतेनुसार वरिष्ठ असलेल्या मागासवर्गीयांना दिनांक २५ मे, २००४ च्या सेवाज्येष्ठतेची अट घालून त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती मिळणे सुद्धा बंद झाले असणे, त्यामुळे सन २०१७ ते २०२२ या कालावधीत राज्यातील जवळपास ८०,००० अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जाती व विशेष मागास प्रवर्गाचे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित ठरले असणे, त्यातील बरेच कर्मचारी पदोन्नतीविनाच निवृत्त झाले असणे, यामुळे राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री बळवंत वानखडे, मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (५२) | "मुंबईतील वाढते प्रदूषण ही एक चिंतेची बाब असली तरी आता दिल्लीलाही मागे टाकत मुंबईने जगभरातील प्रदूषित शहरांच्या यादीत दुसरे स्थान मिळवले आहे, 'स्विस एअर ट्रॅकिंग इंडेक्स' नुसार, दिनांक २९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी दरम्यान जगातील सर्वात प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे, दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई १० व्या स्थानावर होती, दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई दुसऱ्या स्थानावर पोहोचली, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रदूषणाबाबत मुंबईने भारतातील सर्वात प्रदूषित शहर असलेल्या दिल्लीलाही मागे टाकल्याचे स्विस एअर ट्रॅकिंग इंडेक्सनुसार दिसून आले आहे, निरी आणि आयआयटीवीच्या २०२० च्या अभ्यासानुसार, मुंबईच्या हवेतील कणांच्या भारांपैकी ७१ टक्क्यांपेक्षा जास्त रस्ते किंवा बांधकामांचा वाटा आहे, उर्वरित प्रदूषण औद्योगिक आणि ऊर्जा युनिट्स, विमानतळ आणि कचरा डंपमधून होते, हे वाढते प्रदूषण श्वसनाचे आजार असलेल्यांसाठी त्रासदायक ठरू शकते, त्यामुळे अशा व्यक्तींनी व रुग्णांनी काळजी घेण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत आयक्यू एअर, युएनईपी आणि ग्रीनपीस यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील माहितीनुसार मुंबईतील हवेची गुणवत्ता मोजली, तसेच, त्याचे यूएस हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार 'निरोगी' अस्वास्थ्यकर' आणि धोकादायक' असे वर्गीकरण केले, यानुसार, गेल्या तीन वर्षाच्या हिवाळ्याच्या तुलनेत यावर्षी नोव्हेंबर ते जानेवारी दरम्यान मुंबईतील हवा 'खराब' आणि 'खूप खराब' होती, तज्ज्ञांच्या मते, कार, रस्ते आणि बांधकाम प्रकल्पांमधून सतत होणारी धूळ आणि धूर हे हवेची गुणवत्ता ढासळण्याचे मुख्य कारण आहे, मुंबईतील प्राधिकरणांनी वाहने आणि बांधकाम साइट्समधून उत्सर्जन कमी करण्यासाठी त्वरित पावले उचलली पाहिजेत, राज्य शासनाने वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कठोर नियम लागू करणे आवश्यक असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. मिहीर कोटेचा, पराग शाह, अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. छगन भुजबळ, रोहित पवार, अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, अबू आजमी, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (५३) | "महाराष्ट्र जमीन महसूल नियम २०१९ मध्ये भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींना भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याकरिता दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी अधिसूचना काढण्यात येणे, सदर भोगवटादार वर्ग रूपांतरित करण्याकरिता अधिसूचनेमध्ये २ वर्षांचा कालावधी देणे, सदर अधिसूचनेत रूपांतरित करण्याकरिता वर्गवारीनुसार बाजार मूल्याच्या १० ते १५ टक्के रक्कम आकारणे, या दोन | श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | वर्षाच्या कालावधीमध्ये गृहनिर्माण संस्थांकडून हस्तांतरण करता अर्ज सादर न होणे, दिनांक ८ मार्च, २०२२ ला सदर अधिसूचनेचा कालावधी संपणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ च्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिनांक ७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणे, दोन वर्षाच्या मुदत वाढीचा प्रस्ताव असून देखील एकच वर्ष मुदतवाढ मिळणे, हस्तांतरणाची प्रक्रियेकरिता सदस्यहस्तांतर होणे गरजेचे असणे, सदस्य हस्तांतरणाच्या कालावधी जास्त वेळ लागणे, पुढील एक वर्षांमध्ये जमीन हस्तांतरण करणे कठीण असणे, तीन ते चार वर्षाची मुदतवाढ मिळावी अशी नागरिकांकडून मागणी असणे व जीर्ण झालेल्या इमारतीच्या गृहनिर्माण संस्थांना दहा ते पंधरा टक्के ऐवजी अडीच टक्के बाजार मूल्याचे शुल्क आकारणे अशीनागरिकांची मागणी असणे, धोरणात त्रुटी असल्याकारणाने पुनर्विकास होत नसल्याने जीर्ण असलेल्या इमारतींमध्ये ज्येष्ठ नागरिकांना राहावे लागणे, या सर्व प्रकारामुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व उपाययोजना.” | | |
| (५४) | “माहे फेब्रुवारी, २०२३ च्या सुमारास माझ्या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील भोसे व इतर ३९ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सन २०२१ पासून बंद असल्याचे निदर्शनास येणे, सदर योजनेस दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत माहे जून, २०१८ मध्ये ही योजना कार्यान्वीत झालेली असणे, या योजनेची कामे अपूर्ण असताना देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणे राजकीय दबावापोटी तत्कालीन निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन सदर योजना सोलापूर जिल्हा परिषदेकडे दिनांक २६/०५/२०२० रोजी हस्तांतर करणे, जिल्हापरिषदेने देखील कोणतीही शहानिशा न करता योजना ताब्यात घेणे, जिल्हा परिषदेने दिनांक ०८/०३/२०२१ रोजी शिखर समितीची स्थापन करणे, सदर शिखर समितीने दिनांक ०५/०४/२०२१ ते १७/०६/२०२१ पर्यंत म्हणजे २ महिने १२ दिवस ही योजना चालविणे, त्यानंतर विज देयक न भरल्याने दिनांक १८/०६/२०२१ रोजी विजजोडणी तोडण्यात आलेली असणे, सदरची योजना बंद असली तरी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीकडून विज बिल मात्र आकारले जात असणे, फेब्रुवारी, २०२३ अखेर रु.१,१७,००,०००/- (अक्षरी एक कोटी सतरा लाख) विद्युत देयक थकीत असणे, सदर योजनेचे थकीत विज बिल भरलेशिवाय ही योजना चालू करणे अशक्य असणे, सद्यःस्थितीत सदर योजनेत सामवेश असलेल्या ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती साधारण | श्री.समाधान अवताडे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असल्यामुळे इतकी मोठी रक्कम त्यांचे तर्फे भरणे जवळपास अशक्यच असणे, सदरची योजना बंद अवस्थेत असल्याने सदर योजनेतील अनेक गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे ही योजना चालू करणे अत्यंत गरजेचे असणे, म्हणून भोसे व ३९ गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना, ता. मंगळवेढा या योजनेचे रु.१,१७,००,०००/- थकीत विजबिल माफ होणेबाबत येथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधी या नात्याने केलेली विनंती, यावर शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (५५) | "महाराष्ट्राचे दैवत असलेल्या खंडोबा व ज्योतिबा आणि इतर देवस्थाने हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थाने असणे, या देवतांची पूजा ही भंडाराची आणि गुलालाची उधळण करत करणे, याकरिता पिवळ्या व लाल रंगाच्या घातक केमिकलचा वापर भंडारा व गुलालामध्ये करण्यात येणे, या भंडाऱ्यांची विक्री ही देवस्थानाच्या बाहेर करण्यात येत असून सदरचा भंडारा हा हळद समजून भंडाऱ्यांचा वापर पूजेला व अंगावर लावण्यासाठी करण्यात येणे, परंतु सदरचा भंडारा हा शरीरासाठी अपायकारक असून लाकडाच्या भुश्यामध्ये अत्यंत घातक अशी रसायने त्यामध्ये मिसळून पिवळा व लाल रंग आणण्यात येणे, सदरची रसायने ही कॅन्सरला आणि श्वसनाच्या रोगाला उद्युगत करणारी असून यावरती तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, भंडाऱ्याच्या जागेवर शेतकऱ्यांनी पिकविलेली खरी हळद वापरली तर हळदीच्या गुणधर्मानुसार सदर भक्तांच्या शरीरावर चांगला परिणाम होईल आणि शेतकऱ्यांच्या हळदीला एक चांगली बाजारपेठ मिळून शेतकऱ्यांना याचा फायदा होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेश शिंदे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (५६) | "पुणे महापालिकेत २०१७ मध्ये हद्दीतलगतच्या ११ गावांचा समावेश करण्यात आला असणे, त्यानंतर पुन्हा सन २०२१ मध्ये आणखी २३ गावांचा समावेश करण्यात आला असणे, गेल्या पाच वर्षात जवळपास ३४ गावे पुणे महापालिकेत आली असून, ही गावे पालिकेत समाविष्ट करण्याबाबत राज्य सरकारनेच उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले असणे, त्यानुसार ही गावे घेण्यात आली आहे. या समाविष्ट गावांमध्ये पाणी, रस्ते, ड्रेनेज, विद्युत व्यवस्था, उद्याने अशा पायाभूत सोयी-सुविधांची प्रचंड गैरसोय होतं असणे, महापालिकेच्या माध्यमातून हे प्रश्न सुटतील अशी येथील नागरिकांची भावना असणे, मात्र, महापालिकेत येऊनही या गावांचा विकास होऊ शकलेला नसणे, पहिल्या टप्यात आलेल्या ११ गावांसाठी एक प्रभाग | सर्वश्री. सुनिल टिंगरे, संजय जगताप, भिमराव तापकीर, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | करण्यात आला असणे, त्यात केवळ दोन नगरसेवकाना प्रतिनिधित्व मिळाले मात्र तब्बल ३२ किमीचा भौगोलिक परिसर असलेल्या या गावांच्या प्रभागाला या नगरसेवक न्याय देऊ शकलेले नसणे, तर उर्वरित २३ गावांना पालिकेचे लोकप्रतिनिधीत्व मिळू शकलेले नाही. त्यात गेल्या वर्षभर पालिकेवर प्रशासक राज असणे, त्यामुळे अगदी छोट्या-छोट्या समस्याही सुटू शकत नसणे, गावांना सोयी-सुविधा देताना महापालिकेकडून निधी नसल्याची ओरड केली जात असणे, तर राज्य शासनाकडून अद्याप मदत मिळालेली नाही. त्यामुळे या समाविष्ट गावांमध्ये प्रचंड नाराजीची लोकभावना असणे, या गावांना विकासाचा न्याय देण्यासाठी राज्य शासनाने ठोस कार्यवाही करण्याची गरज असणे, तसेच महापालिकेने या गावांसाठी अंदाजपत्रकात स्वतंत्र अशी योजना आणण्याची गरज असणे, या समाविष्ट गावातील नागरिकामध्ये शासन बाबत नाराजी दिसून येणे, या संदर्भात शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना." | | |
| (५७) | "नाशिक मधील त्र्यंबकेश्वर येथील गोदावरी नदीला जाऊन मिळणाऱ्या जलस्त्रोतामध्ये पालिकेचे सांडपाणी सोडले जात असल्यामुळे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, येथे दरवर्षी ४५ ते ५० लाख लिटर सांडपाणी तयार होणे, मात्र १० लाख लिटर सांडपाणी प्रक्रिया करुन नदीमध्ये सोडले जाणे व उर्वरित सांडपाण्यामुळे नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत असून ते पाण्याच्या गुणवत्तेच्या प्राथमिक निकषानुसार आंघोळीसाठीही योग्य नसल्याची बाब उघडकीस येणे, मात्र येथील नागरिकांना हे दूषित पाणी प्यावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होत असल्याचे आढळून येणे, यामुळे नदीत सांडपाणी सोडण्यास विरोध करण्यात येत असणे, सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी रोखण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष व विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने नदीतील प्रदूषण रोखण्याबाबत तसेच प्रक्रिया न करता सांडपाणी सोडणाऱ्या संबधितांवर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (५८) | "औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुंज अधिसूचित क्षेत्राकरिता सन १९९१ मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाल्यानंतर सिडकोने सन १९९६ पासून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादनाची | सर्वश्री. शांताराम मोरे, प्रकाश सोळंके, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रक्रिया सुरू करणे यासाठी सन १९९८, २००० व २०१२ मध्ये भूसंपादनासाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध होणे, यातील काही जमिनींचे आगाऊ ताबे घेऊन त्यावर विकास कामे करणे, परंतु भूसंपादनाची कार्यवाही अद्यापही पूर्ण न होणे, जमीन मालकांना कोणत्याही प्रकारे मोबदला न देणे, सिडकोने मार्च, २०२० मध्ये ठरावाद्वारे प्रकल्पातील प्रलंबित भूसंपादनाची कार्यवाही परत घेण्याचा आणि नव्याने कोणत्याही जमिनीचे संपादन न करण्याचा निर्णय होणे, परंतु त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणे, जमीन धारकांच्या जमिनी जाणीवपूर्वक संपादनाच्या फेऱ्यात अडकवून ठेवून त्यांना विकास परवानगी न देणे, विकास परवानगी व सोयी सुविधा मिळवण्यासाठी सिडको कार्यालयासमोर वेळोवेळी आंदोलन होणे,मोर्चे निघणे, संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या जमिनींच्या विकास कामांना परवानगी देणे बाबत शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सिडको कडून जमीनधारकांना कारण देणे बऱ्याच जमीन धारकांनी याबाबत माननीय उच्च न्यायालयात धाव घेणे, माननीय उच्च न्यायालयाने प्रलंबित भूसंपादनाबाबत शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पूर्वी निर्णय घ्यावा असे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश देऊनही याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष सिडकोने प्रकल्पाचा आर्थिक व्यवहारता अहवाल शासनास सादर करणे, प्रकल्प आर्थिक दृष्ट्या सुसह्य ठरत नसल्याने प्रलंबित असलेल्या १२४ हेक्टर क्षेत्रापैकी केवळ विकास कामे झालेले ७.३० हेक्टर क्षेत्राचे गुण संपादन पूर्ण उर्वरित क्षेत्रातील संपादन न करण्याच्या निर्णयावर सिडको ठाम राहून त्यासाठी शासनाची परवानगी मागणे, शासनाने सन २०२२ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सदर विषयी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना सिडकोच्या सदर निर्णयास सहमती असल्याचे आणि प्रकल्पातील आवश्यक त्या सोयी-सुविधा काल बद्दल वेळेत पूर्ण करण्यासाठी सदर अधिवेशन समता पंधरा दिवसाच्या आत लोकप्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्याबाबत सभागृहात आश्वासन देणे, परंतु या दोन्ही आश्वासनाची पूर्तता न करणे, माननीय उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच, या सार्वभौम सभागृहात आश्वासन देऊन सुद्धा या प्रलंबित प्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमध्ये शासन सिडको यांच्याबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे व या सभागृहात दिलेले आश्वासनांचे तात्काळ पालन करून या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (५९) | "सांगली जिल्ह्यातील वाळवा व शिराळा तालुक्यातील बिबट्याचा वावर वाढलेला असून वाळवा तालुक्यात दिनांक १ जानेवारी, २०१९ ते फेब्रुवारी, २०२३ अखेरपर्यंत ७७ बिबटया व वन्यप्राण्यांपासून ५०० पेक्षा अधिक पशुधनांना ठार केलेले असणे,यापूर्वीसुध्दा ऊसतोड कामगारांच्या लहान मुलांना जखमी करुन सुफीयान शमशुद्दीन शेख, या १ वर्षांच्या मुलाला हल्ला करुन या हल्ल्यात बालक मृत्युमुखी पडणे, त्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व पसरलेले भितीचे वातावरण, आता वन्यप्राण्यांनी विशेषतः मानवावर चढवलेले हल्ले पाहतां या वन्यप्राण्यांचा त्वरित बंदोबस्त करण्याची तेथील नागरिकांची होत असलेले मागणी, या बिबट्याचा व वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत जलद कृती दल स्थापन करुन बिबटया निर्वारण केंद्र उभारण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | सर्वश्री.जयंत पाटील, मानसिंग नाईक, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (६०) | "नगर शहरातील रामवाडी परिसरातील गेल्या अनेक वर्षांपासून तेथील दलित समाजातील लोकांवर मुस्लिम लोकांनी अत्याचार करत असणे, तसेच तेथील दलीत लोकांना रामवाडी वस्तीतून पलायन करण्यास भाग पाडणे, तसेच रामवाडी भागाचे नाव तेथील काही समाज कंटकांनी हिमायतनगर करणे, सदरील सर्व जागा आर्मी कॅन्टोन्मेंटची असणे, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री नगर शहरातील अशोक लोंढे नामक व्यक्तीने औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजी महाराज झाले यासंदर्भात असणाऱ्या पोस्टचे स्टेटस व्हॉट्सॲप ला ठेवले यावरून मुस्लिम जमावाने त्यांच्यावर पूर्वनियोजित एकत्रित होऊन हल्ला करणे, आणि त्याच्या डोक्यात, पोटात व कानामागे तलवारीने वार करणे, त्यानंतर सदर जमाव अशोकच्या बहिणीच्या घरी जाऊन त्यांचा विनयभंग करून घरातील तोडफोड व त्यांना मारहाण करणे, त्यानंतर तेथून सर्व जमाव रोहित जगताप नावाच्या व्यक्तीच्या घरात घुसून त्यांना व घरातील महिलांना मारहाण करून त्यांचा विनयभंग करून घरातील मंदिराची आणि देवी देवतांची विटंबना करणे, त्यानंतर एक कार्यकर्ता हिंदुत्ववादी काम करणारा कुणाल भंडारी नामक व्यक्ती रस्त्याने जातांना घडलेली घटना बघत असताना थांबला तर हा पण हिंदुत्ववादी कामांमध्ये सक्रिय असतो असे म्हणून तेथील त्या जमावाने कुणालला देखील मारहाण करणे, तसेच त्यातील एका मौलानाने फोन कुणाल भंडारीच्या कानाला धरून बोलला की अफजल पैलवानसोबत बोलायला सांगितले परंतु कुणालने अफजल सोबत बोलायला नकार दिल्यानंतर तेथील | श्री. नितेश राणे, वि.स.स. | दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | जमावाने धारदार शस्त्राने कुणालच्या पोटात कोयत्याने वार करून लोखंडी रॉड ने मारहाण करणे, त्यानंतर दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री पुन्हा मुकुंद नगर मधील इमरान माव्या वाला याने रामनगर मध्ये येऊन याच जमावाला सोबत घेऊन राजू भोईटे नामक व्यक्तीला जबर मारहाण करून डोक्यात आणि चेहऱ्यावर रॉडचे वार करणे, सदर घटनेतील एक समीर शेख नावाचा एक मौलाना आहे जो या घटनेतील आरोपी आहे त्याच्या इंस्टाग्राम वरील पोस्ट सर्व हिंदू विरोधी असणे, तसेच आरोपी अफजल शेख नावाचा जो आरोपी आहे तो पोलिसांवरती दबाव तंत्राचा उपयोग करत मुस्लिम लोकांना,महिलांना एकत्रित करून पोलीस स्टेशनला पाठवून पोलिसांवर दबाव आणणे, तसेच अफजल शेख मोठ्याप्रमाणात लव जिहाद, land जिहाद कारवायांमध्ये सक्रिय असणे, मुस्लिम मुलांना लव जिहाद, देशविरोधी कारवायांसाठी फंडींग करणे, घटनेतील सर्व आरोपींचा टोळी माफिया प्रमुख अफजल शेख हा असून याचा भाऊ मुदस्सर हा तेथील रामनगर भागाचा नगरसेवक असून याच्याच वडिलांनी शिवजयंती च्या दिवशी शेवगाव भागातील एका हिंदू कहार समाजाच्या मुलाला घरावर भगवे झेंडे लावले म्हणून मारहाण केलेली असणे,आणि पोलिसांनी कारवाही न करणे, तसेच इतकी गंभीर घटना घडलेली असतांना देखील काही आरोपींना अद्याप पोलिसांनी अटक केलेली नसणे, तसेच साल २०१७ ते २०१८ सुमारास नगर एसपी कार्यालय तोडफोड प्रकरणातील आरोपी अफजल शेख नावाच्या व्यक्तीने एफ.आय.आर मधून नाव वगळण्यासाठी स्थानिक पोलिसांना पैसे देण्याचा प्रयत्न करणे, तसेच संबंधित घटनेच्या विरोधात स्थानिक दलीत हिंदू नागरिकांनी नगर शहरात मोर्चा काढणे, परंतु मोर्चात काही मुस्लिम महिलांनी हिंदू दलीत महिलांना शिवीगाळ करणे, त्यानंतर हिंदू महिला पोलिस स्टेशनला तक्रार द्यायला जाणे, मात्र पोलिसांनी एट्रोसिटी घेणे अपेक्षित असतांना त्या ठिकाणी साधी एन.सी. न घेणे, तसेच याबाबत कारवाही व्यवस्थित न झाल्यास महाराष्ट्रात तीव्र आंदोलन होणार असल्याचे पत्र शासनास हिंदुत्ववादी संघटनांनी देणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व उपाययोजना." | | |
| (६१) | "डहाणू नगर परिषदेचा विकास आराखडा सन २०१६ पासून, उर्वरित डहाणू तालुक्याचा प्रादेशिक आराखडा सन २०१९ पासून राज्य सरकारच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत असणे, हे दोन्ही आराखडे मंजूर न झाल्याने डहाणू तालुक्याचा विकास खुंटला जाणे, सुमारे २० वर्षांपूर्वी डहाणू नगर परिषद क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यात आली होती, मात्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील व नाजूक असल्याचे कारण सांगून या योजनेला | श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | सरकारने मंजुरी दिलेली नसणे, विकास योजनेचा आराखडा केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडे पाठवल्यानंतर तसेच या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीशांच्या समितीसमोर ही बाब पडताळल्यानंतर आराखड्याला राज्य सरकारने आपल्या स्तरावर मंजुरी देण्याचे निर्देश दिले असणे, सन २०१४-१५ च्या सुमारास या आराखड्यावर हरकती मागून त्याची सुनावणी घेण्यात येऊन तज्ञ समितीने हा आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेला असणे, तर डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण अस्तित्वात असल्याने या आराखड्याला प्राधिकरणासमोर सादर करून औद्योगिक वापराच्या क्षेत्रावर मर्यादा आखून देऊन आराखडा सशर्त मंजूर करण्यात येणे, परंतु उर्वरित तालुक्यासाठी प्रादेशिक आराखडा मंजूर नसल्याने हे प्रकरण अद्यापी प्रलंबित असणे, विकास आराखडे मंजूर न झाल्याने त्याचा फटका डहाणूतील नागरिकांना बसणे, डहाणू नगरपालिका क्षेत्रात यूडीसीपीआर लागू करणे व प्रादेशिक आराखड्याला मंजुरी न दिली गेल्याने डहाणूमधील रहिवासी भागाचा विकास तसेच पर्यटनाला चालना मिळण्यास अडथळे निर्माण झाले असणे, परिणामी, अनधिकृत बांधकाम प्रकार वाढलेले असणे, डहाणूच्या विकास आराखड्यात सर्वसमावेशक आरक्षण (अकामोडेशन रिझर्व्हेशन) तसेच हस्तांतरित होणारे विकास हक्क (ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राइट्स-टीडीआर) यांचा समावेश केल्यास आरक्षण क्षेत्राचा झपाट्याने विकास होण्याची गरज, मात्र विकास आराखड्याच्या मंजुरीसोबत या तरतुदींना मान्यता मिळण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (६२) | "राज्यात नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये सर्वे नंबर २५० मौजे म्हसरूळ शिवार नाशिक येथील मिळकतीचे नाशिक महापालिकेने भूसंपादन करून त्या बदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र (डी आर सी/टी डी आर) हे नाव विकास क्षेत्र मूल्यांकन विभाग (१६.१४) च्या बदल्यात मूल्यांकन विभाग (१६.२२) बदल करून अंदाजे ८० करोड चे अतिरिक्त बिल्टप क्षेत्राचे डीसीआरसी/टीडीआर मूल्यांकन झोन बदलले असल्याचे सन २०१८ मध्ये निदर्शनास येणे, याप्रकरणी नाशिक महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी परस्पर संगनमत करून शासनाची व नाशिक महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचा जनतेमध्ये निर्माण | श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | झालेला संशय, यासंदर्भात चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (६३) | “अमरावती जिल्ह्यातील भातकुली तहसील व इतर कार्यालयासह संबंधित शासकीय कार्यालय तथा कर्मचारी निवासस्थान एका ठिकाणी बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्याच्या संबंधाने राज्यांचे विद्यमान महसूल मंत्री यांनी आदेश जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले असूनही अद्यापपर्यंत सदरचा प्रस्ताव सरकार कडे पाठविला नसल्याबाबत ज्यामध्ये खालील कार्यालयाचा समावेश आहे त्यामध्ये भातकुली तहसील कार्यालय चे ठिकाणीं भातकुली जैन येथे तालुका स्तरीय कार्यालये जसे की पंचायत समिती कार्यालय, उपकोषागार कार्यालय, वन विभागाचे कार्यालय, क्रीडा विभागाचे कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, उपविभाग कार्यालय , तालुका भूमी अभिलेख कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय ,महिला बाल विकास विभाग कार्यालय, तालुका वैद्यकीय अधिकारी विभाग कार्यालय, व तालुक्यासंबंधित इतर कार्यालयाचे बांधकाम कर्मचारी निवासस्थान अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे माननीय महसूल मंत्री यांना डिसेंबर २६/१२/२०२२ रोजी मागणी केली असणे, ही मागणी माननीय महसूल मंत्री महोदयांनी गंभीरतेने घेऊन जिल्हाधिकारी अमरावती यांना त्यांचे कार्यालयाचे आदेश क्रमांक ८१/२०२३ तारीख दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी अमरावती यांना तातडीने कार्यवाही करण्यासंबंधी लेखी आदेश दिले असणे, त्यानंतरही अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही दिसून न येणे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी अमरावती यांना वरील प्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देशित केली असणे, या अनुषंगाने आज रोजी पर्यंत कोणत्याही कारवाई झाल्याचे दिसून येणे, भातकुली येथील तालुक्याचे स्थळी वंचित असलेल्या शासकीय कार्यालय तथा कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम करण्यासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णयात्मक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करणे याबाबत शासनाने तातडीने करायची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. रवि राणा, वि.स.स. | दिनांक<br>१७ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| (६४) | "महाराष्ट्रात दुग्ध व्यवसाय हा पूर्वी सरकार व सहकार यांच्या माध्यमातून केला जात असणे, शहरात किंवा मोठ्या गावात खाजगी व्यक्ती शेतकरी लोकांची गरज म्हणून गायी, म्हशी पाळून हा व्यवसाय करीत असणे, आजही काही प्रमाणात हा व्यवसाय चालूच असणे, सहकाराच्या माध्यमातून गावोगाव दुध संकलन सहकारी संस्था स्थापन होऊन हे दूध तालुका संघ, जिल्हा संघामार्फत त्यावर प्रक्रिया करुन पिशवी बंद करुन मोठ्या प्रमाणात शहरी, निमशहरी भागात विक्री करीत असणे, राज्यातील तालुका संघ, जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ स्थापन होऊन एक महासंघ तयार करण्यात येणे, त्यासाठी शासनाने मोठी जागा देऊन गोरेगाव मुंबई येथे दूध व दुधापासून बनवलेल्या पदार्थांची निर्मिती करून मुंबईत विक्री करीत असणे, या महासंघाची व वेगवेगळ्या जिल्ह्यात जिल्हा संघ व तालुका संघाची मोठी गुंतवणूक असणे, त्याचबरोबर कर्मचाऱ्यांची मोठी संख्या कार्यरत असणे, पण राज्यात खाजगी किंवा कंपनीद्वारे मोठ-मोठे प्लॅन्ट टाकून राज्यभर दुधसंकलन करत असणे, यामुळे ज्या गावातून सहकारी दूध संस्था दूध संकलन करीत असे, त्याच गावात एक, दोन, तीन असे वेगवेगळ्या व्यक्ती दूध गोळा करणे, त्याचा परिणाम दूध सहकारी संस्था बंद होत असणे, दूध संस्था बंद होणे म्हणजे तालुका, जिल्हा सहकारी संघ व पर्यायाने महासंघ अडचणीत येणे, त्यामुळे कोट्यावधी रुपयाची गुंतवणूक व कर्मचारी वर्ग यांचाही रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होणे, यासाठी सहकार क्षेत्रामार्फत चालविल्या जाणारा दुग्ध व्यवसाय वाचविण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (६५) | "शासनाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ नंतर राज्यातील नवीन महाविद्यालयाच्या बाबतीत कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारलेले असणे, त्याअनुषंगाने सदर धोरण दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयांना लागू होत नसल्यामुळे ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना सरसकट १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत मागील २२ वर्षांपासून अविरतपणे शासनास निवेदने देवुनही प्रश्न प्रलंबित असणे, याबाबत अनेकवेळा उपोषण व आंदोलने महाराष्ट्र राज्य कृती समिती मार्फत करण्यात येणे, ७८ वरिष्ठ | सर्वश्री. राजेश टोपे, जयंत पाटील, छगन भुजबळ, संजय बनसोडे, शेखर निकम, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | महाविद्यालयांपैकी किती महाविद्यालये सुरु असून अनुदानाच्या धोरणानुसार किती महाविद्यालयांनी अनुदानाचे निकष पूर्ण करण्यात आले, याबाबतची पडताळणी झालेली असून आर्थिक भारासह अद्ययावत परिपूर्ण प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी मागील १५ महिन्यांपासून आजपर्यंत अनुदान मिळणेबाबत प्रलंबित असणे, तसेच एकीकडे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय दिनांक ६ फेबुवारी, २०२३ अन्वये कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळून तसेच त्रुटी व निकषांची पूर्तता केलेल्या खाजगी प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये वर्ग व तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करुन अनुदान मंजूर केलेले असणे तर दुसरीकडे उपरोक्त वरिष्ठ महाविद्यालयांना सर्व त्रुटी व निकषाची पूर्तता करुन व अनुदानास पात्र असून देखील अद्यापपर्यंत अनुदान देणेकामी टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास येणे, सर्व ७८ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी ग्रामीण व दुर्गम भागातील असल्याने अनुदान न मिळाल्याने वेतनाअभावी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व पर्यायाने त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या संपूर्ण कुटुंबिय यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्‌भवणे, परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (६६) | "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू यांनी मनमानी कारभार करून विद्यार्थ्यांसह विद्यापीठाचे आर्थिक नुकसान केल्याची अत्यंत गंभीर बाब निदर्शनास येणे, कोरोना महामारीच्या काळात पदवी व पदवीत्तर ऑनलाईन परीक्षेचे कंत्राट देताना कुठल्याही नियमांचे पालन न करता आपल्या मर्जीतील कंपनीला आर्थिक व्यवहार करून अव्वाच्या सवा दराने कंत्राट दिल्याचेही निदर्शनास येणे, कोरोना महामारीच्या काळात ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतल्या असताना देखील प्रश्नपत्रिका छपाईच्या नावाखाली करोडो रुपये उचलल्याचा गंभीर प्रकार देखील झाला असल्याची बाब निदर्शनास येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २०१९ क्रीडा महोत्सवासाठी मैदाने तयार करताना खुली निविदा न काढता आपल्या मर्जीतील लोकांना कंत्राट देऊन विद्यापीठाचे मोठे आर्थिक नुकसान करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा प्रकार देखील निदर्शनास येणे, हे सर्व करत असताना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना विश्वासात न घेता स्वतःच्या अधिकारांचा वापर करून आर्थिक | श्री. राम सातपुते, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | गैरव्यवहाराच्या उद्देशाने कुलगुरू यांनी सर्व निर्णय घेतले असल्याची बाब देखील निदर्शनास येणे, या सर्व बाबींची विशिष्ट समितीमार्फत चौकशी करून जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कार्यवाहीची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (६७) | "केंद्र शासन व महाराष्ट्र शासनातर्फे राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फेत (NRHM) कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असणे, सदर कर्मचारी १५ ते २० वर्षांपासून कंत्राटी पदावर कार्यरत असणे, कोरानामध्ये जीवावर उदार होऊन कामगिरी पार पाडलेली असणे, याच अभियानात गुजरात, राजस्थान मध्ये या कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेत कायम स्वरुपात सामावून घेतले जात असणे, महाराष्ट्र शासनामार्फत कुठलीही कार्यवाही केली जात नसणे, केंद्रीय व राज्य सरकार मार्फत ६० टक्के व ४० टक्के या कर्मचाऱ्यांना वेतन देत असणे, इतर राज्यात कायमस्वरुपी सेवेत सामील केले असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील या अभियांनाच्या कर्मचाऱ्यांना दुजाभावाची वागणूक निर्माण होत असणे, राज्यातील या अभियानात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची शासकीय सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याची मागणी होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (६८) | "कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथे १०० खाटांचे जिल्हा महिला व बाल रुग्णालयास माहे जानेवारी, २०१३ मध्ये मान्यता देण्यात येणे, तद्नंतर माहे जुलै, २०१३ मध्ये सदर रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी १४ कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, सन २०१४ मध्ये इमारतीच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येऊन उक्त रुग्णालयाची इमारत उभारण्यात येणे, त्याच प्रमाणे सदर रुग्णालयाकरीता गट-अ ते गट-क ची नियमित ४२ पदे व काल्पनिक कुशल, अकुशल पदे ३ अशी पदे माहे जुलै, २०१९ मध्ये मंजूर करण्यात येणे, त्यापैकी आतापर्यंत केवळ १८ पदे भरण्यात आले असून उर्वरीत तब्बल २९ पदे रिक्त असणे, त्याच प्रमाणे सदर रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी अंतिम टप्प्यातील अनेक कामे निधी अभावी रखडणे, रुग्णालयाच्या या नव्या इमारतीमध्ये रुग्ण सेवेसाठी आवश्यक असलेली उपकरणे, यंत्रसामुग्री, फर्नीचर, रुग्णवाहीका, विद्युत पुरवठा, सी.सी.टी.व्ही. उपहारगृह व इतर | श्री. वैभव नाईक, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अनेक कामे निधी अभावी रखडलेले असणे, अपूर्ण असलेली काम करण्याकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच मंजूर असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाकडे वारंवार जिल्हा प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात येणे, तथापी शासनाकडून अद्यापही उक्त प्रस्तावास मंजूर न मिळणे, परिणामी कुडाळ येथील १०० खाटांचे जिल्हा महिला व बाल रुग्णालय रुग्णांच्या सेवेसाठी सक्षमपणे सुरु न होणे, परिणामी जिल्ह्यातील नागरिकांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, शासनाने यासंदर्भात तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन उक्त रुग्णालयचे अपूर्ण अवस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची व मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (६९) | “पालघर जिल्ह्यातील टेंभा खर्डी जव्हार जामसर बोपदारी रुईघर या हायब्रीड अन्युटी अंतर्गत एमयु ३ प्रकल्प कामाची मूळ किंमत १४६.१६ कोटी असणे, त्याअनुषंगाने कार्यारंभ आदेश दिनांक २३.१०.२०१८ रोजी देण्यात येणे, या प्रकल्पाची दिनांक २३.१०.२०२८ पर्यंत देखभाल दुरुस्तीची मुदत असणे, तसेच दिनांक २९.१२.२०१८ ते २६.१०.२०२१ या कालावधीत संबधित ठेकेदार यांना १७७.९५ कोटी रुपयाचे बिल अदा केल्याचे निदर्शनास येणे, ही अदा रक्कम मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त असणे, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कोकण यांनी दिनांक ०३.०८.२०२१ रोजी या प्रकल्पाचा पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करणे, शासनाने शासन निर्णय दिनांक २१.०२.२०२३ नुसार या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, सदर प्रकल्पासाठी पुन्हा नवीन सुधारित प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये २३५.३९ कोटी रुपयाची देणे. सदर रस्त्याचे काम पूर्ण झालेले असणे, तसेच बिल अदा केलेले असणे, तसेच दिनांक २३.१०.२०२८ पर्यंत देखभाल दुरुस्ती मुदत असणे असे असताना प्रकल्पाची रक्कम जाणीव पूर्वक फुगवणे तसेच मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त रक्कम ठेकेदारास अदा करणे, या अनियमिततेसाठी मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी जबाबदार असणे, त्यामुळे पालघर जिल्ह्यात या अनियमिततेबाबत चर्चा सुरु असणे, या प्रकल्पावर यापुढील अनियमितता रोखणेसाठी सदर काम रद्द होण्याची आणि संबंधित जबाबदार अधिकारी यांचेवर कार्यवाही करणेची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. सुनिल भुसारा, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | | | |
| (७०) | "बुलढाणा जिल्हयातील खामगांव येथील स्थानिक रावण टेकडीस्थित डंम्पिग ग्राऊंडवरील कचऱ्याला आग लागण्याच्या सातत्याने घटना घडत असून दिनांक १२.२.२०२३ रोजी अचानक मोठया प्रमाणात आग लागून धुराचे लोळ परिसरात पसरणे, रावणटेकडी, किसननगर, गोपाळ नगर, घरकूल, घाटपुरी नाका हा परिसर विषारी धुरात हरविल्याने तेथील आबाल-वृध्द नागरिकांना श्वसनाचा त्रास होणे, वारंवार या डंपिंग ग्राऊंडला आग लागत असल्याने नागरिकांमध्ये आग लावत असल्याचा निर्माण झालेला संशय, शहरातून कचरा संकलन करुन त्या कचर्याद्वारे खत निर्मिती करीत असताना गेल्या काही महिन्यापासून कचऱ्यापासून खत तयार करण्यात न येणे, यामुळे या कचऱ्यांचे ढिग मोठया प्रमाणात साचणे, या सततच्या आगीच्या घटनांची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी करण्यात येणे, असे असतांनाही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिकिया व भूमिका." | श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (७१) | "पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्हा हा नक्षलग्रस्त तथा आदिवासी बहुल जिल्हा असून गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय तथा मुख्य रेल्वे मार्गाने जोडलेले असणे, शहरामध्ये वैद्यकीय महाविद्यालय तथा व्यापारी केंद्र असल्याने जिल्हा सीमेलगतच्या मध्यप्रदेश, छत्तीसगड परराज्यांसह शेजारच्या जिल्ह्यामधून दरोज हजारो नागरिकांचे कामानिमीत्य आवागमण असणे, गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय असल्याने तथा जिल्ह्यामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध असल्याने नोकरदार वर्ग तथा कामगार/मजुर वर्गाचे शहरामध्ये वास्तव्याला असणे, शहराची लोकसंख्या २ लक्षपेक्षा जास्त असून शहरातील नागरिकीकरणामुळे दररोज नव-नवीन वसाहतींची भर पडत असतांना मूलभूत सोई-सुविधांचा अभाव असणे, गोंदिया नगरपालीका १०० वर्षे जुनी असुन मुलभूत सोइ-सुविधांचा शहरातील कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यास डंपीग वार्ड किंवा घनकचरा प्रक्रीया व्यवस्थापन प्रकल्प नसणे, शहरामध्ये दररोज १०० टनपेक्षा जास्त कचरा निर्माण होणे, सदर कचऱ्याची उचल न झाल्याने जागो-जागी कचऱ्यांचे ढिगारे निर्माण होणे, शहरातील साफ-सफाईकडे नगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असणे, नगरपालिकेमध्ये साफ-सफाईकरीता ४००-५०० कर्मचारी असतांनाही दररोज शहरामध्ये साफ-सफाई तथा कचऱ्याची उचल न होणे, त्यामुळे सर्व धुळीमुळे | सर्वश्री. विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, वि.स.स. | दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | नागरिकांमध्ये दम्यासारखे आजार होत असणे, दररोज कचरा उचल होत नसल्याने शहरामध्ये दुर्गंधी युक्त वातावरण निर्माण होऊन नागरिक जीव मुठीत घेऊन जगणे, शहरामध्ये रोगराई पसरणे, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्याप्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण होऊन नगरपालीकेवर मोर्चा/ आंदोलने नित्याची बाब झाली असणे, नगरपालिका १०० वर्षे जुनी असतांना आजपर्यंत कचरा विल्हेवाटीकरीता कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसणे, शहरातील कचरा शहराबाहेरील मोकळ्या जागेवर फेकण्यास लगतच्या गावातील नागरिक मनाई करणे, कचरा गाड्यांवर प्रतिबंध करणे, राज्य शासन, नगरपालिका प्रशासन तथा स्थानिक लोकप्रतिनिधी विरूध्द वातावरण निर्माण होऊन कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असणे, शहरातील कचऱ्याचे विल्हेवाटीकरीता जागा उपलब्ध नसल्याने एम.आय.डी.सी. तील जागेशिवाय दुसरा पर्याय नसणे, त्याचप्रमाणे शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था ५० वर्षे जुनी असुन शहरामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेल्या नागरिकीकरणामुळे नागरिकांना १५ मिनीटांपेक्षा जास्त वेळ पाणी मिळत नसणे, शहरामध्ये पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या डांगुर्ली पाणी पुरवठ्यामध्ये उन्हाळ्यामध्ये पाणी उपलब्ध राहत नसल्याने याचा विपरीत परिणाम शहरातील पाणी पुरवठ्यावर होऊन नागरिकांना पिण्याचे पाण्याकरीता भटकंती करावी लागत असणे, डांगुर्ली पाणी पुरवठा योजनेकरीता त्याठीकाणी डांगुर्ली बॅरेजचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक झाले असणे, नगरपालिका प्रशासनाने वाढीव तथा पर्यायी पाणी पुरवठ्याकरीता धापेवाडा परियोजनेतून अमृत योजने अंतर्गत रू.२७० कोटींचा शासनाला सादर केलेल्या प्रस्तावाला मंजुरी प्राप्त होणे अत्यंत गरजेचे असणे, शहरामध्ये भूमीगत गटार योजने काम सुरू असणे, ठिक ठिकाणी गटार योजनेकरीता खोदकाम करण्यात आले असणे, परंतु खोदकाम करीता असतांना कोणत्याही मापदंडासह तथा बांधकाम दर्जानुसार करण्यात येत नसणे, सदर योजनेच्या खोदकामामुळे शहरातील रस्त्यांची दुरावस्था झालेली असून नागरिकांना रहदारीकरीता मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, योजनेतील खोदकाम करीत असतांना कंत्राटदार आपली मनमानी करीत असणे, नागरिकांच्या तक्रारीची नगरपालिका प्रशासनाकडून दखल घेण्यात येत नसणे, एकंदरच गोंदिया शहरातील कचऱ्याचे विल्हेवाटीमुळे पसरलेली रोगराई, पिण्याचे पाण्याची कमतरता तथा भूमीगत गटार योजनेच्या खोदकामामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा उपाययोजना." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (७२) | “बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर शहरात वीज पुरवठा व बससेवा उपलब्ध करणारी सार्वजनिक क्षेत्रातील ‘बेस्ट’ परिवहन उपक्रम १८४७ मध्ये देश स्वतंत्र होण्याच्या एक आठवडा पूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असणे, दरम्यानच्या कालावधीत बेस्टच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना अल्पदरात सौजन्यपूर्ण सेवा देऊन विद्युत विभागाच्या मार्फत विद्युत सेवाही चोख दिली असणे, सद्यःस्थितीत बेस्ट आस्थापनेवर सुमारे २९ हजार कर्मचारी वर्ग आणि प्रवाशांच्या सोयीकरिता साधारण ३५०० बसेस रस्त्यावर धावत असल्याचे निदर्शनास येणे, सार्वजनिक उपक्रम व्यवस्थेत मुंबईची बेस्ट सेवा अप्रतिम सेवा म्हणून देशांतर्गत सर्व राज्यात ख्याती असणे, अशा या बेस्ट सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेकडून कर्ज घेऊन मासिक वेतन देण्याची वेळ येणे, हा उपक्रम मुंबई महानगरपालिकेतंर्गत चालविण्यात येत असताना याचे खाजगी करण करण्याची चर्चा सुरु असणे, तथापी बेस्ट उपक्रम हा महानगरपालिकेच्या अंतर्गत ठेवण्याची गरज, मुंबईत या उपक्रमाची ३५० एकर उद्योग संकुल व ७५ एकर निवासी संकुल जागा उपलब्ध असताना व तेथील निवासी संकुलच्या १२ एकरच्या जमिनीवर वसाहतीची जागा शासकीय भावाने विकून ५०० स्के.फुटची घरे त्या वसाहतीत सद्या रहात असलेल्या कर्मचाऱ्यांना मार्केट भावाने देवून अन्य जागा विकल्यास बेस्टचा आर्थिक फायदा होऊन कर्मचाऱ्यांचाही फायदा होणार असणे, तसेच त्यांच्या सेवा निवृत्तीनंतर ते बेस्ट वसाहतीत रहात असलेले निवासस्थान ज्यांचे वारस बेस्ट सेवेत आहेत त्यांच्या नावावर अथवा वारस बेस्ट सेवेत नसल्यास निवृत्त होणाऱ्या बेस्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या नावावर करुन देण्यात येणे, म्हणून बेस्ट संघटनांकडून वारंवार होत असलेली मागणी, बेस्टच्यासेवेत उभे आयुष्य खर्च केल्यानंतर मिळणाऱ्या वेतनात मुंबईत स्वतःचे निवासस्थान घेवू न शकलेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांची संख्या ९० टक्के असून या कर्मचाऱ्यांना मुंबई बाहेरील स्थलांतरीत वावे लागू नये म्हणून त्यांना मुंबईत अथवा नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर परिसरात बाजारमूल्य दरात स्वतःचे घर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने मुंबई पोलिसांच्या धर्तीवर धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, या कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश कर्मचारी मुंबईच्या मातीतील मूळ रहिवासी असल्याने त्यांना मुंबईत स्वतः निवासस्थान उपलब्द करण्याकरिता शासनाने उचित निर्णय घेऊन त्यांच्या भविष्याची चिंता दूर करण्याकरिता व बेस्टचे खाजगीकरण न करता कर्मचाऱ्यांना नोकरीची शाश्वती देण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स. | दिनांक<br>१७ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (७३) | "औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुंज अधिसूचित क्षेत्राकरिता सन १९९१ मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाल्यानंतर सिडकोने सन १९९६ पासून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करणे यासाठी सन १९९८, २००० व २०१२ मध्ये भूसंपादनासाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध होणे, यातील काही जमिनींचे आगाऊ ताबे घेऊन त्यावर विकास कामे करणे, परंतु भूसंपादनाची कार्यवाही अद्यापही पूर्ण न होणे, जमीन मालकांना कोणत्याही प्रकारे मोबदला न देणे, सिडको ने मार्च, २०२० मध्ये ठरावाद्वारे प्रकल्पातील प्रलंबित भूसंपादनाची कार्यवाही परत घेण्याचा आणि नव्याने कोणत्याही जमिनीचे संपादन न करण्याचा निर्णय होणे, परंतु त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणे, जमीन धारकांच्या जमिनी जाणीवपूर्वक संपादनाच्या फेऱ्यात अडकवून ठेवून त्यांना विकास परवानगी न देणे, विकास परवानगी व सोयी सुविधा मिळवण्यासाठी सिडको कार्यालयासमोर वेळोवेळी आंदोलन होणे, मोर्चे निघणे, संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या जमिनींच्या विकास कामांना परवानगी देणे बाबत शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सिडको कडून जमीनधारकांना कारण देणे बऱ्याच जमीन धारकांनी याबाबत माननीय उच्च न्यायालयात धाव घेणे, माननीय उच्च न्यायालयाने प्रलंबित भूसंपादनाबाबत शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पूर्वी निर्णय घ्यावा असे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश देऊनही याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष सिडकोने प्रकल्पाचा आर्थिक व्यवहारता अहवाल शासनास सादर करणे, प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसह्य ठरत नसल्याने प्रलंबित असलेल्या १२४ हेक्टर क्षेत्रापैकी केवळ विकास कामे झालेले ७.३० हेक्टर क्षेत्राचे गुण संपादन पूर्ण उर्वरित क्षेत्रातील संपादन न करण्याच्या निर्णयावर सिडको ठाम राहून त्यासाठी शासनाची परवानगी मागणे, शासनाने सन २०२२ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सदर विषयी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना सिडकोच्या सदर निर्णयास सहमती असल्याचे आणि प्रकल्पातील आवश्यक त्या सोयी-सुविधा काल बद्दल वेळेत पूर्ण करण्यासाठी सदर अधिवेशन समता पंधरा दिवसाच्या आत लोकप्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्याबाबत सभागृहात आश्वासन देणे, परंतु या दोन्ही आश्वासनाची पूर्तता न करणे, माननीय उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच, या सार्वभौम सभागृहात आश्वासन देऊन सुद्धा या प्रलंबित प्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमध्ये शासन सिडको यांच्याबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, माननीय उच्च न्यायालयाने | सर्वश्री. शांताराम मोरे, प्रकाश सोळंके, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | दिलेल्या निर्देशाचे व या सभागृहात दिलेले आश्वासनांचे तात्काळ पालन करून या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (७४) | "बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशनयोजने मधील अनियमिततेबाबत अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली ०६ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालातील दोषीवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प, बीड यांच्याकडे पाठवला असणे, परंतु प्रत्यक्षात बीड जिल्ह्यातील जलजीवन मधील सर्व घोटाळा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांच्या संमतीने झाला असणे, लोकप्रतिनिधी, लोकांच्या तक्रारी, वर्तमानपत्रात वारंवार बातम्या येत असतानाही कार्यवाही करण्याऐवजी दुर्लक्ष करून जलजीवनची कामे देतांना संबंधित एजन्सीना गंभीर त्रुटी असतांना कामे वाटप केलेली असणे, तसेच त्याच विभागातील कर्मचाऱ्यांनी निविदा प्रक्रियेत अनियमितता करत स्वतःच्या मर्जीतल्या व नातेवाईकांच्या संस्थांना व ज्यांनी सर्वे व अंदाजपत्रके तयार केली त्या अभियांत्रिकी सल्लागार यांनाच नियमबाह्य कामे दिली असणे, या सर्व अनियमिततेला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांनी न थांबवता पाठीशी घालून अनियमितता होऊ दिली असणे, त्यामुळे जलजीवनाच्या कामात झालेल्या भ्रष्टचाराला व अनियमिततेला प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. हे जबाबदार असणे, त्यामुळे त्यांच्यासह अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालातील दोषी अधिकारी, कर्मचारी, कॉन्ट्रॅक्टर, यांच्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती नमिता मुंदडा, श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (७५) | "सांगली नजीक कृष्णा नदीत दत्त इंडीया संचालित वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या अनिधीकृत डिस्टलरीचे मळी मिश्रित पाणी कृष्णा नदीत मिसळल्याने मोठ्या प्रमाणात नदी प्रदूषित होऊन हरिपूर अंकलीनजीक हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याची घटना समोर येणे, मृत माशांमुळे नदी मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाली असणे, यामुळे सांगली शहरासह जयसिंगपूर, मिरज, अंकली व शिरोळ तालुक्यांतील वीसहून अधिक गावांतील लोकांचे आरोग्य धोक्यात असल्याचे निदर्शनास येणे, कृष्णा नदीतील जलप्रदूषणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष्य, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | पसरलेला तीव्र असंतोष, अनधिकृत डिस्टलरीवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (७६) | "वर्धा जिल्हयाची हिंगणघाट शहरातील लोकसंख्या १ लाख ३० हजार असणे, हिंगणघाट नगरपरिषदेला अमृत योजने अंतर्गत टप्पा १ त्यासाठी ६१ कोटी ७९ लक्ष रुपये मंजूर होणे, त्यामध्ये २२२ किलोमिटरची पाईप लाईन, नवीन फिल्टर प्लॉन्ट आणि शहरामध्ये ११ नवीन पिण्याच्या टाक्या बांधून पूर्ण होणे परंतु वणा नदीवर बंधारा नसल्याने पाणी पुरवठा न होणे, मा. प्रधान सचिव नवि-२, यांनी दिनांक २०/०९/२०१७ ला मुंबईत बैठक घेऊन वणा नदी हिंगणघाट येथे नविन बंधारा बांधकाम करण्याबाबत आदेशित करणे, परंतु अजूनही नदीवर बंधारा मंजुर न होणे, दिनांक १४/०८/२०१९ ला हिंगणघाट नगरपरिषदने संपूर्ण त्रुटीची पुर्तता करुन संपूर्ण अहवाल संचालक नगरप्रशासन संचालनालय यांच्याकडे पाठविणे एकीकडे पाण्याच्या टाक्या, पाईप लाईन, सर्व जल शुध्दीकरण केंद्र नवीन तयार असून बंधारा नसल्यामुळे जनतेचे प्रचंड हाल होत असणे, त्यामुळे वारंवार मोर्चे आंदोलन होत असणे, अद्यापही बंधारा मंजूर न झाल्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.समीर कुणावार, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (७७) | "मौजे चिंचोलीकाटी (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील एमआयडीसीमध्ये असलेला बालाजी अमाईन्स या कंपनीने अवैधरित्या हजारो ब्रास मुरुम व दगड यांचा उपसा केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात चौकशी केल्यानंतर तहसिलदार मोहोळ यांनी सदर कंपनीवर रु. २६ कोटी ५० लाख मुरुम यांचा उपसा केल्याबद्दल व रु.१६ कोटी ९६ लाख दगड काढल्याबाबत असा एकूण रु. ४३ कोटी ४६ लाख इतका दंड भरण्याची नोटीस दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी कंपनीला देणे, अद्यापही या कंपनीला दंडाची रक्कम भरली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदर प्रकरण तहसिलदार मोहोळ यांच्याकडून काढून घेऊन पुढील कार्यवाही करण्यासाठी तहसिलदार दक्षिण सोलापूर यांच्याकडे दिले असल्याचे उघडकीस येणे, हा बदल करण्याची कारणे काय आहेत, असा संभ्रम तेथील नागरिकांत पसरलेला असणे, याबाबत खुलासा करुन रु.४३ कोटी ४६ लाख ही दंडाची रक्कम बालाजी अमाईन्स या कंपनीकडून वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. यशवंत माने, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (७८) | “सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातील मैंदर्गी गावाच्या सिटी सर्व्हे हा सन २०११-१२ साली विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्या मार्फत नेमण्यात आलेल्या खाजगी कंपनी कडून करण्यात आलेला असणे, सदर सिटी सर्व्हेच्या कामामध्ये ७०% पेक्षा जास्त धारकांच्या नावामध्ये, क्षेत्रामध्ये, नकाशामध्ये व सिटी सर्वे नंतर वाटप केलेल्या सनदा मध्ये चुकीच्या पद्धतीने नोंद होणे, त्यानंतर नागरिकांच्या तक्रारी प्राप्त असणे, उप अधीक्षक, भूमिअभिलेख, अक्कलकोट यांनी मैंदर्गी शहरचा फेरसिटी सर्व्हे करण्याचा प्रस्ताव पाठवला असणे, मलकापुर शहराचा व मैंदर्गी शहराचा सिटी सर्वे एकाच कंपनीकडून करणे, मलकापुर शहराचा फेर सिटी सर्व्हे केला असणे, मैंदर्गी शहराचा चुकीचा झालेला सिटी सर्वे रद्द करून फेर सिटी सर्व्हे केल्याने सर्वांना न्याय भेटेल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (७९) | “केंद्र शासनाने वन अधिनियम १९७८ मधील काही कलमे निरसित करून वनाचे संवर्धन व संरक्षण करण्या संबंधी राज्यांनी कायदा व नियम बनवले असे निर्देश दिलेले असणे, त्यानुसार महाराष्ट्र खाजगी वने आधिनियम विधानमंडळाने कायदा पारित केला असणे, सदर नियमातील सुधारणा कलम २३ (अ) (१) अन्वये मूळ मालकासह चरितार्थासाठी १२ हेक्टर एवढी जमीन पुनःस्थापित करण्याची तरतूद करण्यात आलेली असणे, याबाबत कोर्टाचे अनेक निर्णय असून ज्या खाजगी वन जमिनीचे राजपत्र झाले नसेल व वन खात्याने ताबा घेतला नसेल व मोबदला दिला नसेल अश्या जमिनी परत करण्याचे आदेश असताना २२ (अ) (१) खाली पुनःस्थापित करावयाच्या व इतर कमी क्षेत्राच्या जमिनीच्या ७/१२ सदरी खाजगी वने व वनेत्तर कामा व्यतिरिक्त वापरास बंदी असे शेरे दाखल केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी पसरलेली असणे, सबसिडी व शासनाच्या अनेक योजना कर्ज घेण्यात येणारी अडचण, जमीन विकसित करण्यासाठी येणारे अडथळे त्यामुळे वन व महसूल खात्याकडून होणारी प्रचंड पिळवणूक व त्यामध्ये निर्माण होत असलेला उद्रेक, अगदी वडिलोपार्जीत अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात मोडणारी जमीन तसेच राज्याच्या विकासासाठी रस्ते व इतर प्रकारच्या शेजारील जमीन वनखात्याच्या शेऱ्यामुळे विकसित न करता येत असल्यामुळे प्रचंड प्रमाणावर पसरलेला संताप, हतबल पनाची भावना व शेतकऱ्यांची खुंटलेली प्रगती याबाबत राज्यानेच पारित केलेल्या अधिनियमातील कलम २ (क) (१) व कलम ३ मध्ये संशोधन करण्याची नितांत गरज असणे, शेतकऱ्यांच्या प्रगती आड | श्री. किसन कथोरे, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | येणारी मुख्य वन संरक्षक यांनी पारीत केलेली शासन परिपत्रके दिनांक १६/१२/२००४, दिनांक २२/०२/२००५ व दिनांक १४/०७/२००४ ही शासनाच्या दिशाभूल करून व महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम १९७५ च्या तरतुदी विरुद्ध व न्यायालयीन निर्णयांची अवहेलना करणारी परिपत्रके रद्द करण्याबाबत मा.मंत्री वने हे तातडीने कार्यवाही करतील काय ? सदरची पत्रके रद्द करून केंद्र सरकारच्या दिनांक २०/६/२०१७ रोजीच्या बैठकीत जमिनीच्या खरेदी-विक्रीबाबत आक्षेप नसल्याने मा.मंत्री महसूल यांनी तसे परिपत्रक काढून गरजू असलेल्या शेतकऱ्यांना खरेदी-विक्री व्यवहार करणेसाठी परवानगी देतील का याचा खुलासा या सभागृहा समोर करतील काय ? याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (८०) | "पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील रसायनी पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्या तसेच अमेटी युनिवर्सिटी, भाताण यांच्यामार्फत मालमत्ता कर त्या त्या हद्दीतील ग्रामपंचायतींना अद्यापपर्यंत मिळाला नसणे, सदर मालमत्ता कर न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतींना विकासकामे करताना अनेक अडचणी निर्माण होत असणे, ग्रामपंचायतींकडे आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्यामुळे कंपन्यांकडून व अमेटी युनिवर्सिटीकडून मिळणाऱ्या मालमत्ता करावर ग्रामपंचायतींचा विकास अवलंबून असणे, कंपनी व युनिवर्सिटीकडून मालमत्ता कर न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या विकासाला अडथळा निर्माण होत असणे, उक्त परिसरातील ग्रामपंचायतींमधील कामगारांचे वेतन, पाणी पट्टी कराची रक्कम, तसेच अनेक मुलभूत समस्यांना सातत्याने ग्रामपंचायतींना सामोरे जावे लागत असणे, उक्त ग्रामपंचायतींना मुलभूत सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे ग्रामस्थांच्या तीव्र रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे पनवेल तालुक्यातील अमेटी युनिवर्सिटी, भाताण तसेच रसायनी पाताळगंगा परिसरातील कंपन्यांकडून ग्रामपंचायतींना मिळणारा कर तातडीने मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (८१) | "धाराशिव जिल्हा अवर्षण प्रवण असून जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरी पेक्षा कमी असणे, औद्योगीकरणाचा अभाव व कृषी क्षेत्रासाठी अपुरे शाश्वत सिंचन यामुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त असणे, या बाबी लक्षात घेऊन निती आयोगाने निवडलेल्या आकांक्षीत जिल्ह्यांमध्ये धाराशिव जिल्ह्याचा समावेश असणे, त्यामुळे येथील आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी | श्री.राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. | दिनांक २० मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | औद्योगीकीकरणाला चालना देणे आवश्यक असणे, ही बाब लक्षात घेऊन सन २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी महा जनादेश यात्रा दरम्यान धाराशिव जिल्हयातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव येथील कौडगाव औद्योगिक वसाहतीमध्ये टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याची घोषणा केली असणे, या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल देखील सादर करण्याचे आदेशीत केले असणे, या अनुषंगाने के.पी.एम.जी. संस्थेच्या माध्यमातून एमआयडीसी ने प्राथमिक अहवाल तयार करणे, परंतु महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यापासून दुर्दैवाने हा विषय प्रलंबित राहिलेला असणे, इतर वस्त्रनिर्मिती उद्योगापेक्षा तांत्रिक वस्त्र (टेक्निकल टेक्सटाईल) उत्पादनाला जगभर अधिकचा वाव असल्याने धाराशिव सारख्या आकांक्षित जिल्ह्यात या प्रकारचा उद्योग उभारल्यास किमान १० हजार रोजगार निर्मीतीसह येथील अर्थकारणाला मोठी चालना मिळणार असणे, आकांक्षित जिल्ह्याच्या विकासाबाबत केंद्र सरकार अतिशय सकारात्मक असून देशाचे पंतप्रधान यांच्यावर विशेष लक्ष असणे, तांत्रिक वस्त्र निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालायकडून नॅशनल टेक्नीकल टेक्सटाईल मिशन ही योजना राबविली जात असणे, कौडगांव,धाराशिव येथे राज्यातील पहिल्या तांत्रिक वस्त्र निर्मिती प्रकल्पाची घोषणा केली असणे, ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी व धाराशिव औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी वस्त्रोद्योग, एमआयडीसी व के.पी.एम.जी च्या माध्यमातून त्वरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (८२) | "सन २०१४ मध्ये कोकण व पश्चिम महाराष्ट्रास जोडणारा चिपळूण-कराड रेल्वे मार्ग होण्यास मान्यता देण्यात येणे, प्रकल्पाचा अर्धा खर्च राज्य सरकार करण्याचा निर्णय घेण्यात येणे, दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ रोजी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी भुमीपुजन करणे, कोकण रेल्वे व शापुर्जी पालनजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (एसपीसीपीएल) यांच्यादरम्यान हा सामंजस्य करार झालेला असणे, मात्र अद्याप प्रत्यक्षात काम सुरु न होणे, या सोबतच केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद न केल्याचे दिसून येणे, परिणामी कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील जनतेची घोर निराशा होणे, राज्याकडून या महत्वकांक्षी रेल्वे मार्गाकरिता राज्याच्या अर्थसंकल्पामधून निधीची तरतूद होण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (८३) | "जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथे मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाचे प्रशासकीय मुख्यालय असून भुसावळ रेल्वे जंक्शन हे भारतातील एक महत्वाचे जंक्शन असणे, त्यामुळे या शहरात रेल्वे विभागातील कर्मचारी मोठ्या प्रमाणात असणे, तसेच भुसावळ शहरालगतच्या परिसरामध्ये वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी, दिपनगर पावर जनरेशन, रेल्वेचे रेल्वे झोनल ट्रेनिंग स्कुल, लष्करी तळ असणे, तसेच एम.आय.डी.सी. भुसावळ मध्ये कार्यरत असलेले कर्मचारी भुसावळ शहरात स्थायिक असणे, त्यामुळे भुसावळ शहरात एकंदरीत कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात असणे, त्यानुषंगाने भुसावळ शहराची लोकसंख्या व कर्मचारी संख्या विचारात घेता त्यांच्यासाठी सोईसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने भुसावळ शहराची हद्दवाढ होणे अत्यंत गरजेचे झाले असणे, हद्दवाढ होत नसल्याने सर्वसामान्य जनतेस आवश्यक सार्वजनिक सोईसुविधा पासून वंचित रहावे लागत असून त्याचा ताण भुसावळ शहरावर पडत असणे, भुसावळ ही जळगाव जिल्ह्यातील सर्वात मोठी 'अ' वर्ग नगर परीषद असून, नगरपरिषदेची स्थापना सन १८८२ रोजी बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट १८८२ अन्वये झाली असणे, हद्दवाढीच्या प्रस्तावामध्ये भुसावळ, सतारे, कंडारी, साकेगाव, खडके, मिरगव्हाण, खेडी या शिवारांचा भागशः क्षेत्रांचा समावेश केला असून, त्यामध्ये हद्दवाढीचे ६.९४ चौ. कि.मी. क्षेत्र मिळून अंदाजे २०.३२ चौ. कि.मी. क्षेत्र नगरपरिषदेच्या सुधारीत हद्दीकरीता प्रस्तावित करण्यात येणे, भुसावळ शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार १,८७,७५० इतकी असणे, या प्रस्तावित लोकसंख्येस मुलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा, रस्ते, गटारी, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन इ. सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने नागरिकांचा रोष वाढत असणे, परिणामी त्याचा ताण नगरपरिषदेवर पडत असणे, नागरिकांना आरक्षणाच्या माध्यमातून बगीचा, दवाखाने, शाळा, कालेज, प्ले ग्राऊंड इ. सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच शहराचा सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीकोनातून हद्दवाढ तातडीने होणे गरजेचे असणे, त्याबाबतचे प्रस्ताव नगरपालिकेने नगरविकास विभागाला पाठविले असणे, परंतु अद्याप त्यावर कोणताच निर्णय न घेणे, त्यामुळे भुसावळ नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत शासनाने घ्यावयाची निर्णय व करावयाची कार्यवाही." | श्री. संजय सावकारे, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (८४) | "नवी मुंबई तळोजा येथे मे. डावू केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड या उद्योगाने लॅटेक्स पॉलिमर केक अशास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास येणे, | सर्वश्री. नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, | दिनांक २१ मार्च, |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मे. डावू केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड, तळोजा यांना पर्यावरणाची हानी केल्याबाबत रु.२२०.५५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असणे, परंतु अद्याप दंड वसुलीला होत असलेली दिरंगाई, परिणामी स्थानकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन पर्यावरणाची हानी झाल्याने दंडाची रक्कम वसूल करणेबाबत करावयाची कार्यवाही व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | वि.स.स. | २०२३ रोजी चर्चा झाली |
| (८५) | “राज्यातील विविध शासकीय, अशासकीय आणि अनुदानित आणि विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दरवर्षी विविध व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश दिले जाणे, व्यावसायिक अभ्यासक्रम जसे बीएस्सी अग्री, बी ई, एम बी बी एस इत्यादी साठी प्रवेश देत असतांना जात वैधता प्रमाणपत्र याची मागणी केली जाणे आणि नंतरच प्रवेश दिले जाणे, मात्र अव्यावसायिक अभ्यासक्रम जसे एम एस्सी, एम कॉम, एल एल एम, इत्यादी साठी प्रवेश देत असतांना मात्र जात वैधता प्रमाणपत्र मागितले जात नसणे किंवा विचारात घेतले जात नसणे, फक्त जात प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जात असल्याने बोगस उमेदवार यांनी प्रवेश घेऊन खऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेद्वार यांच्यावर अन्याय होणे, यामुळे खरे अनुसूचित जमातीच्या विध्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता असणे, राज्यात विविध आदिवासी संघटना यांच्याकडून अव्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश देतांना जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य करावे अशी मागणी वेळोवेळी होणे, फक्त जात प्रमाणपत्रा आधारे बोगस आदिवासी उमेद्वार यांनी जागा बळकावणे ही बाब गंभीर आणि चिंतनीय असून याबाबत त्वरेने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, अनिल पाटील, कुमारी आदिती तटकरे, सर्वश्री. चेतन तुपे, विनोद निकोले, धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (८६) | “भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली परंतु आजही आदिवासी समाजातील आदिम जनजाती (कातकरी) समाज हा सोयी सुविधांनपासुन वंचित राहिला असणे, तसेच शासन स्तरावर या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्या करिता अनेक योजना राबविल्या जाणे, परंतु सदारच्या योजना या फक्त कागदावरच राहतात प्रत्यक्षात आदिम कातकरी समाजाला त्याचा कोणताही लाभ मिळत नसल्याचे दिसून येणे, तसेच, हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या स्मृतीदिनानिमित्ता संबधित समाजाने दिनांक १२ जानेवारी, २०२१ वा त्या सुमारास | प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | शासनाकडे निवेदनामार्फत मागणी करणे, म्हणजेच आदिम कातकरी समाजाला त्यांच्या घरासाठी त्या त्या गावातील, गायराण हक्काची जागा मिळावी तसेच प्रत्येकाला पंतप्रधान आवास योजना किंवा शबरी आवास योजना घरकुल मिळावे, तसेच ज्या धरणात मच्छीमारी करतात त्याच धरणाचा ठेका या आदिम कातकरी समाजाला कमी रकमेत मिळावा, शेळीपालन, कुक्कुट पालन, वीट भट्टी अशा स्वरुपाच्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करावी, त्याबरोबरच आरोग्याच्या मोठ्या प्रमाणावर समस्या आहेत त्यामुळे त्यांना आयुष्यमान भारत अंतर्गत आरोग्य योजनेचे कार्ड काढून मिळावे, आणि आदिम कातकरी समाज हा शिक्षणापासून वंचित असून त्यांना साक्षर करण्यासाठी त्या त्या वस्तीत बालवाडी चालू कराव्यात, तसेच बऱ्याच महिला विधवा, अपंग, परीतक्त्या आहेत त्यांना देखील कागदपत्रे नसल्यामुळे याचा लाभ घेता येत नाही, तरी त्यांना याचा लाभ मिळावा आणि या समाजाला सर्व प्रकारची कागदपत्रे मिळावी उदा. आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदानकार्ड, जातीचा दाखला तसेच अनेकांचे जन्माचे दाखले व विवाह नोंदीचे दाखले नोंदणी करून मिळावेत, तसेच दारिद्र्य रेषेखालील रेशनकार्ड मिळावे जेणेकरून त्यांना दारिद्र्य रेषेखालील सरकारी योजनेचा लाभ घेता येईल याबाबत जनजाती कल्याण आश्रम नाशिक संचलित पुणे जिल्हा यांनी व विविध संघटनांनी आदिवासी समाजाचा हक्कासाठी वेळोवेळी शासनास पत्रव्यवहार करणे व शासनाने कोणतीही दखल न घेणे, व या समाजाचे सर्वेक्षण अद्याप न होणे, तसेच मा.आदिवासी विभाग मंत्रालयाने यासंदर्भात अद्याप एकही आढावा बैठक न घेणे, त्यानंतर संबंधित संघटनेने राष्ट्रीय जनजाती आयोग नवी दिल्ली यांना तक्रार करणे, आणि त्यानंतर पुणे जिल्ह्यात मुळशी हवेली प्रांत यांनी दखल घेणे, त्यानंतर दिनांक ३०/११/२०२२ ला आदिवासी कातकरी सामाजाचा जातीचा दाखला, आधार कार्ड आदी संदर्भात कॅम्प घेण्यात येणे, मात्र अद्याप एका व्यक्तीला सुद्धा जातीचे दाखले न मिळणे, तसेच मुळशी खडकवासला हवेली प्रांत श्री.संजय आसवले आणि मुळशी तहसिलदार श्री.अभय चव्हाण यांच्याकडे संबंधित समाजाचे लोक दाखल्याबाबत विचारणा केल्यावर उडवाउडवीची उत्तरे देणे आणि दिवस दिवसभर कार्यालयात बसवून ठेवणे, अर्वाच्य भाषेत संवाद साधणे, याबाबत वेळोवेळी शासनास तक्रार करूनही अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच याबाबत पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, पालघर या जिल्ह्यात प्रामुख्याने अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे असे प्रखरतेने आढळून येणे, यामुळे आदिम जनजाती (कातकरी) समाज हा शासनाच्या सोयी सुविधांपासून अद्याप वंचित राहिलेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| (८७) | "राज्यातील जालना जिल्ह्यासह भोकरदन व जाफराबाद तालुक्यासह संपूर्ण राज्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला नसेल अशा शेतकऱ्यांच्या नावावर पीकविमा भरण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी संबंधित शेतकऱ्यांच्या खोट्या सह्या करून बनावट भाडेपट्टा तयार करीत शेतकऱ्यांच्या नावावर येणारी पिकविम्याची रक्कम स्वतःच्या बँक खात्यावर वळती करून शेतकरी बांधवांना लाखों रुपयांचा गंडा घालणारी टोळी (रॅकेट) उघडकीस येणे, शेतकऱ्यांच्या हक्काचे पीकविमा अनुदान विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी व गावोगावी सक्रिय झालेल्या दलालांशी संगनमत करून लाखों रुपयांचा भ्रष्टाचार करणारी टोळी राज्यात काम करीत असून संबंधित टोळीचा पर्दापाश करून शेतकऱ्यांचे होणारे लाखों रुपयांचे नुकसान टाळण्यासाठी शासनामार्फत कारवाई करण्याची आवश्यकता, सदर टोळीची चौकशी करून संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मांगणी विभागातील जनप्रतिनिधी, जागरूक नागरिक यांनी मा.कृषी मंत्री, पीकविमा समितीचे जिल्हाध्यक्ष, जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्यासुमारास केली असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. संतोष दानवे, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (८८) | "बोदवड तालुक्यातील (जि. जळगांव) जलचक्र खुर्द येथील २८/२ मध्ये मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर धारकाने सन २०१७ ते माहे डिसेंबर, २०१९ दरम्यान सदरील जमिनतून लाखो ब्रास उत्खन्नत करून अवैध विक्री करणे, वास्तविक पाहता जलचक्र खुर्द येथील २८/२ ही वर्ग २ ची जमीन असून शेती प्रयोजनार्थ वापर करणे बंधनकारक असतांना त्या जमिनीचा वाणिज्य वापर करण्यात येणे, तसेच सदरील प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी करून केवळ ४२९४.२१ ब्रासच्या उत्खन्नांवर दंड आकरण्यात येऊन संबधित क्रशर धारकांला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणे, त्याचबरोबर स्टोनक्रशर धारकांवर गौण खनिज चोरी प्रकरणी दंडात्मक कारवाई अपेक्षित असतांना प्रांत व बोदवड तहसीलदार यांची फक्त स्वामित्व धन फरकाची रक्कम वसूल करणे, प्रशासनातील अधिकारी सदर क्रशर अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करून शासनाच्या करोडोचा महसूल बुडवित असल्याप्रकरणी संबधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून संबधित क्रशर धारकांकडून दंडाची रक्कम वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | श्री. चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (८९) | "मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ) मागील अंदाजे १२ ते १५ वर्षापासून अस्थायी म्हणून काम करीत असणे, दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवेला सलग दोन वर्षे झालेली असणे, या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोविड काळात देखील आपल्या जीवाची पर्वा न करता फ्रंटलाईन वर्क केलेले असणे, त्यांच्या सरळ सेवेमधील समावेशाचा प्रस्ताव सचिव कार्यालय, वैद्यकीय शिक्षण विभाग येथे प्रलंबित असणे, महाराष्ट्रातील लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मॅट कोर्ट, छत्रपती संभाजीनगर येथे सदरील विषयावर अपील केलेले असणे, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी मॅट कोर्टाने सदरील वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करून घेण्याचे आदेश दिलेले असणे, सचिव कार्यालयातील प्रलंबित प्रस्तावामध्ये ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासन सेवेमध्ये दोन वर्षापेक्षा अधिक कार्यकाळ काम केलेले असणे, अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सरळ वैद्यकीय सेवेत समावेश करण्यात यावे असे नमूद असणे, वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये या पूर्वीही ज्या सहाय्यक प्राध्यापक डॉक्टरांनी २ वर्षापेक्षा अधिक काम केलेले आहे त्यांचे सलग चार वेळा समावेश केले आहे, निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आजमितीपर्यंत एकदाही समावेश करण्यात आलेला नसणे, महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मॅट कोर्ट, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्णयानुसार समावेश करण्यात यावे अशी निवासी वैद्यकीय अधिकारी यांची मागणी असणे, परंतु अद्यापही या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सरळसेवेत समावेश करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९०) | "मायणी, ता. खटाव, जि. सातारा येथील रूरल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सेंटर व हॉस्पिटल, मायणी या मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर बोगस कागदपत्रे तयार केली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, सदर मेडिकल ऍडमिशन होत असताना संस्था चालकांनी बारावी पासचे सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट, तसेच शाळेचे दाखले बोगस तयार करून विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देऊन प्रक्रिया राबविली असणे, विद्यार्थ्यांना कमी मार्क असताना मेरिटमध्ये येण्यासाठी | श्री. जयकुमार गोरे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | सर्व बोगस कागदपत्रे तयार करून ती शासनास सादर करून मायणी येतील रूरल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सेंटर हॉस्पिटल येथे ऍडमिशन प्रक्रिया केली असून तेथे बोगस डॉक्टर तयार केले असे निदर्शनास आले असणे, यामध्ये तत्कलीन संस्था चालकांनी सांगणमताने हे कृत्य केले असल्याचे निदर्शनास आले असणे, यासंदर्भात दिनांक १८ मे, २०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे तक्रार दाखल केली असून त्यासंदर्भात अद्याप कोणतीही चौकशी केली नसणे, गुन्हा दाखल झालेला असताना तपास अधिकारी यांनी सूत्रधारकांना अभय दिलेला असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात मोठा असंतोष पसरलेला असणे, असेच जाळे महाराट्र मध्ये अनेक ठिकाणी चालू असणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या मनात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून गुन्हेगारावर कार्यवाहीची आवश्कता व उपाययोजना." | | |
| (९१) | "नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सोयी सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादी आवश्यक त्या सोयीसुविधांचा समावेश असणे, राज्यातील अव्वल वीजनिर्मिती केंद्रापैकी एकलहरे हा विद्युत प्रकल्प असणे, तसेच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प यापुर्वीच मंजूर केलेला असणे, तथापि शासकीय अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे हा मंजूर झालेला प्रकल्प रखडलेला असणे, वास्तविक सदर औष्णिक विद्युत प्रकल्प बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला नसणे, असे तत्कालीन मा. ऊर्जा मंत्री यांचेकडून माहे जानेवारी, २०२२ मध्ये सांगण्यात येणे, एकलहरे येथील नवीन प्रकल्प सुरू झाल्यास हजारो कामगार व व्यवसायिकांना रोजीरोटी व व्यवसाय उपलब्ध होणार असल्याचे निदर्शनास येणे, तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरचा मंजूर झालेला नवीन प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत आग्रही मागणी करण्यात येणे, तथापि आजतागायत शासनाने प्रकल्प सुरू करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी त्या परिसरातील तरुणवर्गामध्ये तसेच व्यवसायिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९२) | "पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे वाढत असणे, अतिक्रमणांचे पुर्नसर्वेक्षण होण्याची आवश्यकता, पाटबंधारे विभागाकडे अतिक्रमणांची अद्ययावत माहिती उपलब्ध | श्री. भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | नसणे, जलसंपदा विभागाने धरणाच्या पाणलोटक्षेत्राबाहेरील पाटबंधारे विभागाच्या जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे कोट्यावधी रुपयांचे चलने भरून तसा वारंवार पाठपुरावा करून देखील मोजणी प्रक्रिया सुरू झालेली नसणे, मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणक्षेत्रातील जमिनींवरील अतिक्रमणांना पाठबळ मिळत असणे, जमिनीच्या मोजणीस होत असलेल्या विलंबामुळे धरणाच्या पाणलोटक्षेत्रात जलसंपदा विभागाची नेमकी कोठे व किती जमीन आहे याची माहिती मिळत नसल्याने जलसंपदा विभागाच्या बहुतांश जमिनीवर, ओढ्या-नाल्यावर खाजगी व्यावसायिक स्वरुपाची अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास येत असणे, आजमितीस बहुतांश पूररेषा आणि पाणलोटक्षेत्रात अतिक्रमणे, बांधकामे झाली असणे, तसेच खडकवासला धरणाचे जलप्रदुषणात देखील वाढ झाली असून धरण व पाणलोटक्षेत्र व परिसरात कंपन्या, रेस्टॉरंट, रिसोर्ट व इतर व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांमध्ये पूर्ण क्षमतेने सिवेज ट्रिटमेंट प्लांट व तद्नुषंगिक आवश्यक असणाऱ्या उपाययोजना न केल्याने राजरोसपणे सांडपाणी आणि कचरा व राडारोडा मिसळला जात असणे, धरणाचे जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी सांडपाणी समस्या आणि घनकचरा व्यवस्थापन करिता कृती आराखडा करण्यात आला नसल्याने जलप्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होणे, दुषित पाण्यामुळे त्यावर अवलंबून असलेले नागरिक व वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, धरणाच्या व धरणाकडे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर झाला असणे, धरणाची हद्द संरक्षित नसल्यामुळे जलप्रवाह आणि पाणलोटक्षेत्रात व कॅनॉल मध्ये बुडून अनेकांचा बळी गेला असणे, खडकवासला धरण हे सुरक्षित नसून धरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करत जलसंपदा विभाग पुणेकरांच्या जीवाशी खेळत असणे, सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक, माहिती फलक, संरक्षण जाळी, संरक्षण भिंतीसारख्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येत असणे, जलसंपदा विभागाचा लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय नसणे याकडे जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | | २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९३) | "आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा थार, चामला, बांबर्डा, बोरखेडी, बोटोणा, पारडी, एकांबा, किन्ही मोई, मुबारकपुर ही गावे पहाडी व डोंगराळ भागात बसलेली असणे, त्या ठिकाणी पर्जन्यमान हे | श्री. दादाराव केचे, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अत्यंत कमी असणे, त्यामुळे या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची व शेतीकरिता सिंचनाचा अत्यंत तुटवडा जाणवत असणे, सदर गावे ही दुष्काळग्रस्त असून त्या गावातील जनतेचा उदरनिर्वाह हा शेतीचे उत्पन्नावर अवलंबून असणे, तसेच गावातील शेतकरी शेतीसोबत जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करणे, परंतु पाण्याच्या तुटवट्यामुळे त्यांना जनावरांचे स्थलांतर बाहेर गावी करावे लागणे, त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थितीचा सुद्धा सामना करावा लागणे, बारमाही पाणी साठवणुकीकरिता कुठलीही व्यवस्था नसल्यामुळे दरवर्षी पाण्याचा दुष्काळ पडत असणे, त्या गावात जानेवारी महिण्यानंतर पिण्याकरिता पाणी उपलब्ध राहत नसणे, करिता या भागातील शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी व सिंचनाची सोय होण्याच्या दृष्टीने जाम नदीवर नवनिर्मीत मध्यम सिंचन प्रकल्प मंजुर करण्याकरिता जनतेचे मागणी तात्काळ मंजूर करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | | २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९४) | "पुणे जिल्ह्यातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाच्या अभावी आवर्तनाच्या वेळी लाखो लिटर पाणी वाया जाणे, चासकमान कॅनोलमध्ये दगड माती पडून कॅनोलची रुंदी व खोली कमी होणे तसेच झाडाझुडपांनी अनेकांच्या पोटचाऱ्या गाडून टाकणे, सदरचा कालवा हा रोजगार हमी योजनेतून झाला असल्याने प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण होणे गरजेचा असणे, कॅनोलमधील पाणी गळतीचे प्रमाण ४५ ते ४७ टक्के होत असून कालव्याच्या मुखातून सद्य स्थितीत ५५० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून टेल भागात अंदाजे ७० ते ९० क्युसेकने (पावसाळ्या व्यतिरिक्त) पाणी मिळणे, यामुळे हेड व टेल या दोन्ही भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, टेलच्या भागापर्यंत पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यासाठी व कॅनोलची गळती रोखण्यासाठी तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी, जलसेतू अस्तरीकरणासाठी, चाऱ्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | ॲड. अशोक पवार, सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९५) | "कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकरण होत असणे, महानगरपालिकेतील मुळ क्षेत्रासह २७ गावांमध्ये लोढा, रुणवाल, रिजन्सी, पॅराडाईज सारखे शेकडो एकरमध्ये सुरू असलेले | श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मोठमोठे गृहप्रकल्प, म्हाडाच्या माध्यमातूनही अनेक बांधकामे सुरू असणे, या प्रकल्पाच्या माध्यमातून लाखो घरांची सुरू असलेली निर्मिती, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, मुळ महानगरपालिका क्षेत्रासह विस्तार झालेला असणे, निवासी विभाग औद्योगिक विभागासह मनपा क्षेत्रातील सर्व निवासी विभाग एम.आय.डी.सी. च्या बारवी डॅमवर अवलंबून असून पुरेसा पाणी कोटा व पुरवठा होत नसल्यामुळे सध्या २७ गावांसह संपूर्ण मनपा क्षेत्रात होत असलेली पाणी टंचाई, बारवी व्यतीरीक्त पाणी पुरवठ्यासाठी कोणताही इतर प्रकल्प सध्या सुरू नसल्याने भविष्यात पाण्याची परिस्थिती अधिकच बिकट होण्याची शक्यता, त्यामुळे कल्याण-डोंबिवली मनपा क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करून उल्हास नदीच्या खोऱ्यामध्ये होणाऱ्या जलसाठ्यावर पाणी आरक्षण मिळावे व वाढीव कोटा मिळावा यासाठी सुरू असलेले प्रयत्न, याबबत वारंवार बैठका घेऊनही निर्णय घेतला जात नसणे, कडोंमपा मधील नागरीकांचे पाणी टंचाईमुळे होत असलेले हाल पाहता या प्रकरणी तातडीने लक्ष घालून कल्याण-डोंबिवली साठी आवश्यक असलेला पाणी कोटा वाढवून उल्हास नदीपात्रातून नवी मुंबई महानगरपालिकेस व्यपगत होणारा १४० दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी कोटा कल्याण-डोंबिवली मनपासाठी वर्ग करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया." | | २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९६) | "राज्याच्या अर्थसंकल्पात प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजनेतून मोठा निधी पायाभूत सुविधेवर खर्च होणे, प्रत्येक वर्षी जिल्हा वार्षिक योजनेत वाढ होणे व त्यातुन सामुहिक विकासाची व कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण करणाऱ्या योजना राबविण्यात येणे, परंतु उपरोक्त विकास कामे घेताना रोजगार निर्मितीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, एकूण विकास कामे करताना दरडोई उत्पन्न वाढविणाऱ्या योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यात शासनाचे झालेले दुर्लक्ष, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून ही मोठ्या योजना अंमलात आणताना साधारणतः १२.५० टक्के व ९.६ टक्के निधी खर्च होणे, परंतु त्यातूनही मोठा निधी फक्त पायाभूत सुविधेवरच खर्च होणे, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्र्यात जीवन जगत असलेल्या कुटुंबियांच्या जीवनात उत्थान करण्याच्या शासनाच्या उद्देशाची पुर्तता होण्यास विलंब होणे, राज्यात राहणाऱ्या लोकांची रोजगार निर्मिती व उत्पन्नवाढ याकडे शासनाने प्राधान्य | ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | देण्याची गरज, मागील ७५ वर्षात राज्यात मोठी पायाभूत सुविधा निर्माण झाली असतानाही आता पुन्हा बहुतांश निधी हा नागरिकांच्या गरजेनुसार न होता शासनाच्या प्रचलित योजनेवरच खर्च होत असल्याने याबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता, राज्याच्या मनुष्यबळाचा विचार करून त्या मनुष्यबळाचा वापर होण्याच्या दृष्टीने व राज्याची उत्पादकता वाढविण्याच्यादृष्टीने राज्यात लागणारे सर्व वस्तुंचे उत्पादन राज्यातच होण्याच्या दृष्टीने व राज्याला आत्मनिर्भर करण्याच्यादृष्टीने नियोजन करण्याची आवश्यकता, याकडे नियोजन विभागाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने पायाभूत सुविधेसोबत रोजगार निर्माण करण्याच्या योजनेसाठीही ठराविक निधी खर्च करण्याची आवश्यकता, याकडे शासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारांची संख्या वाढत असल्याने उद्‌भवणाऱ्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने विचार करून नियोजन करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (९७) | "मुंबईतील धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असणे, विभिन्न जाती आणि धर्माचेगरीब व मध्यमवर्गीय परिवार धारावीत गेली कित्येक दशकं एकजुटीने राहत असणे, या ठिकाणी अनेक लघु व मध्यम उद्योगधंदे कार्यरत असणे, या सर्वांमुळे धारावीची एक वेगळी ओळख निर्माण होणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पुनर्वसन प्रकल्प असणे, ६०,००० पेक्षा अधिक परिवारांच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या प्रकल्पावर अवलंबून असणे, २०१८ मध्ये संपन्न झालेल्या निविदा प्रक्रियेला बाजूला सारून शासनाने नव्याने धारावी पुनर्विकास निविदा काढणे, नव्याने बोलावलेल्या प्रक्रियेत पात्रता निकष आणि कामाच्या अनुभवाच्या अटी व शर्थींमध्ये मोठे बदल होणे, त्याविरोधात मा.उच्च न्यायालयात मागील निविदा लागलेले लोग दाद मागणे, हिंडनबर्गच्या (Hindenburg) अहवालामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेल्या अदानी समूह नवीन निविदा प्रक्रिया जिंकणे, सद्यस्थितीत अदानी समूहाला बाजारातून पतपुरवठा उपलब्ध करणे कठीण असणे, या पार्श्वभूमीवर धारावी पुर्नवसन प्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे स्थानिकांत प्रकल्पाविषयी चिंता, असंतोष आणि भीतीचे वातावरण निर्माण होणे, सद्यस्थितीत अदानी समूहावर होत असलेले आरोप आणि त्यांची अस्थिर आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना कामाचे आदेश (Work Order) न देणे आणि | प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | निविदेचा पुनर्विलोकन करण्याची तातडीची गरज असणे, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलेले असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने लक्ष घालून पुनर्विकास निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबवण्यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (९८) | "श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ च्या अधिनियमातील द.म. सुकथनकर साहेब यांच्या अध्यक्षतेखालील समिती काळातील १९९४ ते २२/८/२००४ अखेर पर्यत चे एकूण १६८७ कर्मचारी संस्थानामध्ये काम करीत असून सन २००० पासून शिर्डी संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या ५९८ कर्मचारी संस्थानामध्ये काम करीत असून सन २००० पासून शिर्डी संस्थानामध्ये कार्यरत असलेल्या ५९८ कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करीत असणे, या पगारावर घरखर्च तसेच मुलांचे शिक्षण करणेही जिकरीचे झाले असणे, गेल्या २० वर्षापासून हे कामगार अन्याय सोसत असून त्यातील काही रिकाम्या सेवानिवृत्तही झाले असणे, कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या ५९८ कर्मचाऱ्यांना पुर्वलक्षी प्रभावाने संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमातील कलम १६ अन्वयेच्या तरतूदीनुसार शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार कायमस्वरुपी स्थायी कर्मचारी घेण्याबाबत कर्मचाऱ्यांकडून मागणी होत असून यापूर्वी कायम केलेल्या १०५२ कामगारांचे निकष लावून श्री. साईबाबा संस्थान आस्थापनेवर वा ५९८ कामगारांपैकी जे पात्र आहेत त्यांना श्री. साईबाबा संस्थान आस्थापनेवर कायमस्वरुपी स्थायी कर्मचारी म्हणून कायम करण्याबाबत मागणी होत असून अद्यापही याबाबत कार्यवाही करण्यात न आल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कायमस्वरुपी नियुक्ती करण्यात यावी, तसेच मंजूर आकृतीबंधाप्रमाणे माहे ऑगस्ट, २००९ पूर्वलक्षी प्रभावाने वेतनाचा फरक देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री बाळासाहेब थोरात, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अशोकराव चव्हाण, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री बळवंत वानखडे, नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. सुरेश वरपुडकर, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. लहू कानडे, संजय जगताप, संग्राम थोपटे, शिरीष चौधरी, कुमारी प्रणिती सुशीलकुमार शिंदे, डॉ. विश्वजित कदम, श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. | दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (९९) | "नांदेड जिल्ह्यातील शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प सन १९८९ साली पूर्ण झालेला असणे, सदर प्रकल्पाचे सुधारित लाभक्षेत्र २८,३४० हेक्टर असणे, त्यापैकी लोहा तालुक्यात १५,९२७ हेक्टर व कंधार तालुक्यात २१०० हेक्टर लाभक्षेत्र असणे, शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प उपसा सिंचन प्रकल्प असून ३२ वर्षापासून कार्यान्वित असणे, प्रकल्प पंपग्रहात ८५० अश्व शक्तीचे १४ पंप असणे, सदर पंपांचे | श्री. श्यामसुंदर शिंदे, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | आयुर्मान १५ वर्षे असणे, परंतु प्रत्यक्षात मूळ आयुर्मानापेक्षा सदर पंपांना १७ वर्ष जास्त कालावधी झालेला असणे, तसेच प्रकल्पासाठी ३८७० मी लांबीची उद्धरण नलिका असून त्याचे आयुर्मान संपलेले असणे, त्यामुळे पंपाची उद्धरण नलिकेचे मोठ्या प्रमाणात झीज झालेली असून पंप बंद पडणे, उद्धरण नलिकेचे फुटणे हे प्रकार घडत असल्यामुळे पूर्ण क्षमतेने विसर्ग मिळत नसणे, सद्यःस्थितीत ६ पंप चालू असून एकूण विसर्गाच्या ३० % विसर्ग मिळत असणे, जलसंपदा खात्याकडून १४ पंप व उद्धरण नलिका नव्याने बसविण्याकरता राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असणे, सदर काम लवकर पूर्ण झाले नाही तर प्रकल्प बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नसणे, जलसंपदा खात्याकडून १४ पंप व उद्धरण नलिका नव्याने बसवण्या संबंधी प्रस्तावास मान्यता देण्यास लागणारा विलंब, परिणामी शेतकऱ्यांस सिंचनाचे पाणी मिळणार नसून त्यांचा आक्रोश वाढणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (१००) | “कन्नड-सोयगांव विधानसभा मतदार संघात नेहमीच अतिवृष्टिमुळे नदी लगतच्या असलेल्या गावात पावसाळयात पूराचे पाणी घूसुन जिवित व वित्त हानी होत असल्याने नदीलगत असलेल्या गावांमध्ये संरक्षण भिंत बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वांरवार मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे करण्यात येणे, परंतु अदयापपर्यंत कोणतीच कार्यवाही होत नसल्याने या नदी लगतच्या गावांना नेहमीच पूराचा फटका बसून जिवित व वित्त हानी होणे, परिणामी या नदीलगतच्या गावांतील गावकऱ्यांमध्ये शासनाच्या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. उदयसिंग राजपुत, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१०१) | “सांगली-सातारा-सोलापूर जिल्ह्यातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षापासून सुरू असणे, सदर दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न अद्यापी प्रलंबित असणे, सदरच योजनेचे काम तातडीने केल्यास या योजनेअंतर्गत तीन जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील २१७ गावांना फायदा होणार असुन त्यामुळे या गावातील पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीच्या पाण्याची अडचण दूर होणे, शेतीमालाचे उत्पादन वाढून दर्जा वाढेल, कारखाने जोमाने चालतील, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल, सदर योजनमध्ये खानापूर- | श्री. अनिल बाबर, वि.स.स. | दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | आटपाडी-तासगांव, जत, माण, खटाव तालुक्यातील वंचित गावाचा समावेश करण्याची होत असलेली मागणी, यासाठी टेभू उपसा सिंचन योजनेमध्ये वंचित गावाचा समावेश करून ६ टप्पा नियोजित असणे, याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी बैठक झालेली असून तीन महिन्यामध्ये वंचित गावाचा समावेश करण्याचा आदेश दिलेला असणे, त्यानुसार शासनाने दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी टेंभू योजनेच्या विस्तारित योजनेसाठी वाढीव ८ टिएमसी पाणी उपलब्ध करून देण्यात येणे, याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री (जलसंपदा) मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे विस्तारित योजनेसाठी प्रशासकिय मान्यता व निविदा लवकरात लवकर काढण्याची केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी दुष्काळी तालुक्यातील वंचित गावामधील जनतेमध्ये पसलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, जनतेला पिण्यासाठी व शेतीला पाणी देण्याकरिता शासन स्तरावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१०२) | "स्वातंत्र्यानंतर अनेकवेळा तिल्लोरी कुणबी या समाजाच्या सर्वेक्षणासाठी अनेक वेळा अभ्यास समिती नेमण्यात येणे, त्यानुसार सन १९९६ च्या राज्य अध्यादेशात ओबीसी यादिमध्ये ८३-तिल्लोरी कुणबी समाजाचा समावेश करण्यात येणे, असे असतांनाही घटणाबाह्य हिंदू-कुणबीचे पुराव्यांची मागणी जिल्हा प्रशासनाकडून मनमानी पद्धतीने करण्यात येणे, त्यामुळे समाजाचे मिळणारे आरक्षण आज संकटात सापडलेले असणे, माहे जानेवारी, २०२३ पासून रत्नागिरी जिह्यातील तिल्लोरी कुणबी उल्लेख असलेल्या कुणबी समाजाला दाखले देणे जिल्हा प्रशासनाने पूर्णपणे बंद करणे, सध्या राज्यात दहावी, बारावीच्या परिक्षा सुरू असणे, परिक्षेनंतर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे प्रवेश घेण्यासाठी जातीचे दाखले आवश्यक असतांना मात्र रत्नागिरी जिल्ह्यातील तिल्लोरी कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांना दाखले देणे बंद केल्यामुळे या समाजातील विद्यार्थ्यांना पुढे प्रवेश मिळण्यास अडचण निर्माण होणार असणे, परिणामी त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असणे, तसेच जिल्ह्यात पुढील कालावधीत ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये उमेदवार, सदस्यांचे दाखले, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका लागणार असणे, त्यासाठी उमेदवारांना आवश्यक जातीचे दाखले लागणार असणे, परंतू जिल्ह्यात तिल्लोरी कुणबी समाजाच्या नागरीकांना दाखलेच देणे बंद | सर्वश्री राजन साळवी, भास्कर जाधव, वैभव नाईक, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | केल्यामुळे या समाजातील नागरीकांना निवडणूकीच्या वेळी उमेदवारी मिळण्यासाठी मोठी समस्या निर्माण होणे, कुणबी समाज हा ओबीसी वर्गात येत असणे, तसा शासनाचा शासन निर्णयही असणे, त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून दाखले देणे बंद करण्यात आल्याने कुणबी समाजातील नागरीकांमध्ये वाढलेला तीव्र असंतोष, शासनाने यासंदर्भात तात्काळ चौकशी करून रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा प्रशासनाने बंद केलेले ओबीसी प्रवर्गातील ८३-तिल्लोरी कुणबी समाजातील नागरिक, विद्यार्थ्यांना जातीचे दाखले पुर्ववत सुरू करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (१०३) | “जळगाव शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या मेहरूण गट नं. ७८ व ७९ या अनुक्रमे ६.१० व ५.११ आर.चौ.मी जागेचा खाजगी विकासकाकडून लग्न सभारंभासाठी भाड्याने देऊन वाणिज्यिक वापर करण्यात येत असल्यामुळे जळगाव महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर मिळकत ही महानगरपालिकेची मालमत्ता असल्यामुळे ही मिळकत ताब्यात घेण्याबाबत दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी नागरिकांनी जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिलेले असणे, या प्रकरणाची जिल्हाधिकारी जळगाव यांचे समोर सुनावणी चालू असणे, सुनावणी दरम्यान जळगाव जिल्हाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी गट नंबर ७८ व ७९ चा ले-आऊट रद्द करण्याचे निर्देश दिलेले असणे, मात्र महानगरपालिका आयुक्तांकडून ले-आऊट करण्यासाठी दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असणे, महानगरपालिका आयुक्तांनी हा ले-आऊट रद्द करावा किंवा ही ॲम्यूनिटी ताब्यात घेण्याची आवश्यकता असणे, मात्र याबाबत दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | सर्वश्री छगन भुजबळ, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१०४) | “ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील भूमाफिया व विकासकांकडे ग्रामपंचायतीच्या तसेच पालिकेच्या नगररचना विभागाच्या बांधकाम परवानग्यांची बनावट कागदपत्रे असणे, या बनावट कागदपत्रांच्या आधारे भूमाफिया व विकासक यांनी कल्याण-डोंबिवली परिसरातील २७ गावाच्या भागातील पालिकेची आरक्षणे, सरकारी जमिनीवर शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या महसूल बुडवून | श्री. गणपत गायकवाड, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री कुमार आयलानी, किसन कथोरे, प्रमोद पाटील, अस्लम शेख, अमीन पटेल, नानाभाऊ पटोले, | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | बेकायदा बांधकामे उभी केलेली असणे, यातील बहुतेक बांधकामे ही २७ गावात होणे, बनावट कागदपत्राच्या आधारे ग्रामपंचायतीचे खोटे प्रमाणपत्र तसेच खोटे रेरा नोंदणी पत्र मिळवत नागरिक, शासन व पालिका प्रशासनाची फसवणूक करणाऱ्या सुमारे विकासकांवर कारवाईची टांगती तलवार असताना ४० विकासकांची खाती एसआयटी ने गोठवलेली असणे, एसआयटीने तहसीलदार, जिल्हाधिकारी आणि पालिका प्रशासनासह रजिस्टारला या मालमत्ता संदर्भातील व्यवहार थांबवून चौकशी करण्याचे आदेश देण्यात येणे, आतापर्यंत चौकशी अहवाल सादर झालेला नसणे, परंतु बेकायदेशीरपणे इमारती बांधून विकासक व भूमाफीया इमारतीमधील सदानिका विकून मोकळे होणे, परंतु कामात कसूर करून अनधिकृत बांधकाम सुरू असतांना त्यावर कोणतीही कारवाई न करणाऱ्या अथवा अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, विकास ठाकरे, संजय जगताप, सुनिल केदार, सुरेश वरपुडकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स. | |
| (१०५) | "राज्यात ६२२ कोटी लिटर पेक्षा दररोज जास्त सांडपाणी थेट नद्यांमध्ये मिसळत असल्याने जलजीवांसह मानवी आरोग्यावर तसेच ग्रामीण भागातील शेतीवर घातक परिणाम होत असणे, पुणे शहरात दररोज एक हजार दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाण्याची निर्मिती होत असताना पुणे महापालिकेने केवळ ७५० एमएलडी सांडपाणी नदीत सोडले जात असल्याचे कागदोपत्री दाखवले असणे, राष्ट्रीय हरित लवादाने नदी प्रदूषणावर उपाययोजनांचा कृती आराखडा मागितला असणे, सन २०१८ मध्ये विशेष अधिसूचना काढून नदीकाठावरील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करणे अनिवार्य करण्यात आले असताना व त्याचा कालबद्ध कार्यक्रमही आखण्यात आला असून देखील हरित लवादाचे निर्देश व खात्याचे आदेश असून देखील राज्यभरातील नदीकाठच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीला गती मिळालेली नसणे, सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया व्हावी, त्यानंतरच हे पाणी नदीत सोडण्यास सांगितले असताना देखील त्याचे उल्लंघन झाल्यास हरित लवादाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ दंड ठोठावणार असल्याचे आदेशात नमूद असणे, त्यानुसार ही मुदत पुढील काही महिन्यात संपुष्टात येत असून देखील केवळ ३० संस्थांनी या आदेशाची अंमलबजावणी केली असणे, राज्यात नदीकाठची गावे आणि शहरांमध्ये दररोज निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रकिया करण्याचे प्रमाण कसे वाढवता येईल | ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले असणे, मौजे कुरकुंभ, ता. दौंड येथे मोठी रासायनिक औद्योगिक वसाहत असणे, यामध्ये देखील मोठ्या प्रमाणवर प्रदूषित व रसायन मिश्रित पाणी तयार होत असणे हे प्रदूषित सांडपाणी उद्योगांकडून अनेक वेळा मोकळ्या शेतात, ओढ्यात, नाल्यात किंवा बोअरवेल मध्ये सोडले जात असणे, यामुळे आजूबाजूच्या सुमारे १० ते १५ किमी अंतरावर याचा परिणाम होत असणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी शासनाकडून अनुदान देखील मिळत असणे कुरकुंभ, ता. दौंड येथे प्रदूषण मधून मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे बैठका व पाठपुरावा करण्यात आला असणे, या बाबतीत अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे केमिकलचे स्फोट होऊन देखील मोठ्या प्रमाणावर अपघात घडले असणे, विना प्रक्रिया सांडपाणी शेतात, ओढ्यात, नाल्यात बोअरवेल मध्ये तसेच नदीमध्ये सोडले जात असणे, यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व शेतपिकांचे नुकसान होत असल्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१०६) | "राज्यात वन संवर्धन कायदा लागू नसणाऱ्या ग्रामीण भागातील वृक्षतोड करण्यासाठी 'महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ व महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादी बाबींचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७ 'या कायद्यातील तरतुदीनुसार वन अधिकाऱ्यांना वृक्षतोडीचे अधिकार नसणे, तथापि, वाढत्या नागरीकरणामुळे मोठ्या शहरा सभोवतालच्या गावांमध्ये सुनियोजित विकास करण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई एक्स्प्रेस महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या २ किमी परिसरासाठी रस्ते विकास महामंडळ, नवी मुंबई एअरपोर्टच्या २० कि.मी. परिसरासाठी नैना प्राधिकरणाची स्थापना होणे, सदरचे प्राधिकरणे स्थापित झाल्यानंतर त्यांचा कोणताही विकास आराखडा अद्याप मंजूर न होणे, अशा नियोजन प्राधिकरणाच्या अखत्यारीत अनेक गावांचा व तालुक्यांचा समावेश असणे, या भागात अनेक शेतजमिनी असतांना सदर क्षेत्र जणू काही ते नागरी क्षेत्र आहे असे समजून वृक्ष तोडीस वन अधिकाऱ्यांनी परवानगी नाकारणे व सबंधित नियोजन प्राधिकरणाकडे महाराष्ट्र नागरी क्षेत्र (झाडांचे रक्षण व जतन) अधिनियम, १९७५ अंतर्गत अर्ज करण्यासाठी सूचित करणे, वास्तविक पाहता महाराष्ट्र नागरी क्षेत्र (झाडांचे रक्षण व जतन) अधिनियम, १९७५ च्या तरतुदी केवळ नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू | श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | असताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नैना अशा विविध प्राधिकरणातील ग्रामीण भागातील शेतजमिनीवरील झाडे तोडण्यासाठी सदर अधिनियम लागू असण्याचा अवाजवी आग्रह धरणे, यामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना विनाकारण त्रास होणे, वास्तविक पाहता ज्या क्षेत्रासाठी विकास योजना अंतिम झाली नाही असे क्षेत्र सद्यःस्थितीत ग्रामीण क्षेत्र समजून अशा क्षेत्राकरिता 'महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ व महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादी बाबींचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७' नुसार यापूर्वी वन अधिकाऱ्यांकडून परवानगी देण्यात येत होती त्याच प्रचलित पद्धतीप्रमाणे परवानगी देण्याच्या संदर्भात शासन स्तरावरून सुस्पष्ट मार्गदर्शन नसल्याने अधिकाऱ्यांमध्ये असलेल्या संभ्रमाच्या परिणामी नागरिकांना होणारा त्रास, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१०७) | "अमरावती जिल्ह्यातील धानोरा गुरव नांदसावंगी पापड वाढोणा रस्त्याचे बांधकाम एम.डी.आर २६ कि. मी. ०/०० ते २१/०० तालुका नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती सीआरएफ योजनेअंतर्गत मंजूर कामाची निविदा दिनांक १०/०३/२२ रोजी झाली असणे, निवीदा १५/०६/२२ उघडण्यात येऊन सदर व कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १०/०८/२२ ला देण्यात आला असणे, सदर कामाची किंमत १६ कोटी ७९ लाख ७७ हजार ५४८ असून सदरहू काम १० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे असल्याने सदर कामाच्या अटी शर्तीमध्ये एम ओ आर टी एच (MORTH) नियमानुसार प्लांट कामाच्या ठिकाणापासून साठ किलोमीटर अंतरात असणे किंवा काम मिळाल्यानंतर लावणे बंधनकारक असणे, निविदेच्या अटी शर्तीनुसार कंत्राटदारांचा बॅच मिक्स प्लांट ६० किलोमीटरच्या आत असल्यामुळे २५ लक्ष रुपयेचा एफ डी आर निविदेसोबत जोडला असणे परंतु संबंधित कंत्राटदाराने कामापासून ६० किलोमीटरच्या आत बॅच मिक्स प्लान न लावताच अधिकाऱ्यांच्या संगनमताने २५ लक्ष रुपांचा एफ डी आर परत घेऊन शासनाची फसवणूक केली असणे, तसेच कामाच्या ठिकाणापासून ६५ ते ७० किलोमीटर दूर असलेल्या ड्रम मिक्स प्लॅन वरून संबंधित काम अधिकाऱ्यांच्या संगनमताने करून घेतले असणे, याबाबत कार्यकारी अभियंतांना विचारणा केली असता धर्मेश प्लांट पासूनचे अंतर हे गुगल मॅप नुसार ६० किलोमीटरच्या आत असल्याची खोटी माहिती माननीय लोकप्रतिनिधींना दिली असणे, संबंधित कामाच्या अति शर्तीमध्ये बॅच मिक्स प्लांट चा | सर्वश्री प्रताप अडसड, ॲड. आकाश फुंडकर, श्री.कृष्णा गजबे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | (SCADA) तरतूद असणे परंतु संबंधित कंत्राटदाराने बांधकाम विभागासोबत संगनमत करून त्याकडे दुर्लक्ष केले असणे, संबंधित कामाला लागणारे डांबर हे शासकीय रिफायनरी ते प्लांट चे ई वे बिल व टॅक्स इन्व्हाईस खात्याने तपासलेले नसणे व त्याची खातर जमा चुकीच्या पद्धतीने केलेली असण्याची शक्यता असणे, संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी त्यांचे अधिनस्त उप अभियंता यांना प्लान चालू असताना प्लांटवर पाठवणे आवश्यक असणे परंतु संगनमत असल्यामुळे ही प्रक्रिया सुद्धा केली गेली नाही, यामुळे संबंधित कामांमध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता असणे, कामाचा दर्जा सुद्धा राखला गेला नसणे, तसेच या अधिकाऱ्यांनी यापूर्वी झालेल्या कामांमध्ये सुद्धा अशाच पद्धतीने कंत्राटदारांशी संगनमत करून शासनाची फसवणूक केली असण्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१०८) | "शिंगवे केशव (ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) येथील शेतकऱ्यांनी शेतीसाठी पाणी पुरवठा होण्याकरीता सामुहिकरित्या पुर्ण केलेली सुमारे १२ कि.मी. लांबीची पी.व्ही.सी पाईपलाईन, यासाठी त्यांचा सुमारे अडीच कोटी रुपयांचा खर्च, ही रक्कम त्यांनी कर्जाऊ घेतलेली असणे, काम पुर्ण होऊन झालेला दोन वर्षाचा कालावधी, परंतू क्रिती इंडस्ट्रीज इंडिया लि., पीथमपुर, मध्य प्रदेश या पी.व्ही.सी. पाईप पुरविलेल्या कंपनीकडून झालेला सदोष मालाचा पुरवठा, सदोष पाईप असल्यामुळे ते सातत्याने फुटत असून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पुरवठा होत नसल्याने त्यांचे शेती उत्पन्न बंद होणे, परंतु कर्जाचा बोजा वाढत असल्याने त्यांचेवर आलेले आर्थिक संकट, शेतकऱ्यांच्या तक्रारींना कंपनीकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे, कंपनीने केलेल्या फसवणुकीमुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. प्राजक्त तनपूरे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१०९) | "सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदार संघात मातोश्री ग्राम समृद्धी शेत/पाणंद रस्ते या योजनेअंतर्गत अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या दोन तालुक्यात एकूण ९५ कामे मंजूर असणे, सद्यःस्थितीत काही कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त असल्याचे दिसून येणे, सदर विषयाचा विस्तृत आढावा घेतलेला असणे, त्यातील बहुतांशी १.००० कि.मी. लांबीचे कामाचे अंदाजपत्रक हे प्रचलित दरसूची व १८ टक्के जी. एस. टी चा समावेशानंतर मान्य प्रति कि.मी. रु.२३.४८ लक्ष पेक्षा जास्त होत असल्याचे निदर्शनास येणे, दिनांक २५/११/२०२२ च्या शासन निर्णयानुसार रु.२५.०० लाखाच्या वरील रक्कमेचे अंदाजपत्रकास | श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | स्थानिक स्तरावर तांत्रिक मान्यतेनंतर पुढील कार्यवाहीसाठी नियोजन विभागाकडील रोहयो शाखेकडे सादर करण्याच्या सूचना असणे, नियोजन विभाग रोहयो शाखेकडे सादर केल्यानंतर अंदाजपत्रके वरील नमूद दिनांक २५/११/२०२२ च्या शासन निर्णयाद्वारे गठीत तज्ञ शासकीय अभियंत्यांच्या छाननी समितीकडे पाठविणे गरजेचे असल्याचे नमूद असणे, वास्तविक मंजूर कामे चालू आर्थिक वर्षात दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत कामे पूर्ण करणे क्रमप्राप्त असणे, परंतु शिल्लक अवधी पाहता सदर प्रक्रिया पूर्ण होऊन काम सुरू होणे अशक्य असणे, त्यामुळे सदर कामांना मुदत वाढ व त्यापुढे तांत्रिक मान्यतेसाठी रु.२५.०० लाखाच्या प्रस्तावास शासनाकडे सादर करण्याऐवजी मंजुरीचे वित्तीय अधिकार जिल्हास्तरावर प्रदान करण्याचे आदेश होणे जेणे करून योजनेची अंमलबजावणी गतीने करण्याचे सोयीचे होईल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (११०) | "महाराष्ट्र दारुबंदी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी तसेच दोषसिध्दीचे प्रमाणामध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडून कार्यवाही होत आलेली असणे, परंतु महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचा विचार करता दरवर्षी महाराष्ट्रामध्ये सरासरी १ लक्ष गुन्हे दाखल होत असून फक्त नागपूर परिक्षेत्राचा विचार करता सरासरी २४,००० गुन्हे दाखल होत असून या कायद्यामध्ये दोषसिद्धीचे प्रमाण लक्षात घेता १ % पेक्षा कमी असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली दाखल झालेल्या प्रत्येक सौम्य / गंभीर गुन्हयामध्ये एफ.आय.आर., पंचनामा, मुद्देमाल जप्ती, FSL रिपोर्ट प्राप्त करणे व गुन्हयांचे सविस्तर तपास करुन न्यायालयामध्ये दोषारोप घटनास्थळ पत्र सादर करावे लागत असणे, त्याचबरोबर न्यायालयाकडुन प्रत्येक गुन्हयाचा निपटारा करण्यात येत असणे, गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास करण्याकरिता काही दिवस ते काही महिन्याचा कालावधी लागत असणे, न्यायालयामध्ये सदर गुन्हयाची केस चालविण्यासाठी काही महिन्याचा कालावधी लागत असणे, त्याचबरोबर केसची न्यायालयीन सुनावणी होऊन निकाल लागेपावेतो काही महिन्याचा कालावधी लागणे, यासंपुर्ण प्रकियेदरम्यान जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये जमा असणे, या प्रकियाकरिता बराच कालावधी जात असुन सुध्दा विविध कारणास्तव गुन्हे शाबीतीचे प्रमाण ०.५ % याप्रमाणे अल्प असणे, यावरुन प्रचलीत कार्यपध्दतीद्वारे करण्यात येणारी कार्यवाही प्रभावी ठरत नसल्याचे दिसुन येत असणे, या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यामध्ये अपराध हे कोणतीही | श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. | दिनांक<br>२४ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | जोखीम न पत्करता उच्च लाभ मिळविण्याचे झालेले असल्याने अडचणी निर्माण होत असणे, त्याचप्रमाणे मोठ्या संख्येमध्ये दाखल होणाऱ्या दारुबंदी गुन्हयामुळे गंभीर गुन्हयाचा तपासाच्या व अभियोग चालविण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होत असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायदा हा एक सामाजिक कायदा असुन जेव्हा संघटीत गुन्हेगारी टोळया करुन मोठ्या प्रमाणात दारुची निर्मिती, विक्री, वाहतुक व तस्करी संघटीतरित्या केली जाते, तेव्हा त्यांचेविरुध्द कटोरपणे कार्यवाही करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर अशा गुन्हयाचे गांभिर्यपुर्वक व गुणात्मक तपास करुन गुन्हेगारांना कडक शिक्षा होणे आवश्यक असणे, तथा लहान गुन्हयाकरीता एफ.आय.आर. दाखल करणे, तपास करणे, दोषारोपपत्र न्यायालयात पाठविणे व खटला चालविणे याकरिता लागणारे मनुष्यबळ कमी करुन गुन्हे शाबीतीचे प्रमाण कमीतकमी ६० % ते ८० % नी वाढविणे, शिक्षेच्या सुनिश्चीतीची खात्री करणे, लोकांना दारूबंदी कायद्याचे तरतुदीचे उल्लंघन करण्यापासून थांबविण्यासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक असणे, दारुबंदी कायदयाखालील अपराध हे केवळ कमी जोखीमेचे व उच्च लाभ मिळविण्याकरीता न राहता कोणतेही जोखिम न पत्करता फक्त लाभ मिळविण्याचे झालेले असणे, ज्यामुळे, गुन्हेगारांमध्ये शिक्षा होण्याचा धाक नाहीसा झाल्याने दिवसेंदिवस त्यांचे धाडस वाढत असणे, त्यामुळेच, दारूबंदी कायद्यामधील तरतूदींचे योग्य आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षेच्या सुनिश्चीततेची खात्री करणे आणि या कायद्याचे तरतूदींमध्ये सुधारणा करणे सद्यःस्थितीचा विचार करता अधिक महत्वाचे झालेले असणे, दारुबंदी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून दारूबंदी कायद्याखाली दाखल गुन्ह्यांत अभियोगांच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणणे, गंभीर / गुणात्मक आणि किरकोळ / लहान प्रकरणामध्ये भेद करणे तसेच किरकोळ / लहान प्रकरणाकरिता अभियोगाची क्रियारिती सुकर करणे, उपलब्ध माहितीचे आधारावर विश्लेषण करून पोलीस , अभियोजन पक्ष व न्यायालय या संस्थेवरील कामाचा भार कमी करणे या आणि इतर सुधारणा करणे गरजेचे असणे, तसेच सामाजिक दृष्ट्या विचार करता राज्यातील प्रत्येक गावातील अनेक कुटूंबात दारूचे वाढते प्रमाण व गैर प्रसार यामुळे उध्वस्त झाली असून गावातील महिलांचा दारू बंदी व दारूच्या वाढत्या प्रसाराला नेहमी विरोध राहीला असणे, यादृष्टीने शासनाने तातडीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा-१९४९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१११) | "लातूर पासून नांदेड पर्यंतच्या क्षेत्रातील स्थानिक जनतेच्या सुविधेसाठी लातुर ते नांदेड पर्यंत ब्रॉडगेज विद्युतीकरणासह नविन रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर व्यवहार्यता अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी राज्य शासनास सादर केलेला असणे, मात्र सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या सहमतीची आवश्यकता असणे, या करिता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या व्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे सहमती करिता सादर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे मात्र असे असूनही राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे सहमतीसाठीचा प्रस्ताव पाठविण्याकरिता होणारी टाळाटाळ व दिरंगाई, यामुळे जनतेची होणारी हेळसांड आणि गैरसोय, परिणामतः स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाकडून करण्यात यावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | सर्वश्री. अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, प्रा.वर्षा गायकवाड, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (११२) | "मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक १ मे, २०२२ रोजी मुंबईत सर्वांसाठी पाणी या धोरणाची घोषणा करण्यात येणे, मुंबईकरांना २४ तास पाणी देण्याचे स्वप्न महानगरपालिका दाखवित असतानाच आजही सुमारे १३ ते १४ लाख नागरिक कायदेशीर पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव उघड होणे, मुंबईतील नागरिकांना अनौपचारिक पाणी मिळविण्यासाठी महिन्याला हजारो रुपये खर्च करावे लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, आपण जे शुद्ध पाणी वापरतो ते आपला मळ–कचरा घेऊन सरळ निघून समुद्रात सोडले जात असणे, या वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून या पाण्याचा पुर्नवापर करणे ही संकल्पना केवळ कागदावरच राहिली असणे, काही खाजगी संस्थांनी हा प्रयोग करून पुर्नवापरासाठी पाणी दिले असले तरी महानगरपालिकेकडे व्यवस्था नसल्याचे कोरडे उत्तर महापालिका प्रशासनाकडून दिले जात असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, पाणी वितरण व्यवस्थेत दररोज ३० टक्के बेहिशेबी पाणी वाया जात असून हे पाणी हॉटेल, निवासी आणि खाजगी क्रीडा संकुलांना अवैध जोडण्या देऊन वितरीत केले जात असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईच्या भौगोलिक हद्दीत केवळ ३ टक्के पाणी स्त्रोत असून मुंबईला ९७ टक्के पाणी मुंबई बाहेरून आणावे लागत असणे, मुंबईतील पाण्याचे स्त्रोत विकासाच्या नावाखाली नष्ट झाल्या असून हे स्त्रोत बुजवून जमीन विकसित करताना, काँक्रिटीकरण करताना भूगर्भातील पाण्याचे | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | स्त्रोत नाहीसे झाले असणे, मुंबईतील पाणी चोरी रोखण्यासाठी नियमित वॉटर ऑडीट करण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे मुंबईतील पाणी समस्या लक्षात घेता मुंबईतील पाण्याचे संवर्धन करण्यासाठी मुंबईतील दहिसर, पोयसर आणि ओशिवरा या नद्यांसह, नैसर्गिक पाण्याचे स्त्रोतांचे पुनरुजीवन करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (११३) | “बृहन्मुंबई मनपाचे एस वॉर्ड मध्ये अनधिकृत बांधकामात प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, याबाबत एस वॉर्डचे सहाय्यक आयुक्त यांना लोकप्रतिनिधींमार्फत तक्रार करुनही त्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, किंबहुना सदर अनधिकृत बांधकामांना वाढीस वाव मिळेल अशा पध्दतीने सहाय्यक आयुक्तांचा कारभार सुरुच असणे, सहाय्यक आयुक्त, एस वॉर्ड यांच्या मनमानी कामकाजाबाबत, बेजबाबदार वर्तनाबाबत तसेच अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्याच्या गैरकृत्याबाबत नागरिकांनी वरिष्ठांना दिलेली निवेदने, तरीही सहाय्यक आयुक्त, एस वॉर्ड यांच्याविरुध्द तक्रारींची वरिष्ठांकडून दखल न घेणे, पर्यायाने नागरिकांना अन्यायाविरुध्द दाद मागण्यास कोणताही पर्याय नसणे, सहाय्यक आयुक्तांचा अरेरावीपणा, मनमानी कारभार, बेकायदेशीर कामकाज याबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, सदरहू अनधिकृत बांधकामांची सखोल चौकशी सनदी अधिकाऱ्यामार्फत करण्याची नितांत आवश्यकता, तसेच दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करुन, उपरोक्तबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना.” | श्री. समाधान अवताडे, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (११४) | “भांडूप (प) विधानसभा क्षेत्रातील ईस्टन सबर्ब डीपी शीट क्रमांक ४५ मधील सी.टी एस क्र. १ ( ई.पी क्र. ईपी –एस १२९ ) या क्षेत्राला एनडी झोन मधून वगळून विशेष विकास क्षेत्र म्हणून २०३४ च्या विकास आराखडयात दर्शवून ईपीएस-१२९ नुसार प्रस्तावित करण्यात येणे, या क्षेत्रामध्ये गेल्या ५० ते ६० वर्षापासून गोरगरिब व मोलमजुरी करुन उदरनिर्वाह करणारे नागरिक वास्तव्यास असणे, या नागरिकांना महाराष्ट्र विद्युत वितरणामार्फत विद्युत पुरवठा, जलजोडणी महानगरपालिकेकडून देण्यात येणे, त्याचबरोबर मतदार यादीत या नागरिकांची नांवे असून वर्षानुवर्षे मतदानाचा हक्क बजावित असणे, या क्षेत्राचा विकास व्हावा याकरिता लोकप्रतिनिधिंनी सातत्याने पाठपुरावा करुन तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शासनाकडे पत्रव्यवहार, पाठपुरावा करुनही अदयाप कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, सदरहू नागरिक आपल्या मुलभूत | श्री. रमेश कोरगांवकर, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | सोयी-सुविधांपासून वंचित असणे,सदर जागेवर नागरिकांच्या सुविधांकरिता शाळा, हॉस्पिटल, उद्यान इत्यादि प्रकल्प शासनातर्फे राबविण्याची गरज, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सदर भूखंडावर विकास आराखडा २०३४ मध्ये दर्शविण्यात आलेले ईपी-एस-१२९ वगळण्याबाबत योग्य ते आदेश होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | | |
| (११५) | "पनवेल (ता.पनवेल) येथील अतिशय महत्त्वाचे मानले जाणारे राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला मंजूरी मिळून बराच कालावधी होवूनसुद्धा अद्यापपर्यंत नुतनीकरणाच्या कामाला सुरूवात झाली नसल्याचे माहे मार्च, २०२३ रोजी निदर्शनास येणे, अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या या बस आगारात अनेक प्राथमिक पायाभूत सुविधांअभावी बस चालक, प्रवासी तसेच नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे, कोविड १९ च्या पूर्वी तसेच कोविड १९ च्या काळात जवळपास दोन वर्षे बस आगाराच्या नुतनीकरणाचे काम ठप्प झालेले असणे, सद्यःस्थितीत सर्वच व्यवहार व विकासकामे सुरू झाली असणे परंतु मंजूरी मिळालेल्या पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला सुरूवात झाली नसणे, सदर बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनसुद्धा संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळेच बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला विलंब होत असणे, त्यामुळे बस आगारातील अनेक गैरसोयींमुळे नागरिक व प्रवाशांमध्ये पसरलेल्या चिडीच्या व असंतोषाच्या भावना, शासनाने तातडीने लक्ष घालून पनवेल बस आगाराचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (११६) | "महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीला पौराणिक इतिहास असणे, आदिवासी संस्कृतीचे जतन करण्यासाठी व समाजातील युवकांना आदिवासींची अस्मिता, परंपरा व रितीरिवाज माहित व्हावेत याकरिता संग्राहलयाची आवश्यकता असणे, आदिवासींचे जीवन व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या मौल्यवान व दुर्मिळ वस्तू, आदिवासींचे दागदागिने, देवीदेवता, मुखवटे, शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू व पारंपारिक पोशाख यांचे संवर्धन करण्याकरिता संग्रहालयाची आवश्कता असणे, केंद्र शासनाने संग्रहालयाच्या उभारणी करिता दोन टप्प्यात सुमारे २१ कोटी रुपये मंजुर असणे, तथापी जागेअभावी संग्रहालयाचे काम रखडले असल्याचे | श्री. भिमराव केराम, वि.स.स. | दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | निदर्शनास येणे, मिळालेल्या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्याजागेला सुरक्षा भिंत बांधण्याची आवश्यकता, आदिवासींना संग्रहालयापासून वंचित ठेवण्यात आल्याने समस्त आदिवासींमध्ये पसरलेला तिव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (११७) | "महाराष्ट्राचे दैवत असलेल्या खंडोबा व ज्योतिबा आणि इतर देवस्थाने हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थाने असणे, या देवतांची पूजा ही भंडाराची आणि गुलालाची उधळण करत करणे, याकरिता पिवळया व लाल रंगाच्या घातक केमिकलचा वापर भंडारा व गुलालामध्ये करण्यात येणे, या भंडाऱ्यांची विक्री ही देवस्थानाच्या बाहेर करण्यात येत असून सदरचा भंडारा हा हळद समजून भंडाऱ्यांचा वापर पूजेला व अंगावर लावण्यासाठी करण्यात येणे, परंतु सदरचा भंडारा हा शरीरासाठी अपायकारक असून लाकडाच्या भुश्यामध्ये अत्यंत घातक अशी रसायने त्यामध्ये मिसळून पिवळा व लाल रंग आणण्यात येणे, सदरची रसायने ही कॅन्सरला आणि श्वसनाच्या रोगाला उद्युग्त करणारी असून यावरती तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, भंडाऱ्याच्या जागेवर शेतकऱ्यांनी पिकविलेली खरी हळद वापरली तर हळदीच्या गुणधर्मानुसार सदर भक्तांच्या शरीरावर चांगला परिणाम होईल आणि शेतकऱ्यांच्या हळदीला एक चांगली बाजारपेठ मिळून शेतकऱ्यांना याचा फायदा होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेश शिंदे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (११८) | "मुंबईतील विभागांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात नाल्याचे रुंदीकरण व डी.पी.रोड रुंदीकरणामध्ये अनेक झोपडपट्टीधारक बाधीत झालेले असणे, सदर झोपड्या या सन २०११ च्या झोपडपट्टी नियमात (सशुल्क) पात्र असणे, सदर नियम २०११ च्या झोपडपट्टी धारकांना (एस.आर.ए.) लागू होत असणे, परंतू सदर प्रकल्पबाधीत सशुल्क पात्र झोपडीधारकांना त्यांची अनामत रक्कम किती याबाबत माहिती देण्यात आलेली नसणे, पंतप्रधान आवास योजनेतून किती रक्कम मिळणार, महाराष्ट्र शासनाकडून किती रक्कम देण्यात येणार व झोपडीधारकांकडून किती रक्कम अनामत घेण्यात येणार याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतलेला नसल्यामुळे उक्त बाधीत झोपडीधारक अद्यापही संभ्रमात असणे, मालाड येथील पोयसर नदी व डी.पी. रोड रुंदीकरणबाधीत झोपधीधारक हे पात्र असतांनीही केवळ शासनाने सशुल्क पात्रतेसाठीचे शुल्क निश्चित केले नसल्यामुळे सदर झोपडीधारक हक्काच्या घरपासून वंचित असणे, शासनाने यासंदर्भात तात्काळ निर्णय घेऊन मालाड येथील उक्त झोपडीधारकांना हक्काचे घरे देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (११९) | “अचलपूर जिल्हा अमरावती येथील फिनले मिल कोविड १९ चे कारण देऊन सन २०२० पासून बंद असणे, मिल मधील कामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली असणे, राष्ट्रीय मिल मजदूर संघ व स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी वारंवार केंद्र व राज्य शासनास फिनले मिल सुरु करणे बाबत निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही हालचाल न होणे, फिनले मिलचे कामगार याबाबत वारंवार आक्रमक होत आंदोलन करीत असून कामगारांमध्ये मिल सुरू होत नसल्याने निर्माण झालेला प्रचंड असंतोष, मिल कामगारांच्या कुटुंबियांची मोठया प्रमाणात होत असलेली परवड, राज्य शासनाने याप्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून मिल तातडीने सुरू व्हावी यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता, मागील अधिवेशनात फिनले मिल, अचलपूर सुरु करणे बाबत शासनाद्वारे आश्वासन मिळणे, आश्वासनावर शासनाद्वारे आजपर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे फिनले मिल कामगारांत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. बच्चू कडू, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१२०) | “राज्यभरात सार्वजनिक व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या रुग्णालयांत रुग्ण मृत झाल्यानंतर त्याला घरी अथवा स्मशानात नेण्याकरीता शववाहिनीचा वापर केला जाणे, परंतु राज्यभरात शववाहिन्यांचा प्रचंड तुटवडा भासत असणे, रुग्ण मृत झाल्यावर त्याचे नातेवाईक शववाहिन्या मिळत नसल्याने ॲम्ब्युलेन्स अथवा प्रायव्हेट गाडीने शव घेऊन जात असणे, परंतु यामुळे अनेकदा ट्राफिक पोलीस या ॲम्ब्युलेन्सला अथवा प्रायव्हेट गाड्यांना अडवून दंड वसुल करीत असणे, ॲम्ब्युलेन्सने शव वहन करण्यास परवानगी नसल्याने नातेवाईकांना अतिरिक्त भुर्दंड भरावे लागणे, राज्यभरात शववाहिन्यांची संख्या कमी असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असणे, शासनाने उक्त प्रकरणी तात्काळ निर्णय घेऊन ॲम्ब्युलेन्सद्वारे शव वहन करण्याकरीता परवानगी देण्याची आवश्यकता, यावर शासनाने घ्यावयाचा निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | डॉ. राहूल आहेर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१२१) | “भिवंडी शहरातील स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात ॲडमिट केलेल्या ९ महिन्यांच्या गर्भवती सविता दिनेश यादव यांचा रुग्णालयातील डॉक्टरांच्या व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी मृत्यू होणे, दिनांक १७ नोव्हेंबर रोजी नैसर्गिक बाळंतपणाची वाट न बघता चुकीच्या पद्धतीने सिजर केल्यामुळे व बाळंतपणानंतर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी आई व | श्री. रईस शेख, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | बाळाची नर्सिंग केअर नीट न घेतल्यामुळे मृत्यू ओढावणे, ९९% रुग्णाची तब्येत खराब झाल्यानंतर त्यांना कळवा हॉस्पिटलला रेफर करण्यात येणे, कळवा रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णाची पूर्ण तपासणी केल्यानंतर बाळंतपणानंतरच्या देखभाल करण्यात दिरंगाई केल्याने मृत्यू झाल्याचा उल्लेख असणे, स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे असे प्रकार वारंवार घडत असणे, तसेच मागे एकदा रुग्णालयातील प्रसूती विभागातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून गर्भवती महिलेला रुग्णालयात भरती न केल्याने गर्भवती महिलेला इतरांनी सहाय्य केल्यामुळे रात्री ११ वाजता रुग्णालय आवारात प्रसूती होणे, माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेनंतर बाळंतीन आईची स्थिती गंभीर झाल्यावर तिला मुंबई येथील रुग्णालयात दाखल करावे लागणे, सदर प्रकरणी महिलेचे पती श्री. अफसर शेख यांनी रुग्णालयातील कर्मचारी व डॉक्टर यांच्या हलगर्जीपणाविरुद्ध शांतीनगर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करणे, स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय परिसरातील रुग्णांच्या सेवेकरिता अपुरे असल्याने इमारतीचे विस्तारीकरण नूतनीकरण व दुरुस्ती इत्यादी कामे करण्याचा रु.२२.९५ कोटी रुपयेचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असणे, इमारतीचे दरवाजे खिडक्या बदलणे इमारतीच्या तळमजल्याची दुरुस्ती करणे पिण्याच्या पाण्याची व सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे, इमारतीच्या परिसरात पेवर ब्लॉक बसविणे, कंपाउंड वॉल तयार करणे, इमारतीचा दर्शनी भाग तसेच इमारतीच्या आवारातील रस्ते व संरक्षण भिंत तयार करणे इ. स्थापत्य कामांकरिता रु.१२.२६ कोटी रुपयांची तरतूद असणे व इमारतीतील विद्युत कामांकरिता रु.१०.५९ कोटी रुपयांची तरतूद झालेली असणे, कामे करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या सुचविलेला इमारत नकाशा वास्तुशास्त्रज्ञ महाराष्ट्र शासन मुंबई यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ च्या पत्रान्वये मंजूर केला असून रुग्णालयाच्या दुरावस्थेसह नागरिकांना उत्तम सेवा सुविधा मिळण्याकरिता शासन स्तरावर करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१२२) | "अमरावती शहर "ड" वर्ग महानगरपालिका असुन आजची लोकसंख्या ८ लक्ष असून सन १९८३ पासुन अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मजीप्रा मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अमरावती शहरापासुन ५५ कि.मी. दुर असलेल्या अप्पर वर्धा धरण, मोर्शी येथुन शहराकरीता पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अस्तित्वातील योजना सन १९८६ मध्ये मंजुर झाली असुन १९९४ ला कार्यान्वीत करण्यात येणे, अमृत | श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | १.० मध्ये केवळ शहरांतर्गत वितरण व्यवस्था, जलशुद्धिकरण केंद्र व उंच साठवण टाक्या अस्तित्वातील १५६ दशलक्ष प्रवाह क्षमतेची जलवाहिनी विचारात घेवुन प्रस्तावित करण्यात येणे, यामुळे योजनेतील ३१ कि.मी. लांब PSC गुरुत्ववाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्यमान सन २०२४ मध्ये संपत असून ही पाईपलाईन कमकुवत झाल्यामुळे वारंवार फुटत असून व दुरुस्तीकरीता शहराचा पाणी पुरवठा ३-४ दिवस खंडित राहत असल्याने ही योजना अमृत २.०० योजनेतून करण्यासाठी मागील ३ वर्षापासून वारंवार मागणी करुनही व जिल्हा स्तरावर याबाबतचा प्रस्ताव दोन वेळेला राज्य शासनाकडे पाठवुनही या प्रस्तावाला मान्यता देण्यात न येणे, जुनी जिर्ण झालेले आयुष्यमान संपुष्टात आलेली सिमेंटची गुरुत्वाहिनह बदलविणे अत्यावशक असून त्या सोबतच अतिरीक्त उध्ववाहिनी क्षमता वाढविण्याकरीता अंथरणे आवश्यकता असतांना या योजनेला अमृत २.०० या मधुन मान्यता मिळत नसल्यामुळे ही योजना पुर्ण करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे अमरावती शहराला पाणी पुरवठया पासून वंचित राहण्याची निर्माण झालेली भिती, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून अमरावती शहरासाठी नियोजित पाणी पुरवठा योजनेला अमृत २ अंतर्गत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन सदर योजना तातडीने पुर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१२३) | "जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय बुलडाणा येथे एन.एल. हेल्थ केअर सोलापुर या संस्थेला सन २०२२-२३ मॉडेयुलंर ओटी व लेबर रुमचा २३ कोटी रुपयांचा पुरवठा आदेश देण्यात आलेला असणे, जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी कुठल्याही प्रकारे निवीदेद्वारे खरेदी न करता ८०% आगाऊ रकम देणे, कंत्राटदार सोबत संगनमत करुन शासनाची करोडो रुपयांची केलेली तफावत, निकृष्ट साहित्य देणे, खोटे बिल सादर करणे, कोवीड काळात निष्काळजीपणा करणे, ही बाब लक्षात घेता दिनांक २६/२/२०२३ ला कंत्राटदार यांना सक्तीची नोटीस बजावणे, कंत्राटदार व जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी मोठ्या प्रमाणामध्ये बिले काढणे, पुन्हा या वर्षाचा सन २०२३ चा कंत्राट त्यांनाच देणे, याबाबत तातडीने मागील वर्षाची चौकशी करून या वर्षाचा कार्यरंभ आदेश रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. संजय गायकवाड, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| (१२४) | “नाशिक जिल्हयातील सिन्नर नगरपरिषदेतर्फे शहरात करण्यात आलेल्या विविध विकास कामांमध्ये निकृष्ट दर्जाची कामे करणे, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष कामे न करताच कागदोपत्री पूर्ण केल्याचे दाखविणे, तर काही कामे पूर्ण होण्याआधीच ठेकेदाराला आगाऊ निधी अदा करुन नगरपालिका मुख्याधिकारी श्री.केदार व सबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी शासकीय निधी हडप करुन भ्रष्टाचार केल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, पाणी पुरवठा योजनेच्या देखभालीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक अवास्तव प्रमाणात ७२ लाख रुपये खर्च मंजुर करणे, नगरपरिषद हद्दीत सुर्वोदय संकुलाचे इमारतीस पार्किंगची व्यवस्था न करता आर्थिक संगनमत करुन बांधकाम करण्यास परवानगी देणे व पूर्णत्वाचा दाखल घेणे, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जमीन खरेदीत मर्जीतल्या लोकांनी सन २०१७ मध्ये ८७ लाख ५० हजार रुपयाला घेतलेली जमीन याच लोकांकडून अवघ्या दोन महिन्यात १ कोटी ८४ लाख ९२ हजार किंमतीला नगरपालिकेला विक्री करुन ९७ लाख ४२ हजार रुपये निधीचा अपहार करणे, शहरातील सरस्वती नदीपात्राचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकारी यांनी मंजुर केलेल्या १.७५ लाख रुपये इतका निधी कोणतेही काम न करता ठेकेदारास देयक अदा करणे, सौंदर्यीकरण कामाऐवजी नदीपात्रात अतिक्रमण करुन नदीचे पात्र छोटे केल्याचा प्रकार घडणे, दयानंद बारादरी मठ दशक्रिया विधीच्या जागेवर शेडचे काम न करताच मंजुर केलेला ४८ लाख रुपये निधी हडप करणे, घनकचरा उचलण्यासाठी पालिकेने खरेदी केलेल्या टाटाच्या ४०७ गाडयांचा वापर न करता ५० हजार रुपये दरमहा भाडयाने ट्रॅक्टरने कचरा उचलण्यात येऊन याद्वारे शसकीय निधी हडप करुन भ्रष्टाचार करणे, शहर हद्दीतील स्ट्रिट लाईटचे काम निकृष्ट दर्जाचे मटेरिअल वापरल्यामुळे वारंवार लाईट खराब होणे, धनलक्ष्मी पतसंस्थेजवळच १८ लाख रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेला रस्ता पूर्णपणे निकामी झाला असून त्याची क्वॉलिटी कंट्रोल कडून ऑडिट करण्याची होत असलेली मागणी, सदरहू भ्रष्टाचार प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांना दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी लेखी तक्रार देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, महिला कर्मचाऱ्यांशी अत्यंत उध्दटपणे वागणे, विचारलेल्या प्रश्नांची चुकीची उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभुल करणे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन नगरपरिषदेच्या सबंधित दोषी अधिकारी यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१२५) | "राज्याच्या २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी सुमारे २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, तरी वर्षभरात एकूण तरतुदीच्या ५० टक्केही खर्च झालेला नसल्याची धक्कादायक बाब दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध शैक्षणिक योजनांवरील खर्चातही घट झाल्याचे समोर येणे, राज्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक यांच्यासाठी आर्थिक व शैक्षणिक उन्नतीच्या २३० योजना राबविल्या जात असणे, त्यात १५४ राज्य शासन अर्थसहाय्याचे व ७६ केंद्रीय अर्थसहाय्याच्या योजना असणे, राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर या योजना राबविल्या जात असणे, २०२०-२१ मध्ये अनुसूचित जातींसाठी ९ हजार ६६८ कोटी रुपये तरतूद करण्यात येणे, त्या वर्षात खर्च ६ हजार ४६१ कोटी ८४ लाख रुपये झालेला असणे, २०२१-२२ मध्ये तरतूद १० हजार ६३५ कोटी, खर्च ८ हजार ८२८ कोटी ४९ लाख करण्यात येणे, २०२२-२३ मध्ये (चालू अर्थलंकल्प) १२ हजार २३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, परंतु १५ फेब्रुवारीपर्यंत ४ हजार ५८१ कोटी रुपये खर्च झाला असणे, म्हणजे ५० टक्क्याहून कमी खर्च झाला असल्याचे उघडकिस येणे, अनुसूचित जातींसाठी विविध शैक्षणिक योजना राबविल्या जात असणे, त्यापैकी देशांतर्गत व परदेशातील विद्यापीठांमधून उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती या नावाने दिली जात असणे,२०२१-२२ मध्ये देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी १४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे त्यावर ३ कोटी रुपये खर्च करण्यात येणे. २०२२-२३ मध्ये मात्र लाभार्थी विद्यार्थी संख्येत घट झाली असून या वर्षात ७० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे, त्यावर ९८ लाख रुपये खर्च करण्यात येणे, परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठी २०२१-२२ मध्ये २१० विद्याथ्र्यांच्या शिष्यवृत्तीवर ५३ कोटी रुपये खर्च करण्यात आला असल्याचे उघडकीस येणे, त्यामुळे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना व विद्यार्थ्यांना विकासापासून रोखण्याचा केला जात असलेला जाणीवपूर्वक प्रयत्न, अनुसूचित जाती व जमातीच्या वर्गामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व असुरक्षितेचे भावना,याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री.लहू कानडे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१२६) | "महाराष्ट्र राज्याची सध्याची लोकसंख्या ही अंदाजे ११ कोटीच्या जवळपास असणे, राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी २.५ कोटी कुटुंब हे रेशनकार्ड धारक असणे, एकूण रेशनकार्ड धारकांपैकी १.७१ कोटी | कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. पराग अळवणी, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. | दिनांक २५ मार्च, |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | केशरी कार्ड धारक व ६२.६० लाख कुटुंब हे पिवळे रेशनकार्ड धारक असणे, यामधील अंदाजे ६५.३४ लाख कुटुंब हे केंद्र व राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत धान्य घेत असणे, केंद्र व राज्य सरकारकडून वेळोवेळी स्थानिक रेशन कार्यालयामार्फत आवश्यक रेशन सामुग्री (धान्य) उपलब्ध होत असणे, परंतु काही रेशन दुकानदार हे फक्त ६०% नागरिकांना रेशन समुग्रीचे वाटप करीत असून उर्वरित ४०% नागरिक हे पात्र असून त्यांना रेशन मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, बहुतांश वेळा मशीनच्या तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांचे अंगठ्याचे ठसे स्वीकारले न गेल्यामुळे त्यांना रेशन मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, सदर बाबतीत नागरिकांची काहीएक चूक नसताना देखील निव्वळ तांत्रिक कारणांमुळे त्यांना रेशन पासून वंचित रहावे लागत असणे, रेशन वाटपाच्या धोरणानुसार एकाद्या रेशनकार्ड धारकाने काही कारणास्तव सलग ३ महिने रेशन न घेतल्यास त्यांचे रेशन मिळणे बंद होत असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात सरकार विषयी निर्माण होणारी अविश्वासची भावना, रेशन वाटपाबाबतच्या सरकारच्या सदरच्या धोरणात बदल करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | अमित साटम, समाधान अवताडे, वि.स.स. | २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१२७) | "धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असणे, राज्य उत्पादन विभागांनी या दारू विक्रीकडे दुर्लक्ष करणे, यामुळे अवैध दारू विक्रीचे पेव फुटणे, या अवैध दारूमध्ये काही गुन्हे गोवा बनावटीची तसेच स्थानिक डुप्लिकेट दारू विक्रीस उपलब्ध असणे, यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणे, तसेच शासनाचा महसूलही बुडत असणे, जिल्ह्यात चौका चौकात अवैध दारू विक्री सुरु असणे, ड्रायडेच्या दिवशी बरेच नागरिक अवैधपणे दारू विकत असणे, या अवैध दारू विक्रीमध्ये बनावट तसेच गोवा बनावटीची दारू विक्रीसाठी उपलब्ध होत असणे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे यासर्व प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, पोलीस विभागाने याबाबत धडक मोहीम करत गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून अवैध दारू विक्री बंद करणे, पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात मर्यादा असल्यामुळे या अवैध दारु विक्रीला आळा घालण्याचे काम राज्य उत्पादन शुल्काचे असणे, परंतू राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अवैध दारू विक्रेत्यांकडून हफ्ते वसुली करण्यात येत असल्याचे उघडकीस येणे, तसेच काही ठिकाणी खाजगी व्यक्तींची अवैध दारु विक्रेत्यांकडून हप्ते वसुलीसाठी नियुक्ती करण्यात येणे, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी मुख्यालयी न राहता | श्री. कैलास पाटील, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अन्य ठिकाणी वास्तव्यास असणे, यामुळे कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्यामुळे दिवसेंदिवस अवैध दारू विक्रेते निर्माण होणे, जिल्ह्यात नवीन ७५ परमिट रूम व बिअर शॉपी वितरित करणे, यामध्ये जवळपास पाच कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येणे, याबाबत जिल्ह्यातील नागरिकाकडे ऑडिओ क्लिप उपलब्ध असणे, यामुळे राज्य उत्पादन विभागाची प्रतिमा मलिन होणे, या भ्रष्टचार प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरीकांकडून होत असणे, शासनाने उक्त सर्व प्रकरणी तात्काळ चौकशी करुन धाराशिव जिल्ह्यातील अवैध दारु विक्रीला आळा घाण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने व उपाययोजना.'' | | |
| (१२८) | "मौजे जिंती (ता. फलटण, जि.सातारा) येथील रयत शिक्षण संस्थेने जिंती येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची २ एकर जमिन सदर विद्यालयास जागेची अडचण असल्याने शाळेची इमारत व क्रिडांगणासाठी दिनांक १२ फेब्रुवारी, १९९० रोजी १६ हजार रुपयांत विकत घेतलेली असणे, कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 18/02/1191 रोजी जिंती येथील जमिन शिक्षण संस्थेला देण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली असणे, मा.खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी या प्रस्तावास स्थगिती आदेश दिला असतांना रयत शिक्षण संस्थेला ही जमिन देण्यात आलेली नसणे, परंतु आता मा.खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी स्थगिती आदेश उठविल्यामुळे मंडळ अधिकारी व तालुका फलटण यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी तहसिलदार, फलटण यांना २ एकर जागेचा ताबा रयत शिक्षण संस्थेस देण्याचे दिलेले निदेश, परंतु प्रांत अधिकारी, फलटण यांनी सदरची जागा शिक्षण संस्थेस देण्यास सुरु केलेली टाळाटाळ, त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांत व त्यांच्या पालकांत पसरलेली भितीची भावना, सदर जागेचा ताबा रयत शिक्षण संस्थेस देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१२९) | "जळगाव महानगरपालिकेत असणारी अनुकंपा भरती दहा वर्षापासून रखडलेली असून अनुकंपा भरती यासंदर्भात मयत कर्मचाऱ्यांचे वारसदार खूप वर्षापासून मंत्रालय नगर विकास खात्याकडे पाठपुरावा करीत असणे, जळगाव महानगरपालिकेत सध्या कर्मचारी हे स्थायी आस्थापना व कर्मचारी असून कर्मचारी वीस ते पंचवीस वर्ष त्या ठिकाणी काम करून सुद्धा त्यांच्या वारसांना इतक्या वर्षापासून त्यांना मिळणाऱ्या | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | लाभापासून वंचित ठेवण्यात आलेले असणे, जळगाव महानगरपालिकेला मंत्रालया मधून प्राप्त होत असणारा निधी याचे मनपा मधून वेळोवेळी दखल घेतली जात नसणे, जळगाव महानगर-पालिकेमध्ये नवी आकृतीबंध चा प्रस्ताव अजून पर्यंत प्रलंबित असणे, तसेच मनपा मधील रिक्त पदे सध्या मनपा मध्ये १५०० हुन अधिक पदे रिक्त असल्याचे आस्थापना विभागाकडून माहिती देण्यात आलेली असणे, या कामासाठी कर्मचारी नसल्यामुळे शहरातील नागरिकांचे गैरसोय होत आहे व त्याचा परिणाम महानगरपालिकेवर होत असणे, त्यामुळे नवीन सरळ सेवा भरती करणे शक्य होत नसल्यामुळे महानगरपालिकेमधील कामकाजावर त्याचा परिणाम होत असणे, तरी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१३०) | "नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील भूमापन क्रमांक ६७०, ही जागा खाणीसाठी आरक्षित असणे, नोंद क्रमांक ११०८ प्रमाणे सदर जागा कराराने गौण खनिज काढण्यासाठी श्री.भागवत यांना ९९ वर्षाच्या कराराने देण्यात येणे, सदर जागा कराराने दिलेली असताना देखील सदर जागेवर गौण खनिजाचे उत्खनन न करता रहिवासी प्रयोजनासाठी वापर करणे, सदर जागेवरील महाराष्ट्र शासनाचे नाव कमी करून बेकायदेशीर रित्या खाजगी व्यक्तींचे नाव समाविष्ट करणे, सदर जागेची परस्पर विक्री करणे, यासारखी बाबी झाल्यामुळे शर्तभंगाचा प्रस्ताव करून सदर जमीन शासन जमा करण्याची असणारी आवश्यकता, स्थानिक लोकप्रतिनिधी कडून वारंवार मागणी करून देखील, सदर जमीन शासन जमा करण्यास होत असणारा विलंब, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांचे या बाबीकडे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, सदर प्रकरणात झालेला मोठ्या प्रमाणावरील गैरव्यवहार, या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना, शासनाच्या सर्वांसाठी घरे या धोरणानुसार, हक्काची घरे उपलब्ध करून देण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, सदर जागा शासन जमा करून घेण्यासाठी तत्काळ शर्तभंगाचा प्रस्ताव तयार करून कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१३१) | "अंधेरी पश्चिम येथील जुन्नत नगर, समता नगर व खजूरवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा अंतर्गत ई-मेल अशोक इंटरप्राईजेस व झोपडपट्टी धारक यांच्या १९९६ साली विकासकरारनामा झालेला असणे, १९९८ साली विकासकांनी स्वतः झोपडीधारकांना विश्वासात न घेता बसायरा घर निर्माण संस्था प्रस्तावित | श्री. अमित साटम, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | नामक संस्था स्थापन केलेली असणे, सदर जागा ही खाजगी असून जागेच्या मूळ मालकाची ना हरकत किंवा खरेदी पत्र न केलेले असणे, २००३ साली सदर विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला प्रस्ताव सादर करून सदर ठिकाणी परिशिष्ट दोन तयार करत असताना कोणत्याही प्रकारची स्थळ पाहणी किंवा बायोमेट्रिक सर्वे जागेवरती न केलेला असणे, सदर विषयावर मा.उच्च न्यायालयामध्ये स्टे ऑर्डर असतानाही जागेवर ४० पेक्षा अधिक झोपड्या तोडून सदर ठिकाणी अनधिकृत ट्रान्सझीट कॅम्प उभा केलेला असणे, सदर प्रकल्प हा २०१९ साल पर्यंत प्रलंबित असून त्यामध्ये कोणतेही कारवाई न होणे, स्थानिक झोपडपट्टी धारकांनी २०१९ साली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला तक्रार केलेली असल्यामुळे परिशिष्ट दोनच्या विषयी तक्रार केलेली असून तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी जाहीर नोटीस काढून सदर परिशिष्ट दोन ची ‘पुर्नपडताळणी केलेली असणे व त्या पुर्नपडताळणीमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी व चुका आढळल्या असून जागेवरची परिस्थिती व तयार केलेले परिशिष्ट दोन यामध्ये मोठी तफावत आढळून आलेली असणे, जागेवर घरे नसताना बोगस घरे परिशिष्ट दोनमध्ये दाखवण्यात आलेली असणे हे निष्पन्न होणे, ३०० झोपडपट्टीधारक आजतामयी त्या जागेवर असणे, ९५६ च्या परिशिष्ट दोन मधील फक्त ३०० मूळ झोपडपट्टी धारक जागेवर बसले आहे अशी बाब लक्षात आल्यामुळे सदर परिशिष्ट दोनच्या आधारावरती सदर पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात अशक्य असणे, आणि त्यामुळे झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरणाच्या सचिव यांनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये नव्याने बायोमेट्रिक सर्वे करण्याचे आदेश दिले असता जून २०२२ मध्ये सदर विभागाचा बायोमेट्रिक सर्वे पूर्ण होऊन नवीन बायोमेट्रीक सर्व्हे नुसार नवीन परिशिष्ट दोन तयार करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर जुने परिशिष्ट दोन रद्द करून सदर प्रकल्पाला चालना देण्यासंदर्भामध्ये शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | चर्चा झाली |
| (१३२) | “मुंबईतील बंद पडलेल्या ५८ गिरण्यातील कामगारासाठी व त्यांच्या वारसासाठी सवलतीच्या दरात घरे कामगारासाठी करून देण्याच्या दृष्टिने आता पर्यंत सन २०१२, २०१६ व सन २०२० अशी तीन वेळा १७ हजार घरांची सोडत देणे, उर्वरित १ लाख ७० हजार गिरणी कामगार हक्काच्या घराच्या प्रतिक्षेत असून बंद पडलेल्या गिरण्याच्या जमिनीवर गिरणी कामगारांना म्हाडाने बांधलेल्या घरापैकी ६९२५ घराची पहिली सोडत दिनांक २८ जून, २०१२ मध्ये काढण्यात आली व घराचे वाटप केले परंतू सन २०२० मधील | सर्वश्री सुनील राणे, संजय जगताप, प्रकाश आबिटकर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | सोडतीपैकी घराचे वाटप अजूनही झालेले नसणे, कोनगाव, पनवेल येथील घरासाठी डिसेंबर, २०१६ मध्ये सुमारे २ हजार घरासाठी पैसे भरून ही अनेकांना घरे मिळालेले नसणे, गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना घरे मिळण्यासाठी व गिरणी कामगाराच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी गिरणी कामगार संघटना गेल्या अनेक वर्षापसून संघर्ष करीत असून, अर्ज केलेल्या १ लाख ७० हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी ठोस आराखडा तयार एन टी सी मीलच्या गिरण्याची जमिन घरासाठी उपलब्ध करून देणे, श्रीनिवास आणि श्रीराम मिलच्या गिरणी कामगारांची कायदेशीर देणी देणे, स्वानच्या तीन्ही गिरण्यातील कामगारांना लवकर घरे देणे, खटाव मिलची जमीत डी.सी.आर प्रमाणे घरांसाठी देणे, कोनगाव पनवेल येथील घरे २ हजार ४१७ गिरणी कामगारांना वितरीत करणे, बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलच्या कामगाराची पात्रता निश्ति करून घरांचा ताबा देणे, न्यू ग्रेट हिंदूस्थान व मुकेश मिलची जागा डीसीआर प्रमाणे घरासाठी देणे, गिरण्या चाळीतील रहिवाशांचे पूनर्वसन त्वरीत करणे त्यामुळे तातडीने दखल देऊन गिरणी कामगारांना न्याय देण्याची मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१३३) | "पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील १२ गावांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने कळमजाई शेती जलउपसा सिंचन परियोजना भिमाशंकर योजनेचे सर्वेक्षण करण्यात येणे, त्यानुषंगाने सर्वेक्षण पूर्ण होऊनही गेल्या ८ महिन्यांपासून योजनेचे काम अद्याप सुरू झाले नसणे, डिंभे धरणातील पाणी ६ टक्के प्रवाही उपसा सिंचनासाठी व १४ टक्के ठिबक तुषार उपसा सिंचनासाठी एकूण २० टक्के प्रकल्पिय पिक रचनेच्या क्षेत्रानुसार १ हजार २ हेक्टर प्रवाही आणि ६९४ हेक्टर ठिबक द्वारे देण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाकडून मंजुरी मिळाली असणे, गोहे खु., गोहे बु., राजेवाडी, पोखरी, चिखली, जांभोरी, नंदरकिचीवाडी, फळोदे, तळेघर, राजपूर, गाडेवाडी, तेरूगण, निगडाळे या गावांतील सिंचनाला फायदा होणार असून सदरची गावे आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण परिसरातील १०० टक्के आदिवासी बहुल गावे असणे, कळमजाई शेती जलउपसा सिंचन परियोजना भिमाशंकर ही योजना त्वरित सुरू झाल्यास आदिवासी बांधवांना सामाजिक न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी मदत होणार असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेश लांडगे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (१३४) | "वर्धा जिल्ह्यात बोर व धाम हे सिंचनाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे प्रकल्प असणे, दोन्ही प्रकल्पांचा वर्धा जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना लाभ होत असणे, दोन्ही प्रकल्प जवळजवळ ५० वर्षापेक्षा जास्त जुने असल्याने कालवे व वितरण प्रणाली जीर्ण झाली असणे, सदर प्रकल्पाची सिंचन क्षमता १६१९४ हे. असून देखील आज मितीस फक्त ११५८८ हे. पर्यंतच प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळत असणे, सदर कालवे जागोजागी फुटल्याचे निदर्शनास येणे, कालव्याचा प्रवाह विरुद्ध दिशेस होणे, शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असणे, कालवे प्रणाली जीर्ण झाल्यामुळे सिंचन क्षमता कमी झालेली असणे, कालव्यांची अस्तर प्रणाली जीर्ण झाल्यामुळे व गाळ साचल्यामुळे ४० टक्के पाणी पाझरात असणे, अस्तर प्रणालीची स्थिती बरोबर नसल्यामुळे पाण्याला शेवटपर्यंत जाण्यासाठी अडथळा येत असणे, त्यामुळे बरेचशे शेतकरी सिंचनापासून वंचित राहत असणे, यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असणे, करीता धरणातील गाळ काढणे आवश्यक असणे, धरणांची दुरुस्ती तसेच कालवे व वितरण प्रणालीची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, सदर प्रकल्पांतील पाणी सोडल्याने नदीकाठावरील बऱ्याशा गावात पुराचे पाणी शिरत असणे, बऱ्याचवेळा गावातील लोकांच्या घरांमध्ये पाणी शिरुन जिवीत व वित्त हानी होत असणे, प्रभावित गावांना सुरक्षित करण्याकरीता पुर संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक असणे, नदीपात्राचे खोलीकरण करणे आवश्यक असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत शासनाला वेळोवेळी निवेदनांद्वारे कळविण्यात येणे, सदर प्रकल्पांचे सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. पंकज भोयर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१३५) | "मुंबई उपनगरातील मागाठाणे, बोरिवली येथील महाकाली गृहनिर्माण संस्था व देवीपाडा गृहनिर्माण संस्था हा प्रकल्प गेल्या कित्येक वर्षापासून पुनर्विकासापासून वंचित असून सर्व झोपडी-धारकांची घरे तोडण्यात येणे, तसेच या झोपडीधारकांना गेल्या कित्येक वर्षापासून भाडेही देण्यात न येणे, परिणामी झोपडीधारकांची आर्थिक ओढाताण होत असून करोना महामारीमुळे अत्यंत दयनीय अवस्था होणे, दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण भरणे अशक्य होत असल्याने आर्थिक विवंचनेतून दोन झोपडी धारकांनी आत्महत्या केली असून परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदरील प्रकल्प शासनाने हस्तांतरीत करून नागरिकांना न्याय देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तत्कालिन गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे केलेली मागणी, | श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | शासनाने संबधित विकासकांवर कारवाई करून संबधित झोपडीधारकांना भाडे देण्याचे आश्वासन देऊनही अदयापही संबधित विकासकांवर कारवाई करण्यात आली नाही तसेच झोपडीधारकांना भाडेही देण्यात आलेले नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (१३६) | “पुणे शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये निर्माण झालेल्या अडचणी विषयी बैठक लावणेसाठी स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी विभागीय आयुक्त पुणे यांना दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजी विभागीय आयुक्त पुणे यांना पत्र देणे, परंतु सदर बैठकीचे आयोजन अद्याप पर्यंत न होणे. पुणे शहरात काशेवाडी, मंगळवार पेठ, लोहिया नगर, ताडीवाला रोड, नाना पेठ इत्यादी ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम चालू असणे. यापैकी बरेच प्रकल्प अर्धवट अवस्थेत असणे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करणाऱ्या विकसकांचे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या हितसंबंधामुळे प्रत्यक्ष झोपडपट्टी धारकांची विकासकाकडून वेगवेगळ्या प्रकारे अडवणूक करणे व पात्र असणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना सुद्धा घरापासून वंचित राहावे लागणे प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये सदर प्रकल्पावर देखरेख व तांत्रिक तपासणी करण्यासाठी स्वतःचे योग्य ते मनुष्यबळ नसल्यामुळे सदर प्रकल्पाच्या बांधकामाची तांत्रिक दृष्ट्या तपासणी न होणे, लोहियानगर येथील झोपडपट्टी धारकांना बिबवेवाडी येथे तात्पुरती राहायची व्यवस्था केली असतानाही त्या ठिकाणी सदर झोपडपट्टीधारकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे व लोहियानगर येथे होत असलेल्या प्रकल्पाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडलेले असणे, त्यामुळे येथील रहिवाशांना स्वतःचे घर मिळण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागणे, नाना पेठेतील प्रकल्प पूर्ण झालेला असून तेथे लाभधारकांना मिळालेल्या घरांमध्ये कोणत्याही सोयी सुविधा नसणे ताडीवाला रोड येथील पानमळा प्रकल्पातील झोपडपट्टी धारकाला विकसक व अधिकाऱ्यांच्या असलेल्या संगनमतामुळे पात्र असूनही अनेक वर्ष हेलपाटे मारायला लावून ही अद्यापपर्यंत त्यांना स्वतःच्या हक्काचे घर न मिळणे, या सर्व गोष्टींची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व गरीब झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. | दिनांक<br>२५ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१३७) | "जिगाव प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्या अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील जिगाव गावाजवळ पूर्णा नदीवर प्रगतीपथावर असणे, प्रकल्पामध्ये १५ उपसा सिंचन योजना असणे, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव, शेगाव, जळगाव जामोद, संग्रामपूर, मलकापूर आणि नांदुरा या सहा तालुक्यातील २६८ गावातील व अकोला जिल्ह्यातील बाळापुर व तेल्हारा या दोन तालुक्यातील १९ गावातील असे एकूण ७८ हजार ५८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित असणे, मलकापूर विधानसभा क्षेत्रातील नांदुरा तालुक्यामधील हा प्रकल्प असून सुद्धा नांदुरा तालुक्यातील १४ गावे लाभक्षेत्रापासून वंचित असल्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने सदर १४ गावांचा लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याबाबत माननीय मंत्री जलसंपदा यांना निवेदनाद्वारे विनंती करणे, १४ वंचित गावांचा लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात दिनांक ५ मे, २०२२ रोजी तात्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीमध्ये जिगाव प्रकल्पा अंतर्गत मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील १४ गावांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव तपासून नियमक मंडळाची मान्यता घेऊन शासनास तीन महिन्यात सादर करण्याबाबतचे आदेश तत्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांचे मार्फत देण्यात येणे, परंतु आज रोजी पर्यंत यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे १४ गावांतील शेतकरी व नागरिक यांच्यामध्ये शासनाप्रति असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | सर्वश्री. राजेश एकडे, बळवंत वानखडे, अमित झनक, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |
| (१३८) | "जळगाव जिल्ह्यातील अमळनेरसह ५ तालुक्यांसाठी महत्त्वाचा असलेल्या निम्न तापी पाडळसे प्रकल्प गेल्या २५ वर्षांपासून रखडलेला असणे, १९९७-९८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रकल्प रखडल्यामुळे प्रकल्पाचा खर्च पाचपटीने वाढलेला असणे, प्रकल्प रखडल्यामुळे दरवर्षी १०,००० दशलक्ष घनमीटर पाणी वाहून जाणे, ४२० दशलक्ष घनमीटर क्षमतेचा हा प्रकल्प पूर्ण झाल्यास ५४९३६ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार असणे, पाडळसे प्रकल्प स्थळावर सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नसणे, २९ डिसेंबर, २०२२ रोजी वाळू, खडी, डबर, माती, डिझेल, डीपी, लोखंड अशा ५ लाख रुपयांच्या साहित्याची चोरी होणे, तत्कालीन युती सरकारने या प्रकल्पासाठी नाबार्ड कडून १५०० कोटी कर्ज उपलब्ध झाल्याची घोषणा करणे मात्र ती फसवी ठरणे, या प्रकल्पासाठी सन २०२०-२१ आणि २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात | श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | २०० हून अधिक कोटी रुपयांची तरतूद केलेली असणे, यातून किरकोळ कामे सुरू असणे मात्र धरणाच्या मुख्य पिलरचे काम अद्याप सुरू झालेले नसणे, सद्यःस्थितीत प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असणे त्यासाठी ५३०० कोटी रुपये तरतूद करण्याची गरज, प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१३९) | "अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ज्यांच्या मतदारसंघात निम्न पेढी प्रकल्प येतो त्या लोकप्रतिनिधीने दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंधारण मंत्री यांना पत्र देऊन निम्न पेढी प्रकल्प तालुका भातकुली जिल्हा अमरावती या प्रकल्पाला उमा बरेजः प्रकल्पाला जिल्हा अकोला ज्याप्रमाणे रुपये ०८:२६ लक्ष रूपये विशेष बाब म्हणून लागू केले, त्यानुषंगाने हे धोरण निम्न पेढी प्रकल्प या प्रकल्पास लागू करणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून शासन स्तरावरील त्याबाबत निर्णय घेण्याबाबत पत्र दिले असणे, शासनाने ही बाब गांभीर्याने घेउन शासनाने संबंधित मागणी लक्षात घेता जलसंपदा विभाग या कार्यालयाचे व्हीआयपी पत्र क्रमांक २०२२/१९८/पत्र क्रं.३२८/मो प्र.-२/ दिनांक १४/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर, मुख्य अभियंता जलसंपदा विशेष प्रकल्प अमरावती व जिल्हाधिकारी अमरावती यांना वरील विषय प्रकरणी अहवाल मागवला असणे, कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्रमांक एक अमरावती यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक दिनांक २०/१२/२०२३ रोजीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पत्र पाठवून त्यांनी सदरची बाब ही जिल्हाधिकारी अमरावती यांचेमार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावे असे शासनाचे निर्देश असल्याने त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव निर्णयात्मक व पुढील कार्यवाहीकरीता जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सविनय सादर करण्यात आला असणे, परंतु अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी अमरावती व कार्यकारी संचालक कार्यालय, नागपूर यांच्याकडून सदर प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला नसणे, ज्यामुळे वारंवार निम्न पेढी प्रकल्प ग्रस्त शेतकरी यांनी संबंधित लोकप्रतिनिधी यांच्याकडे सातत्याने तगादा लावला असणे, सदर बाब ही निर्णयात्मक असल्याने तातडीने दोन्ही विभागाकडून प्रस्ताव प्राप्त करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाने निर्णयात्मक आदेश काढण्याची कार्यवाही यासंबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा, वि.स.स. | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (१४०) | "सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ इतकी असणे, त्यापैकी आदिवासी जमातीची लोकसंख्या ही १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असणे, म्हणजेच राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के आदिवासींची लोकसंख्या असणे, अनुसूचित जमातीच्या यादीत ४५ जमाती शासनाच्या सवलती पात्र असताना देखील प्रत्यक्षात १२ जमातींनाच याचा लाभ मिळत असणे, त्यामुळे इतर जमतींकडून आदिवासी मंत्रालय व त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केला जात असणे, राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ९.३५ टक्के निधीची तरतूद दरवर्षी केली जात असणे, राज्याच्या लोकसंख्येप्रमाणे आदिवासी समाजास राजकीय आरक्षण ९ टक्के दिले असणे, व शैक्षणिक आरक्षण ७ टक्के दिले असणे, परंतु पुणे, ठाणे, नाशिक, रायगड, अहमदनगर या पाच जिल्ह्यांतील ३८ तालुक्यांतील आदिवासी जमातींना खरे आदिवासी समजून कोणतेही पुरावे न पाहता, दक्षता पथक न पाठवता, कोणतीही सखोल चौकशी न करता जात वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, उर्वरित महाराष्ट्राच्या विस्तारित क्षेत्रातील एकाही आदिवासी जमातीला जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीने न देता कितीही पुरावे दिले तरी जात पडताळणी प्रमाणपत्र देताना वेगवेगळ्या पुराव्याची माहिती मागवून अडवणूक केली असणे,विशेषतः सोलापूर जिल्ह्यासहित संपूर्ण राज्यातील महादेव कोळी,मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी,डोंगर कोळी ह्या सर्व जमाती आदिवासी समाजात मोडत असताना त्यांची वारंवार अडवणूक होत असणे, पडताळणी समितीच्या निर्णयाच्या विरोधात जे लोक मा.उच्च न्यायालयात जातात, त्यांना मात्र जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जातवैधता प्रमाणपत्र देत असणे, एकट्या सोलापूर जिल्ह्यात महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी,डोंगर कोळी लोकसंख्या ७७ हजार ५१३ इतकी असून यापैकी १०० लोकांनाही जातवैधता प्रमाणपत्र अद्याप दिलेले नसणे, यामुळे आदिवासी असून देखील या जमातींना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित रहावे लागत असणे, तसेच याचा फटका त्यांना राजकीय, शासकीय नोकऱ्या व शैक्षणिक, व अनेक शासकीय योजनांचा लाभ घेताना बसत असणे, यामुळे एकूण लोकसंख्येच्या ५.०४% म्हणजेच तब्बल ६१३८२०६ इतक्या लोकांमध्ये शासन व प्रशासन विषयी असंतोषाची भावना निर्माण होत असणे,याबाबत शासनाने ह्या जमातींना जात वैधता प्रमाणपत्र व इतर सर्व योजनांचा विनासायास लाभ देण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. समाधान अवताडे, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१४१) | “अहमदनगर शहरामध्ये स्थित दो बोटी चीरा मस्जिद जी एतिहासिक आहे व सदर मस्जिद नोंदणीकृत असणे, शहराच्या मधोमध असून मस्जीदीमध्ये न्यायालय असणे, न्यायालयाकरिता नवीन इमारत बांधून तेथे न्यायालयाचे स्थलांतर करूनही अद्यापर्यंत सदरची जागा मस्जीदिच्या संस्थेला देण्यात न येणे, हुसैनी मस्जिद, दो बोटी चिरा मस्जिद यांच्यामध्ये ५० फुटाचे अंतर असणे, सदर मस्जीदीच्या मध्ये अहमदनगर कोतवाली पोलीस स्टेशन चालविण्यात येणे, तसेच याच वक्फच्या जागेवर नवीन कोतवाली पोलीस स्टेशन बनविण्यात येणे व अद्यापपर्यंत जुन्या मस्जीदीचा ताबा देण्यात न येणे, हातमपुरा अहमदनगर मधील बाबा बंगाली दरगाह जवळ २२ क्रमांकाची मस्जीदीच्या जागेवर जुने जिल्हाधिकारी कार्यालय बनविण्यात आलेले असणे, नवी इमारत बनून हि सदरची जागा अद्यापपर्यंत मस्जीदिच्या ताब्यात न देणे, तारकपूर, अहमदनगर मधील रुमी खान मस्जिद आणि दरगाह च्या जागेवर शहरामधील काही ताकतवर नेत्यांनी कब्जा केलेला असून सदर जागेवर कोणालाही येण्या-जाण्यास मनाई करण्यात येणे, सदर विषयी शासनाकडे वारंवार संबंधितावर कारवाई करून सदर ची जागा संबंधित संस्थांना देण्यात यावी अशी मागणी करूनही कोणतीही कारवाई करण्यात न येणे, सदर विषयी जनसामान्यांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. अबू आजमी, वि.स.स. | दिनांक<br>२५ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |
| (१४२) | “केंद्र व राज्य शासनाने कांदळवनाबाबत आपली भुमिका स्पष्ट केलेली असून पर्यावरणाची हानी होऊ नये याकरिता ज्या ठिकाणी कांदळवने असतील त्या ठिकाणी त्यांचे रक्षण करणे व जतन करणे याची जबाबदारी वन खाते व पर्यावरण खात्यामार्फत केंद्र व राज्य शासन करीत असणे, परंतु, काही ठिकाणी कांदळवनाचे संरक्षण होत असल्यामुळे आजुबाजूच्या परिसरात विकास कामे करीत असताना फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, कारण त्यातील काही कांदळवनांची सिमा निश्चित केल्यानंतर पावसाळ्यामध्ये, अवकाळी पावसामुळे अथवा सुसाट्याच्या वाऱ्यामुळे कांदळवनाच्या बिया शेतकरी शेती करीत असलेल्या शेताच्या काही भागामध्ये पसरल्यामुळे त्या ठिकाणी कांदळवनाची फार मोठ्या प्रमाणात वाढ असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करताना मोठ्या प्रमाणात अड्चणींना सामोरे जावे लागत असणे, त्याचबरोबर काही कच्च्या रस्त्यावर व अविकसित भुखंडावर या बिया गेल्यामुळे शासनाच्या कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे सदरचा भुखंड विकसित होऊ शकत नसणे, अथवा रस्त्यांचे रूंदीकरणही होऊ | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | दिनांक<br>२५ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | शकत नसणे, तसेच ज्या भुखंडावर ही कांदळवने पसरली जातात त्या भुखंडधारकांना भुखंडाचा मोबदला हा टी.डी.आर. च्या स्वरूपात अथवा आर्थिक स्वरूपात मिळण्यासाठी देखील अड़चणी निर्माण होत असणे, माझ्या ओवळा - माजिवडा विधानसभा मतदारसंघातील कांदळवनाच्या बाबतीत विचार केला तर मेट्रो-४ व मेट्रो-९ चे काम असो अथवा घोडबंदर किल्याशेजारी शिवसृष्टी उभारणीचे काम असो, त्याचबरोबर दहिसर-भाईंदर कोस्टल रोडचे काम असो अथवा गायमुख - कोलशेत कोस्टल रोडचे काम, एम.एम.आर.डी.ए. करीत असलेल्या घोडबंदर जेसलपार्क चौपाटी या ६० मिटर रस्त्याचे काम असो अथवा नागला बंदर व घोडबंदर खाडी किनारा विकसित करण्याचे काम, सुभाषचंद्र बोस मैदान विकसित करण्याचे काम असो अथवा घोडबंदर परिसरातील जेट्टीचे काम या सर्व विकास कामांना कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होणे, यावर उपाययोजना म्हणून शहरी भागातील या कांदळवनाची पुर्वीची सिमा रेषा निश्चित करून या कांदळवनांची वाढ भविष्यामध्ये विकास कामांवर परिणाम होऊ देऊ नये तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये किंवा भुखंड मालकांच्या खासगी भुखंडावर ही कांदळवने निर्माण झालेली आहेत त्यांना इतर शेतकऱ्यांप्रमाणे व इतर खाजगी भुखंड मालकांप्रमाणे आर्थिक व टी.डी.आर. स्वरूपातील मोबदला देण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (१४३) | “मुंबई वर्सोवा येथील वर्सोवा खाडीमध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचलेला असणे, तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी वर्सोवा खाडीतील गाळ काढण्यास ४.०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून गाळ काढण्यात येणे परंतु अंदाजे ५५ ते ६० लाख क्युबिक मीटर गाळ काढायचा राहिलेला असून सदर गाळामुळे मच्छीमाऱ्यांना मासेमारी करणे कठीण जात असून बोटींच्या होणाऱ्या अपघातामुळे त्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिकि नुकसान होत असणे, त्यामुळे सदरचा गाळ नियमित काढणे महत्वाचे असून वर्सोवा खाडीतील उर्वरीत गाळ लवकरात लवकर काढण्याबाबत तसेच त्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१४४) | “सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी उजनी धरण जलाशय उदभव धरून पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आलेली असणे सदर योजनेद्वारे सोलापूर शहरास दररोज १७० द.ल.ली पाणी उपलब्ध होणार असणे सदर योजनेत मुख्यत्वे धरण क्षेत्रात जँकवेल बांधणे, पंपींग स्टेशन व पंपींग मशीनरी,रायझिंग मेन, बी.पी.टी. ग्रॅवीटी मेन इ. कामांचा समावेश असणे, सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (उजनी धरण उभ्दव-१७० द.ल.ली.क्षमता) असणे, लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग सर्विसेस प्र.लि. कोल्हापूर यांना दि.२७.१०.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले होते परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२४.११.२०२२ रोजी जागेवरील काम थांबविण्याबाबत आदेश दिलेले असणे तसेच मागील ठेकेदार पोचमपाड कंपनी यांनी उर्वरित काम रु.६१५ कोटीमध्ये करण्यास इच्छुक असलेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर सिटी डेव्हलमेंट कार्पोरेशन लि. यांच्याकडे दि.५.१२.२०२२ पत्रांनी कळविले असून याबाबत दि. १५.१२.२०२२ रोजीच्या ३२ वी संचालक मंडळाची बैठकीमध्ये कायदेशीर मत घेणेबाबत ठरले, तसेच तो पर्यंत ठेकेदार लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग सर्विसेस प्र.लि. यांना काम थांबविण्याचे निर्देश दिलेले असणे, कामाच्या अंमलबजावणी दरम्यान, कोविड परिस्थितीच्या प्रभावामुळे स्टील, सिमेंट आणि इंधनाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे कंत्राटदाराने काम सुरू ठेवण्यास असमर्थता दर्शविली, त्यामुळे, निविदेमध्ये कलमाचा समावेश न केल्यामुळे, दि.११.११.२०२१ रोजी सोलापूर स्मार्ट सिटीच्या २७ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत करार संपुष्टात आणण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, दि.२९.१२.२०२१ रोजी सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे कंत्राटदाराला अंतिम समाप्तीची नोटीस बजावण्यात येणे, याप्रकरणी ठेकेदार लवादाकडे गेलेले असणे, पुणे येथे लावादाची प्रक्रिया सुरू असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. | दिनांक<br>२५ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |
| (१४५) | “कर्नाटक राज्याला वीज निर्मितीसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील बरांज मोकासा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करून कोळसा उत्खननाकरिता देण्यात येणे, सन २००८ मध्ये बरांज मोकासा, चेक बरांज, कढोली, किलोनी, चीचोर्डी, सोमनाला व अन्य अश्या ७ गावच्या शेतकऱ्यांच्या १४५७.६० हेक्टर आर (अंदाजे ३६००.३२ एकर) जमिनीचे भुसंपादन करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी प्रत्येक शेतकऱ्यांना जमिनीचा ५० % आर्थिक मोबदला अदा करण्यात आला असून उर्वरित ५० % आर्थिक मोबदला मागील | श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. | दिनांक<br>२५ मार्च,<br>२०२३ रोजी<br>चर्चा झाली |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | १४ वर्षापासून कर्नाटका पावर कॉर्पोरेशन तर्फे अद्यापही शेतकऱ्यांना देण्यात आलेला नसणे, KPCL तर्फे कोळसा उत्खनन केल्यानंतर शेतकऱ्यांची शेती कसदार करून त्यांना परत करण्याच्या अटी व शर्तीसह करार करण्यात आले असणे, तसे R & R policy - २०१६ बिंदू क्र. २.६ मध्ये नमूद असणे, परंतु मागील १४ वर्षात कोळसा उत्खनन करूनही अद्यापही पिडीत शेतकऱ्यांना शेती सुधारणा करून शेतीजमीन करारानुसार परत न देणे, सदर करारनामा मध्ये तांत्रिक शब्दाचा वापर करून बरांज व अन्य ७ गावच्या शेतकऱ्यांचे अंदाजित १४७ कोटी रुपये मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे प्रकल्पग्रस्त पिडीत शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देण्याकरिता जमा केलेला नसणे, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची KPCL कंपनीकडून आर्थिक फसवणूक करण्यात येत असणे, KPCL कंपनी तर्फे शेतकऱ्यांचे ५० % जमिनीचा आर्थिक मोबदला अदा न केल्याने आणि करारानुसार जमीन परत न करत असल्याने जिल्हा चंद्रपूर ता.भद्रावती येथील बरांज मोकासा कोळसा खाण करिता शेतकऱ्यांची अधिग्रहित १४५७.६० हेक्टर आर जमिनीचे सर्व फेरफार रद्द करण्यात यावेत अथवा संपूर्ण शेतकऱ्यांचे सद्यस्थितीत बाजार मूल्य नुसार नवीन दराने ५० % जमिनीचा आर्थिक मोबदला व्याजासह मिळण्याच्या अनुशंषगाने शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१४६) | "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालक वाहकांच्या अनेक मागण्या शासन दरबारी प्रलंबित असणे, त्यासाठी एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधलेले असणे, एसटी महामंडळाचे चालक वाहक एखाद्या ठिकाणी मुक्कामी बस घेऊन गेल्यास त्यांना अवघा ७५ रुपये भत्ता मिळत असणे, प्रत्यक्षात मात्र त्यांना राहण्या व खाण्यासाठी एकूण १५० रुपयांपेक्षा जास्तीचा खर्च येणे, त्यामुळे मुक्कामी बस घेऊन जाण्यास वाहक चालक नाखुश असल्याचे दिसून येणे, कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी गेल्या पाच वर्षात तीन वेळा एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी संप केलेला असणे, तरी शासनाने अद्यापही योग्य निर्णय घेतलेला नसणे, दहा वर्षे सेवा केल्यानंतरही एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचा पगार १८ हजार रुपये इतकाच असणे, आजच्या महागाईच्या काळात घरखर्च भागविणे कठीण झालेले असणे, त्यामुळे राज्यातील एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पगारात भरघोस वाढ करण्याची आवश्यकता असणे, परंतु शासनाचे या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याने सदर कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेल्या तीव्र असंतोष व नाराजीची भावना | श्री. कुणाल पाटील,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील,श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. रोहित पवार,श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम,श्री. संजय बनसोडे, श्री. अबू आजमी, श्री. धनंजय मुंडे, श्री. चेतन तुपे,श्री. विनोद निकोले, श्री. सुनिल प्रभू,श्री. अजित पवार,कुमारी आदिती तटकरे,श्री. दौलत दरोडा, श्री. धर्मरावबाबा आत्राम,श्री. अनिल पाटील,श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | राज्यातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व यावर राज्य शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१४७) | "परिवहन विभागाचे प्रमाणपत्र न घेताच तब्बल ३० हजार वाहने मुंबईच्या रस्त्यावरून धावत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, फिटनेस चाचणी न करणाऱ्या वाहनांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये, १५ वर्षांहून अधिक जुन्या वाहनांवर green tax वाढवण्याची, त्यांची तपासणी आणि मोठ्या प्रमाणात दंड आकारण्याची योजना आखली असणे, त्यामुळे, फिटनेस चाचणी न करणाऱ्या वाहनांवर कारवाई न करण्याची गरज असणे, तसेच, प्रत्येक वाहनांची फिटनेस चाचणी होण्यासाठी स्वयंचलित फिटनेस चाचणी केंद्रे उभारण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (१४८) | "माहे जानेवारी, २०१७ दरम्यान राज्यामधील बस स्थानकांचा कायापालट करण्याकरिता १३ अत्याधुनिक बस पोर्ट बांधण्यात येण्याची घोषणा करणे, पहिल्या टप्प्यातील बस पोर्टकरिता १३ जागांची निवड करण्यात येणे, खासगी-सार्वजनिक भागीदारीतून त्याची उभारणी करण्यात येणे. त्याची देखभाल व दुरुस्ती "बस पोर्ट' उभारणारी संस्थाच करणार असल्याचे नमूद करणे. २०२२ पर्यंत एकही बस पोर्ट उभारण्यात न येणे, या बस पोर्टच्या बांधकामाची सध्याची परिस्थिती. महाराष्ट्रातील जुनी बस स्थानके व नव्याने बांधलेली बस स्थानकांची सध्याची अवस्था चांगली नसून प्रवश्यांची गैरसोय होत असणे. माझ्या मुख्यमंत्री काळात कराड बस स्थानकांची अत्याधुनिक इमारत बांधकाम करण्यात येणे, परंतु प्रवाश्यांच्या सोयीकरिता बसण्याची बाकडे तुटलेली असल्याने प्रवाश्यांची गैरसोय होणे. पावसाळ्यामध्ये पाणी साठत असल्याने व स्थानकाची देखभाल दुरुस्ती होत नसल्याने बस स्थानकांची मोडतोड व दुरावस्था होणे, शासनाने महाराष्ट्रातील बस स्थानकांच्या सोई व देखभाल दुरुस्तीकडे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. पृथ्वीराज चव्हाण वि. स. स. | कित्ता |
| (१४९) | "अमरावती जिल्ह्यातील कायम रहिवाशी असलेले विशेष मागास प्रवर्गातील १२ एस.टी. महामंडळ कर्मचारी चालकांच्या बदल्या अमरावती विभागातून यवतमाळ, बुलढाणा, विभागात करण्यात आल्यामुळे त्यांची व त्यांच्यावर निर्भर असलेल्या कुटुंबातील सदस्यांची गैरसोय झाली असणे, सदर कर्मचारी हे यापूर्वी इतर विभागात दहा ते बारा वर्षे सेवा देऊन अमरावती विभागात इतर जिल्ह्यातुन बदली होऊन आलेले अमरावती | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | जिल्ह्यात आले असणे, अमरावती विभागाची बिंदू नामावली तयार करताना विशेष मागास प्रवर्गात १४ कर्मचारी मंजुरी पेक्षा अतिरिक्त झाल्यामुळे त्यांच्या बदल्या यवतमाळ, बुलढाणा विभागात करण्यात आल्या असणे. सदरची बाब त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबातील सदस्यवर अन्याय करणारी असणे, सदर बदलीमुळे त्यांच्या कौटुंबिक अडचणी निर्माण झाल्याने सदर कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्य हे लोकप्रतिनिधी यांना भेटून वरील बदली रद्द करण्याबाबत उसनवारीवर ऑन लोन वर घेण्याबाबत त्यांनी अमरावती जिल्हा विभाग नियंत्रक व राज्य परिवहन विभागाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना मागणी केलेली असणे सदर कर्मचारी हे अमरावती जिल्ह्यातील असल्यामुळे त्यांची व इतर भागात झालेली बदली रद्द करण्यात यावी किंवा उसनवारीवर ऑन लोन वर घेण्याबाबत सदर कर्मचारी विनंती करत असणे, अमरावती विभागात कामगिरीवर ठेवण्यात यावे व तसेच अमरावती विभागात विशेष मागास प्रवर्गात जागा रिक्त झाल्यावर सेवाज्येष्ठतेनुसार कायमस्वरूपी सामावून घेण्यात यावे जेणेकरून त्यांची व त्यांच्या कुटुंबातील सदस्यशांची गैरसोय होणार या विषयी अमरावती लोकप्रतिनीधी यांनी या संबंधी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक वाहतूक भवन मुंबई यांना त्यांचें पत्र क्रमांक ३२५०/२०२३ वदिनांक २४/०२/२०२३ रोजी कळविले असणे लोकप्रतिनिधिंची मागणी लक्षात घेऊन मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पत्र क्रमांक ३५/२०२३ दिनांक ०६/०२/२०२३ रोजी प्रधान सचिव परिवहन विभाग मंत्रालय मुंबई, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राज्य परिवहन महामंडळ वाहतूक भवन मुंबई, यांना व जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालय चे पत्र क्रमांक १४४/२०२३ दि.०६/०२/२०२३ रोजी राज्यांचे मुख्य सचिव यांनाही शासनाने उपरोक्त मागणी तातडीने निकाली काढण्यासाठी आवश्यकता या बाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही व शासनाची भूमिका प्रतिक्रिया.” | | |
| (१५०) | ‘’परिवहन विभागाची भुसावळ शहराला लागून राष्ट्रीय महामार्गावर स्वतःची जागा असणे, सद्याचा बसस्टँड रेल्वे स्टेशनला लागून असणे, सदर ठिकाणी जिल्ह्यातून एस.टी. बसची ये-जा सुरु असणे, भुसावळ हे मध्य रेल्वेचे जंक्शन असणे, त्याला लागूनच बस स्टँण्ड असणे, रेल्वेने आलेल्या प्रवाशांना ग्रामीण भागात जिल्ह्यात जाण्यासाठी बस स्टँण्डचा उपयोग मोठ्या प्रमाणात होणे, सतत येणाऱ्या बस गाड्यांमुळे शहरात वाहतुकीची कोंडी होणे, परिवहन विभागाची जी स्वतःची जागा असणे तेथे बस स्टँण्ड तयार करण्यात यावे | श्री. संजय सावकारे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | व फक्त लांब पल्लाच्या बसेस शहरात न आणला परस्पर बाहेरुनच स्टँण्ड वरुन नेण्यात याव्यात जेणे करुन शहरातील वाहतुक कोंडी कमी होईल, जिल्ह्यातील बसेस रेल्वे बस स्टँण्ड पर्यंत आणण्यात अनुमती द्यावी जेणे करुन जनतेस त्रास होणार नाही, सदर नविन बस स्टँड बनविण्याबबात बैठक बोलावून त्यात निर्णय होणे बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार त्याबाबत निविदा प्रक्रिया व अन्य त्याअनुषंगाने कामे करण्याबाबत शासनाने कार्यवाह करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.'' | | |
| (१५१) | "ठाणे जिल्ह्यातील ठाणे आणि भिवंडी तालुक्यात १८१ आणि मुरबाड तालुक्यात ११७ हेक्टर जमीन कोयना धरणग्रस्तांना जागावाटप करण्यासाठी मंजुर केलेली असणे, मात्र सदरची जमीन अद्यापही कोयना धरणग्रस्तांना वाटप केलेली नसल्याचे दि.१६ फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास आलेले असणे, मागील ६० वर्षापासून कोयना प्रकल्पग्रस्त पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणे, कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, कोयना प्रकल्पग्रस्तांसाठीच्या ठाणे जिल्ह्यातील जमीनीवर वर्षानुवर्षे असलेले अतिक्रमण दुर करण्यात आलेले असणे, सदरची जागा कोयना धरणग्रस्तांना वेळीच वाटप न केल्यास सदर जागेवर पुन्हा भूमाफियांकडून अतिक्रमण होणार असतांनाही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली जात असणे, सदरची जागा लवकरात लवकर वाटप करण्यासाठी कोयना धरणग्रस्तांनी मा.मुख्यमंत्री, मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.१७ फेब्रुवारी,२०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोयना प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सुमारे ६० वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात निर्णय घेऊन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.छगन भुजबळ, श्री.जयंत पाटील, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे, वि.स.स. | कित्ता |
| (१५२) | "चंद्रपूर जिल्हयात वेस्टर्न कोल्ड फिल्ड कंपनी अंतर्गत एकोना ओपन कोळसा खाणीसाठी मौजा वनोजा, चरुरखटी, मार्डा व एकोना गावातील जमीन भुसंपादित करण्यात येणे, त्या जागेवर ओपन कोळसा खाण सुरू करण्यात येणे, मात्र एकोना व मार्डा गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी अद्यापही भुसांपादित करण्यात न | श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार,श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | येणे, तसेच मौजा ऐकोणा, मार्डा, वनोजा व चरूरखटी गावाचे अद्यापही पुर्नवसन करण्यात आलेले नसल्यामुळे शेकडो नागरिक अद्यापही त्या गावात राहत असणे, त्यामुळे एकोणा ओपन कोळसा खाणीमूळे होणारे प्रदुषण व कोळसा वाहतुकीमूळे होणारे प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून अनेकांना श्वसनाचे, दमाचे यासह अनेक आजार उद्‌भवने तर शेतकऱ्यांची शेती सुध्दा कोळशाच्या धुळीमूळे संपूर्ण पिक खराब होऊन नष्ट होत असल्याने शेतकऱ्यासह त्यांच्या कुटूंबाना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, कोळसा खदानीत होणाऱ्या विस्फोटामूळे नागरिकांच्या घराला तडे जात असून केव्हाही घरे कोसळून जिवित हानी सुध्दा होण्याचा धोका असणे, या गंभीर प्रकराची तक्रार व निवेदन एकोण कोयला खदान संघर्ष समितीच्या वतीने मुख्य प्रंबधक निर्देशक वेस्टर्न कोलफिल्ड लि., नागपूर व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना वेळोवेळी देण्यात येणे, मात्र सदर तक्रारीवर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामूळे शेतकऱ्यांसह नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष व संतांपाचे वातावरण परिणामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (१५३) | “सोलापूर जिल्ह्यातील तत्कालीन उपजिल्हाधिकारी पुनर्वसन व तहसीलदार व महसूल विभागातील कर्मचारी यांनी सन २०१६ ते सन २०२० च्या दरम्यान पदाचा दूरपोयोग करून पुनर्वसन जमिनी व भूखंड दुबार वाटप करून सुमारे ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, सदर भूखंड अथवा जमिनी सन १९८८ ते २०१२ या उजनी व सातारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पुनर्वसन कायद्याअंतर्गत वाटप करण्याचे शासनाचे आदेश असणे, सदर रहिवासी भूखंडाचे /जमिनीचे वाटप सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे सिद्धापूर व त्याच्या सभोवतालच्या गावांमध्ये तसेच पंढरपूर तालुक्यात, उत्तर सोलापूर तालुक्यात तर काही मोहोळ तालुक्यात झालेले असणे, पुनर्वसन कायद्याप्रमाणे एखाद्या जमीन अथवा भूखंडाचे वाटप केल्यास त्याच प्रकल्पग्रस्तास दुबार जमीन किंवा भूखंड वाटप करता येत नसणे असा कायदा असताना देखील तत्कालीन उपजिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी व पुनर्वसन जिल्हाधिकारी यांनी संगणमताने पूर्वी वाटप झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कागदोपत्री हेराफेरी करून दुपार शेतजमिनी व एका प्रकल्पग्रस्तास पाच पाच भूखंड वाटप केल्याचे निदर्शनास येणे, उदाहरण | श्री. समाधान अवताडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | दाखल पूर्वी झालेल्या आदेशाची यादी व पदाचा गैरवापर करून शेत जमिनी व भूखंडाची दुबार वाटप केलेले ची माहिती खालील प्रमाणे असणे, अ.क्र.प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची नावे आदेश तालुका गाव गट क्र. १ श्रीपती सीताराम वाडकर व इतरक्र.पुनव/फे/सी.आर दि.१९९० मंगळवेढा ४३५५/२ ब २ मारुती कोंडीबा पवार व नथुराम मारुती पवार व इतर क्र.पुनव/३, एस आर/०२/१०/आरआर/२५७/१० उतर सोलापूर बेलाटी१४६/०२३ कोंडीबा गेनू शेंडगे व ज्ञानदेव कोंडीबा शेंडगेक्र.पुनव/३/आर आर/ ५१७/१०/ आर आर/६/२०१०उत्तर सोलापूर भाटेवाडी १९/१ पैकी ४ श्रीमती तनु पांडू वरवडे व मारुती पांडू वरवडे क्र.पुनव/३/आर आर/९७/१० इसार/१७६/१० इ.०३/०५/२०१० मंगळवेढा ४३५५/२ अ २ पदाचा गैरवापर करून भूखंडाचा दुबार वाटप त्याच व्यक्तीच्या नवे केल्याची यादी अ.क्र.प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची नावे आदेश तालुका गाव गट क्र. १ श्रीपती सीताराम वाडकर व इतरक्र.पुनव/फे/सी.आर दि.१९९० मंगळवेढा सिद्धपुर फेरफार ३३०४ ने नोंद २९० व २६३ व २४४ २ मारुती कोंडीबा पवार व नथुराम मारुती पवार व इतर क्र.पुनव/३,एस आर/०२/१०/आरआर/२५७/१० मंगळवेढा सिद्धपुर फेरफार ३३१२ ने नोंद ३०४ क्षेत्र १.२१ आर व ३८२ क्षेत्र १.२३ आर ३ कोंडीबा गेनू शेंडगे व ज्ञानदेव कोंडीबा शेंडगेक्र.पुनव/३/ आर आर/५१७/१०/आर आर/६/२०१०मंगळवेढा सिद्धपुर फेरफार ३४४० ने नोंद ४४३ ४ श्रीमती तनु पांडू वरवडे व मारुती पांडू वरवडे क्र.पुनव/३/आर आर/९७/१० इसार/१७६/१० इ.०३/०५/२०१० मंगळवेढासिद्धपुर ६६१तत्कालीन उपजिल्हाधिकारी पुनर्वसन यांनी चक्क सरकारी जमिनीचे दुबार वाटप करण्यासाठी एकरी दोन लाख ते पाच लाख रुपये असे दर ठरवून दलाला मार्फत सदर रक्कम घेऊन तालुक्यातील शेत जमिनी व भूखंड वाटप करण्याचे काम निर्धास्तपणे केलेले असणे, तसेच सन २०१६ ते २०२० च्या दरम्यान महसूल विभागातील अनेक अधिकारी, वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतः कागदोपत्री हेराफेरी करून मोठ्या प्रमाणावर शासकीय भूखंड विकत घेतले असणे, याबाबतची अधिक माहिती मिळवण्याकरता माहिती अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केला असता संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडून वारंवार दिरंगाई करून टाळाटाळ केला जात असल्याचे देखील निदर्शनास येणे, तसेच पुरावे सादर करून देखील तक्रारदारास चुकीची माहिती उपलब्ध करून देणे, वारंवार वरिष्ठांकडे तक्रार करून देखील सदर प्रकरणी साधी चौकशी देखील केली नसल्याची निदर्शनास येणे, याकरता शासनाने पुनर्वसन अंतर्गत सन २०१६ पासून ते २०२० पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील वाटप करण्यात आलेल्या सर्व | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | जमीन व भूखंडाचे रेकॉर्ड त्वरित जप्त करून त्याची सखोल चौकशी करून शासनाची फसवणूक करून कोट्यावधींचे नुकसान केलेल्या संबंधित तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची कारवाई.” | | |
| (१५४) | “पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यातील १६ गावांत भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे व शिरुर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे व न्हावरा परिसरातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर इतर हक्कात टाकलेल्या शेऱ्याऐवजी “पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय” असा शेरा मार्च, २०२२ मध्ये फेरफार होऊन दाखल करण्यात येणे, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यातही अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही अशा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनी हस्तांरणाच्या व्यवहारावरील असलेले निर्बंध उठविण्याची कार्यवाही करणेबाबत दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे उठविणेबाबत कार्यवाही झालेली असणे, मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी जानेवारी, २०२२ वा त्या सुमारास हवेली तालुक्यांतील १८ गावांत ७/१२ वरील इतर हक्कातील पुनर्वसन राखीव शेरा कायमस्वरुपी कमी करणेबाबत प्रस्ताव शासनास दाखल होऊनही अद्यापपर्यंत त्यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, मा. उच्च न्यायालयामध्ये ज्यांनी ७/१२ वरील शेरे उठविणेबाबत याचिका दाखल केली त्यांचे शेरे उठले परंतू आर्थिक दुर्बल घटकातील शेतकरी न्यायालयामध्ये गेले नसल्याने त्यांचे ७/१२ वरील शेरे उठलेले नाहीत, शेतकऱ्यांच्या ७/१२ वर सद्या “पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त् शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय” असा शेरा टाकण्यात आल्याने या अर्थ काय याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम अवस्था निर्माण होणे, शेतकऱ्यांना स्वतःचा व्यवसाय करावयाचा असेल तर शेती ना विकास झोन करता येणार नसल्याने शेतकरी उद्योग व्यवसायाला चालणा न मिळणे याकरिता ७/१२ वरील “पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय” असा शेरा पुर्णतः काढणेबाबत शासन शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची प्रतिक्रया.” | ॲड. अशोक पवार, श्री. दिलीप मोहिते-पाटील, श्री. चेतन तुपे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (१५५) | "पुणे जिल्हातील शिरुर तालुक्यातील चासकमान प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी जमीन संपादित झालेली असताना लाभ क्षेत्रात वीर, नीरा देवघर, गुंजवणी, टेमघर, उजनी, कळमोडी, भामा आसखेड या प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी जमिन वाटप करणे, चासकमान प्रकल्पाचे धरणग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाल्याचे असतानाही लाभ क्षेत्रातील जमिनीवर संपादन होण्याचे शेरे असणे, सन १८९४ च्या भूसंपादन कायदयाने कलम ४ व कलम ६ च्या अधिसूचना २०१३ च्या नवीन भूसंपादन कायद्याने व्यपगत असल्याने शेरे काढून टाकणे आवश्यक असणे, एकत्र कुटुंब पध्दीतीत ए.कु.म्य.असे ८ अ नोंद असताना सहहिस्सेदार यांचे क्षेत्र विभागणी करणे गरजेचे होते तसे न करता शेतकरी खातेदारांना अल्प भूधारक, भूमिहीन करणे, स्लॅब आकारताना कालवे, रस्ते, पाझर तलाव, लागवडी अयोग्य क्षेत्र वगळायाची तरतूद असताना अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीवर चुकीचे संपादन करणे, परंतू सदरचा भाग हा स्लॅब मधून वगळणे आवश्यक असणे, स्लॅब आकारणी करताना लाभ क्षेत्रातील व लाभ क्षेत्राबाहेरील जमिनीच्या १/४ जमीन हिशोबात धरुन स्लॅब आकारणी करणे आवश्यक असतानाही लाभ क्षेत्राबाहेरील जमिन प्रत्यक्ष शेतीसाठी पाण्याचा लाभ होत नाही. असे संपादन मंडळाचे अभिप्राय असतानाही चुकिचे स्लॅब लावणे, प्रामाणित संकलन नसताना बोगस प्रकल्प ग्रस्तांना जमिन वाटप होणे, संकलानात फेरबदल करण्याचे अधिकार नसतानाही प्रकल्प ग्रस्तांची संकलने बदलणे, प्रकल्प ग्रस्तांना जमिन वाटप झाल्यावर लगेच कायदयातील तरतुदीचे उल्लंघन करुन अधिकार अभिलेखात फेरफार होण्याआधीच जमिनीचे एंजट लोकांनी खरेदी खते नोंदवणे, जिल्हा पुर्नवसन कार्यालयात संपादित जमिन वाटप जमिन यांचा हिशोब नसणे, त्यामुळे एकाच कुटुंबात दुबार-तिबार वाटप होण्याची शक्यता असल्याने जिल्हा पुनर्वसन कार्यालयाची १९९० पासून दप्तर तपासणी होणे गरजेची असणे, वीर, नीरा देवघर, गुंजवणी, टेमघर, उजनी, कळमोडी, भामा आसखेड यांचे त्यांचे लाभ क्षेत्रात धरण ग्रस्तांचे पुनर्वसन होणे गरजेचे असणे, शिरुर तालुक्यातील शेतकऱ्यांची ७/१२ वरील चासकमान, टेमघर इत्यांदी पुनर्वसनाचे शेरे पुर्णतः उठविणेबाबत शासनाने केलेली कार्यवाही, प्रकल्पनिहाय लाभार्थ्यांना वाटप झालेल्या व राखीव ठेवलेल्या प्रकल्पाग्रस्तांची माहिती मिळणेबाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे व पुनर्वसन विभाग, पुणे यांना लोकप्रतिनिधीने ९ स्मरणपत्रे देवूनही अद्यापर्यंत पुनर्वसन विभाग, पुणे यांच्याकडून माहिती उपलब्ध न होणे, पसंतीनुसार प्रकल्पग्रस्तांना शेती जमिन गट वाटप मंत्रालय स्तरावर न होता ते गट वाटप जिल्हास्तरावर सक्षम अधिकाऱ्याकडून होणे अपेक्षित असणे, तसेच | ॲड. अशोक पवार,श्री. दिलीप मोहिते-पाटील,श्री. चेतन तुपे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचा आदेश असतानाही हवेली तालुक्यातील १६ गावे व दौंड तालुक्यातील ९ गावांचे भामा आसखेड प्रकल्पाचे ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे अद्यापर्यंत काढलेले नसणे, एप्रिल, २०२२ च्या सुमारास पुनर्वसन विभाग, पुणे यांच्याकडून सदरचे शेरे काढणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवूनही कारवाई न होणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१५६) | "विभागीय आयुक्त अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे स्मरणपत्र क्रमांक माहे जानेवारी, २०२३ चे दरम्यान शासनास सादर केलेला प्रस्ताव या अगोदर दिनांक २४/११/२०२०व त्यानंतरची स्मरण पत्र क्रमांक डिसेंबर, २०२२ च्या दरम्यान तालुका भातकुली जिल्हा अमरावती प्रकल्पातील सावरखेडा ततारपुर अंशतः बाधीत गावांचे १००% पुनर्वसण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असणे त्या प्रस्तावामध्ये अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील प्रकल्पाला जो मोबदला दिला तो मोबदला व तोच न्याय पेढी प्रकल्पातील लाभधारकांना देण्याबाबत संबंधित पेढी प्रकल्प ग्रंस्ताची मागणी केली असणे वारंवार शासनाचे माननीय मंत्री महोदय व विभागास निवेदन दिले असूनही अद्याप पर्यंत शासनाकडून कोणत्याही प्रकारची करवाई झाल्याचे दिसून न येणे, पेढी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे वारंवार मागणी केली असणे व त्या मागणीद्वारे धरणांचे काम पूर्ण करून सुरु करणे, काहीं गावांचे पुनर्वसन करण्याचे आदेश देण्याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडे दिलेल्या निवेदनात आमरण उपोषणाचा इशारा दिला असणे. तातडीने वरीप्रमाणे निर्णयात्मक आदेश करण्याकरिता या संबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका वा प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा, वि. स. स. | कित्ता |
| (१५७) | "देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या गावातील पूरग्रस्त बाधित कुटुंबाच्या वस्तीचे शासनाने मंजूर केलेल्या मौजे आंबवण, ता.उमरखेड येथील जागेचे पुनर्वसन मागील १७ वर्षापासून रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे दिवसरी गावामध्ये पाणी शिरुन १८७ कुटूंबांच्या घरांचे पडझड होऊन मोठया प्रमाणात नुकसान होणे, याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी मा. सचिव, मदत पुनर्वसन विभाग यांना आधित १८७ कुटूंबांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणे, सदरील प्रस्तावाच्या अनुषंगाने बाधित कुटूंबांचे पुनर्वसन मौजे आंबवण (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे सर्व | श्री. संतोष बांगर, श्री. नामदेव ससाणे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | सोयीसुविधांसह प्रस्तावित केलेला आहे. परंतु याबाबत १८७ कुटुंबांना न्याय मिळण्यास आजपावेतो विलंब होत असणे, मागील अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ मध्ये विधीमंडळ सभागृहात तारांकित प्रश्न क्रमांक ३८१८६, दि.०७/०३/२०२२ रोजी उपस्थित केला असता तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्री यांनी सदरील बाधित कुटूंबाचे पुनर्वसन नियमात बसत असल्याने पुढील एका महिन्यामध्ये बाधित कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात येईल असे आश्वासन दिले असणे, परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे आढळून येणे, परिणामी बाधितांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व चिंता निर्माण होणे, त्यानुषंगाने शासन निर्णय दि.१४/१०/२०२२ नुसार जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून पत्र क्रमांक जिपुर्व/अ.का.१/कावि/१२३/ २०२३ या दिनांक ०८/०२/२०२३ रोजी उपसचिव मदत व पुनर्वसन मंत्रालय यांच्याकडून शासनास पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला असणे, जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी देवसरी येथील बाधित कुटुंबाचे मौजे आंबवण (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील नवीन जागेवर स्थलांतरीत करुन गावातील बाधित कुटूंबाचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण निर्णय घेईल, असे शासनास पाठविलेल्या प्रस्तावात नमूद केले असणे, करीता १८७ बाधित पूरग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन त्वरित करण्याबाबत व त्यांचेवर होणारा अन्याय दूर करुन बाधिताना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१५८) | अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील मौजे मातुलठाण, सरला गोवर्धन, महाकालवडगाव ७ कमालपूर, खानापूर, भामाठाण आदि गोदावरी नदीकाठच्या पूररेषा नियंत्रण रेषे मधील गावांना नवीन गावठाण मंजूर करण्यात आलेले असणे, सन १९७२ मध्ये किंवा त्या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वरील सर्व गावांसाठी जमीन संपादन करण्यात आलेली असणे, तथापि सरला - २६७ गोवर्धन - ३२८, भामाठाण -३३८, महाकालवडगाव - ४१६, कमालपूर- ११४, खानापूर - १६३ आणि मातुलठाण- ३३८ एवढ्या मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी असणे तथापि जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा तहसीलदार यांनी आज पावतो संपादित गावठाणा मध्ये प्लॉट पाडून सर्व लाभार्थ्यांना प्लॉटचे वाटप केलेले नसणे, त्यामुळे अद्यापही अनेक लाभार्थी जुन्याच गावात राहत असणे, जुन्याच गावात धोकादायक स्थिती मध्ये राहत असणे, लाभार्थ्यांच्या नावे प्लॉट जमीन नसल्याने शेकडो लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही रद्द होत असणे, शाळा, अंगणवाडी | श्री. लहू कानडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | पाणीपुरवठा योजना अशा सार्वजनिक अत्यावश्यक सुविधा पासून ग्रामस्थ वंचित राहत असणे, आणि याबाबत तहसीलदारांकडे सदर प्लॉट वाटपाबाबत वारंवार मागणी करूनही प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | | |
| (१५९) | "राज्यात करोना काळात मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर टोल वसूलीचे कंत्राट मिळालेल्या मे.आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. या कंपनीला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एम.एस.आर.डी.सी.) अधिकाऱ्यांनी करोना काळातील भरपाई म्हणून सुमारे ७१ कोटी रुपये शासकीय निधी मंजूर करुन दिल्याचा धक्कादायक प्रकार दि.८.२.२०२३ रोजी निदर्शनास येणे, आपत्ती उद्‌भवल्यास त्याला अराजकीय परिस्थिती मानली जावी अशी परिस्थिती उद्‌भवल्यास अपरिहार्य कारणाने होणारे नुकसान त्या त्या पक्षकाराने स्वतः सोसावे त्याबाबत कोणत्याही पक्षकारांना परस्परांना भरपाई देण्याची आवश्यकता नसेल असे एमएसआरडीसी व आयआरबी मध्ये झालेल्या कंत्राटात स्पष्ट नमुद असतानाही राज्य शासनाने २६ मार्च ते १९ एप्रिल २०२० या कालावधीत झालेल्या ७१ कोटी ४ लाख रुपयांच्या नुकसानीबद्दल भरपाई मिळण्यासाठी आयआरबीने सादर केलेल्या अर्जात मान्यता देण्याचा घडलेला बेकायदा व नियमबाह्य प्रकार, शिवाय एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी आयआरबी कंपनी व्यवस्थापनाने आर्थिक संगनमत करुन सदरहू ७१ कोटी रुपये निधी शासनाकडून मंजूर करुन घेऊन आर्थिक घोटाळा करण्यात येणे, यामुळे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात झालेला अपव्यय, सदरहू मुंबई-पुणे महामार्गावर आयआरबी कंपनीने २०१९ पर्यंत जवळपास १५ वर्षे टोल वसुली करण्यात येणे, त्यानंतरही त्याच कंपनीला नव्याने करार करुन टोल वसुलीसाठी दिलेली मुदतवाढ ही बेकायदा असल्याची धक्कादायक माहिती उघड होणे, राज्य सरकारने राज्यातील ५३ टोलनाक्यावरील टोल वसुली बंद करण्याचा निर्णय घेणयात येणे, त्याच धरतीवर मुंबई-पुणे महामार्गावरील टोल वसुली बंद करण्याचा शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन एमएसआरडीसीचे संबंधित अधिकारी आणि आयआरबी कंपनी व्यवस्थापन विरुद्ध कारवाई करुन सदरहू मंजूर केलेली रक्कम पुन्हा वसूल शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१६०) | “ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, नवी मुंबई यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या कल्याण शिळ रस्त्याचे सहा पदरीकरणाचे काम रस्ते विकास महामंडळातर्फे सुरु असणे, या कामासाठी मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. जेव्ही मे.एस. एम. एस. एल. या कंत्राटदारांची नियुक्ती करुन टप्पा-१ साठी ३८९ कोटी मंजूर असणे, अत्यंत महत्त्वाच्या या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने मा. मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिलेली असणे, त्यानंतर सतत पाठपुरावा केल्यानंतर महामंडळाने कामाचा दर्जा तपासण्यासाठी व्ही. जे. टी. आय. या त्रयस्थ संस्थेची नियुक्ती करण्यात येणे, या संस्थेने केलेल्या पाहाणीत रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होऊन ४० ठिकाणी रस्ता वापरण्यायोग्य नसल्याचे अभिप्राय नोंदविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, संस्थेने शासनास सादर केलेल्या संरचनात्मक अहवालात केवळ १० कि.मी. लांबीच्या रस्त्यात ६४ पॅनलमध्ये तडे गेल्याचे आढळून येणे, या रस्त्याचे काम कंत्राटदार कंपनीने अतिशय संथगतीने करुनही अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याने सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचे होत असलेले हाल, अनेक वेळा अपघात झालेले असणे, असे असतानाही जबाबदार अधिकाऱ्यांनी ज्याकडे जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, लोकप्रतिनिधींना दिलेले खोटी व दिशाभूल करणारी उत्तरे, केवळ अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने शासनाच्या निधीचा होत असलेला दुरुपयोग, वारंवार निदर्शनास आणूनही कारवाई करण्यास होत असलेली टाळाटाळ, अधिकाऱ्यांकडून दोषींना पाठीशी घालण्याचा सुरु असलेला प्रयत्न, त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांमध्ये निर्माण झालेला संताप व चिड पाहता याकडे तातडीने लक्ष घालून कल्याण शिळ रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधित कार्यकारी अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना तातडीने निलंबित करुन त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता तसेच मे. साकेत इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. जेव्ही मे. एस. एम. एस. एल. या कपन्यांना काळ्या यादीत टाकून शासनाचे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. प्रमोद पाटील वि. स. स. | कित्ता |
| (१६१) | “लातूर जिल्हयातील अहमदपुर, जळकोट, उदगीर या तालुक्यात बी.आर.आंदे कन्स्ट्रक्शन या कंपनीमार्फत सातत्याने भ्रष्टाचार होत असुन संबंधित तालुके अंतर्गत गांवे १.जळकोट तालुक्यात घोणसी ते आतनुर | श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | डांबर रोड काम २.अहमदपुर तालुक्यात शि. ताजबंद ते वायगांव पाटीचे रोड काम ३.उदगीर शहरातील शिवाजी चौक ते जाकेर हुसेन चौक व जाकेर हुसेन चौक ते तोंडार पाटी पर्यत सिमेंट रोड व डिवायडर व रोड च्या दोन्ही बाजुने साईड पट्टयाचे काम मोजमाप पुस्तिकेप्रमाणे होत नसल्याचे व हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या रस्त्याचे काम करण्यासाठी एक मिटर जमिन खंदणे व खंदवल्यानंतर रोड बांधणे आवश्यक असतानाही विनाखोदकाम जुन्या डांबरी रोडवर सिमेंट बांधुन शासनाची फसवणुक करुन या मध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार संबंधितांनी केली असल्याचे सकृतदर्शनी आढळले, सदर रोडवर डिवायडर चे खोदकाम न करता कमी प्रमाणात स्टील वापरणे. एम.बी. प्रमाणे काम न करता बेकायदेशीरपणे काम केल्याने शासनाचा कोटयावधी रुपयांचा निधी लाटला असणे, हा भ्रष्टाचार अभियंता व गुत्तेदार यांच्या संगनमताने केला असणे, याकरिता सदर कामाची गुणनियंत्रक पथकामार्फत चौकशी करुन संबंधित शाखा अभियंता श्री. देशपांडे, जळकोट उपअभियंता देवकर, उदगीर यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करावी तसेच बी.आर.आंदे कन्स्ट्रक्शन कंपनीची मान्यता रद्द करुन काळया यादीत टाकण्यात यावे असे निवेदनाद्वारे सातत्याने संबंधित नागरिकांनी मागणी करीत असुन अनेक वेळा मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा. बांधकाम सचिव, मा. विभागीय अधिकारी, मा. जिल्हाधिकारी तसेच संबंधित प्रशासनाला निवेदनामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे परंतू आवश्यक कार्यवाही व दोषापिंतावर कारवाई न झाल्याने नागरिक सध्यःस्थितीत मुंबईतील आझाद मैदान येथे उपोषणास बसले असुन अद्यापही उचित कार्यवाही, चौकशी न झाल्याने शासनाने त्वरीत याबाबत चौकशी करुन करावयाची कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (१६२) | “अमरावती जिल्ह्यातील भिवापूर तलाव तालुका जिल्हा अमरावती या तलावा वरुन मोगरा, भानखेडा “बु” कस्तुरा, भांनखेडा खुर्द, अंजनगाव बारी, या गावांना पाणीपुरवठा होत होता परंतु अतिवृष्टीमुळे धरण ओव्हरफ्लो झाल्यामुळे धोका निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने तलावाचा बांध संरक्षण भिंत तोडली असणे त्यामुळे संबंधित गावांना या तलावातून पाणीपुवठा होत नाही तसेच तोडलेल्या बांध संरक्षण भिंत पुन्हा बांधकाम करणे करिता दहा कोटी रुपये निधी मंजूर करून देणेबाबत तसेच या तलावामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साठलेला असुन तो गाळ काढणे तसे खोलीकरण करणे बाबत तसेच इतर सुविधांची कामे | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | करण्याकरिता जिल्हा वार्षिक योजनेतून किंवा इतर योजनेतून पाच कोटी रुपये असे एकूण पंधरा कोटी रुपये मंजूर करण्यात यावे या संबंधाने जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १३/१२/२०२३ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र देऊन वरील प्रमाणे मागणी केली असणे जिल्हाधिकारी अमरावती यांना सदर प्राप्त मागणी १७/०२/२०२३ रोजी प्राप्त झालेली असणे, त्यावर जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिनांक २१/०२/२०२३ रोजी उपवनसंरक्षक अमरावती वन विभाग अमरावती, जिल्हा जलसंधारण अधिकारी विभाग अमरावती यांना. सदर वरील नमूद प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविले असणे, उन्हाळ्याचे दिवस बघता वरील मागणी तातडीने मान्य होण्याकरता तातडीनं निर्णयात्मक आदेश काढण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची यासंबंधाने प्रतिक्रिया.” | | |
| (१६३) | “छत्रपती संभाजीनगर येथील जलसंधारण महामंडळाच्या कार्यालयात कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या कामाची १ कोटी ३७ लाख रुपयांची बिले काढण्यासाठी साडेसात टक्क्यांनी ८ लाख ५३ हजार २५० रुपयांची लाच घेताना संबंधीत दोषी अधिकाऱ्यांना फेब्रुवारी, २०२३ मध्ये अटक करण्यात येणे, यामध्ये लाच घेणारे उपविभागीय जलसंधारण अधिकारी व लिपिक यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात येणे, परभणी जिल्ह्यातील जलसंधारणाची ही कामे असून त्याची १८ लाख व १ कोटी १९ लाख असे १ कोटी ३७ लाखांची बिल प्रलंबित असताना ही बिले काढण्याकरीता लाचेची मागणी करण्यात येणे, बिले काढण्यासाठी संबंधीतांनी व्यवस्थापकीय संचालक सुनील कुशिरे यांच्यासाठी ७.५ टक्के प्रमाणे ८ लाख ५३ हजार रुपये व स्वतःसाठी आणि महामंडळ कार्यालयाचे मिळून ५०,०० रुपये असे एकूण ८५३२५० रुपयांची मागणी करणे, सदरहू प्रकरणी केवळ दोन दोषींवर कारवाई झाली असल्याने मुख्य आरोपी असलेले सुनील कुशिरे यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला नसून कारवाई झाली नसणे, त्यामुळे तक्रारदार यांनी सदरहू व्यवस्थापकीय संचालकावर कारवाई करण्याची मागणी करणे, शासनाने या प्रकरणात तात्काळ चौकशी करून संबंधीत दोषी व्यवस्थापकीय संचालक सुनील कुशिरे यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | श्री. नारायण कुचे,श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर वि. स. स. | कित्ता |
| (१६४) | “महाराष्ट्र शासनाच्या वसुंधरा पाणलोट विकास पुणे मार्फत जुलै, २०२२ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्था यांच्या कडून अर्ज मागविण्यात येणे, त्यानंतर सदर | श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रकल्प राबविण्याकरीता दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे यांच्यामार्फत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार PIA म्हणून काम करण्यासाठी शासकीय यंत्रणा व अशासकीय संस्था यांची जिल्हा स्तरावर छाननी करणे PIA यांची निवड करण्यात येणे असे पत्र सर्व संबंधित जिल्हा स्तरावर देण्यात येणे, केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर योजनेतील प्रकल्प अंमलबजावणी ही शासकीय यंत्रणा व अशासकीय संस्था मार्फत राबविण्याचे धोरण असणे तत्कालीन सचिव यांनी दिनांक ४.११.२०२२ च्या SLSC बैठकीचे केंद्र शासनाने मंजूर करणे महाराष्ट्र महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व १४४ प्रकल्प हे शासकीय यंत्रणेमार्फत राबविण्याच्या सूचना व आदेश दिलेले असणे, केंद्रशासनाच्या मार्गदर्शन सूचनेच्या क्रमांक ११.२.१ नुसार योजनेतील २५% प्रकल्प हे अशासकीय संस्थांना देण्यात येणे असा नियम असताना संबंधित विभागाने संस्थांना या योजनेपासून वंचित ठेवण्याचे काम करणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शन तत्वांच्या छेद दिले असणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.” | | |
| (१६५) | “पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेत कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचे येथील नागरिकांच्या तक्रारी असणे व वस्तूस्थितीही तशीच असणे, तेथे या योजनेत नाला खोलीकरणाच्या कामांत अधिकाऱ्यांनी सविस्तर अंदाजपत्रकात चूकीचे दर वापरुन अवास्तव रकमेची अंदाजपत्रके तयार करणे, सिमेंट नालाबांधाची कामे तांत्रिकदृष्टया अयोग्य केलेली असणे, सलग समतल चराची कामे डोंगराळ भागात दर्शविण्यात आली असून फक्त १५ ते १६ टक्के एवढीच कामे होणे, तथापि या संपूर्ण कामाची बिले काढलेली असणे, माती नालाबांधात पाया खोदला नसणे, नाला खोलीकरण व बांधातील गाळ काढणे ही कामे केल्याचे भासवून कामे न करता अपहार केलेला असणे, महात्मा फुले जलभूमी योजनेतंर्गत रु.५.५. कोटी निधी फक्त एका दिवसात ई-निविदा न करताच खर्च करणे, येथील एका मशिनधारकास एका आर्थिक वर्षात आर्थिक संगनमत करुन रु.१.६० कोटी रकमेची नियमबाहय कामे देणे, यासंदर्भात प्रशासनाने येथे गैरप्रकार केले असणे, याबाबत येथे तक्रारी झाल्यावर तत्कालीन अधिक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, पुणे यांचे तपासणी अहवालावर अद्याप कार्यवाही न होणे, त्यामुळे शासन या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे येथील जनतेत भावना निर्माण होणे, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही | श्री. संजय जगताप, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | व्हावी, अशी मागणी असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१६६) | "महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या माहे जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या ६३ व्या बैठकीत जलसंधारणाची कामे कंत्राटदारांना देताना त्यांनी केलेल्या पूर्वीच्या कामाचा दर्जा तपासून नवीन कामे देण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी दिल्या असतानाही गतवर्षी जुन-जुलै महिन्यात मराठवाडयातील स्थगिती दिलेल्या २७६ कामांवरील स्थगिती उठवून कोटयावधी रुपयांच्या कामांना मंजुरी दिल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, हिंगोली व इतर जिल्हयातील कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामासह इतर कामांचा स्थगिती उठविलेल्या २७६ कोटींच्या यादीत समावेश असणे, सदरहू कामे रेवडी कल्चरल प्रमाणे वाटप करुन प्रत्यक्षात कामे न करताच अगाऊ बिल अदा केल्याचा प्रकार घडणे, जलसंधारण महामंडळाच्या उपविभाग वैजापूर येथील उपविभागीय जलसंधारण अधिकारी ऋषीकेश प्रल्हादराव देशमुख यांस दिनांक ६/२/२०२३ रोजी व्यवस्थापकीय संचालक कुशिरे यांचेसाठी सुमारे साडेआठ लाख रुपयांची लाच घेताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडून अटक केल्याचा घडलेला प्रकार, त्यानंतर १६ व्या दिवशी देशमुख यांचे निलंबनाचे आदेश मृद व जलसंधारण विभागाने जारी करण्यात येणे, त्यांचा पदभार के.ए.साखरे यांचेकडे देण्यात येणे, साखरे हे सध्या परिविक्षाधीन असतानाही शासनाचे नियम डावलून शिकाऊ अभियंत्याकडे पदभार सोपविण्यात येणे, विशेष म्हणजे लाचलूचपत विभागाच्या एफआयआरमध्ये रक्कम घेताना व्यवस्थापकीय संचालक कुशिरे यांना साडेसात टक्क्यांप्रमाणे रक्कम देण्याबाबत उल्लेख होऊन त्यानुसार कुशिरे यांचे नाव आले असतानाही अद्याप त्यांचेविरुध्द शासनाने कोणतीच कारवाई न करता सदर प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकण्यात येणे, रु.२७६ कोटींचा आर्थिक घोटाळा प्रश्न कायम असताना महामंडळाने मध्यंतरी ६ हजार कोटींची रद्द केलेली कामे तसेच अलीकडे एक हजार कोटीपेक्षा अधिक कामे महामंडळान मंजुर केल्याप्रकरणी कुशिरे संशयाच्या भोवऱ्यात सापडणे, मराठवाडयातील जलसंधारणाच्या सर्व कामांचे निर्णय पुणे येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या मुख्यालयातून घेण्यात येणे, सदरहू प्रकरणात महामंडळाचे | श्री. सुरेश भोळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | व्यवस्थापकीय संचालक सुनिल कुशिरे व संबंधित अधिकारी यांनी शासनातील उच्च पदस्थांच्या आशिर्वादाने कामांना मंजुरी देऊन ठेकेदारांशी आर्थिक संगनमत करुन यातील दोषींविरुध्द तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, यास्तव कुशिरे यांना तात्काळ बडतर्फ करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची जनतेतून होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | | |
| (१६७) | “सफाई कामगारांसाठी लाड समितीच्या शिफारशीनुसार त्यांचे वारसांना शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाची भूमिका असणे, त्यासाठी वाल्मिकी, मेहतर समाजाला सामाजिक, आर्थिक संरक्षण देण्यासाठी त्यांचेसाठी वारसा पध्दत पुढे चालू ठेवण्यात येणे, अशा अनेक शासन निर्णय अस्तित्वात असतांना सुध्दा घाण व कचऱ्यांशी संबंधित कर्मचारी, शवग्रह सेवक / परिचर, धोबी, स्मशान कामगार, मलवाहिन्या, ड्रेनेज व स्टॉर्म वॉटर ड्रेनेज मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सफाई कामगार पदनाम देऊन लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याची सफाई कामगार संघटनांची मागणी, सफाई कामगारांच्या घरांचा २१ वर्षे प्रलंबित असलेला अनुशेष भरुन काढणे, वर्षांचे ३६५ दिवस चालणाऱ्या या अत्यावश्यक कामासाठी ठेकेदारी प्रथा बंद करण्याची मागणी, एकंदरीत सफाई कामगारांच्या समस्या व सोईसुविधाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. रोहित पवार, श्री. विनोद निकोले, श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. छगन भुजबळ, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. दौलत दरोडा, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. गणपत गायकवाड, डॉ. बालाजी किणीकर, श्री. कुमार आयलानी, श्री. किसन कथोरे, कुमारी आदिती तटकरे, श्री. संजय जगताप, श्री. अबू आजमी, वि. स. स. | कित्ता |
| (१६८) | “अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून संयुक्तपणे भारत सरकार शिष्यवृत्ती देण्यात येत असणे, ही शिष्यवृत्ती महाडीबीटीच्या संकेतस्थळावरून शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असणे, शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मुदत वाढ देण्यात येणे, मात्र मात्र सन २०२२/२३ च्या मध्ये अनुसूचित जाती व नव बौद्ध संवर्गाचे आतापर्यंत राज्यातून २ लाख ९० हजाराचे ऑनलाईन नोंदणी झालेली असणे, त्यापैकी समाज कल्याण विभागाकडे प्राप्त झालेले १ लाख ४२००० अर्ज मंजूर करण्यात येणे मात्र १ लाख ते २० हजार अर्ज महाविद्यालयाकडे प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, विशेष म्हणजे समाज कल्याण विभागाने वारंवार | श्री. लहू कानडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | याबाबत सूचना करूनही काही महाविद्यालयाने जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर येणे, मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांना संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून नोटीस बजावून महाविद्यालयाचे मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येणार असल्याचे सामाजिक न्याय विभागाचे सचिव आणि आयुक्त यांनी याबाबत आढावा घेतल्याचे समोर येणे, याबाबत शासनाने विद्यार्थ्यांच्या नुकसान करणाऱ्या महाविद्यालया विरोधात करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (१६९) | "सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करून यांतर्गत सन २०२१ मध्ये संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आली असणे मात्र या योजनेतून ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी २० वसतिगृहे मंजूर करून देखील अद्यापही वसतिगृहे सुरू करण्यात आलेली नसणे, ऊसतोड कामगारांना स्थलांतर करून अन्य ठिकाणी ऊस तोडणीसाठी जाताना आपल्या पाल्यांची शाळा सोडून द्यावी लागणे व त्याचे गंभीर परिणाम त्या मुलांच्या आयुष्यावर होत असणे, लोकप्रतिनिधी मार्फत मंजूर करण्यात आलेली वसतिगृहे तात्काळ सुरू करण्याबाबत वारंवार मागणी होत असणे व सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात सातत्याने मागणी करूनही सदर वसतिगृहे सुरू न झाल्याने विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान, त्यावरून पसरलेला असंतोष यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |
| (१७०) | "ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली असणे मात्र मागील सुमारे सहा ते आठ महिन्यांपासून महामंडळाचे कामकाज पूर्णपणे ठप्प असणे, ऊसतोड कामगारांची नोंदणी प्रक्रिया ठप्प असून पूर्वी नोंदणी केलेल्या कामगारांचे रेकॉर्ड शासनाकडे उपलब्ध नसणे, राज्यातील साखर कारखाने यांच्याकडून कामगार कल्याण निधी संकलित करण्याबाबत सरकारची भूमिका उदासीन असणे व त्यामुळे ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी कोणतीही योजना किंवा उपाययोजना शासनाने अस्तित्वात आणलेली नसणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ तातडीने कार्यान्वित करून रखडलेली कामगार नोंदणी पूर्ण केली जावी, महामंडळाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू केले जावे, ऊसतोड कामगार कल्याण निधीचे संकलन केले जाऊन कामगारांसाठी सुरक्षा, आरोग्य व विमा आदी योजना लागू केल्या जाव्यात याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (१७१) | “मुंबईतील दादर येथील इंदूमिल परिसरात उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारक उभारणीचे काम मागील काही महिन्यात ठप्प असल्याचे निदर्शनास आले असणे, सदर स्मारक स्थळी उभारण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची प्रतिकृती अद्यापही अंतिम नसणे, राज्य सरकारने स्मारक उभारणीच्या कामाचे संनियंत्रण करण्यासाठी स्थापन केलेली समिती बरखास्त करण्यात आली असणे व त्यामुळे संपूर्ण कामकाज ठप्प असणे, या स्मारक उभारणीच्या कामात होणाऱ्या विलंबामुळे प्रकल्प खर्चाची किंमत वाढत जात असणे तसेच अपेक्षित कालावधी देखील वाढत जात असणे व त्यावरून तीव्र संताप पसरत असणे, स्मारक स्थळी उभारण्यात येणाऱ्या पुतळ्याची प्रतिकृती तातडीने अंतिम करून मुख्य पुतळ्याचे काम सुरू करणे, संनियंत्रण समितीचे पुनर्गठन करणे, स्मारक कामाच्या दैनंदिन देखरेखीसाठी एका उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची/अभियंत्यांची नियुक्ती करणे, याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |
| (१७२) | “समाजात असलेले तृतीय पंथीय म्हणजेच किन्नरांच्याही विविध मागण्या प्रलंबित असणे, किन्नर समाजाच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी गेल्या अधिवेशनात त्यांच्या मागण्या सरकारकडे मांडलेल्या असणे, किन्नर लोकांना समाजात बहिष्कृत केले जाते किंवा वाईट वागणूक मिळत असणे, त्यांना रोजगारही मिळत नसल्याने ते भीक मागताना ट्रॅफिक सिग्नलवर किंवा इतर ठिकाणी दिसत असणे, महाराष्ट्र हा प्रगत राज्य तर आहेच पण देशाला दिशा दाखवणारे राज्य आहे त्यामुळे तृतीय पंथीयांना समाजात समानतेचा अधिकार देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी “किन्नर कल्याण महामंडळ” स्थापना करण्याची नितांत आवश्यकता, तसेच किन्नरांसाठी स्वतंत्र शौचालये नसल्याने त्यांची प्रचंड कुचंबना होणे, त्यामुळे अशी शौचालये तातडीने बांधणे अत्यावश्यक असणे, त्याचप्रमाणे सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण, पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र सेल, रेल्वेगाडीत महिलांसाठी असते तशी किन्नरांसाठीच स्वतंत्र बोगी, सरकारी अर्जामध्ये स्त्री, पुरूष याप्रमाणेच किन्नर असा तिसरा कॉलम यासह त्यांच्या रोजगार, घर, शिक्षण याबाबत अशा त्यांच्या विविध मागण्या असणे, तसेच काही दिवसांपूर्वी शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेमध्ये मा. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून तृतीय पंथियांना सामावून घेण्यासंदर्भात आदेश दिलेले असणे, त्यामुळे तृतीय पंथियांना देखील समाजात | श्री. प्रताप सरनाईक वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | मान- सन्मान मिळावा हे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयावरून दिसून येणे, त्यासाठी शासनाने किन्नरांच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांचे शिक्षण, रोजगार, घर आणि इतर कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महामंडळाची स्थापना करणे गरजेचे असणे, समाज कल्याण खात्याच्या अंतर्गत किन्नरांच्या सर्व मागण्या, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी कृती आराखडा बनविणे, त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी तृतीय पंथियांना समानतेचा अधिकार देण्याकरिता शासनाने लवकरात लवकर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१७३) | "अनुसूचित जातीच्या मुलामुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळावी म्हणून पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचे सुधारित धोरण केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने एप्रिल, २०१८ आणि मार्च, २०२१ मध्ये जाहिर करणे, डीम्ड विद्यापीठ व खाजगी विद्यापीठांनाही हे धोरण लागू असणे, मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयानेही यापूर्वीच आदेश देणे, परंतु राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने धोरण लागू करुन तसे शासन आदेश काढले नसल्यामुळे अनुसूचित जातीतील शिष्यवृत्ती पात्र, तसेच फी माफी पात्र मुलामुलींना डीम्ड विद्यापीठ व खाजगी विद्यापीठ लाभ देत नसणे, सामाजिक न्याय विभागास अनुसूचित जातीच्या लोकसंख्येप्रमाणे वार्षिक तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक असून आतापर्यंत जवळपास ३० हजार कोटी अखर्चित निधी लॅप्स होणे, त्यामुळे अनुसूचित जातीचे पात्र लाभार्थी विकास योजनेपासून वंचित राहत असल्याने परिणामी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन डीम्ड विद्यापीठ व खाजगी विद्यापीठांमध्ये अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना, उमेदवारांना शिष्यवृत्तीच्या सुधारित धोरणाप्रमाणे लाभ मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. नितिन राऊत,श्री. बाळासाहेब थोरात,श्री. सुरेश वरपुडकर,श्री. अमित देशमुख,श्रीमती प्रतिभा धानोरकर,श्री. विकास ठाकरे,श्रीमती सुलभा खोडके,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड,श्री. संजय जगताप,श्री. धिरज देशमुख,श्री. बळवंत वानखडे,श्री. अशोकराव चव्हाण,श्री. जितेश अंतापूरकर,श्री. मोहनराव हंबर्डे,श्री. माधवराव पवार,श्री. राजेश एकडे,श्री. अमिन पटेल,श्री. अस्लम शेख,श्री. सुनिल केदार,श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | कित्ता |
| (१७४) | "राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे मागासवर्गीय समाजासाठी विविध योजना राबविल्या जात असून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, या समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी, योग्य व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे, परदेश शिष्यवृत्ती | डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात,श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | साठी विद्यार्थ्याची संख्या सन २०१७-१८ पासुन ७५ इतके असुन या संख्येत वाढ करुन २०० करण्याबाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी सामाजिक न्याय मंत्री यांनी मंजूर करणे, परंतू अद्यापही शिष्यवृत्तीच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नसणे, त्यामुळे राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थी व पालकवर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द परदेशी शिष्यवृत्तीमध्ये २०० पर्यंत विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | |
| (१७५) | “शासनाने दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी शासन निर्णय क. बीसीएच २०१८/प्र.क्र.६१/शिक्षण-२ अन्वये १६५ निकषपात्र आश्रमशाळांसाठी शाहू, फुले आंबेडकर अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा योजना ही नवीन योजना तयार करुन अनुदान मंजूर केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीस अनुसरुन सदर १६५ आश्रमशाळांची अनुक्रमे दिनांक ९ जानेवारी, २०२० व दिनांक २२ ते २४ डिसेंबर, २०२० अशा दोन वेळा तपासण्या केल्या असणे, सदर अहवाल समाजकल्याण आयुक्तांमार्फत आपल्या कार्यालयात सादर करण्यात आले असणे, आपल्या स्तरावर सदर अहवालाची छाननी समिती स्थापन करण्यात आली असणे, तद्नंतर सदर अहवालाची छाननी करुन आश्रमशाळा अनुदानास पात्र घोषित करण्याची प्रक्रिया आजतागायत प्रलंबित असणे, शाहु फुले आंबेडकर निवासी योजनेसाठी लेखाशिर्ष तयार करुन आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात सदर लेखाशीर्षाकार रु.२५ कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आलेली असणे, या प्रकियेदरम्यान सदरील आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मानधन मंजूर झाले असल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असोसिएशनच्या मागणीनुसार तत्कालीन सन्माननीय मंत्री महोदयांनी कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी देणे व व्हीजेएनटी च्या धर्तीवर | डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | आश्रमशाळा संहिता लागू करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश दिले असणे, सदर वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमिती वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याची आवश्यकता असणे व त्याअनुषंगाने त्यासाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीची हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्याद्वारे शासनाने मंजुरी देण्याची आवश्यकता, सध्यःस्थितीत वरिल संस्थाची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन विद्यार्थ्याचे परीपोषण व तद्नुषंगिक इतर बाबीकरिता मंजुर आलेला निधी तात्काळ वितरीत करण्याची आवश्यकता असुनही शासन याबाबत दुर्लक्ष करित असलेल्या नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत करावयाची आवश्यकता तसेच शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१७६) | "राज्यात अनुसुचित जातींच्या विकासासाठी निश्चित धोरण नसल्यामुळे त्यांच्यासाठी असलेल्या योजनांना लोकसंख्येनुसार निधीची तरतुद नसणे, वेळेवर पुर्ण निधी मिळत नसल्याने अखर्चित रहाणे, मागील ८ वर्षात अनुसूचित जातीच्या विकासासाठी ३० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असूनही त्याप्रमाणात विकास न होणे, Scsp/tsp अंमलबजावणी करिता कायदा करण्याची अनेक वर्षापासून मागणी असतानाही सन २०१७ पासून सदरचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे प्रलंबित असणे, अनुसूचित जातीच्या विविध योजनांकडे राज्यशासनाने दुर्लक्ष केल्याने विदयार्थांची शिष्यवृत्ती, फि माफी या योजनांमध्ये अनेक समस्या असणे, सन २०११ पासून ही शिष्यवृत्ती सुरु झाली असले तरी विदयार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे वेळेवर जमा न होणे, स्वाधार योजना, स्वाभिमान योजना, रमाई घरकुल योजना, सेवेमधील आरक्षित रिक्त पदभर्ती, अनुशेष भरती, पदौन्नतीमध्ये आरक्षण इत्यादी प्रश्न प्रलंबित असणे, या प्रश्नांकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी अनुसूचित जातीतील नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीची व तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करुन अनुसूचित जातींच्या विकासासाठी निश्चित धोरण तयार करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात,श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित देशमुख,श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे,श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड,श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख,श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | कित्ता |
| (१७७) | "महाराष्ट्रात २०१३ मध्ये जादूटोणाविरोधी कायदा मंजूर होणे, कायद्याच्या जन जागृतीकरिता २०१४ साली प्रचार-प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात येणे, समितीमार्फत २०१४ साली सदर | श्री. पृथ्वीराज चव्हाण वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कामाचा आराखडा तयार करण्यात येणे, शासनाकडून योजना आराखड्यास निधी मंजूर होणे, सरकार बदलानंतर योजनेचे संपूर्ण काम ठप्प होणे, सदर समिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत काम करणे तसेच सामाजिक न्यायमंत्री हे समितीचे पदसिध्द अध्यक्ष असणे, परंतू महत्वाच्या योजनाकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, परिणामी राज्यात जादूटोणा, अंधश्रध्देच्या घटना होत असणे, शासनाकडून करावयाची उपाययोजना आणि कार्यवाही.” | | |
| (१७८) | “शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यातील अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, भारत सरकारची मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती तसेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती दरवर्षी दिली जात असणे, असे असतांना बीड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी यांनी या योजनांसाठी शासन निधी उपलब्ध असतांनाही समाज कल्याण अधिकारी (श्री. रविंद्र शिंदे) यांनी जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये विद्यार्थी संख्या किती आहे याची यादी शिक्षण विभागाकडून घेवून योजना राबविण्याची तसदी घेतली नसल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास येणे, यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील समाजकल्याण उपायुक्त कार्यालयामार्फत माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाचा आढावा घेतल्यावर निदर्शनास आलेले असणे, सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांबाबत वारंवार सुचना देऊनही जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी व जिल्हापरिषदेचे समाज कल्याण अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे व त्यास प्रामुख्याने सर्वस्वी श्री. शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी हेच जबाबदार असल्याचे त्यामध्ये निदर्शनास आलेले असणे, त्यासंदर्भात समाजकल्याण विभागाच्या छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक उपायुक्त (जयश्री सोनकवडे) यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (श्री. पवार) यांना पाठविलेल्या पत्रामध्ये यासह अनेक आक्षेप नोंदवून ही बाब अनुसूचित जातीच्या मुलामुलींवर अन्याय करणारी असल्याचे नमूद केले असल्याचे निदर्शनास येणे, त्याबाबत विभागीय कारवाईचा प्रस्ताव पाठविण्याचे आदेशित करण्यात येणे, अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे बीड जिल्ह्यात या घटनेतील हजारो विद्यार्थी असतांना व शासन निधी उपलब्ध असतांना दरवर्षी हजारो विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहत असणे, हे लक्षात घेता शासनाने, याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची तसेच | श्री. संदिप क्षिरसागर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | याप्रकरणी जबाबदार असणारे जिल्हा समाज कल्याण अधिकारी (श्री. रविंद्र शिंदे) यांना निलंबित करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१७९) | "राज्यात मुला-मुलींची ४४५ वसतिगृहे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने असून ज्यामध्ये पन्नास हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून सदरहू विद्यार्थांना राज्य सरकारच्या नियमांनुसार निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय असताना मागील सहा महिन्यापासून रखडलेला असल्याने तसेच कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता अदयापी देण्यात आलेल्या नसल्यामुळे सदरहू विद्यार्थांची आर्थिक कोंडी होऊन त्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होणे, कोरोना काळामध्ये सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे बंद असली तरीही या दरम्यान शाळा, महाविद्यालयेही बंद असलीतरीही ऑनलाइन शिक्षण सुरू असणे, वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असून गावांमध्ये इंटरनेटची जोडणी नसल्याने ऑनलाइन शिक्षण घेणे कठीण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी बाहेर भाड्याची खोली घ्यावी लागणे, मात्र या काळात केवळ वसतिगृहे बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने पर्यायाने शासनाने या काळातील १९ महिन्याचा निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांच्या खर्चही विद्यार्थ्यांना देण्यात नकार दिल्यामुळे या विद्यार्थ्यांना गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणे, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांना बाहेर भाड्याच्या खोलीत राहून शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून स्वाधार योजना असणे, कोरोना काळात स्वाधार योजनेच्या लाभार्थ्यांना सर्व लाभ देण्यात येणे, मात्र वसतीगृहांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना कोरोना काळात केवळ वसतीगृह बंद असल्याचे कारण देव त्यांना निर्वाह भत्ता व शैक्षणिक माहिला भत्यापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे समान तत्वावर सुरू असलेल्या दोन योजनाच्या लाभार्थीमध्ये शासन भेद करीत असल्याने नाराजी व्यक्त करून कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्ता मिळावा म्हणून शासनाकडे रीतसर लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात येणे, सदर मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसणे, तसेच मागील सहा महिन्यापासून रखडलेला निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य भत्ता आदी तसेच कोरोना काळातील १९ महिन्याचे भत्ते विनाविलंब देण्याचे दृष्टीने शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवशक्यता असणे, याकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सुनील राणे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (१८०) | "परिट, धोबी अनु. क्रमांक १२५ व वरठी अनु. क्रमांक १६६ वर असल्याने धोबी समाजातील नागरिकांना शैक्षणिक, वैयक्तिक कामात वेळोवेळी अडथळा निर्माण होत आहे. कित्येक शाळकरी मुलांच्या व मुलींच्या कास्ट व्हॅलीडीटी न निघाल्याने ॲडमिशन झालेल्या नाहीत. तसेच बऱ्याच नागरिकांच्या नोकरीसाठी सुध्दा अडचणी निर्माण झाल्या आहेत. शासनाने सुध्दा दोन्ही जाती ह्या एकच आहे हे सुध्दा आयोगाला सुनावणीत सांगण्यात आले आहे. ६७ समाजबांधवाचे दाखले कुणाच्या आजोबाचे वरठी मुला मुलीची, नातवांची धोबी, कुणाची परिट कुणाची वरठी हे आयोगापुढे सादर करण्यात आले आहे. सदर धोबी समाजांची कास्ट व्हॅलीडीटीची अडचण लक्षात घेता त्यांना अनु. क्रमांक १२५ किंवा अनु. क्रमांक १६६ या दोन पैकी एकाच क्रमांकावर धोबी समाजाची कास्ट व्हॅलीडीटी काढण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. राजु पारवे, वि. स. स. | कित्ता |
| (१८१) | "राज्यातील दिव्यांग मुलामुलींची शाळा/कर्मशाळा व मतिमंद मुलांचे बालगृहाला अनुदान तत्वावर मान्यतेबाबत बृहत आराखडा व पदमान्यता नसल्याने अनेक वर्षापासून अश्या शाळांना अनुदान न मिळणे, बिगर अनुदान तत्वावर वर्षानुवर्षे या शाळा कार्यरत असल्याने शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी विनावेतन अत्यंत विपरीत परिस्थितीत काम करत असणे, अनुदानाअभावी दिव्यांग शाळेतील खास करून मतिमंद मुलामुलींचे हाल होणे, काही शाळांना शासनाने विशेष बाब म्हणून मान्यता देणे, मात्र अनेक तालुक्यातील अश्या शाळांना वेतनेत्तर अनुदान व पदमान्यता न मिळाल्याने अश्या शाळांच्या मुलांवर, पालकांवर व कर्मचाऱ्यांच्या मनात शासनाविरोधात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, या प्रकरणी शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व ही बाब शासनासाठीही शरमेची असणे, शासनास प्राप्त असलेल्या अनुदान व पदमान्यतेच्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याची व बृहत आराखडा तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष जयस्वाल, वि. स. स. | कित्ता |
| (१८२) | "राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे जातवैधता प्रमाणपत्र पडताळणीचे संकेतस्थळ माहे जानेवारी, २०२३ पासून बंद असल्याचे निदर्शनास आले असणे, कास्ट व्हॅलिटिडी संबंधित अर्ज | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. जितेश अंतापूरकर, | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | स्वीकारणे, पोचपावती देणे, त्रुटींची पूर्तता करणे, जातवैधता प्रमाणपत्र ऑनलाईन देणे ही कामे पुणे येथील एका एजन्सीकडे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सोपविली असणे, विद्यार्थी व नागरिक वा राजकीय व्यक्तींना कास्ट व्हॅलिटिडी मिळविणे सुकर व्हावे यासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, मात्र राज्यभरात मागील महिन्याभरापासून कास्ट व्हॅलिडिटीचे संकेतस्थळ बंद असल्याने अनुसूचित जाती, ओबीसी, व्हीजेएनटी, मराठा, एसबीसी प्रवर्गातील उमेदवारांना कास्ट व्हॅलिटिडी साठी भटकंती करावी लागत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोष, चिडीची भावना लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. बळवंत वानखडे वि. स. स. | |
| (१८३) | “जिल्हा जालना येथील अंबड शहरातील शासकीय वसतिगृहात सोयी-सुविधा मिळत नसल्याने संतप्त मुलींनी तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केलेले असणे, तेथील शासकीय वसतिगृहात सोयी-सुविधा मिळत नसल्याने संतप्त मुलींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या दरम्यान अंबड तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणे, मुलींनी ठिय्या आंदोलन करताच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ दखल घेऊन सदर वसतिगृहात झालेल्या गैरसोयीची प्रशासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ वसतिगृह गाठून चौकशी सुरू केली असता अनेक धक्कादायक खुलासे आढळून येणे, तसेच या वसतिगृहात कालबाह्य झालेली बिस्किटे गोर गरीब शिकणाऱ्या विद्यार्थीनींना देण्यात आल्याचे आढळल्याने पुरवठादारांविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली असणे, सदर वसतिगृहात माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०२०, माहे मार्च-एप्रिल २०२१ या कालावधीत कालबाह्य झालेल्या बिस्किटांचा साठा आढळलेला असणे, तसेच सदर प्रकरणी माहिती घेतली असता सदर पुरवठा करणारी कंपनी ही परभणी येथील असल्याचे निदर्शनास येणे, सदर मे.बहुजन हिताय व भोजन उत्पादक व पुरवठा मागासवर्गीय सहकारी संस्था, जिल्हा परभणी या नावाची संस्था संपूर्ण राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अनेक शासकीय वसतीगृहे यांना आहार पुरवठा करण्याचे काम शासनाच्या सामाजिक विकास विभागाने दिलेले असणे, परंतु सदर भोजन पुरवठा निविदा देताना अनेक अनियमितता झालेल्या असणे, सदर संस्था गुणवत्तेनुसार पात्र नसतानाही त्या संस्थांना राज्यातील अनेक जिल्ह्यांचे काम देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, जालना जिल्ह्यातील उपरोक्त प्रकरणासारखे अनेक प्रकरणं राज्यात | श्री. नारायण कुचे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>( १ ) | थोडक्यात विषय<br><br>( २ ) | सदस्यांची नावे<br><br>( ३ ) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>( ४ ) |
|---|---|---|---|
| | झालेले असणे, परंतु सदर संस्थेच्या व सामजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन अनेक प्रकरणे दाबली असली तसेच संबंधीत आहार पुरवठा करणारी संस्था यांना एकाप्रकारे पाठीशी घातलेले असणे, तसेच सदर परभणी येथील इतरही अनेक शासकीय वसतिगृहे यांची कंत्राट यांनाच देण्यात आल्याचे स्पष्ट झाले असणे, त्यामुळे शासनाने त्या पुरवठा करणारी कंपनी यांच्यावर कठोर कारवाई करून त्याचे ऑडिट करावे, तसेच सदर पुरवठा करणाऱ्या बनावट कामाची सखोल चौकशी करावी होत असलेली मागणी, मे.बहुजन हिताय व भोजन उत्पादक आणि सहकारी संस्था परभणी याचे अध्यक्ष श्री.श्रीरंग नागोराव हत्ती आंबिरे यांना सदर प्रकरणी गोरगरीब मागासवर्गातील समाजातील मुलींच्या आरोग्याशी हेळसांड करणाऱ्या व्यक्तीला तात्काळ अटक करून त्यांचेवर गंभीर खटला दाखल करून शिक्षा देण्याची पालकांची मागणी, सदर संस्थेकडून राज्यातील आहार पुरवठ्याचे काम काढून घेऊन शासनाने सदर संस्थेला यापुढे कोणतेही काम देऊ नये, तसेच सदर संस्थेला काळया यादीत टाकण्याची कारवाई करावी अशी मागणी सामान्य नागरिक व स्थानिक लोप्रतिनिधींनी शासनाच्या सामाजिक न्याय विभाग यांचेकडे करण्यात येणे, परंतु शासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याने विद्यार्थिनी, पालक व स्थानिक जनतेत शासनाच्या प्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१८४) | " राज्यशासनाने इयत्ता १ ली ते १० वी.च्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना वारंवार आवाहन करून दहा लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांकडून प्री-मॅट्रिकशिष्यवृत्तीसाठी अर्ज भरून घेतलेले असणे, मात्र आता शाळांनी ते अर्ज प्रमाणित केल्यावर अचानक शासनाने हे अर्ज फेटाळण्याच्या सूचना दिल्या असणे,त्यामुळे मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळालेले व यंदा नव्याने अर्ज करणारे विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकले असून पालकांमध्ये संताप निर्माण झालेला असणे, पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेतून केंद्र सरकारमार्फत दरवर्षी एक हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात असणे, यंदा नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरून घेणे व पडताळणी करून केंद्राकडे पाठविण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (योजना) कार्यालयाकडे दिली असणे, सुरुवातीला अत्यल्प अर्ज भरले गेल्याने संचालनालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून दिलेली असणे, त्यानंतर पुन्हा ५ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात आलेली असणे, मात्र आता विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळास्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नॅशनल स्कॉलरशिप | श्री. छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश एकडे, श्री. अमित झनक, श्री. बळवंत वानखडे, श्री. विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | पोर्टलवर अचानक अर्ज रद्द करण्याचे परिपत्रक जारी करण्यात आलेले असणे, या परिपत्रकानुसार पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना आरटीईनुसार मोफत शिक्षणाचा लाभ दिला जात असणे, त्यामुळे त्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाऊ शकत नसणे, केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचेच अर्ज प्रमाणित करून केंद्र शासनाकडे पाठविण्याच्या सूचना करण्यात आलेले असणे, यामुळे महाराष्ट्रातील पहिली ते आठवीचे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकलेले असणे,त्यामुळे अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (१८५) | “मुंबई सारख्या शहरात सुमारे १३ ते १५ लाख नागरिक कायदेशीर पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, पाणी वितरण व्यवस्थेत दररोज ३० टक्के बेहिशोबी पाणी वाया जात असून हे पाणी हॉटेल, निवासी आणि खासगी क्रिडा संकुलाना अवैध जोडण्या देऊन वितरित केले जाणे, तसेच, तलावात पुरेसा पाणी साठा असतानाही पाण्याचा अपुरा व अनियमित पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, त्यामुळे, भूस्तरीय पाणी स्त्रोतांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापराकरीता उपयोगात आणण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. अतुल भातखळकर, श्री. अबू आजमी वि. स. स. | कित्ता |
| (१८६) | “बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी सन १९२६ मध्ये क्रिडा भवनची स्थापना करण्यांत येणे, त्यानुसार मुंबई मुख्यालयासमोर एक व दुसरी दादर येथील शिवाजी पार्क येथे क्रिडा भवन इमारत उभारण्यात आलेली असणे, सदर क्रिडा भवनातून अनेक कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय व यशस्वी कामगिरी बजावलेली असणे, तथापि सन २०१२ मध्ये क्रिडा भवनच्या कार्यकारिणी सदस्यांवर झालेल्या गैरकारभाराच्या आरोपानंतर २०१० मध्ये क्रिडा भवनाला टाळे ठोकण्यात आल्याने आजतागायत म्हणजे १२ वर्षांनंतरही क्रिडा भवन बंदच असणे, क्रिडा भवनचे १० हजार सदस्य असून अडीच हजारापेक्षा जास्त आजीव सदस्य असून त्यामध्ये १२ ते १५ खेळ खेळणारे खेळाडू सभासद असल्याचे व ते आपापली वार्षिक वर्गणी नित्यनियमाने भरत असल्याचेही निदर्शनास येणे, तथापि म्युनिसिपल को. ऑप. बँकेने क्रिडा भवनचे खाते माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये सील करण्यात येणे, त्यामुळे त्याचे पर्यावसन नोव्हेंबर, २०२२ | श्री. रोहित पवार,श्री. हसन मुश्रीफ वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | पासून कामगारांचे पगार व खेळाडूंना मिळणारी आर्थिक मदत थांबण्यात आल्याचे आढळून येणे, जवळपास १०० वर्षांची वाटचाल करणाऱ्या क्रिडा भवनाला पुन्हा उभारणी येण्याच्यादृष्टीने मा.आयुक्त, महानगर-पालिका, यांनी क्रिडा भवन कार्यकारिणीची निवडणूक घ्यावी व १२ वर्षांपासून बंद असलेल्या क्रिडा भवनाच्या दोन्ही इमारती खुल्या करण्यांत याव्या तसेंच बँक खातेही सुरु करावे अशी मागणी कर्मचाऱ्यांनी दिनांक २२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान महापालिका प्रशासनाकडे केली असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, जागतिक, राष्ट्रीय, देश व राज्य पातळीवर खेळाडूंचे महत्व विचारांत घेऊन, शाससनाने महापालिकेचे क्रिडा भवन बंद प्रकरणी चौकशी करण्याची गरज व क्रिडा भवन पुन्हा सुरु करण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका." | | |
| (१८७) | "रस्त्यांवर वाढत असलेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाय शोधताना त्यांचे नियमन करणे गरजेचे असून कुत्र्यांचे निर्बिजीकरण, त्यांचा आहार, देखभाल, लसीकरण यावरही उपाय होणे गरजेचे असल्याचे मत मुंबई उच्च न्यायालयाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, श्वानांवर आवर घालण्यासंबंधीच्या उपाययोजना, त्यांचे लसीकरण, रेबीज इंजेक्शन याकरिता आवश्यक निधी प्रशासनाला उपलब्ध करून देण्याची गरज असणे, तसेच, स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन भटक्या कुत्र्यांचा प्रश्न सोडविण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर,श्री. सुनिल टिंगरे,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार,श्री. अस्लम शेख,श्री. प्रताप सरनाईक वि. स. स. | कित्ता |
| (१८८) | "मुंबई वाहनतळ प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, पालिकेच्या २४ विभागातील वाहनतळ व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्यात येणार असणे, त्यामध्ये, कांदिवली पूर्व येथील स्व.मनोहर पर्रीकर मैदानात भूमिगत वाहनतळ उभारण्याचे काम सुरु असणे, त्यामुळे, मुंबई शहरात भूमिगत वाहनतळाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (१८९) | "मुंबईतील मालाड मधील कुरार गाव परिसरात दि.१३.२.२०२३ रोजी वा त्या सुमारास सिलेंडरचा स्फोट होऊन झोपडपट्टीला आग लागणे, त्यामध्ये अनेक झोपड्या जळून खाक होणे, आगीत अग्निशमन दलाचे | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कर्मचारी व अनेक रहिवाशी जखमी झाल्याचे उघडकीस येणे, जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करणे, काही रुग्णांची परिस्थिती अत्यंत नाजूक असणे, त्यामुळे शासनाने जखमी व मृत झालेल्या नागरिक आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, शासनाने यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अमित साटम,कॅप्टन आर. तमिल सेल्वन,श्री. किसन कथोरे,श्री. प्रशांत ठाकूर,श्री. सुनिल प्रभू,श्री. संजय केळकर,श्री. बंटी भांगडिया,श्री. योगेश सागर,श्री. अतुल भातखळकर,श्री. मिहीर कोटेचा,श्री. पराग शाह वि. स. स. | |
| (१९०) | "मुंबई उपनगरातील बोरिवली राजेंद्र नगर येथील फिल्ड मार्शल करिअप्पा उड्डाणपुलाला जोडलेल्या पादचारी पुलाची अवस्था अत्यंत बिकट झाल्याचे फेब्रुवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, सदर पुलावरून नागरिकांना जीव मुठीत घेऊन पुल ओलांडावा लागत असल्याचे निदर्शनास येणे, जवळपास २२ वर्षांपूर्वी बांधकाम झालेला हा पुल मागील काही वर्षांपासून जीर्णावस्थेत असणे, पुलाच्या सर्व पायऱ्या झिजल्याने संरक्षणासाठी लावलेल्या लोखंडी पट्ट्याही अर्धवट निघालेल्या असणे, लोखंडी पट्ट्यामुळे प्रवाशांना शारिरीक इजा पोहचण्याचा धोका निर्माण होणे, महानगरपालिकेकडे सदरहू पुलाची डागडुजी करण्यासाठी अनेकदा मागणी व विनंती करूनही पालिकेचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली चीडेची भावना, शासनाने तातडीने उक्त पुलाची डागडुजी करण्याबाबत पालिका प्रशासनाला आदेश देऊन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. संजय केळकर, श्री. बंटी भांगडिया, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर, श्री. मिहीर कोटेचा, श्री. पराग शाह, श्री. राम कदम वि. स. स. | कित्ता |
| (१९१) | "मुंबई शहर आणि उपनगरात अनेक ठिकाणी मेट्रोची कामे सुरू असणे, त्यामुळे रस्ते हे निमुळते झाले असणे, या अरुंद रस्त्यांमध्ये अनेक ठिकाणी मध्ये-मध्ये झाडे असुन ही झाडे वाहतुकीस अडथळा ठरत असूनही ही झाडे तोडता येत नसणे, मुंबई मधील एसव्ही रोड वर मेट्रो लाईनचे काम सुरु असल्यामुळे अरुंद रस्त्यावर बांद्रा, खार, सांताक्रूझ या भागात रस्त्याच्या मध्ये झाडे येत असल्यामुळे वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण झालेली असणे, मुंबई शहरात आज सुद्धा वाहतुकीची समस्या तीव्र असून तर भविष्यात या समस्येत आणखी वाढ होणार असणे, मुंबईत मेट्रोच्या कामासाठी आरे कारशेड मधील हजारो झाडे तोडली असणे, विविध विकासकामांसाठी देखील काही प्रमाणात झाडे तोडली जात असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात अडसर ठरलेली मुंबई, पालघर आणि ठाणे येथील २१ हजार ९९७ | श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड,डॉ. भारती लव्हेकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | खारफुटीची झाडे तोडली जाणार असणे, या बदल्यात २ लाख झाडे लावा असे मा.न्यायालयाने म्हटले असणे, त्याचप्रमाणे परवानगी घेऊन मुंबई शहरात रस्त्यात येणारी वाहतुकीला अडसर ठरणारी झाडे तोडून रहदारीमधील अडथळे दूर करावे लागणार असणे,तोडलेल्या झाडांचे पुनर्ररोपण करण्याच्या अटीवर किंवा त्याच्या बदल्यात पर्यायी ठिकाणी वृक्ष लागवड करून शहरातील वाहतुकीमध्ये येणारे अडथळे लवकर दूर करण्याची आवश्यकता असणे, मुंबई शहर आणि उपनगरातील वाहतूक समस्येमुळे रहदारीला अडथळा ठरणारे झाडे तोडून त्याबदल्यात पर्यायी ठिकाणी झाडे लावणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी सुद्धा माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (१९२) | “नाशिक महानगरपालिकेने गेल्या अडीच वर्षात केलेल्या साडेसहाशे कोटींच्या रस्त्यांची पावसाळ्यात अक्षरशः चाळण झाल्यामुळे विविध संघटनांकडून माहे सप्टेंबर मध्ये वा त्या सुमारास आंदोलने करण्यात आलेले असणे, नाशिक शहरातील रस्त्याच्या कामांची गुणवत्ता खराब व दर्जाहीन असल्याबाबत नाशिक महानगरपालिकेला माहे सप्टेंबर मध्ये असंख्य तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, नाशिक शहरात दर्जेदार रस्ते तयार करण्यासाठी या कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्याचा नाशिक महानगरपालिकेने माहे ऑगस्ट मध्ये निर्णय घेतलेला असणे, रस्त्याच्या कामांची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी बांधकाम विभागासह गुणवत्ता नियंत्रण विभागाची असूनही प्रत्यक्षात या विभागांमार्फत कोणावरही कारवाई करण्यात आलेली नसणे, सन २०१९ ते २०२२ या तीन वर्षांत सुमारे एक हजार कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे झालेली असणे, परंतु तीन वर्षे होण्याच्या आतच गेल्या पावसाळ्यात शहरातील सर्व रस्त्यांची चाळण झालेली असणे, खड्ड्यामध्ये रस्ते शोधण्याची वेळ नाशिककरांवर आलेली असणे, रस्त्यांच्या झालेल्या दुर्दशेमुळे नागरिक त्रस्त झाल्यामुळे या खड्डयांविरोधात ठिकठिकाणी आंदोलने करण्यात आलेली असणे, महानगरपालिकेने रस्ते दुरुस्तीसाठी ठेकेदारांना वेळोवेळी मुदती देण्यासह त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे इशारे दिलेले असणे, प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत निकृष्ट काम केलेल्या ठेकेदारांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, रसत्यांच्या कामांची तपासणी त्रयस्थ पार्टीमार्फत करण्याची केवळ घोषणा करण्यात आलेली नसणे, मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (१९३) | "मुंबई महापालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढलेला असून मागील दोन वर्षात तब्बल १ लाख १४ हजार पेक्षा जास्त जणांना कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस आलेली असणे, भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरण आदि उपक्रम राबविले जात असतांनाही महापालिका प्रशासनास अपयश आलेले असणे, विशेषतः रात्रीच्या वेळी दबा धरून बसणारे श्वानांकडून प्रवाशी, वाटसरुंवर अचानक हल्ला करून चावा घेण्याचे प्रकार दररोज घडत असणे, लहान मुले, महिला व अबालवृध्दांवर या श्वानांकडून हल्ले केले जात असणे, कामावरुन उशिरा घरी परतणाऱ्या नोकदारांमध्ये नेहमीच प्रचंड भीतीचे वातावरण असणे, परिसरात सुमारे ३ लाखांपेक्षा जास्त भटके कुत्रे असून समाजातील काही जणांकडून भटक्या कुत्र्यांना बेकायदेशीररित्या अन्न दिले जात असल्यामुळेही कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली असणे, मुंबई परिसरात भटक्या कुत्र्यांची समस्या गंभीर बनलेली असतांनाही, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, भटक्या कुत्र्यांच्या आक्रमणामुळे अनेकजण गंभीर जखमी होत असून मानवी आरोग्यावर घातक परिणाम होत असणे, मुंबईबरोबरच मुंबई महानगर प्रदेशात नागरिकांवर श्वानांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे त्यांच्या जिवीतासंदर्भात गंभीर प्रश्न उभा राहिलेला असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करून सदरबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे,श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे वि. स. स. | कित्ता |
| (१९४) | "ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपालिका हद्दीतील बांधकाम परवानग्या देताना शासनाच्या नगरविकास विभागाच्या दिनांक ३० जून, २०२२ पर्यंतच्या अध्यादेशा अन्वये प्राप्त प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने बांधकाम परवानगी देण्याची मुभा होती परंतु कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या दिनांक ३० जून, २०२२ नंतर प्राप्त प्रस्तावांना बांधकाम परवानगी, बांधकाम पूर्णत्व दाखला व टी.डी.आर.प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने कार्यवाही करण्यास कळविले असताना देखील दिनांक ३० जून, २०२२ नंतर आलेल्या अर्जांना सुद्धा बांधकाम परवानग्या ऑफलाईन पद्धतीने देण्यात येणे, त्यामुळे या बांधकाम परवानग्या | श्री. किसन कथोरे,ॲड. आशिष शेलार,श्री. अतुल भातखळकर,श्री. कुमार आयलानी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | टी.डी.आर. व बांधकाम पूर्णत्वाचे दाखले देताना तत्कालीन नगररचनाकार यांनी अनेक प्रकरणात अनियमितता केलेली असून यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे या सर्व बांधकाम परवानग्या, बांधकाम पूर्णत्त्वाचे दाखले व टी.डी.आर प्रमाणपत्र याची चौकशी करण्याची गरज व अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१९५) | "प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व राजकीय दबावामुळे ठाणे महानगर पालिका हद्दीत दिवसेदिवस अनाधिकृत बांधकामे वाढत असून शहराचे विद्रुपीकरण होत असणे. तथापि, ठामपा हद्दतील दिवा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. २९ व ३३ येथील शिवली नगर दोस्ती पाठीमागील डी.पी. रोड लगत, खान कंपाऊंड शीळ आचार गल्ली, शीळ ठाकूर पाडा या परिसरात गेल्या दीड वर्षापासून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे सुरु असल्याची तक्रार केल्याने सदर तक्रारीची दखल घेऊन आयुक्तांनी दखल घेणे व तेथील सहाय्यक आयुक्त, फारूक शेख यांच्यावर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी कारवाई करण्यात येणे. परंतु ठाणे शहरात उथळसर प्रभाग समिती राबोडी नं - १ व २ मधील झालेले अनधिकृत बांधकामे तसेच ठाणे मुख्य मार्केट, कोपीनेश्वर मंदिराच्या दुरुस्तीच्या नावाखाली केलेले वाढीव बांधकाम तसेच लक्ष्मीनारायण मंदिर मधील आनंदभारती मंदिराच्या समाधीच्या बाजूला दुकानाचे वाढीव बांधकाम याबाबत अतिक्रमण हटवण्याची मागणी होऊनही कारवाई न करणे. तसेच माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमध्ये ढोकाळी, दादलानी, बालकुम या परीसरात फुटपाथावर अनधिकृत गाळे व इमारतही बांधून शासकीय व महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होऊनही जबाबदार अधिका-यांवर कारवाई न होणे. तसेच अनधिकृत पाईप लाईन टाकणे, बार दुकानदारांकडून अनधिकृत बांधकामे करण्यात येणे. परिणामी स्थानिक रहिवाश्यांना उपद्रव होणे. तसेच खोपट येथे विकास आराखड्याप्रमाणे बांधकाम न करता परवानगीपेक्षा अधिकचे बेकायदेशीर बांधकाम रामचंद्र टावर येथे बांधण्यात येणे. खोपट येथे परदेशी चाळ येथे परवानगी नसताना डबल रूमचे बेकायदेशीर बांधकाम करणे. तसेच जांभळीनाका, स्टेशन रोड, नागरी स्टोर, दत्त मंदिर, चेंदणी कोळीवाडा, अशोक टॉकिज परिसरात हातगाडी, फेरीवाले यांचे अतिक्रमणामुळे वर्दळीच्या रस्त्यावरील नागरिकांना उपद्रव होणे. या सर्व अतिक्रमणाबाबत, बेकायदेशीर बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२३ रोजी आयुक्तांसह सबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करूनही जबाबदार अधिका-यांवर | श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे,ॲड. आशिष शेलार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कोणतीच कारवाई न होणे. तथापि दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त, श्री. शेख यांना तेथील अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई केली गेली त्याच नियमानुसार राबोडी, ढोकाळी, बाळकुम, जांभळीनाका, स्टेशन परिसरातील अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामांना जबाबदार धरून येथिल अतिक्रमण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी होणे. परंतु वरिष्ठ अधिकारी व राजकीय नेत्याच्या पाठबळांमुळे संबंधित अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न होणे. परिणामी नागरीकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सचिव स्तरावरील त्रयस्थ वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी करणे व त्यातील दोषींवर निलंबनासारखी तात्काळ कारवाई करण्याची देखील मागणी होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (१९६) | "राज्य शासनाने अर्थसंकल्पीय भाषणात जाहीर केलेले नवी मुंबईतील 'महाराष्ट्र भवन' बांधण्यासंदर्भात संपूर्ण वर्ष संपले तरी कोणतीही कारवाई केली नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, एकीकडे राज्य शासन उत्तर प्रदेशातील 'अयोध्या' येथे महाराष्ट्र भवन बांधण्यासाठी पुढाकार घेत असताना,जाहीर केलेले नवी मुंबई मधील महाराष्ट्र भवन बांधण्यासाठी करावयाच्या भूखंडाच्या खरेदीच्या कराराकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, भारतातील बहुतांश राज्यांनी मागील काही काळात सिडको कडून नवी मुंबईतील वाशीमध्ये भूखंड घेऊन आपापल्या 'राज्याचे भवन' उभारलेले असणे, इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकारलाही भवनासाठी सिडकोने भूखंड दिलेला असणे, तथापि भूखंड खरेदी करण्याचा साधा करारही सरकारला अद्याप करता आलेला नसणे, परिणामी खेड्यापाड्यातून मुंबई किंवा आसपासच्या ठिकाणी शिक्षण, नोकरीसाठी येणाऱ्या युवकांना निवासाची योग्य ती व्यवस्था होत नसल्यामुळे राज्यातील जनतेत राज्य शासनासंदर्भात निर्माण झालेली असंतोषाची भावना, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." | श्री. अजित पवार,श्री. जयंत पाटील,श्री. छगन भुजबळ,श्री. दिलीप वळसे-पाटील,श्री. धनंजय मुंडे,कुमारी आदिती तटकरे,श्री. संजय बनसोडे,श्री. दत्तात्रय भरणे,श्री. चेतन तुपे,श्री. विनोद निकोले,श्री. दौलत दरोडा वि. स. स. | कित्ता |
| (१९७) | "पालघर जिल्हयातील वाडा नगरपंचायत कार्यालयामध्ये लेखापाल पदावर श्री.अमित शेट्टी हे कार्यरत असणे, सदर अधिकारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्यामुळे त्यांच्या कामांतील नेहमीचीच दिरंगाई लक्षात येणे, त्याबाबत विचारणा केली असतां, अगदी उर्मटपणे पालघर येथे जिल्हयातील | श्री. सुनिल भुसारा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कार्यालयात अथवा मंत्रालयात कामानिमित्त गेलो होतो अशी सबब देऊन कार्यालयात उपस्थित न राहण्याचे बहाणे त्यांचेकडून वांरवार करण्यांत येत असल्याचे निदर्शनास येणे, तसेंच मागील वर्षभरात वारंवार अशाप्रकारे गैरहजर राहत असल्याचेही निदर्शनास येणे, संबंधित लेखापाल (श्री.शेट्टी) कार्यालयात येणाऱ्या नागरिकांशी मनमानी पध्दतीने असभ्य वर्तवणूक करित असल्याने नागरिकांकडून त्यांचेबाबत सतत तक्रारी येत असणे, इतकेच नव्हेतर, त्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अतिरिक्त मुख्य सचिव (नगरविकास विभाग) मंत्रालय तसेंच मा.जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे दि.७ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तक्रार निवेदन देण्यांत आल्याचेही निदर्शनास येणे, तथापि अद्यापही कारवाई करण्यांत न येणे, त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (१९८) | "नागपूर महानगरपालिकेत मागील २० वर्षापासून कार्यरत १८९ कंत्राटी संगणक चालकांची सेवा संपुष्टात आणून नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आणणे, सद्यस्थितीत या कर्मचाऱ्यांना किमान वेतन अधिनियम १९४८ च्या तरतुदीनुसार सरासरी रक्कम २०६६६ रुपये वेतन भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी आरोग्य विमा या सुविधा मिळत असणे, सध्या मनपाच्या कामकाजाचा बोजा याच कर्मचाऱ्यांवर असणे, मात्र आता मनपाने नवीन कंत्राटदार नियुक्तीचा प्रस्ताव आणून त्यात संगणक चालकांना दरमहा १५,५०० रुपये मानधन प्रस्तावित केले असणे, नियमानुसार ते किमान वेतनात बसत नसणे, हा कार्यरत संगणक चालकांवर अन्याय असणे, त्यामुळे ते आंदोलन करीत असणे, मागील १५ ते २० वर्षापासून सेवा देत असलेल्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वय ४० ते ५० वर्षे झाले असणे, अशा परिस्थितीत त्यांना बेरोजगार करणे योग्य नसणे, त्यामुळे त्यांना सध्या मिळत असलेल्या मनधनावर त्यांना फेरनियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या संगणक चालकांत पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया." | श्री. विकास ठाकरे, श्री. अमिन पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार वि. स. स. | कित्ता |
| (१९९) | "नागपूर येथील अंबाझरी तलावाशेजारील नागपूर महानगरपालिकेत अंदाजे ६० वर्षापूर्वी आवंटीत केलेल्या खसरा क्र.१, नगर भूमापन क्र.१ या एकूण ४४ एकर जमिनीवर बांधलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर | श्री. विकास ठाकरे, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | स्मारक व उद्यान परिसरातील जमीन असणे, ही जमीन जिल्हाधिकारी नागपूर यांनी दि.२०/९/२०१८ रोजी आदेश देऊन सदर जमीन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना भाडेपट्ट्यावर देणे, मात्र या आदेशामुळे सदर महामंडळाने कट कारस्थान करून ही जमीन खासगी कंपनीला अनुसचित लाभ मिळवून देण्यासाठी बेकायदेशीरपणे शासनाची दिशाभूल व फसवणूक करून मेसर्स गरुडा ॲम्युशमेंट पार्क या खासगी कंपनीस हस्तांतरीत करणे, या कंपनीने कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची परवानगी न घेता गुप्तपणे अंबाझरी तलाव जुने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन" उद्धवस्त करणे, यासंदर्भात येथील आंबेडकरी जनतेत असलेली चिड लक्षात घेता या कंपनीची चौकशी करून कारवाई होणे अपेक्षित असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार वि. स. स. | |
| (२००) | "ठाणे महानगरपालिका दिवा प्रभाग समिती अंतर्गत दिवा प्रभाग समितीमध्ये सुरू असलेली बेसुमार अनधिकृत बांधकामे, मनपा अधिकाऱ्यांकडून संगनमत करून बांधकामाना संरक्षण देणे, याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून, प्रत्यक्षात भेट घेऊन निदर्शनास आणूनही कारवाई करण्यास होत असलेली टाळाटाळ, केवळ १५ दिवसांत ७-७ मजल्यांच्या धोकादायक इमारती बांधण्याचे काम सर्रासपणे सुरू असणे. गार्डन, रुग्णालय, डी.पी. तसेच इतर आरक्षणांवरही बांधकामे सुरू असल्याने रहिवाशांना कोणत्याही सोयी सुविधा देणे शक्य नसणे, सदर बांधकामांना पाणी, रस्ते, वीज, ड्रेनेज सारख्या मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यास महानगरालिका असमर्थ असणे, कोणतीही दुर्घटना घडल्यास बचाव कार्यासाठी अग्निशमन दलही या इमारतीपर्यंत पोहचू शकत नसणे, अनधिकृत बांधकामे थांबवावी यासाठी सर्वच लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन बैठकीपासून अगदी विधानसभेपर्यंत आवाज उठवूनही कोणतीही कारवाई होत नसणे, दिनांक २४ जून, २०१३ रोजी शीळ परिसरातील लकी कंपाऊंडमधील एक इमारत कोसळून ७६ पेक्षा जास्त नागरिकांचे गेलेले दुर्दैवी बळी, तरीही महानगरपालिका प्रशासन अशा बांधकामांवर कोणतीही कारवाई नसणे, २६ जुलै सारखी पूर परिस्थिती निर्माण झाल्यास दिव्यामध्ये बिकट परिस्थिती निर्माण होऊन अनेक रहिवाशांचे बळी जाण्याची शक्यता, कारण खाडी व खारपुटीवरही बांधकामे सुरु असणे, तसेच स्टेशन परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांकडून कचरा खाडीमध्येच टाकला जाणे, त्यामुळे पावसाळ्यात पाणी | श्री. प्रमोद पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | निचरा होण्यास येत असलेली अडचण, दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी दिवा प्रभाग समितीमधील वॉर्ड ऑफिसर यांच्यावर झालेली निलंबनाची कार्यवाही, परंतु केवळ ही कारवाई पर्याप्त नसून ठाणे महानगर-पालिकेतील गेल्या काही वर्षांपासून दिवा प्रभागातील वॉर्ड ऑफिसर, अतिक्रमण विभागातील उपायुक्त तसेच मनपा प्रशासनातील अतिक्रमण, घनकचरा, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य, स्मार्टसिटी अशा सर्वच विभागात सुरु असलेल्या भ्रष्टचार पाहता मनपाच्या कामाची कॅगद्वारे ऑडीट करण्याची आवश्यकता, तसेच सर्वच विभागातील संबंधित सर्व अधिकाऱ्यांची अँटी करप्शन विभागाकडून चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२०१) | "पश्चिम द्रुतगमी महामार्गावरील ऑबेरॉय जंक्शन ते आरे चेकनाका जंक्शन पर्यतच्या रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम रखडलेले असल्याचे निदर्शनास येणे, उक्त जंक्शनपर्यत सर्वोदयानगर येथील बैठ्या चाळी या महामार्गालगत असलेल्या नगर भूक्रमांक ८१ गाव दिंडोशी हा भूभाग विकास नियोजित रस्त्याने बाधित असणे, सदरहू भूभाग पशु व दुग्ध व्यवसाय यांचेमार्फत मुंबई महानगरपालिकेकडे अद्याप हस्तांतरीत झालेला नसणे, सदरहू भूभाग मनपाकडे हस्तांतरित अद्यापी न झाल्यामुळे यामध्ये बाधित होणाऱ्या झोपड्यांची पात्रता निश्चित करण्यास येत असलेल्या अडचणी, परिणामी रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम रखडणे, सदरहू महानगरपालिकेच्या प्रस्तावित सेवा रस्त्याच्या जागेची संबंधित नगर भूमापन अधिकारी, मालाड व महानगरपालिका यांच्याकडून संयुक्तीक स्थळपाहणी करण्यात येऊनही सदरची जागा महापालिकेस हस्तांतरित करण्यास होत असलेला विलंब, त्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने संबंधित विभागाशी पत्रव्यवहार, विविध आयुधांद्वारे शासनाची लेक्ष वेधणे आदि माध्यमातून पाठपुरावा करुनही शासन स्ततरावर गांभीर्याने दखल घेतली जात नसणे, परिणामी झोपडीधारकांमध्ये तसेच वाहनचालक, व प्रवाशांमध्ये प्रचंड असंतोष असणे, सदरहू प्रस्तावित सेवा रस्त्याच्या कामामध्ये बाधित होणारी सर्वोदयनगर येथील झोपडपट्टी व अनिवासी गाळ्यांच्या पुनर्वसनाच्या कार्यवाहीबाबत महसूल व वन विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ." | श्री. रविंद्र वायकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२०२) | "नाशिक शहरातील नवीन नाशिक सिडको डीएनएच माघ सेक्टर येथील भूखंड क्र.२४ मध्ये अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम केले जात असणे, या इमारतीच्या बांधकामासाठी नाशिक महानगरपालिकेने दि. १४ सप्टेंबर २०२२ रोजी पार्किंग अधिक चार मजल्यांसाठी मंजुरी दिलेली असणे, मात्र या ठिकाणी महानगरपालिकेची परवानगी न घेता पार्किंग अधिक सहा मजल्यांचे अनधिकृत व बेकायदेशीरपणे बांधकाम सुरु असल्याचे दि. २० फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, हे बांधकाम करतांना नियम व निकष पायदळी तुडवल्यामुळे रस्त्यामध्ये वाहतुकीला अडथळा निर्माण होत असणे, सदर इमारतीचे बेकायदेशीरपणे केलेले पाचव्या आणि सहाव्या मजल्याचे बांधकाम तातडीने काढून घेणेबाबत महानगरपालिकेने कारवाई करण्याची आवश्यकता असणे, मात्र याबाबत महानगरपालिकेकडून दिरंगाई केली जात असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण,यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. छगन भुजबळ वि. स. स. | कित्ता |
| (२०३) | "माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२२ आणि माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२३ दरम्यान पुणे शहरातील मनपा रुग्णालयांमध्ये जाणवलेला रेबीजच्या लसींचा तुटवडा, याच दरम्यान भटक्या कुत्र्यांचा दंश झालेल्या नागरिकांच्या संख्येत झालेली वाढ, त्यामध्ये महिला आणि शाळकरी मुलांचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याने ह्या घटकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे आणि चिंतेचे वातावरण, मनपा रुग्णालयांमध्ये लस उपलब्ध नसल्याने नगरीकांना खाजगी हॉस्पिटल मधून महागडे उपचार घ्यावे लागत असल्याने, त्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली नाराजीची आणि असंतोषाची भावना, पुणे शहरातील सर्व मनपा रुग्णालयांमध्ये रेबीजच्या लसींचा पुरेसा पुरवठा तातडीने करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना." | श्री. चेतन तुपे वि. स. स. | कित्ता |
| (२०४) | "मा.उच्च न्यायालयाने भूसंपादनाचे आदेश देणे, आरक्षण क्र.११२ अन्वये बगीच्यासाठी आरक्षित जमिनीबाबत भूसंपादन प्रस्ताव क्र.६०/०७ मध्ये जळगाव शहर महानगरपालिकेने आगाऊ मोबदला रक्कम जमा करणे, त्यानंतर उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांनी अंतिम निवाडा घोषित करणे, जमिनीचे सहमालक सौ.विद्या शैलेंद्र बियाणी यांना कर्करोग होणे, पिडीत महिलेच्या मुलाने भूसंपादन प्रस्तावात जमा असलेल्या आगाऊ मोबदला रकमेची शस्त्रक्रियेसाठी मागणी करणे, उपविभागीय अधिकारी | श्री. सुरेश भोळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | जळगाव भाग जळगाव यांनी आयुक्त जळगाव शहर महानगरपालिकेकडून आगाऊ मोबदला रक्कम देण्यासाठी ना-हरकत मागविणे, आयुक्त जळगाव शहर महानगरपालिका यांनी ना-हरकत न देणे, उपचारा अभावी शेतकरी महिलेचा अकाली मृत्यू होणे, मयत शेतकरी महिलेच्या मुलाने पोलिसांकडे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार देणे, जळगाव शहर पोलीस स्टेशनकडून जळगाव महानगरपालिका आयुक्त यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी पत्र क्र.४००९/२०१९ देण्यात येणे, पोलिसांनी मनपा आयुक्तांना गंभीर स्वरूपाच्या प्रकरणाची चौकशी करून तक्रार देण्याचे कळविणे, परंतु मनपा आयुक्तांनी कोणतीही दखल न घेणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२०५) | "बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बी, सी, डी, ई, के/पश्चिम, के/पूर्व, पी/उत्तर, एल, एच/पश्चिम, या प्रभागांत मोठ्या प्रमाणामध्ये बेकायदेशीरपणे अनधिकृत इमारतींचे बांधकामे होत असणे, अशा इमारती पुर्ण झाल्यानंतर त्या इमारतींवर अधिकृत वा अनधिकृत याबाबत न्यायालयात प्रकरण जाणे, न्यायालयाने सदर अशा इमारती अनधिकृत घोषित करणे, परिणामी तेथील रहिवाशी यांना बेघर होण्याची पाळी येणे, नुकतेच सी वॉर्ड येथील गुलिस्तान अर्पाटमेंट मधील १४० परिवारांना बेघर व्हावे लागणे, त्याच घटनेची बी वॉर्ड येथे मेहबूब सोरटीया या विकासकामार्फत पुनरावृत्ती होणे, सध्या हबीब हायस्कूल समोर इकोनॉमिक हाऊस नावाच्या १५ मजली इमारतीचे राजरोसपणे अनधिकृत बांधकाम सुरू असणे, बी वॉर्ड मधिल डोंगरी या भागात इमारत क्रमांक २२, २४, २६ हे धोकादायक स्थितीत असताना महानगर पालिकेने टेंडर काढून सदर इमारतींचे बांधकाम निश्कासित करणे, सदरच्या इमारतींचे पुन्हश्चः अनधिकृत बांधकाम सुरू असणे, संबंधित अधिकाऱ्यांचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, अशा अनधिकृत इमारती पडण्याच्या दुर्घटना वारंवार घडत असणे, नुकतेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कुर्ला एल प्रभागामध्ये दिनांक २९ जून, २०२२ रोजी ४ मजली इमारत कोसळणे, त्यामध्ये १९ जणांची झालेली जिवित हानी, दिनांक ९ जून, २०२१ रोजी मालाड पी/नॉर्थ वॉर्ड येथे ४ मजली अनधिकृत इमारत पडून त्यामध्ये ८ बालके आणि ११ पौढ यांचा दुर्दवी मृत्यू होणे, सदर बाबी लाईफ इन लाईट या सामाजिक स्वयंसेवी संस्थेच्या निदर्शनास येणे, याबाबत त्यांनी वेळीच कार्यवाही होणेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी शहर/उपनगर कार्यालय, उपायुक्त झोन-१, उपायुक्त झोन-४, संबंधित सहायक आयुक्त, कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) यांचेकडे | श्री. संजय रायमुलकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | तक्रार करणे, सबब अशा अनाधिकृत बांधकामाकरिता जबाबदार असणाऱ्या बांधकाम व्यवसायीक व बांधकांमावर प्रशासनातर्फे कार्यवाही न होणे, त्यामुळे जनसामान्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, यास जबाबदार असणाऱ्या प्रशासकिय अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२०६) | "महाड एमआयडीसी कारखान्यातील इथिनोल ऑक्साईड प्लँटला भीषण आग लागल्याची घटना माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास आली असणे, तसेच, ८ दिवसात तुर्भे एमआयडीसीतील कापड कंपनीला आग लागल्याची दुसरी घटना ही निदर्शनास आली असणे, त्यामध्ये, दोन्ही ठिकाणी आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अस्पष्ट असणे, त्यामध्ये, राज्यात अनेक ठिकाणी आगीच्या घटना वाढत असल्याचे निदर्शनास येत असूनही त्यावर नियंत्रण नसल्याने तर काही ठिकाणी नियमांचे पालन होत नसल्याने आगीच्या घटना वाढत असणे, त्यामुळे, आगीच्या वाढत्या घटना पाहता नियमांचे काटेकोर पालन होण्याची गरज असणे, तसेच, वेळोवेळी फायर ऑडीट करण्याची गरज असणे, तसेच, नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात आगीच्या घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (२०७) | "माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, मुंबई मनपाचे अनेक क्लास वन दर्जाचे अधिकारी शासकीय निवासस्थान मिळण्याकरिता वाट पाहात असताना, मुंबई मनपा प्रशासनातील शिपाई म्हणून नेमणूकीस असलेल्या व्यक्तीला गेल्या दोन-तीन वर्षापासून निवासस्थान म्हणून बंगला मिळाल्याची बाब उघडकीस येणे, नाना चौकातील डी विभागाच्या घनकचरा विभागात काम करणारे अर्जुन नराळे यांनी पत्नीच्या नावे कंपनी स्थापन करुन करोना काळात १ कोटी ११ लाख रुपयांची कामे तसेच मेंटनन्स विभागातील शिपाई रत्नेश भोसलेने पत्नी रियाच्या नावे आर.आर.एंटरप्रायजेस कंपनी स्थापन करुन ६५ लाख रुपयांची कामे मिळविल्याचे या प्रकरणी केलेल्या चौकशीत उघडकीस येणे, त्यामुळे या दोघांना सेवेतून निलंबित करणे, परंतु अद्यापही पालिकेने त्यांचेवर गुन्हा दाखल न करणे, नियमांचे पालन न करता या दोघांना मदत करणाऱ्या पालिकेच्या डी विभागातील दहा अभियंत्यांची खात्यांतर्गत चौकशी अजून सुरु न करणे, शिपायांना निलंबित करण्याचा झालेला निर्णय, परंतु सहकार्य करणाऱ्या वरिष्ठ | श्री. निलेश लंके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | अधिकाऱ्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरू न झाल्याने चतुर्थ श्रेणीत काम करणाऱ्या शिपाई तसेच अन्य कर्मचाऱ्यांच्या मनात प्रशासनाच्या भेदभाव प्रवृत्ती विरुध्द निर्माण झालेला तीव्र असंतोष,चीड व संताप, मिळविल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (२०८) | पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाविरोधात दिनांक ९ ऑगस्ट, २०११ रोजी मावळ तालुक्यातील बऊर येथे स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन होऊन सदर प्रकल्पास प्रचंड विरोध व्यक्त होणे. या आंदोलनादरम्यान पोलीस प्रशासनाकडून आंदोलकांवर बेछूट गोळीबार होऊन यामध्ये ३ व्यक्ती आंदोलन स्थळी मृत पावल्या असून १२ आंदोलक जखमी होण्याची दुर्दैवी घटना घडलेली असणे. या घटनेचे देशभरात तीव्र प्रतिसाद उमटणे. सदर मृतांच्या वारसांना व जखमींना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्याचे आश्वासन शासनातर्फे देण्याचे जाहिर होणे. परंतु या घटनेला ११ वर्षे पूर्ण होऊनही आंदोलनातील जखमींना अद्याप नोकरी मिळालेली नसणे. आंदोलनात सहभागी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेऊन सदर जलवाहिनी प्रकल्पाला स्थगिती दिलेली असून यावर कोणताही ठोस निर्णय अद्याप झालेला नसणे. सदर आंदोलनातील जखमींना नोकरी देण्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे व स्थायी सभेत सर्वानुमते संमत केलेला ठराव पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठविलेला असणे. यावर तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये सदर विषयावर बैठक आयोजित होऊन बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री यांनी सकारात्मक अहवाल सादर करावा असे नगरविकास विभागाला निदेश देऊनही सदर प्रस्ताव शासन स्तरावर बराच काळ प्रलंबित राहून अखेर नामंजूर होणे. यामुळे जखमी शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाविषयी तीव्र संताप निर्माण होऊन सर्वसामान्य जनतेमध्ये शासनाविरोधी निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण तसेच नाराजीची तीव्र भावना, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सुनिल शेळके वि. स. स. | कित्ता |
| (२०९) | "माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, मुंबई येथील हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ या हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेल भूखंडा शेजारील ३,०३६.२७ रिक्रिएशन ग्राऊंडचा उपयोग हॉटेलच्या दोन कुलिंग टॉवरची उभारणी करून बेकायदेशीररित्या करीत असल्याची कबुली विधानसभेत उपस्थित करण्यात आलेल्या एका मुद्याच्या स्पष्टीकरणात उघडकीस येणे, सीटीएस क्र. ३४५४ हा भूखंड | श्री. निलेश लंके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मुंबई मनपास अद्यापही हस्तांतरीत करण्यात न येणे, या हॉटेल व्यवस्थापना मार्फत मनोरंजनाचे मैदान म्हणून आरक्षित असलेल्या सुमारे ३० ते ३५ हजार चौ.फूट जागेचा वापर बेकायदेशीररित्या करण्यात येत असून त्यावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन त्यातून दरमहा लाखो रुपयांचे उत्पन्न हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ यांना मिळत असूनही, मुंबई मनपा प्रशासनाचे त्याकडे हेतूतः होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करून हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ शासकीय भूखंडाचा गैरवापर करीत असल्याच्या अनेक तक्रारी मुंबई मनपा प्रशासन, आयुक्त, प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे करण्यात आल्याची बाब उघडकीस येणे, तरीही मुंबई मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी हॉटेल व्यवस्थापनाशी झालेल्या आर्थिक हातमिळवणीकडे विधानसभेला खोटी उत्तरे व माहिती सादर करून लोकप्रतिनिधींची हेतूतः केलेली दिशाभूल, व हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ व्यवस्थापनाला गैरकारभार करण्यास केलेले बहुमोल सहकार्य, यामुळे हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ यांना कोटयावधी रुपयांचा झालेला आर्थिक नफा, याकडे मुंबई मनपा प्रशासन हेतूतः करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तक्रारदारांच्या मनात मुंबई मनपा प्रशासनाच्या हेतूबद्दल व अक्षम्य दिरंगाईबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (२१०) | "कोल्हापूर शहरास ऐतिहासिक वारसा लाभलेला असून, करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे प्रमुख स्थान असणे, तसेच कोल्हापूर शहर हे भारतातील प्रमुख पर्यटन स्थळांपैकी एक धार्मिक स्थळ म्हणून ओळख असणे, कोल्हापुरात श्री महालक्ष्मीच्या दर्शनासाठी देशातूनच नव्हे तर जगातून भाविक भक्त, महिला, लाखोंच्या संख्येने दररोज येत असल्याचे दिसून येत असणे, तसेच श्री आंबाबाईच्या दर्शनाला तसेच पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या महिलाना संपूर्ण शहरामध्ये कोठेही स्वतंत्र महिला स्वच्छतागृह नसल्याने महिला पर्यटकांची अत्यंत गैरसोय होत असणे, तसेच कोल्हापूर शहराची लोकसंख्या सुमारे ७ लाखाच्या आसपास असतानाही सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने स्थानिक महिला यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत असून परिणामी महिलांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याने युरिन अधिक वेळ तटल्यामुळे महिलाना युरिन इन्फेक्शन, फंगल इन्फेक्शन तसेच किडणीचे गंभीर आजार होऊ शकतात व किडनी स्टोन सारखा त्रासही होऊ शकतो अशी धक्कादायक माहिती किंवा चिंता आरोग्य तज्ञांकडून करण्यात आलेली असणे, | श्रीमती जयश्री जाधव वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | तसेच कोल्हापूर शहरामध्ये महिलांकरीत स्वतंत्र स्वच्छतागृह तातडीने उभरण्याबाबत केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने भरगोस निधी देऊन स्थानिक प्रशासन यांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अनेकदा केलेली असणे, परंतु प्रशासनाने महिलांच्याप्रश्नी केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२११) | "कोल्हापूर जिल्ह्यातील शासन स्तरावरील विविध विकास प्रस्ताव तत्कालीन राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेली असणे, त्यात प्रामुख्याने कोल्हापूर येथील तीर्थक्षेत्र श्री महालक्ष्मी परिसर विकास आराखड्यास सुमारे ७९.९६ कोटी रूपयाच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिलेली असणे, तसेच त्यापैकी सुमारे ८.२० कोटी रुपयाचा निधी प्राप्त झालेला असणे, उर्वरित निधीसाठी सुमारे ७१.७६ कोटीचा प्रस्ताव शासनास सादर केला असणे, परंतु त्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसणे, तसेच राजर्षि शाहू महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर उभारणे तसेच राजर्षि छत्रपती शाहू महाराज समाधी स्थळाचे सुशोभीकरण व इतर कामे करण्यासाठी रुपये ९ कोटी ४० लाख ५० हजार इतक्या निधीला शासनाकडून मंजूरी मिळालेली असणे, परंतु सदरच्या निधीची स्थगिती उठऊन निधी देणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, तसेच कोल्हापूर येथे खंडपीठ व सर्किट बेंच त्वरिती सुरू करण्याबाबत शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही किंवा पाठपुरावा केलेला नसणे, तसेच नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या कामाला दिलेली स्थगिती उठवणे व त्याजागी जागा उपलब्धतेचा निर्णय घेणेत यावा अशी मागणी असणे, तसेच जिल्हा क्रीडा संकुल करीत जागा उपलब्ध करून दिलेली नेमणे, यासह कोल्हापूर शहरातील केशवराव भोसले नाट्यगृह व राजर्षि शाहू खासबाग कुस्ती मैदान संवर्धन व सुशोभीकरण करण्यासाठी सुमारे ८.९३ कोटी रुपयाचा निधी शासनाने उपलब्ध करून द्यावा, अशी हि मागणी असणे, तसेच शासनाने कोल्हापूर शहर अंतर्गत रस्त्यासाठी राज्यस्तरीय नगरीयान अंतर्गत सुमारे १६५ कोटीच्या प्रस्तावास मान्यता द्यावी, अशी मागणी असणे, तसेच राज्यशासनाच्या तेजस्विनी बस योजनेमधून महिलांसाठी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी असूनही अद्याप कोणतीही उपाययोजना शासनाने केलेली नसणे, तसेच कोल्हापूर सुरक्षित टप्पा क्र. २ या प्रकल्पास मान्यता देण्यात आलेली नसणे. | श्रीमती जयश्री जाधव वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | तसेच पंचगंगा प्रदूषणाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुण त्याची अमलबजावणी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनाकडे करण्यात येणे, परंतु शासनाने निधीबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२१२) | "परभणी महानगरपालिकेंतर्गत सन २०१८ मध्ये १००० आसन क्षमतेच्या नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकास कामांना नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, सदर कामासाठी मार्च, २०१८ मध्ये १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे, सद्यःस्थितीत निधी अभावी सदर नाट्यगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असणे, नाट्यगृहाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्यासाठी अजून ११ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असणे, या नवीन नाट्यगृह बांधकामासाठी वाढीव ११ कोटी ७५ लाख रुपये निधीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १६/०६/२०२२ रोजी परभणी महानगरपालिकेने शासनास सादर केलेला असणे, सदर वाढीव निधीस मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ०२/११/२०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत निधी मंजूर न होणे, परिणामी सदर नाट्यगृहाचे काम अद्यापही निधी अभावी रखडलेले असणे, त्यामुळे जिल्ह्यातील व परिसरातील कलावंताची होणारी फरफट, शासनाने परभणी येथील १००० आसन क्षमतेच्या मंजूर नवीन नाट्यगृहाचे काम पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेला निधी तात्काळ मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही." | डॉ. राहूल पाटील वि. स. स. | कित्ता |
| (२१३) | "माझ्या वडगावशेरी मतदार संघातील स.नं.२१४/२ येथे एका बांधकाम व्यावसायिकाने जवळपास ३४० झाडांची कत्तल केली असणे, झाडे तोडतांना शासनाकडून संबंधित व्यावसायिकाकडून प्रतीशुल्क न घेणे, तसेच परवानगी घेतांना संबंधित झाडांएवढे वृक्षारोपण करावे लागत असून तसे न करणे, संबंधित व्यावसायिकावर अद्याप कार्यवाही न होणे, तसेच अधिकारी व व्यावसायिक यांचे लागेबांधे दिसून येणे, संबंधित बाब वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित होणे, तसेच माझे दिनांक ०५/०१/२०२३ रोजी महापालिका आयुक्त यांना निवेदन देणे, परंतु संबंधित व्यावसायिकांवर आजतागायत महापालिकेकडून कार्यवाही न होणे, पर्यावरणाचा सर्रास ऱ्हास होणे, वरिल बाब खरोखर चिंताजनक असणे, सदर घडलेल्या प्रकारामुळे | श्री. सुनिल टिंगरे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | पर्यावरणप्रेमी व सामान्य नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२१४) | "रत्नागिरी जिल्हयातील गुहागर नगरपंचायत हद्दीत १४ वा वित्त आयोग योजनेंतर्गत करावयाच्या रस्ते, पाखाडी, गटार व संरक्षक भिंत अशा कामांच्या दि. २/११/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ४१ पैकी तब्बल २४ कामांच्या जागा हया नगरपंचायत मालकीच्या नसल्याची गंभीर बाब दि.१/१/२०२० रोजी वा त्यासुमारास समोर येणे, मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनीच सदर माहिती अर्जदार जयदेव मुरलीधर मोरे, रा. गुहागर यांना माहितीच्या अधिकाराखाली दिलेली असणे, त्यामुळे खोटी प्रमाणपत्रे सादर करून कामे मंजूर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याचे निष्पन्न होणे, त्यामुळे मुख्याधिकारी तसेच सदर कामांना मंजुरी देणाऱ्या प्रक्रियेतील संबंधितांवर कारवाईची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेली मागणी, त्यावर सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना शासनाने आदेश देणे, या आदेशानंतर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून त्रिस्तरीय समिती गठीत केलेली असणे, सदर समितीने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे अहवाल सादर केलेला असणे, मात्र २ वर्ष उलटूनही हा अहवाल शासनाला सादर करण्यात आलेला नसणे, त्यामुळे अहवाल गुलदस्त्यात ठेवून नगरपंचायत गुहागर यांनी केलेल्या बेकायदेशीर कामांना पाठिशी घालण्याची भूमिका शासनाची आहे का, असा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असलेली अत्यंत संतापाची व चिडीची भावना, बेकायदेशीर व नियमबाह्य कामे करून कोणतीही कारवाई होत नसल्याने अशा प्रकारे अन्य कामे करण्याचे नगरपंचायतीला मिळालेले बळ, यातून वाढलेला मनमानी कारभार व प्रचंड भ्रष्टाचार, ही गंभीर बाब लक्षात घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. भास्कर जाधव वि. स. स. | कित्ता |
| (२१५) | "माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्या सुमारास सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील अत्यंत महत्त्वाची व पवित्र समजली जाणारी चंद्रभागा नदीच्या पाण्याचे व पंढरीचा यमाई तलावातील पाण्याचे होणाऱ्या प्रदूषणाच्या समस्येने गंभीर रूप धरण करणे, पंढरपूर शहराची वाढती लोकसंख्या आणि दररोज येणाऱ्या भाविकांची वाढत असलेली संख्या लक्षात घेता शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा अपुरी ठरत असणे, परिणामी दररोज लाखो लिटर सांडपाणी प्रक्रिया न करताच थेट चंद्रभागा नदीत जाऊन मिसळत असणे, | श्री. समाधान अवताडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | सध्या पंढरपूर शहराची लोकसंख्या सुमारे एक लाख २५ हजार इतकी असून दररोज १३ ते १४ एम एल डी सांडपाणी वापरून सोडले जात असणे, परंतु शनिवार-रविवार, विविध यात्रा व एकादशीच्या दिवशी हे सांडपाणी जवळपास १६ ते १८ एम एल डी पर्यंत वाढत असणे, सध्या शहरात केवळ १५.५ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यरत असणे, त्यामुळे वाढलेले अतिरिक्त सांडपाणी हे कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करताच चंद्रभागा नदीच्या पात्रात मिसळत असणे, यावर उपाय म्हणून मी स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने मुख्य कारण असलेली सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता आवश्यक अशी पूर्ण क्षमतेची नवीन भुयारी गटार योजना राबविण्याची मागणी केलेली असणे, त्यानुसार पंढरपूर नगर परिषदेने २० लाख लोकांच्या सांडपाण्याची निचरा करणारी नवीन भुयारी गटार योजना सविस्तर प्रकल्प अहवाल बनवला असणें, सदर योजनेमध्ये भुयारी गटार सांडपाणी व्यवस्था, २ पंपींग स्टेशन, रायझींग पाईपलाईन, २ सेवरीज ट्रिटमेंट प्लॅन्ट, टर्शरी ट्रीटमेंट प्लान्ट, रिसायकल वॉटर वितरण व्यवस्था, रिसायकल वॉटर ESR व GSR फिल्टर व्यवस्था इत्यादी कामांचा समावेश असणे, परंतु, सदर ५ एम एल डी क्षमतेचे दोन नवीन प्रकल्पाचे प्रस्ताव तयार असून देखील मागील १० महिन्यांपासून हा प्रस्ताव नगरपालिकेतच पडून असणे, तसेच सदर प्रदूषण रोखणे करता तत्कालीन मा.मुख्यमंत्र्यांद्वारे “नमामी चंद्रभागा प्राधिकरणाची” स्थापना करण्यात येणे, तत्कालीन अर्थमंत्री यांनी उल्लेख केल्यानुसार सदर प्राधिकरणाचे मुख्य काम नदीत मिसळणारे सांडपाणी बंद करणे, उगमापासून संगमापर्यंत पाणी स्वच्छ करणे, पंढरपूर परिसरात दोन्ही बाजूंना नदीकाठावर झाडे लावणे, घाट सुशोभिकरण करणे, तसेच शहरात वारीकाळात वारकऱ्यांना पूर्ण क्षमतेने शौचालय उभारणे, इत्यादी महत्त्वाच्या कामांचा आराखड्यात समाविष्ट करण्याचा उद्देश असणे, परंतु स्थापनेनंतर अद्यापर्यंत आराखडा तयार करण्यात आला नसल्याची बाब उघडकीस येणे, तसेच हजारो घरातील महिला मिश्रित सांडपाणी यमाई तलावत कोणतेही प्रक्रिया न करता सोडत असल्याने तलावाचे रूपांतर सांडपाणी साठवणारे टक्के म्हणून झालेले असणे तलावाच्या परिसरातील जलचर जीवांसह सभोवताली राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य ही सदर प्रदूषणामुळे धोक्यात आलेले असणे सदरचा तलाव हा शेकडो वर्ष जुना असून शहरातील सर्वात मोठा तलाव असणे, सदर तलावाचे क्षेत्रफळ जवळपास ८० एकर इतके असणे, प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नदीच्या व तलावाच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होणे, नदीचे पावित्र्य नष्ट होत असल्याचे बघून येथील स्थानिक नागरिक, वारकरी व भाविकांमध्ये | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रशासनाविषयी विषयी तीव्र चीड निर्माण होणे, सबब पवित्र अश्या चंद्रभागा नदीचे व यमाई तलावाचे प्रदूषण कमी करण्याकरता नमामी चंद्रभागा प्राधिकरणाची बैठक घेऊन आराखडा तयार करून व नवीन भुयारी गटार योजनेस मंजुरी देऊन आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपायोजना.” | | |
| (२१६) | “पंतप्रधान यांचे प्रत्येक भारतीय नागरिकाला स्वतःचे हक्काचे घर असावे असे स्वप्न असणे, माननीय पंतप्रधान यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची आखणी करून प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नगरविकास विभागाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ व दिनांक ०६ मार्च, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करणे, खाजगी व सरकारी जमिनीतील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी दोन स्वतंत्र शासन निर्णय काढलेले असणे, दिनांक १/१/२०११ पूर्वी वास्तव्य करणाऱ्या नागरिकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश असणे शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील नाशिक महानगरपालिकेकडून मात्र याबाबत कोणती कारवाई करण्यात न येणे, नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी कोणती कारवाई करण्यात येणे, शासन निर्णयात नमूद असताना देखील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी बैठकीचे आयोजन न करण्यात येणे, यामुळे नाशिक शहरात राहणाऱ्या अनेक नागरिकांना हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागणे, महानगरपालिकेचे सदर शासन निर्णयाकडे होत असणारे दुर्लक्ष, नाशिक महानगरपालिकेत सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी यंत्रणा नसणे त्यामुळे नागरिकांची होत असणारी गैरसोय, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सर्वांसाठी घरे देण्यासाठी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | श्रीमती देवयानी फरांदे वि. स. स. | कित्ता |
| (२१७) | “मुंबई येथील लोअर परळ स्थानकाजवळील डिलायल रोड उड्डाणपुलाचे बांधकाम गत ४ वर्षांपासून प्रलंबित असणे, सन २०१८ मध्ये सदरहू उड्डाणपुल धोकादायक अवस्थेत असल्याने नुतनीकरणासाठी पाडण्यात आला असणे, सदरहू पुलाचे बांधकाम महानगरपालिकेकडून ५० टक्केच झाले असणे, तसेच पुलाच्या बांधकामाकरिता महानगरपालिकेने ८५ मीटर लांबीचे बांधकाम करण्यासाठी रेल्वेस निधी प्राप्त | श्री. आदित्य ठाकरे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | करून देऊनही रेल्वे प्रशासनाने तांत्रिक कारण देऊन सदर पुलाचे बांधकाम करण्यास जाणीवपुर्वक विलंब केल्याने एल्फिस्टन, वरळी व प्रभादेवी या विभागातील नागरीकांना मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे सदरहू विभागातील नागरीकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाचे भावना, उक्त प्रकरणी शासनाने रेल्वे प्रशासनाकडून होत असलेल्या विलंबाबाबत चौकशी करून सदरहू पुलाचे बांधकाम तात्काळ पुर्ण करण्याच्यादृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२१८) | "बोरीवली (प.) येथील खाडीपलीकडील गोराई, उतन, मनोरी हे परिसर मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असून तेथे पाणीपुरवठा, रुग्णालय, प्रसुतिगृह, पथदिवे आदि विविध नागरी सुविधांची मागील अनेक वर्षापासून अभाव असतानाही महापालिकेचे कायम दुर्लक्ष होत असल्याची भावना तेथील नागरिकांमध्ये निर्माण होणे, सदरहू नागरी सुविधांची विनाविलंब पूर्तता करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होणे, गोराई गावातील रस्त्यामध्ये काही भाग वगळता एकूण रस्त्याची स्थिती चांगली असतानाही या भागात कॉंक्रिटचे रस्ते बांधण्यासाठी जवळ १०० कोटीच्या निविदा मागविल्याने तेथील नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली असून आधी नागरी सुविधा अशी मागणी करण्यात येणे, गोराई कोळीवाडयातील नागरिकांना योग्य पाणीपुरवठा होत नसल्याचे पालिकेच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही दुर्लक्ष होत असल्याचे रहिवाशांना टँकर किंवा बोअरवेलचे पाणी वापरावे लागणे, विकास हा लोककेंद्रीत असावा गोराईत तो कंत्राटदार केंद्रित असल्यामुळे या प्रकरणी पालिका प्रशासनाची सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई विना विलंब करण्याची मागणीही करण्यात येणे, या संपूर्ण परिस्थितीबाबत गांभीर्याने विचार करून सदरहू गोराई, उतन व मनोरी येथे विनाविलंब पाणीपुरवठा, रुग्णालय, प्रसुतिगृह रुग्णवाहिका, पथदिवे आदी नागरी सुविधांची पुर्तता करण्याचे दृष्टीने शासनाने ठोस करावायची कार्यवाही." | श्री. सुनील राणे वि. स. स. | कित्ता |
| (२१९) | "राज्य शासनाने राज्यातील ग्रामीण भागात पथदिवे लावण्याकरिता ईईएसएल या कंपनीकडून पथदिवे खरेदी करणे बंधनकारक करण्यात येणे, यामुळे मालवण नगरपरिषदेच्या, जि.सिंधुदुर्ग यांच्या पुरवठादाराने ईईएसएल कंपनीशी १८ वेट डेकॉरेटिव्ह लाईट व ५०० वॅट एलईडी पुरविणेबाबत करारनामा करण्यात येणे, परंतु मालाचा पुरवठा न केल्यामुळे दि.५.८.२०२२ व १५.११.२०२२ रोजी दोन स्मरणपत्रे पाठवूनही अदयापही पुरवठा न केल्यामुळे नगरपरिषद हददीतील अंदाजे २०० लाईट बंद अवस्थेत असणे, तसेच या | श्री. वैभव नाईक वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कंपनीला दि.२९.१०.२०२१ रोजी ६,६०,७९७ व दि.५.८.२०२२ रोजी ९,३२,४५६/- रुपये एवढी रक्कम अदा करूनही पथदिव्यांचा पुरवठा करण्यात न येणे, परिणामी शहरातील बंद अवस्थेतील पथदिव्यांची दुरुस्ती करतांना मर्यादा येत असल्याने नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| (२२०) | " माहे फेब्रुवारी, २०२३ व त्या सुमारास पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्या अंतर्गत वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील मौजे वालीव येथील सर्वे नं. ४७, हिस्सा नं. ७, ७ अ, ७ ब,सर्वे नं. ४८, हिस्सा नं. ६, १०, ११, सर्वे नं. ५०, हिस्सा नं. ३, क्षेत्र २६८१० चौ. मी. जमिनीवर व्यवसायीक व रहिवाशी इमारतीचे बांधकाम करणेकामी आरक्षित तलाव आणि नाल्याच्या जागेवर बेकायदेशीर रित्या भराव करून इमारत बांधकामाची परवानगी मिळविल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आलेली असणे, वरील नमूद जमिनीत शाहिद अब्दुल हमीद मुस्तफा हुसेन शेख व त्यांच्या कुटूंबियांचे क्षेत्र ४००० चौ. मी. असून हे क्षेत्र दि. २५/११/२००९ रोजीचे कायदेशीर व नोंदणी खरेदीखताने असणे, त्याबाबतचा फेरफार क्र. ५०२९ दि. ०६/१२/२००८ रोजीनुसार सदर क्षेत्र हे. आर. चौ. मी. ४०.००.००, आकार रु. पै. ४००.०० ही जमीन त्यांच्या कुटूंबियांचे बेस्ट बिल्डर्सचे भागीदारांचे नावी वरील नमूद जमिनीच्या ७/१२ चे उताऱ्यात नोंदलेली आहे. सदर ४००० चौ. मी. जमिन ही त्यांचे दि. २५/११/२००८ रोजीचे खरेदीखत त्यावेळेचे प्रस्तावित डेव्हलपमेंट प्लान नुसार बिल्डींग नं. ३ चे एफ विंगचे बांधकाम व बिल्डींग नं. ४ चे डी विंगचे बांधकामाचे डेव्हलपमेंटचे हक्कासहित असणे, उर्वरीत क्षेत्र हे मोना अतुल पटेल यांचे नावी मालक सदरी नोंदलेले असणे,वरील नमूद जमिनींबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांनी क./महसूल/क-१-टे -९/एस. आर. १३९/२००४ दिलेले बिनशेती परवानगीनुसार (दि. १८/०७/२००५ रोजीची) तत्कालिन सिडको ह्यांनी बांधकाम परमिशन B. P. ३५६४६, दि. ०२/०९/२००८ रोजीचे क्षेत्र १२७१९.७२ चौ. मी. करीता दिलेली असणे, त्यानुसार डी. पी. रोड क्षेत्र ६४७७.४३ चौ. मी., कॅनल क्षेत्र ८२०६ चौ. मी., तलाव क्षेत्र २९०३.३६ चौ. मी., आर. जी. क्षेत्र २३८४.९५ चौ. मी., सी.एफ. सी. क्षेत्र ७९४.९८ चौ. मी. बांधकाम अनुज्ञेय नाही, असे स्पष्ट आदेशात नमूद केलेले असणे, तसेच महसूल विभागाच्या दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या | श्री. शिरीष चौधरी,श्री. अबू आजमी,श्री. अनिल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | ७/१२ उताऱ्यावर देखील तलाव क्षेत्र २९ गुंठे असल्याची नोंद असणे, मात्र सदर जागेवर तलाव असल्याकारणाने रे.नं.५४७/२०११ दाव्यात मा. सिव्हील जज्ज (जे. डी.) वसई ह्या सदर युसुफ कुरेशी मालक मे.निर्माण डेव्हलपर्स विरुध्द बांधकाम मनाई आदेश दिलेले असणे, असे असताना देखील मे. निर्माण या विकासकाने वसई विरार शहर महानगरपालिकेचे नगररचना विभागाचे अधिकारी उप संचालक वाय. एस. रेड्डी तसेच महसूल विभागातील तहसिलदार, तलाठी, मंडळ अधिकारी यांना हाताशी धरून नविन रिवाइस प्लान सादर करून तलाव असताना देखील तलाव नसल्याचे खोटेपणाने दाखवून बनावट बांधकाम परमिशन V. P.४२८९/२०२२-२३ अन्वये मंजूर करुन घेणे, त्यासाठी तहसिलदार, तलाठी व मंडळ अधिकारी यांनी विषयांत नमूद जमिनीत तलाव नसलेबाबत खोटा, बनावट कागदपत्र व पंचनामा तयार केला असणे, यामध्ये संबंधित अधीकारी व विकासकाने आर्थिक गैरव्यवहार करून सदर ठिकाणी २९ गुंठ्याचे तलाव आढळले नसल्याचे अहवालात नमूद करणे,एकीकडे सिडको व मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आपल्या अहवालात तलाव असल्याचे स्पष्ट नमूद केले असताना देखील संबंधित जबाबदार अधिकारी यांनी आपल्या पदाचा आर्थिक फायद्यासाठी गैरवापर केल्याचे स्पष्ट होणे, यामुळे संबंधित तक्रारदार शाहिद अब्दुल हमीद मुस्तफा हुसेन शेख यांच्यावर अन्याय झाल्याची भावना निर्माण होणे, शासनाची दिशाभूल करून पदाचा गैरवापर केलेल्या वसई तहसिलदार उज्वला भगत, वसई विरार शहर महानगरपालिकेचे नगररचना अधिकारी वाय. एस. रेड्डी, ज्युनियर इंजिनियर मिताली चंद्रकांत धनगर यांचेविरुध्द आर्थिक गुन्हेगारी, पर्यावरण कायदे व बनावट पंचनामा, अहवाल दाखले, तोतया व्यक्तीसह केलेबाबत फौजदारी गुन्हे नोंदविन्याबाबत शासनाने करावयाची कारवाई." | | |
| (२२१) | "जोगेश्वरी (पूर्व) येथील नवलकर मंडई धोकादायक जाहिर करून सन २०१५ मध्ये मंडई खाली करण्याच्या देण्यात आलेल्या सूचना, सदरहू मंडई रिक्त करुन निष्कासित करण्याचे देण्यात आलेले निर्देश, बहुतांशी गाळेधारकांचा तातपुरत्या स्थलांतरास असलेला विरोध, सदर मंडईचा सुधारित आराखडा तयार असून त्यास अंतिम मंजूरीकरिता महानगरपालिकेच इमारत विभागाकडे पाठविण्यात येऊनही आज सहा वर्षाहून अधिक काळ लोटूनही अद्याप कोणताच निर्णय न होणे, किरकोळ मंडईकरिता आरक्षित असलेल्या नगर भूमापन क्रमांक २५५, २५६, २५७, २५८, व २५९ पैकी २५६ ,२५७ हे भूखंड अधिग्रहणासाठी सन | श्री. रविंद्र वायकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | २०१२ पासून अधिक्षक भूमिलेख यांच्याशी पत्रव्यवहार करूनही त्यास इच्छित यश न मिळणे यासंदर्भात महसूल व नगरविकास यांची संयुक्त बैठक घेण्याबाबत आश्वासन देऊनही अद्याप पुर्तता न होणे, परिणामी या अत्यंत धोकादायक अवस्थेत असलेल्या मंडईच्या पुनर्विकासास प्रशासन उदासिन असणे, मंडईच्या पुनर्विकासाचे स्वप्न फक्त कागदावर राहणे, मा.नगरविकास मंत्रीमहोदयांनी सदर मंडईचा पुनर्विकास ४ वर्षात करण्याचे महानगरपालिकेमार्फत नियोजित असून सदर मंडईच्या पुनर्विकासानंतर गाळेधारकांना पुनर्विकसित मंडईमध्ये पुनस्थापित करण्यात येणार असल्याचे आश्वासित करणे, सदरहू नवलकर मंडईचा भूखंड महानगरपालिकेच्या नावावर करण्यात येणे, त्याचबरोबर निर्मलाताई राजेश्वर रागिनवार प्रेमनगर मार्केट –जोगेश्वरी-पूर्व हे मार्केट अत्यंत धोकादायक अवस्थेत असणे, याठिकाणी असलेले प्रसाधनगृह, शेड, पायवाट, विजेचे कनेक्शन, पाणीपुरवठा याची अवस्था अत्यंत दयनीय असून या मंडईचा देखील पुनर्विकास करण्यात यावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिनी सातत्याने पाठपुरावा करुनही प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, उपरोक्त नवलकर मंडई व निर्मलाताई राजेश्वर रागिनवार मंडई या दोन्ही मंडईचा तातडीने पुनर्विकास होण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून मंडईच पुनर्विकांसाकरिता भरीव निधीची उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.” | | |
| (२२२) | “भुसावळ नगरपालिकाच्या मुख्य अधिकारी यांच्या विरोधात शासनाकडे तथा जिल्हा प्रशासनाकडे विविध भ्रष्टाचार करणेबाबतची तक्रार शहरातील नागरिकांनी वर्ष २०२२ पासून केली असल्याची माहिती समोर येणे, सदर भ्रष्टाचाराची दखल घेत शासनाने जिल्हा प्रशासनाला त्रिस्तरीय समिती नेमण्याचे आदेश देणे सदर तिरीस्तरीय समिती वर्ष २०२२ च्या मार्च या महिन्यात गठित होणे परंतु सुमारे एक वर्ष उलटला तरी या समितीने शहरातील विविध भ्रष्टाचारांच्या बाबतीत कोणतीही कारवाई न करणे तसेच संबंधित तक्रारदाराला न बोलवता परस्पर चौकशी केली असल्याची बाब समोर येणे, शहरातील दलित वस्तीचा निधी दलित बहुल विभागात न खर्च करता दुसऱ्या विभागांमध्ये खर्च करत असल्याची तक्रार होणे शहरातील रस्त्यांचे काम १२ कोटी मधून होत असल्याने सुद्धा ज्या रस्त्यांच्या समावेश १२ कोटीच्या रस्त्यामध्ये आहे त्या रस्त्यांना तीन वर्षाची देखभाल दुरुस्तीचे कालावधी असताना त्या रस्त्यावर परत तीस लाख रुपयांच्या | श्री. चंद्रकांत निंबा पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | काम करायची ना हरकत प्रमाणपत्र आपल्या अधिकारात नसताना त्यामुळे शहरांमध्ये विविध विकास कामांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याची बाब समोर येणे सदर रस्त्याच्या उद्घाटन प्रसंगी जे नागरिक नगरसेवक नाही आशांचा उल्लेख सदर बोर्ड वरती होत असणे त्यामुळे सार्वजनिक बांधकाम अथवा नगरपालिका प्रशासन या कोणत्या विभागाने हा उद्घाटन समारंभ केलेला आहे त्यांनी जनतेची फसवणूक करणे,शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असून त्या अतिक्रमण निर्माण करण्यासाठी मुख्याधिकारींकडे तक्रारी प्रलंबित असून सुद्धा त्याने आर्थिक देवाण-घेवाण करून या अतिक्रमण न काढणे त्यामुळे या नागरिकांच्या जमिनीवरती अतिक्रमण आहे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे मुख्याधिकारी भुसावल यांनी शहरातील विविध ओपन स्पेस जागेवरती जॉगिंग पार्क व गार्डन बनवण्याची निविदा प्रसिद्ध करणे व त्या काम त्यांना देण्यात आलेला कालावधीमध्ये न करणे त्यामुळे शासनाच्या पैशाचा अपव्य होणे व ज्या ठिकाणी क्रीडांगणाचा आरक्षण आहे त्या ठिकाणी ग्रीन पेस्ट अंतर्गत गार्डन तयार करणे व त्याची देखभाल दुरुस्ती न होणे घरामध्ये दुभाजक तयार करत असताना ते शासनाच्या नियमाप्रमाणे होत नसल्याची तक्रार नगरपालिका प्रशासन व जिल्हा प्रशासन तसेच राज्य सरकारकडे होत असणे शहरातील नगरपालिका दवाखान्यामध्ये औषधी उपलब्ध नसणे व नगरपालिकातील डॉक्टर आपल्या मनमर्जी कारभार प्रमाणे कार्य करत असणे त्यामुळे शहरातील होणारे पोस्टमार्टमला उशिर होणे भुसावळ नगरपालिकेतील मुख्याधिकारी हे क वर्ग दर्जाचे अधिकारी असताना त्यांना वर्गाचा नगरपालिकाचा प्रभार देणे जे शासनाच्या नियमाला बगल देत असणे त्याबाबतची तक्रार शहरातील विविध माजी नगरसेवक व लोकांनी शासनाकडे करत असणे शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात काँक्रीट व डांबरीचे रस्ते असताना शासनाच्या नियमाला डावलून पेवर ब्लॉकचे रस्ते तयार करणे मुख्याधिकारी यांच्यावर असलेले विविध भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी होणे गरजेचे असताना त्या बाबतीत कोणती चौकशी न होत असल्याची बाब समोर येणे व शासनाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक २५ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाला देखील यांनी कचऱ्याची टोपली दाखवली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ सन २०१२ आणि आत्ताचे दिनांक २५ मे, २०२२ चे शासन बाजूला करत मुख्य अधिकारी ने आपल्या अधिकारात आपल्या कार्यालयात एअर कंडीशन बसवल्यामुळे नगरपालिकाचे वीज बिल मोठ्या प्रमाणात येणे त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे तरी शहरातील विविध विकास कामांच्या कामाची चौकशी करण्यासाठी गठित असलेल्या समितीने लवकरात | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | लवकर चौकशी अहवाल देऊन संबंधितांवर कारवाई करणे गरजेचे असताना ते न करणे या मुख्याधिकारी भ्रष्टाचार मध्ये लिंपीत असल्यामुळे त्याची चौकशी आर्थिक गुन्हा शाखा मार्फत होणेची नितांत गरज त्यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.” | | |
| (२२३) | “राज्यात नाशिक महापालिकेत नोकर भरतीसाठी ३५ टक्के आस्थापना खर्चाच्या मर्यादेची अट शासनाने शिथिल केल्यामुळे महापालिकेतील २८०० रिक्त पदांच्या भरतीचा मार्ग मोकला झाला असल्याने ही प भरण्यासाठी शासनाची अनुमती घ्यावी लागणार आहे असणे. त्यामुळे महापालिकेच्या स्थापना परिशिष्टावर विविध संवर्गातील ७०९० पदे मंजूर असणे त्यातील जवळपास २८०० हून अधिक पक् असून गेल्या २१ वर्षापासून महापालिकेत नोकर भरती झालेली नाही. पदोन्नत ‘ब’ संवर्गानुसार महापालिकेने शासनाच्या मान्यतेसाठी १४ हजार पदांचा सुधारित आकृतीबंध सादर केला आहे. मात्र त्यास अद्याप मंजुरी मिळू शकलेली नसणे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तातडीची बाब म्हणून अग्निशमन विभागाच्या ३४८ वैद्यकीय व आरोग्य विभागातील ३५८ अशा एकूण ७०४ पदांच्या भरतीला शासनाने मान्यता दिली आहे, परंतू ही भरती करताना टिसीएस किया आयबीपीएस या संस्थेच्या माध्यमातून भरतीच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार महापालिकेने आयबीपीएस संस्थेसमवेत कराराची प्रक्रिया सुरू कारणे नाशिक महापालिकेने आणखी ११ विभागांच्या सेवा प्रवेश नियमावलीचे प्रस्ताव महासभेच्या मान्यतेने शासनाकडे सादर केलेले आहेत. सेवा प्रवेश नियमावलींना मंजुरी घेऊन उर्वरित रिक्त पदांच्या भरतीची महापालिकेची योजना असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्रीमती सीमा हिरे, वि. स. स. | कित्ता |
| (२२४) | “वाशी नवी मुंबई येथे सेक्टर - ३,४,५ व ६ याठिकाणी सुमारे ४० वर्षांपासून सिडकोने रहिवाशी वापराकरिता ३ व ४ मजली सदनिका बांधणे, सदर रहिवाशी सदनिकांमधील तळ मजल्यावर असणाऱ्या सदनिका अवैधरीत्या हेअर सलून, टेलर दुकान, मिठाई दुकान, बँक एटीएम इतर दुकानाकरिता भरमसाठ भाड्याने देणे, काही इमारतीसमोर संरक्षण भिंत बांधण्यास तळ मजलावर दुकानदारांनी विरोध करणे, परिणामी फेरीवाले विक्रेते, खरेदी करण्यासाठी येणाऱ्या अनाहूत ग्राहकांमुळे स्थानिक रहिवाशांना विनाकारण त्रास सहन करावा लागणे, सदर ईन्नाटी ४० वर्षांहून अधिक जुन्या असल्यामुळे इमारती अत्यंत कमकुवत झाल्याने इमारतीचे स्लाब प्लास्टर केव्हाही कोसळण्याची भीती निर्माण होणे, तळमजल्यावर ज्या सदनिकाधारकांनी | श्री. अबू आजमी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | वाणिज्यिक वापरासाठी सदनिका भाड्याने दिलेल्या असणे. त्यांच्या प्रामुख्याने इमारतींच्या पुनर्विकासासाठी तीव्र विरोध असणे, परिणामी इमारतींच्या पुनर्विकास प्रक्रियेला खिळ बसने, या प्रकरणी २० फेब्रुवारी, २०२३ रोजी सिडको नवी मुंबई महानगरपालिकेला निवेदन देणे, तथापि कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत गंभीर नोंद घेऊन शासनाने प्राधान्याने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२२५) | "औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांची वापरात असलेली इमारत मोडकळीस आल्याने तसेच जागा अपुरी पड़त असल्या कारणाने जागा नवीन जागा ११६ बी अरबी चांदोरकर मार्ग आगरी पाडा मुंबई ११ येथे देण्याचे शासन निर्णयद्वारा ठरणे, तसेच त्याकरिता महाराष्ट्र शासनद्वारा आर्थिक तरतूदसुद्धा करण्यात येणे, सदरील जागा ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत लोअर परेल यांच्या ताब्यात देण्यात आलेली असताना सदरील जागेवर होमलेस शेल्टर चे आरक्षण होते व सदर आरक्षण बदलून ते (इतर शिक्षण) Other Education करावे अशा स्वरूपाचा पत्रव्यवहार वेळोवेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारा करण्यात येणे, परंतु त्यास तत्कालीन शासनाने कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात न येणे, आणि सन २०२० साली मंजूर झालेल्या डीपी २०३४ मध्ये हे आरक्षण बदलून इतर शिक्षण असे करण्यात येणे, आणि सदगीर आरक्षण बदलल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारा महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करून मोजणी करणे, तसेच संरक्षण भिंत बांधण्यास परवानगी मागण्यात येणे व याबाबतचा झालेला पत्रव्यवहारही उपलब्ध असून, सदरील बाब मुंबई महानगरपालिकेद्वारा कुठल्याही प्रकारे प्रतिसाद न देणे, आणि दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांना शैक्षणिक वापराकरता देण्यात आलेली जागा प्रस्तावित भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शैक्षणिक उद्दिष्टाकरिता देण्यात आलेला असतानाही संस्थेकडून सदर भूभागावर शैक्षणिक उद्दिष्ट अनुरूप कोणतेही बांधकाम करणात आलेले नसल्यामुळे हा भूभाग वापराविना आहे तसाच ठेवून मग त्याच्या अटी व शर्तीचा भंग केलेला असणे, तसेच सदरील मक्त्याने दिलेल्या भूभागाचे संपूर्ण विहित भुई भाडे महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकेला अद्याप प्राप्त झालेले नाही अशा रूपाचे कारण दाखवून ती जागा परत घेण्याचा निर्णय घेण्यात ठराव करण्यात येणे, तसेच सदरील भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून काढून घेऊन त्या जागेवर उर्दू लर्निंग सेंटर उर्दू भवन उभारण्याचा निर्णय परस्पर घेण्यात येणे, तसेच तीन महिन्याचे आतच | श्री. नितेश राणे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | म्हणजे फेब्रुवारी, २०२२ मध्ये साडेबारा कोटी रुपयांचे उर्दू लर्निंग सेंटर उभारण्यासंदर्भातले टेंडर ही मागवण्यात येणे, आणि सदरील टेंडर मागवून प्रक्रिया राबवून सदर जागेवर उर्दू लर्निंग सेंटर संदर्भात बांधकाम सुरू करण्यात येणे, तसेच सर्व बैठका बी.एम.सी. ने कोरोनाकाळात घेणे, आणि याबाबतीत कोणत्याही बैठकीचे मिनिट्स, बैठकीचे पुरावे नसणे, तसेच याबाबत आयुक्तांना राष्ट्रीय बालहक्क आयोगाने नोटीस देऊन याबाबत अहवाल मागवणे आणि अद्याप प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना बांधकाम चालू असणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | | |
| (२२६) | "मुंबई भारत सोसायटी, जंगलेश्वर महादेव मंदिर रोड, सुभाष नगर, असल्फा व्हिलेज, घाटकोपर पश्चिम, मुंबई ४०००८४ येथे असलेल्या "मदरसा मस्जिद अरबिया सिराजुल उलुम" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका बेकायदेशीर बांधकाम झालेले असणे, तसेच सदर बांधकाम जुलै, २०२० च्या सुमारास कोविड १९ चा फायदा घेऊन या बेकायदेशीर संरचनेचे बांधकाम सुरू झालेले असणे, त्यानंतर ४ डिसेंबर, २०२० रोजी वरिष्ठ अभियंता, इमारत आणि कारखाना विभाग, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई यांना तक्रार पत्र देणे, तरी देखील बेकायदेशीर बांधकामावर कार्यवाही न होणे, त्यानंतर पुन्हा दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी सहायक आयुक्त, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई यांना पत्र देणे आणि त्यानंतर स्थानिक रहिवाशी शिष्टमंडळासह सहायक आयुक्तांची भेट घेणे, सहायक आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करणे, त्यानंतर देखील कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करणे, सदर मज्जित ज्या ठिकाणी आहे तो भूखंड उद्यान म्हणून आरक्षित भूखंड असणे, यासंदर्भातील सर्व पुरावे महानगरपालिकेचे असताना देखील श्री.नितिन कांबळे (पदयुक्त अधिकारी, बी अँड एफ, एल वॉर्ड), श्री.रामेश्वर वाकडे (एई, बी अँड एफ, एल वॉर्ड), श्री. शिल्पेश दिनकर वाघमोडे (जेई, बी अँड एफ, एल वॉर्ड, कुर्ला), श्री. दत्ता (मुकादम, बी अँड एफ, एल वॉर्ड, कुर्ला) यांनी कारवाही न करणे स्थानिक रहिवाशांवार दबाव आणणे, तसेच सदर बांधकाम चालू ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, तसेच सदर अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी तोंडी परवानगी देऊन बांधकाम चालू ठेवणे, तसेच सदर अधिकाऱ्यांच्या आणि त्यांचा नातेवाइकांचा संपत्तीमध्ये वाढ होणे, आणि या बाबत | श्री. नितेश राणे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | स्थानिक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना देखील वेळोवेळी रहिवाश्यांनी संपर्क केला असता त्यांनी देखील कोणतीही दखल न घेता उलटी कारवाही करण्याची धमकी देणे, या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | | |
| (२२७) | "वसई येथील सर्व्हे नं. १७६, १७७ आणि इतर गांव मौजे दिवाणमान, तालुका वसई (प), पालघर ह्या जागेवर हिंदु बहुल वस्तीमध्ये मुस्लीम दफनभूमी बांधण्यासाठी वसई तालुक्यामध्ये शर्थीचे प्रयत्न सुरु असणे, तसेच सदर वादातील दफनभुमीची जागा गाव मौजे दिवाणमान, तालुका वसई (प.) पालघर येथील स. नं. १७६, १७७ आणि इतर ही जागा केंद्रशासनाच्या पर्यावरण विभागाने तयार केलेल्या वेटलँड (पाणथळ जागा) मध्ये अंतर्भुत असून सदर जागा व्हेटलँड मध्ये अंतर्भुत असल्याची (व्हेटलँड ॲटलासने बाधीत असल्याचे) खुद्द वसई विरार महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या दिनांक ०२/०३/२०१९ च्या पत्रामध्ये स्पष्टपणे मान्य केलेलं असणे, तसेच वादातील दफनभुमीची जागा व्हेटलँड ॲटलासने मध्ये अंतर्भुत असल्याची नोंद वेदास रुपेस सेंटरच्या संकेतस्थळामधुन सिद्ध होऊ शकते आणि http://vedas.sac.gov. in ह्या भारत सरकारच्या संकेतस्थळावर माहिती पुरावे असणे, तसेच माननीय मुंबई उच्च न्यायालयाने जनहीत याचीका क्र. ८७ /२०१३ मध्ये १४ ऑक्टोबर पोलीस ठाण अमर ०१३, १९ मार्च, २०१४ मध्ये पारीत केलेल्या आदेशामध्ये ज्या व्हेटलँड ॲटलास मध्ये पोली व्लड (पाणथळ जागा) म्हणुन दाखवलेल्या आहेत त्या जागेवर कोणत्याही प्रकारचा "भराव अथवा बांधकाम करण्यासाठी बंदी घातलेली असणे, तसेच नगरविकास खात्याने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपंचायत इत्यादी यांना MRTP Act Sec. १५४ प्रमाणे स्पष्टपणे सुचना दिलल्या असुनही तथा व्हेटलँड ॲटलास मध्ये (पाणथळ नकाशात) दिवाणमान सर्व्हे क्र. १७६, १७७ व इतर ही जागा येत असल्याची पुर्णपणे माहिती असुन देखील ह्या जागेवर वारंवार भराव व बांधकाम केले जात असने, आणि यासंदर्भात पर्यावरण विभागाने दिलेले पत्र हे माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले जात असणे, आणि सदर काम करणेपुर्वी महानगरपालिकेने माननीय उच्च न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक होती मात्र तरी देखील परवानगी न घेता बांधकाम करणे, आणि प्रस्तावीत मुस्लीम दफनभूमी ही सुरुवातीपासुन वादाच्या भोवऱ्यात असून सुद्धा जनसमुदायाचा ह्या गोष्टीसाठी विरोध मोठयाप्रमाणावर असुनही महापालिकेचा अधिकाऱ्यांनी | श्री. नितेश राणे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | जनभावना लक्षात न घेता अर्धवट अभ्यास करून सर्व्हे क्र. १७६, १७७ आणि इतर दिवाणमान येथेच दफनभुमीचा घाट घातला जात असणे, व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बऱ्याच ठिकाणी कायमस्वरुपी पाणथळ जागा असुनही मोठया प्रमाणावर भराव टाकुन बांधकामे करून विकास झाल्याचे भासवले जाणे, दफनभूमीबद्दलची विरोधाची जनभावना केराच्या टोपलीत टाकुन, दफनभुमी बांधण्यात येणे आणि त्यासाठी स्थानिक नागरिकांचा ह्या सर्व गोष्टींना पुर्णपणे विरोध असणे,तसेच या बाबत दिनांक २६ फेब्रुवारी रोजी वसई शहरात स्थानिक नागरिकांनी मोठा जनआक्रोश मोर्चा काढणे, आणि या मोर्चाची दखल वृत्तपत्र आणि नॅशनल मीडियाने घेणे, आणि अद्याप काम चालू असणे, तसेच याबाबत संपूर्ण राज्यात तीव्र आंदोलन करणार असल्याचे राज्यशासनास निवेदन देणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया.” | | |
| (२२८) | “माझ्या पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील मंगळवेढा शहराची स्वतःची अशी ऐतिहासिक ओळख असणे, संपूर्ण राज्याचे दैवत असलेले श्री विठ्ठलाचे मंदिर श्री क्षेत्र पंढरपूर येथे वसलेले असून पंढरपूर शहराच्या जवळच असलेले मंगळवेढा शहर या शहराची ओळख संतांची भूमी अशी असणे, सदर भूमीत जगत ज्योती श्री बसवेश्वर महाराज, श्री संत दामाजीपंत, श्री संत चोखामेळा, श्री संत कान्होपात्रा संत चोखोबाच्या पत्नी संत सोयराबाई बहिण संत निर्मळा मुलगा संत कर्ममेळा मेहुना संत बका संत लती बुवा संत टीकाचार्य यांच्यासह इतर काही काळ स्वामीसमर्थ अक्कलकोट वास्तव्याने व पदस्पर्शाने पावन झालेली असणे, एकीकडे पंढरपूर शहर देवाची भूमी म्हणून परिचित असणे यामुळे या दोन्ही शहरात दरवर्षी राज्यातून नव्हे तर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यांतून लाखो भाविक व अनुयायी दर्शनासाठी येत असणे, तसेच जगत ज्योती श्री बसवेश्वर महाराज यांचे नियोजित जागतिक दर्जाचे स्मारक देखील मंगळवेढा शहरात उभारण्यात येणार असणे,या सर्व संतांचे प्रत्यक्षात वास्तव्य या शहराला लाभलेले असताना देखील संतांनी प्रत्यक्षात समाजात प्रबोधनासाठी केलेले महान कार्य, समाज प्रबोधन जाणून घेण्यासाठी केवळ नावाला छोटी समाधी मंदिर उपलब्ध असणे, यामुळे आजच्या व भविष्यात येणाऱ्या पिढीला संतांच्या महान कार्यपासून, प्रबोधनपासून आपल्या संस्कृती पासून वंचित रहावे लागणार असणे, याकरता मंगळवेढा शहरात संतांनी केलेले कार्य त्यांनी केलेले समाज प्रबोधन त्यांच्या जीवनपट अशी संपूर्ण माहिती असलेली | श्री. समाधान अवताडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | संतसृष्टी निर्माण करण्याची गरज निर्माण होणे, त्या स्वरूपाची मागणी सातत्याने होऊन देखील तत्कालीन शासनाने याकडे दुर्लक्ष केलेले असणे, सदर संतसृष्टी निर्माण झाल्यास याचा फायदा मंगळवेढा शहरातील व सभोवतालच्या गावांतील पर्यटन वाढीच्या दृष्टीने होऊन स्थानिक रोजगाराला देखील चालना मिळणार असणे, सबब मंगळवेढा शहरात संतसृष्टी उभारण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कारवाई व उपाय योजना." | | |
| (२२९) | "ज्यात राज्यात ठाणे जिल्ह्यातील मिरा रोड येथील सृष्टी सेक्टर दोन अ मध्ये मेसर्स एवर स्माईल प्रायव्हेट लिमिटेड या बांधकाम कंपनीकडून भव्य प्रकल्प बांधण्यात येत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे हा प्रकल्प सीआरझेड बाधित जागेत बांधण्यात येत असून त्यासाठी कंपनीने पर्यावरण विभागाकडून कोणतीही परवानगी घेतलेली नसणे या विरोधात स्थानिक रहिवाशांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल केली असणे त्या त्यावर त्यावरील सुनावणीत लवादाने त्रिसदस्य समिती स्थापन करून ते अनधिकृत बांधकाम पाडण्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश देत या प्रकल्पास लावादाने चांगला धक्का दिलेला असणे लवादाच्या आदेशामुळे यावर स्माईल कंपनीच्या प्रकल्पातील सदनिका खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या गुंतवणुकीवर चिंता व्यक्त केली जात असणे या प्रकल्पाच्या बांधकामाचा मार्ग मोकळा करण्यासाठी पालिकेतील तत्कालीन वृक्षपाधिकरण समिती च्या परवानगी केली प्रशासनाने गृह प्रकल्प आज येणारी सुमारे २५० हुन अधिक झाडावर कुराड चालवली असणे या ग्रह प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले पण हा गृहप्रकल्प सीआरझेड बाधित जागेत असताना ही सागरी किनारा व्यवस्थापन समिती व पर्यावरण विभागाचे अधिसूचना तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाच्या २००६ मधील अधिसूचनेनुसार पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी कंपनीकडून घेण्यात आलेली नसणे परवानगी न घेताच कंपनीने केवळ पालिकेचे बांधकाम परवानगी घेत ०३ लाख २३ हजार ६५६ मीटरच्या बांधकामाला परस्पर सुरुवात करणे यामुळे पालिकेने कंपनीला बांधकाम परवानगी देताना पर्यावरण विभागाची परवानगी घेऊनच बांधकाम करायला हवे होते अशी अट घातली असतानाही कंपनीने त्याकडे परस्पर दुर्लक्ष करणे, त्यामुळे मिरा - भाईंदर मधील मौजे पेनकरपाडा सर्वे क्र. २३५ नवा ६८ या भूखंडावरील मेसर्स एवर स्माईल प्रॉपर्टी यांनी आदिवासी समाजातील संरक्षण कोळ जमीन हक्काची व पर्यावरण महसुली भागाची फसवणूक केल्याने जबाबदार अधिकारी वर्गावर कायदेशीर कारवाई करण्यात बाबत हरित लवादाने दिलेल्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी न केल्याने सर्वसामान्य नागरिक नाराजी व्यक्त करीत असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. विनोद निकोले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| (२३०) | “महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार दिनांक ४ जानेवारी, २००८ नंतरच्या उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अवैध बांधकामांना देय मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी अवैध बांधकाम शास्ती कर राज्यशासनाकडून लावण्यात येणे. उल्हासनगर शहरांचे स्थानिक लोकप्रतिनिधीकडून अवैध बांधकामावरील शास्ती कर संपूर्ण माफ करणेबाबत महानगरपालिका सभागृहात विशेष महासभा ठराव क्र.७१ दि.२९.०३.२०२२ रोजी ठराव घेतला असणे. प्रशासनाने तो ठराव अंमलात न आणणे.अथवा विखंडित न करणे. सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ नुसार “महानगरपालिकेकडून ठरविण्यात येईल अशा दराने शास्ती भरण्यास पात्र असेल” अशी तरतूद असणे. मनपाने ठराव व तरतूद असताना कार्यवाही न करणे. यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसणे. मनपाचे कर वसुली न होणे. अवैध बांधकामाला मनपा ठरावात नमूद प्रमाणे शास्ती माफ करण्यात यावी अशी सर्वसामान्य शहरवासियांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने संपूर्णत अवैध बांधकामवर शास्ती माफ करण्याची आवश्यकता व महानगरपालिकेस निदेश देणे.” | श्री. कुमार आयलानी वि. स. स. | कित्ता |
| (२३१) | “छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा विकास आराखडा १९९०-१९९१ या वर्षी मंजूर झालेला असणे, आता त्याला ३२ वर्षापेक्षा अधिक काळा झालेला असणे, ३०-३२ वर्षांत या शहरात नवीन विकास आराखडा तयार नसल्याने शहरात २०x३० चौ.फुटाच्या क्षेत्रफळाचे प्लॉट मोठ्या प्रमाणात विक्री होणे, त्या सर्व प्लॉटवर घरे बांधून झोडपट्ट्या तयार झाल्या असणे, शहरातील अशा झोपडपट्टींची संख्या इतर कोणत्याही महापालिकेपेक्षा जास्तच असणे, त्यामुळे या भागात मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यास महापालिका असमर्थ ठरणे, या वस्त्यांमध्ये ड्रेनेज, पाणी, रस्ते, लाईटची सुविधा नसणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला बाधक असे वातावरण निर्माण होणे, त्यामुळे छत्रपती संभाजीनगर महापालिकेचा नवीन विकास आराखडा तात्काळ मंजूर करून तो लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. हरिभाऊ बागडे वि. स. स. | कित्ता |
| (२३२) | “नाशिक महानगरपालिका क्षेत्राचा विकास करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्या भागीदारीतून स्मार्ट सिटी योजना तयार केली असणे, या स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून नाशिक शहरातील विविध योजना व मूलभूत प्रकल्प कार्यान्वित करून नाशिककरांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा उद्देश असणे, परंतु सुरुवातीपासूनच स्मार्ट सिटी योजनेचे कामकाज निराशा जनक होणे, के पी एम जी या संस्थेला तांत्रिक | श्रीमती देवयानी फरांदे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | सल्लागार म्हणून नियुक्ती केली जाणे, के पी एम जी ही संस्था वित्तीय संस्था असून वित्तीय क्षेत्रात काम करण्याचा सदर संस्थेला अनुभव असल्यामुळे सदर संस्थेने एका दुसऱ्या संस्थेची भागीदारी (जेवी) करून सदर काम प्राप्त करून घेणे, तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या संस्थेलाच तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे प्रकल्पांची उभारणी करण्यात मोठ्या प्रमाणावर अडचणी येणे अनेक प्रकल्प यशस्वी ठरणे, या सर्वांची जबाबदारी सदर संस्थेवर करून संस्थेकडून झालेल्या नुकसानाची भरपाई घेण्याची आवश्यकता असणे. गोदावरी नदीवरील होळकर पुलाजवळ असलेला बंधारा काढून त्या ठिकाणी मेकॅनिकल गेट तयार करण्यासाठी सन २०१९ साली कार्यारंभ आदेश देऊन देखील अद्यापही कामाला सुरुवात झालेली नसणे, गोदावरी नदी खोलीकरण करण्याचे काम १२ कोटीचे असताना यातून केवळ वाळू काढली जाणे, सदर काम ७० टक्के पेक्षा जास्त झालेले असताना देखील गोदावरी नदीपात्रात खोलीकरण न होणे, त्याचप्रमाणे वॉटर ट्रीटमेंट प्लांट व इलेक्ट्रिक मीटर या कामात देखील कार्यारंभ आदेश होऊन देखील काम सुरू झालेले नसणे, अशा प्रकाराने कामे सुरू न होण्यात अधिकाऱ्यांसमवेत तांत्रिक सल्लागार यांची अकार्यक्षमता जबाबदार असणे तसेच या कामांमुळे स्मार्ट सिटी योजनेचे पर्यायने राज्य व केंद्र शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान होणे रस्ते करण्याचे काम पुणे येथील ठेकेदार श्री.शिर्के यांना दिलेल्या असणे त्यांच्याकडून कामे सुरू करण्यास विलंब झालेला असणे, स्थानिक बाबींची माहिती नसल्यामुळे कामाचा दर्जा खराब होणे, अनेक रस्त्यांची कामे सुरू देखील न करणे पर्यायी कमी महत्त्वाचे रस्ते करणे, त्यामुळे नाशिक शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचे कामे प्रलंबित असणे, सल्लागार व ठेकेदार नियुक्ती करताना झालेला मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार, संपूर्ण स्मार्ट सिटीच्या कामांचीच चौकशी होण्याची असणारी आवश्यकता, नाशिक महानगरपालिका राज्य शासन व केंद्र शासन यांच्या निधीचा झालेल्या दुरुपयोग, अपूर्ण व दर्जाहीन कामांमुळे झालेले नुकसान, याबाबत चौकशी त्रयस्थ संस्थेकडून करण्याची असणारी आवश्यकता, प्रशासनाचे संदर्भात इकडे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, माननीय मुख्यमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर देखील सदर चौकशी स्मार्ट सिटी योजनेकडूनच करून घेण्यात येणे, त्यामुळे नुकसानात झालेली वाढ, गैरव्यवहार करणाऱ्यांना मिळालेले संरक्षण, तसेच संचालक मंडळाची बैठक वेळेवर न झाल्यामुळे निधी खर्च करण्यास व निर्माण झालेल्या अडचणी, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना याबाबत शासन स्तरावरून कारवाई करण्याचे असणारी आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.” | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२३३) | "मुंबई महानगर पालिकेत सन २००९ मध्ये रोजंदारीवर भरती केलेल्या कामगरांना कोव्हिड या साथीच्या आजाराचा आधार घेऊन म.न.पा. च्या सेवेत अतिविषेश खास बाब म्हणून सामावून घेण्यासाठी जून, २०२१ रोजी मुंबई महापालिकेच्या सर्वसाधारण बैठकित निर्णय घेतला जाणे, जानेवारी, २०२२ मध्ये सर्वसाधारण बैठकित दिलेली मान्यता, मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक घेऊन सदर कर्मचाऱ्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा घेतलेला निर्णय, एक वर्षाचा कालावधी होऊनही मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षेतेखाली न झालेली बैठक, कोरोना रोगाच्या साथीत सदर कर्मचाऱ्यांनी मुंबई महापालिकेत केलेली सेवा मागील दहा ते बारा वर्षापासून सदर कर्मचारी महापालिकेच्या सेवेत घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री, नगरविकास सचिव, महापालिका आयुक्त, महापौर व इतर अधिकाऱ्यांकडे वारंवार केलेल्या तक्रारी, शासनाने सदर कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत घेण्याबाबत मुंबई पालिकेला आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची भुमिका व प्रतिक्रिया." | श्रीमती यामिनी यशवंत जाधव,श्रीमती गीता जैन,श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, वि. स. स. | कित्ता |
| (२३४) | "भिवंडी महानगरपालिकेतील शिवाजी चौक येथील सन १९९१ रस्तारुंदीकरणमध्ये तोडलेल्या गाळ्यांचे महानगरपालिकेची जमीन भिवंडी सर्व्हे क्र.१०२ व सर्व्हे क्र.७३ मध्ये ३४ गाळयांचे सन १९९१ च्या नगरपालिका महासभेच्या कायदेशीर ठरावानुसार पुनर्वसन करण्यात येणे, लगतचे सर्व्हे क्रं.१०१ मध्ये टोलेजंग इमारत बांधण्यासाठी विकासकाला अडथळा निर्माण होऊ नये म्हणुन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची विकासकावर मेहरनजर असुन त्यामुळे येथील ३४ गाळ्यांना बांधकाम तोडावयाची नोटीस न देता परस्पर गाळेधारकांचे बांधकाम निष्कासीत करून गाळेधारकांना देशोधडीला लावणे, गेल्या ३ वर्षापासुन बेरोजगार बनून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणलेली असणे, आता त्यापैकी १४ गाळेधारकांनी सर्व्हे क्र. १०२ व सव्हे क्र. ७३ मध्ये जागा उपलब्ध करून दिली असुन जमिनधारक शिवकुमार गुप्ता यांची गेल्या ३२ वर्षा पासुन गाळेधारकांच्या विरुद्ध कुठलीही हरकत नसल्यामुळे गाळेधारक हे गेले ३२ वर्षापासून सर्व्हे क्र. ७३ मध्ये दिवाणी न्यायाच्या कायद्याने ॲडव्हर्स पजेशनने कब्जेदार असणे, तसेच भिवंवडीत एकही टॅक्सि परमिट नसुन आरक्षण जागेत कुठल्या विकासकाच्या फायद्यासाठी महानगरपालिकेच्या खर्चाने वाहनतळ बांधुन देण्यात येत नसणे, याची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे असणे, विकास आरखड्याप्रमाणे महापालिकेच्या डिपीरोडमध्ये कुंपण व वाहनतळ बनवण्यात येत असते | श्री. राजु आवळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | तर गाळ्यांची जागा असलेले रहिवासी जागेमध्ये जाणुनबुजून रस्ता बनवण्यात आलेला असणे, हा सर्व खटाटोप महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी एका व्यक्तीसाठी गैरव्यवहारातुन गैरलाभ मिळवण्याच्या दृष्टीकोनातुन करण्यात आलेला असणे, सदर सर्व्हे क्र.१०२ व ७३ ही जागा मोकळी असल्याचे छायाचित्रणासह दि.१७/११/२०२२ व दि. २४/२/२०२३ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व भिवंडी महापालिका यांना निवेदन दिलेले असुन भिवंडी महापालिकेने मागील अधिवेशनात विकासकाच्या फायदयासाठी जाणुनबुजून चुकीचे उत्तर दिले असल्यामुळे व सदर गाळेधारकाची मोक्याची जागा हडपुन विकासकास फायदा करून दिला असणे, त्यामुळे शासनाने या भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करून राहिलेल्या मोकळ्या जागेत देशोधडीला व उपासमारीस आलेल्या या १४ गाळेधारकांना त्याचठिकाणी पुनर्वसन करून देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाने करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (२३५) | “ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका हद्दीतील आरक्षण जमिनीच्या विकास हस्तांतरणाची बाजारमुल्य किंमत नगण्य झाली असुन तेथील स्थानिक शेतकऱ्यांना जमिनीचे मिळणाऱ्या विकास हस्तांतरणाचा विक्रीचा मोठा आर्थिक फटका बसला असणे, कारण बांधकाम विकासक हे महापालिकांना अधिमुल्य चढभाव भरून ईमारतीचे मजले वाढवत असल्याने शेतकऱ्यांकडून कवडीमोलाच्या दराने विकास हस्तांतरणाची मागणी करत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणे, महापालिकेने टाकलेल्या आशा आरक्षणामुळे शेतकरी देशोधडीला लागलेला असणे, ठाणे जिल्हयात अनेक प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित झालेले असुन बुलेटट्रेन सारख्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांना १५ लाख रुपये गुंठ्याप्रमाणे सरळ-सरळ वाटाघाटीतुन मोबदला मिळालेला असणे, तसेच मुंबई-वडोदरा महामार्गासाठी हायवे ॲथोरिटीने ५ पटीने शेतकऱ्यांना मोबदल्याची रक्कम दिलेली असणे, तर समृद्धी महामार्गात गेलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनींना मुल्यांकन दराच्या ४ पटीने मोबदला दिलेला असणे, त्यामुळे महानगर पालिकेतील जे शेतकरी आहेत त्यांच्यावरती अन्याय होणे, नगरविकास विभाग हे इतर प्राधिकरणापेक्षा जास्त श्रीमंत असल्याने महानगरपालिका हद्दीतील मुल्यांकन दराच्या ५ पट रक्कम ते महानगरपालिकेतील आरक्षीत भूसंपादित जमिनीसाठी भुमीपुत्र शेतकऱ्यांना देऊ शकणे, जर त्याबाबत शासनाने महानगरपालिकेतील आरक्षीत जमिनीसाठी ५ पट मोबदला देण्याचे प्रस्तुत अर्थसंकल्पामध्ये धोरण | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | आखणे आवश्यक असल्याने महानगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांवरती अन्याय होऊ नये म्हणुन तात्काळ मा.मुख्यमंत्री यांनी धोरण अवलंबण्याची गरज, ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका हद्दीतील ज्या काही शेतकऱ्यांच्या जमिनी आरक्षणाखाली गेलेला असणे, त्यांच्यासाठी मुल्यांकन दराच्या ५ पट रक्कम देण्याचे धोरण अवलंबले पाहिजे, जेणेकरुन इतर प्राधिकरणांनी इतर शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने मोबदला बहाल केलेला आहे व त्यांना न्याय देण्याचा काम केलेला आहे, मग महानगरपालिकेतील शेतकऱ्यांवरती शासन कसे काय अन्याय करू शकते, त्यामुळे शासनाने ठाणे महानगरपालिका व भिवंडी महानगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी तात्काळ त्यांना त्यांच्या रोड, गार्डन, मैदाने व इतर आरक्षीत केलेल्या जमिनीचे मुल्यांकन दराच्या ५ पट रक्कम भूसंपादन मोबदला देण्यासाठी शासनाने भूसंपादन अधिनियम कायदा नगररचनासाठी धोरण अवलंबनेसाठी करावयाची कार्रवाई व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२३६) | "शासनाने १९७० साली नवी मुंबईच्या विकासासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको महामंडळाची स्थापना केली असणे, रायगड आणि ठाण्यातील हजारो एकर शेतकऱ्यांच्या जमिनी शासनातर्फे सिडकोसाठी संपादित केली असणे, उक्त जिल्ह्यातील सिडकोने संपादित केलेल्या जमिनींमुळे ९५ गावे प्रकल्पबाधित झाली असणे, १९७० साली संपादित केलेल्या जमिनींवर विविध कारणांसाठी आरक्षण टाकून १९८० साली अवार्ड करण्यात आली असणे, जमिनी संपादनाचे आरक्षण टाकताना गाव नकाशांच्या आधारे सक्षम पंचनामे न करता सरसकट शिक्के मारले गेले असणे, सदर आरक्षण टाकताना गावांची चतु:सीमा न ठरवता सिमांकन केले असणे, कायदेतज्ञ आणि विचारवंतांनी सिडको आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला गावसिमा अधोरेखित करून संपादन करण्याचे सुचविले असतानाही त्याची ठोस अंमलबजावणी झाली नसणे, त्यामुळे ९५ गावातील पायाभूत सुविधांवर विपरीत परिणाम झाला असणे, त्यामुळे उक्त जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या प्रचंड रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सामोरे जावे लागत असणे, याबाबत शासनाने सिडकोने संपादित केलेल्या जमिनींमुळे बाधित झालेल्या गावांचे चतु:सीमा ठरवून गावांचा वाढविस्तार व मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत सिमांकन करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | श्री. प्रशांत ठाकूर, श्री. समीर कुणावार, श्री. महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२३७) | ''मुंबईतील भुलेश्वर विभागात तीसरा भोईवाडा, मोठा मंदिर, प्रसिद्ध असलेल्या जीवनजी महाराज कंपाऊंड लग्नाची वाडीमधील मालक चेनाराम, खेताराम राजपुरोहीत व महेश्वरी या तीन मालकांनी भागीदारीमध्ये मे.प्रतुल एक्झीम प्रा. लि. या कंपनीतर्फे इमारत क्र.१०५ ते १०७ या दोन जी+१ व जी+२ या दोन जुन्या इमारती पाडून त्याठिकाणी ४२ अनाधिकृत व्यापारी गाळ्यांचे बांधकाम व विक्री करून कोट्यावधी रुपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचे दिनांक ०९.०३.२०२३ रोजी नुकतेच उघडकीस येणे, उक्त १०५-१०७ सदरहू जुन्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये १२ निवासी व ४ अनिवासी मिळून १६ सदनिकाधारक रहात असताना सदरहू इमारती पाडून त्या जागेवर अतिरिक्त चटई क्षेत्राचा गैरवापर करून आणि वाडीतील डीपी रोडच्या ३५ टक्के चटई क्षेत्राचा वापर करून ४२ व्यापारी गाळ्याच्या मॉलचे अनाधिकृत बांधकाम करण्यात येणे, महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्यानुसार निवासी सदनिकांचे व्यापारी गाळ्यात रुपांतर कायद्यात कोणतीही तरतूद नसताना विकासकाने हारून बागड या आर्किटेक्टची नियुक्ती करून आणि महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागातील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करून ४२ गाळ्यांचे मॉलचे बांधकाम केल्याचा प्रकार घडणे, भुलेश्वर हा विभाग दाटीवाटीचा असून या ठिकाणी मॉलचे बांधकाम करण्यास डीसी रुल नियमानुसार सभोवताली ६ मीटर जागा सोडणे बंधनकारक असतानाही इमारत मालक तथा विकासक यांनी याबाबत संबंधित नियमाचे उल्लंघन करून बेकायदेशीररित्या मॉलचे बांधकाम करून तसेच बांधलेले व्यापारी गाळे कोट्यावधी रुपये किमतीला विक्री करून शासन तथा महापालिकेची प्रचंड आर्थिक फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, उक्त अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासंदर्भात स्थानिक नागरीकांनी कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव विभाग आणि महापालिका आयुक्त तसेच राज्य शासनास दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रव्यवहार करण्यात येऊनही अद्याप अनाधिकृत मॉलचे बांधकाम निष्कासीत करण्याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अतुल बेनके, श्री. सुरेश भोळे, वि. स. स. | कित्ता |
| (२३८) | "राज्यात पुणे जिल्ह्यातील साडेसतरानळी हडपसर पुणे येथील सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड निर्मित अमनोरा पार्क टाऊन या टाऊनशिप एकात्मिक नगर वसाहत मधील सेक्टर आर २६ मध्ये सरकारी जागेत शासनाचे फसवणूक करून दिशाभूल करणारी कागदपत्रे देऊन बहुमजली इमारतीचे बांधकाम केलेले असणे, त्यामधून | श्री. सुरेश भोळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अंदाजे ६५० सदनिका सुमारे सात हजार रुपये प्रति स्क्वेअर फुट प्रमाणे विक्री केल्या असून त्यामधून अब्जावधी रुपयाचा नफा शासनाची जमीन विकून मिळवलेला असणे, याविषयी शासनाच्या महसूल व नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे अनेक तक्रारी आलेले असतानाही त्यावर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यासाठी शासनाने संबंधित सदनिकधारकांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी या टाऊनशिप वर तातडीने कारवाई करण्याची मागणी सामान्य जनतेतून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२३९) | "मुंबईत मोठ्या प्रमाणात जाहिरातीसाठी होर्डिंग्ज उभारण्यात आले असणे, त्यासाठी जमिन मालिकांनी वेगवेगळ्या कंपनीशी करार केला असणे, उक्त करार केल्यानंतर त्याची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेस देणे आवश्यक असणे, परंतु मुंबईतील सर्वात जूनी अशी सेल्व्हल पब्लिसिटी ॲन्ड कन्सलटंट प्रा.लि. या जाहिरात कंपनीने एफ.एस.आय सह महानगरपालिकेची फसवणूक केली असणे, उक्त कंपनीने मुंबईतील जुहु येथे भारतीय विमानतळ प्राधिकरणाशी सन १९७० पासून त्यांच्या कार्यक्षेत्रातील होर्डिंग्ज भाडेतत्वावर घेतल्या असून दर पाच वर्षांनी त्याबाबतचा करार नुतनीकरण करण्यात येत असणे, परंतु उक्त कंपनीने अद्यापही केलेल्या कराराची प्रत महानगरपालिकेला दिलेली नसणे, तसेच महानगरपालिकेचे इस्टेट शुल्क, मुल्यांकन शुल्क बुडविण्यासाठी सदरहू कंपनीने अश्या प्रकारे मुंबईतील इतर ठिकाणी देखीलही होर्डिंग्ज उभारताना केलेल्या कराराची मुळ प्रत दिलेली नसणे किंवा कमी किंमतीच्या कराराची प्रत सादर केली असणे, बृहन्मंबई महानगरपालिकेच्या मुल्यांकन विभागाकडून दर ५ वर्षांनी नुतनीकरण करून घेणे आवश्यक असताना देखील त्याकडे दुर्लक्ष केले असणे, होर्डिंग्ज उभारण्यासाठी इस्टेट विभागाची परवानगी घेणे आवश्यक असताना त्याकडेही दुर्लक्ष केले असून इस्टेट शुल्काची भरणा देखील केलेली नसणे, जमीन मालकांना तसेच भारतीय विमान प्राधिकरणास सर्व देयके धनादेशाद्वारे दिलेले असणे, तसेच उक्त कंपनीने दोन करार करून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने केलेली महानगरपालिकेची फसवणूक, याकडे महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करून सदरहू कंपनीवर व उक्त बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. छगन भुजबळ वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२४०) | "मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २६२ विकसित करण्यासाठी बीओटी तत्वावर वर्धमान फंटासी या खाजगी विकासकास ३० वर्ष मुदतीसाठी देणे, सदर विकासकाने मंजूर नकाशानुसार आरक्षण विकसित न करणे, मनपाने कंत्राट रद्द केले असताना न्यायालयाची स्थगिती असताना सदर जागेत मंजूर नकाशापेक्षा जास्त अनधिकृत बांधकामे जशी लग्नाचे हॉल, व्यायामशाळा, हॉटेलचे बांधकाम करणे, संपुर्ण जागेचा वाणिज्य स्वरूपाचा वापर करणे, कारारनामा प्रमाणे महापालिकेस जागेचे भाडे न देणे, संपुर्ण जागेचा दुरूपयोग करून नागरीकांना सुविधा पासून वंचित ठेवणे, मा. न्यायालय व लवादाचा कोणतीही स्थगिती नसताना अनधिकृत बांधकामे न तोडणे महापालिकेमार्फत जागेचा दुरूपयोग करण्यास मज्जाव करणेची कार्यवाही न करणे याबाबत शासनाने त्वरित सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करून सदर खाजगी विकासकावर एम आर टी अंतर्गत गुन्हा दाखल करून करावयाची कडक कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |
| (२४१) | "माहे फेब्रुवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास वसई विरार मनपाच्या नगररचना विभागाचे उप संचालक श्री. वाय शिवा रेड्डी यांचे या पदावर झालेली नियुक्ती बेकायदेशीर असून गेले आठ ते दहा वर्षे ते एकाच पदावर व एकाच ठिकाणी विना खंडन नियुक्ती वर असल्याची बाब उघडकीस येणे, वाय शिवा रेड्डी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मनपा क्षेत्रात शेकडो बेकायदेशीर बांधकामे करण्यास विकासकांना केलेले सहकार्य, आरक्षित केलेल्या ८८६ खंड पैकी "३२९ लोकांनांवर बेकायदेशीर बांधकामे झाल्याचे प्रतिज्ञापत्र मनपा ने मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणे. आज पर्यंत ४४३७ कोटी रुपये खर्च करून ५६ भूखंडांचा ताबा घेण्यात वसई विरार मनपाला आलेल्या दारुण अपयशचा उल्लेख या प्रतिज्ञापत्रात असणे, तात्कालीन गटनेता म.न.पा यांनी मार्च-एप्रिल २०१६ ला विरार पो. स्टे. मध्ये श्री. वाय शिवा रेड्डी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत अनेक पुराव्यासह केलेल्या लेखी तक्रारी, शासकीय नोकरी व बदलीचे कोणतेही नियम या नगररचना विभागाच्या उप संचालकाना बंधनकारक नाही का ? असं मनपा क्षेत्रातील नागरिकांना पडलेला गंभीर प्रश्न गेली १० ते १२ वर्षे एकच पदावर कार्यरत राहिल्याने विकासकांशी आर्थिक हात मिळवणी करून अनेक विकासकांच्या 'बेकायदेशीर बांधकामांकडे हेतूत करण्यात आलेल्या अक्षरशः दुर्लक्ष श्री. वाय शिवा रेड्डी यांची तात्काळ बदली करण्यात येऊन त्यांचे कार्यकाळात घेण्यात आलेले | श्री. निलेश लंके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | निर्णयांची फेर तपासणी नगरविकास विभागाच्या उच्चपदस्य व्यक्तीने करून उत्पन्न स्तोत्र पेक्षा जास्त कोट्यावधी रुपये जास्त संपत्ती असलेल्या पदाचा गैरवापर करून जमा केली असल्याने पोलिसांच्या आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या मार्फत वाय शिवा रेड्डी यांची तपासणी करण्याची तक्रार मनपा प्रशासन हे करण्याची जनतेमधून होत असलेली मागणी व वाय शिवा रेड्डी यांना प्रशासनाचे कोणते नियम लागू होत नसल्याने सिद्ध झाल्याने मनपस क्षेत्रातील लाखो नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | | |
| (२४२) | "नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत मौजे माळधे व सायने येथील घरकुल बांधणे कामासाठी ठेकेदार मे.ए.व्ही.पंधे सोलापूर व मे.ए.व्ही.पंधे इन्फ्राकॉन्स सोलापूर यांना सन २००९ साली ४३३.५६ कोटी रुपयांच्या कामात कोट्यावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सदरहू ठेकेदार कंपनीने महापालिका आयुक्त, उपायुक्त आणि सबंधित अधिकारी यांचेबरोबर आर्थिक संगनमत करून सदरहू भ्रष्टाचार करण्यात येणे, मालेगाव शहरात सदरहू योजनेचे ५० टक्केही काम पूर्ण झालेले नसताना कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून ठेकेदारास २२.४७ कोटींचे बिल ॲडव्हान्सपोटी अदा केल्याचा घडलेला प्रकार, गतवर्षी महानगरपालिकेकडे वेगवेगळ्या कामाचे शिर्षक तयार करून ठेकेदाराने नियमबाह्यपणे पत्र देऊन केलेली ४६.२७ कोटी रुपयांची मागणी मा.आयुक्तांनी मंजूर करुन सदर रक्कम अदा करण्यात येणे, तसेच सदरहू योजने अंतर्गत महानगरपालिकेचे मोबेलायझेशन ॲडव्हान्स, स्टील ॲडव्हान्स, मटेरियल ॲडव्हान्स च्या बदल्यात घेण्यात आलेली बँक गॅरंटी नुतनीकरण न केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होणे, सदरहू योजनेच्या भ्रष्टाचाराची चौकशीसाठी मनपाने नेमलेले उपायुक्त सतीश दिघे यांनी आपला अहवाल मा.आयुक्त, मनपा यांना दि.२९/१२/२०२२ रोजी सादर करण्यात येऊनही चौकशी अहवालात अनेक गंभीर मुद्दे नमूद असतानाही सदरहू प्रकरणी अद्याप आयुक्तांनी पोलीसांत तक्रार दाखल करून कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, यामुळे मालेगाव महापालिकेचे झालेले प्रचंड आर्थिक नुकसान, यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १३/२/२०२३ रोजी लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्याप महापालिकेचे आयुक्त, शहर अभियंता, उप अभियंता व संबधितांवर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुरेश भोळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| (२४३) | "जि.नाशिक, मालेगाव येथील संगमेश्वर भागातील भूखंड क्र.९६ ते १००, सदर भूखंडावर गेले ५० वर्षाहून अधिक काळ लघु व्यवसाय करणारे दुकानदार, हॉटेल आदी व्यवसायीकांना प्रस्तावित समावेश न करता, मिळकतधारकांनी महापालिका आयुक्तांची दिशाभूल करून बेकायदेशीररित्या बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदर प्रकरणी मिळकत मालक बाळू अहिरे व आर्किटेक्ट मुकुंद चिंधडे यांना महापालिकेने नोटीस बजावण्यात येणे, परंतु नोटीसला उत्तर देण्यापूर्वीच मिळकतधारकांनी वहिवाटीचा रस्ता खोदल्याने येथील लघु व्यवसायीकांमध्ये सतांपाचे वातावरण निर्माण होणे, मिळकत मालक तथा आर्किटेक्ट यांनी मंजूर नकाशाप्रमाणे काम न करणे,जुना आग्रा रोड येथे सुमारे ३५ तर पाठिमागे १५ पत्राशेड दुकाने असणे, परवानगी दिलेल्या मंजूर नकाशात सदरहू दुकानांचा कोणताही समावेश नसल्याने सदरहू अनेक वर्षापासून व्यवसाय करीत असलेल्या दुकानदारांवर बेकारीचे संकट कोसळणे, सदरहू जागेत पालिका प्रशासनाने आर्थिक संगनमताने भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून बेकायदेशीरपणे अटी व शर्तीचे उल्लंघन करून बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार उघडकीस येणे, कब्जेदार भाडेकरुंच्या ताब्यातील क्षेत्रात तफावत निर्माण करून कमी दर्शविणे, वहिवाटीचे रस्ते बंद करणे, डी.पी.रोड मोकळे नसतानाही मोकळे दर्शविणे, कलम ४७ अन्वये अपिलातील निर्णयाप्रमाणे न्यायप्रविष्ट क्षेत्राची अद्याप पालिकेने मोजणी न करणे, विविध शासकीय स्तरावरील या प्रकरणी झालेले आदेश प्रलंबित ठेवणे, जे बनावट कागदपत्र महापालिकेत बांधकाम परवानगीसाठी दाखल केले त्या कागदपत्रां विरोधात जागा मालकावर फौजदारी दावा क्र.५३६/२०१४ दाखल असून पुन्हा तिच कागदपत्रे विचारात घेऊन बांधकाम परवानगी देणे, बांधकाम परवानगी मिळवताना कब्जेदार भाडेकरुंना मोजणी नकाशात न दर्शवणे, मा.लोकआयुक्त यांच्या चौकशी आदेशानुसार सहाय्यक संचालक, नगररचना, श्री.माने यांनी सादर केलेल्या दिनांक २०/१२/२०१९ रोजीच्या अहवालावर अंमलबजावणी न करणे, पीआयएल ६३/२०१५ या मा.उच्च न्यायालयातील दाव्यात महापालिकेने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे वस्तूस्थिती जागेवर नसणे, महासभेत सदर बांधकाम परवानगी रद्द करणे कामी ठराव सर्वानुमते मंजूर झाला असतानादेखील सदर ठरावाची अंमलबजावणी न करणे, सदरहू प्रकरणी पालिका आयुक्त श्री.भालचंद्र गोसावी यांच्यासह त्यांचे विविध अधिकारीयांनी आर्थिक संगनमताने मिळकत मालक व विकासक यांना झुकते माप देऊन लघु व्यवसायीक भाडेकरुंवर बेदखल होण्याची पाळी आणणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. माणिकराव कोकाटे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२४४) | "पुणे महानगरपालिकेने घरमालकांना देण्यात येणारी मिळत करातील ४० टक्के सवलत रद्द केल्याने याचा फटका हजारो पुणेकरांना बसणे, राज्यात दिवसेंदिवस महागाई वाढत असुन महागाईमुळे पुणेकरांवरीलही खर्चाचा बोजा वाढत असणे, त्यातच मिळकत करात देण्यात येणारी ४०% सवलत बंद झाल्यामुळे पुणेकरांना मोठा आर्थिक फटका बसणे, १९७० सालापासून सन २०१८ पर्यत मिळालेला सवलत व्याजासहित पुणेकरांकडून वसुल करण्याचे आदेश देण्यात आल्याने यासंदर्भात पुणे म.न.पा ने वसुली व व्याज घेण्यावर स्थगिती द्यावी असा ठराव करून शासनाकडे पाठविला असतानांही याबाबत शुध्दीपत्रक शासनाने अद्यापही काढलेले नसणे, मुंबई शहरात ५०० चौ.फुटाच्या आतील घरांना सवलत दिली जाते परंतु पुणेकरांना देण्यात आलेली सवलत रद्द करून त्याची वसुली करण्यात येत असल्याने पुणे शहरातील नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत राज्याशासनाने चौकशी करून करण्यात येणारी वसुलीला करण्यात येणारी वसुलीला स्थगित देऊन कर सवलत कायम करण्याची तसेच मुंबईच्या धर्तीवर पुणे शहरातील ५०० चौ.फुटाच्या आतील घरांना कर माफ करण्याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | श्री. रवींद्र धंगेकर, श्री. अमिन पटेल, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. भिमराव तापकीर वि. स. स. | कित्ता |
| (२४५) | "मुंबई बेस्ट उपक्रमातील मागील सुमारे १६ वर्षाहून अधिक कालावधीपासून नैमित्तिक (CAUSAL) कामगार म्हणून कार्यरत असलेल्या ७१४ कामगारांना कायम करण्यात आलेले नसल्याने सदरहू कामगारांच्या वतीने यापूर्वी सातत्याने बेस्ट प्रशासनाकडे निवेदने सादर करून, पाठपुरावा करून तसेच आंदोलनाचा मार्ग ही त्यांनी अवलंबिलेला तरीही बेस्ट प्रशासनाकडून या संदर्भात झालेले दुर्लक्ष व टाळाटाळ झाल्याने सदरहू कामगारांनी औद्योगिक न्यायालयाकडे दाद मागितली असता, औद्योगिक न्यायालयाने या संदर्भात सदरहू कर्मचाऱ्याच्याबाजूने न्याय देऊन, त्यांना कायमस्वरूपी नवघानी पदावर सामावून घावे, असे स्पष्ट आदेश दिनांक १५-१०-२०१९ रोजी बेस्ट प्रशासनाला दिल्यानंतरही बेस्ट प्रशासनाने या आदेशाचे पालन न केल्यामुळे, सदरहू नैमित्तिक कामगारांनी मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपल्या समस्या त्यांच्या समोर मांडलेल्या असता, मा.मुख्यमंत्र्यांनी या नैमित्तिक कामगारांना बेस्ट उपक्रमामध्ये कायमस्वरूपी घेण्यात यावे असे स्पष्ट आदेश बेस्ट महाव्यस्थापक यांना देऊनही त्याकडेही दुर्लक्ष व टाळाटाळ झालेले असल्याने या कामगारांनपैकी मध्यंतरीच्या काळात काही कामगारांचे मृत्यू झालेले असणे , काही कामगारांचे वय ४० | श्रीमती यामिनी यशवंत जाधव वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | ते ४५ वर्ष उलटलेले असून व काही कामगार दोन तीन वर्षात सेवा निवृत्त होण्याची संभावना असल्याने या कामगारांवर आता पर्यंत झालेल्या अन्यायामुळे त्यांचामध्ये निर्माण झालेले नैराश, काहींनी आपले जीवन ही संपविलेले असणे, सध्या सदरहू नैमित्तिक कामगारांना मिळणारे अत्यल्प वेतन, यामुळे त्यांची व त्यांच्या कुटुंबियांची झालेली व होत असलेली आर्थिक कोंडी व उपासमार, या संपूर्ण प्रकरणा संदर्भात सखोल चौकशी होऊन, या कामगारावर कोणत्याही प्रकारे अन्याय होऊ नये, म्हणून त्यांना औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार विनाविलंब बेस्ट उपक्रमामध्ये कायमस्वरूपी सामावून घेण्याची आवश्यकता, तसेच याप्रकरणी जाणीवपूर्वक टाळाटाळ करणाऱ्यावर जबाबदारी निश्‍चित करून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (२४६) | “मुंबई उपनगरातील अंधेरी पश्‍चिम येथील मे ओशिवरा लँड डेव्हलपेंट कंपनी प्रा. लि. या कंपनीच्या ताब्यातील क्षेत्रावर नागरी जमीन कमाल धारणा कायदा कलम २० अन्वये गृह बांधणी प्रयोजनार्थ विकासकाला सूट देण्यात येते, त्यानुसार विकासकाला सूट दिली असणे, मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील सर्व्हे क्र. ४१ येथील क्षेत्रावर विकासकाकडून अनियमितता झाली असणे, विकासकाने अत्यंत उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील सदनिका बांधणे आवश्यक असणे, मात्र विकासकांनी सदनिका बांधल्या नसणे, त्या संदर्भात विकासकावर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मनपाचे संबंधित अधिकारी अहवाल देण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत असल्याचे स्पष्ट झाले असणे, नागरी जमीन (कमाल धारणा विनियमन) अधिनियम, १९७६ व्या कलम ३४ अन्वये सदनिकाच्या आकार-मानाबाबत महानगरपालिका व संबंधित अधिकारी या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी सयुंक्तरीत्या बारकाईने पहाणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, तथापि या ठिकाणी तसे घडत असल्याचे दिसून येत नसणे, शासनास अहवाल सुद्धा सादर केला नसणे, मनपा व शासनाचे संबधित अधिकारी विकासकाला मदत करीत असणे, संबंधित अधिकाऱ्यांवर व विकासकाचे संगनमत असणे, त्यामुळे शासनाचे नुकसान होत असणे, विकासकावर कोणतीच कार्यवाही होत नसणे, याला तिन्ही यंत्रनेतील अधिकारी जबाबदार असणे, या कामात दिरंगाई व कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता | श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | निर्माण झाली असणे, याकडे मनपा व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी शासनाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असणे, याबाबत स्थानिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व मनपा व शासना प्रती निर्माण झालेली चिडीची भावना या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया." | | |
| (२४७) | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात अनेक कंपन्या तसेच हॉटेल असून त्यांचा महापालिकेला भरणा असलेला मालमत्ता कर अनेक वर्षांपासून थकीत असणे, महापालिकेमार्फत सदर कंपन्या व हॉटेल व्यावसायिकांना वारंवार जप्तीच्या नोटिसा देणे, नवी मुंबईतील ग्रामस्थांच्या घरांनाही वसुलीबाबत तगादा लावणे, तदनंतर महापालिका अधिकाऱ्यांकडून कंपनी व हॉटेल मालकाला समजावता करण्यासाठी आमंत्रित करण्यात येणे, समजावता झाल्यानंतर कोट्यवधी रुपयांची थकीत रक्कम कमी करण्यात येणे, सदर हॉटेल, बार व कंपन्यांना लावण्यात आलेला मालमत्ता कर हा किती लावण्यात आला ? कश्याचा आधारे लावण्यात आला ? किती कमी करण्यात आला ? याची चौकशी करण्याची आवश्यकता, त्यामुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडणे, याआधीही सदर पदावर असलेल्या उप-आयुक्तांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे त्यांची झालेली उचलबांगडी, अजूनही सदरबाबत न्यायालयात खटला सुरू असणे, सद्यस्थितीत नवी मुंबई महापालिकेत महसूल विभागाचे उप-आयुक्त नसतानाही अतिरिक्त कार्यभार पाहणाऱ्या अधिकारीही अशा औद्योगिक कंपन्यांकडून समजावता करीत असल्याच्या वारंवार येत असलेल्या तक्रारी, त्यामुळे पुन्हा महापालिकेतील भ्रष्टाचार उघडकीस येणे, सदर संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज, महापालिकेत सदर जागेवर अधिकारी नसल्याने उप-आयुक्त नियुक्ती करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही तसेच उपाययोजना." | श्रीमती मंदा म्हात्रे वि. स. स. | कित्ता |
| (२४८) | "शिवाजीनगर (जि. पुणे) येथे पुणे महानगरपालिकेच्या पांडवनगर व वाकडेवाडी याठिकाणी ४० ते ५० वर्षांपूर्वीच्या जुन्या वसाहती असणे, पांडवनगर येथे एकूण २४० सदनिका व वाकडेवाडी येथे एकूण २८८ सदनिका असणे, सदर सदनिका फार जुन्या झाल्या असून याचे पुणे मनपा तर्फे structural audit केले असणे, या structural audit च्या अहवालानुसार सदर दोन्ही इमारती धोकादायक असणे, सदरील इमारती नागरिकांच्या राहण्याच्या दृष्टीने असुरक्षित असल्याचे आढळून येणे, जीवित हानी | श्री. सिध्दार्थ शिरोळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | टाळण्यासाठी पांडवनगर व वाकडेवाडी याठिकाणी नवीन इमारती बांधण्याची आवश्यकता असणे, या दोन्ही ठिकाणी जवळपास ९०० सदनिकांची गरज असणे, नवीन इमारती बांधण्यासाठी जवळपास १०० कोटी निधीच्या तरतुदीची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२४९) | "मुंबईतील माटुंगा पश्चिम मनपा प्रभाग क्रमांक १८९ मधील माटुंगा रोड रेल्वे स्थानकाजवळ विश्वेश्वरय्या उड्डाणपुला शेजारी रेल्वेचा भूखंड असणे, सदर भूखंडावर मागील बऱ्याच काळा पासून झोपडपट्टी वसलेली असणे, सदर झोपडपट्टी ही रेल्वेच्या नव्हे तर मुंबई मधील पदपथावर असल्याची खोटी माहिती देऊन तत्कालीन महानगरपालिका सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग व इतर अधिकारी यांनी संगनमताने सदर भूखंड गैर मार्गाने विकासकास DCPR २०३४ ३३ (१२) ब योजने अंतर्गत विकसित करण्यासाठी दिल्याचे निदर्शनास येणे, याबाबत अतिरिक्त आयुक्त (शहरे) यांना माहिती प्राप्त झाली असता त्यांच्या मार्फत या कामास २८ फेब्रुवारी २०२१ मध्ये स्थगिती देण्यात आली असणे, परंतु फेब्रुवारी, २०२३ मध्ये विकासकाने पालिका प्रशासनाला सोबत घेऊन गैरमार्गाने सदर योजनेचा फायदा घेतल्याचे निदर्शनास येणे, विकासकाने महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन सदर जागी रहात असलेल्या झोपडपट्टी धारकांना नाममात्र रक्कम देऊन त्यांना पुन्हा पदपथावर रहाण्यास भाग पाडले असणे, यामुळे झोपडपट्टी धारकांना त्यांच्या हक्काच्या घरा पासून वंचित रहावे लागत असणे, जेणे करून मुंबई भकास होण्यास मुंबई महानगरपालिका अधिकारीच जबाबदार असल्याचे निदर्शनास येणे, सदरहू झोपड्या या महानगरपालिकेचा प्रस्तावित रस्ता अथवा पदपथावर उभारलेल्या नसणे यामुळे या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब प्रमाणे पात्र न नसणे, तरीही महानगरपालिकेने गैरमार्गाने सदर योजनेत विकासकाला फायदा मिळवून देण्यासाठी या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब मध्ये समाविष्ट केल्या असणे, सदर बाब म्हणजे प्रचंड मोठा F. S. I. घोटाळा असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात महानगरपालिका प्रशासना बाबत निर्माण झालेले भीतीचे वातावरण व शासनाचे होत असलेले नुकसान लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, श्री. अमित साटम वि. स. स. | कित्ता |
| (२५०) | "मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर, नवघर स. क्रं. ८१/१,२,३ पै., ५,६, २) स. क्रं. २७/८,९, ३) स. क्रं २७/१, १०अ, २, व स.क्रं २८/५ २९/३, ४) स.क्रं. ८३/१,२, ८५/१/१अ, ५) | श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | स.क्रं. ८६/१,३,४,८अ, ८ब, ८क व स.क्र. ८७/१पै., १ब,१क, १ड, २ व स.क्रं. ८८/१/१,१/३, स.क्रं. ८९/१,३, स.क्रं. १०५/१,२, स.क्रं. २२५पै., ६) स.क्रं. ७२/२, ७३/१,२,३,४, ७४/१, २, ७५/१, ७९/१,३,४, ७) स.क्रं. ८२ यासह नव्याने समाविष्ट स.क्रं. २६/१, २७/३,५,६,७, २८/१,२पै., ३पै., २९/१, ३०/७पै.८पै., ४१/४अ, ४३/२,४,५६,५५/२, ५६/८, ६३/१,२,३,४,६,७,८,९, ६४/१,२,३,४, ६७/१,२, ६८/१,२,३, ७०/१,२,८१/४ब, २२४/पै., २२५/पै., २३२/१अ,१ब,१क, २अरब, २३४/१ व मौजे नवघर मधील स.क्रं./हि.क्रं. १) स.क्रं. ९२पै, ९३,९४,९५पै, ( जुना स.क्रं. ४३० पै. ४३१,४३२,४३३पै.) २) स.क्रं. १२८ (जुना ४४४/५), ३) स.क्रं. १२७ (जुना ४४३)/१पा., १पै., ४) स.क्रं. १०६ (जुना ४१९), ११६ (४२०)/१,२,३, ११७ (जुना ४२१)/१,२,३अ, ३ब, ४, ५,६, १०३ (जुना ४२२)/ १,३पै. ४,५,६,७,८,९,१०,११,१०५ (जुना ४२३)/२,३,४,५पै., ५पै., ५पै., ५) स.क्रं. ९६(जुना ४२९)/२,६९६ (जुना ४२९)/५.७) ४३५पै., ४३६/१ ते ११, स.क्रं. ४३८/१ ते ३,६, ४३९/१ ते ६.८, ४४०/१,३ ते ८,११,१२,१३,८) १२७ (जुना ४४३)/२पै., १२८ (जुना ४४४)/१,३, १२६ (जुना४१८)/२,३,४, १२४ (जुना ४१७)/ ७,९) स.क्रं. ४४७ (जुना १४२)/४, तसेच नव्याने समाविष्ट स.क्रं. १०५ (जुना ४२३)/१, ९८ (जुना ४२८)/३, ९६ (जुना ४२९)/ १,३, ९५ (जुना ४३०)/१, १०७ (जुना ४३६)/३, ११५ (जुना ४४२)/१ ते ५ब, १३० (जुना ४४६)/१पै, २, १४२ (जुना ४४४)/४, ४४७/३,५ या जागेत मेसर्स रवी डेव्हलपर्स या खाजगी विकासकाने मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडून रहिवासी इमारत बांधणे कामे परवानगी घेतलेली असणे, सदर जागेत बांधकाम परवानगी देताना महानगरपालिकेने अटी शर्ती च्या आधारे परवानगी दिलेली असणे यातील प्रमुख अट म्हणजे युएलसी कडून ना हरकत प्रमाणपत्र व कलम २०-२१ अन्वये १०० करोड पेक्षा जास्त रुपयांची थकबाकी असताना देखील नियमबाह्य मंजुरी देणे, तसेच आवश्यक असणाऱ्या पर्यावरणाची परवानगी सीआरझेडची परवानगी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कडून ना हरकत प्रमाणपत्र अशा अत्यंत महत्त्वाच्या व आवश्यक कागदपत्र साधरण करताना देखील मीरा-भाईंदर महानगरपालिकेने परवानगी देणे, प्रामुख्याने सदर जमिनी बाबत रवी डेव्हलपर्स या खाजगी विकासाकडे मालकी हक्क नसताना देखील केवळ अनोंदणीकृत अधिकार पत्राच्या आधारे परवानगी दिलेली असणे, सदर कृत अधिकार पत्राद्वारे परवानगी दिल्यामुळे शासनाचा जवळपास शंभर करोड रुपये पेक्षा जास्त महसूल बुडालेला असणे, सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करून मीरा- | | |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | भाईंदर महानगरपालिकेच्या माननीय आयुक्तांनी या सर्व परवान्या दिलेल्या असणे परंतु सदर बेकायदेशीर परवानगी चे प्रकरण चर्चेत आले असता ह्याच आयुक्तांनी सदरची परवानगी त्वरित रद्द करणे सदर परवानिया रद्द करून देखील सदर रवी डेव्हलपर्स या खाजगी विकासकामे आजही सदर रहिवासी इमारतींचे बांधकाम चालू ठेवणे, तसेच सदर रहिवासी इमारतींची फ्लॅटची अनधिकृतपणे विक्री करत असणे, सदर इमारती या बेकायदेशीर व अनधिकृत असणे त्यामुळे या इमारतीत ज्या नागरिकांनी फ्लॅट घेतले आहेत त्यांना भविष्यात आर्थिक भुर्दंड व मानसिक त्रास सहन करावा लागणार असणे,यामुळे आयुक्त मीरा-भाईंदर महानगरपालिका यांनी अधिकार पदाचा गैरवापर करून दिलेली परवानगी व खाजगी विकासकामे परवानगी रद्द करून देखील इमारत बांधून रहिवाशांना विकत असलेले फ्लॅट शासनाचा तब्बल २०० करोड पेक्षा जास्त बुडवलेला महसूल यामुळे येथील स्थानिकांमध्ये प्रशासनाविषयी व विकासाच्या विषयी पसरलेली तीव्र नाराजी व त्यांच्यावर कारवाई करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची उपायोजना.” | | |
| (२५१) | “मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे भाईंदर जुना स. क्रं. ४८५/१,२,४,५,६,७ नविन स.क्रं. १०९/१,२,४,५,६,७ या जागेत दिनांक २५/१२/२००६ रोजी श्री.एडविन मतेस डिसूजा व इतर यांना सदर सर्वेचे एकत्रित करून नकाशा मंजूर करून इमारत बांधकाम परवानगी दिलेली असणे, सदर बांधकाम परवानगीनुसार त्या जागेचे संपूर्ण एफएसआय वापरून सद्यःस्थितीत त्या जागेवर इमारती चे पूर्ण बांधकाम केलेले असणे, तसेच परवानगीच्या व्यतिरिक्त देखील सदर जागेवर अनधिकृत वाढीव बांधकाम केलेले असणे, यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सदर जागेवर विनोद त्रिवेदी या खाजगी विकासकास या अगोदरच दिलेल्या एकत्रित सर्वे नंबर पैकी सर्वे क्रमांक ४८५/४ ब हे वेगळे असल्याचे भासवून दिनांक २५/६/२०१५ रोजी मीरा-भाईंदर महानगरपालिकेने पुन्हा नव्याने परवानगी दिलेली असणे, सदर जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक या अगोदरच वापरून देखील कोणत्याही एफएसआय शिल्लक नसताना व वाढीव बांधकाम झाल्याची माहिती असताना देखील जाणीवपूर्वक हेतू परस्पर सदर एकत्रित मंजूर नकाशा पैकी स्वतंत्र नकाशा मंजूर करून आर जी क्षेत्रामध्ये परवानगी दिलेली असणे ,सदर गैरप्रकार बाबत मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडे तक्रार केली असता तत्कालीन आयुक्तांनी सदरची परवानगी त्वरित रद्द केलेली असणे, परंतु सदर विकासकाने आत्ताच्या आयुक्तांकडून आर्थिक गैरव्यवहार करून पुन्हा परवानगी प्राप्त करून | श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | घेतलेली असणे, यामुळे येथील इतर विकासकांमध्ये व नागरिकांमध्ये स्थानिक आयुक्त, नगररचना विभाग व विनोद त्रिवेदी या खाजगी विकास बद्दल असंतोष निर्माण होऊन तीव्र चिड निर्माण होणे यावर शासनाने सदर परवानगी तातडीने रद्द करून याची करावयाची चौकशी व कारवाई.” | | |
| (२५२) | “नाशिक महानगरपालिकेने गेल्या काही वर्षांपासून वाचनालय, अभ्यासिका, व्यायामशाळा, समाज मंदिर, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रे यांचे दर वाढवल्यामुळे ते नागरिकांना परवडणार नसणे, त्यामुळे महानगरपालिकेने सदरच्या मिळकती २००८ पासून सील करण्यात आल्या असणे, त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात अडचण होत असणे, रेटीरेकनर प्रमाणे सतत वाढ होत असल्याने या मिळकती तशाच पडून असणे, त्याचा कोणताही फायदा नागरिकांना होत असणे, वापर नसल्यामुळे या मिळकतींची दुरावस्था होत असणे, यावरील केलेला खर्च वाया जात असणे, या मिळकती नागरिकांसाठी तातडीने खुल्या होणे अत्यंत गरजे असणे, त्याकरीता महानगरपालिकेने मिळकतीवर आकारण्यात येणारे दर कपात करणे गरजेचे असणे, नाममात्र दर कायम करून या मिळकती नागरिकांसाठी खुल्या करण्याची आवश्यकता, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्रीमती सीमा हिरे, वि. स. स. | कित्ता |
| (२५३) | “राज्यातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अंतर्गत असलेल्या धन्वंतरी व साळुंखे मॅटर्निटी होम ही खाजगी रुग्णालय जन्म मृत्यूची नोंदी, अपत्यांची हेराफेरी व आपत्य जन्माला आल्यानंतर त्यांच्या कागदोपत्रांमध्ये अपहर करत असल्याची तक्रार प्राप्त होणे, याचे उदाहरण म्हणजे एका नगरपरिषदेच्या निवडून आलेल्या नगरसेवक व राजकिय नेत्याने व त्यांच्या पत्नी ज्या सरकारी नोकरदार आहेत त्यांनी त्यांच्या पोटी जन्माला तिसरे आपत्त्य लपवण्यासाठी स्वताचे आपत्याला आपल्याच नातेवाईकांना सोपवून नातेवाईकाचे नांव लावलेले असणे, पत्नी तसेच वडील व आडनांव ही नावे बदलण्यासाठी सन २०१५ - २०१६ च्या दरम्यान रुग्णालयात भरती होत असताना आधारकार्ड ओळखपत्र म्हणून घेत नसल्याचा फायदा घेवुन संबंधितांनी सिंधुनगर महानगरपालिका चिंचवड जन्ममृत्यु नोंदणी व पिंपरी चिंचवड शहरा मधील खाजगी दवाखान्यात खोट्या नावाने उपचार घेवुन यशवंतराव चव्हाण मेमोरीयल हॉस्पिटल, पिंपरी चिंचवड महापालिका दवाखाना व सिंधुनगर महापालिकेचा दवाखाना निवडल्याची सत्य घटना घडलेली असणे, आपल्या पत्नीस तिसरे आपत्य झाल्याने सदर राजकीय नेत्याने आपले राजकीय कारकीर्द | श्री. समाधान अवताडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | वाचविण्यासाठी व निवडणुका लढविण्यासाठी पूर्वनियोजन करून कागदोपत्री हेरफेर केलेला असणे, सदर नेत्याने धन्वंतरी व साळुंके मॅटर्निटी होम, पिंपरी चिंचवड या खाजगी हॉस्पिटलमध्ये नाव नोंदवतांना स्वताच्या पत्नी एवजी नातेवाईकाचे व त्याच्या पत्नीचे नांवाने उपचार घेवुन महापालिकेला त्या खोट्या नावाने नोंद करुन राजकिय पदाचा लाभ घेत असणे, तसेच तिसऱ्या आपत्य झाले असताना त्यांच्या पत्नीने देखील सदरची बाब लपवून ठेवणे, तसेच तक्रारदरांनी सदरचे आपत्य त्यांच्या नातेवाईकाला विकत तर नसतील ना अशी शंका निर्माण होणे, या उपस्थित शंकेला सदर नेत्याने उत्तर देताना हे आपत्य माझेच असून हिमंत असेल तर सिद्ध करून दाखवा असे खाजगीत बोलत असणे, यामुळे तक्रारदारांनी सदर तिसऱ्या अपत्याची सदर राजकीय नेत्याची व त्यांच्या पत्नीची डि.एन.ऐ टेस्ट करण्याची व तसेच खोटी नांवे लावण्यासाठी मदत करणारे रुग्णालयाची संपुर्ण चौकशी कारवाई करण्याची मागणी होत असणे, सदर राजकीय नेत्याने व त्यांच्या पत्नीने खाजगी रुग्णालयांच्या मदतीने शासनाची केलेली दिशाभूल व फसवणूक यावर शासनाने करावयाची कारवाई.” | | |
| (२५४) | “पालघर जिल्हयातील वसई-विरार महापालिका शहरात सन २०१८ ते २०२१ या तीन वर्षात ६९ कोटींचे किटकनाशक व औषध फवारणीचे कंत्राट घेतलेल्या किरण कॉर्पोरेशन कंत्राटदार कंपनीने किटकनाशक औषध फवारणी करुनही पालिका हद्दीत डासांचा प्रसार वाढून डेंग्यु, मलेरिया व फायलेरियाचा प्रसार झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १३/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, महापालिकेचे तांत्रिक सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांचेमार्फत सदरचा ठेका किरण कॉर्पोरेशन कंपनीला देण्यात येणे, दर महापालिकेतर्फे किटकनाशक फवारणीसाठी दरवर्षी २३ कोटी देण्यात येऊनही मागील वर्षी डेंग्युचे प्रमाण १००, मलेरिया ९३ व फायलेरियाचे प्रमाण ८० रुग्ण असणे, तर खासगी रुग्णालयात याच रुग्णांची संख्या ५०० हून अधिक असल्याची आकडेवारी स्वतःमहापालिकेतर्फे देण्यात येणे, यामुळे दरवर्षी किटकनाशक फवारणीसाठी दरवर्षी २३ कोटी निधी देऊनही शहरात डासांचा प्रसार होऊन रुग्ण वाढत असल्याचा प्रकार चिंताजनक असणे, सदर प्रकरणात ठेकेदार, महापालिकेचे संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी आर्थिक संगनमताने कमी व स्वस्त किटकनाशके वापरुन यामध्ये आर्थिक घोटाळा करण्यात येणे, संबंधितांच्या भ्रष्टाचारामुळे शहरातील करदात्या नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी होऊन सदरहू नागरिकांना विविध रोगांचा | श्री. अनिल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रादूर्भाव होऊन उपचारासाठी रुग्णालयात जावे लागणे, यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, सदर प्रकरणाची शासनने चौकशी करुन तातडीने यातील दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन सदर कंपनीचा ठेका तात्काळ रद्द करुन सदर कंपनीला काळया यादीत टाकण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शहरातील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (२५५) | "वसई-विरार महापालिकेत गेले तीन वर्षांपासून ठेक्याने मनुष्यबळ पुरविण्याचे कंत्राट मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट कंपनीला दिल्याचा गंभीर प्रकार दि.२३/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, सन २०२२ मध्ये महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाला पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी नव्याने ४०४ मनुष्यबळ पुरविण्याकरिता ए,सी,बी,ई व डी,एफ,जी,एच,आय या प्रभागासाठी अनुक्रमे तीन ठेके पुढील तीन वर्षासाठी देण्यात येणे, सदरहू ठेके महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सही सह मे.आर.जी.कन्स्ट्रक्शन या नवीन ठेकेदार कंपनीस एक ठेका केवळ ०.९९ टक्के कमी दराने देण्यात चालवित असणे, सदरहू ठेकेदारास सुमारे २० टक्के अतिरिक्त दराने ठेका देण्यात येणे, विशेष म्हणजे तीन पैकी दोन निविदा या एकाच कुटुंबातील असणे, जे स्वतःपती-पत्नी असून त्यांचे सख्खे भाऊ वसई-विरार महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असणे, एकूण तीन ठिकाणच्या निविदा प्रक्रियेनुसार अदांजपत्रकीय रक्कम ४६ कोटी ५५ लाख १६ हजार ४८० इतकी असून, या २७ ते २८ टक्के जादा दराने असणे, सदर निविदांच्या एकत्रित मंजुरी नंतर ५५ कोटी ८६ लाख १९ हजार ७७६ इतकी स्वीकृती रक्कम असून ज्यामध्ये ठेकेदारास २० टक्क्यांनुसार ९ कोटी ३१ लाख ३ हजार २९६ इतका नफा होणे अपेक्षित असणे, स्वयंभू ट्रान्सपोर्टला ०.९९ नुसार ४६ लाख ८ हजार ६१३ इतका नफा होणे अपेक्षित असताना, महापालिकेने सदरहू ठेकेदार कंपनीस ८ कोटी ८४ लाख ९४ हजार ६८२ रुपयांचा अतिरिक्त फायदा करुन दिल्याचा घडलेला बेकायदा प्रकार, यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान, या संदर्भात या परिसरातील संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२३/१/२०२३ रोजी लेखी निवेदन देऊन सदर कंपनीचा ठेका तात्काळ रद्द करुन त्या कंपनीला काळया यादीत टाकून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी | श्री. अनिल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | करुनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (२५६) | "नवी मुंबईच्या निर्मितीसाठी सिडकोने नियोजन आणि विकासाचा बहुकेंद्री आकृतीबंध स्वीकारला असणे, सिडकोची भारतातील प्रमुख नगरविकास व पायाभूत सुविधा विकसित करणारी संस्था तसेच "शहरांचे शिल्पकार" या नावाने ओळख असणे, सन १९७१ पासून पर्यायी नागरी व्यवस्था व सौख्यपूर्ण जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा आणि स्थैर्य देण्यासाठी पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे, सिडकोने नवी मुंबईत निवासी वापरांकरिता बांधलेल्या वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरुळ, सीबीडी-बेलापूर स्थित इमारती सुमारे ३० ते ४० वर्षांहून अधिक जुन्या असणे बहुतांश इमारतींची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, सदर इमारती अत्यंत निकृष्ट दर्जाच्या व राहण्यायोग्य नसणे. परिणामी स्थानिक रहिवाश्यांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व भीतीचे वातावरण, वाशी, सानपाडा, नेरुळ या भागामधील काही इमारतींच्या पुनर्विकासासाठी काही विकासकांनी पुढाकार घेणे तथापि पुनर्विकासाबाबत सिडकोने कोणतेही धोरण वा नियमावली निश्चित केलेली नसणे. त्यामुळे अपार्टमेंट असोसिएशन व गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये निर्माण झालेली संभ्रमावस्था, अत्यल्प, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी बांधलेल्या सदनिकांच्या पुनर्विकासानंतर विकासकामार्फत देण्यात येणाऱ्या सदनिकेच्या चटई क्षेत्रफळाच्या निश्चितीसह संग्रह निधी (कॉर्पस फंड), विकासकाकडून देण्यात येणारी बँक हमी इतर सोयी-सुविधा, बांधकामाचा दर्जा व बांधकामाचे निकष, कालबध्द इमारत पूर्णत्वाचे निकष, सदनिकांचा ताबा देण्यासाठी लागणारा कालावधी, इमारत पूर्ण होईपर्यंत सदनिकाधारकाला विकासकाकडून पर्यायी निवास व्यवस्था इत्यादी बाबींचा अंतर्भाव करुन सिडकोने पुनर्विकास धोरण अवलंबण्याची आवश्यकता तसेच पुनर्विकासासाठी बांधकाम क्षेत्रातील नामांकित मे.एल. ॲण्ड टी. रिॲल्टी, मे. शापूरजी ॲण्ड पालनजी, मे. टाटा रिॲल्टी, मे. गोदरेज प्रॉपर्टीज यांसारख्या कंपन्यांची पुनर्विकासासाठी नियुक्ती करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका." | श्री. अजित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२५७) | "राज्यामध्ये रोज एकूण ८१९ कोटी लिटर सांडपाण्याची निर्मिती होत असताना केवळ २५ टक्के पाण्यावर प्रक्रिया होणे, उर्वरित ७५ टक्के पाणी कोणतीही प्रक्रिया न करताच थेट नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, जलजीवांसह नागरिकांच्या आरोग्यावरही घातक परिणाम होणे, त्याला प्रतिबंध घालण्यात अपयश येत असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून स्पष्ट होणे, तसेच, महापालिका, नगरपरिषदांनी त्यांच्या अंदाजपत्रकातील २५ टक्के निधी हा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, नदी प्रदूषणास कारणीभूत असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प निर्मितीसाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अतुल भातखळकर, श्री. छगन भुजबळ वि. स. स. | कित्ता |
| (२५८) | "मुंबई शहर आणि उपनगरातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, संपूर्ण जानेवारी महिना हा प्रदुषणात गेल्याची नोंद झालेली असणे, जानेवारी महिन्यात मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि कल्याण या चारही औद्योगिक क्षेत्रात ३१ पैकी ३१ दिवस प्रदुषित आढळले असणे, गेल्या दोन वर्षापासून मुंबईच्या प्रदुषणात वाढ होत नसल्याची नोंद केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांकाच्या आकडेवारीवरुन समोर आली असणे, ही बाब मुंबईकरांसाठी चिंतेची ठरत असणे, मुंबईच्या प्रदुषणात औद्योगिक व नागरी प्रदुषणाचा समावेश असणे, त्यात धुलिकण व वायु प्रदुषणाचा समावेश असणे, यात उद्योगातून निघणारे धुळ-वायु प्रदुषण तसेच वाहने, बांधकाम, कचरा ज्वलन या घटकांचा समावेश असणे, प्रदुषणामुळे सर्व सामान्य नागरीकांना मोठया प्रमाणात साथीच्या आजाराने ग्रासले असल्यामुळे सरकारबाबत निराशेची व संतापाची भावना निर्माण होणे, मुंबई शहर व उपनगरातील प्रदुषण कमी करण्याबाबत राज्य शासनाने लवकरात लवकर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी वि. स. स. | कित्ता |
| (२५९) | "Swiss Air Tracking Index असलेल्या IQAir ने मुंबईला दिनांक २९ जानेवारी ते दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ या काळासाठी देशातील सर्वाधिक व जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून घोषित केले असणे, मुंबईच्या हवेची पातळी सातत्याने वाईट व अतिवाईट या श्रेणींमध्ये असणे, मुंबईच्या हवेतील हानिकारक असलेल्या PM२.५, PM१० व mercury चे प्रमाण मोठ्या प्रमाणात | श्री. रोहित पवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. राजेश एकडे, श्री. अबू आजमी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | वाढणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून, महाराष्ट्राची राजधानी असणे, मुंबईत एक कोटींहून अधिक लोक राहत असून देश विदेशातील राजकीय व उद्योग जगतातील पाहुणे इथे सातत्याने येत असणे, त्यामुळे मुंबईच्या हवेच्या पातळीत घट होणे ही सर्वार्थाने चुकीची बाब असणे, भविष्यात मुंबईच्या प्रदूषणाची समस्या दिल्ली सारखी गंभीर होण्याचा धोका असणे, तरी शासनाने यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज असणे,याबबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (२६०) | “रायगड जिल्ह्यातील जे.एन.पी.टी. बंदरा जवळील कोप्रोली-उरण व चिरनेर येथील रस्त्यालगत ग्लोबिकॉन टर्मिनल कंपनीने काही कंटेनरमध्ये साठवून ठेवण्यात आलेल्या नाशवंत खाद्यपदार्थांच्या मालाच्या दुर्गंधीचा या परिसरातील नागरिकांना त्रास होत असल्याची बाब दि.३.२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, सदरहू कंपनीने नाशवंत मालाची विल्हेवाट खाडी किनाऱ्याजवळील भररस्त्यावरच लावत असल्याने या विषारी डंपींग विरोधात परिसरातील संतप्त नागरिकांनी अनेकदा आवाज उठवूनही व तक्रार करुनही यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी तसेच महसूल विभागाचे अधिकारी यांनी अद्याप कोणतीच कार्यवाही न करता याकडे दुर्लक्ष केल्याची बाब आढळून येणे, याबाबत सदरहू तीन कंटनेरमध्ये खाद्यपदार्थांचा सडका व नाशवंत माल प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने खाडी किनारी रहिवाश्यांच्या रस्त्यालगत टाकल्यामुळे निर्माण झालेल्या दुर्गंधीचा या परिसरातील नागरीकांना प्रादुर्भाव होऊन नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, उरण परिसरातील अनेक केमिकल कंपन्या प्रदुषण नियमाचे उल्लंघन करुन कारखाण्यातून निघालेले केमिकलवर प्रक्रिया न करताच पागोटे, भेंडखळ, बांधपाडा खाडीत सोडण्यात येत असलेल्या विषारी केमिकलमुळे मोठ्या प्रमाणात मासे मृत झाल्याची तक्रार नागरीकांनी संबंधित विभागाकडे करण्यात येऊनही सदरबाबत शासनाकडून कोणतीच दखल घेण्यात न येणे, सदरहू प्रकरणी शासनाने प्रदुषण करणारी ग्लोबीकॉन टर्मिनल तसेच खाडीत प्रक्रिया न करता केमिकल सोडणाऱ्या रासायनिक कंपन्यांविरुद्ध कठोर कारवाई करुन नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| (२६१) | “नागपूर जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील सुमारे १ हजार २२९ कारखान्यांचा प्रदूषण निर्देशकांचा प्रदूषण निर्देशांक पेक्षा अधिक प्रदूषणकारी असल्याचे चिंताजनक पातळीवर होवून येथील हवेची गुणवत्ता खराब होणे, प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना राबविण्यात येत असल्यातही अनेक कारखान्यांच्या मनमानी कारभारामुळे शहरासह आजूबाजुच्या तालुक्यांतील हवा आणि पाणी प्रदूषणात सातत्याने वाढ होणे,येथील कारखान्यांमधून होणाऱ्या वायुगळतीमुळे होत असलेल्या त्रासाबाबत नागरिकांकडून अनेक तक्रारी येत असतानाही त्याकडे शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया.” | श्री. विकास ठाकरे, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार वि. स. स. | कित्ता |
| (२६२) | “मुंबइतील रूग्णालयातून निर्माण होणारा बायोमेडिकल कचरा गोवंडी येथील एसएमएस कंपनीद्वारे जाळण्यात येत असल्याने येथील रहिवाश्यांमध्ये गंभीरस्वरूपाचे जिविताला धोका निर्माण करणारे आजार उध्दवून त्यांच्याचे आरोग्यास धोका निर्माण होणे, आधीच हयाविभागात डम्पिंग ग्राऊंड असल्याने येथील नागरीक त्रस्त असताना बायोमेडिकल वेस्टच्या जाळण्याने नागरीकांचे मृत्यू सदृष्य धोक्यात येणे, बायोमेडिकल प्लांटच्या चिमणीतून चोविसतास धुर बाहेर निगत असून हि प्रदुषण मंडळाची प्रदुषण पातळी व घटक मोजणारी यंत्रणाच नसल्याने गोवंडी व परिसरात कोणते व किती प्रदुषण होत आहे याची माहितीच उपलब्ध न होणे, तात्कालीन पर्यावरण मंत्री यांनी सादर कंपनीद्वारे होणारे प्रदुषण विचारात घेता कंपनी बंद करून कंपनीला प्रकल्प तळोजा येथे हालविण्याचे आदेश दिल्यावर कंपनीने केवल एक दिवस कंपनी बंद करून कंपनी पुन्हा आहे तेथेच सुरू ठेवणे, नागरीकांचे आरोग्य व होणारे गंभीर प्रदुषण विचारात घेता सदरची कंपनी त्वरीत बंद करून तळोजा येथे हालविण्याची कारवाई करण्याची आवश्यकता विचारात घेता शासनाने करावयची कारवाई व करावयाची उपायोजना.” | श्रीमती यामिनी यशवंत जाधव वि.स.स. | कित्ता |
| (२६३) | “राज्यात पालघर जिल्ह्यात तारापूर एम. आय. डी. सी.मधील बजाज हेल्थ केअर कंपनीतील रासायनिक सांडपाणी भूमिगत पाईपलाईनद्वारे चोरीछुपे बाहेरील गटारात सोडण्याच्या प्रकार माहे. डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, तसेच याच बजाज हेल्थ केअर या कंपनीच्या प्लॉट क्र.टी ३० आणि प्लॉट क्र. एन २१९ वरील दोन प्लांटमध्ये कंपनीतील घातक रासायनिक सांडपाणी हे कोणतीही प्रक्रिया न | श्री. विनोद निकोले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | करताच चोरी छुपे भूमीगत बंदीस्त पाईपलाईनद्वारे बाहेरील गटारात सोडण्याचा गोरखधंदा गेली अनेक वर्षे बिनबोभाट पणे सुरू असणे, गटारात सोडण्यात येणारे हे घातक सांडपाणी पुढे नाल्यावाटे समुद्राच्या खाडीला जाऊन मिळत असल्याने या परिसरातील जल प्रदूषणाचा स्तर उंचावला असणे, या परिसरातील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत तारापूर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी या भागातील कारखान्यांची तपासणी मोहीम हाती घेणे, परंतु, कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, दिनांक ०६ डिसेंबर रोजी प्लॉट क्र. टी ३० वरील बजाज हेल्थ केअर या कंपनीचे घातक रासायनिक सांडपाणी गटाराच्या चेंबरच्या खालून पाईपलाईनद्वारे सोडण्यात येत असल्याचे उघडकीस येत, या प्रकरणी दोन्ही प्लांट मधील सांडपाण्याचे नमुने गोळा करण्यात आलेले असणे, राष्ट्रीय हरित लवादाने उक्त कंपनीवर प्रदूषणास जबाबदार धरत दंड ठोठावला असणे, त्या नंतर दुसऱ्या दिवशी दि. ०७ डिसेंबर रोजी पुन्हा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्लॉट क्र. एन २१९ वरील याच बजाज हेल्थ केअर कंपनीच्या दुसऱ्या प्लांटची तपासणी केली असता कंपनीच्या आतून भूमीगत बंदीस्त पाईपलाईनद्वारे घातक रासायनिक सांडपाणी विना प्रक्रिया बाहेरील गटारात सोडत असल्याचे उघडकीस आलेले असणे, त्यामुळे आजूबाजूच्या शेतकरी-बागायतदार यांच्या शेतजमिनी, विहिरी-कूपनलिका या सारख्या पिण्याचे पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झालेले असणे, त्याच प्रमाणे मत्स्य उत्पादन देखील कमालीची घट होत असणे, तसेच स्थानिक आजूबाजूच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२६४) | "भिवंडी शहर हे कापड उद्योगासाठी भारतात प्रसिद्ध शहर असणे, या शहरात कापड उद्योगाशी संबंधित अनेक कारखाने व कपड्यांवर प्रक्रिया करणाऱ्या मोठमोठ्या डाईंग्स असणे, या डाईंग्स मध्ये कपड्यांवर प्रक्रिया केली जाणे, ही प्रक्रिया करत असताना कपड्यांना पॉलिश करण्यासाठी त्याला मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण करून कपड्यांवर प्रक्रिया करावी लागत असणे, ही उष्णता निर्माण करण्यासाठी डाईंग्स मध्ये तेथील आजूबाजूच्या परिसरात प्रदूषण होऊ नये म्हणून नैसर्गिक कोळसा जाळणे गरजेचे असणे, परंतु भिवंडी येथे पर्यावरण प्रादेशिक अधिकारी श्रीमती सौजन्या पाटील यांच्या कार्यक्षेत्रात डाईंग्स मध्ये मोठ्या प्रमाणावर कोळशाच्या ठिकाणी प्लास्टिक चिंध्या वापरल्या जात असणे, भिवंडी शहरात विविध ठिकाणी लोक वस्ती शेजारीच या डाईंग्स असणे, प्रक्रियेमध्ये प्लास्टिकच्या चिंध्या वापरल्यामुळे या डाईंग्स च्या | श्री. शांताराम मोरे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | चिमण्यांमधून लहान प्लास्टिकचे कण हे तेथील लोकांच्या हवेत पसरुन स्थानिकांना विविध श्वनसाचे आजार होणे, यामुळे भिवंडी शहरातील लाखो नागरिक गंभीर आजाराने ग्रस्त झालेले असणे, या विरोधात स्थानिक नागरिकांनी पर्यावरण प्रादेशिक अधिकारी सौजन्या पाटील यांच्याकडे अनेक तक्रारी करुनही त्यांच्याकडून उक्त डाईंग्स मालकांवर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदर प्रादेश्कि अधिकारी यांच उक्त डाईग्स कंपनीसोबत मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप स्थानिक नागरीकांकडून होत असणे, त्यामुळे त्यांच्याकडून कारवाई करण्याकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत असणे, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी करून वायू प्रदुषण करणाऱ्या उक्त डाईग्स कंपनीवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित प्रादेशिक अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने आतापर्यंत केलेली कार्यवाही." | | |
| (२६५) | "करवीर विधानसभा मतदार संघातील मौजे वडणगे (ता.करवीर, जि.कोल्हापुर) येथे राज्य सरोवर संवर्धन कार्यक्रमातंर्गत तलाव संवर्धन करणेचे काम शासन निर्णय दिनांक ०७/११/२०१७ अन्वये ३ कोटी ६९ लाख ४७ हजार १७४ रूपयांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असणे, सदर कामास दिनांक २९/०८/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिला असणे, त्याची मुदत दिनांक ३१/१२/२०२० रोजी संपली असणे, सदर कामावर रु.२८ लक्ष ५५ हजार ३४४ इतका खर्च झाला असणे, सदरचे काम मे.वरदलक्ष्मी कंस्ट्रक्शन, प्रा.लि.शाहूपूरी, कोल्हापुर हा मक्तेदार करत असणे, सदरच्या कालावधीत पहिल्याच पावसात त्यांनी बांधलेली तलावाची दिडशे फुट लांबीची व दहा फुट उंचीची भिंत सोमवार दिनांक २४ जून २०१९ रोजी कोसळली असणे, त्यामुळे येथील ग्रामस्थांत संतापाची लाट उसळली आणि सदरचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने काम बंद पडले असणे, कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत असणे, त्यामुळे दिनांक १३/०१/२०२२ दरम्यानच्या काळात सदर तलावाचे काम पुर्ण होण्याकरिता आढावा बैठक घेवुन १५ दिवसांत दुरुस्ती आराखडा तयार करा, मक्तेदाराला नोटिस काढून १५ दिवसांची मुदत द्या, त्याचबरोबर मक्तेदार लोकवर्गणी भरून काम सुरू करणार आहे किंवा नाही ते पाहून काम सुरू करणार नसल्यास मक्तेदार बदलणे, व अधिकाऱ्यांनी पुढील कार्यवाही तातडीने करावी, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, कोल्हापुर यांना दिली असणे, परंतु त्याबाबत कोणताही प्रतिसाद | श्री. पी.एन.पाटील (सडोलीकर) वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मिळाला नसणे, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे शासनाने दिलेल्या निधीचा योग्य वापर होत नसल्याचे निदर्शनास येत असलयाने संबधित ठेकेदार यांचेवर व संगनमत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे गरजेचे असणे, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२६६) | "राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांच्या मुख्य परीक्षा यापुढील काळातही चालू वर्षापासून वस्तुनिष्ठ स्वरूपात न घेता वर्णनात्मक स्वरूपात घेण्याचा निर्णय घेणे, याच्या निषेधार्थ एमपीएससी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुणे येथील अलका टॉकीज चौकात दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी आंदोलन केले असल्याचे निदर्शनास येणे, नवीन शैक्षणिक पॅटर्न सन २०२५ पासून लागू करण्याची मागणी सदर एमपीएससीच्या विद्यार्थ्यांकडून करण्यात येणे, आतापर्यंत एमपीएससी मार्फत वस्तूनिष्ठ स्वरूपात परीक्षा घेण्यात येणे, मात्र आता माजी आयएएस अधिकारी चंद्रकांत दळवी यांच्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांना एमपीएससीची मुख्य परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने द्यावी लागणार असणे, त्यासाठी सदर विद्यार्थ्यांचा विरोध नसून नवीन पॅटर्न सन २०२५ पासून लागू केल्यास एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करण्यास पुरेसा वेळ मिळेल यासाठी सदर विद्यार्थ्यांनी आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधलेले असणे, परंतु शासनाची भूमिका अनुकूल नसल्याने सदर विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झालेले असणे, याबाबत शासनाने योग्य निर्णय घेऊन सदर एमपीएससीची च्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. कुणाल पाटील वि. स. स. | कित्ता |
| (२६७) | " राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत कर्मचारी मयत झाल्यास सदर कुटुंबाच्या उपजिविकेसाठी सदर मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील वारसास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत घेतले जात असणे. अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी विविध विभागात मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त असून अनेकांची वयोमर्यादा संपली असतानाही व वयोमर्यादा संपत आली असतानाही हजारो अनुकंपाधारक नोकरीच्या प्रतीक्षेत असणे. वयोमर्यादा संपली असल्याचे व सदरील वारस हे नोकरीपासून वंचित राहीले असल्याचे निदर्शनास येणे. अनुकंपा तत्त्वावर वारस म्हणून अर्ज केलेल्या परंतु वयोमर्यादा संपलेल्या वारसा नंतर दुसऱ्या वारसास अनुकंपाच्या नियुक्तीसाठी अर्ज देता येत नसल्याने अनेक अनुकंपाधारक कुटुंबांतील वारस नोकरीपासून | श्री. अभिमन्यु पवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | वंचीत राहिले असल्याचे निदर्शनास येणे. सदर मयत कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्त्वावर प्रतिक्षा करूनही नोकरी न मिळाल्याने व वयोमर्यादा संपल्याने सदर कुटुंबात नैराश्याची भावना निर्माण झाली असणे. राज्यातील वयोमर्यादा संपत आलेल्या अनुकंपाधारकांसाठी अधिसंख्य पदे त्या त्या विभागात निर्माण करून त्यांना सेवेत घेण्याबाबत किंवा वयोमर्यादा संपल्यास इतर वारसास अनुकंपासाठी अर्ज करण्याची परवानगी देऊन नवीन वारसास नोकरी देण्याबाबत सुधारित शासन आदेश निर्गमित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२६८) | "उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगांव आणि नंदूरबार हे तिन्ही जिल्हे विकासाच्या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कितीतरी पटीने मागे असणे, तिन्ही जिल्ह्यात सिंचनाचा मोठा अनुषेष असणे, नाशिक महसूल मंडळ आणि खान्देशात महसूल मंडळ २ स्वतंत्र महसूल मंडळ करून नाशिक जिल्ह्यातील मालेगांव जिल्हा निर्मितीचा प्रश्न मार्गी त्या हिंदू ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची घोष्णा प्रत्यक्षात साकार करण्याची निर्माण झालेली गरज, नवीन मालेगांव तालुक्यात मनमाड, नांदगाव, नामपूर, तर धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा पिंपळनेर असे विविध तालुक्यांच्या निर्मितीचा विषयही अनेक वर्षापासुन प्रलंबित असणे, यासाठी नाशिक महसूल मंडळाचे विभाजन करून अमरावती महसूल मंडळाच्या धर्तीवर खान्देशातील धुळे, नंदूरबार आणि जळगांव जिल्ह्याचे स्वतंत्र महसूल मंडळ करण्याची मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी माहे फेबुवारी, २०२३ मध्ये केलेली घोषणा, त्यामुळे जनतेच्या मनात नवीन आशा पल्लवित होणे, यासाठी तिन्ही जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या धुळे जिल्ह्यात महसूल मंडळाचे मुख्यालय करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. जयकुमार रावल वि. स. स. | कित्ता |
| (२६९) | "औष्णिक ऊर्जा प्रकल्पात निर्माण होणारी राख प्रकल्पाच्या परिघातील बांधकामासाठी मोफत वितरित करण्याचा नियम असताना डहाणूतील अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड कंपनीतील राखेची मात्र विक्री केली जात असणे, स्थानिकांना राखेचे वितरण करणाऱ्या वीज कंपनीने राख वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गुजरातमधील एका कंपनीची नियुक्ती केलेली असणे, ती देखभाल शुल्काच्या नावाखाली स्थानिक व्यावसायिकांना राखेची विक्री करत असून त्यासाठी अनामत रकमाही घेत असणे,५०० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी पाणीमिश्रित सौम्य दर्जाची राख (पॉण्ड ॲश) | श्री. छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दौलत दरोडा, श्री. विनोद निकोले, श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. धर्मरावबाबा आत्राम वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रकल्पापासून दूर एका विशेष डबक्यामध्ये गोळा केली जात असणे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या नियमावलीनुसार, प्रकल्पापासून ३०० किमी परिघातील बांधकामांमध्ये तसेच बांधकाम साहित्यांच्या निर्मितीसाठी ही राख वापरणे सक्तीचे असणे, तसेच राखेचे वितरण विनाशुल्क करण्याचेही केंद्र सरकारने स्पष्ट केले असणे, मात्र डहाणूतील अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड कंपनीच्या बाबतीत हा नियम पायदळी तुडवण्यात आलेला असणे,कंपनीतून १५ वर्षांपासून राखेचे वितरण स्थानिकांना करण्यात येत असणे, त्यामुळे येथील स्थानिक राख वाहतूकदारांना रोजगारही मिळत असणे, मात्र जानेवारी २०२२ पासून कंपनीने स्थानिक वितरकांना थेट राखपुरवठा करण्यास मज्जाव केलेला असणे, त्याऐवजी गुजरातमधील मे. रेहवर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीकडे राख वितरणाचे कंत्राट दिले असणे, आता या कंपनीने ३० रुपये प्रति टन या दराने राखेसाठी शुल्क आकारण्यास सुरुवात केलेली असणे, त्यासाठी कंपनीच्या अंतर्गत रस्त्यांच्या देखभाल खर्चाचे कारण पुढे करण्यात आलेले असणे, राखेचे वितरण बंद झाल्यामुळे स्थानिक नागरिकांवर बेरोजगारीचे संकट उभे ठाकलेले असणे, त्यामुळे त्यांनी माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये या विरोधात ठिय्या आंदोलन सुरू केले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२७०) | "फुलशेती, फळशेती, कृषी पर्यटन इत्यादीसह कृषीसंबंधित उत्पादनांचा शेती (इतर) या गटामध्ये वर्गीकरण करून वाढीव दराने आकारणी केल्याने पालघर जिल्ह्यातील शेतकरी मेटाकुटीला आलेला असणे, अशा सर्व कृषीसंबंधित उत्पादनांना पूर्वापार कृषी गटाप्रमाणे वीज बिल आकारणी व्हावी यासाठी महावितरण कंपनीकडे शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने साकडे घालणे, महावितरण कंपनीने दिनांक ३ एप्रिल, २०२० परिपत्रकानुसार शेतीशी संलग्न अनेक उत्पादनांचा वीज दर शेती (इतर) या गटामध्ये वर्गीकरण केलेले असणे, त्यामुळे कृषी गटातील ग्राहकांना ३.७९ रुपये प्रति युनिट इतक्या होणाऱ्या वीज दर आकारणीऐवजी शेती (इतर) गटात पाच रुपये वीस पैशांनी आकारणी होऊ लागणे, विशेष म्हणजे राज्यात अनेक वीज मंडळांत हा निर्णय अमलात आलेला नसताना कोकणातील शेतकऱ्यांवर ही दरवाढ लादली गेली असणे, याकडे कंपनीचे लक्ष वेधण्यात येणे, जिल्ह्यातील शेतकरी हा पूर्ण वेळ फुलशेती, फळशेती करत नसणे, तर भात व इतर धान्यांच्या पिकांसोबत आंतरपीक म्हणून वेगवेगळ्या फुलं, फळांची लागवड करत असणे, विशेष म्हणजे फुलशेतीला तसेच चिकू, केळी, आंबा व नारळ यांना इतर पिकांच्या तुलनेत खूप कमी | श्रीमती मनिषा चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रमाणात पाणी लागते, याकडे लक्ष वेधताना पाण्याची मोठी आवश्यकता असणाऱ्या ऊस पिकाकडे मात्र महावितरण कंपनीने नवीन वर्गीकरणात समाविष्ट केलेले नसणे, परिणामी सर्व कृषीसंबंधित उत्पादनांना पूर्वापार कृषी गटाप्रमाणे वीज बिल आकारणी करणेसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२७१) | "राज्यातील अन्य फळपीक उत्पादक जिल्हयांमध्ये शेती व कृषी पंपांची वर्गवारी ही 'कृषी' गटामध्ये असताना केवळ रत्नागिरी जिल्ह्यातील शेती व कृषी पंपांची वर्गवारी ही 'अकृषीक' गटामध्ये करण्यात आलेली असणे, परिणामी, जिल्ह्यातील आंबा, काजू, फणस, नारळ, सुपारी बागायतदार, रोपवाटिका व्यवसायिक यांच्या शेती, कृषीपंपाची वीजबिले आधी येणाऱ्या बिलांपेक्षा चारपटीने जास्त येत असणे, सदर भरमसाठ बिलांची महावितरण कंपनीकडून जबरदस्तीने वसुली केली जात असणे आणि बिले न भरल्यास वीज खंडीत करण्याचे प्रकार सुरू असणे, त्यामुळे शेतकरी, बागायदारांमध्ये प्रचंड निराशेचे आणि संतापाचे वातावरण असणे, गेल्या काही वर्षात निसर्ग, तौक्ते यासारखी एकापाठोपाठ एक झालेली मोठी वादळे, सतत होणारा अवकाळी पाऊस यामध्ये जिल्ह्यातील बागायतदार अक्षरशः मेटाकुटीस आलेला असणे, बदलत्या नैसर्गिक वातावरणाचा सतत बसणारा फटका, त्यात शासनाने शेती व कृषी पंपांची वर्गवारी ही 'कृषी' गटामध्ये केल्याने तब्बल चारपटीने जास्त येणारी बिले, यामुळे जिल्ह्यातील बागायतदार, शेतकरी व संबंधित व्यवसायिकांपुढे मोठे संकट उभे राहिले असून बागायती करायच्या कशा, असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होणे, केवळ रत्नागिरी जिल्ह्यातील बागायतदारांच्या बाबतीत लावण्यात आलेला हा निकष अत्यंत अन्यायकारक असणे, तो तात्काळ रद्द करण्यात यावा, या गंभीर विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. भास्कर जाधव वि. स. स. | कित्ता |
| (२७२) | "राज्यात एप्रिल, २०१८ नंतर आजतागायत हजारो शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीतील वीज पंपासाठी अर्ज करून डिमांड भरले असणे,सदरील शेतकरी यांना स्वखर्चाने वीज जोडणी घेण्याबाबत व त्यासाठी लागणारा पोल वायर व इतर साहित्य घेण्याबाबत महावितरण विभागाकडून सांगण्यात येणे, ज्यांची आर्थिक क्षमता नाही असे शेतकरी स्वखर्चातून वीज जोडणी साठी लागणारा प्रचंड खर्च करू शकत नसल्याने आजतागायत वीज जोडणीच्या प्रतीक्षेत असणे, गेली चार ते पाच वर्षापासून शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळाली नसल्याने | श्री. अभिमन्यु पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | शेतात विहीर व विंधन विहीर यांना पाणी असतानाही ते पिकांना देता न आल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असणे,औसा विधानसभा मतदारसंघात जवळपास सर्वच गावातील शेतीपंपाचे रोहित्र हे ओव्हर लोड झाल्याने शेतकऱ्यांना योग्य दाबाने वीज पुरवठा होत नसणे, ओव्हर लोड रोहित्र सातत्याने नादुरुस्त होणे, महिनोमहिने वीजपुरवठा खंडित राहत असल्याने शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसान होत असणे, अनेक उपकेंद्रातील रोहित्र हे ओव्हर लोड असल्याने नवीन उपकेंद्र व उपकेंद्राच्या रोहित्राची क्षमता वाढ करण्याबाबत RDS योजना अंतर्गत या कामांना मंजुरी दिलेली असणे, परंतु उपकेंद्र मंजूर होऊन अनेक वर्ष झाली असतानाही उपकेंद्राच्या कामासाठी निधीची तरतूद झालेली नसणे, गावठाण फिडर सेपरेशन करण्याची कार्यवाही प्रलंबित असणे, पोल व तारा ह्या जुन्या व जीर्ण झाल्याने व आयुष्मान संपल्याने बदलण्याची आवश्यकता असणे, गावोगावी असलेले रोहित्राची दुरुस्ती दरवर्षी होत नसणे, अनेक रोहीत्र उघडे असणे, कीटक्याट सह केबल व इतर साहित्य महावितरण विभागाकडून पुरवठा केला जात नसणे, ऑईल संपले या कारणाखाली रोहित्र महिनो महिने दुरुस्त करून वीजपुरवठा सुरू केला जात नसणे, घरावरून गेलेल्या लाईन, वाकलेली पोल, झोल झालेल्या लाईन, घराला चिकटलेल्या लाईन यामुळे जीवित व वित्त हानीचा धोका होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, महावितरण चे अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसणे, ग्राहकांच्या तक्रारीची दखल तत्परतेने घेतली जात नसणे, परिणामी शेतकऱ्यांत तीव्र नाराजीची भावना निर्माण झाली असणे, राज्यातील वीज जोडणीसाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना महावितरण विभागाकडून त्वरित वीज जोडणी देण्यासाठी तसेच मागेल त्या शेतकऱ्यांना वीज जोडणी व योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी राज्यशासनाने योजना राबविण्याबाबत व त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत आणि वीज ग्राहकांचे प्रलंबित प्रश्न तत्परतेने निकाली काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (२७३) | “अहेरी, सिरोंचा, ऐटापल्ली, भामरागड व मुलचेरा तालूका (जि. गडचिरोली) अतिदुर्गम, ग्रामीण, जंगलाने व्याप्त व नक्षलग्रस्त भाग असणे, येथील नागरीक ग्रामीण भागातील असल्यामुळे विजेचा कमी प्रमाणात वापर होत असणे, परंतु या विभागात महावितरण कंपनीकडून हजारों नागरीकांना १ लक्ष पर्यंत विजेचे बिल येत असल्याची बाब निदर्शनात येणे, याबाबत नागरीकांकडून अनेकदा विज वितरण कंपनीकडे तक्रार | श्री. धर्मरावबाबा आत्राम वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | करुनसुध्दा यामध्ये सुधारणा न होण्याची गंभीर बाब समोर येणे, विजेचे बिल न भरल्यामुळे नागरीकांना विजेचे कनेक्शन कापण्याबाबत वारंवार धमक्या मिळणे, विज वितरण कंपनी कडून नागरीकांना विजेचे बिल भरण्याबाबत दबाब टाकण्यात येणे, त्यामुळे बिनाकारण नागरीकांना मानसीक त्रास होणे, परिणामी जनतेत वीज वितरण कंपनी बद्दल तिव्र नाराजी पसरल्याचे चित्र निदर्शनात येणे, याबाबत दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याकरिता आंदोलन करण्याची स्थानीक जनतेची सततची होत असलेली मागणी, यामध्ये सुधार करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२७४) | "चंद्रपूर येथील औष्णीक विद्युत केंद्रात कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यात येत नसल्याने वारंवार अपघात घडणे, वीज केंद्रातील ५ क्रमांकाच्या संचाचे देखभाल व दुरूस्तीचे काम सुरू असतांना काल दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान २० ते २५ फुटावरून एका अभियंतासह टेक्नेशियन असे दोन कर्मचारी खाली पडुन गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ ला निर्देशनास येणे,याच औष्णीक केंद्रात वीज केंद्रातील ५ क्रमांकाच्या संचाचे देखभाल व दुरूस्तीचे काम सुरू असतांनाच पंधरा दिवसापुर्वी कंत्राटी कामगार सचिन रमेश गोवर्धन याचा सुद्धा अपघात दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी २२ फुट ऊंचिवरून खाली पडून दुर्दवी मुत्यू झााल्याची घटना उघडकिस येणे,या वीज केंद्रात कर्मचाऱ्यांच्या सुरक्षतेचर काळजी घेण्यात येत नसल्याने वारंवार अपघात होण्याच्या प्रमाणात वाढ होऊन निरपराध कर्मचाऱ्यांच्या मृत्यू होणे, पंधरा दिवसापुर्वी घटना घडून सुद्धा याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे काल दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ला दुर्घटना घडून दोन कर्मचारी जखमी होणे,या गंभीर प्रकरणी शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातारण, त्यामुळे या अपघातांची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होणेबाबत तसेच अपघात होऊ नये याबाबत शासनाने तातडीने करावयायाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार,श्री. अस्लम शेख,अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) वि. स. स. | कित्ता |
| (२७५) | "राज्यातील चंद्रपूर जिल्हास्थित चंद्राकोल आणि त्याचेशी संबंधित कोहली ट्रान्सपोर्ट आणि स्वामी फ्युल कंपनी कोल इंडियाच्या खाणीतून कोळसा घेऊन महाजेनकोच्या पॉवर स्टेशनपर्यंत पोहचवणे तसेच कोल | श्री. सुभाष धोटे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | ट्रेडिंगचे काम करीत असणे, संबंधित कंपनी गोडेगांव, सिंगौरी, गोकुळ खदान, एमकेडी-१, एमकेडी-३, उमरेडच्या खाणीतुन कोळसा वाहतुकीचे काम करीत असणे, सदरहू कंपनी कोळसा पुरवठा बिलासपूर, वणी (यवतमाळ), मुजटवन सह मराठवाड्याच्या अनेक भागांत करीत असणे ; महाजेनको मध्ये कोळसा वाहतुकीचे काम इतर कोणत्याही कंपनीने घेऊ नये यासाठी चंद्राकोल व त्याचेशी संबंधित अन्य कंपन्यांनी कमी खर्चात वाहतुक ठेक्याचे काम घेण्यात येणे, सन २०१८ पासून सातत्याने या कामासाठी कंपनीने हातमिळवणी करून एकाधिकार प्राप्त केला असणे, चंद्राकोल आणि त्याचेशी संबंधित कोहली ट्रान्सपोर्ट आणि स्वामी फ्युलने महाजेनकोला हजारो करोड रुपयांचा चुना लावला असणे, खासकरून लॅब टेक्नीशीयन, ज्यांना कोळशाची गुणवत्ता चेक करण्याचे काम दिले गेले असणे, सूत्रानुसार १०० ते २०० रुपये टन खराब कोळसा पास करण्याचा रेट फिक्स केला गेला असणे, या घोटाळ्याचा परिणाम असा झाला की अनेक वर्षांपासून महाजेनको मध्ये जी वीज कमी कोळशापासून बनत होती, खराब कोळशामुळे कोळशाची मांगणी जवळपास २५% वाढली असणे, महाजेनको मधून २ ते ३ लाख टन कोळशाची शॉर्टफॉल स्थिती निर्माण झाली व या घोटाळयामुळे वीजेचा खर्च वाढल्याचा भुर्दंड सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागला असणे, चंद्राकोल कोल इंडियाच्या खाणीतून उच्च प्रतीचा कोळसा उचलते परंतु महाजेनकोच्या पॉवर प्लांट पर्यंत पोहचेपर्यंत तो खराब क्वालिटी मध्ये बदलला जातो, अर्ध्या रस्त्यात चांगला कोळसा काढून त्यात तारकोलची भेसळ करून महाजेनको पर्यंत पोहचवला जात असणे, येथून मिळालेला चांगल्या क्वालिटीचा कोळसा इतर खाजगी कंपन्यांना मोठ्या रकमेच्या मोबदल्यात अवैधरित्या विक्री केला जात असणे, या संपूर्ण अवैध, निकृष्ट दर्जाची कोळसा वाहतुक, बिल, डमी नोंदीची तसेच करोडो रुपयांच्या कोळसा घोटाळ्याची उच्चस्तरीय निष्पक्ष चौकशी स्थापित करून भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईची मांगणी स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी जिल्हा खनिज अधिकारी, चंद्रपूर, कोयला नियंत्रक, नागपूर यांच्याकडे करूनही यावर कोणतीही उच्च स्तरीय चौकशी करून कारवाई करणेबाबतीत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२७६) | "२९ तरुणांना सरकारी नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून १.२ कोटी रक्कम लाटल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, सदर टोळी ही कृत्ये संध्याकाळी कार्यालय सुटल्यावर मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील केबिनमध्ये मुलाखती घेऊन बनावट नियुक्ती पत्र देत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यात दोषी आढळणाऱ्यावर कडक कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर,ॲड. आशिष शेलार,ॲड. पराग अळवणी,श्रीमती मनिषा चौधरी,श्री. अमित साटम,कॅप्टन आर. तमिल सेल्वन,श्री. किसन कथोरे,श्री. प्रशांत ठाकूर,श्री. संजय केळकर,श्री. बंटी भांगडिया, श्रीमती यामिनी यशवंत जाधव,श्री. योगेश सागर,श्री. राम कदम वि. स. स. | कित्ता |
| (२७७) | "व्हिसाची मुदत संपल्यानंतर देखील मुंबईत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून ६०% गुन्हे हे त्यांच्याकडून घडत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये बेकायदा वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी डिटेन्शन सेंटर सुरू करण्याचा प्रस्ताव सादर झाला असणे, परंतु, सदर योजना प्रत्यक्षात आली नसणे, त्यामुळे सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याची गरज असून लवकरात डिटेन्शन सेंटर सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (२७८) | "मुंबईतील मंत्रालयातून चालणाऱ्या बनावट भरतीचे धक्कादायक रॅकेट फेब्रुवारी २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, माजी सामाजिक न्याय मंत्री यांच्या नावाचा वापर करून नियुक्ती आदेशाचे बनावट पत्र देऊन मंत्रालयातील कर्मचारी, लिपिक भरतीचे रॅकेट चालवित असल्याचे निदर्शनास येणे, बोगस भरती लिपिक रॅकेट प्रकरणी गोवंडी पोलिसांनी एका मंत्रालयीन कर्मचाऱ्यासह तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करून अटक करण्यात येणे, अद्यापही काही गुन्हेगार फरारी असून त्यांचा शोध सुरू असणे, या प्रकरणी शासनाने अजून कोणकोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे याचीही दखल घेणे गरजेचे असणे, त्यामुळे शासनाने तातडीने कार्यवाही करून संबंधीत भ्रष्ट असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष शेलार,ॲड. पराग अळवणी,श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन,श्री. किसन कथोरे,श्री. प्रशांत ठाकूर वि. स. स. | कित्ता |
| (२७९) | "मुंबईतील मंत्रालयातून चालणाऱ्या बनावट भरतीचे धक्कादायक रॅकेट उघडे झाले असणे, माजी सामाजिक न्यायमंत्री यांच्या नावाचा वापर करुन नियुक्ती आदेशाचे बनावट पत्र देत मंत्रालयातील कर्मचारी लिपिक भरतीचे रॅकेट चालवत असल्याचे उघड झाले असणे, बोगस लिपिक भरती रॅकेटप्रकरणी गोवंडी पोलिसांनी | श्री. अमित साटम,ॲड. आशिष शेलार,ॲड. पराग अळवणी,कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | एका मंत्रालयीन कर्मचाऱ्यासह तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवत एकाला अटक ही केली असणे, मंत्रालयात सामाजिक न्याय विभागात लिपिकपदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून लाखो रुपये उकळणाऱ्या टोळीने उमेदवारांचा विश्वास संपादन करण्यासाठी बनावट आदेशपत्रांसह सामाजिक न्याय विभागाच्या बनावट ई-मेल आयडीचा वापर केल्याचे उघड झाले असणे, याबाबत गोवंडी पोलीस अधिक तपास करत असणे, यापूर्वी ही गेल्या डिसेंबर अखेरीस गुन्हे शाखेच्या कक्ष-६ ने मंत्रालयातील बोगस लिपिक भरती प्रकरणात मंत्रालयात शिपाई पदावर असलेल्या सचिन डोळस याच्यासह महादेव शेदू शिरवाळे, नितीन कुंडलिक साठे, प्रकाश सकपाळेलाही अटक केली असणे, धक्कादायक बाब म्हणजे, सामान्य प्रशासन उप सचिवांच्या केबिनमध्येच उमेदवारांच्या मुलाखती घेतल्याचे समोर आले असणे, याप्रकरणामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये शासनाच्या विरोधात निराशेची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असणे, मंत्रालयातून चालणाऱ्या बोगस लिपिक भरतीच्या घोटाळयातील दोषी कर्मचाऱ्यांवर शासनाने करावयाची कडक कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (२८०) | “रस्ते अपघात कमी करण्यासाठी चालकांना वाहतुकीच्या नियमांची शिस्त लावण्यासाठी आणि बेशिस्त चालकांना लगाम घालण्यासाठी राज्यातील वाहतूक पोलिसांना अतिरिक्त १९४ इंटरसेप्टर वाहनांची आवश्यकत असणे, याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे कोरोना काळापासून रखडलेला असणे, त्यामुळे वाहतूक पोलिसांना उपलब्ध असलेल्या इंटरसेप्टर वाहनांद्वारेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरोधात कारवाई करावी लागत असणे, या वाहनांमध्ये स्पीड गन ठेवण्याची सुविधा असणे, त्यामुळे उन-वारा, पावसाचा परिणाम पोलिसांच्या स्पीडगन कारवाईवर होत नसणे, शिवाय कारवाईसाठी सीसी टीव्ही कॅमेरे, ब्रीद ॲनलायझर, ई-चलान यंत्रणाही असणे, त्यामुळे तात्काळ या प्रस्तावाला मंजुरी देऊन वाहतूक पोलिसांनी १९४ इंटरसेप्टर वाहने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. बंटी भांगडिया, श्री. संजय केळकर, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर, श्री. संतोष दानवे, श्रीमती श्वेता महाले वि. स. स. | कित्ता |
| (२८१) | “दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी सातपूर नाशिक दोघांनी फेसबुक पोस्टच्या वादातून एका युवकाची हत्या केल्याची घटना ताजी असतांना दि. २१ जानेवारी २०२३ रोजी नाशिक शहरात पुन्हा एका तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आलेली असणे, दि. १५ जानेवारी २०२३ रोजी मेनरोड नाशिक येथे दोन गटात तुफान | श्री. छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | हाणामारी व प्राणघातक हल्ला तर देवळाली (जि.नाशिक) येथे दोन गटात प्राणघातक हल्ला झाल्याचे निदर्शनास आलेले असणे,माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात अश्विनी कॉलनी नाशिकरोड येथे दोन युवकांच्या दोन गटांमध्ये चॉपर तलवारी आणि कोयत्याने मारामारी झाली तर धात्रकफाटा परिसरात आर्थिक व्यवहारातून गोळीबार झाल्याची घटना निदर्शनास आलेली असणे, दि. ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सिडकोतील बुरकुले सभागृहाजवळ बहिणीची छेड काढल्याबद्दल विचारणा करण्यासाठी गेलेल्या भावासह बहिणीवर टोळक्याने कोयत्याने प्राणघातक हल्ला केलेला असणे,शहरात वर्षभरात ४४५५ गुन्हे दाखल होवून गुन्ह्यांच्या चढत्या आलेखामुळे आणि गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे पोलिसांपुढे आव्हान निर्माण झालेले असणे,सिडको परिसरात दिवसेंदिवस गुन्हेगारीमध्ये वाढ होत असून नवनवीन टोळ्या उदयास येत असणे,अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोयते आणि तलवारी बाळगून कोयता गँग आणि वाय गँग ने दहशत निर्माण केली असणे, नाशिक शहरातील सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन 'एमआयडीसी पोलीस ठाणे' निर्माण करण्याची लोकप्रतिनिधींनी दि.१८ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे,नाशिक शहर येथील सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यासाठी पोलीस महासंचालक मुंबई यांनी दि. ४ सप्टेंबर २०१८ रोजी गृह विभागाला प्रस्ताव पाठविलेला असून अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्ह्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या सुमारास स्वाक्षरी मोहीम इ.विविध आंदोलने केलेली असणे,नाशिक पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांच्या विभाजनासह आयुक्तालय कार्य क्षेत्राची हद्दवाढ व विस्तार करण्याबाबत पोलीस आयुक्त नाशिक यांनी माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्या सुमारास पोलीस महासंचालकांना प्रस्ताव पाठवलेला असणे,सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये नाशिक पोलीस आयुक्तालयात ५५९ गुन्ह्यांची वाढ झाल्यामुळे वाढत्या शहरीकरणामुळे नाशिक पोलीस आयुक्तालयाची हद्दवाढ आणि पोलीस ठाण्यांचा विभाजन करण्याची आवश्यकता असणे, नाशिक शहरातील गुन्हेगारीमध्ये प्रचंड वाढ झालेली असणे, शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालण्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२८२) | "दि. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी महिला विधानपरिषद सदस्या या कसबे धावंडा ता.कळमनुरी जि.हिंगोली येथे गावकरयांना मार्गदर्शन करीत असताना अनोळखी व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला करणे, दि. ११ जानेवारी २०२३ रोजी कणेरा-रहाटगाव नाका जि.अमरावती येथे विधानसभा सदस्य यांना दुचाकी वाहनाने उडवल्यामुळे अपघात होवून ते गंभीर जखमी झालेले असणे, सदर अपघात घातपातामुळे झाल्याची लोकप्रतिनिधी यांनी तक्रार केलेली असणे, दि. १४ जानेवारी २०२३ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांना त्यांच्या नागपूर येथील कार्यालयात दूरध्वनीद्वारे जीवे मारण्याची धमकी प्राप्त झालेली असणे,मुंबईत सुद्धा धमक्यांच्या कॉलचे सत्र सुरूच असून मुंबई पोलीस दलातील सहआयुक्तांसह गुगल इंडिया प्रा.लि.कंपनीच्या नंबरवर धमक्यांचे दोन कॉल आलेले असणे, या प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची तसेच लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |
| (२८३) | ''नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील पोलिसांनी आदिवासी कातकरी समाजातील अल्पवयीन मुलामुलींची विक्री करून मेंढीपालनाच्या वेठबिगारी प्रकरणात दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपास करून व त्यातील दोषींना अटक करणेबाबत सहा महिने होऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचा गंभीर प्रकार दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, सदर वेठबिगार प्रकरणात राष्ट्रीय अनुसुचित जनजाती आयोगाने नाशिक व अहमदनगरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक या चारजणांना समन्स बजावूनही हे गैरहजर राहणे, इगतपुरी तालुक्यातील उभाडे गावात आदिवासी कातकरी समाजातील कुटुंबाला पैसे व मेंढीपालनाचे आमिष दाखवून त्यांच्या मुलाची विक्री झाल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस येणे, त्यापैकी एका मुलीचा खून झाल्यानंतर सदरहू प्रकरण अधिकच प्रकाश झोतात येणे, सदरहू प्रकरणी काही पिडीत मुला-मुलींनी दिलेल्या जबाबानुसार संगमनेर पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात येणे, त्यातील एक गुन्हा पारनेर पोलिसात वर्ग करण्यात येणे, त्या अन्वये नाशिक व अहमदनगर पोलिसांनी सदर प्रकरणाचा तपास करून संशयीतांना अटक करून तपास सुरू ठेवणे, सदर प्रकरणी राष्ट्रीय अनुसुचित जनजाती आयोगाने नाशिक व अहमदनगरचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना समन्स बजावूनही उपस्थित न राहिल्याने आयोगाने अटक वॉरंट जारी करण्यात येऊनही त्याची दखल न घेता त्यांनी गैरहजर | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | राहून दुर्लक्ष केल्याचा घडलेला प्रकार, यामुळे आदिवासी मुलामुलींची विक्री करून वेठबिगार प्रकरणाचा तपास करुन अद्याप यातील दोषी व्यक्तींना अटक करून अहवाल सादर करणेबाबत नाशिक व अहमदनगर पोलिसांना आलेले अपयश, यामुळे पिडीत आदिवासी जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| (२८४) | "ठाणे भिवंडी शहरालगतच्या कारोवली ग्रामपंचायत हद्दीतील सुभाष नगर नालायार येथील मनीन शेख चाळीत ईदगार रोड कारीवली इमारतीत अनाधिकृतपणे एक टेलिफोने एक्सचेंज चालविले जात असल्याची बाब दि. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस येणे. तबरेज मोमीन नावाचा व्यवसायाने एजंट असलेल्या या इसमाने कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे आंतरराष्ट्रीय कॉल करण्यासाठी त्याचा बिनधास्त वापर करत असल्याचे उघड होणे. तथापि आंतरराष्ट्रीय कॉल हे टेलिफोन नेटवर्कमधून पाठविण्यासाठी दूरसंचार तसेच माहिती तंत्रज्ञान मंत्रालय विभागाची परवानगी घेणे आवश्यक असणे. मात्र तशी कोणतीही परवानगी नसताना सदरचा इसाम त्याच्या जवळील यंत्रणेद्वारे आंतरराष्ट्रीय कॉल भारतातील इच्छित मोबाईलवरून अनाधिकृत रित्या फिरवीत असल्याचे उघड होणे . या प्रकारामुळे भारत सरकारचे आर्थिक नुकसान झाले असून अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय कॉलचे माध्यमातून दहशतवादी कारवाया पसरविण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी वापरली जाण्याची भीती व्यक्त होणे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून ठाणे दहशतवादी पथकाने करून या घटनेकडे विविध बाजूने तपास होण्याची मागणी होणे व यात अन्य एखादी टोळी कार्यरत असावी असाही संशय नागरिकांमधून व्यक्त होणे. याही बाजूने ठाणे दहशतवादी पथकाने या प्रकरणी लक्ष घालून सखोल चौकशीची मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतीक्रिया." | श्री. संजय केळकर वि. स. स. | कित्ता |
| (२८५) | "ठाणे महापालिका प्रशासनातील श्री. महेश अहेर मूळ लिपिक म्हणून कार्यरत असताना सेवा सेवा ज्येष्ठतेचे व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०५.१०.२०१५ मधील तरतुदीचे उल्लघन करून सहाय्यक आयुक्त पदी नेमणूक होणे. तथापी श्री. अहेर हे आपल्या पदाचा वापर करून कुख्यात गँगस्टारशी त्याचे संबंध असणे. त्यातूनच कळवा, मुंब्रा विधास्बेचे लोकप्रतिनिधीचे कुटूंबियांना जीवानिशी मारण्याची बाहेर राज्यातील गुंडाना सुपारी दिल्याची त्याच्या आवाजातील ऑडीओ क्लीप दि. १३.०२.२०२३ व त्या दरम्यान | श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | वर्तमानपत्रात उघडकीस येणे. परिणामी ठाणे शहरात खळबळ माजणे. तथापि आस्थापनेवरील लिपिक पदी असूनही शासन निर्णय ०५.०९.२०१८ मधील तरतुदीचे उल्लघन करून इतरांची सेवा ज्येष्ठता डावलून प्रत्येक वर्षी नियम बाह्य रित्या सहाय्यक आयुक्त पदी नेमणूक केली जाणे. तसेच शहर विकास अधिकारी म्हणून एकाच ठिकाणी अनेक वर्ष कार्यरत असणे. बदली होऊनही पुन्हा पुन्हा त्याच जागेवर नियुक्ती करणे. तथापि श्री. अहेर हे वादग्रस्त अधिकारी असून आपल्या पदाचा गैरवापर करून येथील नागरिकाचा आर्थिक व मानसिक चळ करीत असल्याचा आरोप होणे. सदर प्रकरणी लोकप्रतिनीधी २०.०७.२०२१ पासून २०२३ प्रर्यत अनेक लेखी तक्रार करूनही कारवाई न होणे . तसेच अधिकृत बांधकामे व झोपडपट्टी धारकाच्या मूळ मालकांना बेदखल करणे व त्याच्या नावावरील घरे तोतया लाभार्थी उभे करून त्याच्या नावे घरे देणे. सदर प्रकरणामध्ये प्रंचड आर्थिक गैर व्यवहार होत असल्याचे उघड होणे . परंतु श्री. अहेर यांचे गँगस्टारशी संबंध असल्याने त्यांच्या कारवाई करण्यास वरिष्ठ अधिकाऱ्यावर मर्यादा येणे. परिणामी अहेर सारखे अधिकारी नियमबाह्य व बेकायदेशीर काम करीत असल्याचे नागरिकाकडून आरोप होणे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर कारवाई ची मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया ." | | |
| (२८६) | "ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाणे १९७८ मध्ये उभारण्यात आलेले असून, या पोलीस ठाण्याची हद्द ६८ चौरस कि.मी. इतकी आहे, मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत डोंबिवली फेज १ व २ असे या औद्योगिक क्षेत्र, २७ गाव, लोढा पलावा, रुणवाल मायसिटी, रुणवाल गार्डन, अनंतम सारख्या मेगा सिटीसह अन्य असंख्य मोठे गृह प्रकल्प उभारण्यात आल्याने तसेच होत असलेले नागरीकरण, रासायनिक आणि इतर विविध कंपन्या, बार-रेस्टॉरंटचे पसरलेले जाळे, तसेच कामानिमित्त परराज्यातून येणारे मोठ्या प्रमाणातील लोक आदीमुळे २०१८ मध्ये सात ते आठ लाखाच्या दरम्यान असलेली लोकसंख्या सद्यस्थितीत ११ लाखाहून अधिक झालेली असून मानपाडा पोलीस स्टेशनचे पोलीस बळ मात्र आजही १५३ इतकेच असल्याने, एकीकडे अपुऱ्या पोलीस कर्मचारी वर्गामुळे अस्तित्व असलेल्या पोलिसांवर नाहक मोठ्या प्रमाणावर पडत असलेला अधिकचा कामाचा ताण, तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस गंभीर झालेली व होत असलेली समस्या, वरिष्ठासह एकूण ३ पोलीस | श्री. प्रमोद पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) | (४) |
| | निरीक्षक, ६ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १२ पोलीस उप निरीक्षक, २ महिला उप निरीक्षक आणि १३० पोलीस कर्मचारी असे एकूण १५३ संख्याबळ या पोलीस ठाण्यात कार्यरत असल्याने वाढणाऱ्या चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, दुकानाची लुट, अल्पवयीन मुली व महिलांवर होत असलेले अत्याचारचे प्रकार वाढीस असल्याची परिस्थिती, २०१६ च्या आधीपासून मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन व्हावे आणि दावडी व काटई अशी आणखी दोन नवीन पोलीस ठाणी उभारण्यात यावीत म्हणून कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे स्थानिक लोकप्रतिनिधी सह अन्य लोकप्रतिनिधींनी, विविध सामाजिक संघटनांनी आजमितीस सातत्याने करण्यात आलेली, त्यानुषंगाने मा.पालकमंत्री, मा.गृहमंत्री तसेच सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांसमवेत अनेक बैठकीही संपन्न होऊन त्यामध्ये विचार विनिमय होऊन सकारात्मक निर्णय घेण्यात आलेत. मात्र त्याची आजमितीस पूर्तताच न झाल्याने मानपाडा पोलीस स्टेशनच्या विभाजनाचा आजमितीस केवळ कागदवर राहिल्याने, कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे संघाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा मा.गृहमंत्री यांच्याकडे दिनांक १६ जून, २०२१ रोजी सविस्तर लेखी पत्र पाठवून मानपाडा पोलीस स्टेशनचे लवकरात लवकर विभाजन करून दावडी व काटई अशी आणखीन दोन नवीन पोलीस ठाणी उभारण्याची मागणीही केलेली आहे, तरी त्याकडे शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे सन २०२१ च्या तृतीय अधिवेशनात कपात सूचना (क.पा.सू.२९६६) सभागृहात उपस्थित करून शासनाकडे पुन्हा पाठपुरवठा केलेला असतानाही शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष व टाळाटाळ, परिणामतः मानपाडा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात दिवसेंदिवस वाढीस लागलेले गुंडगिरी, समाज कंटकाकडून अल्पवयीन मुली व महिलांच्या सुरक्षिततेची व सर्वसामान्य नागरिकांच्या मालमतेच्या सुरक्षिततेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती तसेच सप्टेंबर २०२१ मध्ये ३३ नराधमांनी आळीपाळीने एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आल्याचे प्रकारामुळे सांस्कृतिक डोंबिवलीचे प्रकरण संपूर्ण देशभर चांगलेच गाजल्याची स्थिती, सबब डोंबिवली मानपाडा पोलीस स्टेशनचे विनाविलंब विभाजन करून दावडी व काटई अशी आणखीन दोन नवीन पोलीस ठाणी निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२८७) | "ठाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येणाऱ्या दिवा शहर व परिसरातील गावांची संख्या ५ लाखाहून अधिक असून दिवसेंदिवस शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत आहे, तसेच हा संपूर्ण परिसर मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीत असून मुंब्रा पोलीस मध्ये आधीच पोलीस कर्मचारी वर्गाची संख्या अपुरी असल्यामुळे एकीकडे अस्तित्वात असलेल्या पोलिसांवर प्रचंड प्रमाणावर कामाचा ताण, तर दुसरीकडे कायदा व सुव्यवस्थाचे गंभीर समस्या उद्भवत असल्याने ब करण्यात यावी म्हणून येथील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा. गृहमंत्री, मा. पालकमंत्री, ठाणे जिल्हा, मा.मुख्यमंत्री आदीकडे सातत्याने केलेले मागणी, या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर यांनी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाण्याचे विभाजन करून दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलानंतर सदरहू प्रस्ताव रितसर योग्य त्या शिफारशीन्वये राज्य शासनास पाठविल्यानंतर, सदरहू प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता मिळण्यास होत असलेली अक्षम्य दिरंगाई व टाळाटाळ, परिणामतः दिवा शहर व परिसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढीस लागलेले विविध प्रकारची गुन्हे, महिला व तरुणींच्या सुरक्षितेची निर्माण झालेली गंभीर समस्या, यामुळे शासनाने सदरहू प्रस्तावास विनाविलंब मान्यता देऊन दिवा शहरासाठी नवीन स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. प्रमोद पाटील वि. स. स. | कित्ता |
| (२८८) | "पुणे महामार्गावरील खेड, राजगुरू नगर जवळच्या शिरोली परिसरात दि.१३.२.२०२३ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातात अज्ञात वाहनाने रस्ता ओलांडणाऱ्या महिलांच्या ग्रुपला धक्का दिल्याने सदर अपघातात ५ महिलांचा मृत्यू झाला असून १७ महिला गंभीररित्या जखमी झाल्याचे उघडकीस येणे, जखमी महिलांना रुग्णालयात दाखल करून पोलिसांनी अज्ञात वाहनधारकाच्या विरोधात गुन्हा दाखल करणे, अद्यापपर्यंत वाहनचालकाचा शोध न लागणे, गंभीररित्या जखमी झालेल्या महिलांना तसेच मृत झालेल्या महिलांच्या कुटुंबियांना शासनाकडून तातडीने मदत देण्याची होत असलेली मागणी, शासनाने याची दखल घेऊन त्यांना मदत देण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. संजय केळकर, श्री. बंटी भांगडिया, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (२८९) | "राज्यातील विविध गावांमध्ये ३५००० हून अधिक पोलीस पाटील कर्मचारी सामान्य नागरिक व पोलीस प्रशासन यामधील दुवा बनून कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करीत असणे, अनेक ठिकाणी | श्री. मंगेश चव्हाण वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | पोलीस पाटील यांनी आपल्या कर्तव्यदक्षतेमुळे अनेक गुन्हे व दंगली होण्यापासून वाचवल्याची झालेली उदाहरणे, पोलीस पाटलांच्या पुढाकारामुळे आज महाराष्ट्रात शेकडो गावे तंटामुक्त झालेली असणे, नवीन भरती होणाऱ्या पोलीस पाटील पदांसाठी महिलांची देखील निवड होत असल्यामुळे घरगुती कौटुंबिक वाद मिटविण्यासाठी त्यांचा मोठा वाटा असणे, कुठलाही वाढीव मोबदला न घेता कोविड काळात ग्रामपातळीवर पोलीस पाटील यांनी आपला पूर्णवेळ देत बजावलेले कर्तव्य यामुळे कोविड विरोधातील लढ्याला बळ मिळणे, कोविड काळातील पोलीस पाटील यांच्या कामगिरीचा अहवाल प्रशासनाकडून मागविल्यास या घटकाचे काम आपल्या लक्षात येईल की, कोविड मुळे अनेक पोलीस पाटील बांधवाना दुर्दैवाने आपला जीव देखील गमवावा लागल्याचे निदर्शनास येणे, सन २०१८ मध्ये शासनाने पोलीस पाटलांच्या मानधनात ३००० वरून ६५०० इतकी वाढ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेणे, तसेच मानधनात अजून वाढ करून इतर मागण्या देखील पूर्ण करण्याचे आश्वासनही देण्यात आलेली असणे, मात्र मध्यंतरीच्या काळात सरकारने पोलीस पाटील घटकाच्या सर्व प्रश्नांकडे साफ दुर्लक्ष केलेले असणे, यासंदर्भात गेल्या अनेक वर्षापासून अनेक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाला निवेदने देऊन, त्याचा पाठपुरावा करून, तसेच विधिमंडळ सभागृह त्यांचे प्रश्न उपस्थित करूनही आजतागायत राज्यातील पोलीस पाटील यांच्या समस्या शासनातर्फे सोडविण्यात आलेल्या नसणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील पोलीस पाटलांच्या मनात शासनाविरुद्ध होत असलेली नाराजी, याबाबत शासनाने पोलीस पाटील घटकांच्या समस्या सोडविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.” | | |
| (२९०) | “महाराष्ट्रातील मानखुर्द शिवाजीनगर तसेच भिवंडी शहरातील तरूण वर्ग अंमली पदार्थाच्या आहारी जाणे. भिवंडी शहारात गोरगरिब नागरिक मोठ्या प्रमाणावर राहत असणे. भिवंडी शहर पावरलूम शहर असल्यामुळे इतर स्थलांतरित व अस्थलांतरित असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर कामगार वर्ग वास्तव्यास असणे. तसेच राहणीमानाचा दर्जा खालावालेला असल्यामुळे तरूणवर्ग (विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय शिक्षण न घेणारे विद्यार्थी) मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थाच्या आहारी गेलेला असणे. येथील तरूणवर्ग हिरॉईन, कोकेन, आदी. या अंमली पदार्थाचे सेवन करत नसून डॉक्टरांच्या विनापरवानगी मेडिकल स्टोअर्स मधून सहज उपलब्ध होणारी औषधे. उदा. कफ सिरप, आयोडॅक्स, यांच्या आहारी जाणे. तसेच इतर | श्री. अबू आजमी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अंमली पदार्थ (बोली भाषेनुसार) पेपर बटन, चरस, गांजा, एम.डी, व्हायटनर या पदार्थाच्या आहारी गेला असणे. या सर्व गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन तसेच गृह विभागाचे अधिकार असून देखील दोन्ही विभागाचे संग्नमत नसणे. सबब अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची संयुक्त कार्यदलाची निर्मिती करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२९१) | "भिवंडीमध्ये मागील काही आठवड्यांमध्ये तीन वर्षीय दोन अल्पवयीन मुलींच्या लागोपाठ हत्या होणे, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच ऐरणीवर येणे, त्यामुळे भिवंडी शहर हे पूर्णपणे हादरलेले असणे, तसेच सदर प्रकरणातील आरोपींचा अद्याप शोध लागलेला नसणे. गेल्या काही दिवसांमध्ये ठाणे पोलीस आयुक्तालयांच्या हद्दीत अजाण बालकांबाबत घडलेल्या हत्या, लैंगिक अत्याचार आणि अपहरणाच्या घडलेल्या गंभीर घटनांमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असणे, काही वर्षापूर्वी भिवंडीमध्ये आठ वर्षाच्या बालकाचे अपहरण करून त्याच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडलेली असणे, अशा प्रकारच्या घटना वारंवार घडणे, सदर प्रकारच्या घटनांवर पायबंद आणणेकामी लोकप्रतिनिधी या नात्याने संबंधित विभागास वारंवार सूचना केलेली असणे, त्याअनुषंगाने प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक असणे, तसेच पालकांमध्येही जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे , भिवंडी शहरात वाढत्या गुन्हेगारीचे बदलते स्वरूप पाहता धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असणे, य़ाबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना." | श्री. रईस शेख वि. स. स. | कित्ता |
| (२९२) | "रत्नागिरी जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीबरोबरच अंमली पदार्थांचा विळखा घट्ट होत चाललेला असणे, रत्नागिरी शहर व परिसर त्याचे मुख्य केंद्र असल्याचे समोर येणे, या ठिकाणाहून गांजा, चरस, टर्की पावडर, मेथ्यॅक्युलॉन (एमडी) सारख्या अंमली पदार्थांची छुपी वाहतूक व तस्करी सुरू असणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी रत्नागिरी शहरातील शांतीनगर भागात एका तरूणीसह चैघेजण अंमली पदार्थांची विक्री करताना आढळून येणे, त्यांच्याकडे सुमारे २ लाख रू. किंमतीचे अंमली पदार्थ आढळून येणे, माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये रत्नागिरी शहरातील मिरकरवाडा येथे गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका तरूणावर पोलिसांनी कारवाई केलेली असणे, त्याच्याकडे सुमारे १८ हजार रू. किंमतीचा गांजा आढळून येणे, त्याआधी मार्च २०२२ मध्ये शहरातील एका लॉजवर टाकलेल्या छाप्यात मेथ्यॅक्युलॉन (एमडी) हा | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | विक्रीसाठी आणलेला अंमली पदार्थ आढळून येणे, त्याची किंमत सुमारे ५ लाख रू. इतकी असणे, याप्रकरणी केरळमधील दोघांना झालेली अटक, कारवाई झाल्याने या घटना समोर येणे, परंतु, मोठ्या प्रमाणात छुप्या पद्धतीने अंमली पदार्थांची तस्करी होत असणे, अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांचा आंतरराष्ट्रीय टोळ्यांशी संबंध असल्याचे स्पष्ट होवूनही मुख्य सूत्रधारांवर कारवाई करण्यास पोलिसांना आलेले अपयश, अंमली पदार्थांबरोबरच गोवा बनावटीच्या लाखो रूपयांच्या दारूची राजरोसपणे बेकायदा वाहतूक सुरू असल्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, दिनांक २५ जानेवारी, २०२३ वा त्या सुमारास मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर (जि. रायगड) नजीक ४ लाख १८ हजार रू. किंमतीची गोवा बनावटीची विदेशी दारू एका कारमध्ये आढळून येणे, अशाचप्रकारे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ वा त्यासुमारास सुमारे २४ लाख रू. किंमतीची गोवा बनावटीची दारू घेवून नाशिकच्या दिशेने निघालेला मोठा कंटेनर महामार्गावर कळंबस्ते, ता. चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे आढळून येणे, याचदरम्यान कळंबस्ते गावातील एका घरामध्ये लाखो रूपयांच्या दारूचा साठा आढळून येणे, दररोज मोठ्या प्रमाणात राजरोजपणे बेकायदा गोवा बनावटीच्या दारूची वाहतूक होत असताना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर जागोजागी तपासणीसाठी उभ्या असलेल्या महामार्ग पोलिसांच्या नजरेतून दारू भरून चाललेली कंटेनरसारखी वाहनांना महामार्ग विभागाचे पोलीस जाणीपूर्वक दुर्लक्ष करणे, बेकायदा वाहतूक करणारे आणि महामार्ग पोलीस यांचे असलेले संगनमत, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली संतापाची व चिडीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (२९३) | “सोयाबीन व कापसाला दरवाढ मिळावी यासह अनेक सार्वजनिक हिताच्या मागण्यांसाठी श्री. रविकांत तुपकर यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२३ रोजी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा दिलेला असणे, अतिवृष्टीची नुकसान भरपाई, पीकविमा रक्कम शेतकऱ्यांना मिळणेबाबत त्यांनी संघटनेमार्फत शांततेत आंदोलन केलेले असणे, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२३ रोजी त्यांचे आत्मदहनाच्या प्रयत्नाचे वेळी अंगावर डिझेल पडलेले असणे, काही प्रमाणात ते प्यायले गेले असणे, अशा परिस्थितीतही त्यांना स्थानबध्द करून दवाखान्यात घेऊन न जाता, उलट त्यांचेसोबत आलेल्या शेतकऱ्यांवर बेछूटपणे लाठी हल्ला केलेला असणे, त्यामध्ये जेष्ठ नागरीक, महिला, लहान मुले जखमी होणे, वार्ताकन करणाऱ्या | डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. अजित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | पत्रकार बांधवांना पण धक्काबुक्की करीत मारहाण झालेली असणे, एकंदरीत लाठी हल्ला हा पूर्व नियोजित कट असणे, अनेक विद्यमान व माजी विधानसभा सदस्यांना तसेच मंत्री यांनाही श्री.तुपकर यांना भेटू न देणे, लोकशाहीची पूर्णपणे पायमल्ली करणे, त्यांचेवर अनेक गंभीर गुन्हे मुद्दामहून दाखल करणे, सनदशीर मार्गाने होणारी आंदोलने दडपण्याचा प्रयत्न करणे, यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरुन अशी कृत्ये करणे, या संदर्भात चौकशी करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, परिणामी तेथील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण व त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, पोलीस निरीक्षक, प्रल्हाद काटकर व सहाय्यक पोलिस निरीक्षक, जयसिंग पाटील हे दारु पिवून लाठी चार्ज करण्यात आघाडीवर असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (२९४) | "नागपूर ग्रामीण पोलीस अंतर्गत कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत शिवाजी नगर येथील निर्दोष आदिवासी युवक राहुल सलामे याला या पोलीस ठाण्यातील सतीश मेश्राम, राऊत या पोलीस अधिकारी व इतर कर्मचारी यांनी ३/२/२०२३ रोजी त्याने न केलेल्या एका गुन्ह्याची विचारपूस करण्यासाठी अटक करणे, या युवकाला पोलिस ठाण्यात मानसिक व शारिरीक छळ करून मारहाण करणे, त्यात त्याचा दि.१७/२/२०२३ रोजी मेयो या शासकीय रुग्णालयात दुर्दैवी मृत्यू होणे, हा मृत्यू संशयास्पद असल्याचे आढळून येणे, या मृत युवकाला अटक केल्यानंतर मा.न्यायालयात हजर न करणे, त्याची विचारपूस करण्यासाठी पोलिस ठाण्यात आलेल्या त्याच्या पत्नीला बेदम मारहाण करणे, त्याला रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याची कोणतीही माहिती त्याच्या नातेवाईकांना देण्यात न येणे, इ. गंभीर बाबी निदर्शनास येणे, त्यामुळे या आदिवासी युवकाच्या संशयास्पद मृत्यूची सखोल चौकशी व्हावी व संबंधित पोलीस अधिकारी व इतर कर्मचारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हाव व अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये कार्यवाही व्हावी, अशी येथील नागरीक व त्याचे नातेवाईक मागणी करीत असणे व आंदोलने होत असणे, परंतु शासन, प्रशासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनस्तरावरुन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (२९५) | बुलढणा शहर तसेच शहरालगत (जि. बुलढाणा) ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात कॅफे असणे, सदर कॅफेच्या नावाखाली मुला मुलींचे गैरप्रकार वाढले असून मुलींना मोह पाशात ओढण्यासाठी कॅफेचा वापर होत असल्याचे निदर्शनास येणे, कॅफे मालकच त्यांना अशा प्रकारची सुविधा पुरवित असल्याचे निदर्शनास येत असणे, अशा कॅफे मध्ये मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या धर्मीय जोडपी येत असल्याने वेळीच दखल न घेतल्यास धर्मा-धर्मात वाद होण्याची शक्यता निर्माण होणे, याबाबत सकल मराठा समाज, बुलाढाणा मार्फत दिनांक १ मार्च, २०२३ रोजी जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन देण्यासाठी गेले असता अधिक्षकांकडून निवेदनकर्त्यांना अतिशय अपमानास्पद वागणूक मिळणे, विशेष म्हणजे पत्रकारांसमोरच हा प्रकार घडणे, यावेळी एसपी (श्री. सारंग आव्हाड) यांच्याकडून पत्रकार येथे कशासाठी ? तुम्हाला शो करायचा का ? शक्तीप्रदर्शन करायचे आहे काय ? अशा प्रकारचे प्रश्न विचारले जाणे, यासंदर्भात निवेदन देण्यासाठी शिष्टमंडळ गेले असता एसपी सारंग आवाड यांनी नागरिकांच्या, निवेदनकर्त्यांच्या भावना समजून घेण्याऐवजी त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याने निवेदनकर्ते व स्थानिक नागरिकांत पसरलेली संतापाची भावना, बुलढणा शहरात कॅफेच्या माध्यमातून सुरु असलेले गैरप्रकार रोखून अशा कॅफे मालकांवर तातडीने कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | डॉ. राजेंद्र शिंगणे वि. स. स. | कित्ता. |
| (२९६) | "राज्यातील सुमारे अडीच ते तीन हजार महिलांची ओमान व दुबई या देशात मानवी तस्करी झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, राज्यातील महिलांना परदेशात काम देतो सांगुन त्यांना परदेशात गेल्यावर या महिलांकडून त्यांची कागदपत्रे, फोन काढून घेतले जातात आणि त्याचा छळ करीत डांबून ठेवले जात असणे, याप्रकरणी राज्य महिला आयोग आपल्या दरबारी या उपक्रमातून श्रीमती चाकणकर यांनी अहमदनगर मध्ये जाऊन महिल्यांच्या तक्रारी घेऊन जनसुनावणीही घेणे, तसेच प्रकरणी परराष्ट्र मंत्रालयाशी महिला आयोगाने पत्रव्यवहारही केलेला असणे, परराष्ट्र मंत्रालयाने या महिलांची येत्या ५ ते ६ महिन्यात सुटका करण्यात येईल असे आश्वासनही देणे, या व अशा वाढत्या घटना लक्षात घेता राज्यातील परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या महिलांमध्ये निर्माण झालेली भितीचे वातावरण, दोषींवर त्वरीत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. जितेश अंतापूरकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. बळवंत वानखडे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (२९७) | “पालघर जिल्हयातील तलासरी तालुक्यात एका ४५ वर्षीय रमेश दुबळा या इसमाचे आपल्या शेजारच्या कुटुंबासोबत बोटीवरून घेतलेल्या पैशावरून आर्थिक आणि घरगुती वाद असणे, या शेजारच्या १० वर्षीय विद्यार्थीनीला तुला शाळेत सोडतो या बहाण्याने तिला आपल्या मोटर सायकल वर बसून तिच्या घरापासून सुमारे दहा पंधरा किलोमीटर व गुजरात पासून जवळ असलेल्या भिलाड-सांजण जंगलात घेऊन जाणे, त्या जंगलात गेल्यावर या नराधाम इसमाने त्या दहा वर्षीय मुलीवर बलात्कार करून तिचा गळा दाबून खून केल्याची घटना दिनांक एक मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, संबंधित मुलगी रात्री उशिरापर्यंत घरी न आल्यामुळे त्या कुटुंबातील घरच्यांच्या मध्ये भीती निर्माण होणे त्यामुळे या घरच्यांनी तलासरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणे, पोलिसांनी १२ तासाच्या आत संबंधित आरोपीच्या मुस्क्या आवळणे, या घटनेबाबत समाजात निर्माण झालेली चिड, भीतीची व संतोषची भावना, आशा घटना भविष्यात कुठे घडू नये याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया” | श्री. लहू कानडे वि. स. स. | कित्ता. |
| (२९८) | “बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघात मागील वर्षभरात सुमारे ५० तरुणांनी आत्महत्येच्या माध्यमातून मृत्यूला कवटाळलेले असणे, प्रत्येक महिन्याला सरासरी ४ ते ५ युवकांनी आत्महत्या करणे ही बाब केवळ मृत युवकांच्या आई-वडिलांनाच चटका लावणारी असून समाजातील विचारवंत व व्यवस्थेची निगराणी करणाऱ्या प्रशासनासाठी अत्यंत भयावह व गांभीर्याने विचार करावयास भाग पाडणारी बाब असणे, जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२३ दरम्यान मलकापूर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत २४ ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत २१, दसरखेड एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत ५ अशा एकूण ५० आत्महत्येच्या घटना घडलेल्या असणे, यापैकी २१ आत्महत्यांची प्रकरणे ही ३२ वयोगटाच्या आतील असणे, हा सुशिक्षित बेरोजगार युवक वर्ग खाजगी सावकारी, फायनान्स कंपन्यांच्या सापळ्यात ओढल्या जात असणे, तथापि पाच-दहा टक्के नव्हे तर २० टक्क्यापर्यंत व्याज आकारणी करून धाकदपटशाही, समाजात, कामाच्या ठिकाणी, मित्रमंडळी समोर, घरापर्यंत येऊन कुटुंबियांसमोर अपमानजनक पद्धतीने कर्जवसुलीचा तगादा, शिविगाळ प्रसंगी मारहाण करणे या कार्यपद्धतीमुळे कर्जदार युवक प्रचंड नैराश्याने ग्रस्त होत असणे, परिणामी आत्महत्येस प्रवृत्त होणे, सोशल मीडिया व इंटरनेटच्या आहारी गेलेला बहुसंख्य युवा वर्ग कष्टाविना शॉर्टकट झटपट श्रीमंत होण्यासाठी ऑनलाईन सट्टा, जुगार, | श्री. राजेश एकडे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | गेमिंग तसेच अश्लील उद्योगाशी निगडित व्यावसायिक तरुणींच्या हनी ट्रॅप मध्ये ओढल्या जात असणे, परिणामी पैशांची मागणी व न दिल्यास सामाजिक बदनामीची धमकी, ब्लॅकमेलिंग अशा सापळ्यात हा युवावर्ग अडकला असणे, या सापळ्यातून बाहेर पडू न शकल्याने देखील हा युवा वर्ग आत्महत्येचा मार्ग धरत असणे, माझ्या मतदारसंघात गेल्या वर्षभरात झालेल्या युवकांच्या आत्महत्या प्रकरणी मी स्थानिक पोलीस निरीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून देखील सखोल तपास व उपाययोजना न झाल्याने तसेच सायबर क्राईमचे अपयश यामुळे यासंबंधी नागपूर हिवाळी अधिवेशनात दि.२८ डिसेंबर, २०२२ रोजी मी नियम २९३ च्या प्रस्तावावर चर्चा करत असताना पोटतिडकीने या विषयाचे गांभीर्य मांडून सुद्धा आजतागायत विधिमंडळाने देखील या विषयाची दखल घेतलेली नसणे, त्यामुळे पालकांमध्ये व समाजामध्ये पोलीस प्रशासना विषयी तीव्र रोष असणे, परिणामी या लक्षवेधीच्या माध्यमातून मी माझे मतदारसंघात गेल्या वर्षभरात सुमारे ५० हून अधिक युवकांनी केलेल्या आत्महत्या प्रकरणाची एक विशेष पथक ज्यामध्ये क्राइम ब्रांच, सीआयडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असेल, असे पथक नेमून विहित कालावधीमध्ये या सर्व आत्महत्या प्रकरणामागच्या कारणांची तातडीने उकल करण्याची आवश्यकता, या गंभीर विषयाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष आणि शासनाने करावयाच्या उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (२९९) | "रायगड जिल्ह्यातील पनवेल रेल्वेस्थानकात प्लॅटफॉर्मवर झोपलेल्या तीन वर्षीय मुलीचे अपहरण करुन तिच्यावर अत्याचार केल्याची घटना, तलासरी तालुक्यात १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन गळा दाबून तिची हत्या झाल्याची क्रुर घटना, डोंबिवली येथे इस्त्रीवाला कपडे इस्त्री करण्यासाठी आलेल्या महिला, तरुणींकडून इस्त्रीवाल्याने मोबाईल क्रमांक घेऊन त्यांना व्हॉट्सअॅपवर अश्लील मेसेज पाठविण्याची घटना, तसेच दुरान्तो नागपूर-मुंबई ट्रेनमध्ये एका महिलेची टी.सी.ने विनयभंग केल्याची घटना याबाबत सी.एस.एम.टी लोहमार्ग येथे गुन्हा दाखल केला असणे, अशा अनेक घटना वारंवार राज्यात घडत असणे, राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलिस व्यवस्था, त्यामुळे महिलांवरील अत्याचारांचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे | कुमारी आदिती तटकरे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे महिलांमध्ये सरकारबद्दल अविश्वास व महिलांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत महिला सुरक्षा धोरणाची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३००) | "न्यायालयाच्या आदेशानुसार/ जामिनीवर सुटलेल्या आरोपीस शिवडी (मुंबई) पोलीस स्टेशनला पकडून आणून पोलीस निरीक्षक सचिन माने व इतर पोलिसांनी बेदम मारहाण करून आरोपीस त्याचे मूत्र पाजण्याची घटना जानेवारी, २०२३ मध्ये घडणे, एप्रिल २०२२ मध्ये MH०४-KF८७९७ या ट्रॅक्टर मधून चोरलेले डिझेल टेम्पो क्र. MH०४-GR-७०८१ मध्ये सापडल्यावरून शिवडी पोलीस स्टेशनचे निरीक्षक सचिन माने यांनी कोणताही गुन्हा न नोंदविता आरोपींना सोडून देणे, शिवडी पोलीस स्टेशन हद्दीत गुटखा, एमडीएच, अवैध रसायने इ. अमली पदार्थाची खुले आम विक्री होत असणे, जुगार मटका इत्यादी चालू असणे, शिवडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रेती बंदर, लकडा बंदर या ठिकाणी करोडो रुपयांच्या रेतीची अनधिकृतरित्या उत्खनन, साठवणूक, वाहतूक होत असूनही त्याकडे पोलिसांनी जाणून-मधून दुर्लक्ष करणे, शिवडी पोलीस स्टेशनच्या जवळ समुद्रकिनारी अनेक मोठी सप्लाय व्हेसल, बार्ज, बेवारस स्थितीत ठेवण्यात येत येऊन त्याद्वारे समुद्र मार्गे येणारे चोरीचे डिझेल, गुटखा, अमली पदार्थ भंगार इत्यादी किनाऱ्यावर आणणे व सुरक्षा सुरक्षकांकडून त्याची विक्री होत असणे, दुरुस्तीसाठी आणलेल्या जुन्या जहाजांवरील कित्येक टन लोखंडांना गंज व तेल समुद्रात प्रदूषण वाढविणे, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री या प्रकाराची माहिती देऊनही शिवडी पोलिसांनी कोणतीही कारवाई न करणे, सद्य सदर पोलीस स्टेशनच्या हद्दीत अनेक अनधिकृत गॅरेजेस पार्किंग, गोडाऊन मध्ये मोठमोठ्या कंटेनरमधून आणलेला गुटखा, अमली पदार्थ साठवून ठेवणे, शिवडी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये समुद्र मार्गाने अतिरेकी मुंबईत येण्याचा धोका निर्माण होणे, पोलीस निरीक्षक सचिन माने व त्यांच्या अंतर्गत काम करणारे दहा-बारा पोलीस कर्मचारी यांना हप्ता देण्यासाठी गैरकाम करणारे गुन्हेगार वारंवार पोलीस स्टेशनला येत असणे, शिवडी परिसरातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती धोक्यात आलेली असणे पोलीस निरीक्षक व इतर पोलीस यांचे विरुद्ध त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता झाल्याने केलेली व करावयाची कारवाई, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती गीता जैन वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३०१) | "राज्यात परभणी जिल्ह्यातील तत्कालिन पोलीस अधिक्षक यांनी पोलीस कल्याण निधीमध्ये मोठा गैरव्यवहार केल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना माहे डिसेंबर, २०२२ मध्ये स्वयंस्पष्ट निवेदन देणे, शासकीय कार्यालयाकरिता साहित्य खरेदी करत असताना जी.ई.एम. पार्टलमधून खरेदी करणे अपेक्षित असणे, परंतु तत्कालिन पोलीस अधिक्षकांनी असे न करता टि.व्ही. आणि संगणक खरेदी करता वेलफेअर फंडाचा वापर करून चुकीचा पायंडा पाडलेला असणे, सदर खरेदीचे देयके अथवा नोंद कोणत्याही रेकॉर्डवर घेण्यात आलेली नसणे, व त्यासाठी शासकीय प्रक्रीयेचा अवलंब केलेला नसणे, त्यामुळे शासकीय खरेदी करताना नोटसीट बनवावी लागते, परंतु तसेही करता आलेले नसणे, त्यामुळे खरेदी करण्यात आलेले टि.व्ही. त्यांच्या निवास स्थानी ठेवण्यात येणे, पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या महत्वाच्या (उदा. अपघात, आजारपण, अपघाती मृत्यू) कार्यासाठी वापरला जाणारा पोलीस कल्याण निधीचा वापर स्वतःसाठीच केलेला असणे, या कामासाठी वेलफेअर फंडासाठी लाखो रुपयांची एफडी मोडली, याचे सुध्या रेकॉर्ड उपलब्ध नसणे, तसेच पोलीस वेलफेअर फंडातून कोट्यावधी रुपयाचा निधी स्वतःसाठी व स्वतःच्या निवासस्थानी खर्च केलेला असणे, त्याचबरोबर कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी बनविण्यात आलेल्या नविन मंगल कार्यालयासाठी माती, रेती, सिमेंट, विटा खरेदी केले असे दाखवले असणे व त्याची लाखो रुपयांची देयके अदा केली असणे, परंतु हे त्यांच्या अधिकार क्षेत्रातील पोलीस स्टेशनकडून सदर बांधकाम साहित्य मोफत मागून घेतलेले असणे याची चौकशी होणे गरजेचे असणे, तसेच गुन्ह्याची माहिती भरणेसाठी सीआयडी क्रॉईम मार्फत सी.सी.टी.एन.एस. प्रणाली चालवली जाते, त्याच्यासाठी सध्या ८ लक्ष रुपयाचा खर्च तत्कालिन पोलीस अधिक्षकांनी केला असणे, जे की संपुर्ण महाराष्ट्रामध्ये सी.सी.टी.एन.एस. कोठेही ८ रुपयाचा सुध्दा खर्च केलेला नसताना परभणी जिल्ह्यात लाखो रुपयांचा खर्च करणे, त्यामुळे याबाबतीत राज्य सरकारने सखोल विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. रत्नाकर गुट्टे वि. स. स. | कित्ता. |
| (३०२) | "मौजे भरोडी गांव (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथील हायस्पीड रेल्वे बुलेट ट्रेन कार्पोरेशन भूसंपादित जमिनीसाठी सर्व्हे क्र. २१५/१ व इतर जमिन मिळकतीत १२ कोटी रुपयांचा भुसंपादन मोबदला हा परस्पर बोगस व भामट्या शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खातेत वळवल्याचे तक्रार दर्शना हरीदास मढवी यांनी विभागीय | श्री. राजु आवळे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | कोकण आयुक्त व पोलिस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक खाते, ठाणे यांना दि.१५/१२/ २०२२ रोजी तक्रार दिली असणे, तक्रार देऊन आज कित्येक दिवस उलटूनही बनावट शेतकऱ्यांवरती गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून एकही पैशाची वसूली करण्यात आलेली नसणे, संबंधीत बनावट शेतकऱ्यांनी दर्शना हरीदास मढवी यांना मानसिक छळ देण्याचा व जिवे ठार मारण्याची धमकी दिली असणे, यांच्या जमिनीचे भरोडी दस्तक्रं. १४९६/२०२० मध्ये दि. ३० मार्च २०१२ या जमिनीच्या २२ खातेदारांपैकी फक्त ४ खातेदारांचे बनावट साठेकरार देऊन परस्पर बनावट खातेदारांनी स्वतःच्या बँकेत पैसे वळवून एक बनावट प्रतिज्ञापत्र सुध्दा बनविण्यात येणे, यामधील कुठलाही प्रतिज्ञापत्र व साठेकरार हे नोटरी समक्ष नोटरी झालेले नसुन नोटरी बुकात अंगठा-सही नसतांना परस्पर हे बनावट करार बनवण्यात आलेले असणे, तसेच १५ दिवसांसाठी तात्पुरते स्वरुपात रोहन पवार या तलाठीला आणुन वडिलोपार्जित वारसाने दर्शना हरिदास मढवी व त्यांच्या कुटूंबदारांचे नावे डावलुन ४ खातेदारांचे फेरफार नोंदवण्यात आले आणि त्या चौघांनी ८ करोड़ रुपये त्यांच्या बँक खात्यात वळवले, हे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक खाते ठाणे व कोकण विभागीय आयुक्त यांना माहित असुनही त्यांनी गुन्हा दाखल करण्याचे धाडस अजुनपर्यंत केलेले नसणे, कारण लुटारू व बनावट शेतकऱ्यांचे मोठे वशीले असल्याने यांच्यावरती अद्यापर्यंत गुन्हा दाखल करण्याची कारवाई झाली नसणे, तक्रारदार दर्शना हरिदास मढवी व त्यांचे कुटूंबदार यांची जमिनही गेली व पैसेही भामट्याने चोरून नेल्यामुळे ते देशोधडीला लागलेले असणे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे, त्यामुळे शासनाने अतिगांभिर्याने या प्रकरणात लक्ष घालून संबंधीत बनावट शेतकऱ्यांवरती अतितातडीने गुन्हा दाखल करण्याची व भूसंपादन मोबदल्याची रक्कम वसूलीची कारवाई होण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कारवाई प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| (३०३) | "नागपूर येथील अजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. २५/२/२०२३ रोजी एका मतिमंद मुलीवर एका ऑटोचालकाने जबरदस्ती शारीरिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली असणे, सदर तरुणी घराजवळील दुकानात चॉकलेट आणण्यासाठी गेली असता तिचे अपहरण होणे, ती घरी परतल्यावर चौकशी केली असतांना तिच्यावर शारीरिक अत्याचार झाल्याची बाब समोर येणे, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून नागरिक संताप व्यक्त करीत असणे, या घटनेतील आरोपीला पोलीसांना अटक केली असली | श्री. विकास ठाकरे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| | तरी काही मुद्दे शासनाने विचारात घ्यावेत, ज्याप्रमाणे अल्पवयीन मुले-मुली यांच्या संदर्भातील अत्याचार प्रतिबंधक कायदा आहे तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आहे त्याच धर्तीवर दिव्यांग, मतिमंद, मुलीवरील अत्याचाराला प्रतिबंधक करण्यासाठी व आरोपींवर कठोर कारवाई करण्यासाठी नवीन कायदा शासनाने आणावा अशी जनतेतुन मागणी होत नसुनही त्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३०४) | "ऑनलाईन खेळांच्या अनेक जाहिराती प्रसारमाध्यमांवर प्रसिध्दी होत असणे, त्यामुळे अनेक युवक-युवती त्याकडे वळत असणे, शासन त्या जाहिरातच मान्यता देत असणे, यातून युवकांना त्या खेळांचे व्यसन जडत असणे, त्यामुळे आर्थिक नुकसान होत असणे, त्यातून अनेक युवक नैराशाग्रस्त होऊन आत्महत्या करत असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, यासर्व प्रकरणात शासनाने करावायाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर वि. स. स. | कित्ता. |
| (३०५) | "छत्रपती संभाजीनगर येथे पोलिस अधिकाऱ्याने मद्यधुंद अवस्थेत महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान घडली असल्याचे निदर्शनास येणे, तसेच सदर पोलीस हा संबंधीत खात्यातील वरिष्ठ पदावर काम करणारा असून त्याने मध्यरात्रीच्या सुमारास जोडप्याकडे लिफ्ट मागण्याच्या बहाण्याने त्यांच्या सोबत गैरवर्तणूक करून सदर महिलेचा विनयभंग करून बेकायदेशीरपणे त्यांच्या घरात घुसणयाचा प्रयत्न केला असणे, सदर धक्कादायक प्रकरणी पोलिस अधिकारी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असणे, अधिकाऱ्यांच्या या प्रकारामुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगरात भीतीचे वातावरण असून स्थानिक महिला व तरुणी यांच्या मध्ये असुरक्षित असल्याची भावना निर्माण झाली असणे, उपरोक्त प्रकरणी शासनाने तातडीने अधिकाऱ्यांला निलंबित करून भविष्यात अशा घटना घडू नयेत याकरिता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. नारायण कुचे वि. स. स. | कित्ता. |
| (३०६) | "माहे फेब्रुवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास वसई-विरार शहर म.न.पा च्या नगर रचना विभागाचे उप संचालक श्री. वाय. शिवारेड्डी यांचे विरोधात तत्कालीन म.न.पा गटनेता त्यांनी तात्कालीन पोलीस निरीक्षक विरार पो.स्टे. विरार (पूर्व) ता. वसई, जि. पालघर यांचे कडे दि. ६ मार्च २०१६, | श्री. निलेश लंके वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | १४ मार्च २०१६ ( २ तक्रारी ) १ एप्रिल २०१६, २३ मार्च २०१६ ( ४ तक्रारी ) १० मार्च २०१६, ८ मार्च, २०१६ अश्या सुमारे ८ ते १० लेखी तक्रारी दाखल करणे, सर्व तक्रारी मध्ये उपसंचालक नगर रचना यांनी पदाचा गैर उपयोग करून अनेक विकासकाना जादा बिल्टअप एरिया मंजूर करणे, खोट्या नोंदी करून निमबाह्य FSI वाढवून देणे, DRC नियमांचे उल्लंघन करून बांधकामास परवानगी देणे. दोन विकासकांना एकाच सर्व्हे नंबर वर बांधकामाची परवानगी देताना FSI चा केलेला घोटाळा, आरक्षण असलेल्या जमिनीवर आरक्षण न उठवता बांधकामांना दिलेल्या अवैद्य परवानग्या बेकायदेशीर बांधकामांना विरोधात झालेल्या तक्रारी कडे केलेले अर्थपूर्ण दुर्लक्ष श्री. वाय शिवारेड्डी यांची नेमणूकच बेकायदेशीर झालेल्या असणे, ई असंख्य पुरावे देऊन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची वारंवार केलेली विनंती, तात्कालीन पोलीस निरीक्षक यांनी या गंभीर तक्रारीची दखल न घेणे,गेल्या ६ ते ७ वर्षात या तक्रारीचा तपास म.न.पा च्या सहाय्याने करण्यात न येणे, या मुळे वसई-विरार म.न.पा मध्ये बेकायदेशीर बांधकाम करण्याचे वाढलेले प्रमाण, म.न.पा क्षेत्रातील शेकडो नागरिकांनी पोलीसांकडे वाय शिवारेड्डी यांचे विरोधात केलेल्या तक्रारीकडे हेतूनः अर्थपूर्ण होत असलेल्या अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील उडालेला विश्वास व पोलीस प्रशासनाच्या संशयास्पद 'वागणुकीमुळे निर्माण झालेली तीव्रचीड व संताप,तसेच गेल्या ८ वर्षात या प्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व पोलीस निरीक्षक व अन्य अधिकाऱ्यांनी तपासात केलेले हेतुतः दुर्लक्ष,या बाबत शासनाने तातडीने करायवाची कार्यवाही व प्रतिकिया." | | |
| (३०७) | "शेतकऱ्यांना वसूलीचा त्रास देत असलेल्या बजाज फायन्सास कंपनीला धडा शिकविण्यासाठी श्री.प्रथमेश मधुकर पवार, बाळासाहेब शिवसेना तालुका प्रमुख, अमळनेर, जि. जळगांव यांनी कंपनीच्या कार्यालयासमोर दिनांक १०.१.२०२३ रोजीच्या सुमारास आंदोलन करणे, या प्रकरणी कलम आयपीसी ३९५ सारखा गुन्हा दाखल करणे, सदरी प्रकरणी मागे घेण्याकरिता अमळनेर पोलिस निरिक्षक श्री. विजय शिंदे यांनी सुमारे ३५ लक्ष रुपयांची केलेली मागणी, त्यातील १० लाख रोख रक्कम पो.कॉ. श्री. शरद पाटील यांनी घेणे, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि.२८.१.२०२३ रोजी च्या सुमारास लेखी निवेदन सादर करणे, या निवेदनानुसार सविस्तर चौकशी करुन कारवाईचा | श्री. किशोर पाटील वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अहवाल सादर करण्याचे अ.मु.स., गृह यांना आदेश देणे, परंतु अदयापही या प्रकरणी कोणतीच कारवाई न झाल्याने निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका." | | |
| (३०८) | "गुन्हे अन्वेषण विभाग छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच बदली झालेले आणि नाशिक ग्रामीणचे तत्कालीन पोलीस अधीक्षक श्री सचिन पाटील यांनी नाशिक येथे कार्यरत असताना राष्ट्रीय महामार्ग तीन वरील पिंपळगाव बसवंत टोल नाक्यावर जाण्यासाठी लेन रिकामी ठेवण्यात आली नसल्याने त्यांना राग येऊन त्यांनी टोल नाक्यावरील महिला कर्मचारी यांच्याशी केलेले गैरवर्तन, त्यांना उठाबशा काढायला लावून केलेली मारहाण, दारू पिऊन घातलेला धिंगाणा, स्वतःला वाचविण्यासाठी आरटीपीसी चा बागुलबुवा करून महिला कर्मचाऱ्यावर भारतीय दंड संहिता कलम ३५३, ३३२ अन्वये दाखल केलेले गुन्हे सीसीटीव्ही मधील फुटेज उघड होऊ नये म्हणून dvr ची केलेली चोरी, litigation च्या जमिनी देण्याच्या नावाखाली नाशिक ग्रामीण भागातील स्वतःच्या नावे केलेली ८० एकर जमीन, अमलदाराकडून नियमितपणे हप्ता वसुली करून पूर्ण कालावधीत सुमारे शंभर कोटीची केली कमाई व जमवलेली माया, बंगल्यावर दहा महिलांची नेमणूक करून त्यांच्याकडून दारूचे पेग भरून घेणे, त्यांच्याशी अंगलट करणे, मुलाची शी साफ करून घेणे, अधिकारी कर्मचारी यांच्या बदली करण्यासाठी घेतलेले दोन ते पाच लाख रुपये, स्वतःचे जिल्हा बदलीचे प्रकरण चव्हाट्यावर येऊ नये म्हणून ५७ वर्षाच्या महिला कर्मचाऱ्यावर भारतीय दंड संहिता कलम ४२० व ४६५ अन्वये दाखल केलेले गुन्हे, तसेच इगतपुरी तालुक्यातील आदिवासींच्या शिधावाटप दुकानावर बेकायदेशीरपणे कारवाई करून आदिवासी लोकांना जातीवाचंक केलेली शिवीगाळ, या प्रकरणी नाशिक येथील न्यायालयात त्यांच्याविरुद्ध ॲट्रॉसिटी खाली दाखल झालेले गुन्हे, तसेच पोलिस उप आयुक्त, ठाणे येथे पदाचा गैरवापर करून सृष्टी को ऑ. हौ. सो. , कोलबाड, ठाणे येथील पदाधिकाऱ्यांवर खोटे व चुकीचे गुन्हे दाखल केल्या प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्या बाबत मुख्यमंत्री, अतिरिक्त सचिव, गृह विभाग, पोलिस महासंचालक यांचेकडे केलेल्या लेखी तक्रारी, उपरोक्त सर्व प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी होऊन पुढील कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविलेला अहवाल तथापि त्यावर अध्यापही न करण्यात आलेली कारवाई, त्यामुळे पोलीस विभागात व जनतेत पसरलेली | श्री. शांताराम मोरे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असंतोषाची भावना, अशा अधिकाऱ्यांमुळे जनतेचा पोलीस विभागावरील उडालेला विश्वास, अशा मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता आणि ज्या लोकांवर अन्याय केला आहे त्यांना न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३०९) | " गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात सकल हिंदू समाजाकडून हिंदू जन आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून लव जिहाद, धर्मांतरण विरोधी कायदा लागू करण्याची मागणी होत असणे, सदर मोर्चामध्ये मोठ्या संख्येने जनसामान्य नागरिक रस्त्यावर उतरणे, तसेच महाराष्ट्रातील विविध शहरातील मुली आणि महिलांना आर्थिक प्रलोभन दाखवून, फसवून त्यांचे इस्लाम मध्ये धर्मांतरण करण्याचे षडयंत्र गेली अनेक दशके महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, तसेच लव्ह जिहादमधून घडलेल्या श्रद्धा वालकर, आफताब, मुंबई येथील रुपाली चंदनशिवे च्या केस मध्ये भयावह गोष्टी संपूर्ण देशासमोर येणे, अशा घटनांचा तक्रार निवेदनावर राज्यातील पोलीस प्रशासनाकडून जलदगतीने कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसणे, तसेच लव जिहाद मधील केसेस मध्ये पोलिसांची फिर्यादी कडून तक्रार घेण्यास टाळाटाळ करणे, आणि संबंधित अशा प्रकारच्या केसेस मध्ये पैशांची मागणी होत असल्याचे निदर्शनात येणे, तसेच लव जिहाद धर्मांतराच्या प्रकरणी तत्परतेने अटक होऊन संबंधितांवर कारवाई होण्याच्या घटना अत्यल्प असणे, तसेच अहमदनगर,नाशिक, कोल्हापूर, पुणे, सातारा येथे गेल्या सहा महिन्यात २७ अल्पवयीन मुलींना प्रलोभन दाखवून फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी संबधित आरोपींवर पॉस्को अंतर्गत गुन्हे दाखल होणे, याबाबत पोलीस प्रशासनाचे निष्क्रियता, भ्रष्टाचार, पीडितांनी पुढे येणे, लढ्यासाठी लागणारे मनोधैर्य, पैसा आणि पुढाकार आदी अनेक गोष्टी आरोपींना शिक्षा होणे किंवा न होणे यासाठी कारणीभूत असल्या तरी कायदा झाल्यामुळे पीडितांना 'आपल्या पाठीशी कायदा आहे' असे नैतिक पाठबळ असणे हे पाठबळ त्यांना अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यास आणि लव जिहाद धर्मांतर करणाऱ्यावर वचक बसवण्यास निश्चितपणे उपयोगी ठरण्याची आशा असणे, आणि अन्य धर्मीयांकडून केल्या गेलेल्या धर्मांतराची कुठेही सरकारी नोंद नसणे, राज्यात जी धर्मांतरण होतात ती सक्षम सरकारी अधिकाऱ्यांसमोर त्यांची नोंद न होणे, आणि नोंद नसल्यामुळे राज्यात अनेक धर्मांतराचे प्रकार हे लपविले जात असणे, तसेच हिंदू बांधवांच्या | श्री. नितेश राणे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>( १ ) | थोडक्यात विषय<br><br>( २ ) | सदस्यांची नावे<br><br>( ३ ) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>( ४ ) |
|---|---|---|---|
| | दृष्टीने लव जिहाद, धर्मांतराचा कायदा हा अनन्यसाधारण महत्त्वाचा असणे, आणि उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, या राज्यात धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात असणे, आणि त्यामुळे याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील वाढत्या धर्मांतर व लव्ह जिहादच्या घटनांना आळा घालण्यासाठी धर्मांतर विरोधी कायदा लागू करुन त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, अशी मागणी देखील राज्यात विविध ठिकाणी निघालेल्या हिंदू जन आक्रोश मोर्चे, आंदोलनातून केली जात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३१०) | "सेंट्रल उर्दू हायस्कूल सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग येथे असून त्याठिकाणी १० वीच्या परिक्षेचे केंद्र असणे, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी १० वीच्या परिक्षा केंद्राची तयारी करीत असणे, केंद्राची तयारी चालू असताना दि.२८.०२.२०२३ रोजी सकाळच्या सुमारास १०.०० वाजता श्री. इम्तियाज खानापूरी व इतर व्यक्ती शाळेत मुख्याध्यापकाच्या खोलीत (कॅबीन) मध्ये अनाधिकृतपणे घुसले असणे, परिणामी १० वीच्या केंद्राची तयारी करण्यास अडथळा निर्माण झांला असणे, पुन्हा दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी १० वीच्या विज्ञान - २ चा पेपर परीक्षा केंद्राची तयारी करीत असणे, केंद्राची तयारी चालू असताना दि.१७.०३.२०२३ रोजी सकाळच्या सुमारास ०९.४५ वाजता श्री. खलील खान व इतर व्यक्ती शाळेत मुख्याध्यापकाच्या खोलीत (कॅबीन) मध्ये अनाधिकृतपणे घुसले असणे, त्यामुळे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला असणे, आम्ही शाळेचे विश्वस्त असल्याचे मुख्याध्यापकाला सांगितले असणे, सदरच्या व्यक्तीने मुख्याध्यापकाला दमदाटी व गोंधळ केला असणे, मुख्याध्यापक घाबरला असणे, त्यामुळे शाळेत मोठ्याप्रमाणावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असणे, यासंदर्भात स्थानिक पोलिसात तक्रार केली, मात्र तक्रार करुनही पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केले असणे, पोलीस दखल घेत नसणे, त्यानंतर शाळेच्या भिंतीवर दोन फलक लावले असणे, परिणामी भितीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असूनही सावंतवाडी पोलिसांनी पंचनामा केला नसणे, पंचनामा करण्याची आवश्यकता असणे, तरीही पोलिसांनी पंचनामा केला नसणे, परिसरात सेंट्रल इंग्लिश स्कूल येथे सी.सी.टी व्ही फुटेज घेतला नसणे, | श्री. अस्लम शेख, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमिन पटेल, श्री. झीशान सिद्दिकी, श्री. विकास ठाकरे, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | ही बाब गंभीर असणे, या संदर्भात सावंतवाडी मर्कजी जमात, मुंबई यांनी जिल्हाधिकारी - सिंधुदुर्ग, पोलिस अधिक्षंक - सिंधुदुर्ग व सावंतवाडी पोलीस ठाणे, त्यांच्याकडे दि. ३ मार्च, २०२३ रोजी लेखी तक्रार केली असणे, तथापि अद्याप तक्रारीची दखल घेतली नसणे, गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३११) | "राज्यातील शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागू केलेली असल्याने लाखो कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असणे, या पेन्शन योजनेमुळे कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन पूर्णतः अंधकारमय झालेले असणे, सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना आर्थिक/सामाजिक स्तरावर त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची शासनपातळीवर वारंवार मागणी केलेली असणे, मात्र त्यावर निर्णय घेतला जात नसल्याने आवश्यक सोयीसुविधाअभावी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दैनंदिन जीवन खडतर झालेले असणे, आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरोधात सरकारी कर्मचाऱ्यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजीपासून राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढून आंदोलने सुरु करणे, राजपत्रित अधिकारी महासंघानेही आंदोलनाचा इशारा दिलेला असून सरकारी/निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीपासून बेमुदत राज्यव्यापी संपाची घोषणा केलेली असणे, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना बंद करुन जुनी पेन्शन योजना लागू करावी, कार्यरत पदांचा सुधारित आकृतिबंध त्वरित रद्द करावा या प्रमुख मागण्यांसही इतर मागण्यांवर न्याय्य निर्णय घेण्याची कर्मचारी संघटनांनी केलेली मागणी, सदर प्रकरणी आवश्यक निर्णय घेण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी, राज्य शासकीय कर्मचारी महासंघाने मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील लक्षावधी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ पासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पिय अधिवेशनकाळात | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील,श्री. दिलीप वळसे-पाटील,श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे,श्री. शेखर निकम,श्री. संजय बनसोडे,श्री. प्रकाश आबिटकर,श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्रीमती जयश्री जाधव,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार,श्री. अस्लम शेख,कुमारी प्रणिती शिंदे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, राष्ट्रीय निवृती वेतन योजनेमुळे त्यांचेवर अन्याय होत असल्याने जुनी पेन्शन योजना लागू करण्याची त्यांनी न्याय मागणी केलेली असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होणे, शासनाने तातडीने निर्णय घेऊन त्वरेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३१२) | "मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे पत्र दिनांक २१/०२/२०२३ रोजी प्रधान सचिव, वित्त व कोषागारे विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र प्राप्त झाले असणे, ज्या पत्रातून मुख्यमंत्री सचिवालयाने सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या वेतन तफावत मध्ये सुधारणा करण्याबाबत तसेच या पदाचा पदश्रूखंलेत बदल करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे शासनाच्या संबंधित विभाग प्रधान सचिव तसेच मुख्य सचिवाकडे मा.आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री, वित्त मंत्री, मुख्यमंत्री यांच्याकडे व माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला असूनही दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकाशित केलेला अ बक्षी समितीच्या अहवालामध्ये खंड २ मध्ये वरील मागणीचा समावेश नसल्याचे दिसून येत नसणे, म्हणून वरीलप्रमाणेच मागणी मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्याबाबत कळविले असणे, यानंतर वारंवार पत्र पाठवून तातडीने निर्णयात्मक आदेश घेण्याबाबत कळविले असणे तसेच विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र माहे जानेवारी व फेब्रुवारी रोजी चे दरम्यान उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे प्रधान सचिव यांना व वित्त विभाग, मंत्रालय यांनाही पत्र पाठवून वरील लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव पाठविला असणे, वरील बाबीचा विचार करून विशेष बाब म्हणून सभागृहाला असलेल्या विशेष अधिकारानुसार वरील विषयात होत असलेला पाठपुरावा तरीही बक्षी समितीचे खंड २ मध्ये मागणी मान्य झाली नसणे, ही बाब बघता विधिमंडळ सभागृहाने वरीलप्रमाणे मागणी मान्य करण्यासाठी तातडीने निर्णयात्मक आदेश व यासंबंधाने शासनाने करावयाची कारवाई व यासंबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३१३) | "बक्षी समिती चा खंड-२, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकाशित झाला असून त्यामध्ये सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे यांच्या आस्थापनेवरील सार्वजनिक आरोग्य विभागातील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाच्या वेतन तफावत सुधारणा करण्याबाबत तसेच या पदाच्या पदशुखलेत बदल करण्यासाठीचे मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती या कार्यालयाचे पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २३फेब्रुवारी २०२३ रोजी पत्र क्रमांक १६२/२०३३ अन्वये अप्पर मुख्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय मुंबई यांना वरील मागणी विशेष बाब म्हणून आदेश निर्गमित करण्यासाठी पाठविले असणे. दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रकाशित झाला असून अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे यांच्या आस्थापनेवरील सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या वेतन तपासणी करण्याबाबत बदल करण्यासाठी वारंवार शासनाकडे तसेच राज्याचे मुख्यमंत्री राज्याचे उप मुख्यमंत्री राज्याचे प्रधान सचिव वित्त व कोषागारे यांना वारंवार पत्र लेखी पत्र देऊन अवगत केले असणे.तरीही वरील बक्षी समिती च्या खंड २ मध्ये वरील मागणीचा समावेश नसल्याने सदर कर्मचारी व अधिकारी त्यांच्या भावना संतप्त झाले असणे कर्मचारी अधिकाऱ्यांची भावना लक्षात घेता पुन्हा लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य., यांना विशेष बाब म्हणून वरील मागण्या मान्य करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी मान्य मुख्यमंत्र्यांनी आदेश संबंधित प्रधान सचिव वित्त लेखा व कोषागार यांना मागणी केली असणे ती मागणी जसे चे तशी शिफारस मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी अमरावती यांचे पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी यांनी वरील मागणी चा समावेश असलेले पत्र दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी माननीय मुख्यमंत्री सचिवालय अपर मुख्य सचिव यांना दिलेले असणे सदरची मागणी अतिशय रास्त असून ती मागणी शासनाने मंजूर करणे अतावश्यक आहे ही मागणी मान्य करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाने प्रधान सचिव वित्त व लेखा कोषागार यांना विशेष बाब म्हणून आदेश होण्यासाठी आदेश देण्याची व निर्णय काढण्याची आवश्यकता असणे. त्यासंबंधाने करावयाची कार्यवाही शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. रवि राणा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३१४) | "पुणे येथे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या स्थापनेचा विषय गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबीत असणे, गोर-गरीब नागरिकांसाठी सदर खंडपीठाची अत्यंत आवश्यकता असणे, पुणे येथे मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे खंडपीठाची स्थापना होणेबाबत दिनांक २२ मार्च, १९७८ रोजी महाराष्ट्र विधानसभेत ठराव संमत होऊन विधानसभेने मा.प्रमुख न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय,भारत सरकार महाराष्ट्र सरकार व मा.राष्ट्रपती यांना मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठाची पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे स्थापना होणेबाबत सूचना केलेली असणे, राज्याची फेररचना कायदा कलम ५१(३) प्रमाणे फिरते खंडपीठ स्थापना करण्याचे अधिकार मा.प्रमुख न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय यांना असणे, दिनांक २६ फेब्रुवारी, १९८१ रोजी केवळ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च न्यायालयाची खंडपीठाची मंजुरी देण्यात आलेली असणे, मात्र पुण्यातील उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापना करणेचा विषय प्रलंबित राहिलेला असणे, पुण्यातील मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठाची स्थापना होणेसाठी जमीन उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, पुण्यातील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची स्थापना करणेकामी मंत्री मंडळाने मा.उच्च न्यायालय मुंबई तसेच मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांचेकडे शिफारस करण्याची तसेच सदर खंडपीठासाठी राज्य सरकारने आर्थिक नियोजन करणे व निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे,मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची पुणे येथे स्थापना करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड, वि. स. स. | कित्ता |
| (३१४अ) | "राज्यातील धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त या पदावरील एका अधिकाऱ्याची धर्मादाय उप आयुक्त, जळगावं येथे रिक्त पदावर माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये पदोन्नती झालेली असणे, धर्मादाय संघटनेमध्ये सध्या मुंबई, ठाणे व सोलापूर या ठिकाणी प्रतिनयुक्तीवर कार्यरत असलेल्या तीन न्यायिक अधिकारी/न्यायधीश यांची सेवा मा.उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत न झाल्याने पदोन्नती करीता पात्र असणाऱ्या नियमित अधिकाऱ्यांना धर्मादाय उप आयुक्त या पदावर पदोन्नती मिळण्यास विलंब होत असणे, सदरील तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा मा.उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करणेकामी विधि व न्याय विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित असतानाही त्याबाबत कार्यवाही न होणे, तसेच या तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा मा.उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करुन घेणेकामी मा. | डॉ. नितिन राऊत,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे),श्री. धिरज देशमुख,श्री. अमिन पटेल,श्री. अस्लम शेख,श्री. सुनिल केदार,श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून विधि व न्याय विभागाच्या पत्रव्यवहारास प्रतिसाद दिला जात नसणे, त्यामुळे शासनाने चौकशी करुन सदरील अधिकारी यांना पदोन्नतीसाठी निर्देश देणे आवश्यक असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या संघटनेतील अधिकारी-कर्मचारी यामध्ये पसरलेले असंताषाचे वातावरण व नाराजीची भावना, परिणामी शासनाने चौकशी करुन सदरील अधिकाऱ्यांना तातडीने पदोन्नती देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३१५) | "राज्यात ॲट्रॉसिटी खाली चालणाऱ्या सर्व प्रकरणाचे तसेच खटल्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे, दिनांक १६ जानेवारी, २०१६ पासून अनिवार्य केले असून मात्र आजतागायत मुंबई उच्च न्यायालय आणि अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विशेष न्यायालय, मुंबई येथे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे सदर खटल्यांमध्ये पारदर्शक न राहता त्यामधील दोष सिद्धतेचे प्रमाण अतिशय कमी झालेले असल्याचे आढळून येणे, जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हाधिकारी, मुंबई यांची तशी व्हिडिओ रेकॉर्डिंग व्यवस्था करण्याची जबाबदारी असून त्यांना सन २०१८ पासून सतत मागणी व विनंती करुनही व्यवस्था करण्यात केली जात नसणे, त्यामुळे एकूण न्यायव्यवस्थेबाबत निर्माण झालेली संशयाची भावना तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वर्गात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत राज्य शासनाने चौकशी करून मुंबई उच्च न्यायालयाल व अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विशेष न्यायालय, मुंबई ॲट्रॉसिटी संदर्भातील खटल्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याबाबत त्वरित आदेश देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. नितिन राऊत,श्री. बाळासाहेब थोरात,श्री. सुरेश वरपुडकर,श्री. अमित देशमुख,श्रीमती प्रतिभा धानोरकर,श्री. विकास ठाकरे,श्रीमती सुलभा खोडके,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड,श्री. संजय जगताप,श्री. धिरज देशमुख,श्री. बळवंत वानखडे,श्री. अशोकराव चव्हाण,श्री. जितेश अंतापूरकर,श्री. मोहनराव हंबर्डे,श्री. माधवराव पवार,श्री. राजेश एकडे,श्री. अमिन पटेल,श्री. अस्लम शेख,श्री. सुनिल केदार,श्री. विजय वडेट्टीवार, वि. स. स. | कित्ता |
| (३१६) | "पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालय जनसंपर्क अधिकारी यांची बैठक दिनांक १४/१२/२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पार पडली असून या बैठकीमध्ये अनेक धर्मादाय हॉस्पीटल गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्याचे बैठकीमध्ये चर्चा होणे, मिटींगला गैरहजर राहणाऱ्या हॉस्पीटलवर लेखी स्वरुपात कारवाई करावी, लोकप्रतिनिधींनी फोन केला असता अनेक हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी फोन घेत नसल्याने त्यांना समज देणे, ज्या हॉस्पीटलचा | ॲड. अशोक पवार,श्री. दिलीप मोहिते-पाटील,श्री. चेतन तुपे,श्री. सुनिल शेळके , वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | आयपीएफ निधी संपलेला असून जे हॉस्पीटलचा निधी तोट्यात आहे त्या हॉस्पीटलचे ऑडीट करण्याची आवश्यकता असणे, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी व रात्री ७ वाजलेनंतर जनसंपर्क अधिकारी हॉस्पीटलमध्ये उपलब्ध नसणे, काही धर्मादाय हॉस्पीटलमध्ये महिला जनसंपर्क अधिकारी असल्याने रात्री फोन करण्यास मर्यादा येतात याकरिता नोडल ऑफीसरची २४ तास संपर्क साठी नेमणूक करणे, काही धर्मादाय हॉस्पीटल सरकारी जमीन घेतात व नंतर कंपनी कायद्यांतर्गत पळवाट काढून धर्मादाय योजनेतून बाहेर पडतात अशा रुग्णांलयांची चौकशी करणे आवश्यक असणे, पुणे जिल्ह्यातील काही धर्मादाय रुग्णालय आयपीएफ च्या रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगितली जाणे, धर्मादाय रुग्णालयामध्ये रुग्ण भरती झाल्यानंतर सदर रुग्णांना सांगितले जाते की बाहेरील डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी आल्यास त्याची फी द्यावी लागेल परंतू वास्तविक पाहता ती जबाबदारी धर्मादाय हॉस्पीटलची असल्याने याबाबच्या सूचना हॉस्पीटलला होणे आवश्यक असणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीबांसाठी १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेची प्रभावी अमंलबजावणी होणेकरिता या सर्व चॅरिटी हॉस्पीटलमध्ये बाह्यरुग्ण तपासणी आयपीएफ योजनेत समावेश करणे, मेडिकल बिले आयपीएफ मध्ये समाविष्ठ करणे, जनसपंर्क अधिकारी यांचे नाव, मोबाईल नंबर, १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार घेत असल्यास नोटीस बोर्डवर रुग्णाच्या नावासहित रक्कम तपशिल लिहिण्यात यावा, समितीचा बोर्ड, रुग्ण भरतीचा बोर्ड दर्शनी भागात मराठीमध्ये लावणे, २४ तास जनसंपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक करणे, जनसंपर्क अधिकाऱ्यांचे कार्यालय हॉस्पीटलच्या दर्शनी भागात असणे, १० टक्के राखीव खाटा व आयपीएफ निधी कोणत्या हॉस्पीटलमध्ये शिल्लक आहेत याबाबतच्या तपशिल वेबसाईटवर टाकण्यात यावा व तो रोज अपडेट करण्यात यावा, चॅरिटी हॉस्पीटलची मिटींग दर महिन्याला घेण्यात यावी, आयपीएफ च्या रुग्णांना बाहेरुन खाजगी मेडिकल मधून औषधे न आणता हॉस्पीटलने पुरविणे, रुग्णाला कोणत्या गोष्टी सवलतीमध्ये मिळू शकतात याबातचा उल्लेख दर्शनी भागात बोर्डवर लावणे याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३१७) | "पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती अंतर्गत कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यातील अंदाजे ३ हजार ६७ देवस्थाने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या कार्यक्षेत्रात येणे, या सर्व देवस्थानांकडे अंदाजे | श्री. प्रकाश आबिटकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | ३० हजार एकर हुन अधिक जमिनी असून या जमिनी संबंधित कुळांमार्फत गेल्या तीन ते चार पिढ्यांपासून कसत असणे, कुळांकडून या जमिनी कसण्याच्या बदल्यात पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे खंड स्वरूपात भरपाई करणे, परंतु काळानुरूप पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडून कुळांच्या जमिनी परस्पर विक्री करणे, कुळांकडून जमिनीचा ताबा काढून घेणे, मनमानी पद्धतीने खंड आकारणी करणे सुरू असणे, यामुळे पिढ्यान-पिढ्या जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना नाहक त्रास देणे सुरू असून त्यांच्यावर अन्याय होणे, त्या दरम्यान राज्य शासनाने डिजिटल ७/१२ पद्धती अवलंबल्यामुळे इतर हक्कातील असलेल्या कुळांची नावे ७/१२ वरून कमी होणे, यामुळे वर्षानुवर्षे कसत असलेल्या जमिनीवर कुळ म्हणून असलेला हक्क संपुष्टात येणे, यामुळे कुळांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, हजारो शेतकरी बांधव यांचेकडून पिढ्यान-पिढ्या कसत असलेल्या जमिनी कुळांच्या नावे करण्याबाबतची मागणी मा.लोकप्रतिनीधी व शेतकऱ्यांकडून होत असणे, याबाबत पिढ्यान-पीढ्या कसत असलेल्या जमिनी कुळांच्या नावे करण्याकरिता स्वतंत्र कायदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.” | | |
| (३१८) | “सार्वजनिक न्यास नोंदणी, ठाणे यांचे कडील वज्रेश्वरी देवी संस्थान नोंदणी सन १९५३ ची असून यांचे नावे ठाणे जिल्हा व मुंबई या ठिकाणी अनेक जमीन मिळकती असून सन १९६३ च्या विश्वस्तांनी नमूद परिशिष्ट १ मिळकतीचा तक्ता सार्वजनिक न्यास नोंदणीस पुर्वीच सादर केलेला असणे, नंतरच्या नवीन विश्वस्तांनी सन १९९३ साली चेंज रिपोर्ट दाखल केल्यानंतर भुमिअभिलेख, भिवंडी यांच्या सन १९२० च्या रेकॉर्ड आकारफोड पत्रकानुसार पुर्वीपार असलेले जमिनदार व शेतकरी यांच्या नोंदीप्रमाणे खाजगी मिळकती शेतकऱ्यांचे असतांना जाणुनबुजून शेतकऱ्याच्या खाजगी मिळकतीमध्ये नंतरच्या विश्वस्तांनी आणलेल्या चेंजरिपोर्टमुळे न्यासनोंदणीचे अधिकारी देवस्थानचे विश्वस्त व महसूल अधिकारी यांनी संगनमत करुन हेतुस्पर गैरलाभ मोक्याच्या जमिनीचे गैरलाभ मिळावणे, म्हणून खाजगी जमिनीत देवस्थान नोंदी घेतल्या गेल्या वास्तविक पाहता सन १९६३ च्या परिशिष्ट १ देवस्थान जमीन मिळकत तक्त्यांप्रमाणे देवस्थानाने जमीन काबिज करावी व इतर खाजगी मिळकतीतून त्यांची नोंद कमी करण्याची आवश्यकता, कारण देवस्थान जमीन मिळकतीचे विश्वस्तांनी मोठ्या प्रमाणावर अफरातफर व दान हुडीचे पैशांचे ७ करोड रुपयांचे घोटाळा केलेला असणे, सदर जमिनींपैकी भिवंडी येथील कणेरी गाव व फेणेगाव मध्ये | श्री. राजु आवळे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | काही जमीन मिळकतीमध्ये अन्यायकारक देवस्थान नोंद घेऊन अनेक लोकांच्या जमिनी अडकून ठेवलेले असणे, वज्रेश्वरी देवस्थान या जमीन मिळकतींचे सार्वजनिक न्यास नोंदणी, ठाणे यांच्याकडे जमीन मिळकतीचा तक्ता उपलब्ध असून कणेरी व फेणेगांव येथील जमिनीचे वर्णन सदर जमीन मिळकत तक्त्यामध्ये संपूर्ण गावच नसून फक्त काही मिळकतींचेच सर्व्हे नंबर नमूद केलेले असणे, सदर जमीन देवस्थान परिशिष्ट १ मिळकत तक्त्यामध्ये कणेरी येथील सर्व्हे क्र. ३९ व ६५ तर फेणे येथील सर्व्हे क्र. ५, १८, १९, २० हे सर्व्हे नंबर नमूद नसून या सर्व्हे नंबरमध्ये वज्रेश्वरी देवस्थानच्या विश्वस्तांनी गैरव्यवहाराच्या व गैरलाभाच्या दृष्टीकोनातून महसूल अधिकाऱ्यांना हाताशी धरून महसूल खात्याच्या रजिस्टरला संपूर्ण गाव (एंटायर विलेज) म्हणून नोंदणी केल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना व जमिनदारांना गेल्या कित्येक वर्ष याचा मोठा आर्थिक फटका बसलेला असणे, त्या जमिनदारांचा व शेतकऱ्यांचा विकास खुंटलेला असून देवस्थान इनाम वर्ग-३ अशी नोंद असल्यामुळे विकासकामी परवानगी मिळण्यास बाधा येत असणे, त्यामुळे ही वस्तुस्थिती जाणून देण्यासाठी जमीन मिळकत तक्त्याप्रमाणे देवस्थानाची नोंद दुरुस्त करण्यासाठी दि.१७/११/२०२२ रोजी प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांच्याकडे निवेदन सादर केलेला असणे, परंतु अद्याप सदर प्रकरणी शेतकऱ्यांना व जमिनदारांना नाहरकत दाखला देण्यासाठी देवस्थानचे विश्वस्त व महसूल अधिकारी यांच्या गैरव्यवहाराचा व गैरलाभाचा दृष्टिकोन असल्याने सार्वजनिक न्यास नोंदणी विभाग यांचा आशिर्वाद लाभल्याचे दिसून येत असल्याने शासनाने याची गंभीररीत्या उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधितांवरती कार्रवाही करून बेकायदेशीर संपूर्ण गाव (एंटायर विलेज) रद्द करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भूमिका." | | |
| (३१९) | "मुंबईतील म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील गोरेगांव (पूर्व), बिंबिसार येथील संक्रमण शिबिरातील १७ इमारतीतील ९५० कुटुंबांना ५०० रुपयावरून ३००० इतकी भाडेवाढ करुन सन २०१० पासून ते अद्यापर्यंतचे प्रती सदनिकाधारक यांना ९ लाख रुपये इतकी मोठी रक्कम भरण्याची अचानक नोटीस पाठविल्याचा धक्कादायक प्रकार दि.१६.०१.२०२३ रोजी निदर्शनास येणे, मुंबई मंडळाने सदरहू सदनिकाधारकांकडून सन २०२२ पासून घरभाडे घेण्यास नकार देऊन ऑनलाईन पद्धतीने भाडे भरण्यास नोटीसद्वारे कळविण्यात येणे, सदर नोटीसमध्ये प्रत्येक घराचे कोडनंबर व ऑनलाईन | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | पद्धतीने भाडे कसे भरावे याबाबतची माहिती देण्यात येणे, तद्नंतर दि.१६.०१.२०२३ रोजी मंडळाने एप्रिल २०१० ते जानेवारी २०२३ पर्यंत दरमहा ३००० रुपये या प्रमाणे घरभाडे व त्यावर आतापर्यंतचे व्याज व दंड मिळून एकूण ९ लाख रुपये जादा दराने घरभाडे भरण्याच्या नोटीसा पाठविण्यात येणे, मंडळाने फेब्रुवारी २०२२ अखेर पर्यंत ५०० रुपये प्रमाणे दरमहा घरभाडे स्वीकारून मार्च २०२२ पासून भाडे घेण्यास नकार देऊन ऑनलाईन पद्धतीने भाडे भरण्यास कळविण्यात येणे, सदरहू रहिवाशी कुटुंबांना कोणतीही पूर्व कल्पना अथवा परिपत्रक न देता अचानक भाडेवाढ लादल्याने रहिवाश्यांमध्ये खळबळ निर्माण होणे, तसेच सदरहू थकीत देय लाखो रुपयाचे घरभाडे भरणे गरीब व मध्यमवर्गीय रहिवाशी कुटुंबांना सद्यस्थितीत परवडणारे नसून त्यांच्या आर्थिकदृष्ट्या अवाक्याबाहेर असणे, सदरहू प्रकरणात म्हाडाच्या मुंबई इमारत दु. व पु. मंडळाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याने कोणतीही माहिती न घेता परस्पर भाडेवाढीची व थकबाकीची नोटीस पाठविण्याचा घडलेला प्रकार हा खोडसाळपणाचा व चुकीचा असणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांना दि.३.२.२०२३ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू चुकीची नोटीस तत्काळ रद्द करुन पूर्ववत भाडे आकरण्याकरिता शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंबईतील संक्रमण शिबीरातील रहिवाशी कुटुंबांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (३२०) | "कोकणनगर, मौजे-मजास ता.अंधेरी येथे म्हाडाचा सी.टी.एस.नं १६९ वरिल भूखंड मोकळा असल्याने त्यावर सध्यस्थितीत डेब्रीज टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, सदर मोकळ्या भूखंडाचा गैरवापर होत असल्याने त्या भूखंडावर शासकीय कार्यालय ( उदा -शिधावाटप कार्यालय, शैक्षणिक कार्यालय, दुय्यम निबंधक, निवडणूक कार्यालय ) आदि उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांकडून होत असलेली सातत्याने मागणी, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ मध्ये मा. उप मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार, सर्व शासकिय कार्यालय एकाच छताखाली या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने उक्त मोकळ्या भूखंडावर सर्व शासकिय कार्यालय आणल्यास स्थानिक नागरिकांची गैरसोय दूर होईल याकरिता शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | श्री. रविंद्र वायकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३२१) | “पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ इमारतीच्या पुनर्विकासाकरिता विकासकाची नेमणूक करण्यास होत असलेली दिरंगाई, यापूर्वी मे.श्रीपती इन्फ्रास्ट्रक्चर या विकासकांची करण्यात आलेली नेमणूक, म्हाडा व विकासक यांच्यामध्ये दि.२७/०८/२०१५ रोजी त्रिपक्षीय करण्यात आलेला करारनामा, सदरहू करारनामानुसार विकासकाने रु. १५.२३ कोटी मुंद्रांक शुल्क भरून दिनांक २६/०४/२०१६ रोजी नोंदणीकृत करणे, सदरहू विकासकाला १७ इमारतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता दिनांक १३/११/२०१४, ०८/०७/२०१६ व ०५/०१/२०१८ मध्ये तीन वेळा देकार पत्रे देऊनही कोणतीच आजतागायत उक्त १७ इमारतीच्या पुनर्विकासाबाबत कार्यवाही केलेली नसल्याने इमारतीतील रहिवाशांनी नविन विकासक नेमण्याबाबत केलेली मागणी, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधित मंत्रीमहोदय, म्हाडाचे संबंधित अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार करून तसेच विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधुन नविन विकासक नेमण्याबाबत मागणी करून ही आजतागायत शासन स्तरावर कोणती कार्यवाही झालेली नसणे, परिणामी रहिवाश्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरलेला असून विकास कामांना बसत असलेली खीळ, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ इमारतीच्या पुनर्विकासाकरिता विकासकाची नेमणूक करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.” | श्री. रविंद्र वायकर वि. स. स. | कित्ता |
| (३२२) | “मुंबई सांताक्रुझ, गोळीबार एसआरए प्रकल्पात २७ हजार झोपडयांचा समावेश असून या प्रकल्पांच्या विकासाची जबाबदारी शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि. या कंपनीकडे असणे, सन २००६ पासून प्रकल्प सुरुवात होऊन २६ वर्षे उलटूनही प्रकल्प पुर्णतः रखडला असणे, शिवालिक व्हेंचर्सकडून त्याठिकाणच्या सुमारे ७८०० झोपडया तोडण्यात आल्या असणे,गेल्या १६ वर्षापासून अनेक झोपडपट्टीवासियांनी भाडे थकीत असून, बहुतांशी झोपडीवासियांना भाडे दिले नसल्यामुळे हजारो कुटुंबियांना रस्त्यावर राहण्याची वेळ येणे,या प्रकल्पातून अद्यापपर्यत २००० कुटुंबसुध्दा पक्की घरे दिलेली नसणे, ट्रान्सिस कॅम्पमध्ये ८०० कुटूंबांना स्थलांतर केले असले तरी ती घरेही मोडकळीस आली असून राहण्यासाठी योग्य नसणे, शिवालिक व्हेंचर्स या विकासकाने एस.आर.ए.म्हाडा व महानगरपालिकेचे करोडो रुपये थकविले असल्याचे निदर्शनास | श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार,श्री. अस्लम शेख,श्री. झीशान सिद्दिकी,श्री. अमिन पटेल,प्रा. वर्षा गायकवाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | येणे, महानगरपालिकने वेळोवेळी विकासकाला नोटीस पाठवूनही सदर बाकी भरली न जाणे, म्हाडा व महानगरपालिकेच्या भूखंडावर बनविलेला ट्रान्झिस्ट कॅम्पची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, यामध्ये राहणे नागरिकांना असह्य होत असणे, झोपडपट्टीवासियांचे योग्य पुनर्वसन न करता विकासकाने विक्रीसाठी केलेली ४०० घरे विकून पैसा कमवला असूनही झोपडपट्टीवासियांना घरे बांधून देण्यास असमर्थतता दर्शविणे, उक्त प्रकल्प इतके वर्षे रखडला असून स्थानिक नागरिकांना पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने सखोल चौकशी करुन एसआरएच्या ३ के स्कीमला त्वरीत रद्द करुन इतर विकासकामार्फत सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | | |
| (३२३) | "पंतप्रधान आवास योजनेसाठी जिल्हा प्रशासनाने महापालिकेला तिसगाव, पडेगाव, हर्सुल, चिकलठाणा, सुंदरवाडी या ठिकाणी जागा दिल्या असणे. या जागांवर सुमारे ४० हजार घर बांधणीसाठी स्थळ पाहणी न करता DPR तयार करणे, मार्च २०२२ पर्यंत निविदा प्रक्रिया अंतिम करणे गरजेचे असल्यामुळे घाई गडबडीत त्याची निविदा प्रक्रिया पण राबवली जाणे घरे बांधण्यासाठी दिलेल्या जागेवर अतिक्रमण, डोंगराळ भाग व खदाणी असणे, महापालिकेने या गृहनिर्माण योजनेसाठी एकाच कंत्राटदाराला पात्र करणे, कंत्राटदाराची आर्थिक कुवत न तपासता त्याला कार्यारंभ आदेश देणे, कंत्राटदाराने निविदेप्रक्रिये मध्ये रिंग करून निविदा मिळविणे नंतर महानगरपालिकेने झालेली निविदा प्रक्रिया रद्द करणे, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत गरजू व गरीब नागरिकांना तात्काळ घरे मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. हरिभाऊ बागडे वि. स. स. | कित्ता |
| (३२४) | "मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी. चाळ परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वास्तव्य असणारे व शासन निर्णयानुसार संरक्षणास पात्र असणारे अधिकृत भाडेकरु झोपडीधारकांवर अचानक बी.डी. डी.चाळीचे नव्याने आलेल्या चाळ अधीक्षक यांनी कारवाई करणे, कारवाई झालेल्या झोपड्या सन २००० पूर्वीच्या असून त्याची नोंद मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या सर्वेमध्ये असणे, सन २००० च्या शासन निर्णयानुसार सार्व.बांधकाम विभागाने या झोपडीधारकांकडील असलेले पुरावे पाहून भाडेदारी हस्तांतर शुल्क रु.४०,०००/- आकारुन झोपडीधारकांना नियमित करण्यात आलेले असणे, आजतागायत | श्री. अजय चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | या झोपडीधारकांचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग नियमित स्विकारत असणे, विशेषतः सदर कारवाई करतांना झोपडपट्टीधारकांच्या कागदपत्राची कोणत्याही प्रकारची तपासणी न करता व त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता कांही झोपडीधारकांच्या झोपड्या जमीन दोस्त करण्यात येणे, सदर कारवाई करतांना पोलीस संरक्षण न घेता खासगी सुरक्षा रक्षकांच्या उपस्थितीत झोपड्या जमीनदोस्त करण्यात येणे, याबाबत झोपडीधारकांनी वरळी पोलीस ठाणे व पोलीस कंट्रोल रुमकडे तक्रार केल्यानंतर वरळी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी हजर होत झोपडीधारकांची बाजू ऐकून व कागदपत्रे तपासून सदर कारवाई थांबविण्याची विनंती बी.डी.डी. चाळीच्या व्यवस्थापकास करुनही त्यांना न जुमानता जोपड्या जमीन दोस्त करण्यात येणे, उक्त कारवाई झालेले झोपडीधारक गेल्या अनेक वर्षापासून झोपड्यांची दुरुस्ती करण्याची परवानगी मागत असणे, तसेच बी.डी.डी.चाळ पुनर्वसनात या झोपड्यांचा समावेश व्हावा आणि आपल्याकडे असलेल्या सर्व कागदपत्रे व पुराव्यांची सक्षम अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करावी आदींसाठी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्व.बांधकाम मंत्री, म्हाडा, सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी यांच्याकडे पाठपुरावा करीत असणे, शासन निर्णयानुसार पात्र असलेल्या उक्त झोपडीधारकांकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन या झोपडीधारकांचे योग्य पुनर्वसन करणे आवश्यक असतांना याउलट त्यांना अनधिकृत गृहीत धरुन मनमानी पध्दतीने बी.डी.डी चाळीच्या व्यवस्थापकाने त्यांच्यावर कारवाई करणे, ज्या झोपडीधारकांच्या झोपड्या पाडल्या आहेत त्यांना तात्पूरत्या जागा देण्यासाठी त्यांचे शासकीय गोडावूनमध्ये किंवा संक्रमण शिबिरात योग्य ती कागदपत्रे देउन त्यांना स्थलांतरीत करावे अशी मागणी उक्त झोपडीधारकांकडून होत असणे, शासनाने यासर्व प्रकरणाची चौकशी करून केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रीया." | | |
| (३२५) | "मुंबई शहराच्या विकासामध्ये गिरणी कामगारांचा मोलाचा वाटा असून मुंबईमध्ये डी सी रूल मध्ये १९९०-९१ सालात बदल केल्यामुळे मुंबईमध्ये कारखाने गिरण्या चालवणे ऐवजी बंद करून त्या जागेचा विकास करण्याला प्रोस्ताहन मिळाले ही बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, गिरण्या बंद झालेल्या जागेवर मॉल व निवासी इमारती उभ्या करण्यात आल्या असणे, या प्रक्रियेला विरोध सर्वच गिरणी कामगारांनी करणे, गिरणी कामगारांच्या मागण्या प्रामुख्याने सरकारचा नागरिक कमाल जमीन धारणा कायदा | श्री. प्रकाश आबिटकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | शासन निर्णय प्रभावाने रद्द करणे, गिरणी कामगारांना मुंबईत गिरण्यांच्या जागी घर देऊन पुनर्वसन करणे, पुनर्वसन नागरिक कमाल जमीन धारणा कायद्यामधील जमिनीवर करणे, गिरणी कामगारांना मोफत घर देणे या असणे, त्याचे परिणाम मुंबईचे बंद गिरण्यातील कामगारांना मुंबईत घरे देऊन गिरण्यांच्या जागेत त्यांना त्यांच्या वारसांना नोकऱ्या देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा नियम सरकारला करावा लागणे यात एक लाख ७५ हजार गिरणी कामगारांची घरे मिळण्याची नोंद होणे इतक्या मोठ्या संख्येपैकी आजातागायत मात्र पंधरा हजार गिरणी कामगारांनाच आठ वर्षात घरे उपलब्ध होणे, तसेच कोणत्याही गिरणी कामगारांच्या वारसदारांना नोकऱ्या देण्यात न येणे, याबाबत तत्का. गृहनिर्माण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७/४/२०२२ रोजी कामगारांच्या घर वाटपासंदर्भात धोरण निश्चितीबाबत बैठक पार पडणे, बैठकीमध्ये मंत्री महोदयांनी मुंबई गिरणी कामगारांसाठीच्या घरासंदर्भात सविस्तर चर्चा करणे त्यामध्ये म्हाडा व एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्देश देणे, प्रामुख्याने मुंबई गिरणी कामगारासाठी मौजे कोण तालुका पनवेल जिल्हा ठाणे येथे डेंटल हाऊसिंग अंतर्गत एमएमआरडीए कडून माडाकडे प्राप्त होणाऱ्या जोड सदनीकांवर दुरुस्तीसाठी काही खर्च अपेक्षित आहे तो म्हाडा कडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनीकांच्या किमतीतून वजा करून उर्वरित रक्कम म्हाडाने एमएमआरडीएला प्रदान करणे, मौजे कोण तालुका पनवेल जिल्हा ठाणे येथील एम.एम.आर.डी.ए. कडून म्हाडाकडे प्राप्त होणाऱ्या घरांसाठी काढलेल्या सोडीतीतील पात्र लाभार्थी घर घेऊ इच्छित नसल्यास त्यांना तशी लेखी विनंती म्हाडाकडे करावी व त्यानुसार संबंधितांची नावे लाभार्थींच्या यादी मधून वगळून ती पुढील सोडतींमध्ये घेण्यात येणे, मुंबईतील गिरण्या जागेवरील सेस इमारतीचा पुनर्विकास म्हाडाच्या मुंबईत इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने तर उर्वरित जागेचा पुनर्विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेने कालबद्ध कार्यक्रम आखून करणे मुंबई गिरणी कामगारातील बांधलेल्या घरांसाठी सोडती काढलेल्या घरांचा ताबा पुढील दोन महिन्यात संबंधित कामगारांना देण्यात येणे (मा. न्यायालयीन बाबी व इतर वादग्रस्त बाबी वगळून) मुंबई गिरणी कामगारांची पात्रता तपासताना म्हाडाच्या स्तरावर काही अडचण उद्भवत असल्यास ती दूर करण्यासाठी एखाद्या खाजगी यंत्रणेची मदत घेऊन म्हाडाकडून कालबध्दपणे पोग्राम आखण्याची आवश्यकता असणे, वर्षानुवर्षे गिरणी | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | कामगारांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित राहल्याने बहुतांशी गिरणी कामगार कालपरत्वे मृत्युमुखी पडणे त्यामुळे हयात असणाऱ्या व मयत कामगारांच्या वारसांना वेळेत घरे मिळण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.” | | |
| (३२६) | “मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या ५६ वसाहतींना वाढीव सेवाशुल्कापोटी आलेली बिले, त्यात म्हाडाने सन २०१७ पासून सेवाशुल्कात केलेली वाढ, काही संस्थांना सन १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सेवाशुल्काचा भरणा करण्याबाबत पाठवलेली बिले, एकेका संस्थेस लाखाची आलेली बिले, संस्थांनी १९९८ ते २०१७ पर्यंत नियमित सेवा शुल्काचा भरणा केलेला असताना देखील त्यांना मागील सेवा शुल्क भरण्याबाबत नव्याने पाठवण्यात आलेली जाचक बिले, म्हाडा वसाहतीतील बहुतांश घरे अत्यल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटातील असणे, संस्थांना आलेली लाखोंची व करोडोंची बिले भरणे शक्य नसणे , बहुतांश वसाहतींना म्हाडामार्फत फक्त पाण्याची सुविधा मिळत असणे, इतर सुविधांसाठी आकारण्यात येत असलेली रक्कम रद्द करण्याची मागणी, सन १९९८ च्या पासून ज्या संस्थांनी सन दोन हजार सतरा पर्यंत नियमित सेवा शुल्काचा भरणा केला आहे त्यांना यातून वगळण्याची रहिवाशांची मागणी असणे, या सर्व प्रकारांमुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व उपाययोजना.” | श्री. मंगेश कुडाळकर वि. स. स. | कित्ता |
| (३२७) | “मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या ५६ वसाहतींस वाढीव सेवाशुल्कापोटी आलेली बिले, त्यात म्हाडाने सन २०१७ पासून सेवाशुल्कात केलेली वाढ, काही संस्थांना सन १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सेवाशुल्काचा भरणा करण्याबाबत पाठवलेली बिले, एकेका संस्थेस लाखांची आलेली बिले, संस्थांनी १९९८ ते २०१७ पर्यंत नियमित सेवाशुल्काचा भरणा केलेला असताना देखील त्यांना मागील सेवाशुल्क भरण्याबाबत नव्याने पाठविण्यात आलेली जाचक बिले, म्हाडा वसाहतीतील बहुतांश घरे अत्यल्प उत्पन्न व मध्य-उत्पन्न गटातील असणे, संस्थांना आलेली लाखोंची व करोडोंची बिले भरणे शक्य नसणे, बहुतांश वसाहतींना म्हाडामार्फत फक्त पाण्याची सुविधा मिळत असणे, इतर सुविधांपोटी आकारण्यात येत असलेली | श्रीमती विद्या ठाकूर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | रक्कम रद्द करण्याची मागणी, सन १९९८ पासून ज्या संस्थांनी सन २०१७ पर्यंत नियमित सेवाशुल्काचा भरणा केला आहे त्यांना यातून वगळण्याची रहिवाशांची मागणी असणे, या सर्व प्रकारामुळे रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३२८) | "जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रातील म्हाडाच्या अखत्यारित येत असलेल्या इमारतींच्या अभिहस्तांतरण व पुनर्विकास तसेच मोकळया भूखंडाचा होत असलेला गैरवापर आदिकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, म्हाडाच्या अखत्यारितील बिंबीसार नगर येथील अनेक गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीचे अभिहस्तांतरण गेल्या १९ वर्षापासून रखडलेले असणे, त्याचबरोबर पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ इमारतींच्या पुनर्विकास विकासकाच्या नेमणूकीअभावी रखडलेला असणे, सदरहू विकासकाला १७ इमारतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता दिनांक १३/११/२०१४ , ०८/०७/२०१६ व ०५/०१/२०१८ मध्ये तीन वेळा देकार पत्रे देऊनही अदयाप १७ इमारतीच्या पुनर्विकासाबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, या इमारतींपैकी कांही इमारती अतिधोकादाय असून कोणत्याही क्षणी कोसळून जिवीतहानी होण्याची शक्यता, तसा अहवालही शासनास प्राप्त होणे, रहिवाशी जीव मुठीत घेऊन वास्तव्य करित असणे, मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात यासंदर्भात तातडीची बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही अदयाप बैठक घेण्यात आलेली नसणे, सदर इमारतीचा पुनविर्कास म्हाडाच्या माध्यमातून करणे अथवा खाजगी विकासकाची तात्काळ नेमणूक करुन करण्यात आलेल्या सूचना विचार करण्याची गरज, तसेच कोकणनगर, मौजे मजास ता.अंधेरी येथे म्हाडाचा सी.टी.एस नं १६९ या मोकळया भूखंडावर मोठया प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, सदर भूखंडाचा होत असलेला गैरवापर, शासनाला सर्व शासकिय कार्यालय एकाच छताखाली घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन घेण्याची आवश्यकता, त्याअनुषगाने शासनाने शिधावाटप कार्यालय, दुय्यम निबंधक, निवडणूक कार्यालय आदि मोकळया भूखंडावर आणल्यास सर्वसामान्य नागरिकांची होणारी गैरसोय दूर होण्यास मदत होणे, सदर इमारतीचा विकास म्हाडाच्या माध्यमातून करण्याची नितांत आवश्यकता, इमारतीचा पुनर्विकास करतांना नेमण्यात येणाऱ्या विकासकांकडून किती कालावधीत इमारतीचा पुनर्विकास करण्यात येणार याबाबत हमीपत्र घेण्याची गरज, उपरोक्त इमारतीच्या प्रलंबित | श्री. रविंद्र वायकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | असलेल्या समस्याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंकडून सातत्याने होत असलेला पाठपुरावा, याबाबत शासनाने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| (३२९) | "मुंबई उपनगरातील विक्रोळी ( पूर्व ) कन्नमवार नगर येथील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या इमारतीचा पुर्नविकासाचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणांकडून ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, विक्रोळी ( पूर्व ) कन्नमवार नगर व टागोरनगर हा म्हाडा लेआऊट असून कामगार वसाहतीत हे रुग्णालय असणे, घाटकोपर ते मुलुंड पर्यंतच्या परिसरातील किंबुहना पूर्व द्रुतगती महामार्गालगत असलेले महापालिकेचे एकमेव रुग्णालय असणे, या रुग्णालयाचा लाभ विक्रोळी, कन्नमवार, टागोरनगर ,कांजूर, भांडूप, सुर्यनगर या परिसरातील रुग्णांना होतो तसेच पुर्व द्रुतगती महामार्गावरील अपघात ग्रस्तांना या रुग्णालयात उपचाराअभावी फारच गैरसोय होत असणे, रुग्णालयाच्या पुनर्विकास तातडीने व्हावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने म्हाडा व महापालिकाच्या संबंधित विभागाशी बैठका घेऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, स्थानिक नागरिकांनी दिनांक १५ सप्टेंबर,२०२२ रोजी केलेले आंदोलन, सदर आंदोलनाची दखल घेऊन मा.मुख्यमंत्री महोदयानी म्हाडा प्राधिकरणाकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क किंबुहना मोबदला न घेता तात्काळ "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल तसेच पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण करण्यात येईल व पुनर्विकासादरम्यान सदरचे रुग्णालय याच परिसरातील बंद अवस्थेत असलेल्या सुश्रुषा रुग्णालय स्थलांतरीत करण्यात येईल असे आश्वासन देऊनही अदयाप म्हाडा प्राधिकरणाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, परिणामी रुग्णालयाचा पुनर्विकास अदयापही रखडलेला असणे, त्याचबरोबर क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचे बंद अवस्थेत असलेल्या सुश्रुषा रुग्णालय स्थलांतर झाले नसल्याने प्रचंड गैरसोय होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून रुग्णालयाच्या पुनर्विकासाबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | श्री. सुनिल राऊत,श्री. रमेश कोरगांवकर,श्री. संजय पोतनीस, श्री. रविंद्र वायकर,श्री. सुनिल प्रभू, श्री. प्रकाश फातर्पेकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (३३०) | “मुंबईतील ग्रँटरोड (प), तुकाराम जावजी रोड, दत्तात्रय सहकारी गृहनिर्माण संस्थेची सदनिका क्रमांक ३/५५ मधील रहिवाशी सदनिकाधारक यांचेसह शेकडो भाडेकरु रहिवाशी कुटुंबांना कार्यकारी अभियंता, डी-२ डिव्हिजन, मुंबई इमारत दु. व पु. मंडळ, म्हाडा यांचेतर्फे ९५-ए अंतर्गत घरे रिक्त करण्याच्या दि.२७.२.२०२३ रोजी नोटीसा पाठविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात नोटीसचे उत्तर सादर करण्यासाठी रहिवाशी धारक गेले असता त्यांना नोटीस रद्द करायची असेल तर पुनर्विकासासाठी संमतीपत्रावर सह्या मागण्याची सक्ती कार्यकारी अभियंता आणि विकासक लोढा यांचे प्रतिनिधी यांनी सक्ती करण्यात आल्याचा घडलेला धक्कादायक प्रकार, सदरहू दत्तात्रय सहकारी गृहनिर्माण संस्थेचे म्हाडा अधिनियम प्रकरण ८-अ कलम १०३ (ब) अंतर्गत पूर्वी सादर केलेला प्रस्ताव रद्द झालेला नसताना व याबाबत सर्वोच्च न्यायालयाची परवानगी नसताना तसेच सदरहू संस्थेचे भूसंपादन शासनाने परस्पर बेकायदेशीर रित्या रद्द केल्याचे प्रकरण मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे सन २०१४ पासून प्रलंबित असताना मायक्रो डेव्हलपर्स कंपनीच्या विकासकाने म्हाडाचे मुख्य अधिकारी व संबंधित अभियंता यांचेबरोबर संगनमत करुन गृहनिर्माण संस्थेच्या रहिवाश्यांना पुनर्विकासासाठी सक्तीने कागदपत्रे सादर करण्याबाबत बेकायदेशीर रित्या नोटीसा पाठविण्यात आल्याने रहिवाशी कुटुंबांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण तयार होणे, तसेच उक्त सहकारी संस्थेच्या इमारतीत तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी यांनी त्यांचे भाऊ इमारत क्र.२ मध्ये रुम नं.४२ हि सदनिका तसेच म्हाडाचे माजी अभियंता यांनी इमारत क्र.१ मध्ये रुम नं.१९ तर त्यांचा मुलगा यांनी इमारत क्र.४ मध्ये रुम नंबर १ आदि तीन सदनिका म्हाडा व शासनाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदा सदनिका खरेदी करण्यात येऊन सदरहू अधिकारी अभियंता यांनी सदरहू गृहनिर्माण संस्थेचे प्रकरण ८ अ कलम १०३-ब चा प्रस्ताव कायद्यात बसत नसनाही दि.१०.०३.२०१६ रोजी भूसंपादन रद्द केल्याची आधिसूचना जारी करण्यासाठी सहभाग दर्शविण्यात आल्याचा प्रकार घडणे, एकंदरितच सदरहू गृहनिर्माण संस्थेचा १०३-ब चा प्रस्ताव रद्द झालेला नसताना व त्याकरिता मा.सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिलेली नसताना शासन व म्हाडाचे संबंधित अधिकारी आर्थिक संगनमताने विकासकाची एकतर्फी बाजू घेऊन संस्थेची इमारतीतील रहिवाशी कुटुंबांवर सक्तीने पुनर्विकास योजना लागू करीत असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने उच्च स्तरावरून चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | श्री. अतुल बेनके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (३३१) | "मुंबईतील चिंचपोकळी (पूर्व) डॉक्टर कंपाऊंड येथील सी.एस.क्र.१ए/७८२, २/७८३, ७८४, ७८५ आणि ७८६ माझगांव विभाग या जुन्या उपकरप्राप्त प्रोग्रेसिव्ह चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पात १६ वर्षे इतका कालावधी होऊनही विकासकाने १९९ पैकी १०४ भाडेकरुंचे पुनर्वसन केले नसल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच दि.१३.०३.२०२३ रोजी उघडकीस येणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाला देय असलेल्या ३ हजार ५९५ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळापैकी केवळ २०१७ साली १२२० चौ.मी. क्षेत्रफळच सुपुर्द करुन उर्वरित २३७४.९६ चौ.मी. क्षेत्रफळ विकासकाने म्हाडाचे मुख्य अधिकारी व संबंधित अधिकार यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन परस्पर विक्री करुन ३२ कोटीचा आर्थिक घोटाळा केल्याचे निदर्शनास येणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात ५ इमारतीं पैकी ३ पुनर्वसनासाठी इमारत व एक विक्रीसाठी आणि १ संयुक्त याप्रमाणे बांधकाम करण्याचे प्रस्तावित करण्यात येणे, सन २०१६ मध्ये शासनाने प्रकल्पास परवानगी देताना भाडेकरुंच्या पुनर्वसनाच्या चटई क्षेत्रफळामध्ये चटई क्षेत्र निर्देशांकात मुक्त क्षेत्र फंजीबल क्षेत्र यांचा समावेश करु नये या अटिवर सुधारित ना हरकत प्रमाण पत्र देण्याच्या म्हाडाच्या प्रस्तावास गृहनिर्माण विभागाने सन २०१४ मध्ये मंजूरी देण्यात येणे, तसेच जुन्या इमारतीमधील सर्व वहिवाट दारांचे नव्या इमारतीमध्ये पुनर्वसन झाल्याशिवाय आणि अधिकचे म्हाडाला देय असलेले क्षेत्र म्हाडाकडे स्वाधीन केल्याशिवाय ओ.सी. देण्यात येऊ नये असेही शासनाने स्पष्ट करणे, असे असतानाही म्हाडाने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन व ना-हरकत प्रमाणपत्रांच्या अटींचे पालन केले नसतानाही १० हजार ७८२ चौ.मी. बांधीव क्षेत्रफळाच्या संपूर्ण विक्री इमारतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र नियमाबाह्य व बेकायदशीरपणे देण्यात येणे, उक्त प्रकल्पात गेली ५ वर्षापासून विकासकाने म्हाडाला देय असलेले २३७४.९६ चौ.मी. अतिरिक्त क्षेत्रफळ परस्पर विक्री केले असतानाही अद्याप विकासकाविरुद्ध म्हाडाने कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण कोट्यावधी रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार करुन संगनमताने दडपून टाकणे, तसेच सदरहू प्रकल्पात विकासकाने बांधलेल्या सदनिका चटई क्षेत्र निर्देशांकात मुक्त क्षेत्र आणि फंजीबल क्षेत्र नसल्याचा प्रकार उघडकीस येऊन अद्यापही १०४ भाडेकरुंचे पुनर्वसनासाठी कोणतीच कार्यवाही न करता त्यांना बेघर करण्यात येणे, तसेच सदरहू समस्येबाबत विधानसभेत उपस्थित प्रश्नास चुकीचे उत्तर देऊन शासनाची दिशाभूल करण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, येथील भाडेकरु रहिवाशी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अतुल बेनके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३३२) | "मुंबई उपनगरातील बोरिवली स्थित जुनी एम.एच.बी.कॉलनी मधील अनेक वर्षांपासून इमारतीचे पुनर्विकास रखडलेल्या अवस्थेत असणे, येथील पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित असल्यामुळे इमारतींमध्ये पडझड झाल्याने तात्पुरती डागडुजी करावी लागणे, कांदिवली प. येथील आरएसजी ३, सेक्टर ८, चारकोप येथील म्हाडाच्या भूखंडावर जैस्वाल कंपनीने अतिक्रमण करून भरणी टाकून अनधिकृत झोपड्या उभ्या करणे, म्हाडा प्रशासनाला वारंवार सदर अतिक्रमणाविरोधात स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून देणे, असे असतानाही म्हाडा प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न करणे, सदरहू भूखंडावरील अतिक्रमण निष्कासित करून भूखंड म्हाडाच्या ताब्यात राहण्याची आवश्यकता, नागरिकांनी येथील लोकप्रतिनिधींना वारंवार पुनर्विकास प्रश्न मार्गी लावण्यासाठी विनंती करणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये तसेच सदनिकाधारकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने यावर चौकशी करून पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्याकरीता करावयाची कार्यवाही व उपाययोजना, याकरीता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे." | श्री. सुनील राणे वि. स. स. | कित्ता |
| (३३३) | "राज्य शासनाच्या अंगिकृत विज वितरण महानिर्मिती कंपनीमध्ये कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता या पदाच्या पदभरतीची जाहिरात महानिर्मिती कंपनीमार्फत या वर्षी प्रसिध्द करण्यात येणे, सदर जाहिरातीमध्ये, आरक्षित वर्गाला अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल-Domicile Certificate) सादर करणे अनिवार्य करण्यात आल्याचे निदर्शनास येणे परंतु सदर जाहिरातीमध्ये खुल्या वर्गातील उमेदवारांना तसे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नसल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे नोकरभरतीमध्ये राज्यातील खुल्या प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता न येणे तसेच अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य नसल्याने परराज्यातील उमेदवार सदर भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची शक्यता असल्याने राज्यातील स्थानिक उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध होण्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता, त्यामुळे महानिर्मितीच्या पदभरती प्रक्रियेत सर्व उमेदवारांनाच अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टिफिकेट) अनिवार्य करण्याबाबत शासनाने तसे शुध्दीपत्रक तातडीने काढण्याची मा. लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी करण्यात येणे व तसेच | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | मा. उपमुख्यमंत्री यांना पत्र-निवेदने देण्यात आल्याचेही माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, परिणामी राज्यातील मा. लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३३४) | "सीना नदीवरील दहा कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे लातूर टाईप बॅरेजमध्ये रुपांतर करण्याची विस्तार व सुधार कार्यक्रमांतर्गत मान्यता मिळालेली असणे, सर्वेक्षण व अंदाजपत्रकाचे काम पूर्ण झालेले असून अद्यापही विभागाकडून कुठलीही कारवाई झालेली नसणे, सदर दहा कोल्हापूर बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या कामास प्रायोगिक तत्वावर मान्यता दिलेली असतांना देखील सद्यःस्थितीत काम स्थगित असणे, सीना नदीवरील दहा कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्याचे लातूर बॅरेजमध्ये रुपांतर करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |
| (३३५) | "राज्यातील कुकडी प्रकल्पातील डिंभे माणिक डोह या बहुप्रतिक्षित बोगद्याच्या कामाला शासनाने मान्यता दिलेली असणे, सदर बोगद्याच्या बांधकामामुळे पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे अतिरिक्त पाणी बोगद्याद्वारे माणिक डोह धरणात साठविले जाणे, सदर अतिरिक्त पाण्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील कर्जतसह पारनेर, श्रीगोंदा आणि करमाळातालुक्यांना कुकडी प्रकल्पातुन एक अतिरिक्त आवर्तन मिळण्याची शक्यता असणे, इतकेच नव्हे तर या बोगद्यामुळे पुणे-सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यातुन जाणाऱ्या राज्यातील सर्वात लांब अशा कुकडी डाव्या कालव्याला देखील अतिरिक्त आवर्तन मिळणार असल्याचे व त्यामुळे पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगांव आणि शिरुर तालुक्यातील पाण्याचा कोटा आहे तसाच राहणार असल्याने त्यावर कोणताही परिणाम होणार नसल्याचेही निदर्शनास येणे, याप्रकरणी शासनाने काही त्रुटी काढून त्याची पूर्तता करण्याबाबत कार्यकारी संचालक, म.कृ.खो.वि. महामंडळ यांना आदेशित करण्यात येणे, त्यानूसार त्रुटींची पूर्तता महामंडळाने करण्यात येऊन त्याबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात येणे व सदर प्रस्तावात, "कुकडी प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता शासनाने दिनांक ०८/११/१९६६ मध्ये दिलेली असल्याने सदरहु प्रशासकीय मान्यताही केंद्रीय पर्यावरण विभागाच्या नोटीफिकेशनच्या पुर्वी प्राप्त झालेली असल्याने आता नव्याने या प्रकल्पास पर्यावरण तसेच केंद्रीय जल आयागाच्या मान्यता घेण्याची आवश्यकता नसल्याचे प्रस्तावात महामंडळाकडून नमूद | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | करण्यात येणे, अतिरिक्त पाणी बोगद्याच्या माध्यकातून माणिक डोह धरणात साठविण्यात आल्यास, धरण दरवर्षी भरणार असल्याने पूढील काळात कूकडी प्रकल्पासाठी पाणी कमी पडणार नसल्याचे दिसून येणे, तथापि बोगद्याचे काम सुरु करण्याबाबत जनतेची आग्रही मागणी असून शासनाने अद्याप बोगद्याचे काम सुरु केलेले नसणे, परिणामी त्या भागातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्येची भावना, याबाबत शासनाने सदर बोगद्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देऊन बोगद्याचे काम तातडीने हाती घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भुमिका. ” | | |
| (३३६) | “धनेगाव (ता.केज, जि.बीड) प्रकल्पाची ०.५० मीटर ने उंची वाढवण्यास शासनाने दिनांक ०३/०४/२००१ रोजी मान्यता दिली असणे, सदर काम यांत्रिकी विभाग दापोडी, पुणे यांच्यामार्फत सन २००१ मध्ये सुरु होऊन एका वर्षाच्या आत पूर्ण करण्यात आले असणे, सदर उंची वाढीमुळे केज, जि.बीड तालुक्यातील डाव्या तीरावरील १२ गावांची ५२.१५ हेक्टर शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असणे, परंतु अद्याप सदर शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मावेजा देण्यात आला नसणे, मागील १४ वर्षांपासून मावेजा पासून शेतकरी वंचित असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण होणे, तेव्हा सदर प्रकरणी तातडीने संबंधित शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मावेजा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | श्रीमती नमिता मुंदडा, वि. स. स. | कित्ता |
| (३३७) | “पालघर व डहाणू तालुक्यातील शेती सिंचनाची गरज भागविण्यासाठी सुर्या धरण प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येणे, तथापि सुर्या धरणाच्या डाव्या व उजव्या तीर कालव्यांसह संलग्न असलेले शाखा, कालवे व लघुपाट इत्यांदीची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती न होणे, त्यामुळे दुरुस्तीअभावी जागोजागी दुरावस्थातील कालव्यांलगत मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे वाढलेली असल्याचे तसेच पावसाळ्यात डोंगरातून वाहून येणारी माती व गाळ नियमित साफसफाई न झाल्याने बोईसर परिसरात कालव्यांमध्ये गाळ साचल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, त्यामुळे कालव्यातून पाणी जाण्यास अडथळा निर्माण होऊन सिंचनासाठी आवश्यक पाणी मिळत नसल्याने त्या भागातील हजारो शेतकरी उन्हाळी भातशेती व बागायती पिके अशी दुबार शेतीपिके घेण्यापासून वंचित राहिल्याचेही त्यासुमारास (जानेवारी, २०२३) निदर्शनास येणे, तशात चिल्हार-बोईसर भागावरील खाजगी कारखान्यांनी अतिक्रमण करून धरण प्रकल्प | श्री. दौलत दरोडा, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | कालव्यांच्या जागा हडप करून कालव्यांची नासधूस केली असल्याचे निदर्शनास येणे, त्याविरोधात शेतकऱ्यांनी शासनाचे म्हणजे पाटबंधारे विभागाच्या (जलसंपदा) अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात येणे,तथापि शासनाकडून कारखान्यांनी नोटीसा बजावण्यापलिकडे कोणतीही कारवाई करण्यात न आल्याचेही व यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी कारखान्यांना पाठीशी घालण्याची भुमिका घेतली असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास येणे, परिणामी शेतकरी वर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना, शासनाने त्यानुसार कालव्यांची देखभाली अभावी झालेली दुरावस्था व कारखानदारांनी कालव्यांची हडप केलेली जागा व त्यामध्ये अधिकाऱ्यांचा अर्थकारणामुळे दिसून येणारा सहभाग याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३३८) | "राज्यात प्रकल्प कार्यान्वित करतांना बाधित लोकांचे पुनर्वसन करण्यात येणे, पुनर्वसन करताना घरासोबतच तेथील नागरिकांना मूलभूत सोई सुविधा सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणे, परंतू सदर बाधित नागरिकांना सदर जागेचा कब्जा हक्क देताना सदर जागेच्या मूल्यांकनानुसार काही ठराविक रक्कम भरून घेतल्या शिवाय जागेचा कब्जा हक्क दिला न जाणे, प्रकल्प राबविताना प्रकल्पामुळे सदर नागरीक अगोदरच बाधित झालेला असणे, शेतकऱ्यांची जमीन हेच त्यांचे सर्वस्व असून त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालणे, त्यामुळे सदर बाधीत नागरिक कब्जा हक्क रक्कम भरू शकत नसणे, पर्यायाने सदर बाधितास जमिनीचा किंवा मिळालेल्या घराचा हक्क न मिळणे, त्यामुळे राज्यभरातील अनेक प्रकल्पग्रस्तांनी कब्जा हक्क रक्कम भरलेली नसल्याने त्यांना त्यांच्या हक्काचं घर मिळालेले नसणे, तसेच केवळ याच कारणामुळे अनेक पुनर्वसनाचे प्रकल्प रखडलेले असणे, उदा. माझ्या चिखली तालुक्यातील पेन टाकळी प्रकल्पातील घाणमोड, मानमोड, अंशतः बाधीत पांढर देव या पुनर्वसित गावातील नागरिकांना अजूनही त्यांच्या प्लॉटचा कब्जा हक्क दिलेला नसणे, कोणतेही पुनर्वसन करताना त्या ठिकाणी सर्व सुविधा शासनाकडून उपलब्ध करून देत असताना केवळ कब्जा हक्क रक्कम बधिताकडून घेणे संयुक्तिक नसणे, यासाठी पुनर्वसीत गावातील लाभार्थींना प्लॉट किंवा घरे देताना कब्जा हक्क रक्कम न घेता देण्यात यावे किंवा कब्जा हक्क रक्कम शासनाने भरावी अशी होणारी मागणी, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती श्वेता महाले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (३३९) | "भिवंडी (जि.ठाणे) मधील खारभूमी योजनेच्या खूप मोठ्या खाडी असून खाड्यांमधील खार पाणी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, ग्रामपंचायत कांबे हद्दीतील तळेखार खारभूमी योजनेत मोठ्या प्रमाणात खांडी असणे, सदरच्या खांडी दुरूस्ती करण्याची स्थानिक लोकप्रतीनिधी व शेतकऱ्यांकडून उपविभागीय अंभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी यांच्याकडे वर्षानुवर्षे होत असलेली मागणी, परंतु संबंधित अधिकारी शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच अंजूर दिवे खारभूमी योजना या योजनेच्या बांधावर कोणत्या प्रकारे काम न झाल्याचे निदर्शनास येणे, त्याकामांचे उपविभागीय अंभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी यांच्या मार्फत प्रत्यक्षात काम न झाल्याचे देयक (बी-१/६७-२०१९-२०२०) कंत्राटदाराला अदा करणे, तसेच मालोडी ग्रामपंचायत, ता.भिवंडी जि.ठाणे हद्दीतील अन्नपुर्णा खारभुमी योजनेच्या अंतर्गत मोठ्या प्रमाणात खांडी असून मागील दोन वर्षे पासून शेतकऱ्यांकडून खांड्यांची दुरुस्ती करण्यात यावी याकरिता उपविभागीय अंभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी यांच्याकडे मागणी करुनही संबंधित अधिकाऱ्याकडून कोणती कार्यवाही न करणे, शेतकऱ्यांच्या शेती नापीक करुन शेतजमीन विकासकांना विकण्यास भाग पाडण्यास संबंधित अधिकाऱ्यामार्फत प्रवृत्त केले जात असल्याचे तक्रार प्राप्त असणे, संबंधित अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी काम करत असणे स्थानिक नागरिकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, खाऱ्या पाण्यामुळे शेतजमीनीचे होणारे नुकसान तसेच स्थानीक लोकांच्या घरात खारपाणी जाऊन घराचे होणारे नुकसान थांबविण्यासाठी तसेच अधिकाराचा गैरवापर करणाऱ्या उपविभागीय अभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी, जि.ठाणे यांच्याविरुद्ध शासन कोणती तातडीची कार्यवाही व उपाययोजना करणार आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. महेंद्र दळवी, श्री. शांताराम मोरे, वि. स. स. | कित्ता |
| (३४०) | "माझ्या माळशिरस मतदार संघातील कायम दुष्काळी भागाला पाणी मिळावे म्हणून नीरा देवधर धरणाची योजना तयार करण्यात येणे, सन १९८४ साली महाराष्ट्र सरकारने सातारा व सोलापूर जिल्ह्यातील कायम दुष्काळी भागाला पाणी मिळावे म्हणून नीरा देवधर धरणाची योजना तयार करण्यात येणे, सन १९९५ साली युती सरकारने या योजनेला मंजुरी देऊन प्रत्यक्ष कामाला सुरूवात होऊन व सन २००१ ला १२ टीएमसी क्षमतेचे धरण बांधून पूर्ण होणे, सन २००१-०२ पासून या धरणातील पाणी वीर धरणात सोडण्यात येत | श्री. राम सातपुते वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | असणे, या पाण्याचा उपयोग या धरणाच्या कार्यक्षेत्राबाहेरील गावांना होत असणे, माळशिरस तालुक्यातील २२ गावांपैकी १६ गावांना या योजनेचा लाभ मिळावा म्हणून आपल्या युती सरकारकडून सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर करणे, परंतु २२ गावांपैकी ९ गावे अद्यापही या योजनेत समावेश होण्यापासून वंचित असणे, माहे मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये भरीव निधीची तरतूद करून फडतरी (शिवारवस्ती), लोंढेमोहितेवाडी, भांब, गारवाड,मगरवाडी, पठाणवस्ती, तरंगफळ, सुळेवाडी, शिंगोर्णी व बचेरी या गावांचा समावेश नीरा देवधर प्रकल्प योजनेमध्ये समावेश होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३४१) | "सांगली व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला कायमस्वरूपी पाणी मिळावे यासाठी शासनाने टेंभू योजना सुरू करणे, परंतु टेंभू सिंचन योजना ३० वर्षांपासून रखडली असणे, मुख्य जोड कालव्यासह पोट कालव्यांच्या अस्तरीकरणाचे काम निकृष्ट झाले असणे, वारंवार तक्रारी करूनही कामे पारदर्शक झाली नसणे, अस्तरीकरणाच्या कामास तडे गेल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असणे, त्यामुळे मागील काही वर्षांत या योजनेच्या झालेल्या कामाची चौकशी व्हावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होणे, सांगली व सोलापूर दुष्काळी भागातील सुमारे ८० हजार हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याची ही योजना असून आशिया खंडातील सर्वात मोठी योजना म्हणून ही योजना ओळखली जाणे,कराड येथील कृष्णा नदीचे पाणी अडवून चक्क सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यापर्यंत सुमारे २१३ गावांना पाणी देण्याचा या योजनेचा मूळ उद्देश असणे, टेंभू योजना सुरू झाल्यापासून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची चर्चा सातत्त्याने जनमानसात होत असणे, या योजनेच्या अस्तरीकरणाला केवळ दोन ते तीन वर्षात तडे जाणे, या योजनेचे काम जलद करण्यापेक्षा योजना वर्षानुवर्षे रखडत ठेवणे, याकडेच अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नसणे, असे आरोप शेतकरीवर्गातून होत असणे, परिणामी २७ वर्षांत ही योजना आज देखील पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसणे, त्यामुळे दुष्काळी जनतेमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून टेंभू धरणाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया." | श्री. विश्वजित कदम,श्री. अशोकराव चव्हाण वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| (३४२) | “वालदेवी नदीवरील जलसंपदा विभागाचे अखत्यारीतील सिंचनासाठी बांधलेल्या बंधाऱ्यांच्या यांत्रिकीद्वारे दारांची उघडझाप दुरुस्ती होणेसाठी स्थानिकांची वारंवार मागणी असणे, त्या मागणीनुसार स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागाकडे पाठपुरावा करणे, त्यानुसार मा.मंत्री जलसंपदा यांचेकडे दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी बैठक होऊन तात्काळ दुरुस्ती करणेच्या सूचना देण्यात येणे, दरम्यान कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी सदरचे काम तात्काळ मंजूर करणेसाठी मुख्य अभियंता यांनाही सूचना देणे, कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी क्षेत्रिय कार्यालयाद्वारे सदरचे काम कृती आराखड्यात होणेच्या सूचना देणे, त्यानुसार दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या तत्कालीन अधिक्षक अभियंता यांच्या पत्रानुसार वालदेवी नदीवरील बंधारे दुरुस्तीकरिता रु.१.४१ कोटी निधी उपलब्ध होणे, तात्कालीन अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांनी वालदेवी बंधाऱ्यांचे काम देखभाल दुरुस्ती अंतर्गत मंजूर असतानाही स्थगितीच्या यादीखाली शासनास कळविणे, या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना व अधिक्षक अभियंता यांनी निधी अनुपलब्धतेबाबत कुठलाही पत्रव्यवहार झालेला नसताना दिनांक १४ डिसेंबर, २०२२ च्या पत्रान्वये सन २०२२-२०२३ करिता वालदेवी बंधाऱ्यांचे देखभाल दुरुस्तीचे काम रद्द करणे, वास्तविक देवळाली नाशिक मतदार संघातील हे विकास काम राजकीय आकसापोटी तत्कालीन अधिक्षक अभियंता, नाशिक यांनी रद्द केलेले असणे, नाशिक डावा कालव्याचे प्रशासकीय मान्यता दिलेले विशेष दुरुस्तीचे रु.२.२० कोटीचे काम देखील जाणीवपूर्वक सहा महिने प्रलंबित ठेवलेले असणे, तत्कालीन अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास, नाशिक यांनी हेतुःपुरस्सर निधी व्यपगत केलेला असणे, राजकीयदृष्टीने प्रेरित होऊन विकास कामात अडथळा आणलेला असणे, एकंदरीत जलसंपदा विभागाच्या या विकास कामात हलगर्जीपणा करणाऱ्या या तत्कालीन अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई होणेची गरज, निधी उपलब्धेबाबत हलगर्जीपणा केलेला असणे, याप्रकरणी विभागीय चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई होणेची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व त्याबाबत शासनाची भूमिका.” | श्रीमती सरोज आहिरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>( १ ) | थोडक्यात विषय<br><br>( २ ) | सदस्यांची नावे<br><br>( ३ ) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>( ४ ) |
|---|---|---|---|
| ( ३४३ ) | “लातूर ( जि. लातूर ) तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाची दुरुस्ती मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे अद्याप मोठ्या प्रमाणात पाणीगळती होऊन परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी व शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे, त्यामुळे मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी तत्कालीन शासनाकडे पाठपुरावा करणे, त्यामुळे सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीची पाहणी केली जाणे, यामुळे शासनाने सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी ४१ कोटी ५९ लाख रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकाला दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देणे, मात्र या अंदाजपत्रकाला प्र.मा. मिळून एक वर्ष उलटले असतानाही अद्याप निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नसणे, त्यामुळे सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम रखडणे, त्यामुळे शासनाने या प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून दुरुस्तीचे काम शासनाने तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी होत असणे, परंतु त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. धिरज देशमुख वि. स. स. | कित्ता |
| ( ३४४ ) | “अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा प्रकल्प व वर्धा जिल्ह्यातील लोअर वर्धा प्रकल्प गेल्या १२ ते १५ वर्षापासून पूर्ण झालेला असणे, हे दोन्ही प्रकल्प पावसाळ्यामध्ये १०० टक्के क्षमतेने भरल्यानंतर प्रकल्पाच्या गेट मधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विर्सग होत असणे, या दोन्ही प्रकल्पाचे पाणी वर्धा नदी पात्रात सोडण्यात येणे, त्यामुळे नदी पात्रालगत असलेली अमरावती जिल्ह्यातील सिंभोरा, येवती, भांबोरा व वर्धा जिल्ह्यातील बेल्होरा, खंबित, गोदावरी, टेकोडा ता. आष्टी व आर्वा तालुक्यातील रोहना, दह्यापुर, सायखेडा अशा अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात पाण्याने नुकसान होणे, तसेच लोअर वर्धा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने भरल्यानंतर प्रकल्पाच बॅक वाटर राजापूर, देवूरवाडा, निबोंली येथील शेतकऱ्याच्या शेतात पाणी जमा होणे व येथील लोक वस्ती असलेल्या नागरीकांच्या घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, त्यामुळे शेतकऱ्यांना व नागरिकांना १२ ते १५ वर्षापासून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागणे, करिता शेतकऱ्याना झालेल्या पिकाची नुकसान भरपाई देऊन नुकसानग्रस्त शेती अधिग्रहित करून धरुन नदी किनाऱ्यावरील नागरिकांच्या घराचे पुनर्वसन करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. दादाराव केचे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३४५) | “पुणे जिल्हयातील भामा आसखेड धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी (राजगुरुनगर) तालुक्यातील मौजे नाणेकरवाडी, गोणवडी, रासे, कडाचीवाडी, खराबवाडी, चाकण,काळूस,मेदनकरवाडी आदि १८गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केलेल्या असणे, शासनाच्या दि.५ ऑगस्ट, २०१९ रोजी शासन निर्णयान्वये पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यात अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आलेले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी कालवा नको, कालव्यामधून शेतीला पाणी नको, अशी भूमिका घेऊन ग्रामपंचायतीने तसे ठराव पारित केलेले असणे, खेड तालुक्यातील सदर १८ गावांतील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर शासनाने मारलेले शेरे व निर्बंध उठविण्याबाबत संबंधित सर्व शेतकऱ्यांनी शासनाकडे आतापर्यंत वारंवार मागणी करण्यांत येणे, त्यानुसार त्यासंदर्भात दि.२२/१०/२०२० रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे पुणे येथील दालनात झालेली बैठक, शेतकऱ्यांची मागणी व पुनर्वसित जमिनीच्या लाभक्षेत्रातील जमिनीबाबत शासननिर्णयात नमूद केलेली परिस्थिती लक्षांत घेण्यांत येणे व त्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांनी भामा आसखेड प्रकल्पाच्या खेड तालुक्यातील उर्वरित ३४६५ हे.लाभक्षेत्र भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून वगळणेबाबत व सदर पुनर्वसनासाठी राखीव शेरे उठविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाकडे दि.२२ जानेवारी,२०२२ च्या पत्रान्वये तसा प्रस्ताव पाठविण्यांत आलेला असणे, तथापि गेल्या वर्षांपासून सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, परिणामी तेथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याची भावना, त्यामुळे शासनाने त्याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका.” | श्री. दिलीप मोहिते-पाटील,ॲड. अशोक पवार,श्री. चेतन तुपे,श्री. सुनिल टिंगरे,श्री. रोहित पवार,श्री. दत्तात्रय भरणे,श्री. सुनिल शेळके वि. स. स. | कित्ता |
| (३४६) | “अकोले तालुक्यातील (जि. अहमदनगर) निळवंडे कालव्याच्या पाटाला भर टाकण्यासाठी माती टाकण्यासाठी पाटाच्या कडेला खड्डे खोदून माती काढण्यात येणे, खोदलेले खड्डे बुजवण्यात न आल्यामुळे व रस्ते अरुंद असल्यामुळे त्या ठिकाणी अपघाताचे वाढलेले प्रमाण, दि.१४ फेब्रुवारी, २०२३ रोजी या खड्डयामुळे म्हाळादेवी येथील निळवंडे कालव्यात ट्रॅक्टर उलटल्यामुळे या ट्रॅक्टर चालकाचा झालेला दुर्देवी मृत्यू, यापूर्वीसूध्दा याच धरणात खड्ड्यामुळे वाहतूक करणारे वाहन कोसळून तीन व्यक्ती मृत्यूमूखी पडणे, यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष व भीतीचे वातावरण, या सर्व प्रकरणाची चौकशी करून | डॉ. किरण लहामटे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | खड्ड्यांना जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करुन मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (३४७) | “परभणी जिल्हयातील सेलु येथील ब्रम्हवाकडी येथे निम्न दुधना धरण प्रकल्पात ७५ टक्के पाणीसाठा हात असून बॅक वॉटरमुळे हया प्रकल्पात पूर्ण १०० टक्के पाणीसाठा न होणे, बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांना शेतीवर परिणाम होणे, लवादाप्रमाणे मराठवाड्याला ६० टीएमसी पाणी मिळणे आवश्यक असताना फक्त ३५ टीमएसी पाणी अडविण्यात येणे, मराठवाड्याला गोदावरीच्या उपनद्यावरील बंधारा प्रकल्पात पणी अडविले जात असून ६० टीएमसी पाण्याचे उद्दीष्ट गाठण्यासाठी बॅरेजची १०० टक्के कामे आवश्यक असणे, डाव्या कालव्याची कामे ६९ कि.मी. व उजव्या कालव्याची ४८ कि.मी. सोय झालेली असणे, परंतु कालव्याच्या वितरिकेचे अस्तरीकरणाची कामे झालेली नसणे, डावा व उजवा कालवा मिळून एकूण ८४.५० कि.मी. चे अस्तरीकरणाची कामे शिल्लक असणे, या बंधाराच्या अनेक वितरिकेच्या टेलचे शेवटचे टोक हे खाजगी शेतकऱ्यांच्या जमिनीत सोडले असून त्यापासून नाले व नदीचे अंतर अंदाजे २०० ते ३०० मिटरपर्यंत असल्याने या चऱ्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन त्यांचे नुकसान होत असणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, निम्न दुधना प्रकल्पात पाणी क्षमता पूर्ण होत नसल्याने या भागाला पाणीपुरवठा करण्यास येणाऱ्या अडचणी, यासाठी राज्य शासनाने चौकशी करून बॅक वॉटरमुळे बाधीत होणाऱ्या शेतकऱ्यांचे व वितरिकेच्या चऱ्यांमुळे शेतीचे नुकसान होणाऱ्या शेतकऱ्याच्या जमीनी संपादीत करून त्यांना योग्य मोबदला देण्याची आवश्यकता व निम्न दुधना धरण पूर्ण क्षमतेने पूर्ण भरण्यासाठी करावयाची उपाययोजना व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. सुरेश वरपुडकर वि. स. स. | कित्ता |
| (३४८) | “जालना जिल्ह्यातील पाटोदा साठवण तलाव प्रकल्प, बरबडा बृहद लघु पाटबंधारे प्रकल्प व खोराडसावंगी लघु पाटबंधारे प्रकल्पांची भुसंपादन मावेजा व पुनर्वसनाची कामे मागील २० वर्षांपासून प्रलंबित असणे, पाटोदा साठवण तलाव प्रकल्प ता.मंठा जि.जालना या प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता रु.१५.२१ कोटीची असून सन २००२-०३ मध्ये प्राप्त असणे, तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.१३०.६६ कोटी असून सुप्रमा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीकरिता प्रलंबित असणे, प्रकल्पाचे मातीकाम ८५% झाले | श्री. बबनराव लोणीकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | असुन सांडव्याचे सर्व काम बाकी असणे, प्रकल्पाची अद्याप धार दाबण्यात आलेली नसून भूसंपादन व पुनर्वसनाचे कामे प्रलंबित असणे, लिंबेवडगाव गावाचे पुनर्वसनाकरिता अद्याप जागा निश्चीतीची कार्यवाही झालेली नसणे, प्रकल्पास एकूण आवश्यक भूसंपादन (हे.) २८८.३७ असून २८८.३७ एवढे भुसंपादन झाले असणे, पुनर्वसनाकरिता एवढे २८.५४ हे क्षेत्र आवश्यक असणे, त्यासाठी एवढा १४०० निधी आवश्यक असणे, तसेच मौजे लिंबेवडगाव येथील बाधित गावाच्या बांधकामाचे मुल्यांकनाकरिता रु.१००० लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, खोराडसावंगी लघु पाटबंधारे प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता रु.३.६७ कोटीची असुन सन १९९९-२००० मध्ये प्राप्त असणे, तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. २२.५८ कोटी असून दि.०५/०३/२०१९ रोजी प्राप्त असणे, प्रकल्पाचे काम ८०% पूर्ण झालेले असुन प्रकल्पाची धार दाबण्याची कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक असणे, प्रकल्पाचे पुनर्वसनाच्या कामाची कार्यवाही अजुन प्रलंबित असणे, प्रकल्पास एकूण आवश्यक भूसंपादन (हे.) ८१.५० असून ७०.४२ हे एवढे भूसंपादन झाले असणे, उर्वरित ११.०८ हे एवढे भूसंपादन करणे बाकी असून त्यांस रु. २७५ लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात मौ. माळसावंगी शिवारातील ३१ घरे बाधीत होत असणे, सदरील ३१ घरांसाठी पुनर्वसना ऐवजी एक रकमी स्वेच्छा पुनर्वसन अनुदान प्रस्तावित असणे, त्यांस रु. १७० लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, बरबडा बृहद लघु पाटबंधारे प्रकल्प या प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता रु. १२.०९ कोटीची असुन सन १९९९-२००० मध्ये प्राप्त असणे, तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. २९.८७ कोटी असुन दिनांक २५/११/२००५ रोजी प्राप्त असणे, प्रकल्पाचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता रु.३५५.७७ कोटी शासनाकडे मंजुरीकरिता प्रलंबित असून मंजुरी आवश्यक असणे, प्रकल्पाचे काम ८०% पुर्ण झालेले असून प्रकल्पाची धार दाबण्याची कार्यवाही करणे तसेच मौ. आकणी गावाचे पुनर्वसनाबाबत अद्याप पर्यंत कार्यवाही झालेली नसुन सुधारित प्रशासकीय मान्यता मंजुरी अत्यंत आवश्यक असणे, प्रकल्पास एकूण आवश्यक भूसंपादन (हे.) ४५९.५१ असुन २७२.८ हे एवढे भुसंपादन झाले असणे, उर्वरित १८६.७१ हे एवढे भुसंपादन करणे बाकी असून त्यांस रु. ७५०० लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, पुनर्वसनाकरिता एवढे ६३.७० हे क्षेत्र आवश्यक आहे. त्यासाठी एवढा रु. २५०० लक्ष निधी आवश्यक आहे. तसेच मौजे आकणी येथील बाधित गावाच्या बांधकामाचे मुल्यांकनाकरिता रु.२००० लक्ष एवढा निधी आवश्यक आहे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३४९) | "रायगड जिल्ह्यातील ता.पेण मध्ये खारेपाट विभागातील महसूली गावातल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी मे./ SEZ Ltd या कंपनीस देऊन शेतकऱ्यांचे योग्य पॅकेजद्वारे पुनर्वसन करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने सन २००४ चे अधिसुचनेद्वारे घेतला. मात्र, त्यानंतर मुंबई SEZ Ltd या कंपनीकडुन दिनांक ८ जून, २००७ मध्ये महाराष्ट्र शासनाबरोबर केलेल्या करारामध्ये संमती निवाड्याचा व सोबत जाहीर केलेले पुनर्वसन पॅकेजचा उल्लेख़ नसणे, जे जाहीर करण्यात आले त्याची आजमितीपर्यंत पुर्तता झालेली नसणे, महाराष्ट्र प्रकल्पब्राधित पुनर्वसन कायदा १९९९ चे कलम १२ (१) व (१२) अन्वये खरेदी केलेल्या जमीनीचे बदल्यात पुनर्वसन पॅकेज न दिल्यास भुसंपादन झालेल्या जमीनीची संमती निवाड्याने व खरेदीखताने हस्तांतरीत झालेल्या जमीनींचा व्यवहार कलम १२(३) नुसार स्पष्टपणे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येणे, कंपनीने संपादीत झालेल्या जमीनी संमती निवाड्याने परस्पर शासनास हाताशी धरून नावे केलेल्या असणे, खोट्या व बनावट ताबेपावत्या करण्यात आल्याचे उघडकीस येणे, सबंधित शेतजमीनी आजही शेतकऱ्यांच्या ताब्यात असून त्यावर ते शेती करीत असणे, म्हणजेच महाराष्ट्र टेनन्सी ॲग्रीकल्चर ॲक्ट १९४८ चे कलम ६३/१ अ नुसार खालील नुसार तरतूद असणे, Provided further that, Such purchase of lamd shall be subject to the condition that it shall be put to industrial use within the specified total period years from the date of purchase. Failing which are person from whom the land was perchased shall have the right to repurchase such land at the price for wich it was originally sold by him. याचप्रमाणे कंपनीने शासनासोबत दिनांक ८ जुलै, २००७ रोजी केलेल्या करारातील कलम ७ चा देखील भंग होणे, अधिसुचनेनुसार व कलम १२ नुसार जमिनीचे हस्तांतरण करणेपुर्वी शासनाची म्हणजेच आयुक्तांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असतांना भुसंपादन व खरेदीखत प्रक्रियेत संमती निवाड्याची अगर खरेदीखताची परवानगी देण्यात आलेली नसणे, SEZ प्रकल्प १५ वर्षात पूर्ण झालेला नसणे, शासन निर्णयानुसार संमती निवाडे करतांना मुळ शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष जिल्हाधिकारी यांचे समोर सद्या करणे अशी अट असतांना गैरमार्गाने संमती निवाडे हे अंधारात ठेऊन कुलमूखत्यारपत्राच्या आधारे करण्यात येणे, या प्रकल्पाकरीता केंद्र शासनानेही मुदतवाढ न देणे, अशा अनेक प्रश्नांअंती शासनाने माहे जानेवारी, २०१४ मध्ये संपादित जमीनींचा वापर SEZ | श्री. रविशेठ पाटील, कुमारी आदिती तटकरे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | प्रकल्पाकरीता होत आहे वा कसे याबाबत तहसिलदार पेण यांचेकडून पंचनाम्यासहीत मागविलेल्या अहवालात कंपनीने शेतकऱ्यांच्या जमीनी घेऊन ठरल्यानुसार पॅकेज वा पुनर्वसन न करता कसलेही प्रोजेक्टचे काम सुरू वा कार्यावित केलेले नाही तसेच शेतकऱ्यानी जमीनी परत मिळाव्यात म्हणून अर्ज केलेले असल्याचे स्पष्टपणे नमुद असणे, म्हणून चुकीच्या पध्दतीने झालेली भुसंपादनाची प्रक्रिया व संमती निवाडे (अॅवार्ड) रद्द झाल्याचे शासनाने जाहीर करून प्रकल्प रद्द करण्याची घोषणा करावी व ७/१२ सदरी कंपनीची नोंद रद्द करून कब्जेदार सदरी शेतकऱ्यांची नावे पुर्ववत करावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेले नाराजीचे वातावरण व त्यांचे भविष्याची दखल घेऊन दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (३५०) | "पालघर जिल्ह्यातील बोईसर पूर्वेकडील किराट येथील दगड खाणीत करण्यात येणाऱ्या भुसुरुंग स्फोटांमुळे जवळच्या आदिवासी पाड्यांतील नागरिकांच्या घरांना तडे जाऊन ही घरे राहण्यासाठी धोकादायक बनली असल्याचे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, भुसुरूंग स्फोट करण्यासाठी बोअर मशीनचा बेकायदेशीर वापर केला जात असल्याचेही निदर्शनास येणे, किराट गावात मुंबई-डोदरा एक्सप्रेसवेचे काम सुरू असून मोंटे कार्लो या ठेकादार कंपनीकडून रस्त्याच्या भरावासाठी लागणाऱ्या मातीकरीता यंत्राद्वारे टेकड्या पोखरण्याचे काम सुरू असणे, बोईसर शहरापासून पाच-दहा कि.मी.च्या पट्ट्यात असणशऱ्या गुंदले, नागझरी, लालोंडे, किराट आणि तिहे या गावांशेजारील हिरवेगार डोंगर आणि टेकड्या गौणखनिज उत्खननासाठी खाण आणि क्रशर मालकांनी उद्ध्वस्त करणे, यामध्ये काही खाणींनी संरक्षित जंगल भागात अतिक्रमण करून तो भाग गिळंकृत केला असणे, खदानीतील दगड काढण्यासाठी जिलेटिनद्वारा नियंत्रित स्फोट करण्यात येणे, त्याचबरोबर दिवस-रात्र स्फोटांचा तीव्र कानठळ्या बसविणारा व कानांच्या पडद्यांना इजा पोहचविणारा आवाज, क्रशर मशीनमधून निघणारे घातक धुलिकण व गौणखनिज वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची सतत वाहतूक यामुळे होणारे प्रचंड प्रदूषण याने आरोग्य व पर्यावरणाचे गंभीर प्रश्न निर्माण होऊन लोकांसोबतच जंगलातील वन्यजीव यांचे देखील जगणे मुश्कील झाले असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करून तात्काळ ही भुसुरुंग स्फोटांचे प्रमाण कमी करण्याची आवश्यकता व नागरिकांना दिलासा देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया." | अॅड. आशिष शेलार, अॅड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. बंटी भांगडिया, श्री. विनोद निकोले, श्री. संजय केळकर, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३५१) | "कुकडी प्रकल्पासाठी कर्जत तालुक्यातील एकूण ११० भूसंपादन प्रस्ताव असून प्रस्तावांपैकी ९० भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर असणे, तसेच कर्जत तालुक्यातील मौजे राक्षेवाडी करपरडी व कोरेगाव तीन प्रस्तावांकरिता १५ कोटी रुपये निधी महामंडळाकडे प्रलंबित असूनन काळेची वाडी, कुळधरण, आळसुंदे, देशमुख वाडी, चिलवडी येथील पाच प्रस्ताव स्पेशल इम्पॅक्ट असेसमेंट मधील कलम १० क अंतर्गत प्रलंबित प्रस्तावांवर कुठलीही कारवाई केलेली नसणे, भूसंपादनाचा निधी वाटप व आपापसातील संमतीवादामुळे वेळ लागणे, परिणामी कुकडी यंत्रणेमार्फत थेट खरेदीच्या प्रस्तावांमध्ये मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित असणे, भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रकल्पग्रस्तांना अद्याप त्यांच्या जमिनींचा मोबदला न मिळाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेली असंतोषाची व नाराजीची भावना, कुकडी प्रकल्पातील भुसंपादन केलेल्या प्रकल्पग्रस्तांना तातडीने मोबदला देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |
| (३५२) | "महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील वेवजी ग्रामपंचायती नंतर शेजारच्या झाई गावाच्या जमिनीवर गुजरात राज्याने अतिक्रमण केल्याच्या मुद्दा स्थानिकांनी उपस्थित केला या प्रकरणी पालघरचे मा.जिल्हाधिकारी यांनी सीमा भागातील दोन्ही गावांना नुकतीच भेट देणे, तलासरी तालुक्यातील ग्रामस्थांना गुजरात राज्यातील उंबरगाव तालुक्यातील गोवाडा ग्रामपंचायतीने आपल्या जागेवर घरे बांधल्याचे सांगून सन २०२० साली घरे रिकामे करण्याची नोटीस झाई ता.तलासरी, जि.पालघर या महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना देणे, त्यामुळे सीमाभागातील नागरिकांना संघर्ष करावा लागत असणे, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादाचा मुद्दा चर्चिला जात असतानाच आता महाराष्ट्र - गुजरात सीमा वाद निर्माण होत असणे, त्यामुळे या संदर्भात मा.जिल्ह्याधिकाऱ्यांनी यांनी महसूल व भूमी अभिलेख या विभागाला जमिनीची पूर्वीची कागदपत्रे व नकाशा गोळा करण्याच्या सुचना दिल्या असणे, तसेच वेवजी गावातील जमिनीवर गुजरातच्या सोलसुंभा ग्रामपंचायतीने केलेल्या अतिक्रमण भागात ही त्यांनी भेट दिली. त्यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामस्था मोठ्या संखेने उपस्थित असणे, त्यामुळे राज्याराज्यात संघर्ष तीव्र होऊन सीमा वाद वाढण्याची शक्यता निर्माण होत असणे, त्यामुळे दिनांक ०१ मे, १९६० रोजी अस्थित्वात आलेल्या महाराष्ट्राच्या सीमे प्रमाणे कायम करण्यासाठी गरज निर्माण होणे, तसेच, | श्री. विनोद निकोले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | राज्य शासनाने राज्यात संपूर्ण सीमा भागात चेक पोस्ट सतत कार्यरत ठेवण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३५३) | "जळगाव जिल्ह्यातील अमळनेर परिसरात मोठ्या प्रमाणात वाळूची तस्करी सुरू असल्याचे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२३ मध्ये वेळोवेळी निदर्शनास येणे, अवैध वाळू वाहतुकीला विरोध करणाऱ्या तरुणाचा अंगावर ट्रॅक्टर घालून खून केल्याची गंभीर घटना मांडळ ता. अमळनेर येथे दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी घडणे, या परिसरात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीस पायबंद घालण्यास महसूल प्रशासन अपयशी ठरल्यामुळे ही घटना घडल्याची आरोप करून नातेवाईक व नागरिकांनी मृतदेह तहसीलदार कार्यालयात आणून ठेऊन निषेध नोंदवणे, सदरील घटनेनंतर योग्य त्या गांभीर्याने कारवाई न केल्यामुळे वाळू तस्कर अद्यापही मोकाट फिरणे, सदर तरुणाच्या कुटुंबीयास शासनाने मदत करण्याची गरज असणे, आव्हाने परिसरातील गिरणा नदीपात्रात बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असल्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडणे, तापी पात्रातील वाळू गटांचा लिलाव पूर्ण होण्यापूर्वीच वाळू तस्करांनी बेकायदा वाळू उपसा सुरू करणे, गिरणा नदीपात्रातील वाळू तस्करांविरोधात कारवाई करण्यासाठी जळगाव जिल्हाधिकारी स्वतः जाणे, मात्र कारवाईची माहिती त्यापूर्वीच बाहेर पडल्याने वाळू तस्कर सावध होणे, सदर संपूर्ण वाळू तस्करीची चौकशी होऊन कडक कारवाई करण्याची गरज तसेच वाळू वाहतुकीवर नियंत्रणासाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याची गरज याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना." | श्री. अनिल पाटील वि. स. स. | कित्ता |
| (३५४) | "चंद्रपूर जिल्ह्यातील कुसुंबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे. आर जमिन मानिकगड सिमेंट कंपनीने स्थानिक प्रशासनिक अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन दिनांक १९ मार्च, १९८५ पासून बेकायदेशीरपणे ताब्यात घेणे, स्थानिक महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोणताही मोबदला न देता, नियमबाह्य व बेकायदेशीररित्या ही जमीन कंपनी द्वारा बळकावण्यात येणे, सदर बाब भुसंपादन उप जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ व ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी त्यांनी या जमिनीचा मोबदला व न्याय या आदिवासींना मिळवून देण्याबाबत उप विभागीय अधिकारी, राजूरा यांना पत्र देणे, त्या पत्रावरून दिनांक १६ मे, २०१८ रोजी तहसिलदार, जिवती यांनी मानिकगड सिमेंट कंपनीस लाभ मिळवून देण्यासाठी खोटा व बनावट अहवाल तयार करून | डॉ. देवराव होळी, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | शासनाला पाठविणे, त्या खोट्या अहवालावरूनच पुढील प्रत्येक अहवाल व रिपोर्ट शासनाला सादर करणे, यामुळे अजूनपर्यंत आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासीं याना न्याय न मिळणे, न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या या आदिवासी बांधवांना न्याय मिळवून देण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३५५) | "रत्नागिरी जिल्ह्यातील खेड शहरातील तहसिलदार व पोलीस यंत्रणेने गेल्या काही वर्षांत विविध कारवायांमध्ये ताब्यात घेतलेले साहित्य तहसिलदार कार्यालयाच्या आवारात धोकादायक पद्धतीने ठेवले असल्याचे फेब्रुवारी २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, सतत वर्दळ असलेल्या भागात अपघातग्रस्त वाहने, वाळू उपसा करणारे सक्शन पंप आदी साहित्य अस्तव्यस्थ पडलेले असणे, त्यामुळे तेथे निर्माण झालेली अडगळ, त्यामुळे तेथे विषारी साप, विंचु, डास यांचे वाढलेले प्रमाण, यामुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण झालेला असणे, संबंधीत यंत्रणेने त्याची दखल घेण्याची मागणी नागरिकांनी वारंवार केली असणे, परंतु सदरहू मागणीकडे यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने नागरिकांच्या जीवाला धोका होऊ नये याची काळजी घेण्याकरीता करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया." | श्री. बंटी भांगडिया, श्री. संजय केळकर, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (३५६) | "विदर्भात उच्च दर्जाच्या वाळूसाठी प्रसिद्ध असलेले व उपलब्ध असलेले चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्ह्यातील नदीपात्रातुन अवैध मार्गानी वाळू उपसा होत असल्याचा घटना नित्येची बाब ठरत असणे, अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांवर प्रशासनाने नियंत्रण आणावे, आणण्याची मागणी सातत्याने नदीकाठच्या गावातील ग्रमस्थांकडुन होणे, अनेक वेळा नदीकाठच्या ग्रामस्थांनी अवैधरीत्या होत असलेला वाळू उपसा महसूल विभागाला रंगेहात पकडुन दिल्यानंतरही अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई महसूल व संबंधित विभागाकडुन न होणे, अनेकदा महसूल विभागामार्फत थातुरमातुर कारवाई केल्या जाणे ज्यामुळे आजमितीस एकाही जप्ती केलेल्या वाहनाची, जप्ती केलेल्या यंत्रांची किंवा अवैध जमा साहीत्याची लिलाव झाल्याचे किंवा भंगारात काढल्याचे निदर्शनास न येणे, किरकोळ कारवाई करून वारंवार त्याच ठिकाणी पुन्हा अवैध वाळू उपसा होत असणे, त्यामुळे जिल्ह्यातील नदीकाठच्या ग्रामस्थांचे व ग्रामसभेचे मानसिक खच्चीकरण होणे, अवैध वाळू उपसा करणारे महसूल | श्री. बंटी भांगडिया, श्री. टेकचंद सावरकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | विभागाची कुठलीही भिती मनात न बाळगता राजरोसपणे वावरत असणे, यापैकी काही प्रकरणी प्रशासनाने जिवावर बेतुन गुन्हे दाखल केले असतांनाही देखील त्यामधुन कायद्यांमधील पळवाटाचा फायदा घेऊन वाळू तस्कर निर्दोष सुटत असणे, या वाळू तस्करांवर होणारी कायद्यांमधील फौजदारी गुन्हयांची कलमे किरकोळ असल्याने कारवाई होऊनही पुन्हा अवैध वाळूची तस्करी जोमाने केली जाणे, त्यामुळे वाळू तस्करांवर वेळीच आवर घालण्यासाठी गुन्ह्यांची कलमे व कारवाईत सुरक्षा पुरविण्याची गरज निर्माण होणे, नियम आणखी कडक करण्याचा आवशकता, वाळू तस्करांद्वारा कारवाईस गेलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर वाढलेले हत्यारांद्वारा हिंसक व जिवघेणे हल्ले, कठोर कारवाई व प्रसंगी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची गरज याकडे प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष त्यावर प्रशासनाने करावयाची तातडीची करवाई व याबाबत प्रशासनाची भुमीका आणि यावर प्रतिक्रिया." | | |
| (३५७) | "मुंबईतील मालाड पश्चिम, मालवणी येथील गेट क्र.८, गायकवाड नगर, अंबुजवाडी, दर्शबाग रोड परिसरातील कांदळवणात मोठ्या प्रमाणात अनाधिकृतपणे बांधकामाचा राडारोडा टाकून भराव करणाऱ्या कंत्राटदाराविरोधात पोलीस ठाण्यात दि.२५.०१.२०२३ रोजीच्या सुमारास गुन्हा दाखल केल्याची घटना घडणे, सदरहू परिसरात कांदळवणावर भराव टाकून त्यावर अनाधिकृतपणे मोठ्या प्रमाणात बांधकामे उभी रहात असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, तसेच सदरहू अनाधिकृत बांधकामामध्ये बांग्लादेश नागरीकही बेकायदा वास्तव्य करीत असल्याचे आढळून येणे, मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाने नेमलेल्या सहायक उपद्रव शोधकांनी पाहणी केली असता सदरहू भागात १३ ठिकाणी अशा पद्धतीने राडारोडा व मातीची भरणी टाकून जागा निर्माण करून त्यावर अनाधिकृत बांधकामे करण्यात आल्याची माहिती महापालिकेला अधिकृतपणे देण्यात येणे, सदरहू प्रकरणी महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाअंतर्गत संबंधित दोषी कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येऊनही महापालिका तथा पोलीसांतर्फे सदरहू अनाधिकृत बांधकामाविरुद्ध अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे आढळून येणे, यामुळे येथील स्थानिक नागरीकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (३५८) | "गेली अनेक वर्षे किनारपट्टीलगत वास्तव्य करून असणाऱ्या मच्छिमारांच्या घरालगतची जागेचा वापर उदा. जाळी ठेवणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे, बोटी दुरुस्त करणे याकरिता करत असणे, मच्छिमारांच्या वसाहती लगत किंवा गावालगत मोकळी जागा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २२ अन्वये तरतुदीनुसार विहित करण्यात हरकत नसावी असा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे, वहिवाटीच्या जागा/जमिनीचे ७/१२ त्यांचे नावे होण्याची कार्यवाही मुंबई विभागात (कोळीवाडा सिमांकन) सुरू असणे, परंतु कोकण विभागातील इतर सर्व जिल्ह्यामध्ये सिमांकन करण्याची कार्यवाही अद्यापी चालु झालेली नसणे, सदर मोकळ्या जागांचे वाटप अन्य कारणासाठी मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे कारण दाखवून सदर जागा मच्छिमारांना वापर करण्यास शासनाकडून होत असलेला विरोध, मच्छिमारांविरोधात शासनाकडून होत असलेली कारवाई, परिणामी मच्छिमार धंद्यावर होत असलेला विपरित परिणाम, मच्छिमारांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली तीव्र चीडीची व संतापाची भावना, मच्छिमारांच्या गावालगतच्या, वसाहतीलगतच्या खुल्या जागा मच्छिमारांच्या धंद्याकरिता म्हणजेच मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्त करणे, बोटी शाकारणे याकरिता कोकणातील सर्व जिल्ह्यातील मच्छिमारांच्या घरालगतची जागेचे (कोळीवाडा/गावठण) सिमांकनाचे काम पुर्णकरुन तातडीने विहीत करून देण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती मनिषा चौधरी वि. स. स. | कित्ता |
| (३५९) | "मौजे मोरमारेवाडी (ता.मावळ, जि.पुणे) हे महसुली गांव ग्रुप ग्रामपंचायत करंजगाव अंतर्गत असणे, या गावातील धनगरपाड्यावर एकूण ११ कुटुंबातील ग्रामस्थ असून गावालगतच्या उंच डोंगर पठारावर त्यांची एकूण ११ घरे, गोठे आणि लागवडी योग्य शेतजमीन, निवासी घरे, गोठे, शेती यासह शेकडो वर्षापासून सदर कुटुंबे वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास येणे, सदर कुटुंबिय ग्रामस्थांना इंग्रजकालीन राजवटीपूर्वी मावळ तालुक्यातील अनेक गावे/भूखंड तत्कालीन राजकीय व प्रशासकीय व्यक्ती व संस्थांना वतने म्हणून बहाल करण्यात येणे व त्यामध्ये श्री.कर्वे, इनामदार परिवाराला मिळालेल्या वतनावरील मोरमारेवाडी येथील धनगरपाड्याला देखील वतन मिळाले असणे, त्यानंतर सन १९६८ साली ग्रामपंचायत करंजगाव अस्तित्वात | श्री. सुनिल शेळके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | येऊन धनगरवाड्यातील सर्व घरांची नोंद ग्रामपंचायत दप्तरी असून या सर्व घरांचा व शेतीचा शासकीय कर, पट्टया इत्यादी कर तेव्हांपासून सदर ग्रामस्थ शासनास अदा करीत असणे, तथापि सन १९५७ च्या कुळ कायद्याअंतर्गत सदर कुटुंबियांची नावे त्यावेळी ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद झालेली नसणे, तथापि सन १९६८ साली त्यापैकी काही कुटुंबाचा कूळ म्हणून ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद असल्याचे निदर्शनास येणे, परंतु सन २००६ यावर्षी श्री कर्वे, इनामदार (वतनदार) यांनी सदर ग्रामस्थांच्या वहिवाटीच्या जमिनीसह सर्व जागा मुंबईतील ओझोन लँड प्राईव्हेट लिमिटेड या कंपनीला परस्पर विकल्याचे निदर्शनास येणे व त्यासाठी कंपनीने प्रस्तुत गटाच्या सातबारा उताऱ्यावरील नोंद देखील दुरुस्थ (काढून टाकल्याने) केल्याचेही निदर्शनास येणे, याप्रकरणी सदर ग्रामस्थांनी दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी मा.महसूल मंत्री यांना सविस्तर लेखी निवेदन देऊन वहिवाटीच्या हक्काची जमिन त्यांच्या नावे शासनाने करून देण्याची मागणी करण्यात येणे, परंतु अद्यापही शासनाकडून कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी संबंधित सर्व ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३६०) | "माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, तहसीलदार कार्यालय, वसई (जि. पालघर) यांनी दिनांक ३ मे, २०२१ रोजी सतीश जमनादास दत्ताणी, रा.सांडोर, ता.वसई, जि.पालघर या विकासक तसेच जागा मालक यांना त्यांच्या मालकीच्या वसई येथील सर्वे नं.२५२ अ, २५२ ब, २५५ अ, २५६/२ व ४, २५७ हि.नं.२/१, ३, ४, ५, १०/१ व ११ व सर्वे नं.२५८, २५९, २८४ या ठिकाणी करण्यात आलेली खोदाई, गौण खनिज खोदण्यास शासनाने दिलेल्या परवानगीचे उल्लंघन करून हजारो ब्रासची बेकायदेशीररित्या खोदाई झाल्याच्या विरोधात उप विभागीय अधिकारी, वसई यांचेकडे दिनांक २ नोव्हेंबर, २०१९ रोजी करण्यात आलेली लेखी तक्रार, अनुषंगाने मंडळ अधिकारी, माणिकपूर यांनी दिनांक १७/११/२०१९ रोजी तक्रार अर्जात नमूद केलेली मोजमाप घेऊन बेकायदेशीरपणे गौण खनिजाचे उत्खनन झाल्याचे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आपला अहवाल दिनांक ०४/१२/२०१९ रोजी वरिष्ठांना सादर करणे, त्यानंतर जागा मालकाच्या घेतलेल्या आक्षेपानुसार दिनांक ०४/०२/२०२०२ रोजी निवासी नायब तहसीलदार, वसई आणि मंडळ अधिकारी, माणिकपूर यांनी संयुक्तपणे तक्रारीत नमूद केलेल्या जागेचे | श्री. निलेश लंके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मोजमाप घेऊन आपला पुर्नरपाहाणी अहवाल सादर करणे, त्यानंतर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन दिनांक ०३/०५/२०२१ रोजी तहसीलदार, वसई यांनी सतीश जमनादास दत्ताणी, रा.सांडोर, यांना १५,९१७ ब्रास मातीचे बेकायदेशीर उत्खनन केल्याबद्दल पाचपट दंडाची रक्कम धरून ८ कोटी ७७ लाख ७० हजार इतकी रक्कम शासनाकडे जमा करावी असे दिलेले लेखी आदेश, सदर आदेश देऊन १७ ते १८ महिने झाले तरीही जमीन मालक सतीश जमनादास दत्ताणी यांनी शासनाकडे दंडाची रक्कम दिलेल्या लेखी मुदतीत वा नंतर जमा न करणे, तहसीलदारांनी शासनातील नियमानुसार दंड जमा झाला नाही म्हणून जागा मालका विरोधात करावयाची कारवाई करण्यास केलेली अक्षम्य दिरंगाई व हेळसांड, यामुळे महसूल विभागाच्या कारभारा विरोधात सामान्य जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (३६१) | ''माहे जानेवारी २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्ग निर्मितीच्या कामासाठी नेमलेल्या जी.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट या कंपनीने मु.पो.ता.सफाळे (जि.ठाणे) रेल्वे स्थानकाच्या पुर्वेकडील नवघर गावातील गट क्र.१८८ मधून आठ हजार ब्रास मुरुम उत्खननाचा परवाना असताना, सुमारे दीड लाख ब्रास माती उत्खनन केल्याची तक्रार ग्रामस्थांनी महसुल प्रशासनाकडे लेखी स्वरुपात करणे, उत्खनन परवाना मुदत संपल्यावरही उत्खनन सुरू असल्याचे प्रशासनाने केलेल्या पाहाणीत उघडकीस येणे, तक्रारदार संदीप किमी, राहुल सापने, सफाळे मंडळ अधिकारी तेजल पाटील, करवाळे सजेचे, तलाठी किरण जोगदंड यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन केलेल्या पाहाणीत १ लाख ६० हजार ब्रास मातीचे उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, मंडळ अधिकारी यांनी आपला पाहाणी अहवाल तहसील कार्यालयास पाठविण्यास हेतूतः सुरू असलेली चालढकल व विलंब, गट क्र.१८८ ची शासकीय मोजणी व सिमा निश्चिती न केल्याने जी.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट कंपनीने परवानगीपेक्षा जास्त केलेले बेकायदेशीर उत्खनन, सदर प्रकरणी महसुल प्रशासन संबधित ठेकेदार कंपनी विरोधात कोणतीच कायदेशीर कारवाई करत नसल्याने सफाळे, नवघर इ.भागात वास्तव्य करणाऱ्या हजारो ग्रामस्थांच्या मनात महसूल प्रशासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. निलेश लंके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३६२) | "कोकणातील, विशेषतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरिता श्री. राधेशाम मोपलवार, तत्कालिन विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने प्रत्येक तालुक्याचा दौरा करून दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी शासनाला अहवाल सादर केलेला असणे, सदर अहवालात मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम , १९४८ च्या विविध कलमांत सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले असणे, याशिवाय पीकपाहणीच्या नोंदी अदययावत करणे, कुळ कायद्यांच्या प्रकरणातील दावे चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे, सर्व प्रलंबित दावे एका वर्षात निकाली काढण्यासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करणे, कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत यापूर्वी सादर केलेल्या अहवालातील शिफारषींप्रमाणे बेदखल कुळांच्या घरठाणांच्या जागांबाबत शिफारस अशा अनेक शिफारशी करण्यात आलेल्या असणे, तथापि अद्याप सदर अहवाल शासनाने स्विकारलेला नसणे, त्याआधीपासुन पेजे समितीचा अहवालदेखील शासनस्तराव प्रलंबित असणे, कोकणातील १ लाखांहून अधिक बेदखल कुळांचा प्रश्न गेल्या ६०-६५ वर्षांपासून प्रलंबित असणे, कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या, ७० ब कलमामध्ये वेळोवेळी बदल करूनही कुळांचे प्रश्न कायम असणे, रत्नागिरी जिल्ह्यातील तिलोरी कुणबी समाजाला देण्यात येणारे तिलोरी कुणबी-८३ ओबीसी दाखले हे अचानक बंद केल्याचे नुकतेच दिनांक २३ फेबुवारी, २०२३ रोजी समोर येणे, परिणामी कुणबी समाजातील विद्यार्थांना शाळा-महाविद्यालयात किंवा अन्य ठिकाणी प्रवेशासाठी ओबीसी दाखले मिळणार नसल्याने या समाजामध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, मोपलवार आणि पेजे या दोन्ही समितींचा अहवाल स्विकारून कुणबी समाजाला विकासा प्रवाहात आणण्याची गरज, ही बाब लक्षात घेऊन याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. भास्कर जाधव वि. स. स. | कित्ता |
| (३६३) | "जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यामधील गारबर्डीच्या धरणाजवळील २२० लोकवस्तींच्या गावाला महसुली दर्जा देण्यात आलेला असून या गावाला वनदावा मंजूर होऊन १ वर्षे झाले व ४१ घरकुले व इतर योजना मंजूर झालेल्या असणे, परंतू भूमिलेख विभागाकडून गावासाठी मंजूर असलेल्या दोन हेक्टर वन दावा जमिनीचे दोन हेक्टर वन दावा जमिनीचे मोजमाप न झाल्याने शासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे आदिवासींना आजही शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी | श्री. शिरीष चौधरी, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>( १ ) | थोडक्यात विषय<br><br>( २ ) | सदस्यांची नावे<br><br>( ३ ) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>( ४ ) |
|---|---|---|---|
| | वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यामुळे तेथील ग्रामस्थांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, गारबर्डीच्या धरणाजवळील आदिवासींची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासन आवश्यक कार्यवाही करण्याची गरज व याबाबत करावयाची प्रतिक्रिया." | | |
| ( ३६४ ) | "मौजे मोहने ( ता.कल्याण, जि.ठाणे ) येथील उल्हास नदीच्या पुलाजवळ गोदरेज समूहाने मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पचे काम सुरू करणे, सदर गृहनिर्माण संकुल बांधकामाकरिता गोदरेज समूहाने नदीतील परिसरात मोठ्या प्रमाणात केलेल्या उत्खननामुळे उल्हास नदीच्या तीरालगत असलेल्या नैसर्गिक उंचवट्याचा समतोल बिघडणे, परिणामी आर.आर.झेड व सी. आर.झेड. क्षेत्रातील नियमाची पायमल्ली सदर विकासाकडन होणे, उल्हास नदी परिसरातील उपरोक्त नैसर्गिक उंचवटा हा अतिवृष्टी काळात सह्याद्री खोऱ्यातील मोहने बंदराकडून पाण्याचा जोर उल्हास नदी पुलाखालून वाहत येणाऱ्या पुराच्या पाण्याची गती वक्राकार नैसर्गिक उंचवट्यामुळे इतरत्र न पसरतात थेट बारावे जंक्शन येथे कल्याणकडे जाऊन मिळत असणे, असे जुन्या जाणकारांचे मत असणे, उल्हास नदीच्या उपरोक्त नैसर्गिक उंचवट्याचा ( टेप ) समतोल बिघडल्याने संभाव्य पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, त्याचा धोका उल्हासनदी व बारावेखाडी परिसरातील वडवली, अटाळी, शहाड, गौरीपाडा, बारावे जंक्शन या नदी परिसरातील गावांना बसून मोठी वित्त व जीवन होण्याची शक्यता नाकारता ना येणे, उल्हासनदी पुला जवळ नदीतीरा लगत गोदरेज समूहाने सुरू केलेल्या बांधकामा साठी नदी परिसरात केलेल्या उत्खननामुळे आर.आर.झेड. व सी.आर.झेड. नियमांची सदर विकासकाने केलेल्या उल्लंघनाचे सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. विश्वनाथ भोईर वि. स. स. | कित्ता |
| ( ३६५ ) | "नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील अमोणी, कालीबेल, चौगाव बुद्रुक, रोझवा, रापापूर, सोमावल खुर्द, ढेकाटी इत्यादी गावातील साधारणतः ६५९ वनहक्क दाव्यांचा समावेश असणे, सदर दावेदारांनी वनहक्क कायदे अंतर्गत मागणी केलेले क्षेत्र साधारतः ५५० हेक्टर इतके असणे, सदर अतिक्रमण असल्याचे पुरावे सदर अतिक्रमण धारकांकडे असणे, तसेच आजतागायत सदर वनपट्टे अतिक्रमण धारकांच्या ताब्यात असून जमीन कसत असणे, मागील दोन वर्षापासून अति पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याने त्यांना नुकसान भरपाई सुद्धा शासनाकडून मिळत असणे, परंतु, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी | श्री. राजेश पाडवी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ नुसार कलम ३ (१) (क) अन्वये वैयक्तिक वनहक्क दावे दाखल केलेले असूनही फेटाळणे, कारण सन १९९५ मध्ये सरदार सरोवर प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी महसूल विभागाकडे वर्ग केलेली असणे, परंतु, प्रशासनाच्या दुर्लक्षाने सदर वनजमिनीवरील अतिक्रमण नमूद केल्याचे नसणे, त्यामुळे सदर वनजमीन दावे जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे शिफारस न करता फेटाळले जाणे, याबाबत स्थानिक प्रशासनाने मा. प्रधान सचिव, वने व अप्पर मुख्य सचिव, महसूल व मा.आयुक्त, आदिवासी विभाग यांना वारंवार पत्रव्यवहार करून मार्गदर्शन मागविलेले असणे, परंतु, शासनाकडून अद्याप पावेतो कुठलेही मार्गदर्शन प्राप्त न होणे, त्यामुळे सदर वनहक्क दाव्यांवर कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी वनहक्क धारक जनतेमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रया." | | |
| (३६६) | " राज्यात नागरिकांना मोठ्या प्रमाणात घर बांधकामासाठी व शासनाच्या विविध बांधकामांसाठी वाळुची उपलब्धता नसल्याने प्रत्येक नागरिकांना चोरीची वाळु घेतल्याशिवाय पर्याय नसणे, शासनाचा मोठा महसूल बुडणे व सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास होणे, पोलीस व महसूल यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी अनेक ठिकाणी हप्ते घेऊन सर्रास वाळुचोरीला अभय देणे तर दुसरीकडे काही ठिकाणी मोठा दंड ठोठावुनही त्याची वसुली न होणे, डम्प ला अवैध मुदतवाढ देऊन त्या नावावर अवैधरित्या वाळु विक्रीचे परवाने देणे, घरकुल व शासकीय आवास योजनेसाठी मोफत रॉयल्टी पासेस वितरीत करण्यास महसूल अधिकाऱ्यांची अनास्था, राज्यात घरासाठी नियमानुसार स्वामित्व धन स्वीकारून रॉयल्टी पासेस देणे, तहसीलदारांची जबाबदारी असताना राज्यात कुठेही तहसीलदारांनी ही योजना न राबविणे, एका बाजुला घरकुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाचा प्रयत्न तर दुसरीकडे ट्रॅक्टर पकडुन प्रति ट्रॅक्टर तीनपट स्वामित्व धन व एक लक्ष रूपयांची शास्ती वाहनावर लावण्याचे गावातील ट्रॅक्टर मालकांचा पोलीस व महसूल विभागाकडून छळ होणे तर मोठ्या ठेकेदारांना पोकलेननी अवैध उपसा व वाहतुकीकरिता सुट देणे, त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात वाळु माफीया सक्रिय होणे व याबाबत शासनाने धोरणात दुरूस्ती करण्याची गरज असताना शासनाचे याकडे दुर्लक्ष होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष जयस्वाल वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>( १ ) | थोडक्यात विषय<br><br>( २ ) | सदस्यांची नावे<br><br>( ३ ) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>( ४ ) |
|---|---|---|---|
| ( ३६७ ) | "माझगाव मुंबई येथील सिटी सव्हे क्र.३०९ भूखंड अहनद बिल्डिंग टेनन्स को.ऑप.हौ.सो. या सोसायटीला हस्तांतरीत करण्या संदर्भात सन २०२० पासून आजपर्यंत जिल्हाधिकारी, मुंबई यांनी ७/८ सुनावणी घेणे, एवढया सुनावणी घेऊनही जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे सुध्दा न पाठवणे, सदर प्रकरणी निर्णय घेण्यामध्ये जिल्हाधिकारी, मुंबई यांनी जाणीव पूर्वक केलेले दुर्लक्ष व अक्षम्य विलंब, भुखंड हस्तांतरीत करण्याबाबत गृहनिर्माण संस्थेची दीर्घकाळापासून मागणी प्रलंबित असणे, याप्रकरणी शासनाने त्वरित निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | श्रीमती यामिनी यशवंत जाधव वि. स. स. | कित्ता |
| ( ३६८ ) | "लातूर जिल्हयातील उदगीर शहरातील सर्वे नं २१७/१ मधील ०१ हेक्टर ८२ क्षेत्रास रहिवाशी प्रयोजनार्थ (NA) अकृषी परवानगी देण्यात आली असून ही परवानगी संबंधित तहसिलदार यांनी सर्व नियम धाब्यावर बसत बेकायदेशीर व चुकीच्यापध्दतीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, सर्वे नं.२१७ मधील १ हेक्टर, ८२ आर हा परवाना चुकीचा असणे, उदगीर तहसिलदारानां अधिकार नसतानाही चुकीच्या पध्दतीने हा NA प्रस्ताव मंजुर केला असणे त्यामुळे या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता सदर अकृषी (NA) परवाना रद्द करावा ही मागणी नागरिकांनी केली असणे हे लक्षात घेता शासनाने त्वरित संबंधित दोषी अधिकाऱ्यांसह इतर दोषापिंतावर कार्यवाही करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने त्वरित याबाबत करावयाची कार्यवाही." | श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |
| ( ३६९ ) | "मौजे रायसळ ता. वाडा जिल्हा पालघर येथे गट क्रमांक ४३/२ आणि ४३/५ या जमिनीवर बेकायदा उत्खनन झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये उघडकीस येणे. तहसीलदार वाडा यांनी हे बेकायदा उत्खनन झाल्याने १०५ कोटी रुपयाची दंडात्मक नोटीस मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांना देणे. सदर नोटीसला उत्तर देण्यासाठी संबधितांना तीन आठवड्याची मुदत देणे, असे असतांना अचानक दिलेली दंडात्मक नोटीस ७५ कोटी रुपये कमी करून सुधारित नोटीस फक्त ३० कोटी रुपयाची देणे. पहिल्या नोटीसमध्ये झालेले उत्खनन हे १ लाख ३७ हजार ब्रास दाखवणे आणि अचानक दुसऱ्या नोटीस मध्ये ते ४७ हजार ब्रास दाखविणे आणि त्या अनुषंगाने दंडाची रक्कम कमी करणे. तसेच मौजे रायसळ हे गाव पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने हे उत्खनन करत असतांना पर्यावरण विषयक कोणत्याही परवानग्या न | श्री. सुनिल भुसारा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | घेतल्याचे निदर्शनास येणे, एकंदर तहसीलदार वाडा यांची कृती ही संशयास्पद अशी असणे. तहसीलदार यांच्या या कार्यवाही मुळे शासनाचे महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे. तसेच गौण खनिज माफिया यांचे मनोबल मध्ये वाढ होणे, यामुळे वाडा तालुक्यात असंतोषाचे वातावरण निर्माण होणे.याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही." | | |
| (३७०) | "पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी श्री. आगे यांनी पदभार स्विकारल्यापासुन गैरव्यवहाराची मालिकाच सुरु असणे, मतदारसंघातील गोरगरीब शेतकऱ्यांची लूट चालू असणे, भूसंपादनाचे अनेक प्रकल्प सुरु असल्यामुळे त्यांनी त्यांनी नेमलेल्या दलालांनमार्फत इच्छित वसूली झाल्याशिवाय कामे न करणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांनी केलेल्या आर्थिक व्यवहाराची त्यांच्याकडील वापरातील तीन मोबाइल नंबरचे सीडीआर वापरून चौकशी केल्यास वस्तुस्थिति समोर येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब होणे, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधि यांनी वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमधे/खातेधारकांमधे शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने करावयाची करवाई व प्रतिक्रिया." | श्री. शांताराम मोरे वि. स. स. | कित्ता |
| (३७१) | "मौजे नाहूर, ता. कुर्ला, जि. मुंबई उपनगरे येथील १५/४ व इतर या जमिन मिळकतीमध्ये १९४० पासून मतीबाई शंकर यांचे कुळ दाखल असून १९६२ पासून सॉल्ट डिपार्टमेंटनी बेकायदेशीर धारक नोंदी नाव चढवून नंतर महसुल विभागाच्या अध्यादेशानुसार नाहूर गावाच्या जमिन मिळकती या बिनशेती व औद्योगीक प्रयोजनाकरीता बाधित ठेवल्याचे महसुल विभाग नोटिफिकेशन टीएनसी/५१५७/३१९०-एम. दि. २९ मार्च, १९५७ द बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट ४ एप्रिल १९५७ अन्वये बिनशेती व औद्योगिक विकाससाठी राखून ठेवले असल्यामुळे कुळकायदा नाहूर गावी लागु होत नाही, असे सबब अद्यादेशमध्ये नमुद करणे, परंतु नाहूर या गावी अजुनही बिनशेती व औद्योगिक प्रयोजन न झाल्याने मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९४८ हैद्राबाद कुळवहिवाट शेतजमिन अधिनियम १९५० व विदर्भ कुळवहिवाट अधिनियम १९५८ नुसार शेतकऱ्यांना जमिन परत देण्याचे अध्यादेशात नियोजीत असून सदर जमिन मिळकतीत नऊ दशकांपासून भूमिहीन विधवा महिला मतीबाई शंकर हिचे कुळ दाखल असल्यामुळे या कुळाचे वारस लावणेकामी दि. १५/७/२०२२ रोजी विभागीय आयुक्त कोकण विभाग, मुंबई व प्रधान सचिव, महसूल यांना अरुण रामा | श्री. राजु आवळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | पाटील यांनी वेळोवेळी अर्ज दाखल केला असणे, तसेच मौजे बाळकुम ता. जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ७४/१५ व ईतर मध्ये रोहिदास इंद्रपाल पाटील यांनी दि. २७/२/२०२० मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे पुनर्विलोकनाखाली केस चालु असुन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे व उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्याकडून कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने त्याबाबत शासनाने दुर्बल व इतर मागासवर्गीय शेतकऱ्यांचे वारस लावणेकामी व ती जमिन मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९४८ नुसार शेतकऱ्यांना जमिन परत देण्यासाठी शासनाकडून अंमलबजावणी करणे अनिवार्य असल्याने शासनाने अतिगंभीररीत्या दखल घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.” | | |
| (३७२) | “सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी शहर हे महत्वाचे शहर असून एक मोठी बाजारपेठ असणे, रेल्वे जंक्शनमुळे शहराचे महत्व आणखीन वाढलेले असणे, गेल्या कित्येक वर्षापासून वर्ग-ब मालमत्ता धारकांचा प्रश्न प्रलंबित असणे, गेल्या चार ते पाच पिढ्या कब्जे वहिवाट आणि मालकी हक्कात राहणाऱ्या जवळपास ९१७ मालमत्ता असणे, या मालमत्ता बाबत १९९४ ला सिटीसर्व्हे करणाऱ्या चमुने सदर मालमत्याची नोंद महाराष्ट्र शासन सदरी ब वर्ग केलेली असणे, त्या नोंदीमुळे शहरातील जवळपास सर्व व्यापारी मालमत्ता धारक अडचणीत येवून त्यांना विस्थापित होणेची परिस्थिती निर्माण झालेली असणे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, सोलापूर यांनी या ब वर्ग मालकी प्रकारावर “महाराष्ट्र शासन” लावलेली नोंद सदोष असल्याचे सांगणे, नगर भूमापक नियम पुस्तक सिटी सर्व्हे मॅन्युअल १९८८ कलम १२७ प्रमाणे सत्ता प्रकारच्या व्याख्येप्रमाणे सत्ता प्रकार ब मध्ये मिळकत धारकांच्या सदरी महाराष्ट्र शासन नाव दाखल करणे अपेक्षित नसून फक्त ग वर्ग मालमत्ता धारक हा कायमस्वरुपी “महाराष्ट्र शासन” असतो, असे नमूद करणे, या ९१७ चे मालमत्तेचे वर्गीकरण एक आकडा ब प्रकार ७६५ आणि इतर १५२ असे असणे, यापैकी जवळपास ३६५ मालमत्तेचे महाराष्ट्र शासन नाव कमी करणेत आले असणे, मात्र उर्वरीत मालमत्ता धारकांना अद्याप न्याय मिळालेला नसणे, शासनाने त्यांचे ११०९ व २०१२ मधील शासन निर्णयाव्दारे कार्यवाही करण्याचे आदेशित केले असतानाही महसूल विभागामार्फत पर्यायाने उप विभागीय अधिकारी कुर्डुवाडी (ता. माढा) यांचेमार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, तद्नंतर उप विभागीय अधिकारी, कुर्डूवाडी यांचे कार्यालयात संबंधीत मालमत्ता धारक, प्रशासन व लोकप्रतिनिधींची बैठक पार पडणे, उप अधिक्षक, भूमी | श्री. संजयमामा शिंदे, श्री. अजित पवार,श्री. बबनराव शिंदे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अभिलेख, माढा यांना यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी विशेष कॅम्प घेणेची सूचना करणे, मात्र उपअधिक्षक या कॅम्पसाठी गैरहजर राहणे, त्यामुळे अद्यापही सदरचा प्रश्न आहे तसाच असणे, एकंदरीत सदरचा प्रश्न खूप वर्षे प्रलंबित असल्याने स्थानिक नागरीकांमध्ये प्रशासनाविषयी चिड निर्माण होणे, यांच्या पिढीजात मालमत्ता त्यांना मिळणे विषयी त्यांची होत असलेली मागणी, याबाबत संबंधित मालमत्ताधारक यांना न्याय देण्यासाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३७३) | "ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका हद्दीतील आरक्षण जमिनीच्या विकास हस्तांतरणाची बाजारमुल्य किंमत नगण्य झाली असुन तेथील स्थानिक शेतकऱ्यांना जमिनीचे मिळणाऱ्या विकास हस्तांतरणाचा विक्रीचा मोठा आर्थिक फटका बसला असणे, कारण बांधकाम विकासक हे महापालिकांना अधिमुल्य चढभाव भरून ईमारतीचे मजले वाढवत असल्याने शेतकऱ्यांकडून कवडीमोलाच्या दराने विकास हस्तांतरणाची मागणी करत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणे, महापालिकेने टाकलेल्या आशा आरक्षणामुळे शेतकरी देशोधडीला लागलेला असणे, ठाणे जिल्हयात अनेक प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित झालेले असुन बुलेटट्रेन सारख्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांना १५ लाख रुपये गुंठ्याप्रमाणे सरळ-सरळ वाटाघाटीतुन मोबदला मिळालेला असणे, तसेच मुंबई-वडोदरा महामार्गासाठी हायवे ॲथोरिटीने ५ पटीने शेतकऱ्यांना मोबदल्याची रक्कम दिलेली असणे, तर समृध्दी महामार्गात गेलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनींना मुल्यांकन दराच्या ४ पटीने मोबदला दिलेला असणे, त्यामुळे महानगर पालिकेतील जे शेतकरी आहेत त्यांच्यावरती अन्याय होणे, नगरविकास विभाग हे इतर प्राधिकरणापेक्षा जास्त श्रीमंत असल्याने महानगरपालिका हद्दीतील मुल्यांकन दराच्या ५ पट रक्कम ते महानगरपालिकेतील आरक्षीत भूसंपादित जमिनीसाठी भुमीपुत्र शेतकऱ्यांना देऊ शकणे, जर त्याबाबत शासनाने महानगरपालिकेतील आरक्षीत जमिनीसाठी ५ पट मोबदला देण्याचे प्रस्तुत अर्थसंकल्पामध्ये धोरण आखणे आवश्यक असल्याने महानगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांवरती अन्याय होऊ नये म्हणुन तात्काळ मा. मुख्यमंत्री यांनी धोरण अवलंबण्याची गरज, ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका हद्दीतील ज्या काही शेतकऱ्यांच्या जमिनी आरक्षणाखाली गेलेला असणे, त्यांच्यासाठी मुल्यांकन दराच्या ५ पट रक्कम देण्याचे धोरण अवलंबले पाहिजे, जेणेकरुन इतर प्राधिकरणांनी इतर शेतकऱ्यांना ज्या पध्दतीने | श्री. राजु आवळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मोबदला बहाल केलेला आहे व त्यांना न्याय देण्याचा काम केलेला आहे, मग महानगरपालिकेतील शेतकऱ्यांवरती शासन कसे काय अन्याय करु शकते, त्यामुळे शासनाने ठाणे महानगरपालिका व भिवंडी महानगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी तात्काळ त्यांना त्यांच्या रोड, गार्डन, मैदाने व इतर आरक्षीत केलेल्या जमिनीचे मुल्यांकन दराच्या ५ पट रक्कम भूसंपादन मोबदला देण्यासाठी शासनाने भूसंपादन अधिनियम कायदा नगररचनासाठी धोरण अवलंबनेसाठी करावयाची कार्रवाई व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३७४) | "ठाणे जिल्हयातील ठाणे व भिवंडी तालुक्यांतील मौजे लाखिवली व इतर गावांमध्ये वारस लावताना पुर्वीच्या कुटूंबप्रमुखाने इतर भाऊबंधकींचे मुळ वारस व सामाईक खातेदारांचे नांवे लपुन प्रतिज्ञापत्रावरून फेरफार नोंद करून तलाठी व मंडळ अधिकारी यांची दिशाभूल केल्याचे शेतजमिन मिळकतीबाबत दि.१३/१२/२०२१ रोजी रोहिदास तरे यांनी जिल्हाधिकारी ठाणे व प्रधान सचिव, महसुल विभाग यांना तक्रार दाखल केली असणे, भिवंडी तालुक्यातील मौजे कामतघर येथील वारसांचा फेरफार क्र.१७०२ वारसांनी नोंदवून नंतर लगेच बनावट सही करुन बनावट जबाब नोंदवून फेरफार क्रं. १७०२ एकाच दिवशी अगुणवत्तेच्या व अनियमिततेवर दोन फेरफारामध्ये पंधरा दिवसाची नोटीस अवधी न ठेवता फेरफार मंजुर झाल्याने तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांचा पदाचा गैरवापर करुन खोट्या जबाबातुन गैरव्यवहारातून १७०३ या फेरफाराची नोंदणी घेतल्याने सदर फेरफार रद्द करून त्यापुढील फेरफार रद्द करणेकामी पुनर्विलोकन करण्यासाठी मा.उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांना दि. १८/१/२०२१ रोजी शकुंतला चौधरी यांनी तक्रारी दिलेली असणे, वारस फेरफारांच्या नोंदी घेते वेळेस कुटूंबप्रमुख यांनी प्रतिज्ञापत्रत तलाठीसमक्ष सादर करतांना भा.द.वि. संहिता कलम १९८, १९९, २०० व १९३२ मधील तरतूदीनुसार दंडास शिक्षेस पात्र राहील असे प्रतिज्ञापत्र नोटरी करून दिलेले असणे, व असे प्रतिज्ञापत्रावरून फेरफार झाल्याने सदर प्रतिज्ञापत्राचा कायदेशीर भंग झालेला असल्यामुळे वारसांमध्ये वाद निर्माण होऊन संपुर्ण राज्यात भाऊ-बहिणींचे कायदेशीर वारस जमिन प्रकरणांमध्ये न्यायालयीन बोजा वाढलेला असणे, सदर प्रतिज्ञापत्रावरुन वारस डावलून झालेला फेरफार पुनर्विलोकनाखाली रद्द करणे कायदेशीर होईल त्यामुळे | श्री. राजु आवळे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | खरे वारसांची योग्य चौकशी होऊन योग्य फेरफार झाल्यास वारसांमध्ये वाद निर्माण होऊन न्यायालयीन गुंतागुंती व प्रक्रिया न वाढवण्यासाठी शासन स्तरावरती धोरणात्मक निर्णय घेऊन शासनाने गंभीररीत्या करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३७५) | "मौ. बळसोंड (ता. जि. हिंगोली) येथील जुना शेत सर्वे क्रमांक ४ नवीन गट क्रमांक १२ एकूण क्षेत्रफळ ९ हेक्टर ६० आर ही पूर्वी मूळची गायरान जमीन असणे, ही शेत जमीन हिंगोली शहरानजीक असल्यामुळे व बाजार मूल्य जास्त असल्यामुळे काही राजकीय भूमाफियांनी तत्कालीन शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून सदर जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करून लगेच श्री केशव शेषराव गवळी या व्यक्तीच्या माध्यमातून विक्रीची परवानगी घेणे व त्याआधारे शासकीय जमीन बळकावणे, सदर जमीन भोगवटदार वर्ग २ असून सुद्धा या जमिनीवर अनाधिकृत व विनापरवाना इमारत बांधकाम करून शैक्षणिक संस्थेस भाडेतत्त्वावर देणे, परिणामी सदर प्रकरणी शर्तभंग होणे, याप्रकरणी विधानसभेत दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता तत्कालीन महसूल मंत्री महोदयांनी सदर प्रकरणी शर्तभंग झाल्याचे मान्य करून संपूर्ण जमीन शासन जमा करण्याबाबतचे आश्वासन देणे, परंतु अद्यापही ८ हे ८० आर जमीन शर्तभंग करणारी व्यक्ती श्री केशव शेषराव गवळी यांचे नावे असणे, सदर जमीन बेकायदेशीर रित्या हडप केल्याप्रकरणी मूळ लाभार्थ्यांनी श्रीमती सखुबाई भीमराव पाईकराव व इतर सर्व यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या सुमारास आमरण उपोषण करणे व जमीन परत देण्याबाबत प्रशासनास विनंती करणे, परंतु याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, याप्रकरणी शासनाने तात्काळ सदर संपूर्ण शेतजमीन शासन जमा करून मूळ लाभार्थ्यांना देण्याबाबत व दोषींना कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. तान्हाजी मुटकुळे वि. स. स. | कित्ता |
| (३७६) | "अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यामधील वन विभागाच्या हद्दीतील माळढोक पक्षी अभयारण्याच्या पर्यावरण क्षेत्रातील खाणी संदर्भात माहे डिसेंबर, २०२२ मध्ये नागपूर येथील अधिवेशनात उपस्थित लक्षवेधी सुचना उपस्थित करण्यात येणे, सदर चर्चेला उत्तर देताना एका मा.लोकप्रतिनिधीच्या आग्रहापायी महसूल विभागांतर्गत असलेल्या प्रांताधिकारी कर्जत व तहसिलदार, कर्जत यांना शासनाने निलंबित करण्याबाबत सभागृहात सांगण्यात येवून तेव्हांपासून शासनाने त्यांचे निलंबन करण्यात येणे, परंतु पर्यावरण संवेदनशील | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | क्षेत्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व सदस्य सचिव असलेल्या उपवन संरक्षक अहमदनगर यांच्या समितीवर सनियंत्रण समितीची असणे, त्यामुळे माळढोक क्षेत्र अधिसुचित झाल्यानंतर सदस्य सचिव यांनी कारवाई करणे गरजेचे असणे, किंबहुना त्यांचेमार्फत कार्यवाही होणे बंधनकारक असणे, तथापि असे असतांना त्यांचेवर कारवाई होण्याऐवजी महसूल विभागाच्या प्रांताधिकारी, कर्जत व तहसिलदार, कर्जत यांचेवर कारवाई करुन निलंबित करण्यात येणे, वास्तविकतः त्यांच्या या संदर्भातील निलंबनाला मॅट ने स्थगिती देऊन त्यांचे पुर्नस्थापना करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले असणे, परंतु शासनाने त्याबाबत कार्यवाही करण्यात न येणे, सदर दोन्ही अधिकारी हे कार्यक्षम असून उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी व उत्कृष्ट तहसिलदार म्हणून शासनाने त्यांना गौरविण्यात आलेले असणे, त्यांचे केलेले निलंबन हे त्यांचेवर अन्यायकारक असणे, त्यामुळे त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांना पुन्हा सेवेत घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (३७७) | “मौजे मानघर (तालुका पनवेल, जिल्हा रायगड) येथे सर्व्हे नंबर ६७ ही दळी जमीन असणे, दळी जमीन ही स्थानिक ग्रामस्थ कुळांना देणे संदर्भात शासनाचे धोरण असणे, सदर धोरणाअंतर्गत स्थानिक ग्रामस्थांनी सन २०१४-१५ मध्ये तहसिलदार यांच्याकडे अर्ज करणे, तहसिलदार यांनी सदर अर्ज चौकशीकामी वनविभाग व मंडळ अधिकाऱ्याकडे पाठवणे, वन अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी ग्रामस्थांच्या बाजूने अहवाल पाठवणे, तद्नंतर वाटप करावयाची जमीन निर्वणीकरण झाली असल्याने वाटपासाठी सदर जमिनीचा स्वतंत्र ७/१२ तयार होणे, दरम्यानच्या काळात स्थानिक ग्रामस्थांनी वन हक्क कायद्यान्वये त्यांचे हक्क असल्याने अर्ज करणे, सन २०१८ मध्ये वन हक्क कायद्यान्वये स्थानिक ग्रामस्थांचे नाव लावण्यासंदर्भात तहसिलदार यांनी अहवाल पाठविला असणे, परंतु सदरची जमीन ही नवी मुंबई विमानतळा जवळ असल्याने व कोट्यावधी रुपयांची असल्याने एका विकासकाने जाणीवपूर्वक जमीन बळकाविण्याच्या दृष्टिकोनातून दळीनायकाच्या कुटुंबातील व्यक्ती व तहसिलदार यांना हाताशी धरून नियोजनबद्ध आराखडा तयार करणे, यातून ग्रामस्थांच्या अर्जावरून तयार झालेली फाईल तहसिलदार कार्यालयातून गायब करणे, व तद्नंतर दळी नायकांच्या वारसांच्या वारस हक्क प्रमाणपत्राच्या आधारे तहसिलदार यांचेकडून संपूर्ण सर्व्हे नंबर ६७ मधील १४२ एकर जमीन दळीनायकाच्या तीन वारसांच्या नावे करणे, तद्नंतर सदर जमीन | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | विक्री परवानगीसाठी अर्ज करणे, वास्तविक पाहता सदर जमीन दळीनायकांच्या वारसांच्या नावे न करता स्थानिक ग्रामस्थ कुळांच्या नावे करण्याची तरतूद असणे, एका व्यक्तीला पाच एकर पेक्षा जास्त जमीन देय नसताना संपूर्ण १४२ एकर जमीन दळी नायकांच्या तीन वारसांना वाटप करण्याचे तहसिलदार यांनी आदेश करणे, तहसिलदार यांचे बेकायदेशीर आदेश रद्द करून त्यांचे नावे जमीन वाटप करण्यासंदर्भात वेळोवेळी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केलेला असणे, तथापि स्थानिक ग्रामस्थांचे हक्क दुर्लक्षित करून सदर जमीन भू-माफियांना विक्री करण्याच्या संदर्भातील प्रयत्नांना स्थानिक अधिकाऱ्यांनी सहकार्य करणे, ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनावर मा. महसूलमंत्री व मा.राज्यपाल यांच्या सूचनांकडे अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुलर्क्ष करणे, यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये झालेला असंतोष व करावयाची उपाययोजना." | | |
| (३७८) | 'जि.पालघर, डहाणू तालुक्यातील वाणगाव-चारोटी मार्गावरील दाभले गावच्या हद्दीतील जागेत सुरु असलेल्या प्रिमीयम इन्फ्रा सर्विसेस प्रा.लि.या कंपनीच्या कास्टींग यार्डमधील आएमसी प्लांटची परवानगीची मुदत २५ जून, २०२२ रोजी संपुष्टात आली असतानाही सदरहू प्लांट गेले ७ महिन्यांपासून विनापरवानगी बेकायदेशीररित्या सुरु असल्याचा प्रकार दि.१८/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, सदरहू प्लांटमधून वेस्टर्न डेडीकेटेड फ्रेट कॉरीडॉर मार्गावरील पुल व इतर कामांसाठी आवश्यक रेडीमिक्स कॉंक्रिट तयार करुन त्याची वाहतूक करण्यात येत असणे, सदरहू प्लांट सदर जागेवर गेले तीन वर्षांपासून सुरु असल्याने प्लांटमधून उडणारे धुलीकण हवेद्वारे आजुबाजुच्या बागायती पिकांवर बसत असल्याने मोठया प्रमाणात रोग पसरुन शेती पिकांची प्रत घसरल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, वाणगाव परिसरात पिकणारी साधी मिरची संपूर्ण देशात प्रसिध्द असून परदेशात देखील मोठया प्रमाणात निर्यात होत असणे, सदर परिसरात साधी मिरची ८०० हेक्टर तर ढोबळी मिरची २५० हेक्टरवर पीक घेण्यात येत असल्याने सदर भागात सुरु असलेल्या आरएमसी प्लांटमुळे या परिसरातील पिकांना सिमेंटमिश्रीत धुलीकणांच्या प्रदूषणामुळे वाणगावसहित दाभले, गोवणे, साखरे आदी गावातील बागायती शेतीला फटका बसून पिकांची प्रतवारी घसरल्यामुळे येथील हजारो शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असणे, डहाणू परिसर हा पर्यावरणीय दृष्टीने अतिसंवेदनशील घोषित करण्यात आला असून, प्रदूषण करणारे उद्योग तथा आरएमसी | श्री. नितीन पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्लांटसारखे प्रकल्प, पर्यावरणाला धोका निर्माण करणारे प्रकल्प सुरु करण्यास बंदी असतानाही, सदर परिसरात मुदत परवानगी संपूनही आरएमसी प्लांट विना परवाना बेकायदेशीररित्या सुरु असणे, सदरहू प्लांट गेले सात महिन्यांपासून प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि डहाणू तहसीलदार यांचे आर्थिक संगनमताने सुरु असल्याने सदर प्लांटच्या प्रदूषणामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, शेती आणि बागायतीला गंभीर धोखा पोहोचविणाऱ्या सदर प्रदूषणकारी प्रिमीयर इन्फ्रा सर्विसेस प्रा.लि.कंपनीच्या आरएमसी प्लांटला परवानगी देऊ नये अशी स्थानिक शेतकऱ्यांनी मागणी करुनही सदर प्रकरणी शासन तथा संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने सदर शासकीय अधिकारी यांचे आर्थिक संगनमताने अद्यापही आरएमसी प्लांट सुरु असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| (३७९) | अंड्याचे मनमानी दर' जाहीर होत असल्यामुळे राज्यातील कुक्कुट पालक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असल्याची बाब नुकतीच उघडकीला येणे, राष्ट्रीय अंडी समिती (एनइसीसी) कडून अंड्याचे दर अचानक कमी केल्याने राज्यातील कुक्कुटपालक शेतकरी अडचणीत आले असणे, परिणामी पक्षी पालकांचे भविष्यात फार मोठे आर्थिक नुकसान होणार असणे, कोणत्याही ठोस कारणाशिवाय अंड्याचे दर अचानक कमी केले जात असल्याकडे संबंधित मंत्र्यांकडे निवेदन देऊनही त्याच्या संदर्भात शासनाच्या संबंधित विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, कोणत्याही कायदेशीर अधिकाराशिवाय राष्ट्रीय अंडी समिती अंड्याचे दर कोणत्याही प्रकारच्या शास्त्रोक्त अभ्यासाशिवाय जाहीर करत असल्याची प्रथा थांबण्याची आवश्यकता, गेल्या काही दिवसांपासून राज्यात दररोज सव्वा कोटी अंड्यांचा तुटवडा असताना आणि उत्पादन खर्चात अचानक वाढ होत असताना राष्ट्रीय अंडी समन्वय समिती, अंडी उत्पादन खर्च, मागणी आणि पुरवठा अशा कोणत्याही वास्तविक माहितीच्या आधारावर दर जाहीर करत नसणे, ही संस्था कुक्कुटपालकांच्या ऐवजी व्यापाऱ्यांच्या बाजूने काम करीत असणे, त्यामुळे पक्षी पालकांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, अंड्यांची किमान आधारभूत | श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. छगन भुजबळ, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. विनोद निकोले, श्री. दौलत दरोडा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | किंमत ठरण्यासाठी कायदेशीर संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." | | |
| (३८०) | ''बृहन्मुंबई दूध योजनेच्या माध्यमातून आरे, वरळी, कुर्ला या शासकीय दूध डेअरीतर्फे माहे फेब्रुवारी, २०२२ पासून दूध पुरवठा बंद केल्यामुळे मुंबईभर दुध वितरण करणारे १८०० स्टॉलधारक आणि त्यास संलग्न असलेले वितरकांवर उपासमारीचे व बेकारीचे संकट कोसळल्याचा प्रकार दि.१०.०२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, आरे दुध व दुग्धजन्य पदार्थ तसेच आरेची सहउत्पादने तातडीने उपलब्ध करणे, केंद्र संचालकाने आगाऊ भरणा केलली दैनंदीन दुध विक्रीची रक्कम परत करणे, आणि थकीत रक्कमेबाबत निर्णय घेऊन निपटारा प्रमाणपत्र द्यावे, केंद्र संचालकाकडून वसून केलेले भूईभाडे तातडीने महापालिकेकडे जमा करणे, केंद्र चालकाच्या वारसाच्या किंवा मदतनिसाच्या नावावर केंद्र हस्तांतरीत करण्याबाबतच्या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र दुध वितरक संघटनेने दि.७.९.२०२२ रोजी व यानंतर दि.१०.२.२०२३ रोजी मा.दुग्ध विकास मंत्री महोदयांना देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, राज्य शासनाच्या उपरोक्त तीन दूध डेअऱ्या बंद करुन त्या डेअरींची कोट्यावधी रुपये किमतीची जागा खाजगी विकासकास विक्री करण्याचे षडयंत्र रचल्याची धक्कादायक बाब उघड होणे, सदरहू जागा विकासकास देण्यासाठी राज्य शासनातील उच्च अधिकाऱ्यांनी शासकीय दूध वितरण बंद करुन व सदरहू दुध संस्था आर्थिकदृष्ट्या तोट्यात आणून बंद करण्यासाठी कार्यवाही करुन खाजगी दुध संस्थांचा व्यवसायास चालना देऊन नफेखोरी करण्याचा घडलेला गंभीर प्रकार, सदरहू प्रकरणी तातडीने गंभीर दखल घेऊन शासनाच्या तीन्ही दुध डेअऱ्यांचे दुध वितरण व दुग्धजन्य पदार्थ व सहउत्पादने तात्काळ सुरु करुन मुंबईकर जनतेस रास्त दरात विशेष ब्रँण्डच्या माध्यमातून दुध वितरण करण्यासाठी तसेच स्टॉलधारकांच्या रास्त मागण्या तत्काळ मान्य करण्याच्यादृष्टीने ठोस उपाययोजनात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले व होत असलेले शासनाचे अक्षम्य व जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी मुंबईतील १८०० केंद्र चालक आणि मुंबईकर जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरन, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (३८१) | "आरे गोरेगांव चेकनाका येथे उभारण्यात येत असलेल्या प्रवेशद्वारास "छत्रपती श्री.शिवाजी महाराज प्रवेशद्वार" असा नामकरणाचा प्रस्ताव मंजूरीअभावी प्रलंबित असणे, सदर परिसरात मरोळ, पवई व गोरेगांव असे तीन चेकनाका येत असून तिन्ही प्रवेशस्थळांची ओळख ही आजतागायत चेकनाका अशीच असणे, तसेच आरे हे पर्यटनस्थळ असल्याने विविध राज्यातून नव्हे तर देश परदेशातून अनेक पर्यटक याठिकाणी येत असल्याने चेकनाकाजवळ शासनाच्या निधीतून आकर्षक प्रवेशद्वाराची निर्मिती आणि मंजूरी अंतिम टप्प्यात असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने मुंबई महापालिका व शासनाकडे केलेला पत्रव्यवहार, दिनांक २ मे, २०२३ रोजी मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे केलेली पत्राद्वारे मागणी, पश्चिम द्रुतगती महामार्गावरुन प्रवास करतांना तसेच आरेच्या सौदर्यात भर घालणारे भव्य असे प्रवेशद्वार उभारण्याबाबतचा प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाकडून होत असलेली चालढकल, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने गांभीर्याने लक्ष घालून चेकनाका येथे उभारण्यात येत असलेल्या प्रवेशद्वारास "छत्रपती श्री.शिवाजी महाराज प्रवेशद्वार" असा नामकरणाचा प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | श्री. रविंद्र वायकर वि. स. स. | कित्ता |
| (३८२) | "रायगड जिल्हयातील अलिबाग वन विभागातील वडखळ रेंजमध्ये सन १९९० चे दरम्यान रोजंदारी मजूरांनी सेवेत नियमित करण्यासाठी वन विभागाविरूध्द.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे (यु.एल.पी.) ६१३/१९९१ दि.०१/११/१९९१ अन्वये खटला दाखल केला आणि मा.औदयोगिक न्यायालयाने सदर खटल्याचा निकाल दि.३१/०३/२००० रोजी शासनाच्या विरूध्द. व मजूरांचे बाजूने दिला. मात्र, त्यानंतर सदर निकालाविरूध्द.शासनाने मा.उच्च.न्यायालय, मुंबई येथे दि.०३/०५/२००२ रोजी क्र.३२५६/२००२ अन्वये रिट पिटीशन दाखल करणे, मा.उच्च.न्यायालयाने दाखल रिट पिटीशनवर दि.१५/०६/२०१८ रोजी पुन्हा खटल्याचा निकाल शासनाच्या विरूध्द.व मजूरांच्या बाजूनेच देणे, मा.उच्च.न्यायालयाने दिलेल्या आदेशास पाच वर्षे लोटूनही न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करीत संबंधित मजूरांना अधिकारी वर्गाकडून अदयापी सेवेत सामावून न घेणे, तसेच त्यांना अदयाप कुठल्याही प्रकारचे लाभ न देणे, या बाबी मख्यत्वे निदर्शनास येणे, हा घटनाक्रम व अधिकाऱ्यांचे मुजोर वर्तन पाहता या वनमजूरांवर झालेल्या अन्यायास कारणीभूत ठरलेल्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी, व त्यामुळे न्याय मिळणेस झालेल्या व | श्री. रविशेठ पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | होत असलेल्या विलंबामुळे यामुळे मजूरांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण यावर या मजूरांना सत्वर दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (३८३) | "चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या मोहुर्ली बफर क्षेत्रात शेतावर जात असलेलया शेतकऱ्याला दगा धरुन बसलेल्या पट्टेदार वाघाने हल्ला करुन ठार केल्याची घटना दिनांक ८/२/२०२३ रोजी घडणे, निळकंठ नारायण नन्नावरे असे मृतक शेतकऱ्यांचे नांव असणे, या घटनेमुळे या परिसरात शोक व्यक्त होणे तसेच घबराटीचे वातावरण निर्माण होणे, येथे माणसांवर वाघांचे हल्ले होणे ही नित्याची बाब झाली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे, विद्यार्थ्यांना शाळेत जाणे दुरापास्त होणे, त्यामुळे शासनाने येथील वाघांचे वाढते हल्ले रोखण्याबाबत तातडीची कार्यवाही करावी अशी आग्रही मागणी असतसानाही त्याबाबत शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती प्रतिभा धानोरकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) वि. स. स. | कित्ता |
| (३८४) | "सातारा जिल्ह्यातील कराड व पाटण तालुक्यातील डोंगरी व दुर्गम भागामध्ये वन्य जीवप्राण्यांचा वावर असणे, अन्नांच्या शोधामध्ये या वन्य प्राण्यांचा शहरी भागांमध्ये वावर वाढलेला असणे, परिणामी वन्य प्राण्यांकडून शेतकरी व त्यांच्या पाळीव जनांवरना धोका निर्माण होत असणे, वराडे, ता. कराड, जि. सातारा येथे जखमी वन्य प्राण्यांवर उपचार करण्याकरिता १० महिन्यांपूर्वी ट्रांझिट सेंटर सुरु करण्याची मंजूरी मिळालेली असणे. कोल्हापूर, सांगलीसह कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील वन्यजीवांवर उपचारासाठी व देखभालीसाठी वराडे, ता. कराड येथील केंद्र सोयीचे असणे. ७ कोटी ५८ लाखांच्या कामांकरिता उपवनसंरक्षक यांच्या नावे जमा झालेली रक्कम त्यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करुन ही मागील १० महिन्यांमध्ये कोणतेही काम सुरु न करणे. जखमी व शहरी वस्तीमध्ये पकडण्यात आलेल्या वन्य प्राण्यावर उपचार करणारे ट्रांझिट सेंटरचे काम त्वरीत सुरु करणेबाबत शासनाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. पृथ्वीराज चव्हाण वि. स. स. | कित्ता |
| (३८५) | "गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा वनविभाग अंतर्गत कमलापुर वनपरिक्षेत्रातील शासकीय हत्ती कॅम्प येथे ८ हत्ती यात २ नर व ६ मादांचा समावेश असणे, त्यामध्ये मंगला नामक ३२ वर्षीय हत्तीण हिची गर्भधारणा | श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. जयंत पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | झाली असणे, माहे जानेवारी २०२३ ते फेब्रुवारी २०२३ दरम्यान प्रसुती होईल असा अंदाज असणे, गर्भधारणा झालेल्या हत्तीणीची देखभाल करण्याकरीता कायमस्वरुपी पशुवैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची वन्यजीव प्रेमी करुन सतत मागणी करण्यात येणे, परंतू उपवनसरंक्षक सिरोंचा वनविभाग यांनी या मागणीकडे दुर्लक्ष केल्याची गंभीर बाब समोर येणे, परिणामी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी जंगलात प्रसुती होणे, जंगलात प्रसुती झाल्याचे लक्षात येताच मंगला हत्तीणीला आणण्याकरीता जंगलात कर्मचारी गेले असता नवजात पिल्लु मृतावस्थेत आढळणे, सिरोंचा वनविभागातील कमलापूर शासकीय हत्तीकॅम्प राज्यातच नव्हे तर देशात प्रसिध्द असल्यामुळे या ठिकाणी नेहमी पर्यटकांची वर्दळ असणे मात्र दुर्लक्षामुळे येथे दरवर्षी हत्तीचा मृत्यू होत असल्याची बाब समोर येणे, यापुर्वी मंगलाच्या आदित्य, सई, अर्जुन नावाच्या तीन पिलांचा मृत्यू झालेला असणे, त्यामुळे वनविभागाच्या कार्यप्रणालीवर पर्यटकांनी तिव्र नाराजी व्यक्त करणे, या घटनेमुळे राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, समाजिक कार्यकर्त्याकडून हत्तीच्या मृत्यूबाबत न्यायलयात याचिका दाखल करुन न्यायलयीन चौकशी करण्याची होत असलेली मागणी, परिणामी या ठिकाणचे सौदर्य जाण्याकरीता हत्तीच्या देखरेखीसाठी आवश्यक सोई सुविधा पुरविण्याची नितांत गरज, गर्भात वाढलेले बाळ जन्मताच दगावण्याची असंवेदनशील घटना, याबाबत जनसंघर्ष समितीने नियमीत चिकित्सक, चाराकटर, व महावत यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी या घटनेस जबाबदार संबंधीत सिरोंचा वनपरिक्षेत्राचे उपवन सरंक्षक, मुख्य वन सरंक्षक यांना निलंबीत करण्याची स्थानिकाकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (३८६) | “अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील अनेक रस्ते या पुलांचे परवानगी प्रस्ताव वन विभाग तसेच व्याघ्र प्रकल्प विभाग यांच्याकडे बऱ्याच काळापासून प्रलंबित असणे, मेळघाट विधानसभा क्षेत्रातील २२ अतिदुर्गम आदिवासीबहुल गावांना स्वातंत्रपासून अद्यापही वीज पुरवठा करण्यात न येणे, चुनखडी, खडीमल अशा मेळघाटमधील गावांना पिण्याच्या पाण्याअभावी गढूळ पाणी पिण्याची स्थिती निर्माण होणे, चिखलदरा पर्यटन स्थळ विकासांतर्गत बांधण्यात येणाऱ्या स्कायवॉक चे काम अर्धवट अवस्थेत पडून असणे, वन विभाग तसेच व्याघ्र प्रकल्प विभागाच्या अतिजाचक अटींमुळे या भागातील गरीब आदिवासींच्या विकासातच नव्हे तर दैनंदिन गरजांच्या पुर्तता होण्यात मोठी अडचण | श्री. बच्चू कडू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | निर्माण होणे, या भागातील नागरिकांना किमान मानवी गरजांची उपलब्धता होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने वन व व्याघ्र प्रकल्प विभागांच्या अटी शिथिल करून तातडीने या क्षेत्रातील गरीब आदिवासींना किमान मूलभूत गरजांची पूर्तता व्हावी यासाठी हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, राज्य या केंद्र शासन आदिवासींच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करीत असताना या भागातील कामे पूर्ण होण्यात अडचणी निर्माण करण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाने या संदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३८७) | "महाराष्ट्रात ग्रामीण व शहरी भागात अनेक गोरगरीब कुटुंब गेल्या २० ते ३० वर्षापासुन अतिक्रमण करून राहात असणे, देशाचे पंतप्रधान यांनी देशात पंतप्रधान आवास योजना सुरू करणे त्या अंतर्गत "सर्वांसाठी घरे" हा उपक्रम देशात सुरू असणे महाराष्ट्रात अनेक गावात ग्रामपंचायत हद्दीमध्ये तसेच शहरी भागातील वार्डामध्ये सदर गरिब कुटुंब २०-३० वर्ष राहात असणे परंतु सदर जागा वन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मालकीची असणे त्यामुळे त्यांना जमीनीचे स्थायी पट्टे न मिळणे शासनाने २०११ पुर्वीचे अतिक्रमण नियमाकुल करून त्यांना स्थायी पट्टे देण्याकरीता आदेश काढणे परंतु ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीमध्ये असुन सुध्दा त्यांना अद्यापही स्थायी पट्टी न मिळणे महाराष्ट्रातील लाखो कुटुंब स्थायी पट्ट्याची वाट पाहत असणे सदर कुटुंबाचे नावे ग्रामपंचायत मधील "ब" यादी व "ड" यादी यामध्ये त्यांचा समावेश असणे यादीनुसार घरकुल मंजुर होणे परंतु स्थायी पट्टा नसल्याने त्या घरकुलाचा लाभ कुटुंबाला न मिळणे तसेच शासनाने गेल्या अनेक वर्षामध्ये ग्रामीण भागातील हद्द वाढीसाठी पुर्वीप्रमाणे रहिवाशी क्षेत्राकरीता जागा अधिग्रहण बंद करणे त्यामुळे ग्रामीण भागातील लाखो कुटुंब घरकुलापासुन वंचित राहणे या सर्वांना स्थायी पट्टे देण्याची आवश्यकता असणे अतिशय कठीण परिस्थितीत सदर कुटुंब जगत असणे वारंवार या संदर्भात आंदोलन व मोर्चे होत असणे या संदर्भात जनतेची प्रचंड मागणी होत असणे त्यामुळे जनतेची तिव्र भावाना व शासनाने करावयाची उपाययोजना." | श्री. समीर कुणावार वि. स. स. | कित्ता |
| (३८८) | "राज्यात श्यामप्रसाद मुखर्जी जनवन ही योजना राबवली जात असणे, या योजनेचा मोठया प्रमाणात निधी वनसमितीच्या खात्यात वळता झाला असूनही ही योजना जनतेला दिलासा देणारी ठरण्यापेक्षा खऱ्या अर्थाने वनकर्मचारी आणि वनसमित्यांच्या पदाधिकाऱ्यांना गब्बर बनवण्यासाठी मैलाचा दगड ठरली असणे, चंद्रपूर | श्री. सुभाष धोटे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | जिल्हाअंतर्गत मद्यचांदा वनविभागामार्फत कोठारी परीक्षेत्रात माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत एकूण वनसमित्या कार्यरत असणे, गणपूर, काटवली, बामणी, कवडजई, आकसापूर, कारंजी, धानपूर, कन्हाळगांव, चिवंडा, आणि परसोडी येथील प्रत्येक वनसमितीच्या बँक खात्यात योजनेच्या अनुदानाची रक्कम २४ लाख २५ हजार जमा केली असणे, कामाचे नियोजन वनसमितीच्या बैठकीत मंजूर करून खर्चाला मान्यता देखील त्यांच्याकडूनच घ्यावयाची असणे, त्याचवेळी शासकीय नियमाला तिलांजली देत अधिकाऱ्यांची मर्जी राखून वनकर्मचारी व वनसमितीच्या पदाधिकाऱ्यांनी सदर योजनेच्या कामात बराच घोळ घेतल्याचे निष्पन्न होणे, कोठारी परिक्षेत्रातील जनवन योजना प्रचंड वादात सापडली असणे, येथे वनसमितीच्या मांगणीनुसार सैन्य प्रशिक्षण राबवण्यात आले, भ्रष्टाचाराचा संशय असलेल्या सहा महिन्यांच्या या प्रशिक्षणासाठी ५ गांवच्या समित्यांनी सदर कामावर सप्टेंबर, २०२२ पर्यंत तब्बल १३ लाख ६३ हजार रुपयांचा खर्च केला असणे, मात्र प्रत्यक्षात हे प्रशिक्षण झालेच नसल्याची तसेच रेकॉर्डवरच प्रशिक्षणाची सांगता झाल्याचे उघडकीस येणे, संपूर्ण बोगस लाभार्थ्यांची नांवे समोर करून त्यांना कुठलेही प्रशिक्षण न देता शासनाचा निधी फस्त करण्यात आल्याची धक्कादायक बाब उजेडात येणे, याप्रकरणी कोणतीही चौकशी करून कारवाई करणेबाबतीत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (३८९) | "महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांसह राज्यातील महापुरुषांशी संबंधित अनेक वस्तू व दस्तऐवज परदेशात असणे, यात छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखं (व्हिक्टोरिया व अल्बर्ट संग्रहालय, लंडन) तसेच त्यांनी वापरलेली महाराजांची जगंदबा तलवार (रॉयल कलेक्शन ट्रस्ट लंडन), छत्रपती शिवाजी महाराजांचे स्टेन ग्लास मधील पेंन्टिग (लंडन), छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे चित्र (रिजस्क संग्रहालयात, ॲम्स्टरडॅम), छत्रपती शिवाजी महाराज यांचे चित्र (ब्रिटिश म्युझियम), १ लाखांहून अधिक शिवकालीन दस्ताऐवज व चित्र (नेंदरलँडमधील नॅशलन आर्काईव्ह) यांचा समावेश असणे, या सर्व ऐतिहासिक वारसा असलेल्या वस्तू आपल्या राज्यात परत आणण्याची राज्यातील जनतेची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (३९०) | "राज्यातील लोककलावंत, तमाशाकलावंत यांच्यासाठी शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने सुमारे दीड वर्षापूर्वी जाहीर केलेल्या पॅकेजनुसार अनुदानाच्या रकमा कलावंताना अद्यापही अदा न करण्यात आल्यामुळे दिनांक ११ जानेवारी २०२३ अथवा त्या सुमारास पासून राज्यभरातील कलावंतानी मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसण्याचा दिलेला इशारा, अनुदानाच्या रकमा अदा करणे तसेच इतर महत्त्वाच्या मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्यामुळे कलावंतांमध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, कोरोना काळात कला सादरीकरणाचे काम पूर्णतः बंद पडल्यामुळे आणि उपजीविकेचे साधन नसल्यामुळे अनेक कलावंतांच्या वाटेला आलेले कर्जबाजारीपण, संबंधित निर्णयांच्या अंमलबजावणीत होत असलेल्या दिरंगाईमुळे कलावंतांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, शासनाचे ह्या बाबीकडे दुर्लक्ष, सदरबाबत तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता इ." | श्री. चेतन तुपे वि. स. स. | कित्ता |
| (३९१) | "खेळे / नमन व जाखडी हा प्रसिध्द कलाप्रकार कोकणामध्ये प्रसिध्द असून अनेक वर्ष या कलाप्रकाराच्या माध्यमातून अनेक कलावंत आपली कला प्रदर्शित करुन मनोरंजन व प्रबोधन करण्याचे काम करत असणे, बदलत्या कालानुसार खेळे/नमन व जाखडी यासारखे अभिजात कोकणी कलाप्रकार काळाच्या ओघात गडप होण्याचा धोका संभवत असणे, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये लोककला अभिजात संस्कृतीचे दर्शन अखिल जगाला घडवितात त्या कला संपूष्टात येऊ नयेत, बदलत्या काळाशी स्पर्धा करत त्यांना तग धरता यावा तसेच सांस्कृतिक व पारंपारीक कलेची लोकांना माहिती व्हावी आणि त्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्यात नाट्यसंगीत, नाट्य, चित्रपट, तमाशा फड, हंगामी तमाशा फड, लावणी कलापथक, दशावतार मंडळ, खडीगंमत कलापथक व शाहिरी पथके इत्यादिना यासाठी शासन निर्णय क्रमांक लोक. अ. २००७/ प्र.क्र.१२७/ सां.कां.३, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२, दिनांक ०१/०१/२००८ नुसार शासनाने अनुदान पॅकेज जाहीर असणे, याधर्तीवर मध्य कोकणातील या पारंपारीक व सांस्कृतिक कलाप्रकारांना देखील उर्जितावस्था देणे, त्या टिकवून ठेवण्याकरीता अनुदान आणि कलाकार पेन्शन योजना शासन लागू करणेबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही." | श्री. शेखर निकम, श्री. निलेश लंके, कुमारी आदिती तटकरे, श्री. अतुल बेनके, श्री. यशवंत माने वि. स. स. | कित्ता |
| (३९२) | "राज्यात परभणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्यात श्री. संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या गोदावरी काठावरील स्थानास दक्षिण काशी म्हणून ही ओळखले जात असणे पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी | श्री. रत्नाकर गुट्टे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | होळकर यांनी बांधलेल्या प्राचिन व पवित्र घाटावर राज्यभरातून व शेजारील राज्यातील नागरिक येथे दशक्रिया विधी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सतत येत असणे, व संत गजानन महारांजाची पालखी तेथे विसावा घेत असणे, या घाटाची व मंदिरांची वर्षोनुवर्षे कोणतीच देखभाल दुरुस्ती होत नसल्याने या मंदिरांचे अस्तिवच नष्ट होत असणे, मंदिराच्या पाठीमागे असलेला नाला खचत असल्याचे निर्दशनास येवून मंदिरास त्याचा धोका निर्माण झाल्याचे समोर येणे, त्यासाठी या क्षेत्रास तात्काळ पर्यटन तथा तिर्थ क्षेत्र ब व क वर्गाचा दर्जा देवून पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी नागरिकांमधून व लोकप्रतिनीधी कडून वेळोवेळी करुनही प्रशासन कोणतीच दखल घेत नसणे, त्यासाठी शासनाने या थोर संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या जनाईनगरेचे भूमिचे रक्षण करणे गरजेचे असणे." | | |
| (३९३) | "रायगडसह कोकण पट्ट्यातील समुद्र किनारपट्टीवर पर्सिसन नेटच्या सहाय्याने अत्याधुनिक ट्रॉलर्सकडून बेसुमार मासेमारी होत असणे, एलईडी व ओव्हर फिशिंगसह बोटींची संख्या वाढलेली असणे, त्यामुळे सागरी प्रदूषणातही मोठ्या वाढ झालेली असणे, दरवर्षी पावसाळ्यात नारळी पोर्णिमेपर्यंत महाराष्ट्रात सागरी मासेमारीवर कायद्याने बंदी घालण्यात येत असणे, बंदीच्या काळातही पर्ससिन, एलईडीच्या माध्यमातुन बेकायदेशीर मच्छीमारी केली जात असल्याने मासळीचे उत्पादन प्रतिवर्षी घटत चालले असणे, पर्यायाने राज्याच्या महसुलामध्ये घट होत असून परकीय चलनावरही विपरीत परिणाम होत असणे, परराज्यातील बोटी राज्यातील सागरी किनाऱ्यामध्ये घुसखोरी करुन चोरटी मासेमारी करत असल्याने किनारपट्टी भगात मत्स्यदुष्काळ झालेला असणे, पारंपारिक मच्छिमारांना मात्र बंदीच्या काळात मासेमारी करता येत नसल्याने राज्यातील स्थानिक व पारंपारिक भूमिपुत्र मच्छीमारांचा व्यवसाय डबघाईला आलेला मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याने कर्जबाजारी झालेले असणे, डिझेल परतावाही वेळेत मिळत नसल्याने कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत असणे, मत्स्यदुष्काळामुळे अनेक मच्छीमारांमध्ये बेरोजगारीचेही प्रमाण वाढलेले असणे, मासेमारी हा एकमेव उदरनिर्वाहाचा मार्ग असल्याने कुटूंबियांच्या उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, पर्यायाने मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेली मोठी रोजगाराची साखळीही नष्ट होण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करुनही आवश्यक कार्यवाही | कुमारी आदिती तटकरे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील मच्छिमारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, पर्सिसन, एलईडी मासेमारीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या लाखो मच्छिमार बांधवांना सहाय्य केले जात नसल्याने दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजीपासुन नागपूर येथे सुरु होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनकाळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, उपासमारी, कर्जबाजारीपणामुळे अडचणीत सापडलेला मच्छिमार आत्महत्यासारख्या मार्ग निवडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, यासंदर्भात कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (३९४) | माहे जानेवारी ते मे या कालावधीत राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन नेट मासेमारीवर बंदी लागू असतांनाही वेंगुर्ले व मालवण तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) बिनधास्तपणे दिवस-रात्र बेकायदेशीर पर्ससीन नेट मासेमारी सुरु असणे, अशा पर्ससीन नेटधारकांना जाब विचारायला गेल्यास ते भर समुद्रात पारंपारिक मच्छीमारांच्या नौकावर चाल करून येत असणे, टोळीने अनधिकृतपणे पर्ससीन मासेमारी करुन दहशत पसरविण्यात येणे, बेकायदेशीरपणे एलईडी पर्ससीन नेटव्दारे मासेमारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी पारंपारीक मच्छीमारांच्या संघटनांनी वारंवार संबंधित अधिकारी व शासनाकडे वारंवार करुनही त्याकडे शासनाचे व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे पारंपारीक मच्छीमारी संकटात आलेली असणे, शासनाने तातडीने एलईडी पर्ससीन मासेमारी व हायस्पीड ट्रॉलर्सना आळा घालण्याच्या अनुषंगाने कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया." | श्री. वैभव नाईक वि. स. स. | कित्ता |
| (३९५) | "ऑनलाईन अर्ज करूनही राज्यातील १ लाख २३ हजार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, ठाणे, मुंबई, पालघर व रायगड या जिल्ह्यांतील तब्बल ७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित असणे, त्यामुळे, अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले असणे, त्यामुळे, मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये याकरीता ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| (३९६) | “मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदावर एका डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती तर मुंबई विद्यापीठात उप कुलसचिव पदावर अहर्ता नसलेला उमेदवार थेट पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठात कुलसचिव पदावर नियुक्त झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, विविध परीक्षांमध्ये गुणपत्रिका प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका गहाळ होणे इत्यादी बाबींमुळे जगप्रसिद्ध अशा मुंबई विद्यापीठाची प्रतिमा मलीन होत असतांना मुंबई विद्यापीठाने १८ उप कुलसचिव पदी सर्व नियम धाब्यावर बसून अनेक टंकलेखक, लघुलेखक, खाजगी कंपनीतील लिपिक, अधिव्याख्याता, मुख्याध्यापक, मानधन तत्वावरील जिल्हा प्रकल्पाधिकारी, समन्वयक, लेखा सहाय्यक, असा अनुभव असलेल्या लोकांना नियुक्त करण्यात येणे, या संदर्भातील अहवाल उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि मुंबई विद्यापीठाकडे उपलब्ध असताना विद्यापीठ प्रशासन आणि राज्य शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग अर्थपूर्ण रित्या मौन बाळगून असणे, परिणामी मुंबई विद्यापीठाच्या क्षेत्रातील सर्व विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक व पालक यांच्यामध्ये राज्य शासनाच्या बाबतीत पसरलेली तीव्र नाराजी याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.” | श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. छगन भुजबळ, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. विनोद निकोले, श्री. दौलत दरोडा, वि. स. स. | कित्ता |
| (३९७) | “राज्यातील महाविद्यालयातील सुमारे ४०००० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकून संप पुकारण्यात आल्याची घटना दि.२.२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, यामुळे राज्य शासनाने दि.३.२.२०२३ पासून सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठांच्या पुढील परिक्षांना स्थगिती दिल्याचा घडलेला प्रकार, सदरहू कर्मचाऱ्यांनी अचनाक पुकारलेल्या संपाचा लाखो विद्यार्थ्यांना फटका बसून त्यांच्या परिक्षा पुढे ढकलण्यात येणे, यामुळे विद्यार्थ्यांच्या मोठ्या प्रमाणात झालेले शैक्षणिक नुकसान, सेवा अंतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेचे रद्द केलेला शासन निर्णय पुन्हा लागू करणे, सातवा वेतन आयोगातील तरतुदीनुसार १०, २०, ३० वर्षानंतरच्या लाभाची योजना विद्यापीठ कॉलेजच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करणे, दिनांक १ जानेवारी, २०२६ ते प्रत्यक्ष सातवा वेतन आयोग लागू झालेच्या कालवधीतील वेतनाच्या फरकाची थकबाकी देणे, रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देणे, सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, आदि न्याय मागण्यासांसाठी सदरहू राज्यातील महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिक्षेवर बहिष्कार टाकून | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | आंदोलन करण्यात येणे, महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक कृती समितीने कृती समितीने शासनाकडून बैठक होऊनही यावर ठोस निर्णय न झाल्याने तसेच मागण्या मान्य न झाल्याने सर्वच प्रकारचे कामकाज बंद करण्याचा राज्य शासनास दिलेला गंभीर इशारा, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातवरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (३९८) | "माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी सप्टेंबर, २०२२ मध्ये मुंबई-चर्चगेट येथील मातोश्री हॉस्टेल व विविध ठिकाणी असलेल्या विद्यार्थ्यांच्या हॉस्टेलला दिलेल्या अचानक भेटीत या हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्यां ऐवजी मंत्रालयातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घुसखोरी केल्याची बाब उघडकीस आल्यानंतर पोलीसांच्या मदतीने घुसखोरांवर कारवाई करण्याचे दिलेले आदेश, वृत्तपत्रातील बातमीच्या आधारे राज्य मानवी हक्क आयोगाने सुमोटो याचिका दाखल करून उच्च शिक्षण विभागाला स्पष्टीकरणाची दिलेली नोटीस, प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांनी घुसखोरी केलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना लेखी नोटीस बजावून हॉस्टेल रिकामे करताना वापरलेल्या दिवसांचे भाडे भरण्याबाबत दिलेले आदेश, या हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्यां ऐवजी मंत्रालयातील अधिकारी व राजकीय कार्यकर्ते यांना राहण्यास परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याची नितांत आवश्यकता असताना, त्यांच्याविरुद्ध कारवाई होत नसणे, शासकीय जागेचा घुसखोरी करून वापर केल्याबद्दल कायद्यात असणाऱ्या सर्व कलमांचा वापर करून घुसखोरी करणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता असताना, सप्टेंबर, २०२२ पासून या घुसखोरांविरुद्ध कारवाई करावे असे प्रधान सचिवांचे आदेश असतानाही कारवाई झाली नसल्याने ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या हजारो विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या मनात उच्च शिक्षण विभागाच्या ढिसाळ व हेतूतःविलंब करणाऱ्या प्रवृत्तीबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. निलेश लंके, वि. स. स. | कित्ता |
| (३९९) | "दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद म्हणजे एआयसीटीईचे मुंबईतील पश्चिम विभागीय कार्यालय दिल्ली येथे स्थलांतरीत करण्याबाबत परिपत्रक जारी करण्यात आलेली असणे, मुंबई येथील विभागीय कार्यालय पळविल्याने शैक्षणिक संस्था, विद्यार्थ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण | श्री. छगन भुजबळ, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | झालेली असणे, विविध शासकीय विभाग, संस्थांच्या कार्यालयाची पळवापळवी चर्चेचा मुद्दा ठरली असून, यावरुन राजकारण पेटलेले असताना नुकताच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जारी केलेले परिपत्रक वादाच्या भोवऱ्यात सापडलेले असणे, 'एआयसीटीई'च्या वरिष्ठ स्थरावरून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुंबई येथील पश्चिम विभागीय कार्यालय नवी दिल्ली येथे स्थलांतरित करण्यात येत असणे, 'एआयसीटीई'चे एकूण दहा विभागीय कार्यालये देशभरात कार्यरत असणे, त्यापैकी मुंबईतील चर्चगेट परिसरात असलेले सध्याचे विभागीय कार्यालय नवी दिल्ली येथे स्थलांतरित करत असल्याचे परिपत्रक नुकतेच जारी करण्यात आलेले असणे, विशेष म्हणजे संकेतस्थळावर कुठेही हे परिपत्रक अपलोड करण्यात आलेले नसणे, 'एआयसीटीई' अंतर्गत विविध तंत्रशिक्षण शिक्षणक्रम आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम येत असणे, अशावेळी प्रवेश क्षमतेपासून अन्य विविध परवानग्यांशी निगडित बाबी या विभागाअंतर्गत येत असणे, विभागीय कार्यालय स्थलांतरामुळे शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांची गैरसोय होणार असणे, देशाची राजधानी दिल्ली असली तरी आर्थिक राजधानी म्हणून मुंबईची वेगळी ओळख आहे, मुंबई सुसज्ज असतानाही कार्यालय दिल्लीत स्थलांतर करण्याचे नेमके कारण काय, असा प्रश्न शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून उपस्थित केला जात असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४००) | "विद्यापीठे व संलग्नित अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने, औषधनिर्माण शास्त्र व वास्तुशास्त्र आणि तत्सम संस्थांना अनुदान अदा करण्याबाबत शिक्षण व युवा सेवा विभाग शा.नि.क्र.सीटीई ११७७/ १३१/६२६ (३३४०)/९ दि.१८ मे, १९७८ मधील नियम क्र.२,६,९ व ११ अन्वये कार्यवाही होणे अपेक्षित असले तरी नियम डावलून अनुदान मूल्यनिर्धारण तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे करण्यात येत असणे, सदर शासन निर्णयातील नियम क्र.२ नुसार संपूर्ण खर्चाची जबाबदारी केवळ शासनाचीच असून त्यात अनुदानित संस्थांची कोणत्याही विशिष्ट खर्चाकरिता भागीदारी/ हिस्सेदारी नसणे, तसेच नियम क्र.९ नुसार संस्थेच्या अंदाजपत्रकातील मान्य खर्चाच्या ९० टक्के तुलना प्रत्यक्षात झालेल्या तुटीसोबत जोडून बघून त्यातील जे कमी असेल ते विचारात घेणे अपेक्षित असणे, तसेच नियम क्र.११ नुसार संस्थेच्या आर्थिक मंडळाने मंजूर केलेल्या व व्यवस्थापकिय मंडळाने मान्य केलेले अंदाजपत्रक अनुदानाचे मूल्यनिर्धारण करतांना व तद्नंतर त्याप्रमाणे अनुज्ञेय अनुदान निश्चित करतांना | श्री. राजन साळवी, वि. स. स. | किता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | अंतिम मूल्यनिर्धारण अहवालात विचारात घ्यावे असे अभिप्रेत असतांना तसे प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते असणे, राज्यातील अशासकिय अनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ नंतर पूर्ण वेतन मिळत नसून ते त्यांच्या बँक खात्यातही थेट जमा होत नसणे, याबाबत गती ई-वेब संघटनेने तत्कालिन मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी निवेदन सादर करण्यात येणे, त्यावर तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, डॉ.नंदनवार, सहसंचालक, तं.शि.विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र तसेच तंत्रनिकेतन संस्थांमधील कर्मचाऱ्यांना एचटीई सेवार्थ प्रणाली लागू होण्यापूर्वी पूर्ववत संपूर्ण वेतन अदा होण्याच्या दृष्टीने एका समितीचे गठण करून विविध उपाय सुचविणारा स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल समितीने सादर केलेला असणे, तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे संस्थांचा अंतिम मूल्यनिर्धारण अहवाल तयार करतांना दि.१८ मे, १९७८ च्या शासन निर्णयानुसार करणे अपेक्षित असतांनाही दि. ४ सप्टेंबर, १९९९ च्या शासननिर्णयाचा सोयीस्कररित्या वापर केला जात असणे, दि. ४ सप्टेंबर, १९९९ च्या शासन निर्णयाला वित्त विभागाची सहमती नसतानाही नियम क्र. ६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने बदल केलेला असणे, मा. प्र.सहसंचालक डॉ.नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १०० टक्के अनुदान अदा करण्याबाबत विसंगती दूर करण्याची शिफारस करण्यात येणे, याबाबतही अद्याप कोणताच निर्णय न होणे, एचटीई सेवार्थ प्रणाली शासननिर्णय दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ कार्यान्वित होण्यापूर्वी संस्थांना दिल्या जाणाऱ्या अनुदानातून १०० टक्के वेतन कर्मचाऱ्यांना मान्य खर्च म्हणून नियमानुसार मिळत असणे, जे ही प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर ९० टक्के दराने मिळत असणे, या प्रणालीमधून कर्मचाऱ्यांचे वेतन परिगणित करतांना मूळ वेतनच मुळात १० टक्के कमी दराने विचारात घेतल्याने त्यावर परिगणित करावयाचा महागाई भत्ता, घरभाडे यांच्या परिगणनेमध्ये ही त्याप्रमाणात कपात केली जात असणे, परिणामी कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असून त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या सेवार्थ प्रणाली लागू करण्याच्या शासननिर्णयात परिच्छेद क्र.१० मधील विसंगती दूर करण्यासाठी शुद्धीपत्राचा प्रारुप मसुदा समितीने दिला असतानाही त्यावर अद्याप कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच १०० टक्के अनुदान लागू करण्याच्या अनुषंगाने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही." | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४०१) | "मुंबई आणि उपनगर जिल्ह्यातील २२२ आदिवासी पाड्यांवर पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या आदिवासींना मुलभूत सोयीसुविधा पुरविल्या जात नसल्याने त्यांना त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, येथील आदिवासी नागरीकांना शिक्षण, आरोग्य, पाणी, जमिनींवरील मालकी हक्कासाठी नेहमीच झगडावे लागत असल्याने मुंबईतील वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक ६ फेब्रुवारी,२०२३ रोजी मोर्चा काढून आंदोलन केलेले असणे, आदिवासींच्या जमिनींचे सीमांकन केले जात नसल्याने धनदांडग्यांकडून त्यांच्या जमिनी हडप केल्या जात असणे, जातीचे दाखले मिळत नसल्याने चांगल्या शाळेत मुलांना दाखल करता येत नसणे, रेशनचा हक्क, पाण्याची उपलब्धता यासाठी आजही झगडावे लागत असणे, आदिवासींना पाड्यांवर कॅम्प लावून जातीचे दाखले देण्यात यावेत, मुंबई उपनगर जिल्ह्यातील २२२ आदिवासी पाड्यांना गावठाणे घोषित करून तशी भूमीहक्क अभिलेखात नोंद करावी, आदिवासींना त्यांच्या घराखालील जमिनीचे मालक घोषित करावे, वनहक्क कायदा २००६ प्रमाणे वनपट्टे देण्यात यावे व तशी रितसर भूमी हक्क अभिलेखात नोंद करावी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी शेतकऱ्यांना वन कर्मचाऱ्यांकडून नाहक त्रास दिला जात असणे, राष्ट्रीय उद्यानात वन कर्मचाऱ्यांकडून वन संवर्धन कायद्याचे उल्लंघन केले जात असणे या व इतर न्याय्य मिळावा यासाठी लोकप्रतिनिधी, कष्टकरी शेतकरी संघटना व आदिवासी संघटनांनी मा.आदिवासी विकासमंत्री, मा.जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचेकडे दिनांक ७ फेब्रुवारी,२०२३ रोजी तसेच वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील आदिवासी जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष,संताप तसेच चिडीची भावना, आपल्या न्याय मागण्यांसाठी दिनांक २७ फेब्रुवारी,२०२३ रोजीपासून सुरु होणाऱ्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनकाळात मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, हक्काच्या मुलभूत सोयीसुविधा मिळत नसल्याने विकासापासून वंचित राहिलेल्या आदिवासी पाड्यांवर आदिवासींना दिलासा देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन सदरबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील,श्री. दिलीप वळसे-पाटील,श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम,श्री. संजय बनसोडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| (४०२) | "दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी पेठरोड (नाशिक) येथील एकलव्य इंग्रजी शाळेतील निवासी वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या जेवणात अळ्या निघाल्याचे उघडकीस आलेले असणे, दिनांक ६ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी सतत निकृष्ट दर्जाच्या भोजनाचा पुरवठा होत असल्याचा आरोप करीत वसतिगृहात ठिय्या मांडून अन्नत्याग आंदोलन केलेले असणे, या विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी आदिवासी विकास विभागाने सेंट्रल किचन संस्थेकडे काम दिलेले असणे, त्यांच्याकडून पुरवठा होत असलेले अन्न निकृष्ट दर्जाचे असल्याची विद्यार्थ्यांकडून वारंवार तक्रार केली जाणे, मात्र या तक्रारीकडे दुर्लक्ष करून टाळाटाळ केली जात असणे,सतत निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याने त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केलेले असणे, सदर प्रकरणी संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार भोजन मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |
| (४०३) | "राज्यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ४१७ शासकीय आश्रमशाळा असून या सर्व आश्रमशाळांमध्ये १६ हजार ४४३ पदे मंजूर असून त्यापैकी ९ हजार ५५३ (५९%) पदांची भरती करण्यांत येऊन ६ हजार ६९० पदे रिक्त असणे, तसेच शिक्षक व मुख्याध्यापकांची दोन हजार ७३१ पदे रिक्त असणे, तसेंच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तर ५१६ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास येणे, त्याचप्रमाणे राज्यात ५४० अनुदानित आश्रमशाळांमध्ये ९५४ पदे रिक्त असणे, यावरुन आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील आश्रमशाळांतील रिक्त पदे मागील अनेक वर्षांपासून भरण्यात आलेली नसणे, शासनाच्या तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील आदिवासी बालकांच्या मृत्युसंदर्भात रिक्त पदे भरती हे महत्वाचे कारण असले तरीही जे कर्मचारी सध्या आश्रमशाळेमध्ये जे शिक्षक, कर्मचारी कार्यरत आहेत ते त्याच आश्रमशाळांसाठी काम करतात का याची छाननी होण्याची गरज असणे, ज्या आश्रमशाळांमध्ये शिक्षक मिळत नाहीत, तिथे अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती का केली जात नाही याचाही शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज व्यक्त होत असणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण व समग्र विकास करणाऱ्या वातावरणापासून या शाळा दुर्गम भागांमध्ये आहेत त्याठिकाणी गरज आहे त्याच ठिकाणी आश्रमशाळांची उपलब्धता आहे का, याबाबत सर्वेक्षण करण्याची तसेंच सर्व आश्रमशाळांचे किमान दोन वर्षांतून एकदा मूल्यमापन करण्याबाबत व दर्जाप्रमाणे या आश्रमशाळांना शेरे देण्यांत यावेत,अशी जनतेकडून शासनाकडे | श्री. दिपक चव्हाण,श्री.हसन मुश्रीफ,श्री. बाळासाहेब पाटील, श्री.दिलीप मोहिते-पाटील,श्री. सुनिल भुसारा, श्री. चेतन तुपे,श्री.मंगेश चव्हाण, श्री. गणपत गायकवाड,श्री. कुमार आयलानी,डॉ. किरण लहामटे,श्री. दौलत दरोडा,श्री. अतुल बेनके,श्री. संजय बनसोडे,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मागणी करण्यांत येणे, शासकीय आश्रमशाळांमध्ये आजच्या घडीला ६ हजार ६९० पदे रिक्त असल्याचे राज्य मानवी हक्क आयोगापुढे झालेल्या सुनावणीमध्ये मान्य करुन माहे डिसेंबर, २०२२ या महिन्यांमध्ये पदभरतीची प्रक्रिया सुरु करु असे शासनामार्फत आयोगापुढे सांगण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, अद्याप मात्र त्याबाबत कार्यवाही झालेली नसणे, सबब, यासर्व प्रकरणी शासनाने आढावा घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४०४) | "नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना रस्ते, पाणी, निवारा, वीज यांसारख्या मुलभूत सुविधा पूरविण्याबरोबर आरोग्य व शैक्षणिक दर्जाही कायम राखण्यासाठी 'पेसा' कायद्याची १,४८२ गावांमध्ये अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस आलेली असणे, दिनांक १८ जानेवारी, २०२३ वा त्यासूमारास घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ५७५ ग्रामपंचायतींनी अद्याप 'पेसा' क्षेत्रातील गावांचे विकास आराखडेच तयार केले नसल्याने तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, नाशिक जिल्ह्यातील नाशिक, इगतपूरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा, दिंडोरी, कळवण, बागलाण व देवळा या तालुक्यातील एकूण लोकसंख्येत आदिवासी समाजाची लोकसंख्या अधिक असल्यामुळे अनुसूचित जमाती क्षेत्र म्हणून हे तालूके घोषीत करण्यात येणे, यासंदर्भात चौकशी करुन या ९ तालुक्यांतील १,४८२ गावांमध्ये 'पेसा' कायद्याची अंमलबजावणी करण्यास अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची तसेच 'पेसा' कायद्याची अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींची व जनतेची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती सरोज आहिरे वि. स. स. | कित्ता |
| (४०५) | ''राज्यातील शासकीय तसेच अनुदानीत आश्रम शाळांमधील ११२६ बालकांना प्राण गमवावा लागल्याचे धक्कादायक वास्तव दि.२३.१.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, यापैकी तलासरी, डहाणू, पालघर या भागात आरोग्याच्या कारणांमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची बाब उघड होणे, उधवा येथे राहणाऱ्या कु.मिताली चौधरी या १२ वर्षाचा मुलीचा दिनांक ५.१०.२०२२ रोजी तिच्या राहत्या घरापासून १५ मिनिटाच्या अंतरावर असलेल्या आश्रम शाळेत मृत्यु झाल्याची घटना घडणे, अचानक ताप आल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले असता, प्रकृती गंभीर नसलयाचे सांगून परत पाठविण्यात येणे, | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | तब्येत अधिकच खालावल्याने दादरा-नगर-हवेली येथील खानवेल प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले असते मुलीचा मृत्यु होणे, यावरून ग्रामीण आदिवासी भागात बालरोग व स्त्रीरोग तज्ञ अभावी मोठ्या प्रमाणात बालकांचे व मातांचे उपचाराअभावी मृत्यु होत असल्याच्या घटना मध्ये वाढ होत असल्याने सदरहू बाब ही चिंताचनक असणे. आश्रम शाळांमधील व्यथा आणि आरोग्याकडे शासनातर्फे वेळीच योग्य दखल न घेतल्यामुळे अथवा त्यांच्याकडे लक्ष न दिल्यामुळे ५ वर्षात ११२६ बालकांचा मृत्यु झाल्याची गंभीर घटना घडणे, म्हणून राज्य शासनाने आश्रम शाळेतील बालकांचे वाढते मृत्यु रोखण्याकरिता ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यावाही करण्याची आवश्यता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, येथील आदिवास जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'" | | |
| (४०६) | "माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, नाशिक शहरातील म्हसरुळ शिवारातील ज्ञानदीप गुरुकुल आधाराश्रमात वय वर्षे चौदा व त्याखालील १३ ते १५ वयोगटातील आदिवासी तालुक्यातील गावपाड्यावरील अल्पवयीन मुलींना द किंग फाऊंडेशन संस्थेद्वारे ज्ञानदीप गुरुकुल आधाराश्रम हर्षल बाळकृष्ण मोरे संचलित यामधील सर्व मुलींना सत्संगाच्या नावाखाली वारंवार वीर गावात नेऊन त्यांचे अंघोळ करतानाचे व्हिडीओ शूट करुन त्यांना ब्लॅकमेल करुन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात येत असल्याच्या तक्रारी एका पिडीत मुलीने केल्यानंतर, पोलीसांनी अन्य मुलींच्या घेतलेल्या जाबजबाबात सर्वच मुलींनी या घटना आपल्याबाबत घडल्याचे दिलेल्या जबाबात कबूल करणे, मुलींच्या फिर्यादीनुसार पोलीसांनी बलात्कार, बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण, अनुसूचीत जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम नुसार गुन्हा दाखल करणे, सदर प्रकरणी यापूर्वीही या आश्रमात वास्तव्यास असलेल्या मुलींनी सदर हर्षल बाळकृष्ण मोरे याचेकडून लैंगिक अत्याचार करण्यात येत असल्याबद्दल केलेल्या तक्रारींची दखल घेतली न गेल्यामुळे हर्षल मोरे याचे धैर्य व धारिष्टय वाढीस लागणे, या प्रकारामुळे राज्यातील आदिवासी मुलींचा व त्यांच्या पालकांचा आधाराश्रम व आश्रम शाळांवरील उडालेला विश्वास, व शासनाच्या संथगतीने होणाऱ्या कारभारा विरोधात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. निलेश लंके, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४०७) | "बीड जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमातींच्या जि.प. शाळांच्या इयत्ता ७ व ८ वर्गात शिक्षण घेत असलेल्या मुलींना जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२० व २०२०-२१ अंतर्गत विशेष तरतूद म्हणून सायकल खरेदी व शाळांना सौर संच बसवण्यासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, परंतु शिक्षण विभागातील अधिकारी व कंत्राटदार यांच्या नियोजनाअभावी सदर निधी अखर्चित राहून परत गेला असणे, त्यामुळे जवळपास जिल्ह्यातील १५०० विद्यार्थीनी सायकल पासून व १४२ शाळा सौर संचांच्या लाभापासून वंचित राहिल्या असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने दिलेला निधी वेळेत खर्च न करण्यास जबाबदार अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कार्यवाही करून उक्त निधी सन-२०२२-२३ वर्षात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | श्रीमती नमिता मुंदडा वि. स. स. | कित्ता |
| (४०८) | "मौजे - टाकळीभान (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) येथील शासकीय गट नं. २५०/१ मध्ये एका इसमाने कोणत्याही प्रकारची शासकीय व निमशासकीय परवानगी न घेता अंदाजे १५ फूट रूंद व २० फूट लांब आर.सी.सी. (गाळा) बांधकाम केलेले असणे, या अतिक्रमणाबाबत टाकळीभान ग्रामस्थ यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात येणे, या अतिक्रमण केलेले जागेबाबत मंडळ अधिकारी व तलाठी टाकळीभान यांनी यापूर्वी अहवाल तहसीलदार कार्यालय श्रीरामपूर येथे सादर केलेला असणे,तसेच सदर गट नं २५०/१ शासकीय असून सदरचे क्षेत्रात ग्रामपंचायत टाकळीभान यांनी बेकायदेशीररीत्या संबंधित इसमास भाडे तत्तावर दिलेली असल्याचे दिसून येणे, त्यानुसार त्या इसमाला श्रीरामपूर तहसील कार्यालयाचे नोटीसद्वारे सदरचे अतिक्रमण काढून घेणेबाबत कळविले असता त्यांनी याबाबत मा. दिवानी न्यायालय, श्रीरामपूर येथे रे. नं. १९८/२०२२ चा दावा दाखल केलेला असणे, सदर दावा न्यायालयात प्रलंबित असणे, ग्रामपंचायत टाकळीभान यांनी जो शासकीय गट आहे त्या गटातील जागा अनाधिकाराने संबंधित इसमाला भाडेतत्त्वावर दिलेली असणे,वास्तविक असा कोणताही अधिकार ग्रामपंचायतीस नसल्याने केवळ ग्रामपंचायत टाकळीभान यांनी बेकायदेशीर व्यवहार केल्याने अतिक्रमण व उपोषण, तक्रारी उत्पन्न झाल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, सदर अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी श्रीरामपूर तहसीलदार कार्यालयाकडून संबंधित इसमास नोटीस देण्यात आलेली असणे, तहसीलदार श्रीरामपूर यांनी सदरच्या | श्री. लहू कानडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | जागेचा वाद न्यायालय सुरू असल्याने दुकानाचे उद्घाटन करू नये असा आदेश देण्यात आला असतानाही सदरच्या जागेचे उद्घाटन करण्याचा प्रयत्न संबंधित इसमाने दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी दहा वाजता करण्यात येणे, सदर सराफानी दुकानाच्या उद्घाटनाच्या सुरक्षेसाठी लेडीज व जेंट्स बाउन्सर उभे केलेले उघडकीस येणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापची लाट निर्माण होणे, काही काळ टाकळीभान येथे आराजकतेचे व गोंधळाचे वातावरण निर्माण होणे, ग्रामस्थ व दुकानाचे कर्मचारी यात खडाजंगी होण, मा. तहसीलदार श्रीरामपूर यांचे आदेश सदरहू सराफानी न पाळल्याने टाकळीभान ग्रामस्थांमध्ये झालेली असंतोषाची व चिडीची भावना व त्यातून निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न, अशाप्रकारे वर नमूद एका ग्रामपंचायत नव्हे तर राज्यातील अनेक ठिकाणी या प्रकारची कार्यपद्धती वापरून सामाजिक मत्तांचे माफियाकडून होणारे अपहरण आणि वर्षानुवर्षे निवासासाठी घर बांधून राहत असलेल्या गरिबांची अतिक्रमणे कायद्यानुसार नियमानुकूल न करून देणे, यामुळे भूमिहीन बेघरसारख्या गरजूंना किंवा सार्वजनिक हिताच्या कामाला जमीन मिळत नसने, ग्रामपंचायतकडे मालमत्ता नोंदवही अद्यावत नसणे, या प्रकारच्या लँड ऑडिटची गरज असूनही ते होत नसणे, कॅगच्या २०२१ च्या नोव्हेंबरमध्ये पंचायत राज संस्थांच्या आर्थिक परीक्षणात सामाजिक मालमत्ता नोंदवही बाबत मार्गदर्शन केलेले असूनही राज्य शासनाने त्याकडे केलेले केलेले दुर्लक्ष याबद्दल शासनाने दोषी विरुद्ध करावयाची कारवाई व द्यावयाची प्रतिक्रिया." | | |
| (४०९) | "राज्यातील बेघर तसेच दयनिय स्थितीत घरात राहत असलेल्या कुटुंबासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाकडून घरकुल मंजूर करण्यात येत असणे, सदर योजनेत लाभार्थ्यांना घरकूल बांधण्यासाठी २ लाख ५० हजार इतके अनुदान शासनाकडून देण्यात येत असणे, त्यासाठी लाभार्थ्यांने रितसर अर्ज करुन त्यासोबत सात-बारा उतारा (सहा महिन्याच्या आतील) गटबुक नकाशा, खरेदीखत, मालकीपत्र भूमी अभिलेख मोजणी नकाशा, बिनशेती दाखला इत्यादी कागदपत्र जोडणे आवश्यक असणे, रत्नागिरी जिल्ह्यात सदर योजनेचे जवळपास ४५० ते ५०० लाभार्थी असणे, तथापि योजनेधिन कागपत्रांच्या जाचक अटींमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या एकाही लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेताआला नसल्याचे दि. २ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, सदर योजनेत लाभार्थ्यांच्या निवड केलेल्या अर्जाची पडताळणी केली जात असणे, तथापि अर्जाची छाननी/पडताळणी | श्री. शेखर निकम, श्री. दत्तात्रय भरणे वि. स. स. | किता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | करण्यापूर्वी कोरोना साथीच्या आजारामुळे व शासनाकडून निधी न मिळाल्याने त्या काळात घरकुल योजनांच बारगळल्याचे तसेच लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यापूर्वी शासनाच्या काही अटी व शर्ती लावण्यात आल्याने ही योजना रखडल्याचे निदर्शनास येणे, परिणामी जिल्हयातील लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने त्याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता तसेच कोरोना काळापूर्वीच्या व त्यानंतरच्या काळातील घरकुले मंजूर केलेल्या ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अटी व शर्ती शिथिल करुन, निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याची गरज व त्याबाबत शासनाची भूमिका." | | |
| (४१०) | "राज्यातील उद्योगांपाठोपाठ पंतप्रधान दिवस योजनेतून मंजूर करण्यात आलेली घरकुले अन्य राज्यात वळविण्यात येण्याबाबत केंद्रीय ग्रामविकास विभागाने राज्य शासनास आदेशीत केल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ ते जानेवारी २०२३ दरम्यान उघडकीस आली असणे, राज्यात सदर योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांच्या उद्दिष्टातून प्रत्यक्ष घरकुल मंजुरी करण्याचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत असताना देखील शासनाने जिल्हा प्रशासनांना ३१ डिसेंबर पर्यंतच आपले उद्दिष्ट पूर्ण करावे व ३१ डिसेंबर अखेरीस मंजुरीसाठी शिल्लक राहिलेली घरकुले अन्य राज्यात वळविण्यात येतील असे आदेश दिले असणे व या आदेशान्वये राज्यातील गरजू जनतेचे सुमारे १ लाख घरकुले ही अन्य राज्यात वळविण्यात आलेली असणे, सदर आदेश रद्द करून राज्याच्या हक्काची घरकुले पुन्हा मंजूर करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |
| (४११) | "अमरावती जिल्ह्यातील अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद आस्थापनेवरील आरोग्यसेविका पुष्पा वानखडे, चंदा बेलसरे, दिपाली शिंदे, पद्मा जाधव, सुनंदा नाथे, आदींनी राज्य सरकारचे कडून खालील मागण्या मंजूर करण्यात यावे या मागणीसाठी अमरावती जिल्ह्यातील स्थानीक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत त्यांच्या उपस्थितीत नागपूर अधिवेशनादरम्यान दिनांक २७ डिसेंबर, २०२३रोजी राज्याचे आरोग्य मंत्री यांच्याकडे विधानभवनात तसेच राज्य सरकारचे मुख्य सचिव सामान्य प्रशासन मंत्रालय मुंबई यांना ०११ ते ०९ मागण्यांचे निवेदन दिले असणे. ज्या निवेदनामध्ये त्यांनी खालील प्रमाणे मागणे केले असणे त्यामध्ये सन २००५ नंतर कार्यालयात कर्मचाऱ्यांची करून जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका नियमित यांची पदभरती करून त्वरित रिक्त पदे भरण्यात यावे, तसेच आरोग्य सेवक याप्रमाणे | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | आरोग्य सेविका यांना विना प्रशिक्षण पदोन्नती देण्यात यावी, प्रशिक्षणाची अट रद्द करण्यात यावी, तसेच सर्व आरोग्य सेविका यांची ज्येष्ठ सुविचार लवकरात लवकर प्रशिक्षण पूर्ण करून घ्यावे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन एल. एच. व्हीं. पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य प्राथमिक केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन आरोग्यसेविका पदे भरण्यात यावी, तसेच तालुका स्तरावर आरोग्यसेविका पदनिर्मिती करण्यात यावी, तसेच रिक्त पदाचा उपकेंद्राचा मांडण्याकरिता आरोग्य सेविका यांना अतिरिक्त वेतन देण्यात यावे, तसेच वाढत्या पेट्रोलची महागाई पाहता आरोग्य सेविका यांचा कायम प्रवास भत्ता पंधराशे रुपये भरून तीन हजार रुपये करण्यात यावा, नियमित पदोन्नती ची नस्ती निकाली काढणे व पद रिक्त झाल्याबरोबर दुसरे महिन्यात ज्येष्ठ ते त्यानुसार यादीनुसार पात्र पदोन्नती देण्यात यावी, तसेच आरोग्य सेविका यांना पाच कार्य करण्याचा पाच दिवसाचा आठवडा करण्यात यावा, तसेच आरोग्य सेविका यांचे कायमस्वरूपी पदे भरण्यात यावी, तसेच कंत्राटी पद्धत बंद करण्यात यावी, तसेच कोरोना संक्रमण महामारीच्या काळात आरोग्य सेविका यांनी जिवाची काळजी न करता अहोरात्र काम केले. असल्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढ देण्यात यावी, आरोग्य सेविका हिला चालू सेवाकाळामध्ये GNN ट्रेनिंग with salary अशी पद्धत सुरु करणे, निवासस्थान राहणे योग्य नसल्यास आरोग्य सेविकांना घरभाडे भत्ता देण्यात यावा, तसेच सर्व ऑनलाईन पोर्टल जबाबदारी इतर कर्मचारी यांना देण्यात यावे जेणेकरून टेक्निकल कामकाज आरोग्य सेविकेला गुणवत्तापूर्वक सेवा रुग्णांना देता येतील, या सह एक ते १८ प्रकारचे निवेदन आरोग्य सेविका यांनी राज्याचे मुख्य सचिव यांना दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी नागपूर अधिवेशनात दरम्यान दिला असणे, त्यावर दोन महिने पूर्ण होऊनही सरकारकडून यथायोग्य कार्यवाही करण्याचे दिसून येत नसल्याने पुन्हा दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी राज्याचे आरोग्य मंत्री यांना जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.अमरावती यांच्यामार्फत वरोल मागण्यांचे एक ते १८ मागण्यांचा समावेश असलेले निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद, अमरावती यांचे कार्यालयकडे दिले असणे, त्यामध्ये वरील मागण्या केलेल्या असणे, उच्च स्तरावरुन पाठपुरावा सुरु असणे या मागणीसाठी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनीही शासनाच्या आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव माहे फेब्रूवारी, २०२३ च्या दरम्यान ठेविला असणे, म्हणून शासनाने तातडीने निर्णयात्मक आदेश निर्गमित करण्यासाठी व या संबंधाने करावयाची कार्यवाही, शासनाची यासंबंधी भूमिका व शासनाची प्रतिक्रिया." | | |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (४१२) | "जिल्हा परिषद, हिंगोली येथील कॅफो चे पद मागील वर्षभरापासून रिक्त असणे, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.एस.एस.उबाळे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे देण्यात येणे, परंतु त्यांचेकडून अतिरिक्त कार्यभार असलेल्या कॅफोच्या कामकाजावर कसल्याही प्रकारचे नियंत्रण नसणे, तसेच त्यांच्याकडून सदरच्या कामात वित्तीय अनियमितता आणि नियमाबाह्य कामकाज करण्यात येत असल्याचे उघडकीस येणे, जी.पी.एफ. मध्ये ४० लक्ष रुपयांचा घोटाळा झाल्याप्रकरणी चौकशी होऊन दि.१७.११.२०२२ रोजी चौकशी अहवाल चौकशी समितीने सादर करणे, परंतू श्री.उबाळे यांच्याकडून सदरचे प्रकरण दडपण्यात येणे, पंचायत समिती सेनगांव मध्ये सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीत पाणी टंचाईच्या काळातील ६० लक्ष रुपयांचा टँकर घोटाळा झाल्याचेही प्रकरणी त्यांच्याकडून दडपण्याचा प्रकार सुरु असणे, जिल्हा परिषद, हिंगोलीचा कार्यकाळ दि.२०.०३.२०२२ रोजी संपुष्टात आलेला असणे, त्यामुळे अध्यक्ष, सभापती, उपाध्यक्ष यांची चारचाकी ११ वाहने रिकामी उभी असतांनाही कॅफोने खाजगी वाहन भाडेतत्त्वावर लावून आतापर्यंत भाड्याचे ५ लक्ष रुपये शासन तिजोरीतून नियमाबाह्य अदा करणे, तसेच सन २०२२-२३ मध्ये लेखाशिर्ष २२३६ १३१९ चे वित्तपेषण पंचायत समितींना प्राप्त नसतांना लाखो रुपयांच्या देयकांचे प्रदान नियमाबाह्यरित्या झालेले असणे, याबाबत कॅफो यांनी कसल्याही प्रकारची चौकशी न करता प्रकरण दाबून टाकणे, अश्याच प्रकारचे गैरव्यवहार व घोटाळ्याची अनेक प्रकरणे कॅफोचे अतिरिक्त कार्यभार असलेले उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.उबाळे यांच्याकडून दाबून टाकण्याचा प्रयत्न सुरु असणे, याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२३ लेखी निवेदनाव्दारे करणे, शासनाने याप्रकरणी तात्काळ चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही.'' | श्री. संतोष बांगर वि. स. स. | कित्ता |
| (४१३) | "श्री.नागनाथ विश्वनाथ लटपटे मु.अ.के.प्रा. शा. मन्नाथ नगर, गंगाखेड यांची तात्काळ बदली करून चौकशी समिती नेमुन निलंबीत करणे बाबतचे निवेदन स्थानिक प्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री महोदयांना देणे, या अनुषंगाने श्री. नागनाथ विश्वनाथ लटपट मु.अ.कें.प्रा.शा. मन्नाथ नगर, गंगाखेड २५ वर्षापासून गंगाखेड तालुक्यात ठाण मांडून बसले असणे, तसेच यापुर्वी २००१ ते २००२ दरम्यान सदरील | श्री. रत्नाकर गुट्टे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | शिक्षक हा डोंगरपिंपळा ता. गंगाखेड या ठिकाणी सेवेत असताना गंगाखेड पोलीसात त्यांच्यावर ३०२ चा गुन्हा नोंद असणे. सदरील गुन्ह्यात ते आरोपी असून सदर प्रकरण अद्याप प्रलंबित असताना पुन्हा त्यांना त्याच शाळेवर कार्यरत ठेवल्याने श्री. लटपटे राजकीय वरदहस्त वापरत शाळेतील कर्मचाऱ्यांना वेठीस धरत असून मनमानी करीत असणे, त्यामुळे ते शाळेत आणि गावात राजकारण करीत आहे असे स्पष्ट होत असणे, गावातील राजकारणात त्यांचा उघडपने वावर असणे ग्रामपंचायत बैठकांना देखील ते उपस्थित असणे.अधिकाऱ्यांच्या गाड्याचा देखील दे स्वतःच्या कामासाठी वापर करत असल्याचे निदर्शनास आले असणे. त्यांनी गैरमार्गातून मोठ्या प्रमाणात संपत्ती गोळा केल्याचे निदर्शनास येत असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष करणे, त्यामुळे श्री. नागनाथ विश्वनाथ लटपटे मु.अ.के. प्रा. शा. मन्नाथ नगर, गंगाखेड यांची तात्काळ बदली करून चौकशी समिती नेमुन निलंबित करण्याची आवश्यकता असतानाही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थामध्ये तिव्र नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४१४) | "राज्याच्या सीमावर्ती भागातील सांगली व सोलापूर जिल्ह्यातील कन्नड माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळेत अनुसूचित जमाती संवर्गातील शिक्षक उपलब्ध करून देण्याचा वारंवार प्रयत्न करूनही या संवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध झालेला नसणे, रिक्त पदापैकी बहुतांशी पदे अनुसूचित जमाती संवर्गातील असून या संवर्गात एकही उमेदवार आजपर्यंत नियुक्त झालेल्या नसणे, सन २०१३, २०१७, २०१९ मध्ये भरती करण्यात आली परंतु यावेळीही एकही पात्र उमेदवार नियुक्त न होणे, मागील १२ वर्षांपासून सीमावर्ती भागातील कन्नड अल्पभाषिक व अल्पसंख्यांक शाळेत शिक्षक भरती झाली नसल्यामुळे अपुरे शिक्षकांमुळे कन्नड शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेले तीव्र संतोषीची भावना, याबाबत राज्य शासन चौकशी करून अनुसूचित जमातीतील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदला बदलीने पदे भरणे, व पदे आरक्षणातून मुक्त करून शासन निर्णयानुसार अन्य संवर्गातील पात्र उमेदवारांना उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | श्री. विक्रमसिंह सावंत,श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | कित्ता |
| (४१५) | ''जि.ठाणे, शहापूर तालुक्यातील आसनगांव ग्रामपंचायतीमार्फत घनकचरा व्यवस्थापन खत निर्मिती प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या मशिन खरेदीमध्ये २१ लाखांहून अधिक निधीचा अपहार करुन आर्थिक घोटाळा झाल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू मशिन खरेदीसाठी आसनगांव ग्रामपंचायतीला | श्री. नितीन पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | कोणतीही जागा उपलब्ध नसताना आणि प्रत्यक्षात मशिन खरेदी न करता २४ लाख ३० हजार रुपयांचा अर्थकेअर इक्वीपमेंट प्रा.लि.या कंपनीला धनादेश क्र.०२२७८७ अन्वये अदा करण्यात येणे, सदरहू मशिन खरेदीची मूळ किंमत ३५ लाख ५ हजार ५४९ एवढी असताना ५६ लाख ८२ हजार ७३७ एवढे मुल्यांकन करण्यात येऊन यामध्ये संबधितांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचा प्रकार उघड होणे, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लेखी तक्रार करुन व त्यानंतर दोन महिने पाठपुरावा केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी होऊन याबाबतचा अहवाल सादर करण्यात येणे, परंतु अद्याप चौकशी अहवालानुसार दोषी व भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुध्द शासनातर्फे कोणतीच कारवाई न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, यामुळे सदर प्रकरणात शासकीय निधीचा मोठया प्रमाणात झालेलाअपव्यय व आर्थिक नुकसान, सदर प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील ग्रामस्थ जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | | |
| (४१६) | “राज्यातील अनेक महसुल गावांच्या वाड्या-वस्त्या इतर ग्रामपंचायतींना जोडण्यात आलेल्या असणे, अशा वाड्या-वस्त्यांमध्ये विकास कामांसाठी तेथील सरपंच व ग्रामपंचायतचा नाहरकत दाखला घेणे गरजेचा असणे, अनेक सरपंच/ग्रामसेवक हा दाखला देत नसल्याने ही कामे खोळंबून राहत असणे, त्यामुळे अनेक विकास कामे रखडणे, या अशा कामांना नाहरकत प्रमाणत्र गटविकास अधिकारी मार्फत देण्यात आल्यास विकास कामे रखडणार नसून कामे तातडीने मार्गी लागणे शक्य होणार असणे, यापूर्वी ४० दिवस नाहरकत न देणाऱ्या ग्रामपंचायतींची संमती ग्राह्य धरून सदर कामे पूर्ण करण्यात यावी याबाबतचा शासन निर्णय असणे, अशा प्रकारे सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना शासनाकडून आदेश देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | डॉ. राहूल आहेर वि. स. स. | कित्ता |
| (४१७) | “मौजा भंडारा (ता. जि. भंडारा) येथील शहरसिमेतील ऐतिहासीक वारसा असलेल्या लालबहादूर शास्त्री या जिल्हा परिषदेच्या शाळेचा भुखंडावर “बांधा-वापरा-हस्तांतरीत करा” या योजनेखाली स्थानीक नेते मंडळी, संबंधीत विकासक व जिल्हा परिषदचे अधिकारी यांनी संगनमत करुन आर्थीक हव्यासापोटी शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास येणे. भंडारा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी मौल्यवान | श्री. नरेंद्र भोंडेकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | असलेला भूखंड ठराविक विकासकाला अत्यंत कमी किंमतीत मिळण्याकरीता निवीदेच्या अटी व शर्ती ठरविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, ठराविक विकासकाला निविदा मंजूर होणे, परंतू सदर बांधकामात अनियमीतता असल्याने स्थानिकाकडून अनेक तक्रारी प्राप्त होणे, त्याअनुषंगाने उच्च न्यायालयात प्रकरण गेले असता न्यायालयाने विकासकाला मंजूर कामाव्यतीरिक्त इतर काम न करण्याबाबत निर्देश दिले असणे, तद्नंतर विकासकाकडून न्यायालयाच्या निर्देशाकडे डोळेझाक करुन अतीरिक्त बांधकाम करण्यात येणे, त्यामुळे परिसरातील फुटपाथ विक्रेत्यांचे नुकसान होणे, त्याबाबत जिल्हाधिकारी भंडारा यांच्याकडे निवेदन देण्यात येणे, नुकसान भरपाई न मिळाल्यास सामाजीक कार्यकर्ता यांनी आंदोलन करण्याची पूर्वसूचना देण्यात येणे, तसेच सदर शाळेच्या खेळाच्या मैदानाची जागा अन्यत्र दाखवून शाळेतील खेळाच्या मैदानात विकासकाला बांधकाम करण्याची परवानगी देण्यात येणे. याबाबत भंडारा शाळा बचाव समितीने तक्रार करुन सुध्दा त्यावर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात न येणे. सदर शाळेतील मुलांच्या खेळण्याच्या जागेवर बांधकाम झाल्याने मुलांना खेळण्याकरीता क्रिडांगण नसल्याची गंभीर बाब समोर येणे. या सर्व प्रकारामुळे विकासकाला शासनाने दिलेली परवानगी रद्द करण्याची स्थानीक जनतेकडून वारंवार होणारी मागणी. स्थानीक लोकप्रतिनीधीं या नात्याने मी बांधकामाच्या अनियमीततेबाबत पत्रव्यवहाराने शासनाचे ध्यानाकर्षन केल्यानंतर सुध्दा शासनाच्यावतीने कोणतीही कार्यवाही न होणे त्यामुळे स्थानीक जनतेत पसरलेली तिव्र असंतोषाची भावना यावर शासनाने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (४१८) | “नाशिक जिल्हा पषिदेत संगणक खरेदी प्रक्रियेत गैरप्रकार व अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार लेखा व वित्त विभागाच्या तांत्रिक तपासणीत झाल्याने याबाबत सामान्य प्रशासन विभागावर ठपका ठेवल्याचा प्रकार दिनांक २८/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सीईओ आशिमा मित्तल यांनी १ कोटी १४ लाखांच्या खरेदी प्रक्रियेसाठी ठेवलेला दर १० टक्क्यांहून अधिक असल्याने रद्द करण्याची शिफारस करण्यात आल्याने सामान्य प्रशासन विभागावर संगणक खरेदी प्रक्रिया रद्द करण्याची नामुष्की ओढवणे, १० लाखांच्या आतील बांधकामे व खरेदी प्रक्रिया यांची निविदा प्रक्रिया राबविली जात नसल्याने त्याची खरेदी जीईएम पोर्टलवर करणे असा अलिखित नियम असतानाही, सामान्य प्रशासन विभागाने १ | श्री. ज्ञानराज चौगुले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | कोटी १४ लाख रुपयांची संगणक खेदी जीईएम पोर्टलवर करण्यात येणे, आय-५ प्रकारात ३० संगणक पुरविण्यासाठी मिनिटेक सिस्टीम्स इंडिया लि.या कंपनीची निवड करण्यात येणे, सामान्य प्रशासन विभागाने २१ नोव्हेंबरला सर्वात कमी दर असलेल्या पुरवठादारास वाटाघाटीसाठी बोलावण्याची परवानगी मागणारी फाइल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्याची तयारी केलेली असणे, मात्र त्याच दिवशी माध्यमांनी या संगणक खरेदीमुळे नाशिक जिल्हा परिषदेचे १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची बातमी प्रसिध्द होणे, त्यामुळे घाईघाईने सामान्य प्रशासन विभागाने ती फाइल मुख्य लेखा व वित्त विभागाकडे पाठविली असता त्यानुसार लेखा व वित्त विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडून या संगणक खरेदी प्रक्रियेतील सर्व सहभागी संस्थांनी जीईएम पोर्टलवर जोडलेली कागदपत्र मागविणे, त्या कागदपत्रांची तपासणी केली असता त्यात कागदपत्र असूनही काही पुरवठादार अपात्र ठरविण्यात येणे, तर पात्र ठरविलेल्या पुरवठादारांची काही कागदपत्रे अपूर्ण असल्याचे आढळून येणे, तसेच सामान्य प्रशासन विभागाने संगणक पुरवठयासाठी अंतिम निवड केलेल्या पुरवठादार कंपनीचेही काही कागदपत्रे अपूर्ण असल्याचे समोर येणे, त्यामुळे लेखा व वित्त विभागाने या अपूर्ण कागदपत्रांची यादी सामान्य प्रशासन विभागाला डिसेंबरच्या तिसऱ्या आठवडयात दिलेली असणे, सदर खरेदी प्रकरणात अनियमितता झाल्याचे आढळून आले असतानाही, जिल्हा परिषदेच्या मुख्य अधिकारी मित्तल यांनी अद्याप जबाबदारी निश्चित करुन कोणावरही कारवाई न करता सदर प्रकरण दडपून टाकल्याचा घडलेला प्रकार, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांना तात्काळ बडतर्फ करुन त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (४१९) | "पुणे, जिल्हापरिषदेमधील शिक्षणाअधिकारी (माध्यमिक) यांनी शासनाचे आदेश असतानाही अनेक अनुकंपा तत्वावर नियुक्ती साठी कर्मचाऱ्यांनी पैसे न दिल्यामुळे नियुक्ती न देणे, अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही तसेच शासन निर्णय दिनांक ११ डिसेंबर, २०२० अन्वये चतुर्थ श्रेणी कर्मचारी ज्या पदावर कार्यरत असणे त्या पदावर सेवानिवृत्त होईपर्यंत कार्यरत असतील असे आदेश असतानाही शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे जिल्हा परिषद यांनी अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आदेशासाठी पैसे न दिल्याने न दिल्याने विलंब | श्री. रईस शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | लावणे, व दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी काही कर्मचाऱ्यांकडून गैरमार्गाने अनेक अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आदेश काढणे, अशी अनेक प्रकरणे प्रलंबित ठेवून शिक्षणाअधिकारी (माध्यमिक) भ्रष्टाचार करत असणे, त्यामुळे त्यांची तात्काळ विभागीय चौकशी करण्याची मागणी होणे व त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील कर्मचारी व जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (४२०) | "जि.ठाणे, शहापूर तालुक्यात राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व विविध योजने अंतर्गत २०१६-२०१८ या कालावधीत करण्यात आलेल्या २० गावांमध्ये साध्या विहिरीचे बांधकाम आणि दुरुस्तीची कामे गणेशकृपा कन्स्ट्रक्शन (मुरबाड), बुधरानी धर्मू इंदनदास, उल्हासनगर या ठेकेदारांनी प्रत्यक्षात विहिरीची कामे न करता सुमारे १ कोटी १९ लाख रुपये निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार केल्याचा प्रकार दि.१९/१/२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, जिल्हा परिषदेच्या उपअभियंता यांनी अघई ग्रामपंचायतीचे सरपंचासह सहा ठेकेदारांवर शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, सदरहू ठेकेदाराने तालुक्यात कामे न करताच कागदोपत्री पूर्ण केल्याचे दाखवून आणि देयके मिळविण्यासाठी सबंधित ठेकेदाराने २०१७ मध्ये वांद्रे येथील २०१५ पासून बंद असलेल्या शासकीय तंत्र निकेतन संस्थेच्या नावाचा बनावट चाचणी अहवाल सादर करुन १ कोटी १९ लाख रुपये शासकीय निधी प्राप्त करुन हडप करणे, यामुळे सदरहू तालुक्यातील २० गावातील ग्रामस्थ जनतेची विहिरीच्या लाभा अभावी झालेली प्रचंड गैरसोय, ठाणे जिल्हापरिषदेचे सबंधित अधिकारी व घई गावचे सरपंच आणि सहा ठेकेदार यांनी आर्थिक संगनमत करुन शासकीय निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार करण्यात येणे, सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर बोगस काम करणाऱ्या कंपन्यांना तात्काळ काळया यादीत टाकण्याची होत असलेली मागणी, अद्याप पोलीसांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन यातील दोषींविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू भ्रष्टाचारामुळे शासकीय निधीचा मोठया प्रमाणात झालेला अपव्यय व नुकसान, तसेच शेतकऱ्यांचे विहिरी अभावी शेती पिकांचे झालेले प्रचंड नुकसान, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. अनिल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४२१) | “धुळे जिल्ह्यातील गरीब, गरजू रुग्णांची धुळे शहरातील चक्करबर्डी येथील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वोपचार रुग्णालयावर भिस्त असणे, या रुग्णालयात धुळे जिल्ह्यातील आजूबाजूच्या परिसरातील व इतर जिल्ह्यांमधील रुग्ण मोठ्या प्रमाणावर उपचारासाठी येणे, मात्र या रुग्णालयात अनेक सुविधांचा अभाव असणे, सिटीस्कॅन, एमआरआय मशीन उपलब्ध नसणे, जे मशीन आहे तेही धूळखात बंद पडलेल्या अवस्थेत असणे, त्यामुळे गरीब, गरजू रुग्णांना खाजगी ठिकाणी जाऊन सिटीस्कॅन, एमआरआय करण्यासाठी जास्तीचे पैसे मोजावे लागत असणे, त्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय निर्माण होणे, सोनोग्राफी करण्यासाठी महिलांना तासन-तास रांगेत उभे राहावे लागणे, त्यामुळे त्यांचे अतोनात हाल होणे, या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर्स, नर्स, परिचारक, शिपाई यांची शेकडो पदे रिक्त असणे, त्यामुळे आहेत त्या कर्मचाऱ्यांवर जास्तीचा भार दिलेला असणे, रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणावर कचराकुंडीचे स्वरूप प्राप्त झालेले असून मोकाट कुत्री वराहचा मुक्त संचार दिसून येणे, जैविक कचऱ्याचे उघड्यावर विल्हेवाट केले जात असल्याचे निदर्शनास येणे, वार्डांमध्ये दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले असून रुग्णांच्या सोबत येणारे नातेवाईक यांनाही तोंडाला रुमाल बांधून फिरावे लागणे, रुग्णालय परिसरात रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दूरावस्था झालेली असणे, त्यामुळे नागरिकांचे प्रचंड प्रमाणात हाल होणे, परिणामी सामान्य नागरिकांमध्ये शासनाप्रति मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असून धुळे येथील हिरे शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. कुणाल पाटील वि. स. स. | कित्ता |
| (४२२) | “स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि. बीड. येथे ‘थेलेसिमिया’ या रुग्णांना लागणारी उपचार सुविधा व सदर आजारावर उपचारा संबधी लागणारे ब्लड, औषधी, गोळ्या या सुविधा मिळत नसणे, त्यामुळे सदर रुग्णालयात उपचार घेणाऱ्या थेलेसिमिया आजाराच्या रुगानासाठी एकूण ०६ प्रकारच्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी रुग्णांच्या पालकामधून करण्यात येत असणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.” | श्रीमती नमिता मुंदडा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४२३) | “जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत यवतमाळ जिल्ह्यातील दोन्ही पाय समान नसलेल्या जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) शाळेतील शालेय विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्याबाबतचा निर्णय यवतमाळ जिल्ह्याचे तत्कालिन पालकमंत्री यांनी घेणे, त्यानुसार अधिष्ठाता, श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक, जिल्हापरिषद, नगरपरिषद, यवतमाळ यांना लेखी पत्राव्दारे डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांच्याकडून शालेय विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी करण्याबाबत निदेश देणे, त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शाळा जिल्हापरिषद, यवतमाळ यांनी मुख्याध्यापक, जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) यांना दिनांक १ मार्च, २०१९ रोजी डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांच्या सहकार्याने श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्यावतीने दिनांक ४ मार्च, २०१९ रोजीपासून जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) नगरपरिषद येथील जवळपास १०० शाळेतील मुलांचे पाय तपासून त्यांच्यावर उपचार करण्यात येणे, परंतु, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांनी संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी केल्याचा खर्च जवळपास ५० लाखांपेक्षा जास्त असून तो आजमितीपर्यंत संबंधित कंपनीस अदा केलेला नसणे, त्यामुळे संबंधित कंपनीचे लाखोचे नुकसान झाल्यामुळे डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. या कंपनीच्या मालकांवर व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, त्यांच्याकडून आत्महत्या करण्याचा होत असलेला प्रयत्न, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. या कंपनीचे देयक तात्काळ वितरीत करण्याची संबंधितांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. अबू आजमी, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |
| (४२४) | “बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता देण्याची घोषणा तत्कालीन वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री मा. डी.पी. सावंत यांनी केलेली असणे, तत्कालीन मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव यांनी दिनांक २२ मे, २०१८ मध्ये त्यांच्या दालनात उच्चस्तरीय सचिव बैठक घेऊन बुलढाणा येथील मेडिकल कॉलेजसाठी लागणाऱ्या अटी व पात्रतेच्या निकषासाठी समिती पाठवून अहवाल मागविलेला असणे, त्यावर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी मेडिकल कॉलेजचे डॉ कैलास झिने यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समिती बुलढाणा येथे येऊन गेलेली असणे, समितीने बुलढाणा येथे उपलब्ध खाटा, निकषाप्रमाणे उपलब्ध | श्रीमती श्वेता महाले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | जागा, उपलब्ध पायाभूत सुविधांची पाहणी करून बुलढाणा येथे मेडिकल कॉलेजची स्वतंत्र इमारत जरी नसली तरी जिल्हा सामान्य रुग्णालय, क्षय आरोग्य धाम, नवीनच बांधण्यात आलेली स्त्री व बाल रुग्णालयाची इमारत व तेथील जागा व इतर लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याने ह्या उपलब्ध सुविधेतच मेडिकल कॉलेज तात्काळ सुरु होऊ शकते असा सकारात्मक अहवाल व अभिप्राय शासनास सादर करण्यात आलेला असणे, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने निर्धारीत केलेल्या मापदंडानुसार जिल्हा बुलढाणा येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ४३० रुग्णखाटांचे संलग्नित रुग्णालय निर्माण करण्याबाबततचा सुधारित प्रस्ताव संचालनालयाने दिनांक १० मार्च, २०२१ रोजी शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करायच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागास अभिप्रायार्थ पाठविण्यात आला असणे, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने सुद्धा आपला अभिप्राय सकारात्मक दिलेला असणे, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय नसलेल्या इतर नंदूरबार, सिंधुदुर्ग व जिल्ह्यात शासनाने वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता दिलेली असणे, परंतू बुलढाणा जिल्हा मेडिकल कॉलेजला मान्यता न दिल्याने नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष , यासाठी बुलढाणा जिल्हा वैद्यकीय महाविद्यालयास तातडीने मान्यता देण्यासाठी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४२५) | "शासनाने बक्षी समिती खंड २ च्या तरतुदी संदर्भात काढलेल्या शासननिर्णयात संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन अंतर्गत समाजसेवा अधिक्षक वैद्यकीय आणि मनोविकृती या पदांची शैक्षणिक पात्रता नियुक्ती पासुन समाजकार्य पदव्युत्तर पदवी ही उच्चतम शैक्षणिक अर्हता असुन ही पदे शासनसेवेत एकाकी स्वरुपाची आहे. ही पदे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्नीत रुग्णांलयांमध्ये रुग्णसेवा मदत निधी, समुपदेशन आणि शासकीय आरोग्य योजाना अमंलबजावणी मध्ये अत्यंत महत्वाची असुन सुद्धा या पदांना पुर्ण सेवा काळात कोणतीही पदोन्नती नाही. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या १०, २० आणि ३० वर्ष सेवेनंतर मिळणारी वेतनवाढ फक्त एकच वरील श्रेणी लागू आहे. परंतु ६ व्या वेतन आयोगात या पदांना १२ आणि २४ वर्ष सेवेनंतर दोन स्तर वरिष्ठ श्रेणी वेतन वाढ म्हणजेच एस-१६ लागु करणे अपेक्षित होते. त्यांच्या शैक्षणिक अर्हतामध्ये सगळ्यात कमी वेतन मिळणारे पद हेच आहे. कोरोना सारख्या महामारीच्या | कुमारी आदिती तटकरे,श्री. प्रशांत ठाकूर,श्री. समीर कुणावार,श्री. महेश बालदी,श्रीमती मनिषा चौधरी वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | काळात रुग्णांना त्यांच्या अंत्यविधीपासून तर औषधांपर्यंत सर्वतोपरी मदत या समाजसेवा अधिक्षकांना केली त्यामुळे त्यांना न्याय देण्यात यावा.तरीही बक्षी समितीच्या खंड २ अहवालात तसेच शासननिर्णयात या पदांना वेतनावाढीसाठी कोणतीही मागणी मान्य केलेली नाही. त्यामुळे सदरील दोन्ही पदांना ७ व्या वेतन आयोगातील पे मेट्रीक्स मधील एस-१६ या वाढीव वेतनश्रेणीचा लाभ द्यावा ही आग्रहाची मागणी आहे. मात्र त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सदर पदाच्या कर्मचाऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४२६) | "मुंबईतील जे.जे.रूग्णालय व सेंट जॉर्ज रूग्णालय येथे सन १९९७ ते २००१ या कालावधीत सेवायोजन कार्यालया मार्फत २९ दिवसांच्या तत्वावर सहा कर्मचाऱ्यांची केलेली नियुक्ती, सदरहू कर्मचारी अद्यापी अंशकालीन म्हणून काम करीत असणे,सदर कार्मचारी अंशकालीन असल्यामुळे त्यांना शासकीय सेवेचे कोणतेही फायदे न मिळणे अत्यावश्यक सेवा असल्याने सदर कर्मचारी अल्पवेतनावर अविरत करीत असलेली सेवा, सद्याच्या महागाईच्या दिवसात अत्यंत तुटपुंज्या वेतना मध्ये कुटूंबाचे उदरनिर्वाह करणे कामगारांना जड होत असणे, सदर कर्मचाऱ्यांनी गेल्या २० वर्षापासून काम केल्यामुळे त्यांनी शासकिय सेवेची वयोमर्यादा ओलांडली असणे,सदर कार्मचाऱ्यांनी अंशकालीन पदावर काम केल्याचे प्रमाणपत्र न मिळणे, यामुळे सदर कर्मचारी विभागाच्या स्पर्धा परिक्षा देण्या पासून वंचीत रहाणे, मागील २० वर्षे केलेली सेवा विचारात घेऊन विशेष बाब म्हणून शासकिय सेवेत घेण्याबाबत सदर कर्मचाऱ्यांची मा. मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, वैद्याकिय शिक्षण मंत्री, अधिष्ठाता इत्यादींकडे अनेक वेळा मागण्यांची निवेदने देणे, सदर कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेत घेण्याची आवश्यकता, शासनाने केलेली व करावयाची कारवाई, शासनाची प्रतिक्रिया व भुमिका." | श्रीमती यामिनी यशवंत जाधव,श्रीमती गीता जैन,श्रीमती लताबाई सोनवणे,श्रीमती मंजुळा गावीत वि. स. स. | कित्ता |
| (४२७) | "राज्यात शासकीय खेळाडूंचे ५ टक्के आरक्षण बाबतचे बोगस प्रमाणपत्र देऊन शासकीय नोकरी मिळविलेल्या बोगस खेळांडूवर कारवाई करून व त्यांचे बोगस प्रमाणपत्र रद्द करणेसंदर्भात मा.क्रिडा आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.पोलीस महासंचालक यांना दि.३० सप्टेंबर २०२१ लेखी निवेदन देऊन त्यास दोन वर्षे इतका कालावधी होऊनही अद्याप याबाबत शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात आली | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | नसल्याची धक्कादायक बाब दि.१३.३.२०२३ रोजी निदर्शनास येणे, महाराष्ट्र शासनाच्या क्रिडा विभागाच्या वेबसाईडवर प्रमाणपत्र रद्द केलेल्या खेळाडूंचे नावे देखील उपलब्ध असताना अद्याप त्यांच्यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदरहू बोगस खेळाडूंमध्ये राज्य शासनाच्या वर्ग १ ते वर्ग ४ पर्यंतचे कर्मचाऱ्यांचा सहभाग असून अशा या खेळाडूंना बोगस प्रमाणपत्र काढून देण्यासाठी शासनाच्या क्रिडा विभागातील क्रिडा अधिकारी व क्रिडा उप संचालक यांनी आर्थिक व्यवहार करून मदत केल्याचा प्रकार उघडकीस येणे, शिवाय ज्या बोगस खेळाची प्रमाणपत्रे काढून देण्यात आलेली आहेत अशा खेळांच्या संघटनेवर क्रिडा विभागातील अधिकारी अथवा त्यांचे नातेवाईक कार्यरत असल्याने अशा खेळांच्या संघटनेवर कारवाई होणे आवश्यक असणे, ५ टक्के खेळाच्या आरक्षणाचा लाभ बोगस खेळाडू घेत असल्यामुळे प्रामाणिक खेळाडूंना शासकीय नोकरी मिळण्याच्या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कर्तव्य बजावून राज्य व देशासाठी खेळणाऱ्या प्रामाणिक खेळाडूंमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (४२८) | "धारूर नगरपरिषद, जि.बीड साठी सुजल निर्मल अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना राज्य शासनाने दिनांक ४ मार्च, २०१४ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करणे, सदर योजनेचे काम इंद्रानी कंट्रक्शन, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी कार्यारंभ आदेश देणे, सदर योजनेचे काम तत्कालीन नगराध्यक्ष व इतर यांच्यामुळे प्रलंबित रहाणे, याबाबत मुख्याधिकारी यांनी दिनांक १ मे, २०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांना कळविणे, तद्नंतर दिनांक ५ जून, २०१८ रोजी मुख्याधिकारी यांनी पाणीपुरवठा योजना पुर्ण न झाल्यास तत्कालीन नगराध्यक्षांची अडवणुकीची भूमीका जबाबदार राहील याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांना देणे, तद्नंतर तत्कालीन पाणीपुरवठा मंत्री यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ रोजी आदेश पारीत करून योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत करून धारूर (जि.बीड) नगरपरिषदेकडील निधी सह व्याजासह परत घ्यावा, असे निर्देश देणे, परंतु काहीही कार्यवाही न होणे, या सर्व प्रकारास सर्वस्वी तत्कालीन नगराध्यक्ष जबाबदार | श्री. प्रकाश सोळंके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | असणे, सदर योजनेचे काम अद्यापही अपूर्ण असणे, यामुळे धारूर जि.बीड शहरातील नागरीक पाण्यापासून वंचित असणे, यामुळे धारूर जि.बीड शहरातील नागरिकांमध्ये पसरलेला तिव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४२९) | "उमरी (ता. केज, जि. बीड) येथील जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामात अभियांत्रिकी सल्लगार असलेल्या में. संतोष शामसुंदर पडुळे या कंत्राटदाराला दि.२२/०४/२०२२ रोजी जिल्हापरिषद, बीड. यांचेकडून कार्यारंभ आदेश देण्यात आला आला असणे, परंतु सदर काम हे ३० ते ३५% अपुर्ण असतांना सर्व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने दि.०७/०९/२०२२ रोजी सदर कंत्राटदाराला संपूर्ण बील अदा करण्यात आले असणे, सदरील ठेकेदाराने सदर कामाचे सर्व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अनुभव प्रमाणपत्र जिल्ह्यातील प्रत्येक ई-निविदेमध्ये सादर केलेले असल्याचे उघड होणे, तसेच सदर कंत्राटदाराच्या बनकरंजा, ता. केज. येथील कामाच्या तांत्रिक तपासणी मध्ये गंभीर बाबी उघड होणे, सदर कामात में. संतोष शामसुंदर पडुळे या कंत्राटदाराने पाईप अंदाजपत्रकाप्रमाणे न वापरता इतर निकृष्ट दर्ज्याचे वापरून शासनाची फसवणूक केल्याचे उघड होणे, त्यामुळे अपहाराची रक्कम निश्चित करून कंत्राटदारावर गुन्हे दाखल करण्याचे अपर जिल्हाधिकारी यांच्या अहवालात प्रस्तावित करण्यात आले असणे, परंतु में. संतोष शामसुंदर पडुळे या एजन्सीने जलजीवनच्या कामात अनियमितता व भ्रष्टाचार केल्याचे उघड होऊनही अद्याप गुन्हे दाखल करून कार्यवाही करण्यात आली नसणे, सदर कंत्राटदाराला आर्थिक क्षमता नसतानाही मोठ्याप्रमाणात नियमबाह्यकामे देण्यात आली असणे, त्यामुळे में. संतोष शामसुंदर पडुळे या एजन्सीची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करून वरील प्रकरणी तातडीने गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता" यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | श्रीमती नमिता मुंदडा वि. स. स. | कित्ता |
| (४३०) | "अमरावती विभागातील ५६ तालुक्यातील बुलडाणा जिल्हातील मोताळा तालुका अवर्षण ग्रस्त असणे गेल्या पाच सात वर्षा पासुन त्या भागात सतत चा दुस्काळ असणे, त्या अनुषगाने भूगर्भातील पाणी पातळी खाली जाणे, त्या नुसार केंन्द्र सरकारणे भूपातळीची नोद घेऊण दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० ला केंद्र शासन पुरस्कृत अटल भूजल अटल जल योजना राज्यात राबविणे मध्ये मोताळाचा समावेश करणे, त्या आधारे भूगर्भात पाणी पातळी खुप खोल गेली असल्याचा अहवाल देणे, त्यामुळे एम आर जी एस च्या विहिरीना | श्री. संजय गायकवाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मंजूरात मिळूनही वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वक्षण आणी विकास यंत्रणाचे केद्राच्या अटीनुसार प्रमाणपत्र न मिळणे, पंरतु गेल्या चार वर्षात अतिवृष्ठी मुळे भूगर्भातील पातळी पुन्हा पूर्ववत होने तरी सुध्दा केंद्र सरकारच्या संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणांच्या पूर्वीच्या सर्व्हेक्षणातील अहवालानुसार भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणाचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र न मिळणे, या गंभीर विषयावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | | |
| (४३१) | "यवतमाळ शहरातील पाणी पुरवठ्याचे नियोजन करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या गलथान कारभाराचा व नियोजनशून्यतेमुळे शहरातील पाणीपुरवठा योजनेचे तीनतेरा वाजने असून दिनांक ४ मार्च, २०२३ रोजी सकाळी ८ वाजता माईदे चौकातील विर्दभ हाऊसिंग सोसायटीसमोर अचानक रस्त्यावर स्फोट होऊन पाणीपुरवठा योजनेचे पाईप फुटून पाण्याच्या दाबाने रस्ताच उखडून गेल्याची माहिती दिनांक ४ मार्च, २०२३ रोजी निर्देशनास येणे, याच रस्त्यावरून शिकवणी वर्गाला जात असलेली महाविद्यालयीन विद्यार्थीनी या स्फोटामूळे जखमी होणे, जीवन प्राधिकरणाच्या निष्काळजीपणामूळेच हा स्फोट झाल्याची नागरिकांची तक्रार असणे, यवतमाळ शहारात बारमाही पाणी टंचाई असणे, शहरातील काही भागात १० ते १५ दिवसांच्या अंतराने नळाचे पाणी पोहोचत असणे,त्यामुळे नागरिकांचा रोष जीवन प्राधिकारण वर असणे, शहारातील पाणी टंचाई लक्षात घेता प्राधाकरण मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेले निष्काळजीपणा याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, परिणामी या गंभीर प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही होणेबाबत तसेच यवतमाळ शहराला बारमाही शुद्ध पाणी उपलब्ध होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार,श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |
| (४३२) | "नाशिक जिल्ह्याचा टंचाई अंतर्गत गांव, वाडी, वस्ती यांना टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी टँकर मंजूर करतांना शासन नियमानुसार सर्व प्रथम जिल्ह्यात उपलब्ध असलेले शासकिय टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेबाबत निर्देश असल्याने शासकिय विभागांकडे उपलब्ध असलेले टॅंकर यांचे पाणीपुरवठा करणेबाबत आदेश होणे, सदर शासकिय टॅंकर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर सर्वाधित तालुक्याचे गटविकास अधिकारी हे स्थानिक पातळीवर डिझेल पुरवठादार यांचेशी संपर्क साधुन टँकरसाठी | डॉ. राहूल आहेर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | शासनाकडून निधी उपलब्ध होईल व त्यांद्वारे त्यांचे देयकाचे वितरण केले जाईल या अटीवर डिझेल पुरवठा करणेबाबत विनंती करत असणे, या टंचाई कालावधीत नाशिक जिल्ह्यात एकूण १४ शासकिय टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असणे, सदरच्या तालुक्यांना टँकरद्वारे माहे एप्रिल २०२२ ते जून २०२२ या कालावधीत नियमितपणे सुरू असणे, यासाठी सुमारे ३ महिन्याचा कालावधी होऊन गेल्याने व शासनाकडून निधी प्रलंबीत असल्याने संबंधीत डिझेल पुरवठादार यांनी संबधीत गटांकडे देयक मिळणेबाबत विनंती केलेली असल्याने गटविकास अधिकारी यांनी शासनाकडे वारंवार मागणी करणे, परंतु सदरचा निधी अद्याप अप्राप्त असणे, यामध्ये चांदवड ५४५५००० व देवळा २२००००० निधी प्रलंबित असणे, नाशिक जिल्ह्याचे एकूण ५४४६६१० इतका निधी प्रलंबित असणे, आगामी काळातही पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाकडून टँकरद्वारे पुरवठा होणार असल्याने प्रलंबित देयके तात्काळ देणे गरजेचे असणे, त्यामुळे याबाबत शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४३३) | "राज्यात सोलापूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या जलजीवन मिशनच्या कामात अनियमितता झाली असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास येणे, याची सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याच्या सूचना पालकमंत्री महोदयांनी जिल्ह्यात घेतलेल्या आढावा बैठकीत दिल्या असणे, जलजीवन मिशनच्या कामातील अनियमितता संदर्भात स्थानिक वृत्तपत्रात जलजीवन मिशन ठेकेदाराचे पोषण या वृत्तमालिद्वारे सर्व जिल्ह्याचे लक्ष वेधले असणे, जलजीवन मिशन अंतर्गत कोणत्याही प्रकारची बिले कामाची गुणवंता तपासल्याशिवाय काढण्यात येऊ नयेत, तसेच कामासाठी जैन किंवा फिनोलेक्स कंपनीचे पाईप वापरण्यात यावे, कामाची गुणवंचा फेरतपासणी झाल्याशिवाय ठेकेदाराची बिल काढण्यात येऊ नये ज्या ठेकेदाराची आर्थिक पात्रता नाही अशांना कामे देण्यात येऊ नये, अशा कडक पालकमंत्र्यांनी सूचना देणे, जिल्हा भरात जलजीवन मिशनच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांची कामे सुरू असून नियमांना हरताळ फासुन ही कामे मंजूर करण्यात येत असणे, त्यामुळे जलजीवन मिशन हे अधिकाऱ्यांसाठी चराऊ कुरण बनत असल्याने या योजनेचे मातेरे होत असताना दिसत असणे, त्यामुळे यात गुंतलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याची गरज असणे, त्यामुळे जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या कामाविषयी नाराजी व्यक्त होत असून असंतोष व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही." | श्री. सुभाष देशमुख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (४३४) | "मौजे आंबिवली (ता.कल्याण जि.ठाणे) येथील एन.आर.सी कंपनीने आदानी समूहास जमिनी विक्री करणे सदर जमिनीवर आदानी समूहा तर्फे मोठ्या प्रमाणात बांधकामास सुरुवात करणे, बांधकामा करिता आदानी समूहा तर्फे सदर जमिनीवर स्फोटकांचा वापर करून जमिनीमध्ये उत्खनन केल्याजाणे सदर स्फोटामुळे आंबिवली परिसरातील घरांना तडे जाणे खिडक्यांची काचे फुटून नागरिकांच्या घरांचे प्रचंड नुकसान होणे, सदर नुकसानीबाबत स्थानिक नागरिकांनी आदानी समूहाकडे नुकसान भरपाई ची मागणी केली असता आदानी समूहाकडून नागरिकांना उद्धट वागणूक देऊन हाकलून देणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांची शासना प्रती निर्माण झालेला तीर्व असंतोष, आदानी समूहाने एन.आर.सी कंपनीच्या जागेवर सुरू केलेल्या बांधकामासाठी जमिनीमध्ये उत्खनन करण्यासाठी केलेल्या स्फोटामुळे परिसरातील नागरिकांच्या घराचे झालेले नुकसानीचा मोबदला अदा करून आदानी समूहावर कारवाई करणेबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. | श्री. विश्वनाथ भोईर वि. स. स. | कित्ता |
| (४३५) | "चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात अनेक सरकारी व खाजगी कोळसा खाणी असल्याने कोळसा माफियाकडून दोन्ही जिल्हयात नियमबाहय, अवैधरित्या कोलवाशरीज सुरू असणे, नियमबाहय सुरू असलेल्या कोल माफीयांच्या कोल वाशरीजकडे पोल्युशन सर्टिफिकेट, कॅमेन्स सर्टिफिकेट, सन २०२१ च्या शासन निर्णयानुसार साठा करावयाचा असल्यास डिलर परमीट यासह अनेक महत्वपुर्ण सर्टिफिकेट नसल्यामुळे कोल माफियाकडून मनमानी कारभार सुरू असणे, यात उच्च दर्जाच्या कोळशाची मोठ्या प्रमाणात चोरी होत असणे, अनेक ठिकाणी कोळसाच्या साठ्याची नियमबाहय साठवणूक करण्यात येणे, या कोल वॉशरीजमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्याने नागरिकांना, दम्याच्या श्वसनाचा यासह इतर गंभीर आजार होणे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदुषण मंडळाद्वारे २४ तास घेण्यात येणाऱ्या हवा गुणवत्ता निरीक्षणाची सन २०२२ ची धक्कादायक आकडेवारी समोर आली असून गत वर्षात ३६५ दिवसात चंद्रपूरमध्ये केवळ २९ दिवस प्रदूषण मुक्तीचे ठरणे, कोल वॉशरीजकडून मोठ्या प्रमाणात होत असलेली कोळसाची चोरी व प्रदूषण, याबाबत वारंवार तक्रारी होत असतांना सुद्धा कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (४३६) | "मुंबई, कांदिवली येथे १०६४ लिटर भेसळयुक्त दूधसाठा जप्त करून नष्ट केल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, अन्न आणि औषध प्रशासनाने पदार्थांचे नमुने घेऊन तपासणी केली असता सर्वाधिक भेसळ दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळून येणे, परंतु, अन्न आणि औषध प्रशासनामध्ये मनुष्यबळाची कमतरता आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे उत्पादनाच्या नमुन्यांची चाचणी करण्यात अवास्तव विलंब होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये, अन्न आणि औषध प्रशासन विभागातील ११५ मंजूर पदांपैकी ५१% पदे रिक्त असणे, त्यामुळे पद भरतीचे नियम शिथिल करण्यासंदर्भात ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अतुल भातखळकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अबू आजमी वि.स.स. | कित्ता |
| (४३७) | "दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी नाशिक येथील गोंदे औद्योगिक वसाहतीतील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीत बॉयलरजवळ स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत दोन महिला कामगारांचा दुर्दैवी मृत्यु झाल्याचे तसेंच अन्य १७ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे आढळून येणे, त्यानंतर सदर दुर्घटना ठिकाणास मा. मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर, त्याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन त्याचवेळी मृतांच्या वारसास पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषित करण्यांत आल्याचे निदर्शनास येणे, शासनाने आदेशित केल्यानुसार, सदर आगडोंबाची उच्चस्तरीय चौकशी करण्यांत येऊन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यांत आले आहे व त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यांत आली याबाबतची अद्यापही अनभिज्ञता असणे, तसेंच कामगार आयुक्तांच्या पथकाने या कंपनीस दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असतांना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली होती व त्या पाहणीमध्ये काय आढळून आले याबाबत अद्याप खुलासा झालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ अखेरीस निदर्शनास येणे, त्यामुळे या दोन्ही बाबींसंबंधात अद्यापही कार्यवाही न झाल्याने जनतेमध्ये व कामगारवर्गांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याप्रकरणी शासनाने तातडीने मृतांच्या वारसांना आर्थिक मदतीच्या वितरणासह पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. दिलीपराव बनकर,श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. दिपक चव्हाण,श्री. हसन मुश्रीफ, श्री. बाळासाहेब पाटील,श्रीमती सरोज आहिरे,श्री. अजित पवार,श्री. जयंत पाटील,श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. धनंजय मुंडे,कुमारी आदिती तटकरे,श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे,श्री. चेतन तुपे, श्री. विनोद निकोले,श्री. दौलत दरोडा, श्री. धर्मरावबाबा आत्राम,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार, श्री.अस्लम शेख,श्री. सुभाष धोटे,श्री. अमिन पटेल,श्री. नानाभाऊ पटोले,प्रा. वर्षा गायकवाड, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. संजय जगताप,श्री. विश्वजित कदम,श्री. सुरेश वरपुडकर,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) वि.स.स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४३८) | “तळोजे (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील केमस्पेक केमिकल्स लि. कंपनीच्या व्यवस्थापनेने कोणतीही पूर्व सुचना न देता बेकायदेशिरित्या ठेकेदारी पद्धतीवर काम करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्त ११८ कामगारांना कमी केले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले असणे, गेल्या अनेक वर्षापासून प्रामाणिकपणे काम करीत असणाऱ्या कामगारांना केमस्पेक केमिकल्प कंपनीच्या व्यवस्थापनाने अचानकपणे कामावर कमी केल्यामुळे कामगारांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली असणे, कामगारांच्या हित संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांचे सर्रासपणे पायदळी तुडवून कंपनी व्यवस्थापनाने कामगारांवर अन्याय केला असणे, अशा मुजोर कंपनीच्या व्यवस्थापनाच्या विरोधात कामगारांनी गेट बंद आंदोलन केले असणे, परंतु कंपनी व्यवस्थापनाकडुन कोणत्याही प्रकारचे सहकार्य मिळत नसल्यामुळे कामगारांमध्ये कंपनी व्यवस्थापना विरोधात प्रचंड असंतोषाची लाट निर्माण झाली असणे, त्यामुळे शासनाने कंपनी व्यवस्थापनावर तातडीने कारवाई करून ठेकेदारी पद्धतीवर काम करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्त ११८ कामगारांना कामावर घेण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. प्रशांत ठाकूर, श्री. समीर कुणावार, श्री. महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम वि. स. स. | कित्ता |
| (४३९) | ‘‘मुंबईतील चुनाभट्टी येथील गिरणी कामगारांचे कुटुंबे रहात असलेली टाटा नगर इमारत राहण्यास धोकादायक झाल्याने सदरहू इमारतीतील ४५ गिरणी कामगारांच्या कुटुंबियांना कोठेही पर्यायी घरे न देता माहे जुलै, २०२२ मध्ये इमारत रिक्त केल्याने सदरह कुटुंबावर बेघर होण्याचे संकट कोसळल्याची गंभीर बाब दि.१०.०२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, स्वदेशी मिलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी १९६० साली चुनाभट्टी परिसरात “टाटा नगर” नावाची इमारत बांधण्यात येणे, मात्र सन २००१ मध्ये मिल बंद झाल्याने गिरणी व्यवस्थापनाने इमारतीच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळेच सदरहू इमारत जुनी व जीर्ण होऊन राहण्यास अत्यंत धोकादायक बनल्याने मुंबई महापालिकेतर्फे रिक्त करण्याची नोटीस देण्यात येणे, परंतु, सदरहू इमारत रिक्त केल्यानंतर इमारतीतील बेघर झालेल्या गिरणी कामगारांच्या ४५ कुटुंबांना कोठेही पर्यायी घर न देता शासन तथा मुंबई महापालिकेने जबाबादारी झटकून याकडे दुर्लक्ष केल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी ४५ गिरणी कामगारांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले बेघर व बेदखल होण्याचे व चिंतचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४४०) | "वर्षभरापूर्वी सुरू झालेल्या कामगार मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना कामाच्या स्थळी दोन वेळेचे जेवण देण्याच्या शासनाच्या हेतूला भष्ट्राचाराची कीड लागल्याचे चित्र निदर्शनास येणे, वर्षभरात गडचिरोली जिल्ह्यात बनावट संख्या दाखवून तब्बल ११ कोटींचे देयके काढल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळ कार्यालयामार्फेत कुठलिही शहनिशा न करता देयके काढणे, त्यामुळे सदर योजनेत मोठ्या प्रमाणात भष्ट्राचार झाल्याची शंका निर्माण होणे, सुरवातीला नोंदणीकृत कामगारांनाच भोजन पुरविण्यात यावे असे निर्दशीत असतांना संबंधीत कंत्राटदाराने अधिकाऱ्यांशी संगनमत करून अनोंदीत कामगारांना सुद्धा भोजन वाटप करने, त्यामुळे नेमके भोजन किती व कोणाला वाटप करता येत आहे याबाबत माहीती गोळा करने शक्य नसणे, त्याचा फायदा घेवून कंत्राटदाराने अव्वाच्या सव्वा संख्या दाखवून वर्षभरात कोट्यावधीचे देयके मंजूर करवून घेणे, गडचिरोली जिल्ह्यात मागील वर्षभरात ११ कोटी ३७ लाखांचे देयके येथील बांधकाम कल्याणकारी मंडळाने डोळे झाकून अदा करणे. याबाबत माहीती विचारल्यास नोंदीत अनोंदित कर्मचाऱ्यांची माहीती उपलब्ध नसणे, सध्यस्थितीत ज्या गावांमध्ये भोजन वाटप सुरू आहे, त्याठिकाणी माहीती घेतली असता तेथे बांधकामच सुरु नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे मागील वर्षभरापासून जिल्ह्यात हा प्रकार सुरु असणे व यात कोट्यावधीचा घोटाळा झाल्याची शंका उपस्थित होणे, त्यामुळे या भ्रष्टाचाराचे लोण राज्यभर पसरले असल्याची शक्यता नाकारता न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धर्मरावबाबा आत्राम वि. स. स. | कित्ता |
| (४४१) | "राज्यामध्ये मोठ-मोठे उद्योगधंदे निर्माण असणे, त्यामुळे मुंबई बंदरातील गोदी विभागात, किराणा सामान - कागद- लोखंड - पोलाद - कापड - भाजीपाला इ वस्तू साठविल्या जाणाऱ्या गोदामात तसेच वाहतूक, जहाज, रेल्वे इ. ठिकाणी ओझी उचलणे, सामान चढवणे व उतरवणे तसेच रचून ठेवणे यासाठी मोठ्या प्रमाणात माथाडी कामगार काम करीत असणे, परंतु मालक वर्गाकडून माथाडी कामगारांना योग्य वेतन व इतर राहण्या - खाण्याची सुविधा न देता उलट अपमानास्पद वागणूक मिळत असणे, त्यामुळे माथाडी कामगारांना न्याय देण्यासाठी कै.अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगार व मुंबई मधील इतर बाजारपेठांमधील संबंधीत नेत्यांना एकत्र करून वेळप्रसंगी संप पुकारून शासनाकडे पाठपुरावा करणे, त्यामुळे सन १९६९ मध्ये अखेर माथाडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सभागृहात | श्री. प्रताप सरनाईक वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | ‘महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरी नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अन्वये’ कायदा पारित करण्यात येणे, त्यानुसार माथाडी कामगारांच्या हितासाठी कामगार विभागाकडे सन १९९० पर्यंत कै.अण्णासाहेब पाटील यांची एकमेव माथाडी कामगार संघटना अस्तित्वात असणे, मात्र त्यानंतर इतर नवीन तीन संघटना तयार होणे, सद्यस्थितीमध्ये राज्यात माथाडी शब्दाचा वापर करून १५० माथाडी संघटना कार्यरत असून यातील चार संघटना वगळता इतर संघटना बोगस असल्याचा आरोप नोंदीत असलेल्या संघटनांनी केलेला असणे, अद्यापपर्यंत मुंबईत ११ बोर्डात एक लाख माथाडी कामगार आहेत, तर इतर ७० हजार कामगार हे विविध संघटनांच्या नावाने सदस्यत्व घेतलेले असणे, माथाडी कामगारांच्या युनियनच्या बोगस नोंदीमुळे शहरी भागातील काही टपोरीगिरी व उनाडक्या करणारी मुले या माथाडी संघटनांमध्ये सहभागी होत असून आपला एक म्होरक्या निवडून त्याला माथाडी संघटनेचे अध्यक्षपद दिले जात असणे, मेहनत करून, लोकांची ओझी वाहून, गोण्या उचलणाऱ्या माथाडी कामगारांऐवजी ही टपोरी मुले काहीही काम न करता व्यापारी, बांधकाम व्यावसायिक तसेच अन्य लोकांकडून दादागिरी व गुंडगिरी करून पैसे वसुली करीत असणे, तसेच या बोगस संघटना आपल्या बॅनरवर राजकिय नेत्यांचे फोटो टाकून शहरभर लावत असल्यामुळे या सर्व बोगस संघटनाना राजकिय पक्षांचा आर्शिवाद आहे कि काय ? असा प्रश्न सर्वसामान्य व्यापाऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेला असणे, या बोगस संघटनांच्या गुंड प्रवृत्तीमुळे सर्व व्यापारी व बिल्डर पोलिसांकडे तक्रारही करीत नाहीत किंवा तक्रार आल्यास पोलीस जाणिवपुर्वक त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र राज्यातील शहरी भागांमध्ये दिसून येणे, अश्या बोगस माथाडी संघटनाना आवर घालण्यासाठी राज्य शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (४४२) | “राज्यातील लाखोंच्या संख्येने असलेल्या इमारत व बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी शासनामार्फत चांगल्या योजना राबविण्यात येणे, सदर योजनांचा लाभ तळागाळातील सर्व कामगारांना मिळावा, यासाठी संबंधित खात्याच्या अधिकारी वर्गाकरिता चार चाकी वाहने उपलब्ध करून देण्यात येणे, शासनाच्या ग्रामपंचायत ते मंत्रालयापर्यंत कोणतीही वस्तू किंवा विशिष्ट वार्षिक खर्चाच्या अधिक असल्यास ती घेतांना खुली निविदा, टेंडर पद्धतीचा अवलंब करून घेणे बंधनकारक असणे, सहाय्यक कामगार | श्री. सुभाष धोटे,अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे),श्री. अस्लम शेख, श्री. विजय वडेट्टीवार,श्री. सुनिल केदार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | आयुक्त कार्यालय, चंद्रपूर व कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयाअंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयाअंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात वाहन भाड्याने घेतांना कोणत्याही कायदेशीर प्रक्रिया न राबविता आपल्या जवळच्या लोकांशी संगनमत करून त्यांच्याकडून दरपत्रक घेऊन, त्यांचेशी करारनामा करून वाहने भाड्याने घेतल्याचा प्रकार उघडकीस येणे, संबंधित अधिकारी यांच्यासोबत भ्रमणध्वनीवर झालेला चर्चेचा पुरावा (क्लिप) मा.प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा.कामगार आयुक्त यांना दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी सादर केला असणे, यापूर्वी मंडळाच्या कामासाठी याचप्रकारे वाहने भाडेतत्त्वावर व्यवहार झाल्याची व त्या मोबदल्यात लाखों रुपये खर्च केल्याची माहिती संबंधित कार्यालयाकडून मिळाली असणे, याप्रकरणी संबंधित वाहनधारक व चालक-मालक संघटना वाहने पुरविण्यास सक्षम असताना विना टेंडर बाहेरच्या जिल्हयातील पासिंग असलेली वाहने घेण्यामागे अधिकारी वर्गाचे काहीतरी स्वारस्य असणे, संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करुन, त्यांचेवर निलंबनाची कारवाई करणेबाबत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे कामगारांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४४३) | "मुंबईतील भेंडीबाजार येथील बोहरी मोहल्ला येथील इमारतीचे बांधकाम सुरू असतांना लिफ्टची तार तुटल्यामुळे लिफ्टमधील दोन कामगार खाली पडले. त्यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला व दुसरा कामगार गंभीर जखमी झाला, सदरहू बांधकामाच्या कंत्राटदाराने कामगारांसाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था केलेली नव्हती. विकासक व ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळे एका कामगाराचा दुर्देवी मृत्यू झाला आहे, कामगार कायद्याप्रमाणे मृताच्या कुटुंबियांना १५ लाख रुपयांची नुकसान भरपाई देणे आवश्यक असतांना याप्रकरणी केवळ ७ लाख रुपये मृत कामगाराच्या कुटुंबियांना देण्यात आली आहे, हे पाहता सदर मृत कामगाराच्या कुटुंबियांची फसवणूक करण्यात आली आहे, सदर बांधकाम ठेकेदार व विकासकाने कामगारांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणतीही व्यवस्था बांधकामाच्या जागेवर केलेली नव्हती, राज्यात मुंबईसह इतरत्र अशा प्रकारच्या अनेक घटना घडत असतात, त्यामध्ये अनेक गरीब कामगारांची फसवणूक केली जाते. | श्रीमती यामिनी यशवंत जाधव वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | दि. ०८/०७/२०१९ रोजी तत्कालीन कामगार मंत्री श्री. संजय कुटे यांनी आपल्या पत्र (जावक क्र.जा.क्र. मंत्री/का/विजा.भज.इमाव.विमाक/३७/२०१९) द्वारे (आंदोलनकारक) श्री.प्रदीप सुरेश मगरे-महाराष्ट्र चिटणीस, नवीन अखिल महाराष्ट्र माथाडी, वाहतूक आणि जनरल कामगार संघटना, प्लॉट न.६५, सेक्टर-२८, वाशी, नवी मुंबई यांचे दिनांक ०३/०७/२०१९ रोजीच्या निवेदन मध्ये एकूण कामगारांच्या विविध ८ मुद्यांवर आंदोलन सुरू होते. सदर निवेदन संदर्भात मा. प्रधान सचिव याना निवेदन मधील तक्रारीं संदर्भात १५ दिवसांत अहवाल सादर करण्यास कळवले होते, तरी सदर अहवाल अद्यापि सादर न होणे, रेल्वे माथाडी मंडळ मधील टोळी कर. १९५ मधील श्री. दगडू बबन खरात (रजि नः १९९०९) या कामगाराला इतर कामगारांसोबत प्रवेश परवाना देण्याचे मुंबई उच्च न्यायालय च्या writ petition ३२६७ of २०२२ च्या खटल्याचा आदेशामध्ये नमूद असताना सुद्धा त्याला प्रवेश परवाना दिला नाही व टोळी ला आदेशाप्रमाणे काम न देणे, दक्षिण मुंबई मध्ये मोठ्या प्रमाणात रहिवाशी इमारतींचे पुनर्विकास व बांधकाम सुरू आहे. सदर बांधकाम मध्ये माथाडी कायद्याचा धाक दाखवून काही पक्षांचे उपनेते व कामगार संघटनेचे पदाधिकारी माथाडी कायद्याचा धाक दाखवून बेकायदेशीर रित्या बांधकाम विकासक कडून वसूल करत आहेत. सदर प्रकार मुळे खऱ्या माथाडी कामगार मोठ्या प्रमाणात आपल्या कामाशी वंचित राहत असून त्याचे आर्थिक नुकसान होत आहे व शासनाने नेमलेल्या माथाडी मंडळाची लेव्ही हि बुडत आहे. तरी सदर प्रकरणात कामगार विभाग, माथाडी मंडळ व मुंबई पोलीस हे रोकण्यासाठी काही उपाययोजना न करणे, विविध प्रकारे मागणी करूनही शासन व पोलीस कोणतीच कार्यवाही करीत नसल्याने माथाडी कामगारांमध्ये अन्यायची भावना निर्माण होऊन, अत्यंत तिव्र स्वरूपाचा असंतोष खदखदाने, यावर शासनाने तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता विचारात घेता,कारावयाची कार्यवाही व उपायोजना." | | |
| (४४४) | "शासन विविध शासकीय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्थेमार्फत विविध कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करीत असणे, यामध्ये १०२ कंत्राटी रुग्णवाहिका चालक, स्वच्छता कर्मचारी, इतर कर्मचारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ३३ KV सब स्टेशन कंत्राटी ऑपरेटर इत्यादी कर्मचारी हे शासकिय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्था मार्फत नियुक्त करण्यात येत असणे, परंतु सेवाभावी संस्था चालक हे शासनाने ठरवून दिलेले वेतन संबंधितांना न देता तुटपुंजे वेतन देत असल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये महावितरण मधील ३३ KV सब | श्री. संतोष बांगर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | स्टेशन मधील कंत्राटी ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बँक खाती स्वतः जवळच ठेवून शासनाने त्यांच्या खात्यावर टाकलेला पगार परस्पर उचलून ऑपरेटरला मात्र कमी पगार देण्याचे प्रकार घडत असल्याचे उघडकीस येणे, तसेच महाराष्ट्रातील १०२ कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना शासन १९ हजार ९०० रु प्रमाणे वेतन ठेकेदारास अदा करत असतांना ठेकेदार मात्र ८ ते १० हजार रुपये चालकांना देत असणे, तसेच त्यांचे मानधन चार-चार महिने अडवून ठेवण्यात येत असणे, त्यामुळे ज्या-ज्या शासकीय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्थामार्फत कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्यात येत आहेत त्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन नियमाप्रमाणे मानधन देऊन ते मानधन प्रत्येक महिन्याला अदा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४४५) | "डहाणू, पालघर व तलासरी, विक्रमगड तालुक्यातील सुमारे ४२०० एकर क्षेत्रफळावर असलेल्या मिरची लागवडीवर थ्रिप्स, माईट्स, व्हाइट फ्लाय (सफेद पाखरे) या उपद्रवी किड्याचा हल्ला हाणे, यामुळे उत्पादनात निम्म्यानी घट होण्याची शक्यता असणे, पालघर जिल्ह्यात १९३८ हेक्टर क्षेत्रफळावर मिरची लागवड केली जाणे, त्यापैकी डहाणू व पालघर तालुक्यात १३५९ हेक्टरचा समावेश असणे, यंदाच्या हंगामामध्ये सुरुवातीपासूनच उपद्रवी किड्याचा हल्ला होणे, मिरचीच्या फुलांत बारीक थ्रिप्स, कोळी, सफेद पाखरे राहत असणे, जैविक तसेच रासायनिक कीटकनाशक फवारणी नंतर देखील ती मरत नसणे, डहाणू तालुक्यातील शेतकऱ्यांना लागवडीच्या काळात दोन खुडे (वेचणे) देखील मिळाले नाही, बहुतांश शेतकऱ्यांचे एकरी दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झालेले असणे, त्याशिवाय पीक वाचवण्यासाठी वापरलेल्या नामांकित कंपनीची किटकनाशक औषधे बनावट स्वरुपात येत असल्याने त्यांच्या फवारणीचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या माथी पडत असणे, बनावट औषधांमुळे जिल्ह्यातील उत्पादकांचे करोडो रुपयांचे नुकसान होण्याची स्थिती असणे, थ्रिप्स, माईट्स, व्हाइट फ्लाय हे किडे मिरचीमध्ये नियमितपणे आढळून येत असले तरी गेल्या काही दिवसांत वातावरणातील तापमान अचानकपणे वाढल्याने त्यांचा हल्ला अधिक तीव्र झाला आहे, लागवड क्षेत्रात सध्या ड्रीपद्वारे पाणी दिले जात असल्याने लागवड केलेल्या शेडनेटमधील तापमान कमी ठेवण्यासाठी आव्हानात्मक ठरत असणे, आगामी काळात तापमान कमी ठेवण्यासाठी उपाययोजना आखाव्या लागणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले, परिणामी | श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, ॲड. आशिष शेलार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | डहाणू, पालघर व तलासरी तालुक्यातील मिरची लागवडीवर थ्रिप्स, माईट्स, व्हाइट फ्लाय (सफेद पाखरे) या उपद्रवी किडय़ाचा हल्ला रोखण्यासाठी शासनाने मिरची संशोधन केंद्राचे उपकेंद्र डहाणू येथे सुरू करण्याची गरज, तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेसाठी, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४४६) | "अचलपूर व चांदुर बाजार येथिल संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये १४ दिवस उपोषण करूनही अद्यापही त्यांच्या मागण्यांवर कोणतीही कार्यवाही न होणे, सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या वर्षात गारपीट व सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई अजूनही देण्यात न येणे, चांदुर बाजार तालुक्यातील आसेगाव पूर्णा आणि तळेगाव मोहना या मंडळातील एकाही शेतकऱ्याला मदत न मिळणे, स्थानिक लोकप्रतिनिधीनी केलेली मागणी तसेच जिल्हाधिकारी यांचा अहवाल याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या कृषी विभागाने मागण्या मान्य असल्याचे लेखी दिले असतानाही दिलासा न मिळणे, या भागातील शेतकऱ्यांनी शासनाच्या उदासीनतेमुळे संत्रा बगीचे नष्ट करण्याचा घेतलेला निर्णय, या भागात वर्षातील बाराही महिने संत्र्यावर किडीचा प्रादुर्भाव होतो तसेच फळगळती मोठ्या प्रमाणात होते त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या नंतरही शासनाकडून संत्र्यावरील किडीचे नियंत्रण तसेच फळगळती रोखणे यासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, राज्य शासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन तातडीने शेतकऱ्यांना अनुदान देण्याची तसेच आवश्यक उपाययोजना करण्याची आवश्यकता, शासनाने तातडीने दखल न घेतल्यास शेतकरी उध्वस्त होण्याची निर्माण झालेली स्थिती, राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया." | श्री. बच्चू कडू वि. स. स. | कित्ता |
| (४४७) | "बुलढाणा जिल्ह्यामध्ये सन २०१४ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरींना मान्यता देण्यात आलेली नसणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यावर्षीच्या कृती आराखड्यात चिखली विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातून शेतकऱ्यांनी विहीर व गोठ्यांची मागणी केलेली असणे, कृती आराखडा मंजूर असतानासुद्धा आणि कृती आराखड्यात शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात सिंचन विहिरींचे परिपूर्ण प्रस्ताव सादर होऊनही विहिरींना मान्यता | श्रीमती श्वेता महाले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | मिळालेली नसणे, पंतप्रधान नरेगाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये देत असतांना जिल्हा प्रशासन व वरिष्ठ भु-वैज्ञानिक यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना विहिरीचा लाभ मिळणे, तसेच अतिवृष्टीमध्ये गाळाने भरलेल्या, खचलेल्या विहिरीच्या दुरुस्तीला सुद्धा मान्यता न देणे, इतर राज्यांनी मग्रारोहयोच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या निधीतून अनेक विकास कामे पूर्ण करून आपापला विकास साधलेला असणे, MREGS चा निधी उपलब्ध असताना आणि शेकडो कामे करणे शक्य असतांना ही प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मग्रारोहयोची कामे न होणे, तसेच प्रत्येक गावात मजूर उपलब्ध असून आणि त्यांच्या हाताला काम नाही तरी सुद्धा प्रशासन मजुरांना कामे न देणे, भुजल सर्वेक्षण विभागाने लक्षांक दिला नसल्याचे कारण देऊन विहिरींना मान्यता न देणे, परंतु बुलढाणा भुजल सर्वेक्षण विभागाने दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी उद्दिष्ट दिलेले असतानाही अद्याप कोणत्याही विहिरीस मान्यता न मिळणे, काही प्रमाणात गोठ्याच्या कामास मान्यता दिलेली आहे, परंतु प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नसणे, अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय कारभारामुळे विहिरींना मान्यता मिळत नसल्याने दोषींवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच तातडीने विहिरींना मान्यता देण्याची होणारी मागणी, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४४८) | "मनरेगा अंतर्गत धुळे जिल्ह्यात मागील पाच वर्षात असलेले विहीरींचे उदिष्ट तालुका निहाय देण्यात आलेले असणे, साक्री तालुक्यात या योजनेत दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येणे, आतापर्यंत तालुक्यात किती विहीरींचे प्रस्ताव प्राप्त झाले व त्यापैकी किती विहीरींचे प्रस्ताव मंजूर करून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले याबाबत माहिती उपलब्ध करूण देण्यात न येणे, तसेच अनेक लाभार्थींना पहिला व अंतिम हप्ता देण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदर योजनेचे उदिष्ट हे केवळ कागदावरच असल्याचे स्पष्ट होणे, शासनाने यासंदर्भात तात्काळ चौकशी करून साक्री तालुक्यासह धुळे जिल्ह्यातील विहीरींचे उदिष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने केलेली वा करावयाची कार्यवाही." | श्रीमती मंजुळा गावीत वि. स. स. | कित्ता |
| (४४९) | "धुळे तालुक्यात सिंचन विहिरीचा लाभ मिळवून देण्याच्या बहाना करत शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करणारे रॅकेट सक्रिय झाले असल्याचे निदर्शनास येणे, शासनाकडून जिल्ह्यासाठी सिंचन विहिरींचे कोणते उद्दिष्ट प्राप्त नसताना शेतकऱ्यांना अर्ज विक्री होत असल्याच्या तक्रारी स्वतः शेतकऱ्यांनीच प्रशासनाकडे केलेल्या | श्री. कुणाल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | असणे, विहित अर्जाचा कुठलाही शासकीय नमुना अस्तित्वात नसताना धुळे व साक्री तालुक्यात बनावट अर्ज छापले कुणी ? असा प्रश्न शेतकरी बांधव उपस्थित करीत असणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून मागेल त्याला सिंचन, विहिरीचा लाभ देण्याची योजना शासनाने हाती घेतल्यानंतर सन २०१६-१७ मध्ये सिंचन विहिरींसाठी तीन लाख रुपये प्रति लाभार्थी लाभ दिला गेला, दिनांक ४ नोव्हेंबर, २०२२ ला सुधारित शासन निर्णय प्रसारित करुण सिंचन विहिरींच्या अनुदानात चार लाख रुपयांची वाढ करत पात्र शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज सादर करण्याचा सूचना केल्या जाणे, पण शासनाचे ऑनलाइन पोर्टल सुरू न झाल्याने पूर्वीच्या पद्धतीने ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करून ग्रामसभेत लाभार्थीची निवड करणे आवश्यक असणे, असे असतांना धुळे तालुक्यात सिंचन विहिरींच्या नावाने शेतकऱ्यांच्या आर्थिक लूट करणारे रॅकेट सक्रिय झाले असून त्यांच्याकडून १००० सिंचन विहिरींचा लक्षांक मिळाल्याची अफवा पसरवण्यात आलेली असणे, पंचायत समितीच्या माध्यमातून जिल्हापरिषद सदस्यांना २० आणि पंचायत समिती सदस्यांना २० अर्ज देण्यात आलेले असणे, या छापील अर्जावर जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांकडून शिक्का मारून शेतकऱ्यांना अर्ज विक्री केले जात असून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असणे, सिंचन विहिरींसाठी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानात अनेक वाटेकरी तयार झालेले असून शेतकऱ्यांना अर्ज उपलब्ध करून देण्याच्या बदल्यात ३५ ते ४० टक्के घेतले जात असून शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार टक्केवारीत पंचायत समितीतील काही अधिकारी, अभियंत्यांसह, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या काही सदस्यांचा देखील वाटा असल्याची माहिती निदर्शनास येणे, सदर बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४५०) | "कर्जत तालुका जिल्हा अहमदनगर येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याच्या दृष्टीने मोजे पाटेगाव व खंडाळा येथील सहाशे वीस हेक्टर क्षेत्राची सह मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन यांचे अध्यक्षतेखाली भूमी निवड समिती मार्फत दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी स्थळ पाहणी करण्यात आलेली असणे प्रादेशिक अधिकारी नाशिक यांनी दिनांक १५ मार्च, २०२२ च्या पत्रांवर स्थळ पाहणे अंतिम भू निवड समितीने दिलेल्या सूचनेनुसार ड्रोन सर्वे करून नकाशा नुसार क्षेत्र प्रस्तावित करणे तत्कालीन मंत्री यांच्या साप्ताहिक आढावा | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | व विशेष आढावा बैठकीत सदर प्रस्तावास प्रकरण ६ व खंड (२) तरतुदी लागू करण्यास औद्योगिक विकास मंडळाने प्रस्तावित करणे त्या अनुषंगाने कर्जत येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास उच्च अधिकार समितीने तत्वतः मान्यता देणे तथापि अद्यापही सदर औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना विभागामार्फत पारित न होणे परिणामी महाराष्ट्र राज्यात उद्योग येण्यास इच्छुक असताना त्यांना औद्योगिक क्षेत्र उपलब्ध न होणे स्थानिक नागरिकांना रोजगार न उपलब्ध होणे परिणामी कर्जत व जामखेड तालुक्यासह जिल्ह्यात नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे कर्जत औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना होऊन उद्योग स्थापन होणे करिता शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४५१) | "अहमदनगर एम.आ.डी.सी. तील भूखंड क्रमांक RH-६२ निवासी जागेकरीता राखीव भुखंड लाभार्थ्याला वितरीत करण्याचे काढलेले आदेश, लाभाच्यांने सर्व कागदपत्रांची पुर्तता करून भूखंडाच्या किमतीचा एम.आ.डी.सी. कडे केलेला भरणा देकार पत्र देऊनही एम.आ.डी.सी. ने अचानकपणे उक्त भुखंडाऐवजी निवासासाठी योग्य नसलेला भूखंड क्र. RL१३ या भुखंडाचे केलेले वाटप, सदरचा भूखंड निवासासाठी योग्य नसल्याने भुखंड बदलून देण्यात यावा अशी वेळोवेळी आणि वारंवार प्रादेशिक कार्यालय पुणे, नाशिक तसेच मंत्रालयीन सचिव आणि मा. उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी केलेली लेखी मागणी, एम.आय.डी.सी. ने पुन्हा निवासी भुखंडाचे वाटप करताना प्रतिक्षा यादीवरील लाभार्थ्यांना प्रथम भुखंड मिळणे मान्यताप्राप्त असताना त्यांना डावलून इतर लाभार्थ्यांना केलेले वाटप, परिणामी लाभार्थ्यांमध्ये एम.आ.डी.सी. विरुद्ध पसरलेला असंतोष, लाभार्थ्यांने नियमानुसार भूखंडाचा वाटप केल्यास माहे फेब्रुवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात आंदोलन करण्याचा आणि आत्मदहनाचा दिलेला इशारा, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अमित झनक, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे वि. स. स. | कित्ता |
| (४५२) | "मुंबईतील अंधेरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येणारी पॉकेट क्र ६ ही मिळकत मेसर्स हबटाऊन लि. यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास करण्याकरिता हस्तांतरित केलेली असणे, सदर विकासकाने सदर भूखंडावर विक्रीकरिता इमारतीचे प्राधिकरणाने ४ वर्षापूर्वी बांधकाम थांबविण्याची दिलेली नोटिस, सदर नोटिसाला न जुमानता इमारतीचे | श्रीमती ऋतुजा लटके वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | पूर्ण केलेले बांधकाम, तसेच ताबा प्रमाणपत्रही न घेता तळमजल्यावरील योजनेतील लोकांना द्यावयाचे २४ व्यावसायिक गाळे हे योजनेशी संबंधित नसलेल्या लोकांना परस्पर विक्री केलेले असणे, सदर गाळे विक्री झाल्याबाबत माहिती संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना असतांनाही त्यांनी कोणतीच कारवाई न होणे, तसेच मुंबई शहरामध्ये वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष हे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त असून मुंबई शहरात कोणतेही वृक्ष छाटणे किंवा स्थलांतरीत करणे याकरिता सर्व प्राधिकरणांना मुंबई वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी घेणे आवश्यक असतांनाही ती न घेता वृक्ष तोड करणे, सदर प्रकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक ५ मे, २०२२ रोजी उपअभियंता, मरोळ उपविभाग, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व) यांच्याकडे तक्रार करणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व या गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| (४५३) | "राज्यात नाशिकच्या उद्योजकाकडून मागील दोन वर्षापासून वसूल करण्यात येत असलेल्या दुहेरी फायर सेस तात्काळ बंद करण्याचे निर्देश मा. उद्योग मंत्री महोदयांनी माहे डिसेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास देणे, नाशिक जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर मा.उद्योग मंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक होऊन विविध समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन उद्योग मंत्री महोदयांनी देऊन दोन महिन्याचा कालावधी होऊन गेला तरी या बैठकीत दिलेल्या आश्वासनाची प्रशासनाने अद्याप पर्यंत अंमलबजावणी न केल्याने नाशिक येथील उद्योजक आर्थिक अडचणीत येत असणे, अंबडचे फायर स्टेशन महापालिकेकडे हस्तांतरित करणे आठवड्याभरात पोलीस स्टेशन सुरू करणे, पावर प्रोजेक्ट वगळता इतर जमीन परत घेण्यासाठी कायदेशीर बाबी तपासण्याचे निर्देश देणे, बंद जकात नाक्याजवळ औद्योगिक वसाहतीत सीईटीपी प्रकल्प उभारणे, सोलार धोरण कायम ठेवावे, चांगल्या वीज पुरवठ्यासाठी महावितरण सुविधा द्याव्यात, सातपूर अंबड मध्ये ड्रेनेजसाठी अमृत दोन योजनेतून पालिकेने प्रस्ताव द्यावा, वर्गणीला पायबंध घालणारे निर्भया धोरण राबविण्यात यावे, आधी मागण्यांचा वापर झालेला असणे, त्याचबरोबर मा.उद्योग मंत्री महोदया बरोबर झालेल्या बैठकीत इतर मागण्यांच्या ही तात्काळ मंजूर करून उद्योजकांना दुहेरी फायर सेस पासून मुक्ती देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्रीमती सीमा हिरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (४५४) | "महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने मौजे-सावली, (तालुका जिल्हा ठाणे) येथील भूखंड क्र. २२, २३ व २४ महसूल सर्वे नंबर ३५ ते ४६, ५७ ते ६४, ७३, ७७, ११० ते ११३ व १२० ते १२९ या ९५ एकर ०२ गुंठे जमिनीचे दि. ०६/०६/१९६६ रोजी भूसंपादन करणे, संरक्षित कुळ यांना जाणीव पूर्वक डावलून कै. नागीनचंद शहा यांचा मालकी हक्क दाखवत कायद्यामध्ये तरतूद नसताना जमीन संपादनाच्या बदल्यात त्यांना भूखंड प्राप्त करून दिला जाणे, यामुळे मुळ जमीन मालक असलेल्या संरक्षित कुळाला मोबदला मिळल्या पासून वंचित राहावे लागणे, कुळाच्या संदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि. १०/०८/१९९६ च्या पत्राकडे तसेच मा. उच्च न्यायालयातील WRIT क्र.WP ९५३६/२०१८ या WRIT मुळे निर्माण झालेल्या न्याय प्रवाष्ठातेकडे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाणे, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ कुळांच्या संदर्भात सक्षम प्राधिकरण नसतानाही, सदर प्रश्न महसूल विभागाकडे प्रलंबित असताना परस्पर निर्णय घेतले जाणे, तसेच सदर भूखंडासंदर्भात ULC प्रक्रिया पूर्ण करणेकरिता महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांनी नगरविकास यांचा अहवाल न घेता परस्पर निर्णय घेतला जाणे, यामुळे १००% प्रिमियम आकारण्याचा शासनाचा दि.२३/११/२००७ रोजीचा शासन निर्णयाचे उल्लंघन होणे, या सर्व बाबींलक्षात घेता तत्कालीन उद्योग मंत्री यांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या भु संपादनास व हस्तांतरणास दि.०५/०३/२०१८ रोजी स्थगिती देऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश देणे, वरील सर्व वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करत त्याच बरोबर कै. नागीनचंद शहा हे दोषी असल्याचा संबधित चौकशीतून आलेल्या अहवालाकडे दुर्लक्ष केले जाणे, तत्कालीन उद्योग मंत्री यांनी कै. नागीनचंद शहा यांच्या वारसांच्या क्षतीपूर्ती व बंधपत्र घेण्याच्या अटीवर त्यांनीच दिलेली स्थगिती चे आदेश रद्द करणे, सदर भूखंडाचे संपादन करणे व सदर भूखंडाच्या बदल्यात कै. नागीनचंद शहा यांच्या वारसांना अतिरिक्त भूखंड देणे व त्यावर विकासकामाची परवानगी / नाहरकतची कार्यवाही करणे, तत्कालीन उद्योग मंत्री यांनी सदर स्थगिती उठवल्याने संरक्षित कुळ यांच्यावर अन्याय करत दोषींना पाठीशी घातले जात असल्याने त्यांनी केलेल्या कार्यवाहीमुळे शासनाचा महसूल बुडलेला असणे, यामुळे सदर प्रकरणी चौकशी होऊन कार्यवाही होण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व कार्यवाही." | डॉ. बालाजी किणीकर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (४५५) | "श्री. नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक तथा उप जिल्हाधिकारी या पदावर दिनांक २२/१/२०२० पासून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणे,श्री. नितीन गवळी, यांची त्यानुसार शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन आदेश क्र. आयडीसी-२०२०/प्र.क्र. ४३ / उद्योग-१४, दिनांक २३/१/२०२० अन्वये श्री. नितीन गवळी यांची प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक या पदावर प्रथमतः १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली असणे, सदर नियुक्ती दिनांक २१/१/२०२१ रोजी संपुष्टात आली असणे, परंतु करोना महामारीच्या पार्श्वभुमीवर औद्योगिक विकासांची कामे सुयोग्यरित्या होण्यासाठी श्री. गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक यांच्या सेवांची शासनास आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तत्कालीन शासनाने दिनांक २२/१/२०२१ पासून पुढील १ वर्षाकरिता म्हणजेच दिनांक २१/१/२०२२ पर्यंत तसेच शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन आदेश क्र.आयडीसी- २०२०/प्र. क्र. ४३ / उद्योग-१४, दिनांक ९/३/२०२२ च्या शासन आदेशान्वये श्री नितीन गवळी यांच्या प्रतिनियुक्तीस दिनांक २३/१/२०२२ पासून पुढील दोन वर्ष म्हणजेच दिनांक २२/१/२०२४ पर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेली असल्याचे संदर्भीय आदेशात नमूद असणे, उपरोक्तप्रमाणे श्री. नितीन गवळी, उप जिल्हाधिकारी यांचे नियुक्तीबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने आदेश निर्गमित केले असणे, परंतु सदर मुदतवाढीस महसूल व वन विभागाची मान्यता घेण्यात आलेली नसणे, उद्योग व्यवसायात वाढ होण्याकरता सदर अधिकारी असताना प्रत्यक्षात मात्र मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैव्यवहार करून उद्योजकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, यामुळे सदर उद्योजकांमध्ये शासनाबद्दल असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, याकरीता शासनाने श्री.नितीन गवळी, उप जिल्हाधिकारी यांची चुकीच्या पद्धतीने झालेली प्रतिनियुक्ती त्वरित रद्द करून करावयाची कारवाई." | श्री. समाधान अवताडे, वि. स. स. | कित्ता |
| (४५६) | "देशात पर्यायाने राज्यात रक्तदानाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रक्त पेढ्यांमध्ये रक्त संकलित करून गरजू रुग्णांना दिले जाणे, मात्र याच रक्त साठ्यातून रुग्णांना रक्त संक्रमित करतेवेळी बाधित रक्ताचा पुरवठा झाल्याने संसर्ग रोगाच्या अनेक घटना घडल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर येथे एका गरीब शेतकरी कुटुंबातील बालिकेला रक्त संक्रमित करताना एच.आय.व्ही. रोगाचा | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री.योगेश सागर, | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | संसर्ग झाल्याचे उघडकीस येणे, नागपूर मध्ये थालेसेमियाच्या ४ रुग्णांना माहे मे, २०२२ मध्ये एच.आय. व्ही.ची लागण होणे, त्याकरिता केंद्र शासनाच्या माध्यमातून आरोग्य विभागाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत या गोष्टीवर प्रतिबंधक उपाय करण्याकरिता केंद्र शासनाने अमरावती जिल्ह्यातील नेट चाचणीचा पायलट प्रोजेक्ट राबविणे, त्याकरिता सन २०२१-२२ करिता केंद्र शासनाने ९७ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून देणे, परंतु राज्य शासनाच्या आरोग्य विभागातील अमरावती जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या अटी व शर्तीनुसार आपल्या मर्जीतील ठेकेदाराला निविदा लागणार नाहीत हे लक्षात आल्यानंतर हा प्रकल्प रद्द करून या प्रकल्पाची गरज नसल्याचे सांगण्यात येणे, केंद्र सरकार पायलट प्रोजेक्ट राबविण्याकरिता पैसे देत असताना राज्यातील सरकारी बाबूंच्या निष्क्रियतेमुळे व उदासिनतेमुळे राज्याचे नुकसान होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. किसन कथोरे, श्री.प्रशांत ठाकूर, श्री. कुमार आयलानी, डॉ.बालाजी किणीकर, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अबू आजमी, वि. स. स. | |
| (४५७) | "राज्याच्या आरोग्य विभागात तज्ज्ञ डॉक्टर व परिचारिकांची हजारो पदे रिक्त असल्याने सर्वसामान्य रुग्णांना दिली जाणारी आरोग्य सेवा अपुरी पडत असल्याचे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, आरोग्य संचालक, अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उप संचालकांसह आरोग्य विभागातील डॉक्टरांसह अन्य श्रेणीतील तब्बल १७०५१ पदे रिक्त असणे, राज्याच्या आरोग्य विभागात आरोग्य खात्याची ५२७ रुग्णालये असून ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्याची काळजी घेण्यासाठी १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्रे तर १०,६६८ उपकेंद्रे असणे, याकरीता आवश्यक डॉक्टरांची तसेच विशेषतज्ज्ञांची हंगामी पदे भरण्यासाठी वेळोवेळी जाहिरात देऊनही डॉक्टर मिळत नसणे, यामागे ग्रामीण व दुर्गम भागातील डॉक्टरांना पुरेसे मानधन मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, सदरहू रिक्त पदे तात्काळ भरून रुग्णांना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. संजय केळकर, श्री. बंटी भांगडिया, श्री. विनोद निकोले, श्री. मंगेश चव्हाण, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर, श्री. मिहीर कोटेचा, श्री. पराग शाह, श्री. गणपत गायकवाड, श्रीमती श्वेता महाले, ॲड. राहूल कुल, वि. स. स. | कित्ता |
| (४५८) | "बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजने अंतर्गत रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास रुग्णाला ७२ तास मोफत औषधोपचार करण्याचा निर्णय होऊनही अद्यापावेतो त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, तसेच, या योजने अंतर्गत एकूण ७४ प्रकारच्या उपचार प्रक्रियांसाठी | श्री. अतुल भातखळकर, श्री. दिलीपराव बनकर, श्री. दिपक चव्हाण, श्री. हसन मुश्रीफ, श्री. बाळासाहेब पाटील, | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | ३० हजार रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले असणे, परंतु, अद्याप पर्यंत योजनेची अंमलबजावणी न होणे, त्यामुळे, ही योजना प्रत्यक्षात सुरु करून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. दिलीप मोहिते-पाटील, श्रीमती सरोज आहिरे, श्री. बाळासाहेब आजबे, श्री.शेखर निकम, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.चेतन तुपे, श्री.मंगेश चव्हाण, श्री. गणपत गायकवाड, श्री. कुमार आयलानी, डॉ. किरण लहामटे, श्री. पृथ्वीराज चव्हाण,श्री. संजय बनसोडे, डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. सुनील राणे, वि. स. स. | |
| (४५९) | "मुंबईसह राज्यामध्ये गोवरचा उद्रेक झाल्यानंतर रुग्णांचे तातडीने निदान व्हावे यासाठी राज्यात निदान प्रयोगशाळा उभ्या करण्याच्या सूचना गोवर राज्य कृती दलाने दिल्या असणे, मात्र तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, गोवरचा उद्रेक आटोक्यात आणण्यासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गोवर राज्य कृती दलाची स्थापना करणे, कृती दलाने तातडीने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेणे त्यामुळे शासनाने तातडीने निदान प्रयोग शाळा उभ्या करण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया." | ॲड. आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री.किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. बंटी भांगडिया, श्री. सुभाष धोटे, श्री. संजय केळकर, श्री. विनोद निकोले, श्री. मंगेश चव्हाण,श्री. योगेश सागर,श्री. अतुल भातखळकर,श्री. गणपत गायकवाड, श्री. संतोष दानवे,श्रीमती श्वेता महाले, वि. स. स. | कित्ता |
| (४६०) | "ठाणे जिल्ह्यामध्ये चार हजारांवर मुले शाळाबाह्य असल्याचे आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणामधून माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, ग्रामीण, शहरी आणि मनपा विभागातील शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार तथा शस्त्रक्रिया करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत 'जागरूक पालक, सुदृढ बालक' अभियान राबविण्यात येत असणे, | श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील,डॉ. जितेंद्र आव्हाड, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | या अभियानांतर्गत जिल्हा स्तरावर केलेल्या सूक्ष्म कृती आराखड्यात ग्रामीण भागात ६ ते १८ या वयोगटात ४ हजार २६९ बालके ही शाळाबाह्य असल्याची बाब समोर आली असणे,जिल्ह्याच्या शिक्षण विभागाने जून महिन्यात केलेल्या सर्वेक्षणानुसार एकही विद्यार्थी शाळाबाह्य नसल्याचे सांगितले असणे, त्यामुळे आरोग्य विभागाने केलेले सर्वेक्षण नेमके कधीचे आहे आणि कोणते सर्वेक्षण खरे आहे असा प्रश्न उभा राहिला असणे, मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील ० ते १८ या वयोगटातील बालकांच्या आरोग्य तपासणीला सुरुवात झाली असणे, या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा, अंध-दिव्यांग शाळा, अंगणवाड्या, बालगृह बालसुधार गृहे, अनाथालये, समाजकल्याण व आदिवासी विभाग वसतिगृहे, खाजगी नर्सरी, बालवाड्या, खासगी शाळा आणि खासगी कनिष्ठ महाविद्यालये तसेच शाळाबाह्य अशा ० ते १८ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींची आरोग्य तपासणी होणार असणे, या तपासणी दरम्यान आजारी आढळलेल्या बालकांवर त्वरित उपचार आणि संदर्भ सेवा पुरविण्यात येणार असणे,जागरूक पालक, सुदृढ बालक अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील ० ते १८ या वयोगटातील जवळपास ४ लाख ९३ हजार ८३४ बालकांची तपासणी केली जाणार असणे, त्यामध्ये १ लाख ५५ हजार ७०० बालक हे ० ते सहा वयोगटातील असून उर्वरित ३ लाख ३८ हजार १३४ बालक हे सहा ते १८ वयोगटातील असणे, शालेय शिक्षण विभागाकडून केल्या जाणाऱ्या सर्व्हे मध्ये मात्र शाळाबाह्य मुलांची आकडेवारी लपविण्यात येत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४६१) | "राज्याच्या विविध भागात सुमारे १ लाख ६९ हजार पेक्षा जास्त रुग्णांमध्ये सिकलसेल, ॲनेमियासारख्या दुर्धर आजार असल्याची गंभीर माहिती दि. २ फेब्रुवारी,२०२३ रोजी उघडकीस येणे, नंदूरबार, धडगावसह विदर्भातील दूर्गम भागात या आजाराचे सर्वाधिक रुग्ण असणे, सिकलसेलचे निदान होण्यासाठी ज्या प्रगत चाचण्या कराव्या लागतात त्या सरकारी रुग्णालयामध्ये होत नसणे, त्यामुळे दुर्गम भागातील नागरीकांना ४० ते ५० किलोमीटर पायपीट करुन शहरामध्ये धाव घ्यावी लागत असणे, तर काही चाचण्यांसाठी मुंबईकडे जावे लागत असणे, त्यामुळे या आजाराच्या रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसणे, देशपातळीवरील सिकलसेलच्या एकूण रुग्णसंख्येपैकी सुमारे ३० टक्के रुग्ण महाराष्ट्रात असल्याची चिंताजनक माहिती | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील,श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे, श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | उघडकीस येणे, या आजाराच्या निर्मूलनासाठी शासनाकडून आवश्यक उपाययोजना केल्या जात नसणे व दुर्लक्षपणामुळे पर्यायाने सदरची परिस्थिती अधिकच गंभीर बनत चाललेली असणे, मुलांमधील स्वमग्नता आजारासारखेच सिकलसेल आजारामुळे पुढील काळात परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता असणे, त्यामुळे सदर प्रकरणी युध्दपातळीवर उपाययोजना करणे नितांत गरजेचे असणे, या आजारांच्या निर्मूलनासाठी आवश्यक उपाययोजना करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, स्वमग्नता व सिकलसेल या आजारांचे निदान व उपचारासाठी सर्व सरकारी आरोग्य केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष,संताप तसेच चिडीची भावना, स्वमग्नता,सिकलसेल सारख्या आजारांचे वेळेत निदान होत नसणे व निदान झाल्यानंतर ग्रामीण, निमशहरी भागातील रुग्णांना कोणत्याही प्रकारची सुविधा मिळत नसल्याने चिंताजनक परिस्थितीमध्ये भर पडलेली असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन सदरबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (४६२) | “राज्य शासनाने वर्ग तीन व चारच्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी बक्षी समिती नियुक्त करून या समितीच्या अहवालानुसार वेतनश्रेणी लागू करण्याची प्रक्रिया सुरू केलेली असणे, या समितीच्या खंड दोनमध्ये विशिष्ट संवर्गातील कर्मचाऱ्यांनाच सुधारित वेतनश्रेणी लागू केल्याचा संशय व्यक्त करत राज्यातील ४५०० हून अधिक औषधनिर्माण अधिकाऱ्यांनी मोठा अन्याय झाल्याची तक्रार केली असून ते आंदोलनाच्या पवित्र्यात असणे, औषधनिर्माता संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांकडे तक्रार करण्यात आलेली असणे, समितीने काही निवडक संवर्गातीलच कर्मचाऱ्यांनाच सुधारित वेतनश्रेणी लागू केलेली असणे, खंड दोननुसार समान पदांना सुधारित वेतनश्रेणी लागू न केल्याने कर्मचाऱ्यांत अन्यायाची भावना निर्माण झालेली असणे, सातव्या वेतन आयोगानुसार एकाकी पदांच्या वेतनश्रेणीत मोठ्या प्रमाणात वेतन त्रुटी आढळूनही समितीच्या खंड दोनमध्ये या एकाकी पदांचा विचार केलेला नसणे, यामध्ये केवळ वर्ग अ, ब व एस ८ पेक्षा अधिक वेतन असणाऱ्या वर्ग क मधील १०४ | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आलेली असणे, ज्या पदांच्या वेतनश्रेणीत त्रुटी होत्या अशा पदांचा विचारही समितीने केलेला नसणे, त्यामुळे या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४६३) | "मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टरांनी एका रुग्णाच्या नातेवाईकालाच कोणताही अनुभव नसताना रुग्णाच्या पोटातील पाणी काढायला लावल्याचा गंभीर प्रकार दि.२.२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, भायखळा येथे राहणाऱ्या आत्माराम जाधव या रुग्णास पोटाचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी नायर रुग्णालयात दाखल करण्यात येणे, डोळे पिवळसर व पोट फुगलेल्या अवस्थेत असणाऱ्या रुग्णाला तेथील डॉक्टरांनी लिव्हर खराब झाले असून पाणी काढावे लागेल, असे सांगण्यात येणे, सुरुवातील इंजक्शनने तात्पुरत्या स्वरुपात पाणी काढण्यात येणे, सदरहू पाणी इंजेक्शनने कसे काढावे हे त्या रुग्णाच्या मुलाला डॉक्टराने दाखवून देणे, त्यानुसार मुलाने इंजेक्शनद्वारे पाणी काढण्याची कार्यवाही करण्यात येणे, यासंदर्भात आरोग्य संघटनेने सदरहू डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी रुग्णालयाच्या अधिष्ठाताकडे करण्यात येऊनही अद्याप सदरहू डॉक्टरांविरुद्ध शासन तथा पालिका प्रशासनाने कोणतीच कारवाई न करणे, शिवाय सदरहू आजारग्रस्त रुग्णावर आवश्यकते औषधोपचार सुविधा उपलब्ध करुन देण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे रुग्णाची किडणी खराब होऊन रुग्णाच्या जिवीतास निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. | कित्ता |
| (४६४) | "दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी मनोर ग्रामीण रुग्णालय, जिल्हा पालघर येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवेच्या अपूऱ्या सोयी-सुविधांअभावी आदिवासी गरोदर मातेचा बाळासह मृत्यू घडल्याचा दुर्दैवी व धक्कादायक प्रकार, सदर गरीब आदिवासी महिलेला सहा तासांपेक्षा अधिक वेळ दाखल करुन घेऊनही सिझेरियन प्रसुती शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टर उपलब्ध नसणे, सदर महिलेस आयत्या वेळेस रुग्णवाहिकेतून सिल्वासा येथील रुग्णालयात हलविताना वाटेतच गरोदर महिलेचा बाळासह मृत्यू होणे, महिलेच्या गंभीर परिस्थितीची जाणीव करुन देऊनही रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी व लिपिक यांनी उद्धट व मनमानी गैरवर्तन करणे, सर्वात जास्त रुग्णसंख्या असलेल्या मनोर ग्रामीण रुग्णालयातील | श्री. राजेश पाटील,श्री. क्षितीज ठाकूर, श्री. हितेंद्र ठाकूर,श्री. विनोद निकोले, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | अस्वच्छता, बंद पडलेल्या मशिनरी, अपूरा सेवकवर्ग, रुग्णालयाच्या इमारतीची झालेली दुरवस्था इ. बाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी करुनही कोणतीही सुधारणा न होणे, परिणामी गरोदर माता, नवजात बालके, आजारी आदिवासी व बिगर आदिवासी रुग्ण यांच्या जीविताचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, परिणामी संपूर्ण पालघर जिल्ह्यातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना लक्षात घेऊन शासनाने याची गंभीर दखल घेऊन पालघर या आदिवासीबहुल जिल्ह्यातील मनोर ग्रामीण रुग्णालयासह इतर ठिकाणच्या आरोग्य यंत्रणेत शीघ्रतेने सुधारणा करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४६५) | "कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यात मलकापूर हे अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील व कोल्हापूर रत्नागिरी रस्त्यावर वसलेले व मोठी बाजारपेठ असलेले शहर असणे, तसेच रत्नागिरी-नागपूर हायवे मलकापूर शहरावरून जात असणे, सदर हायवेवर अपघात होत असणे, रत्नागिरी व कोल्हापूर यांच्यामध्ये मोठी दुर्घटना घडल्यास कोणताही दवाखाना नसणे, त्यामुळे अनेक लोक वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्यामुळे त्यांचे निधन झालेले असणे, तसेच जंगलाचा परिसर असल्यामुळे सर्पदंश आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडत असणे, त्यांना सुद्धा वेळेत उपचार तेथे मिळत नसणे, त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयासाठी लोकसंख्येची जी अट आहे त्याचा विचार न करता या विशिष्ट पार्श्वभूमीवर उपजिल्हा रुग्णालय देण्याची गरज असणे, मलकापूरच्या १० किलोमीटर परिघांमध्ये ६० ते ६५ खेडी असणे, मलकापूर शहरासह आजूबाजूच्या खेड्यांमधील लोकसंख्या वाढल्याने सध्याचे ग्रामीण रुग्णालय, मलकापूर आरोग्य सेवा देण्यासाठी अपुरे पडत असणे, अत्यवस्थ रुग्णांना जिल्हा रुग्णालयांमध्ये हलविण्यासाठी सध्या ७० ते ८० किलोमीटर अंतर जाते वेळेस रुग्ण दगावण्याची शक्यता असणे, मलकापूर सारख्या अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील शहरात उपजिल्हा दर्जाचे रुग्णालय नसणे, त्यामुळे सदर शहर व आजूबाजूच्या खेड्यातील रुग्णांना अति तातडीची आरोग्य सेवा मिळण्यासाठी बऱ्याच अडचणी असणे, त्यामुळे सध्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे काळानुरूप श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करणे गरजेचे असणे, सध्या अपघातातील रुग्ण, प्रसूतीपूर्व माता, गंभीर आजारी रुग्ण यांना तातडीची आरोग्य सेवा मिळण्यासाठी अडचणी असणे, त्यामुळे सदर विभागातील नागरिकांची चांगली शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करण्याबाबतची मागणी असणे, याबाबत होत असलेल्या दिरंगाईमुळे त्यांच्यामध्ये पसरलेले | डॉ. विनय कोरे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | नैराश्यचे वातावरण अशाप्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची व सध्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (४६६) | “मुंबई शहरात माहे ऑक्टोबर, २०२२ ते माहे जानेवारी, २०२३ या दरम्यान गोवरच्या संसर्गामुळे १५ बालकांचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, महानगरातील एम पूर्व विभागात या संसर्गाचा अधिक धोका निर्माण झाला असणे, त्यामध्ये, मृत्यू विश्लेषण समितीने केलेल्या विश्लेषणातून कुपोषण, श्वसनविकार, संसर्ग, न्युमोनिया, ताप ही लक्षणे गोवर संसर्ग झालेल्या बालकांमध्ये तीव्रतेने दिसून आली असणे, त्यामुळे, गोवर प्रभावित वस्तीमध्ये गोवर लसीकरणाचे सर्वेक्षण करण्याची गरज असणे, तसेच, गोवरचा प्रसार रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम राबविण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. अतुल भातखळकर, वि. स. स. | कित्ता |
| (४६७) | “स्त्रियांमध्ये आढळुन येणाऱ्या कर्करोगामध्ये गर्भाशयमुखाचा कर्करोग क्रमांक २ वर असणे, दरवर्षी भारतात जवळपास १ लाख २५ हजार नवीन केसेसची नोंद होणे व त्यापैकी जवळपास ७० हजार स्त्रियांचे मृत्यू होणे, म्हणजे कोरोनाच्या बरोबरीने महिलांचा दरवर्षी मृत्यू होत असणे, या कॅन्सरचे मुख्य कारण आहे HPV [ Human Papilloma Virus] या विषाणूंपैकी ८०% सर्व्हायकल कॅन्सर हे HPV १६/१८ याने होणे, या कॅन्सर वर लस उपलब्ध असून जगात मागील १४ वर्षांपासून आतापर्यंत ३५० दशलक्ष व भारतात जवळपास ५ कोटी स्त्रियांनी ही लस घेतलेली असणे, ही लस पूर्णतः सुरक्षित असणे, ही लस १०० % प्रतिबंधक तरी HPV १६/१८ द्वारे होणाऱ्या गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून सर्वोत्तम संरक्षक लस असणे, खुल्या बाजारात या लसीची किंमत ३ हजारा पेक्षा जास्त असल्याने सर्वसामान्य महिलांना परवडत नसणे, त्यामुळे ही लस शासकीय स्तरावर मोफत उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणात या कर्करोगाने महिलांचा होणारा मृत्यू दर रोखल्या जाणे, त्यामुळे गर्भाशयमुखाचा कर्करोग Cervical Cancer वर आळा घालण्यासाठी ही लस मोफत उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.” | श्रीमती श्वेता महाले, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४६८) | “माहे नोव्हेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, पुणे शहरातील सर्वात जुने धर्मादाय रुग्णालय म्हणून शासनाकडून अनेक सवलती घेऊन सुरु असलेले रुबी हॉल क्लिनीक हे धर्मादाय नोंदणीकृत असूनही शासनाच्या कोणत्याही नियमांचे पालन या क्लिनीक तर्फे होत नसल्याची गंभीर तक्रार दाखल होणे, रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर लाक्षणीक उपोषण, आंदोलन सुरु करुन केली असल्याची बाब उघडकीस येणे, गेल्या अनेक वर्षापासून या रुग्णालयात बेकायदेशीररित्या किडनी ट्रान्सप्लान्टच्या शस्त्रक्रिया करण्यात येत असून या रुग्णालयाच्या गैरकारभाराबद्दल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात वारंवार चर्चा होणे, सात ते आठ महिन्यांपूर्वी बेकायदेशीर किडनी ट्रान्सप्लान्ट विरोधात पोलीसांत दाखल झालेल्या तक्रारी, शासन नियमांचे कोणतेही पालन या रुग्णालयाचे व्यवस्थापन करीत नसल्याने सोशल ऑडिट, स्ट्रक्चरल ऑडिट तसेच बेकायदेशीररित्या घडलेल्या व उघडकीस आलेल्या किडनी ट्रान्सप्लान्टच्या असंख्य घटना, यामुळे या रुग्णालयाच्या कारभाराची चौकशी एसआयटी मार्फत तसेच पोलीसांच्या आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागा मार्फत तातडीने सुरु करण्यात यावी अशी पुणे शहर व जिल्ह्यातील हजारो रुग्णांची राज्य शासनाकडे होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | श्री. निलेश लंके, वि. स. स. | कित्ता |
| (४६९) | “कराड तालुक्यामध्ये सामान्य व गोर-गरीब जनतेच्या आरोग्य सेवेकरिता स्व. सौ. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय हे वैद्यकीय सेवा देत असून जवळच्या इतर तालुक्यातील रुग्णांकरिता सोयीचे रुग्णालय असणे, राष्ट्रीय महामार्ग ४ च्या जवळ असलेल्या (१०० खाटांची व्यवस्था) स्व. सौ. वेणूताई चव्हाण रुग्णालयाने शासन दरबारी २०० खाटांचे रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिटचा प्रस्ताव सादर सन २०१८ मध्ये केला असणे, २०० खाटांच्या रुग्णालय व्यवस्थेसह शासनाकडील सन २०१८ पासून प्रलिंबत ट्रॉमा केअर सेंटरचा प्रस्ताव मंजूर करुन रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि. स. स. | कित्ता |
| (४७०) | “मुंबईतील भांडूप, मुलुंड, विक्रोळी विभागात एकही शासकीय शवविच्छेदन केंद्र नसणे, परिणामी या विभागातील मृत व्यक्तिला शवविच्छेदनासाठी घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात न्यावे लागणे, त्यामुळे मृत व्यक्तिंच्या नातेवाईकांना अनेक अडचणीला तोंड द्यावे लागणे, भांडूप अथवा मुलुंड येथे शवविच्छेदन केंद्र सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुंबई महानगरपालिका व शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे करणे, मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना याबाबत | श्री. रमेश कोरगांवकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | स्वयंस्पष्ट अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश दिलेले असणे, परंतू अद्यापही याबाबत कोणतीच निर्णयात्मक अंमलबजावणी वा कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी भांडूप, मुलंड, विक्रोळी भागातील नागरीकांच्यात वाढतीची चिंतेची व नैराश्याची भावना, शासनाने याबाबत तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन भांडूप अथवा मुलुंड येथे शवविच्छेदन केंद्र सुरु करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४७१) | "वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील पुणे-पंढरपूर पालखी मार्गावरील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरावस्था होणे, त्यामुळे येथे सध्याच्या या केंद्रासाठी सुसज्ज इमारत बांधण्याचा शासनाने निर्णय घेऊन साडेतीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करणे, मात्र शासन निर्णय होऊन व निधी मंजूर होऊन मोठा कालावधी उलटूनही सदर इमारतीचे काम जागेअभावी रखडले असणे, त्यामुळे दर महिन्याला सुमारे २ हजारांवर रुग्ण तपासणी करणाऱ्या या केंद्राला जागा मिळत नसल्याने हा निधी पुन्हा परत जाईल अशी भिती येथील सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होणे, त्यामुळे शासनाने या प्राथमिक आरोग्य केंद्राला तातडीने जागा उपलब्ध करुन देऊन या केंद्राच्या इमारतीचे काम तातडीने सुरु करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, परंतु याबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. संजय जगताप, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. संग्राम थोपटे, श्री. विश्वजित कदम, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, वि. स. स. | कित्ता |
| (४७२) | "महाराष्ट्र राज्यातील समुदाय आरोग्य अधिकारी सी. एच. ओ. यांनी त्या त्या जिल्हापरिषद आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना त्यांच्या अलीकडेच विविध मागण्यांचे निवेदन दिले असणे, त्यामध्ये त्यांच्या बदल्या करण्याचें संबंधी मागण्यांचा समावेश असणे, या अनुषंगाने दिव्यांग ४४% डॉक्टर कुमारी कोमल चंद्रशेखर अग्रवाल समुदाय आरोग्य अधिकारी C.H.O. यांनीही त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अमरावती, जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती तसेच विभागीय आयुक्त, अमरावती यांना त्यांच्या प्रकरणी न्याय मिळवून देन्यासंबंधाने दि.०६/०२/२०२३ रोजी निवेदन व स्थानीक लोकप्रतिनिधींनीही दिले असणे, असे असताना अमरावती विभागीय आयुक्तांनी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ३०३/ २०२३, दि.१५/०२/२०२३ रोजी उप सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवून डॉक्टर कोमल चंद्रशेखर अग्रवाल सी एच व समुदाय आरोग्य अधिकारी | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | यांच्या प्रकरणी तातडीने शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत शासनाचे उपसचिव सा. आरोग्य विभाग यांना व मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती या विभागाचे विशेष कार्य अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक ३६/२०२३/दि.०६/०२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्र धा न सचिव सा. आ. विभाग मंत्रालय मुंबई, आयुक्त राष्ट्रीय आरोग्य मिशन मुम्बई, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, अकोला यांना डॉ. कोमल अगरवाल समुदाय आरोग्य अधिकारी C.H.O. यांचे प्रकरणांची दखल घेऊन न्यायोचित निर्णय घेण्याबाबत कळविले असणे, म्हणून शासनाने उपरोक्त मागणी तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (४७३) | “सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या वेतन तफावतीमध्ये सुधारणा करण्याबाबत तसेच या पदाचा पदश्रूखंलेत बदल करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे शासनाच्या संबंधित विभाग प्रधान सचिव तसेच मुख्य सचिवाकडे मा.आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री वित्त मंत्री,मुख्यमंत्री यांच्या कडे व माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला असूनही दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकाशित केलेला अ बक्षी समितीच्या अहवालामध्ये खंड २ मध्ये वरील मागणी चा समावेश नसल्याचे दिसून येत नसणे, यानंतर राजभवन सचिवालय राज्यपालाचे अवर सचिव (प्रशासन) यांनी उप सचिव सा.आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांना पत्र क्र.५५१४८०६, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्र पाठवून तातडीने निर्णयात्मक आदेश घेण्याबाबत कळविले असणे तसेच मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ५१/२०२३ दिनांक २१/०२/२०२३ रोजी वरील लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार वरील बाबीचा विचार करून विशेष बाब म्हणून सभागृहाला असलेल्या विशेष अधिकारानुसार वरील विषयात होत असलेला पाठपुरावा तरीही बक्षी समितीचे खंड २ मध्ये मागणी मान्य झाली नसणे हि बाब बघता विधिमंडळ सभागृहाने वरीलप्रमाणे मागणी मान्य करण्यासाठी तातडीने निर्णयात्मक आदेश व या संबंधाने शासनाने करावयाची कारवाई व या संबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.” | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४७४) | "अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी पत्र देऊन अमरावती जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय हॉस्पिटलला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय असे नामकरण करण्याकरिता सोबतच इतरही अमरावती जिल्ह्यातील शहरातील हॉस्पिटलचे नामकरण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कडे दिला असणे, तसेच यांच्या मार्फत राज्याचे माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांनाही प्रस्ताव पाठविला असणे त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना प्राप्त पत्रा प्रमाणे अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांना वरील नामकरण करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले असणे, त्यामध्ये पत्रात नमूद केल्याप्रमाणे उक्त विषयी प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावा व ज्या लोक्रतिनिधींनीही याबाबत शिफारस केली आहे त्यांना अवगत करण्याबाबत सदर पत्रात कळविले असणे, अद्यापपर्यंत शासनाकडे हा प्रस्ताव प्राप्त झाला नसणे, अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी वरील नामकरण याबाबत वारंवार विचारणा होत असणे, शासनाने तातडीने निर्णयात्मक आदेश काढण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व या संबंधाने शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भूमिका." | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता. |
| (४७५) | "देगलूर (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात मनीषा शिंदे या महिलेचा डॉक्टराच्या हलगर्जीपणाने कुटूंब नियोजन व प्रसुतीच्या वेळी मृत्यू झाल्याची घटना दि.२० डिसेंबर, २०२२ रोजी घडली असणे, सदरील मृत्यू डॉ.ठक्करवाड यांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचा आरोप करीत त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन सेवेतून कायमचे बडतर्फ कडक कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनीधी व कुटुंबीयांसह स्थानिक नागरिकांची उपजिल्हाधिकारी कार्यालय, देगलूर येथे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी काढण्यात येणे, डॉ.ठक्करवाड यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करून या समितीच्या अहवालातील मजकुराचा बोध होत नसल्याने सदरील स्वयंस्पष्ट अहवाल देगलूर पोलिसांनी संबंधित विभागाकडे परत पाठविला असणे, परंतु याप्रकरणी कोणतीच कारवाई होत नसल्याने जनमानसात पसरलेला असंतोष व चिडीची भावना, परिणामी शासनाने याप्रकरणी तातडीने मनीषा शिंदेच्या मृत्य प्रकरणातील डॉ.ठक्करवाड दोषीवर कडक कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया." | श्री. जितेश अंतापूरकर, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (४७६) | "पुणे जिल्हा रुग्णालय औंध येथे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री साडेतीन वाजता गर्भवती महिला प्रसुतीसाठी येणे, रुग्णालयातील रात्रपाळीच्या डॉक्टरांनी महिलेवर जुजबी उपचार करून रुग्णालयामध्ये सुविधा नसल्याचे सांगून ससून रुग्णालय, पुणे येथे जाण्यास सांगणे, महिलेची प्रसूती जवळ आली असतानाही जिल्हा रुग्णालयाने रुग्णवाहिका व सोबत डॉक्टर न देणे, महिलेच्या नातेवाईकांनी दुसऱ्या रुग्णालयातून रुग्णवाहिका बोलवून गर्भवती महिलेस ससून हॉस्पिटलमध्ये जावे लागणे, परंतु शिवाजीनगर-जवळ रुग्णवाहिकेतच बाळाचा जन्म होऊन मृत्यू होणे, पुणे जिल्हा रुग्णालय येथे नवजात बालकांसाठी लागणारा व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याने नवजात बालकाचा दुर्दैवी मृत्यू होणे, त्यामुळे रुग्णाच्या नातेवाईकांमध्ये पुणे जिल्हा रुग्णालय प्रशासनाविरोधी असंतोष निर्माण होणे, उक्त प्रकरणी कठोर चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. सिध्दार्थ शिरोळे, श्री. सुनिल कांबळे, ॲड. राहूल कुल वि. स. स. | कित्ता. |
| (४७७) | "जालना जिल्ह्यातील परतूर शहराची लोकसंख्या ६० हजारापेक्षा अधिक असून मंठा शहराची लोकसंख्या देखील ५० हजार पेक्षा अधिक असणे, परतूर व मंठा येथे सन २०१७ पासून ग्रामीण रुग्णालयाचे रूपांतर ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे, या ठिकाणी असलेल्या ग्रामीण रुग्णालयावर या शहराचा भार असल्यामुळे येथे उपजिल्हा रुग्णालय होणे अत्यंत गरजेचे असणे, परतूर व मंठा या दोन्ही तालुक्याची ठिकाणे दोन राष्ट्रीय महामार्गाने जोडल्या गेले असल्यामुळे त्यात शेगाव पंढरपूर पालखी मार्ग, संभाजीनगर-नांदेड राष्ट्रीय महामार्ग यांचा समावेश असणे, त्यामुळे या ठिकाणी अपघाताचे प्रमाण जास्तीचे असून अशा वेळेला आरोग्याच्या सुविधा ऐनवेळी उपलब्ध होत नसणे, परतूर व मंठा या ग्रामीण रुग्णालयाच्या उप जिल्हा रुग्णालय रूपांतर प्रस्तावास तात्काळ मान्यता मिळणे आवश्यक असणे, परतूर व मंठा या दोन्ही तालुक्यातील लोकसंख्येची घनता बघता उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्याच्या अधिकाधिक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याने याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. बबनराव लोणीकर वि. स. स. | कित्ता. |
| (४७८) | "राज्याचे विद्यमान सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री यांना त्यांच्या मंत्रालयातील कक्षामध्ये अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक २६५२ व्हि.आय.पी./२०२२, दिनांक ०१/०३/२०२३ रोजीनुसार लेखी तक्रार देऊन अमरावती जिल्ह्यातील अनेक कर्मचारी यांनी सक्षम | श्री. रवि राणा वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या विरोधात तक्रारी असल्याचे दिनांक १ मार्च, २०२३ रोजी वरील पत्राद्वारे कळविले असणे ज्यामध्ये सक्षम लिमिटेड कंपनीचे दिनांक ३/११/२०२० रोजी च्या दरम्यान शासनाचे कार्यकारी यंत्रणेकडून शासकीय सुपरस्पेशलिटी व इतर रुग्णालयात मनुष्यबळ पुरवठा यासाठी कंत्राट दिला असणे ज्या कंत्राट यामध्ये स्थानिक युवकांना युवतींना रोजगार मिळाला नसून जिल्ह्याचे बाहेरून युवक-युवतींकडून आर्थिक व्यवहार करून घेऊन त्यांना कामावर घेऊन त्यांच्याकडून रुग्णालयातील कामे केले जात असणे, हजेरी पटावरील कर्मचारी व प्रत्यक्षात काम करणाऱ्यांमध्ये संख्येत खूप तफावत असणे व यामध्ये गैरव्यवहार केला जात असणे कर्मचाऱ्यांच्या ESIC/EPF मध्ये मिळणाऱ्या सवलती डावलून शासनाचे व कर्मचाऱ्यांचे लाख रुपयाचे नुकसान सक्षम प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कडून होत असणे. सर्रास वरील प्रकार सुरू असून अमरावती जिल्ह्यातील युवकांमध्ये सक्षम प्रा. लिमिटेड कंपनी विरोधात रोष निर्माण झाला असणे, या गंभीर विषयात शासनाने वेळीच तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता असणे, सक्षम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला शासनाच्या आदेशाने उपसंचालक आरोग्य सेवा अकोला यांचे आदेश पत्र क्रं.४०९०/२०२१, दिनांक ०३/११/२०२० रोजी अकोला मंडल अंतर्गत अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील कामे करण्यासाठी वरील कंपनीने मनुष्यबळ पुरविले असणे यांचे कामाप्रती नेहमीच शासनाकडे तक्रारी होत असणे, वरील विषयात शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सुरुवातीपासून ते आतापर्यंत सक्षम प्रायव्हेट लिमिटेडद्वारे केलेल्या कामाची चौकशी होऊन जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत शासनाकडून सदर कंत्राटदाराची कोणतीही देयक अदा करण्यात येऊ नये तसेच सदर कंपनीवर कारवाई करून कंत्राट रद्द करून सदर कंपनीला काळ्या यादित टाकण्यासाठी निर्णयात्मक आदेश काढण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची यासंबंधी भूमिका व प्रतिक्रिया." | | |
| (४७९) | "सन २०१६ मध्ये मुंबईतील अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारकांच्या प्रकल्प कामाचे मा.पंतप्रधान यांचे हस्ते जलपूजन करण्यात आलेले असणे, त्यानंतर शिवस्मारकाच्या या प्रकल्पामुळे पर्यावरणाला धोका असल्याचे तर मत्स्यव्यवसायाला फटका बसणार असल्यामुळे पर्यावरण प्रेमी व मत्स्यमार संघटना यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यावर मा. न्यायालयाने त्याबाबत तोंडी स्थगिती | श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे, | कित्ता. |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | दिल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानुसार, स्मारकाचे काम बंद ठेवण्यांत आले असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये निदर्शनास येणे, त्या विरोधात राज्य शासनाने सदर कामावरील बंदी उठविण्याबाबत माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये केलेली विनंती मा.न्यायालयाने फेटाळली नसल्याचे सांगण्यात येणे, शिवस्मारकाच्या कामासंदर्भातील ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, शासनाने शिवस्मारकाचे काम सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका." | श्री. दिलीपराव बनकर, श्री. दिपक चव्हाण,श्री. हसन मुश्रीफ, श्री. अनिल पाटील,श्री. बाळासाहेब पाटील, श्री. यशवंत माने,श्रीमती सुमन पाटील, श्री. बाबासाहेब पाटील, श्री. दिलीप मोहिते-पाटील,श्रीमती सरोज आहिरे, श्री. बाळासाहेब आजबे,श्री. संजयमामा शिंदे, डॉ. राजेंद्र शिंगणे,श्री. चेतन तुपे, श्री. मंगेश चव्हाण,श्री. विकास ठाकरे, श्री. नानाभाऊ पटोले,श्री. अमिन पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार, श्री. संजय जगताप, श्री. शिरीष चौधरी,श्रीमती सुलभा खोडके, श्री. गणपत गायकवाड, श्री. कुमार आयलानी,डॉ. किरण लहामटे, श्री. पृथ्वीराज चव्हाण,श्री. संदिप क्षिरसागर,श्री. धनंजय मुंडे,श्री. अजित पवार वि. स. स. | |
| (४८०) | "भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्रींचे जन्मस्थळ असलेल्या ठाणे जिल्ह्यातील आंबेटेंभे (ता.मुरबाड) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भीमाई स्मारक उभारण्याची कार्यवाही सुरु असणे, मात्र या स्फूर्तिस्थळाकडे जाण्यासाठी रस्ताच नसल्याची गंभीर माहिती दि.१६ फेब्रुवारी,२०२३ रोजी उघडकीस येणे, रस्ताच नसल्याने सामाजिक कार्यकर्त्यांना या स्मारकाकडे ये-जा करतांना प्रचंड त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, आंतरराष्ट्रीय भीमाई स्मारकाकडे जाण्यासाठी प्रशस्त | डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | रस्ता तयार करण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी देश-विदेशातील आंबेडकर-प्रेमींमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदर ठिकाणी येण्याजाण्याकरिता रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यासाठी कार्यात्मक कार्यवाही करून त्याची अंमलबजावणी करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४८१) | "मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील लोणेरे नजीक रेपोली गावाजवळ दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी ट्रक आणि इको कारमध्ये समोरासमोर धडक होऊन भिषण अपघात होणे, या दुर्देवी अपघातात एकाच कुटूंबातील दहा जणांचा मृत्यू होणे, अद्याप शासनाकडून मृतांच्या वारसांना मदत न मिळणे, महामार्गाच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असणे, काही ठिकाणी उड्डाणपूल आणि दुभाजकाची कामे सुरु असल्याने रस्त्यावरील वाहतूक डायव्हर्ट करण्यात आली असणे, असे असतांना महामार्गावर कुठेही वाहतूक डायव्हर्ट केल्याचे फलक किंवा दिशादर्शक फलक लावले नसणे, वाहनचालक गोंधळात पडून अनेक छोटे मोठे अपघात होणे, महामार्ग व्यवस्थेच्या निष्काळजीपणामुळे दहा निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागणे, सदर अपघाताची शासनाकडून सखोल चौकशी होणे, दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे, सततच्या अपघातांमुळे कोकण परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चीडीची भावना, दुरावस्थेत असलेल्या महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यांचेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे तथा हवालदिल वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कुमारी आदिती तटकरे वि. स. स. | कित्ता. |
| (४८२) | "भिवंडी कल्याण-शीळ रस्ता कल्याण, डोंबिवली, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर शहरांना जोडणारा महत्वाचा रस्ता असणे, दररोज हजारो प्रवासी या रस्त्यांवर प्रवासासाठी अवलंबून असल्याने सतत वाहतूक कोंडी होणे, दिनांक ३ ऑगस्ट, २०२२ रोजी मंत्रालय येथे झालेल्या कॅबिनेट बैठकीमध्ये या रस्त्यासाठी ५६१ कोटी ८५ लाख रुपयांच्या खर्चास सुधारित मान्यता देण्यात आलेली असूनसुद्धा निधी केवळ सहा पदरीकरणासाठी वापरण्यात येणार असणे, भिवंडी कल्याण-शीळ | श्री. प्रमोद पाटील वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | रस्ता कल्याण, डोंबिवली, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर शहरामध्ये वाढलेली लोकसंख्या, परंतु रस्त्याच्या दुतर्फा चाललेली मोठ-मोठी गृह संकुले पाहता भविष्याच्यादृष्टीने सहा पदरी रस्त्यावरही ताण पडण्याची शक्यता, येथील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून लोकल रेल्वे सेवा जवळ नसल्याने सर्वजण कल्याण शीळ रस्त्यावर अवलंबून असणे, परिणामी भविष्याच्या दृष्टीने विचार करून रस्त्याचे नियोजन करण्याची आवश्यकता पाहता, भिवंडी कल्याण शीळ रस्त्या सहा पदरीकरणासह प्रिमियर कॉलनी ते मानपाडा चौक व रिजन्सी इस्टेट (व्यंकटेश पेट्रोल पंप) ते मानपाडा पोलीस चौकी उड्डाणपूल बनविण्याबाबत तातडीने आराखडा तयार करून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (४८३) | "हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावरुन बुलढाणा जिल्हामध्ये सिंदखेडराजा तालुक्यामध्ये पळसखेड (मलकदेव) येथे चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर या तालुक्यांना जोडण्यासाठी इंटरचेंज तयार करण्यात आलेला असणे, या तालुक्यांची लोकसंख्या जवळपास १० ते १२ लाखाच्या वर असणे, सदर इंटरचेंज वरुन चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर येथे जाण्यासाठी, सिंदखेड राजा देऊळगाव राजा या राज्य मार्गावरुन पुढे जालना-मलकापूर या केंद्रीय मार्गाने देऊळगांव राजा पुढे असोला फाटयावरून जावे लागत असणे, सदर अंतर इंटरचेंज पासून असोला फाट्यापर्यंत अंदाजे २५ कि.मी. इतके असणे, तसेच देऊळगांव राजा या शहरा मधून हा मार्ग जात असल्यामुळे ट्रफिक जाम होत असणे, त्यामुळे जवळपास ३५ ते ४० मिनिटे इतका वेळ लागणे, सदर इंटरचेंज पासून जवळखेड मार्गे ते असोला फाटा हे अंतर अंदाजे ८ कि.मी. इतके असणे, तसेच या इंटरचेंज पासून पळसखेड झाल्टा मार्गे असोला फाटा येथे गेले असता हे अंतर सुध्दा ८ कि.मी. इतकेच असणे, या दोन्ही रस्त्यांचा काही भाग मुख्यमंत्री सड़क योजने अंतर्गत तयार केलेला असणे व अंदाजे ४ कि.मी. रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण झालेले असणे, त्यामुळे वरील पैकी एका रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण केल्यास चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर या तालुक्यांतील नागरिकांना समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी १५ कि.मी. अंतर कमी होवून २० ते २५ मिनीटे इतका वेळ वाचून एक नविन रस्ता उपलब्ध होणे, त्यामुळे एम.एस.आर. डी.सी. किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा यांना आदेश देऊन वरील दोन्ही रस्त्यांचा सर्वे करून | श्रीमती श्वेता महाले वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | योग्य त्या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूती करून समृध्दी मार्गावर ये-जा करण्यासाठी नवीन इंटर चेंज तयार करून चिखली, बुलढाणा मोताळा व मलकापूर येथे जाण्यासाठी वेळेची व अंतराची बचत होण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." | | |
| (४८४) | "रत्नागिरी जिल्हयातील मौजे करंबवणे (ता. चिपळूण) आणि मौजे बहिरवली (ता. खेड) या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या वशिष्ठी खाडीवर पूल उभारणीच्या कामास सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पीय कामांमध्ये निधीसह मंजुरी मिळालेली असणे, चिपळूणसह खेड, दापोली, मंडणगड तालुक्यातील प्रवाशी व पर्यटकांसाठी हा पूल सोयीचा आणि किमान ८० ते १०० किलोमीटर अंतर वाचविणारा असणे, असे असताना गेल्या पाच वर्षात पुलाच्या कामाला सुरूवात न होणे, याबाबत तारांकीत प्रश्नांच्या माध्यमातून शासनाला विचारणा केली असता 'सदर कामाबाबत तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक परवानग्या प्राप्त करण्याचे नियोजन आहे' असे लेखी उत्तर गेली ५ वर्ष वेळोवेळी देण्यात येणे, त्यामुळे या प्रक्रियेला खरंच इतका कालावधी लागतो का ?, की या पुलाचे काम होवू नये याकरिता जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे ? असे प्रश्न निर्माण होणे, पाच वर्ष उलटूनदेखील कामाला सुरूवात न झाल्याने चिपळूण, खेड, दापोली, मंडणगड या तालुक्यांतील नागरिक व प्रवाशांमध्ये निर्माण झालेली प्रचंड संतापाची व चिडीची भावना, या कामाच्या विलंबास जबाबदार संबंधितांवर कारवाईची होत असलेली मागणी, ही गंभीर बाब लक्षात घेवून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. भास्कर जाधव वि. स. स. | कित्ता. |
| (४८५) | "आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण यांच्या अखत्यारित पॅकेज न. एनएसके-५४ (A & B) नाशिक जिल्ह्यातील सटाणा कळवण दिंडोरी निफाड व सिन्नर तालुक्यातील नामपूर-सटाणा-कळवण-वणी पिंपळगाव निफाड सिन्नर रस्ता रामा २७ कि.मी. ०/०० ते ७३/८०० ची सुधारणा करणे, सटाणा, कळवण, दिंडोरी, निफाड व सिन्नर जि. नाशिक (ब) नाशिक दिंडोरी, वणी प्रमुख राज्य क्रमांक ३ कि. मी. १०/७५० ते ४२/५०० रस्ता दिंडोरी ते वणी ची सुधारणा करणे या कामास सन २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देवून मंजुरी देण्यात येणे, सदर रस्त्यास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, नाशिक यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी संबंधित मक्तेदार एजन्सीस कार्यारंभ आदेश देणे, मुळ | श्री. नितीन पवार, वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | प्रकल्पाची किंमत १९४.९२ कोटी इतकी असणे हा रस्ता कळवण शहरातून जात असणे, कळवण शहर हे तालुक्याचे ठिकाण असून सन २०१७ ते २०१९ या दोन वर्षाच्या काळात या ना त्या कारणाने रस्ता दुर्लक्षित राहिल्याने प्रत्यक्ष काम हे ठेकेदाराच्या चुकीमुळे संथ गतीने सुरु होणे, रस्त्याच्या कामात होणाऱ्या विलंबामुळे नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागणे, या रस्त्याचा खर्च ४० टक्के सरकार तर ६० टक्के खासगी सहभागातून केला जाणार असणे, त्यात १५ वर्षे रस्त्यांची देखभालही ठेकेदाराला करावी लागणार असल्याचे करारनाम्यात नमूद असणे असे असतांना देखील सदरचा रस्ता गेल्या ५ वर्षापासून रस्त्याचे काम खोळबंणे, सदरचा रस्ता संबंधित मक्तेदार एजन्सीने वेळेत पूर्ण न करणे, ठेकेदाराच्या दिरंगाईस सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठीशी घालणे, वेळोवेळी संबंधित मक्तेदार एजन्सीस कामास मुदतवाढ देणे, रस्त्याच्या संथगतीमुळे व रस्त्याच्या धुळीमुळे स्थानिक नागरिकांना फुफुसाचे आजार होणे, रस्त्याचे काम वेळोवेळी बंद ठेवल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीचे वातावरण, याच मार्गावर साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले श्री सप्तश्रृंगी देवीचे पीठ असून या ठिकाणी देशभरातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असणे परंतु सदर रस्त्याचे काम संथगतीने होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होणे, ऑक्टोबर महिन्यात ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे २ निष्पाप नागरिकांना याच रस्त्यावर अपघात होवून आपला जीव गमवावा लागणे, परिणामी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी कळवण शहर बंद ठेवून संबंधित मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची तहसिलदार व कळवण पोलीस स्टेशनकडे मागणी करणे, स्थानिक लोकप्रतिनीधींनी देखिल जिल्हा वार्षिक सभेत मा. पालकमंत्री यांच्या ही गोष्ट निदर्शनास आणून देवून मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करणे, पालकमंत्री यांनी देखिल संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणे , पालकमंत्री यांनी आदेश देवून देखिल सदर मक्तेदार एजन्सीवर कोणतीही कारवाई न होणे, या सर्व कारणांमुळे नागरिकांत प्रशासनाविरोधात व शासनाविरोधात असंतोषाचे वातावरण तयार होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| (४८६) | “रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील खरोळा फाटा ते पानगाव दरम्यानच्या रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या (क्र.३६१एच) दुरुस्तीचा प्रस्ताव अनेकवेळा शासनास पाठवूनही त्याला अदयापपर्यंत मंजुरी मिळाली | श्री. धिरज देशमुख वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | नसणे, सदर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघात होऊन नागरिक, शाळेतील मुलांचा बळी गेला असणे, याकडे व रस्त्याअभावी होणाऱ्या गैरसोयीकडे शासन–प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा गावबंद आंदोलने व रस्ता रोको केला असणे, नागरिकांनी वेळोवेळी निवेदने सादर करून आंदोलने करणे, शासन- प्रशासनाचा निषेध करून रोष व्यक्त केला असणे, तरीही याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (४८७) | “राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित गडचांदूर ते नांदाफाटा या रस्त्याच्या दुरुस्ती, मजबूती व डांबरीकरणाच्या कामाकरिता सहा कोटी रुपये मंजूर झाले असून तब्बल वर्षभरानंतर परत सदरहू रस्त्याचे काम सुरू असणे, कुठलीही दुरुस्ती, मजबूती न करता थेट मातीवर डांबरीकरण केले जात असल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी काम बंद करून चक्क हाताच्या बोटांनी डांबरीकरण केलेला रस्ता कसा उखडत आहे, याचा विडिओ व्हायरल केल्याने डांबरीकरण कामाचा फोलपणा उघड होऊन बोजवारा उडाल्याचे दिसून येणे, सहा कोटी रुपये खर्च करून सदरहू रस्ता निकृष्ट दर्जाचा बनवण्यात आल्याची चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर दंड बसवण्याबाबत मांगणी करूनही त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचांदूर कार्यालयाशी संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, वर्क ऑर्डर मिळून एक वर्ष पूर्ण झाले परंतु अद्याप प्रत्यक्षात काम सुरू झाले नसणे, कंत्राटदाराने सदरहू काम दुसऱ्या कंत्राटदारास दिले असून पावसाळ्यापूर्वी केलेल्या रस्त्याच्या कामात अनेक ठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडल्याने सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण करण्याची निकड असणे, सदरहू प्रकरणी शासनामार्फत कोणतीही दखल घेण्यात येत नसल्याने या विभागातील नागरिकांमध्ये शासनाप्रति वाढता असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. सुभाष धोटे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अस्लम शेख, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार वि. स. स. | कित्ता. |
| (४८८) | “सार्वजनिक बांधकाम विभाग वरळी, मुंबई येथील शासकीय इमारतीचे सन २०१८ व त्यापासून पुढे स्नेहा अ, ब, कावेरी, गोमती, शरावती, विसावा, शितल, दर्शना या शासकीय निवासस्थान इमारतीचे दुरुस्तीचे काम हाती घेतलेले असणे, हे काम एकाच व्यक्तीच्या तीन वेगवेगळ्या कंपणीस दिलेले असणे, काम अत्यंत संथ गतीने सुरू असणे, निवासस्थानाची कामे अर्धवट व महीनोमहिने बंद अवस्थेत ठेवणे, यामुळे | श्री. कैलास पाटील, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. संजय केळकर वि. स. स. | कित्ता. |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | निवासी इमारतीमधील रहिवाशांना धुळीचा प्रचंड त्रास होणे यातुन वयोवृध्द स्थानिक रहिवाशी यांना आरोग्यच्या समस्या उद्‌भवने, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असलेले दुरुस्तीचे काम यामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असणे यामुळे निवासस्थानामध्ये पाणी लिकेज होणे, कलर निघून जाणे फरशा तुटणे यासारख्या अनेक समस्या समोर जावे लागत आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाने साहित्याचा दर्जा व गुणवत्ता याची तपासणी न करणे, अल्प कालावधीतच काम पूर्ण करणे यावर कंत्राटदाराचा भर असल्यामुळे काम अर्धवट अवस्थेतच सोडून गेल्यामुळे सदर बिल्डींगमध्ये अस्तव्यस्त सामान पडून असणे, व यामुळे रहिवाशांना त्रास होणे कंत्राटदाराने केलेल्या कामास अल्प कालावधीतच भिंतीला तडे जाणे, पाणी लिकेज होणे, भिंती ओल्या होणे यासारख्या समस्या उद्‌भवणे या प्रकारच्या काम सुरू असताना विभागाचे अधिकारी सहायक अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी आवश्यक ते निरीक्षण व पर्यवेक्षण न ठेवणे यामुळेच कंत्राट दराने निकृष्ट दर्जाचे काम करणे, सार्वजनकि बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना रहिवाशांनी कामाची विचारपूस केल्यास दमदाटी व उद्धटपणे बोलणे, शासकीय निवासस्थानाचे निकृष्ट काम काम झाल्यामुळे कधीही अपघात होण्याची शक्यता निर्माण होणे, इमारतीमधील वरच्या मजल्यावर उंदीर पाईपने चढणे, निवासस्थान व परिसरामध्ये स्वच्छता न राखणे, यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करून देखील कोणतेही कारवाई न करणे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना गोमती इमारतीमध्ये शासकीय निवासस्थान वाटप होणे या निवासस्थानाची दुरुस्तीचे काम देखील याचकंत्राटदराने हाती घेणे, या दुरुस्तीकरीता उच्च दर्जाचे साहित्य वापरणे, यामुळे इतर रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरणे कंत्राटदाराने या निवासस्थानाचे विशेष लक्ष देऊन पाठपुरावा करून काम अल्पकालावधीतच पूर्णत्वास नेणे तसेच टेंडरमध्ये नमूद कामापेक्षा अधिकचे काम हाती घेणे, कार्यकारी अभियंता व कंत्राटदाराचे संगणमत असणे, स्नेहा अ व ब येथे पिझ्झा बॉय कडुन मुलीवर अत्याचार व चोरी झाल्याचे स्थानिक पोलिसस्टेशनमध्ये गुन्हां दाखल असुन सुध्दा कोणत्याच सुरक्षेचा उपाययोजना नसने व सी.सी.टीव्ही गेल्या अनेक वर्षापसुन बंद अवस्थेत असणे, या संपुर्ण कामाची चौकशी केल्याशिवाय अंतिम देयक अदा करू नये अशी रहिवाशांची विनंती असणे, रहिवाशी पार्कींगमध्ये नियमबाह्य वर्षानुवर्ष बाहेरील व्यक्तींच्या गाडया पार्कींग करून ठेवणे, | | |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | शासकीय वसाहतीमध्ये शासणाची परवानगी न घेता भाडेपट्याने जाहिरातीचा फलक लावणे त्यासाठी वृक्षतोड व भ्रष्ट्राचार करणे, कार्यकारी अभियंता यांच्याकडे बीडीडी वरळी चा कार्यभार असणे, बीडीडी वरळी येथील कलेल्या कामामाध्ये प्रचंड भ्रष्ट्राचाराच्या तक्रारी नागरीकांनी करणे याबाबत तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना.” | | |
| (४८९) | वेल्हे (जि.पुणे) तालुका अतिशय डोंगरी व दुर्गम असून वेल्हे तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले तो “तोरणा” गड, याशिवाय स्वराज्याची पहिली राजधानी “राजगड” हे दोन किल्ले असणे, वेल्हे तालुक्यात निसर्ग सौंदर्य असलेला मढेघाट व अनेक निसर्गरम्य ठिकाणे असून तेथे पावसाचे प्रमाण प्रतिवर्षी २५०० ते ४५०० मि.मी. असल्याने पर्यटनासाठी वेल्हे तालुक्यात राज्यातून व राज्याबाहेरुन येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, परंतु, रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्याला जोडणारा, वेल्हे भट्टी - पासली - भोरडी - पिवशी मार्गे शेवते महाड रस्ता हा पुण्याहून कोकणात जाण्यासाठी सर्वात कमी अंतराचा साधारण ९० ते १०० किमी इतका असणे, मुख्यमंत्री सडक योनेंतर्गत प्रस्तावित केलेला असणे, परंतु त्याला अद्याप मंजुरी मिळाली नसणे, रायगड जिल्यातील महाड तालुक्यातील रस्ता ५.५ मीटर रुंदीचा असणे, त्यामुळे प्रस्तावित रस्ता ५.५ मीटर रुंदीचा डांबरीकरण युक्त करणे छत्रपती शिवाजी महाराजाच्या राजगड व रायगड या दोन राजधान्यांना जोडणारा व पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुका व रायगड जिल्ह्यातील महाड तालुका या दोन तालुका व जिल्ह्यांना जोडणारा कमी अंतराचा रस्ता असतांनाही अजूनही या प्रस्तावीत रस्त्याला मंजूरी मिळालेली नसणे, हा रस्ता झाल्यास दळणवळणाची सुविधा निर्माण होऊन स्थानिकांसाठी रोजगार निर्माण होणार असणे तसेच कोकणात जाणारा मार्ग होणार असून यातून अनेक गावे मुख्य रस्त्याला जोडली जाणार असणे व सदरील रस्ता पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत होणारा असल्याने या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून सदर रस्त्याला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया.” | श्री. संग्राम थोपटे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अमित झनक, श्री. अमिन पटेल, श्री. कुणाल पाटील, श्री. संजय जगताप वि. स. स. | कित्ता |
| (४९०) | “लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुका येथील मौजे धोंडवाडी ते धोंडवाडी पाट्टी, माळहिप्परगा ते पाटोडा (खु) या रस्त्याचे काम सद्या सुरू असुन या रस्त्याचे हॉट मिक्स, साईड पटट्याचे काम किंवा डांबराच्या | श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | बांधकामांशी संबंधित रस्त्याची सर्व कामे अतिशय निकृष्ट दर्जाची होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, उक्त निकृष्ट कामाच्या दर्जाची चौकशी करून चांगल्या प्रतीच्या कामाच्या सुचना देण्यात याव्यात अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभाग, जळकोट कार्यालयासमोर तीव्र बेमुदत आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात देणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासन त्वरीत चौकशी करून दोषापिंतावर कारवाई तसेच चांगले काम होण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४९१) | "वाटुर फाटा (ता. परंतुर, जि.जालना) ते चारठाणा, (ता. जिंतूर, जि.परभणी) हा चौपदरी सिमेंट कॉंक्रिटचा २२७ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणारा रस्ता हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत असून त्याबाबत वारंवार प्रशासनाकडे तक्रार केलेली असणे, परंतु तरीदेखील त्याकडे हेतू पुरस्सर दुर्लक्ष करून मोठा भ्रष्टाचार व अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले जात असणे, या रस्त्याचे बांधकाम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही असे निदर्शनास येत असून अंदाजपत्रकप्रमाणे साईड पंखे भरणे अपेक्षित असताना त्यात काही ठिकाणी केवळ १ फूट खोदले असणे, तर काही ठिकाणी अर्धा फूट खोदून निकृष्ट दर्जाचे काम केले जात असणे, नाली बांधकाम देखील अंदाजपत्रकाप्रमाणे खोदकाम करणे, संपूर्ण काळी माती काढणे, त्यामध्ये मुरूम भरणे, त्यावर सोलिंग टाकून खडी टाकून कॉक्रीट करणे असे अपेक्षित होते परंतु असे न करता सरळ सरळ जमिनीवरच बांधकाम केले जात असणे, या बांधकामासाठी वाळू किंवा दगडापासून तयार केलेली वाळू न वापरता खडी क्रेशरवरील रॉ मटेरियल असणारी भुकटी (डस्ट) वापरली जात असणे, अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्वीचा डांबर रस्ता पूर्ण खोदणे बंधनकारक असताना अनेक ठिकाणी वरवर तर काही ठिकाणी डांबर असलेला भाग तसाच दाबण्यात आला असणे, त्यावरच मुरूम टाकण्यात आला असणे, पहिल्या लेयरसाठी खड़ी ऐवजी खड़ी क्रेशरवरची रॉ मटेरियल असणारी भुकटी (डस्ट) वापरली जात असणे, कॉंक्रीट करण्यासाठी वापरलेले सिमेंट निकृष्ट दर्जाचे व अत्यंत कमी किमतीचे वापरले जात असणे, शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्यासह कोणीही अधिकारी साइटवर थांबत नसणे, गिरगाव ता.सेलू, जि.परभणी येथील तलावातून मुरूम काढण्याची परवानगी संबंधित कंत्राटदार कंपनीने घेतली होती, परंतु कंत्राटदार कंपनीने तलावाच्या लगत १० एकर शेतजमिन खरेदी करून या शेत जमिनीतून आठ ते दहा | श्री. बबनराव लोणीकर, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | फुटापर्यंत खोदकाम करत मुरूम उत्खनन करण्यात येणे, विशेष म्हणजे या ठिकाणाहून मुरून उत्खननास लवादाने स्थगिती दिलेली असतानाही या ठिकाणावरून मुरूम उत्खनन करण्यात आले असणे, या रस्त्याच्या बांधकामासाठी लागणारा मुरूम मंठा तालुक्यातील पिंपरखेडा खराबे ता.मंठा, जि.जालना येथील शेतकरी दत्तराव खराबे व इतर तीन शेतकरी यांच्या सुमारे दहा एकर शेतामधून आठ ते दहा फूट शेत जमीन खोदून मुरूम काढण्यात आला असणे, मात्र हा मुरूम उत्खनन करण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे केवळ काही ब्रासची रॉयल्टी भरण्यात आली प्रत्यक्षात मात्र मोठ्या प्रमाणावर मुरूम उत्खनन करण्यात आलेले असणे, यामुळे हा भ्रष्टाचार कंपनी व महसुली अधिकाऱ्याच्या मार्फत झाल्याचे स्पष्ट होणे, या रस्त्याच्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असलेली कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्यासह अवैध उत्खनन प्रकरणी सहभागी असलेले उप जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४९२) | "रिध्दपूर-तिवसा रा.मा.३०० मार्गावरील नेरपिंगळाई (ता.मोर्शी, जि.अमरावती) ०.०० कि.मी. ते ४०/८०० कि.मी. रस्त्याचे काम अत्यंत धिम्या गतीने होत असून गावातील नागरीकांच्या रहदारीकरीता रस्ता गैरसोयीचा होणे, तसेच या रस्त्यांच्या कामामुळे, सांडपाण्याची व पिण्याची पाईपलाईनची सतत लिंकेज होत असल्यामुळे नागरीकांना गढूळ पाण्याचा पुरवठा होत असणे, सदर रस्त्याचे काम करताना भूमी अभिलेख कार्यालयाने खुणा करून दिल्या तेवढे अतिक्रमण काढले नसणे, गरज नसताना गरीबांची घरे पाडणे, ठेकेदार कंपनी (माधव इन्फ्रा) व सार्वजनिक बांधकाम विभाग याच्यात समन्वय नसणे, स्थानिक प्रशासन कंपनीला सहकार्य करीत नसणे, तत्कालीन पालकमंत्री यांनी प्रशासन, ग्रामस्थ यांच्यासमवेत दिनांक १४/६/२०२२ रोजी घेतलेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कोणतेही काम न होणे, बैठकीमध्ये झालेल्या लेखी इतीवृत्त प्रमाणे पुढील कामे वेळीच पुर्ण होणे, इलेक्ट्रिक पोल मनात वाटेल तेथे उभे केल्यामुळे स्ट्रीट लाईटची अडचण निर्माण होणे, येथे काम करताना ग्रामपंचायतीला विश्वासात घेतले नसणे, अनेकवेळा पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जाणे, गावातला पाणीपुरवठा अनियमित होणे, त्याचा आर्थिक भुर्दंड ग्रामपंचायतीला सोसायला लागणे, येथील नाल्याचे काम झाले नसल्याने नागरीकांच्या घरात सांडपाणी शिरुन नुकसान | ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. राजेश एकडे,श्री. बळवंत वानखडे, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | होणे, नागरीकांच्या आरोग्याच्या वारंवार तक्रारी असणे, गावामधील ७०० मीटर अंतराचे काम मागील दिड वर्षापासून रखडले असणे, गावातील नागरिक वारंवार आंदोलने, उपोषण करणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये रोष निर्माण होणे, हे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी येथील नागरीकांची असतानाही या समस्यांकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (४९३) | "जि.ठाणे, भिवंडी तालुक्यातील पिळंझे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या भवरपाडा ते नंबर पाडादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुमारे १ कोटी ७२ लाख रुपये खर्चुन बांधकाम करण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचे दि.१७/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, अल्पावधीतच सदरहू पुलाच्या प्लास्टरला तडे जाणे, सदरहू ठेकेदाराने कॉंक्रिट कामासाठी रेतीऐवजी चक्क फेकून देण्यालायक असलेली स्टोन ग्रीड पावडर पुलाचे बांधकाम करण्यात वापरण्यात येणे, सदरहू पुलाचा पिळंझे, देपोली, साखरोली या महसुली गावांसह १५ आदिवासी पाड्यातील आदिवासी जनतेची रहदारी करण्यासाठी खूपच गैरसोय होणे, सदरहू ठिकाणचा पुल प्रथम सन २०१८ मध्ये कोसळणे आणि त्यानंतरच्या वर्षात पुलाचा जोडरस्ता वाहुन गेल्यानंतर सदर ठिकाणी पुल व जोडरस्ता तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा मागवून सदरहू पुलाचे पुन्हा नव्याने करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार करण्यात येणे, तसेच वाहुन गेलेल्या जोड रस्त्याच्या कामात कॉंक्रिट भिंत उभारण्याचे नमूद असताना, ठेकेदाराने त्या ठिकाणी दगडाचा वापर करून निकृष्ट दर्जाच्या भिंतीचे बांधण्यात येणे, सदर पुलाचे व संरक्षक भिंतीचे काम दोन वेळा करण्यात येणे, सदर प्रकरणात सा.बां. विभागाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता सुनिल पाटील, उपअभियंता चौधरी, कनिष्ठ अभियंता अनिल पवार आणि ठेकेदार यांनी संयुक्तपणे भ्रष्टाचार करून कोटयावधी रुपयांच्या शासकीय निधीचा केलेला गैरव्यवहार, दोन वेळा पुलाचे निकृष्ट बांधकाम करून शासकीय निधीचा झालेला अपव्यय, यासंदर्भात स्थानिक सरपंच व ग्रामस्थांनी याबाबत शासनाकडे तक्रार करण्यात येऊनही त्याची शासनाने दखल न घेणे, या प्रकरणातील जनक्षोभ बघता ठेकेदार विवेक पवार यांस काळ्या यादीत टाकण्याचे ठाणे | श्री. अनिल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | अधीक्षक अभियंता यांचे आदेश असणे, परंतु सदर प्रकरणातील सहायक अभियंता अनिल पवार यांची मुरबाड येथे बदली करण्यात येऊन सदर प्रकरण दडपून टाकण्यात येणे, शासनाने सदरहू पुलाचे व संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट तसेच भिवंडी उपविभागात यापूर्वीच्या कामांमध्ये कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी संगनमताने २० ते २५ कोटी रुपये हडप केल्याचा संशय असल्याने यापूर्वी झालेल्या व सध्या सुरू असलेल्या कामांची कोकण प्रादेशिक अधिक्षक अभियंता यांच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, सबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील आदिवासी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (४९४) | "महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील राज्य मार्ग क्रमांक १७० हातिवले ते चिरेखन फाटा ०.०० ते २३.७०० कि.मी. रस्त्याचे काम सुरू असून ६७ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता आणि ४१ कोटी रुपयाला हा ठेका अलुर कन्स्ट्रक्शन कंपनी अँड नाईक अँड सन्स या कंपनीने घेतला असणे, या रस्त्यावर बेकायदेशीरपणे आणि वाहन चालकांच्या जीवितास धोका होईल असे स्पीड ब्रेकर गरज नसताना अनेक ठिकाणी टाकण्यात आलेले असणे,सदरील ठेकेदार हा कर्नाटक राज्यातील असून बेजाबाबदारपणामुळे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेकांचे मोठे नुकसान झालेले असणे, याअगोदर स्थानिक नागरिकांनी अनेक तक्रारी करून देखील प्रशासन हेतुपूर्वक दुर्लक्ष करत असणे,याचाच दुष्परिणाम म्हणून दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी दैनिक प्रहार चे पत्रकार आणि राजापूर तालुका प्रेस क्लबचे उपाध्यक्ष राजन लाड आणि त्यांची पत्नी या दोघांचे स्पीड ब्रेकर मुळे मोठा अपघात झलेला असणे, या अपघातात फार मोठे शारीरिक आणि आर्थिक नुकसान झालेला असणे,याचबरोबर याअगोदर देखील अनेक वाहन चालकांचा या स्पीडब्रेकर मुळे अपघात झाले असून अनेक गाड्यांचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असणे, यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील हातिवले जैतापूर रस्त्यावर चुकीच्या पद्धतीने आणि अनेकांना धोकादायक ठरलेल्या स्पीड ब्रेकर काढण्याबाबत मागणी होऊन देखील दुर्लक्षित केल्याने येथील स्थानिकांमध्ये सदर ठेकेदार व प्रशासनाविरोधत असंतोषाची व चिडेची भावना निर्माण होणे, वेळेवर कार्यवाही न केल्यास जनभवणांचा उद्रेक होण्याची निर्माण झालेली शक्यता आणि शासनाने यावर त्वरित करावयाची कारवाई व उपाययोजना." | श्री. शांताराम मोरे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (४९५) | "सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील करोडी पासून ते चाळीसगाव अट्रोम घाटापर्यंतचा रस्ता बांधण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग संस्था (एनएचआय) संभाजीनगर यांच्या मार्फत श्री.दिलीप बिडकोन प्रा.लि. या कंपनीला अटी व शर्तीनुसार देण्यात येणे, या निविदेतील अटी शर्तीनुसार रस्त्यांच्या दोन्ही बाजूला झाडे लावून जगवणे बंधनकारक असतांना जुन्या रस्त्यावर लाखो झाडांची कत्तल करून त्या मोबदल्यात नविन झाडे लावण्यात न येणे, त्यांनी पाहिजे तशा प्रकारच्या मातीचा थर भराव न करता काळया मातीवरच सर्व डांबरीकरण करणे, या रस्त्याला अनेक ठिकाणी रस्ता पावसाळयात उन्हाळयात खचतो, रस्त्यावर अनेक प्रकारचे अँड ड्युलेशन निर्माण झाल्याने अपघाताचे प्रमाणसुध्दा वाढणे, तसेच रस्त्यालगतची स्टेट लाईटदेखील अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या सुमारास तसेच वारंवार प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग संस्था (एनएचआय), संभाजीनगर यांच्याकडे तांत्रिक दर्जाची सल्लागार समिती नेमून चौकशी करण्याची लेखी मागणी करण्यात येणे, परंतु अद्यापही या प्रकरणाची चौकशी न झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधितावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | श्री. उदयसिंग राजपुत, वि. स. स. | कित्ता |
| (४९६) | ''जि.ठाणे, भिवंडी तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वडपे- भिणार- निंबवली रा.मा. क्र. ८४ वरील वडपे जंक्शनचे काँक्रिटीकरण करणे, भिवंडी पारोळ रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे व तुळशी करंजोटी ग्रा.मा क्र. १३६ कुबेरी नदीवर लहान पूलाचे बांधकाम करणे, कामोटी नदीवर नदी नाका येथे नवीन पूल बांधणे, चे काम मे.मयुर कन्स्ट्रक्शन यांनी करणे सदर काम करीत असताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन पुलाचे व रस्त्यांचे काम निकृष्ट केले असणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही तक्रारी करून सुद्धा कार्यकारी अभियंता व भिवंडी उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, यांनी सदर ठेकेदार यांचे बिले काढली असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही अनेक वेळा मंत्री. सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे तक्रार करणे, सदर विषयी विभागाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण, यांच्याकडे चौकशी साठी अहवाल दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ मध्ये मागविला असणे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण हे जाणून बुजून वेळ | श्री. रईस शेख, वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | काढू पण करत असणे, बांधकाम करण्यात आलेल्या पुलाचे व रस्त्यांचे बांधकाम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे भिवंडी उप विभागात यापूर्वीच्या कामांमध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, यांनी संगनमताने ४० ते ५० कोटी रुपयाचा भ्रष्टाचार केल्याचा संशय असल्याने यापूर्वी झालेल्या व सध्या चौकशी करण्याची होत असलेली मागणी व मयुर कन्स्ट्रक्शन यांना काळ्या यादीत टाकणे, सबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील आदिवासी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| (४९७) | "मुंबई शहर व आसपासच्या विभागात शिधावाटप कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची ४० टक्के कमतरता असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांची कमतरता असल्याकारणाने सामान्य नागरिकांना विशेषतः जे मानखुर्द – शिवाजीनगर सारख्या झोपडपट्टी विभागात राहणारे नागरिक आहे अशा लोकांना शिधावाटप पत्रिका मिळण्यास व धान्य मिळण्यासाठी अडचण निर्माण होत असल्याचे हि निदर्शनास येणे, शिधावाटप कार्यालयामध्ये असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांची नियुक्ती करून असणारी कमतरता लवकरात लवकर भरण्यात यावी अशी मागणी मा. विधानसभा सदस्य, सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था यांच्यामार्फत करण्यात येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अबू आजमी, वि. स. स. | कित्ता |
| (४९८) | "दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानूसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरीपुरवठा, मुंबई यांच्या आस्थापनेवरील १३९१ पदांना मंजुरी दिलेली असणे, विभागातील एकूण ४९९ पदे कमी करण्यात येणे, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राचा विचार करता, सततची वाढणारी लोकसंख्या, मुंबईवर कोसळणारी नैसर्गिक आपत्ती, तसेच कर्मचारी/अधिकारी यांचेवर कामाचा मोठा ताण पडणार असून कर्मचारी शासनाच्या महत्वाकांशी योजना जनतेला पूरवू न शकणे, विभागातील पदे कमी झाल्यास शासनाच्या महत्वाकांक्षी योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यास मोठ्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता, अन्नधान्य, केरोसीन, बायोडिझेल व वेळोवेळी नियंत्रित करण्यात येणाऱ्या शिधाजीन्यांचा काळाबाजार रोखणे शक्य होणार नाही, हा काळाबाजार | श्रीमती मनिषा चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | रोखण्यास कर्मचारी कमी पडल्यास जनता त्यांच्या हक्कापासून वंचित राहणे, हा विभाग लोकाभिमुख व गोरगरीब जनतेला अन्नधान्य पुरविणारा असल्याने या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची पदे कमी करु नये यासाठी होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना.” | | |
| (४९९) | “राज्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर गगनाला भिडत असतांनाच पेट्रोल पंपांवर हेराफेरीचा प्रकार राजरोसपणे सुरू असल्याची गंभीर बाब दि.२२ फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास आलेली असणे, वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी मशिनवर ठराविक रक्कम टाकल्यानंतर केवळ मशिनवरील काटे फिरत असणे मात्र वाहनांमध्ये इंधन कमी प्रमाणात भरले जात असल्याची धक्कादायक बाब अलिकडील काळात वारंवार उघडकीस आलेली असणे, गॅसपंपावर कमी दाबाने पुरवठा केला जात असतांनाच किंमत मात्र जादा वसुल केली जात असणे, पेट्रोल, डिझेल व गॅस पंपचालक, व्यवस्थापक, सुपरवायझर व कर्मचारी यांच्या संगनमताने सुरू असलेला प्रचंड आर्थिक गैरव्यवहार, राज्यभरात ग्राहकांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केली जात असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागाकडून मात्र वेळोवेळी तपासण्या केल्या जात नसल्याने या टोळ्यांचे फावलले असणे, यामध्ये विविध ठिकाणी रॅकेट कार्यरत असून शासकीय यंत्रणांच्या संगनमताने राजरोसपणे ग्राहकांची आर्थिक फसवणुक केली जात असणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, यासंदर्भात उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील वाहनचालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, वाहनचालकांची प्रचंड आर्थिक लुट होत असतांनाही शासनाकडुन त्यास पायबंद घातला जात नसणे, सदरबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्यासंदर्भात प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.” | डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री. रोहित पवार, श्री. अनिल पाटील, वि. स. स. | कित्ता |
| (५००) | “सांगली व नाशिक भागात द्राक्ष शेतकऱ्यांची अनोळखी व्यापाऱ्यांकडून फसवणूक होण्याच्या घटना समोर येणे, द्राक्षाचे भाव घसरल्यामुळे शेतकरी अडचणीत पडलेले असणे, स्थानिक व्यापारी शेतकऱ्यांना चांगला भाव देत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असणे, अशा वेळी स्थानिक व्यापाऱ्यांपेक्षा अधिकच्या | श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. धिरज देशमुख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | भावात माल घेण्याचे आमिष देऊन शेतकऱ्यांचा माल विकत घेतला जाणे व शेतकऱ्याला तोकडी रक्कम देऊन काही दिवसांनी उर्वरित रक्कम देण्याचे आमिष दाखवले जाणे, सांगली जिल्ह्यात जवळपास २० शेतकऱ्यांची सुमारे ५० लाखांची फसवणूक झाल्याची घटना दिनांक ९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, हे व्यापारी व दलाल झारखंड, उत्तरप्रदेश आदि राज्यांतील असल्याचे निदर्शनास येणे, हे दलाल माल घेऊन अनरीचेबल झाल्याचे निदर्शनास येणे, तासगाव तालुक्यातील मणेराजुरी येथील २० द्राक्ष शेतकऱ्यांची सुमारे ४७ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट होणे, गेल्या वर्षी याच गावातील शेतकऱ्यांची अशाच अनोळखी दलाल व व्यापाऱ्यांनी दोन कोटी रुपयांची फसवणूक होणे, असेच प्रकरण गेल्या वर्षी सन २०२२ मध्ये नाशिक येथील दिंडोरी व मोहाडी च्या शेतकऱ्यांसोबत देखील घडणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करून सदर व्यापारी व दलाल यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करून लवकरात लवकर अटक करणे व शेतकऱ्यांना फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून देणे गरजेचे असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व तातडीने करावयाची कारवाई." | | |
| (५०१) | "राज्यात प्रधानमंत्री पीकविमा योजना व अन्य योजनेंतर्गत शेतीपिकांना विमा संरक्षण दिले जात असणे, सन २०२२ च्या खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात पावसाने नुकसान होऊनही पीकविमा मात्र अत्यंत अल्प प्रमाणात मिळणे, अनेक शेतकऱ्यांना विम्यापोटी भरलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कम भरपाई म्हणून मिळालेली असणे व विमा कंपन्या मात्र कोट्यवधी रुपयांचा नफा कमवत असणे, बीड जिल्ह्यात सन २०२० पासून ८०-११० या सूत्रातील बीड पिकविमा पॅटर्न लागू करण्यात आलेला असून हा पॅटर्न इतर राज्यात देखील लागू करण्यात आलेला असणे, विमा कंपन्यांची नफेखोरी रोखणे, पिकविम्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा व आर्थिक संरक्षण मिळण्याची तसेच प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने देखील स्वतःचे पीकविमा धोरण राबविण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. धनंजय मुंडे वि. स. स. | कित्ता |
| (५०२) | "जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, रावेर, बोदवड, यावल, भुसावळ व जामनेर येथे केळी हे मुख्य पिक असल्याने येथील केळी उत्पादकांच्या मदतीकरिता कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे केळी संशोधन व तंत्रज्ञान प्रसार केंद्र स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.कृषि मंत्री यांच्याकडे | श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | लेखी निवेदनाद्वारे करण्यात येणे, परंतु अद्यापही या संदर्भात शासनाने कोणताच निर्णय घेतला नसल्याने केळी उत्पादकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका." | | |
| (५०३) | "द्राक्ष बागावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास त्यावरील बुरशीचा नाश होण्यासाठी बाजारात विविध प्रकारचे बुरशीनाशक औषधे विक्रीस असणे, त्यापैकीच एक असलेले बायर कॉप सायंन्स लिमिटेड ही एक मल्टीनॅशनल कंपनी असून द्राक्ष बागेवरील भुरी या रोगावर फवारणी करणेसाठी लुना हे प्रोडक्ट बाजारात असणे, यंदाच्या वर्षी द्राक्ष बागांवर खूप मोठ्या प्रमाणात भुरी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी बायर कॉप सायन्स लिमिटेड या कंपनीचे लुना प्रोडक्टचा वापर केलेला असून या औषधाचा कुठलाही परिणाम हा या रोगावर झाल्याचे दिसून आलेले नसणे, याउलट निर्यातक्षम द्राक्ष असतांना मात्र या औषधाच्या फवारणीमुळे ते निर्यातीसाठी रिजेक्ट केलेले असणे, दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी अशाच प्रकारे द्राक्ष बागेचे एक सॅम्पल रिजेक्ट झाल्याची बाब समोर येणे, या नुकसानीचा पंचनामा देखील कृषी विभागाने केलेला असणे, अशा प्रकारे अनेक शेतकऱ्यांचे सॅम्पल हे केवळ बायर कंपनीच्या लुना या औषधामुळे रिजेक्ट झालेले असल्याने द्राक्ष उत्पादक शेतकरी पुरता हवालदिल झालेला असल्याची बाब दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी उघडकीस येणे, त्यामुळे उक्त कंपनीने शेतकरी वर्गाची फसवणूक केल्याने या कंपनीवर कारवाई करण्याची शेतकरी वर्गाची असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. दिलीपराव बनकर, श्रीमती सरोज आहिरे वि. स. स. | कित्ता |
| (५०४) | "पुणे मुंबईसह इतर शहरांमध्ये सीबीएससी बोर्डच्या ६०० शाळा बोगस किंवा अनधिकृत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या शाळांना सीबीएसई, आयसीएसई बोर्डासाठी राज्य शासनाच्या बनावट एनओसी दिल्याचे निदर्शनास आलेले असणे, "राज्यात गाजलेल्या टीईटी घोटाळ्यानंतर बनावट सीबीएससी शाळा वाटप करणारी टोळी मंत्रालयात निर्माण झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, सुमारे १२ लाख रुपयांमध्ये बनावट ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देऊन राज्यभर अशा शाळा सुरू झाल्या असणे, विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातील काही शाळांना देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून येणे, यानंतर शिक्षण | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अस्लम शेख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | विभागाने मुंबईसह मोठ्या शहरात बनावट शाळांची शोध मोहीम सुरू केलेली असणे, त्यामध्ये शेकडो शाळा अशा प्रकारच्या बनावट ना हरकत प्रमाणपत्राच्याद्वारे सुरू झाल्याचे निष्पन्न होणे, ज्या शाळांकडे बनावट प्रमाणपत्र आढळून आले त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचे आदेश शिक्षण उप संचालक, पुणे यांनी दिलेले असले तरी अद्याप एकही प्रकरणात पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे राज्यातील विद्यार्थी, पालक यांची राज्य शासनाच्या संदर्भात निर्माण झालेली असंतोषाची भावना, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (५०५) | "पूर्व उच्च प्राथमिक म्हणजेच इयत्ता पाचवी आणि पूर्व माध्यमिक म्हणजेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जात असणे, सन २०२२ च्या जुलै महिन्यात झालेल्या परीक्षेचा निकाल दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी जाहिर करण्यात येणे, त्यात पाचव्या वर्गातील १६ हजार २३२ आणि आठव्या वर्गातील १२ हजार ९३९ असे २९ हजार १७१ विद्यार्थी शिष्यवृत्तीला पात्र ठरलेले असणे, पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक परीक्षा परिषदेला कळविणे आवश्यक असतांना सुध्दा संबधित शाळेंनी अघापही पात्र विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक कळविलेले नसणे, त्यामुळे परीक्षा परिषदेकडून वारंवार सूचना दिल्यांनतरही संबधित विद्यार्थ्यांच्या शाळांनी तेथील मुख्याधापकांनी या कामाकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष केल्याने राज्यातील तब्बल २२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी शिषवृत्तीपासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती दिनांक १८ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्देशनास येणे, यात इयत्ता पाचवीचे वंचित विद्यार्थ्यांमध्ये चंद्रपूर ३१९, गडचिरोली १३०, गोंदिया १९२, यवतमाळ ३७७, रायगड २७९, ठाणे ५०२, पालघर २३८, पुणे ८४२, अहमदनगर ५८८, सोलापूर ५३७, नाशिक ५९७, धुळे २२१, जळगाव ४४५, नंदूरबार १८३, कोल्हापूर ४३८, सातारा ३५८, सांगली ३५३, रत्नागिरी १७४, सिंधुदुर्ग ९३, छत्रपती संभाजीनगर ४०३, जालना २१४, बीड ३३९, परभणी १८९, हिंगोली १३९, अमरावती ४३०, बुलडाणा ३३७, अकोला २७०, वाशिम १९१, यवतमाळ ३७७, नागपूर ६९६, भंडारा १७५, वर्धा १६१, लातूर ३३५, धाराशिव २१८, नांदेड ३९०, मुंबई १२५० अशा प्रकारे एकूण १२ हजार ६३३ तर इयत्ता सातवीतील वंचित विद्यार्थ्यांमध्ये चंद्रपूर ११३, गडचिरोली ११, गोंदिया १५४, यवतमाळ १९५, रायगड २४८, | श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. अबू आजमी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | ठाणे ३६१, पालघर १२९, पुणे ७३६, अहमदनगर ४५२,सोलापूर ४८०, नाशिक ५८७, धुळे २२८, जळगाव २९२, नंदूरबार १६१, कोल्हापूर ३७३, सातारा ३५१, सांगली ३०८, रत्नागिरी १८४, सिंधुदुर्ग १०५, छत्रपती संभाजीनगर ३७५, जालना १७०, बीड २८३, परभणी १३७, हिंगोली १००, अमरावती १८५, बुलडाणा २७१, अकोला १८७, वाशिम १२१, यवतमाळ १९५, नागपूर २८२, भंडारा १३४, वर्धा ६१, लातूर ३११, धाराशिव १९३, नांदेड ३१९, मुंबई ९१५ अशा प्रकारे एकूण ९ हजार ५१५ विद्यार्थी शिष्यवृत्ती पासुन वंचित असणे, वर्षभर प्रचंड मेहनत घेऊन राज्यातील हजारो मुले शिष्यवृत्तीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेली असणे, असे असतांनासुध्दा शाळेतील मुख्याधापकांच्या दुर्लक्षपणामुळे, दिरंगाईमुळे तब्बल २२ हजाराच्यावर विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागत असल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये पसरत असलेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, परिणामी या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (५०६) | "बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच गटशिक्षण अधिकारी कार्यालयात विजेचे कनेक्शन असणे, परंतु वीज बिलासाठी सन २०१२ पासून जिल्ह्यातील गटशिक्षण अधिकारी कार्यालयांना शासनाकडून निधी देण्यात येत नसणे, वीज बिल न भरल्यास विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत असल्याने उक्त कार्यालयात कार्यरत कर्मचारी आपआपसात वर्गणी जमा करून विजेचे बिल भरत असणे, त्यामुळे नाहक कर्मचाऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करवा लागत असणे, त्यामुळे वीजबिलासाठी बीड जिल्ह्यातील गटशिक्षण अधिकारी कार्यालयांना निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती नमिता मुंदडा वि. स. स. | कित्ता |
| (५०७) | 'पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील सुमारे ९०० शिक्षक अंतरजिल्हा बदलीने अन्य जिल्ह्यामध्ये जाणार असल्याची बाब दि.२.२.२०२३ रोजी निदर्शनास येणे, आदिवासी बहुल पालघर जिल्ह्यात सुमारे २००० प्राथमिक विभागाच्या शाळा असून त्याठिकाणी पुरेसे प्रमाणात शिक्षण असणे गरजेचे असणे, परंतु, दि.२२.१२.२०२२ पासून राज्य शासनाने शासनाने शिक्षकांचे आंतरजिल्हा बदलीचे आदेश काढून जारी करणे, सदरहू जिल्ह्यात आधीच शिक्षकांची २७ टक्के पदे रिक्त असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षकांची अन्यत्र बदली होणार असल्याने पर्यायी व्यवस्था करणेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | आली नसल्याने जिल्ह्यातील २००० शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवसी मुलांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होणार असल्याची चिंता व्यक्त करण्यात येणे, पालघर जिल्हा परिषदेच्या १ ली ते ७ वी पर्यंतच्या २००० शाळांमधील ४० विद्यार्थ्यांच्या पटसंख्येला एक शिक्षक आवश्यक असणे, त्याप्रमाणात शिक्षक उपलब्ध होत नसल्याने आदिवासी मुलांच्या शिक्षणावर झालेला व होत असलेला अनिष्ठ परिणाम, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, आदिवासी जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| (५०८) | "नागपूर जिल्हा परिषद सेवेतील राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना मागण्या शासनाकडे अद्याप प्रलंबित असणे, त्यात प्रामुख्याने या शिक्षकांना जिल्हा अंतर्गत पदोन्नती, याशिवाय या शिक्षकांना शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख इ. पदावर सामावून घेणे, २ जादा वेतनवाढी देणे, वेतनवाढ पुन्हा सुरू करणे, कायमस्वरुपी ओळखपत्र देण्यात यावे, शासन जिल्हा परिषद येथील विविध समित्यांवर सदस्यत्व द्यावे, वर्ग १ व २ पदांवर नेमणूक सेवाजेष्ठतेप्रमाणे प्राधान्य इ. मागण्या असणे, त्यांच्या या मागण्या शासनाने मान्य कराव्यात यासाठी सदर शिक्षक सातत्याने शासनासोबत संवाद करीत असणे मात्र त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील शिक्षकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया." | श्री. विकास ठाकरे, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार वि. स. स. | कित्ता |
| (५०९) | ''शेळेवाडी (जि.कोल्हापूर) येथील माध्यमिक शाळेमध्ये एका शिक्षकाने विद्यार्थिनींना पॉर्न व्हिडिओ (अश्लिल चित्रफित) दाखविल्याचा एका वृत्तवाहिनीने दि.३१.०१.२०२३ रोजी प्रदर्शित केल्याची घटना घडणे, सदरहू शिक्षक वर्गामध्ये शिकवित असताना मुलींच्या बाजुला जाऊन बसणे, त्यांच्या अंगावरून हात फिरवणे अशा घाणेरड्या पद्धतीची अनेक अश्लिल कृत्ये शिक्षकांनी केले असल्याची तक्रार विद्यार्थिनींनी पालकांकडे करण्यात येणे, पालकांनी शाळा व्यवस्थापनाकडे तक्रार केली असता, शाळा व्यवस्थापनाने दोषी शिक्षकांविरुद्ध कोणतीच कारवाई न करता त्याची अन्यत्र शाळेत बदली करून सदर प्रकरण दडपून टाकल्याचा प्रकार घडणे, सदर प्रकरणी विद्यार्थी-पालकांनी केलेली तक्रार मागे घेण्यासाठी शिक्षकांकडून पालकांवर दबाव टाकूण्यात येणे, सदर प्रकरणी संस्था चालकांनी दोषी शिक्षकांस त्वरीत सेवेतून बडतर्फ करणे, त्याचेविरुद्ध पोलीसांत गुन्हा दाखल करून आणि त्याची शिक्षण विभाग अधिकारी | श्री. सुनिल प्रभू वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | यांच्याकडे लेखी तक्रार करून कारवाई करणे अपेक्षित असताना अद्याप याबाबत कोणतीच कारवाई न केल्याचा घडलेला प्रकार, यामुळे अन्यत्र बदली केलेला दोषी शिक्षक नवीन बदलीच्या ठिकाणी असे अशी कृत्ये करणार नाही याबाबत कोणतीही शास्वती नसणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शालेय विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे, चिंतेचे व असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | | |
| (५१०) | "राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी बारावीच्या इंग्रजी प्रश्नपत्रिकेत चुका केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, प्रश्नपत्रिकेतील ८० गुणांपैकी सहा गुणांचे प्रश्न चुकल्याचा प्रकार मंडळाच्या ढिसाळ कारभारामुळे घडला असणे, त्यामध्ये, ज्युनियर कॉलेजच्या शिक्षकांनी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासण्यावर बहिष्कार घातला असल्याने इंग्रजी विषयाच्या मुख्य नियामकांची बैठक झाली नसणे, त्यामुळे इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटी प्रश्नी मुख्य नियामकांची संयुक्त सभा आयोजित करण्याची गरज, तसेच त्रुटीबाबत सभेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालावरून विद्यार्थ्यांना योग्य न्याय देण्याची आवश्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | श्री. अतुल भातखळकर, श्री. प्राजक्त तनपूरे, श्री. छगन भुजबळ, श्रीमती सीमा हिरे, वि. स. स. | कित्ता |
| (५११) | राज्यात इयत्ता बारावीच्या परीक्षा दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ तर दहावीची परीक्षा दिनांक २ मार्च, २०२३ पासून सुरू झालेली असणे, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परीक्षाबाबत कठोर नियमावली जारी केलेली असणे, त्यावर सविस्तर प्रक्रिया उमटत असतानाच परीक्षेचे वेळापत्रकात दोन दिवस दहावी बारावी पेपर एकाच वेळी ठेवल्याने शाळा स्तरावर संभ्रमाची परिस्थिती निर्माण होणे, याबाबत शिक्षण मंडळाकडून घोळ झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होणे, शिक्षण मंडळ स्वायत्त असनाही परीक्षेच्या वेळापत्रक ठरवताना मंडळाने कोणता प्रारूप आराखडा करून परीक्षा वेळापत्रक जाहीर करण्याची जाहीर केले हे मंडळालाच माहीत नसल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण होणे, या गोंधळास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने तातडीने चौकशी करून अहवाल मागवण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना." | श्री. सुभाष देशमुख वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| (५१२) | "राज्यातील व्यवसाय शिक्षकांचे वेतन मागील सहा महिन्यांपासून थकीत असल्याने व्यावसायिक शिक्षकांची उपासमार सुरू असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली असणे, सन २०१५ पासून शालेय शिक्षण विभाग अंतर्गत समग्र शिक्षा कार्यालय व्यवसाय शिक्षण शाळांमध्ये एकूण बाराशे पेक्षा जास्त शिक्षक कार्यरत असून त्यात अति दुर्बल वंचित आदिवासी विद्यार्थ्यांना ते कौशल्य भूमिका करून स्वयंरोजगार रोजगार उपलब्ध करण्याचे कार्य करत असतानाही गेल्या सहा महिन्यापासून वेतन न देणे, यावर शासनाने करावयाची योजना उपाययोजना व कार्यवाही." | डॉ. बालाजी किणीकर वि. स. स. | कित्ता |
| (५१३) | "भारत हा कृषी प्रधान देश असूनही आपल्या देशामध्ये शालेय व माध्यमिक शिक्षणामध्ये मध्ये कृषी विषय शिकवला जात नसणे, महाराष्ट्र राज्यात शालेय व माध्यमिक शिक्षणात कृषि विषय अनिवार्य करण्यात यावा अशी मागणी वारंवार लोकप्रतिनिधी, विविध कृषी संघटनांनी शासनाकडे केलेली असणे, यासंदर्भात अनेक वेळा शासनस्तरावर बैठकाही घेण्यात येणे, परंतू अद्यापही सदर प्रकरणी निर्णयात्मक कार्यवाही व अंमलबजावणी न होणे, युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन, २०१७ च्या अहवालानुसार उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर सर्वात जास्त म्हणजे एक कोटी पेक्षा जास्त मुले (३६.०६ टक्के) कला शाखेमध्ये शिक्षण घेत असणे, त्यापाठोपाठ १९.०९ टक्के मुले विज्ञान शाखेमध्ये तर कॉमर्समध्ये १६.२८ टक्के मुले शिकत घेत असणे, भारतासारखा कृषीप्रधान देशामध्ये कृषी शाखेमध्ये जाणारी मुले केवळ ०.११ टक्केच असणे, आपल्या जीडीपीमध्ये कृषीपेक्षा व्हेटर्नरी कडून येणारी जीडीपी जास्त असणे, मोठया प्रमाणात मुले आर्थिक अडचणीमुळे इयत्ता १० वी नंतरचे शिक्षण घेवु न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय शिक्षणात कृषि विषयाचे ज्ञान दिल्यास कृषि व कृषि संलग्न व्यवसाय उदा. फुलशेती, मत्स्यशेती, मधुमाक्षिका पालन, पोल्ट्री इ. अधिक कौशल्याने करून त्याद्वारे अर्थार्जन वाढवता येण्यास सोयीचे होणार असणे, या नव्या कृषी क्रांतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असणे, राज्यात सध्या सुक्ष्म सिंचन, किटकनाशके, खते, बियाणे, पिकपोषण, सेंद्रीय - जैविक उत्पादने शेती यंत्र निर्मिती या क्षेत्रामध्ये विविध कंपन्या व उद्योगाचा मोठया प्रमाणात मनुष्यबळाची गरज असणे, मात्र या संस्थांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नसणे, छोटी अभ्यासक्रम तयार करून मोठ्या प्रमाणात अभ्यासक्रम घ्ऊघ् च्या माध्यमातुन शिकवल्यास कृषि उद्योजक वाढण्यास मदत होणार असणे, कर्नाटक, पंजाब, हरियाणा या राज्यात शालेय | डॉ. राहूल पाटील वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | व माध्यमिक शिक्षणास कृषि विषय अनिवार्य करण्यात आलेला असणे, इतर राज्यांप्रमाणेच आपल्या महाराष्ट्र राज्यातील शालेय व माध्यमिक शिक्षणामध्ये येणाऱ्या शैक्षणीक वर्षापासून कृषि विषय अनिवार्य करण्याच्या अनुषंगाने शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया.'' | | |
| (५१४) | "राज्यातील शालेय विद्यार्थी/विद्यार्थिनींमध्ये वाचन संस्कृती व आवड रुजविण्याचे काम हे शालेय ग्रंथपाल करत असणे, शालेय ग्रंथालयातील महत्वाचा घटक 'ग्रंथपाल हा असून तो महत्वाची भूमिका पार पाडत असणे, मात्र सध्यः परिस्थितीत राज्यातील माध्यामिक व उच्चमाध्यमिक विद्यालयातील गेल्या अनेक वर्षापासून ग्रंथपालांची रिक्त पदे भरली गेली नसणे, याबाबत माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयातील ग्रंथपाल पदांची रिक्त पदे तात्काळ भरणे, 'शाळा तिथे ग्रंथालय' या तत्वाचा अवलंब करून प्रत्येक विद्यालयात ग्रंथपाल पद भरणे, शालेय ग्रंथपाल पदासाठी असलेली विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याची आवश्यकता असून, याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | श्री. रवींद्र धंगेकर,श्री. अमिन पटेल, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | कित्ता |
| (५१५) | "मुंबई महानगरपालिकेत मान्यता न घेता महापालिका क्षेत्रात २६९ अनधिकृत शाळा गेल्या १० वर्षापासून चालू असणे, सदर शाळा मुख्यतः कुर्ला, सायन, धारावी, वडाळा, माटुंगा, इत्यादी भागातील असणे, सदर बोगस शाळांना महापालिकेने नोटीस देऊनही पुढे कोणतीही कारवाई न होणे, बेकायदा शाळांच्यासंदर्भात कारवाई करण्याचे अधिकार मुंबई महापालिकेला नसणे, नोटीस बजावण्यात आलेल्या शाळांची यादी दरवर्षी शासनास सादर करण्यात येणे, शासनाने सदर याद्यांवर कोणतीही कारवाई न करणे, विना परवाना सुरु असलेल्या शाळांनी विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन करण्याची आवश्यकता, झाल्याने केलेली व करावयाची उपाययोजना, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | श्रीमती यामिनी यशवंत जाधव वि. स. स. | कित्ता |
| (५१६) | "राज्यातील सीमावर्ती भागात मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा उपलब्ध नसणे, या ठिकाणी ३६ माध्यमिक शाळा सुरू करण्याबाबत दिनांक ८ ऑगस्ट, २०११ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात येणे, या निर्णयाच्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील जत, चंद्रपूर, नाशिक या जिल्ह्यातील सीमावर्त्ती भागातील ३६ गावांमध्ये मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा विशेष भाग म्हणून अनुदान तत्त्वावर शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात येणे, त्यानुसार शैक्षणिक वर्ष सन २०१३- १४ मध्ये जाहिरात देऊन खाजगी शिक्षण | श्री. विक्रमसिंह सावंत,श्री. नानाभाऊ पटोले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र (१) | थोडक्यात विषय (२) | सदस्यांची नावे (३) | चर्चा झाल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| | संस्थांकडून अर्ज मागविण्यात येणे, यासाठी काही अटी शर्तीनुसार प्रस्ताव गुणानुक्रमे सादर करून शालेय शिक्षण विभागाकडे प्रलंबित असणे, सदरचा प्रस्ताव दिनांक २ मार्च, २०१७ रोजी रद्द करण्यात येणे, त्यामुळे सीमावर्त्ती भागातील ३६ गावांमधील शाळा सुरू न झाल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने सीमा भागातील मराठी बांधवांची व भाषिकांची गैरसोय लक्षात घेऊन सदर प्रस्ताव पुन्हा मंजूर करून सीमावर्त्ती भागातील मराठी भाषिकांना न्याय देण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (५१७) | "बँकांमधील ठेवींना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा संरक्षण कायद्याच्या धर्तीवर राज्यात पतसंस्थांमधील ठेवींनाही विमा संरक्षण देण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे, कष्टकरी वर्गापासून मध्यमवर्गीय पर्यंतच्या ठेवीदारांना सावकारी पाशातून मुक्तता मिळून आर्थिक बळ मिळणार असणे, त्यामुळे, असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देऊन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | श्री. अतुल भातखळकर वि. स. स. | कित्ता |
| (५१८) | "दि. ४ फेब्रुवारी, २०२३ रोजी खाजगी सावकारीच्या वसुलीला त्रासून नाशिकरोड भागामध्ये दोन सख्या भावंडानी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे निदर्शनास येणे, तसेच दि. ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी शहरात फूड डीलेव्हरी करणाऱ्या तरुणाने व्याजाने घेतलेल्या पैशांच्या वसुलीसाठी अपहरण केल्याची घटना नाशिक शहरातील उपनगर परिसरात निदर्शनास येणे, दि.२९ जानेवारी, २०२३ रोजी सातपूर (जि. नाशिक) येथे तीन जणांनी खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केलेली असणे, या घटनेनंतर सहकार विभागाने सातपूर मधील खाजगी सावकाराच्या घरावर छापे टाकून फाईल जप्त केल्यामुळे या प्रकरणात कारवाई करणाऱ्या पथकाबरोबर आलेल्या पोलिसांनाच खाजगी सावकाराने धमकी दिल्याची धक्कादायक बाब दि. ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, माहे मार्च, २०२२ मध्ये म्हसरूळ (जि.नाशिक) येथील ४२ वर्षीय व्यक्तीने, माहे जानेवारी, २०२२ मध्ये अशोकनगर सातपूर येथील युवकाने तर माहे डिसेंबर, २०२२ मध्ये आनंदवली येथील एका व्यक्तीने तसेच पाथर्डीफाटा येथील एका दांपत्याने तर पेठरोड येथील सुद्धा एका व्यक्तीने सावकारांच्या धमक्यांमुळे आत्महत्या केलेली असणे, नागरिकांच्या आर्थिक असहाय्यतेचा गैरफायदा घेत सामान्य नागरिकांकडून | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अवाच्या सव्वा दराने व्याज वसुली करणाऱ्या सावकारांचे नाशिकमध्ये पेव फुटलेले असणे, या सावकारांमुळे वर्षभरात अनेक जणांचे बळी गेलेले असणे, नाशिक जिल्ह्यातील खाजगी सावकारीवर अंकुश आणण्यासाठी सहकार आणि गृह विभागाला अपयश आलेले असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (५१९) | "शेतकऱ्यांनी टोकाई सहकारी लि., कुरुंद्रा (ता.वसमत, जि.हिंगोली) या साखर कारखान्यास ऊस दिलेला असून दिनांक १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी यांचे ऊसाचे पैसे दिलेले नसणे, या कारखान्याने खुल्या बाजारात साखर बर्गस मोलॅसेस राख हे खुल्या मार्केट विकले असून आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्याचे निदर्शनास येणे, सन २०२२-२३ या वर्षाच्या गाळपाचे अंदाजे १ लाख मेट्रीक टन ऊसाचे बील रुपये २० ते २२ कोटी शिल्लक असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे ऊसाचे पैसे दिले नाहीत साखर आयुक्त, पुणे यांनी कारखान्यांवर RRC ची कारवाई केली व नंतर कारखाना प्रशासनाने कारखान्याची FRP १३ कोटी ६५ लाख रुपये शेतकऱ्यांना तीन हप्ते करुन देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्यामुळे साखर कारखान्याकडे सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील FRP चे पैसे देण्याबाबत शेतकऱ्यांकडून होत असलेली आग्रही मागणी तथापि टोकाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांनी थकीत असलेले ऊसाचे २३ कोटी रुपये देणे शक्य नसल्याचे मा.साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यासाठी शासनस्तरावरुन अध्यक्ष व संचालक मंडळास जबाबदार धरुन शेतकऱ्यांचे पैसे देण्याचे शासनाने आदेश देण्याची आवश्यकता, परिणामी शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेले भितीचे वातावरण व उदासिनतेची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. चंद्रकांत नवघरे वि. स. स. | कित्ता |
| (५२०) | "आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात महाराष्ट्रात नवीन सहकारी सूतगिरण्यांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर जिल्हा सोलापूर या गिरणीस दिनांक १७ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यास मान्यता दिलेली असणे, याच काळात आठव्या | श्री. रोहित पवार वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br>(१) | थोडक्यात विषय<br>(२) | सदस्यांची नावे<br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
| --- | --- | --- | --- |
| | पंचवार्षिक योजनेत समाविष्ट असलेल्या बऱ्याच सहकारी सूतगिरणी प्रकल्प उभारणीबाबत कारवाई सुरू केली परंतु प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर या सूतगिरणीने नोंदणी कालावधी पासून २१ वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही प्रकल्प उभारणी बाबत प्रगती न केल्यामुळे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ ( १ ) क एक व चार मधील तरतुदीनुसार वस्त्रोद्योग संचालनायक दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी गिरणी औसायनात काढण्याबाबतचा आदेश निर्गमित करणे, दिनांक २ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर या सूतगिरणीचा आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली होती संदर्भीय शासन निर्णयानुसार सदरहू सूतगिरणीचे शासकीय अर्थसहाय्य देण्यासाठी नव्याने निवड करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली असणे, त्यानंतर शासन पत्र दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये सदर सुतगिरणीच्या तालुका कर्जत जिल्हा अहमदनगर येथे स्थलांतरणास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येणे, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी च्या सहकार व पणन वस्त्रोद्योग विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रबोधनकार सहकारी सूतगिरणीच्या सुधारित प्रकल्प अहवालास ( किंमत ६१७४.२४ लक्ष) मान्यता दिलेली असणे, तसेच सदर सुतगिरणीने रुपये १२३ लक्ष इतके सभासद भाग भांडवल जमा करणे सदर सूतगिरणी दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये ९ कोटी रुपये इतके अनुदान वितरित करण्यात आलेले असणे, प्रबोधनकार ठाकरे सहकारी सूतगिरणीचे कर्जत येथील स्थलांतरण, प्रकल्प अहवालास मान्यता, अनुदान वितरण ही सर्व कारवाई अवघ्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१९ ते १८ सप्टेंबर, २०१९ या केवळ पंधरा दिवसाच्या कालावधीत अति वेगवान पद्धतीने शासनाने घेतलेला हा निर्णय असणे, सदर सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन प्रगतीचा तिमाही अहवाल आयुक्त वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी शासनास सादर करण्याचे व प्रस्तुत सूतगिरणी संदर्भात शासन निर्णयान मधील तरतुदीनुसार वसुलीबाबत आयुक्त वस्त्र उद्योग यांनी काटेकोरपणे कारवाई करणे गरजेचे असणे सदर सुतगिरणीकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करून विनियोजन योग्य रीतीने होत असल्याची खात्री माननीय आयुक्त वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी करण्याची अट बंधनकारक असणे शासन निर्णयामुळे सूतगिरणीची उभारणे विहित कार्य मर्यादित पूर्ण करणे गरजेचे असतानाही सद्यस्थितीत प्रकल्प उभारणीचे | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | कुठलेही काम झालेले नसणे परिणामी शासनाच्या अनुदानात अपहार झालेल्यांची शंका निर्माण होणे संस्थेचे लेखापरीक्षण करून प्रकल्प उभारणीत झालेली दिरंगाई झालेला गैरव्यवहार तसेच शासनाची केलेली दिशाभूल याबाबत शासनाची भूमिका करावयाची कारवाई.” | | |
| (५२१) | “मुंबईतील दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेमध्ये शासकीय कर्मचारी खातेदार असून या संस्थेचा कारभार सहकार कायद्यानुसार चालत असणे, या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक दि. ८ जुलै, २०२२ रोजी ६ मतदान केंद्रावर पार पडली असून या निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदानाच्या वेळी व मतमोजणी मध्ये प्रचंड गैरव्यवहार व नियमाची पायमल्ली झाल्याचा प्रकार उघड झाला असून या निवडणूक प्रक्रियेतील सहकार पॅनल व एकता पॅनल या दोन पॅनल पैकी एकता पॅनलला मुख्य निवडणूक अधिकारी श्री.सतीश तोटावार यांनी संपूर्णपणे एकतर्फी मदत केल्याचा प्रकार उघड होणे, यामध्ये निवडणूक केंद्रावर बेकायदेशीर व्यक्तींची नियुक्ती करणे, मतदारांना ओळखपत्राशिवाय मतदानास परवानगी देणे, मंत्रालय जिमखाना येथील मतदान केंद्रावर पेपर प्रिंटेड लिस्टचा वापर करून मतदारांची रखडपट्टी करून त्यांना मतदानापासून वंचित ठेवणे, कोकण भवन सीबीडी बेलापूर येथील मतदान केंद्रावर छत्रपती संभाजीनगर येथील सुमारे दीडशे बनावट मतदारांनी मतदान केल्याने सहकार पॅनलने आक्षेप घेतला असता तो आक्षेप फेटाळणे, छत्रपती संभाजीनगर येथे चौकशी केली असता मतदान केलेले सर्व कर्मचारी त्यांच्या कार्यालयात त्यादिवशी कामावर उपस्थित असल्याची नोंद असणे, पालघर मतदान केंद्रात एकता पॅनलच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते दुचाकीवर मतपेटी रेल्वे स्टेशन पर्यंत पोहोचविण्यात येणे, एकता पॅनलच्या कार्यकर्त्यांसोबत रेल्वेमधून मतपेटी मुंबईतील मोजणी केंद्रावर आणणे, त्यावेळी सहकार पॅनलच्या कार्यकर्त्यांना प्रवेशाला मनाई करणे, चर्चगेट स्टेशन वरून खाजगी वाहनाने मतपेटी मोजणी केंद्रात आणणे, वास्तविक मतपेटी चारचाकी वाहनाने पोलीस संरक्षणात आणणे आवश्यक असताना जाणीवपूर्वक असा प्रकार करणे, मतमोजणी केंद्रासाठी संस्थेची स्वतःची प्रशस्त जागा सीबीडी बेलापूर येथे उपलब्ध असून सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही त्या ठिकाणी मतमोजणीची परवानगी न देता सचिवालय जिमखाना येथे संस्थेचे अंदाजे एक लाख रुपये खर्च करून मतमोजणी केंद्र तयार करणे, मतमोजणी केंद्रावर सहकार पॅनलच्या उमेदवारांना प्रवेश न देता एकता पॅनलच्या उमेदवारांना राजरोसपणे वावर करण्यास परवानगी | ॲड. आकाश फुंडकर, श्री. शिरीष चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | देणे, मतदानाच्या वेळी व मतमोजणीच्या वेळी सहकार पॅनलने घेतलेला आक्षेपाना विचारात न घेता मनमानीपणे कारभार करणे, मतमोजणीनंतर मतपेट्या सील करून संस्थेच्या कार्यालयात ठेवणे आवश्यक असताना निवडणूक अधिकारी यांनी घाईघाईने खाजगी वाहनात मतपेटया सील करणे, याबाबत व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असणे, मतपेटी सील करताना उमेदवार, पोलिंग एजंट किंवा साक्षीदारांच्या सह्या न घेणे, दुसऱ्या दिवशी सहकार पॅनलच्या वैध मतपत्रिका आकाशवाणी आमदार निवासातील शौचालयाजवळ सापडणे, अशा अनेक प्रकारे निवडणूक अधिकारी श्री. सतीश तोटावार यांनी स्वतःच्या अधिकाराचा मनमानीपणे गैरवापर केला असणे, मतदानाच्या पूर्वी श्री. तोटावार यांनी सहकार पॅनलचे प्रमुख श्री.प्रकाश डांगे यांच्याकडे १० लाखाची मागणी करणे, याचे ऑडीओ रेकॉर्डिंग उपलब्ध असणे, सहकार पॅनलकडून रक्कम न मिळाल्यामुळे एकता पॅनलला एकतर्फी मदत करणे, उपरोक्त सर्व बाबींसंदर्भात सहकार पॅनलच्या उमेदवारांनी मुख्य निवडणूक अधिकारी, पुणे, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर, विशेष निबंधक सहकारी संस्था, पुणे, संबंधित पोलिस स्टेशन यांच्याकडे लेखी निवेदन दिलेले असणे, सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त प्रकरणी चौकशी करुन वस्तुनिष्ठ अहवाल प्राधिकरणास दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था , मुंबई शहर यांना पत्राद्वारे कळविणे, एकता पॅनलचे प्रमुख भाऊसाहेब पठाण हे छत्रपती संभाजीनगर येथील कृषी विभागात शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांनी गैरमार्गाने मोठी आर्थिक माया जमा केली असणे, त्यांच्या काही जवळच्या व्यक्तींच्या नावे मुंबईतील फोर्ट, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी जमिनी/घरे असणे व त्यांनी निवडणूक अधिकारी यांच्याशी आर्थिक व्यवहार केल्यामुळे एकता पॅनलला निवडणुकीमध्ये मदत मिळाल्याचे सभासदांमध्ये असलेली चर्चा, निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे न राबवता एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणे, याबाबतचे सर्व आक्षेप सभासदांनी नवीन पदाधिकारी यांच्या पहिल्या बैठकीत दि. २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी उपस्थित केले असता त्याबाबत कोणतीच बाब विचारात न घेता बैठकीतून राष्ट्रगीत अर्धवट थांबवून पळून जाणे, याबाबतची तक्रार संस्थेच्या सभासदांनी दिनांक २ मार्च, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त, मुंबई यांना करणे, श्री.पठाण यांनी | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | सोसायटीमधून स्वतःसाठी व जवळच्या व्यक्तींकरिता साक्षीदार न घेता मोठया प्रमाणात कर्ज वाटप करणे, या सर्व प्रकारामुळे यापूर्वी चांगल्या रीतीने काम करणाऱ्या क्रेडिट सोसायटीचा वापर बिनदिक्कतपणे स्वतःच्या लोभापोटी करणाऱ्या नवीन पदाधिकारी व निवडणूक अधिकारी यांचे बाबत सर्व सभासदांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने या संपूर्ण गैरप्रकाराची चौकशी करुन बेकायदेशीरपणे निवडणूक प्रक्रिया राबवून एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणाऱ्या निवडणूक अधिकारी श्री. सतिश तोटावार व त्यांना आर्थिक लाभ देणाऱ्या एकता पॅनलचे प्रमुख भाऊसाहेब पठाण यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता तसेच यापूर्वी झालेल्या निवडणूकीमधील केलेली अनियमितता विचारात घेता दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेची निवडणूक पुनश्च घेण्याबाबत व पुढील निवडणुक होईपर्यंत प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया." | | |
| (५२२) | "सहकारी गृहनिर्माण संस्थामधील मासिक देखभाल आकार न देणाऱ्या सभासदांच्या तक्रारी हाताळण्याबाबत दि. २ नोव्हेंबर, २००२ चे परिपत्रक सहकार व वस्त्रोद्योग विभागाने निर्गमित करणे, मासिक देखभाल आकार थांबवू नये, अस स्पष्ट असतांना उपनिबंधक सहकारी संस्था, के/ पश्चिम वार्ड, वांद्रे (पु) कार्यालयात मनमानी पध्दतीने कार्यभार करणे, उलट १० ते १५ वर्ष् मासिक देखभाल न भरणाऱ्या सभासदांनी संगनमत करणे, गृहनिर्माण संस्थेविरुध्द योग्य शहानिशा न करता निकाल देणे, यामुळे दहशत निर्माण होणे, असंतोष निर्माण होणे, नियम १०१ अन्वये श्री नितीन दहिभाते यांनी निकाल दिलेल्या सर्व प्रकरणांची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करण्याची आवयश्यकता निर्माण होणे, नियम ७८ अ(१) (ब) नुसार फक्त १ सभासदांना कमी करण्याचे अधिकार असतांना किंवा निवडणूकी संबंधी प्रकरणे सहकार न्यायालयाच्या कक्षेत असतांना, त्यांच्या अधिकारात नसतांना घेतलेल्या निर्णयामुळे सभासदांची छळवणूक होणे, भ्रष्टाचाराला मोठा वाव मिळणे, बदली झाली असतांना कार्यमुक्त न करण्यासाठी गैरमार्गाचा वापर करणे, लेखापरिक्षक, प्रशासकिय अधिकारी यांची चमू करुन गृहनिर्माण संस्थेचा पैसा गिळकृंत करणे, जनमानसात शासनाची प्रतिमा मलिन होत असल्यामुळे अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | श्रीमती मनिषा चौधरी वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| (५२३) | "इतर मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनींनाबाहेरगांवी मोठ्या शहरांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळुनही शासकीय वसतीगृह किंवा निवासाची पर्यायी व्यवस्था नसल्यामुळेशिक्षणापासुन वंचित राहावे लागत असणे, राज्य शासनाने इतर मागास प्रवर्गासाठी जिल्हानिहाय वसतीगृहे सुरु करण्याचा निर्णय घेतला असणे, मात्र ही वसतीगृहे "बाबू जगजीवनराम छात्र आवास" योजनेअंतर्गत केंद्र सरकारचा ६०% व राज्य शासनाचे ४०% टक्के निधीमधून बांधली जाणार असणे, वस्तुतः "बाबू जगजीवनराम छात्र आवास" ही योजना बंद झाल्यामुळे राज्यातील इतर मागास वसतीगृहे बांधकामाला खीळ बसली असणे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे नाशिक येथे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी १०० मुले व १०० मुलींचे मातोश्री वसतीगृह हे राज्यासाठी पथदर्शी असणे, या वसतीगृहाच्या बांधकामासाठी रु. ७ कोटी निधी खर्च झाला असणे, याप्रमाणेच जिल्हानिहाय ७२ वसतीगृहांचे बांधकाम रु. ५०० कोटी मध्ये केले जाऊ शकत असणे, दिड ते दोन वर्षांमध्ये ही वसतिगृहे बांधली जाऊ शकत असणे, यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये वसतीगृहांसाठी जागा निश्चित करून इतर मागासवर्ग विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी जिल्हानिहाय स्वतंत्र वसतीगृहे बांधण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | श्री. छगन भुजबळ,श्री. जयंत पाटील,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |
| (५२४) | "कोल्हापूर शहरास ऐतिहासिक वारसा लाभला असून करवीर निवासिनी श्री.अंबाबाई यांचे जागृत देवस्थान असून संपूर्ण राज्यासह जगभरातून भाविक, भक्त, पर्यटक कोल्हापूर येथील अंबाबाईच्या दर्शनाला येत असतात. तसेच करवीर निवासिनी श्री अंबाबाई आणि श्री क्षेत्र जोतिबा यासह ३०६७ देवस्थानाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने भाविक-भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी अनेक प्रकल्प हाती घेण्यात आलेले असणे, परंतु जागतिक कोरोना महामारी आणि इतर निधी न मिळाल्याच्या कारणामुळे बहुतांश प्रकल्प रखडलेले असणे, तसेच यातील काही बहुतांश प्रकल्प शासनाच्या निधीतून होत असून तसेच कोल्हापूर येथील पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या रखडलेल्या प्रकल्प यांना शासनाने निधी न दिल्यामुळे बरीचशी कामे अपूर्णावस्थेत असल्याने भविकांत प्रचंड नाराजी पसरलेली असणे, तसेच महत्वाच्या प्रकल्पापैकी शासनाने मान्य केलेल्या सुमारे २५ कोटी रूपयाच्या निधीतून श्री क्षेत्र जोतिबा देवस्थान विकास आराखडा प्रकल्प हा ही अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने तो तातडीने मार्गी लागावा | श्रीमती जयश्री जाधव वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | व दुसऱ्या टप्प्यातील कामाचे आराखडे तयार करण्यासाठी सदर समितीने पाठपुरावा करावा अशी मागणी असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रलंबित प्रस्ताव यास तातडीने निधी देण्याचे मागणी केलेली असणे, परंतु शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| (५२५) | “प्राचीन काळापासून गडकोट, किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्व असून त्याद्वारे राज्याचे संरक्षण केले जात असणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात ३६० किल्ल्यांचा उल्लेख असून महाराष्ट्र राज्यामध्ये सह्याद्रीच्या डोंगररांगा व पश्चिम घाट असल्यामुळे त्यापैकी जास्तीत जास्त किल्ले हे महाराष्ट्रात आढळून येणे, शिवरायांच्या स्वराज्यातील प्रत्येक किल्ल्याला स्वतःचा असा एक इतिहास असणे, जसे शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवरायांचा जन्म, स्वराज्याची पहिली राजधानी राजगड व त्यानंतरची राजधानी असलेला अभेद्य असा रायगड किल्ला ज्या ठिकाणी छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक करण्यात आलेला असणे, तसेच अजिंक्य असा जलदुर्ग म्हणून जंजिरा किल्ला, सिंहगड, पन्हाळा , विशाळगड अश्या अनेक किल्ल्यांचा जाज्वल्य इतिहास आपल्याला ऐकायला मिळत असणे, परकिय आक्रमणामुळे तसेच काळानुसार अनेक किल्ल्यांची पडझड झालेली आपल्याला सद्यःस्थितीत पहावयास मिळणे, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्रीय व राज्य पुरातत्व खाते तसेच विविध संस्था गडकोट संवर्धनासाठी काम करीत असणे, परंतू ज्याप्रमाणे राजस्थान, मध्यप्रदेश व अन्य राज्यामध्ये गडकिल्ल्यांचे अतिउत्तमरित्या संवर्धन केले जात आहे त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात केंद्रीय व राज्य पुरातत्व खात्याला इतिहासतज्ञाचे योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी अधिकारी उदासिन असल्याचे चित्र दिसत येत असणे, ठाणे जिल्ह्यातील ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघात घोडबंदर किल्ला येत असून राज्य पुरातत्व खात्यातील अधिकारी व वास्तूविशारद यांना विश्वासात घेऊन आमदार निधीतून व विशेष निधी आणून घोडबंदर किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम सुरू असणे, राज्यात प्रथमतः घोडबंदर किल्ल्यांवर १०५ फुटी कायमस्वरूपी भगवा झेंडा फडकविण्यात आला असून किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारण्याचे काम देखील लवकरच सुरू होणार असणे, महाराष्ट्र राज्यातील गडकोट, किल्ले हा आपला ऐतिहासिक वारसा | श्री. प्रताप सरनाईक, श्री. भिमराव तापकीर वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | असून किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आपल्या सरकारने पुरातत्व खात्याला नवीन मार्गदर्शक तत्वे घालून देऊन एका स्वतंत्र महामंडळाची निर्मिती करणे गरजेचे असणे, महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील गडकोट, किल्ल्यांची नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने डागडुजी व सुशोभिकरण करून निगा व देखभाल केल्यास तसेच ये - जा करण्यासाठी रोप - वे , फ्युनिक्युलर रेल्वे सारख्या सुविधा दिल्यास किल्ल्यांचे संवर्धन होऊन पर्यटनाला सुध्दा चालना मिळण्यास मदत होणार असणे, त्यामुळे शासनाने याबाबत तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| (५२६) | "पुरंदर, सासवड जिल्हा पुणे तालुक्यात अबालवृध्दांसह तरुणांना आकर्षित करणारे अनेक धार्मिक पर्यटन क्षेत्र निसर्गमय घाटमाथे असणे, इथे श्रीसंत सोपान देव महाराज यांची समाधी, श्री भैरवनाथ मंदिर तसेच महाराष्ट्राचे कुळदैवत श्री खंडोबा यांचा जेजुरी गड असणे, या ठिकाणी देश परदेशातून भाविक येत असणे, याशिवाय इथे अनेक निसर्गमय घाटमाथे असणे, या तालुक्यात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे जन्मस्थान पुरंदर हा गडकोट असणे, या ठिकाणी देश परदेशातून भाविक दर्शनासाठी येत असणे, या दोन्ही तालुक्यांना मोठा इतिहास असणे, मात्र इथे येणाऱ्या भाविकांना, पर्यटकांना योग्य प्रमाणात मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे येथील धार्मिक क्षेत्राला पर्यटन चालनादेण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न होताना दिसत नसल्यामुळे व शासनाकडून होत असलेला अक्षम्य दुर्लक्षामुळे जनतेत पसरलेला असंतोष व ण नाराजीची भावना त्यामुळे शासनाने पुरंदर, सासवड, जिल्हा पुणे तालुक्यातील धार्मिक पर्यटनाला चालना देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया." | श्री. संजय जगताप वि. स. स. | कित्ता |
| (५२७) | "नाशिक शहरातील पंचवटी येथे देशाची दक्षिण गंगा म्हणून प्रसिध्द असलेल्या गोदावरी काठी ५०० वर्षाहून अधिक प्राचीन काळातील श्री.काळाराम मंदीर असणे.श्री.काळाराम मंदिर हे जगभर प्रसिध्द असणे, सदरील मंदिरात दररोज सरासरी १० हजाराहून अधिक भाविक दर्शनसाठी येत असणे, सदरील मंदिराचे व्यवस्थापन श्री.काळाराम संस्थान पंचवटी नाशिक यांच्यामार्फत करीत असणे, सदरील श्री.काळाराम संस्थान, पंचवटी नाशिक याचे अध्यक्ष माननीय जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश महोदय असणे, श्री.काळाराम मंदिर येथे गुजरात राज्यातील अक्षरधाम व महाराष्ट्रातील शेगाव येथे दाखवत असलेल्या लेझर शो व विद्युतीकरणाच्या धर्तीवर श्री.काळाराम मंदिर येथे लेझर शो व विद्युतीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या | ॲड. राहुल ढिकले वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | पर्यटन व सांस्कृतिक विभागाकडून दि.०४-०१-२०१७ रोजी शासन निर्णयानुसार प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत रु.१.५० कोटी मंजूर होणे, सदरील काम निविदाव्दारे M/s.J.D. Enterprises, Pune या एजन्सीला मिळणे, सदरील M/s.J.D.Enterprises, Pune या एजन्सीला कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) नाशिक यांनी दि.१७-०७-२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देणे, सदरील M/s.J.D.Enterprises, Pune या एजन्सीने लेझर शो चे काम न करता अत्यंत निकृष्ट दर्जाच्या कापडी स्क्रीनवर चलत चित्र दाखवले जात असल्याचे गंभीर बाब निदर्शनास येणे, सदरील प्रकाराबाबत भाविकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, सदरील कार्यारंभ आदेशात असलेल्या व सादरीकरण केलेल्या लेजर शो व विद्युतीकरण पैकी काहीच प्रत्यक्षात विकास काम न करता अत्यंत निकृष्ट दर्जाचे केवळ प्रोजेक्टवरून कापडी स्क्रीनवर चलत चित्र दाखविले जात असणे, सदरील विकास कामाबाबत श्री.काळाराम संस्थेचे मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१८-८-२०१९ रोजीच्या जा.क्र.श्री.का.सं.ना पत्राव्दारे समाधानकारक काम न केल्याने व निकृष्ट दर्जाचे काम केल्याने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) नाशिक यांना सदरील M/s.J.D.Enterprises, Pune याना बिल अदा करू नये असे लेखी पत्राव्दारे कळविले असणे,तसेच दि.३०-९-२०१९ रोजी श्री.का.संस्थानचे माननीय अध्यक्ष तथा न्यायधीश जिल्हा सत्र न्यायलय नाशिक यांनी जा.क्र.२२०/२०१९ पत्राव्दारे सदर लेजर शो चे काम अपूर्ण असताना व सदरील काम पूर्ण झाल्याशिवाय कामाचा पूर्णत्वाचा दाखला देवू नये व बिल अदा करू नये असे कळविले असणे, सदरील लेखी तक्रारीकडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) नाशिक यांनी जाणून बुजून दुर्लक्ष करून सदरील एजन्सीला फायदा मिळवून देण्यासाठी न केलेल्या कामाचे व नको ते अर्धवट कामाचे एकाच टप्प्यात संपूर्ण बिल अदा करणे, श्री.काळाराम मंदिराचे मुळ पवित्र व सुंदर अशा प्रभू रामचंद्राच्या मंदिर परिसराचे अपूर्ण लेजर शो च्या साहित्यामुळे अडगळीचे स्वरूप प्राप्त होणे, सदरील अडगळीमुळे मंदिर परिसराचे पावित्र नष्ट होणे, तसेच मागील चार वर्षात आज रोजी मार्च, २०२३ पर्यंत एकदाही लेझर शो न झाल्याने सदरील शो व विद्युतीकरणासाठी वापरलेले सर्व साहित्य खराब होवून अडगळीत पडून शासनाचे रु.१.५० कोटीचे नुकसान होणे,सदरील कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) नाशिक यांनी कोणत्याही कामाची शहानिशा न करता तसेच मा.अध्यक्ष श्री.काळाराम संस्थान व लोकप्रतिनिधी तसेच भाविकांच्या लेखी तक्रारीकडे दुर्लक्ष करून | | |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | स्वतःच्या आर्थिक लाभापोटी संगनमताने M/s.J.D.Enterprises, Pune या एजन्सीला न केलेल्या कामाचे बिल अदा केल्याने स्थानिक नागरिक व भाविकांनमध्ये प्रचंड असंतोष व चीड निर्माण होणे,भ्रष्ट कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) नाशिक व इतर दोषी अधिकारी तसेच M/s.J.D. Enterprises, Pune यांची चौकशी करून कडक कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| (५२८) | "बुलढाणा जिल्हयातील सिंदखेडराजा हे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थानाने पावन झालेली नगरी मागील अनेक वर्षापासून सिंदखेडराजा हा या ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तुचा समावेश असलेल्या राज्य पुरातत्व विभाग व केंद्रीय पुरातत्व विभाग यांच्या अधिनस्त असलेल्या व सिंदखेडराजा गावाच्या विकासा-संबंधात अनेक आराखडे तयार होणे, परंतु शासनाकडून आवश्यक निधी प्राप्त न होणे, त्यामुळे अर्धवट राहिलेला सिंदखेडराजा या नगरीचा विकास व त्यामुळे इतिहासप्रेमी तसेच सर्वसामान्य नागरीक यांच्यामध्ये असलेले तीव्र नाराजी, मातृतीर्थ सिंदखेडराजाचा विकास व्हावा यासाठी तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी दिनांक २१ मे, २०२२ रोजी स्वतः सिंदखेडराजा येथे येवून संपूर्ण वास्तु पाहणी करण्यात येणे, त्यानंतर पुरातत्व विभाग, नगरपरिषद प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रिडा विभाग, महसूल विभाग, वन विभाग यांची बैठक घेण्यात येणे आणि सुधारित मातृतीर्थ सिंदखेडराजा विकास आराखडा तयार करावा अशा सूचना दिलेल्या असणे, त्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही, सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला असेल तर तो कितीचा झाला त्याची विभागनिहाय असलेली माहिती सुधारित विकास आराखडा तयार झाला नसेलतर तो कधीपर्यंत तयार करण्यात येईल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | डॉ. राजेंद्र शिंगणे वि. स. स. | कित्ता |
| (५२९) | "राज्यात २०१५ नंतर सुमारे १५००० शेतकरी विधवा असून सन २०२२ मध्ये जानेवारी ते ऑगस्ट या दरम्यान सुमारे १८७५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस येणे, शेतकरी विधवा महिलांसाठी शासकीय पेन्शन असून या पेन्शन केवळ कागदावरच राहिलेले असने, १५००० अधिक संख्येत असलेल्या ह्या शेतकरी विधवासाठी शासनाची कोणतीही एकत्रीत उपयोजना नसणे, शेतकरी आत्महत्या नंतरचा या विधवा महिलांचा विदारक वास्तव समजून घेण्यासाठी मकाम या संस्थेने केलेल्या संशोधनातून काही | श्री. लहू कानडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | धक्कादायक बाबी उघडकीस येणे,एकूण शेतकरी आत्महत्या पैकी केवळ २६ टक्केच महिला या पेन्शन साठीअर्ज केलेला असने, त्यापैकी ४७ टक्के महिलांनाच पेन्शन मिळणे, पीडितांना स्वतंत्र रेशनकार्डची मुभा असूनही फक्त ३४ टक्के आत्महत्याग्रस्त महिलांचं नाव माहेर अथवा सासरच्याच रेशनकार्डवर असणे, ७ टक्के पीडितांचं नावही रेशनकार्डवर नसणे, ६५ टक्के आत्महत्याग्रस्त पीडितांना पती निधनानंतर घराचा मालकी हक्क नाकारला जाणे, २९ टक्के पीडितांचा पतीच्या संपत्तीतील हक्क डावलला गेला असून ४० टक्के पीडिता शेतजमिनीच्या हक्कापासून वंचित असल्याचे उघडकीस येणे, ग्रामीण भागात ७५ पेक्षा जास्त महिला शेतामध्ये काम करूनही त्यांना शेतकरी म्हणून नाकारले जाणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी विधवा या हतबल होऊन ऊसतोडी सारख्या कामात गुंतलेल्या असणे, तिथे त्यांना लैंगिक छळ, अपमान ,जीवघेणी मारहाण व कौटुंबिक हिंसाचार इत्यादी अत्याचारांचा सामना करावा लागणे, साखर कारखाना, ग्रामपंचायत, पोलीस यापैकी कोणीही त्यांच्या सुरक्षिते साठी प्रयत्न न करणे, आत्महत्याग्रस्त महिला शेतकऱ्यासंदर्भात १८ जून, २०१९ रोजी झालेल्या शासन निर्णयाची अद्याप पर्यंत अंमलबजावणी न होणे, अशाप्रकारे या विधवा शेतकऱ्यांच्या मनात कायम स्वरूपी असलेली असंतोषाची व असुरक्षितेचे भावना, सबब शासनाने शेतकरी विधवा महिलाना समाजात योग्य स्थान देऊन त्यांच्या उपजीविकेबाबत शासनाने करावयाची धोरणात्मक कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| (५३०) | "नंदूरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील जुगणी गावाच्या हिरिचापडा येथे राहणाऱ्या श्रीमती. अलकाबाई अमिताभ वळवी या गेल्या ३ वर्षांपासून अंगणवाडी सेविका म्हणून हिरिचापडा येथील तेलखेडी बिट एक येथे कार्यरत असणे, त्यांना गेल्या ३ वर्षांपासून त्यांचे मानधन देण्यात आलेले नसणे, त्यांनी बालविकास अधिकारी श्री. किशोर पगारे यांच्याकडे मानधन देण्याबाबत वारंवार विनंती केली असता, त्यांनी त्याकडे हेतूपूस्पर केलेले दूर्लक्ष, त्यांनी त्यांची परिस्थिती बिकट असल्यामुळे आपले कार्य सुरुच ठेवलेले असणे, श्री. किशोर पगारे व विस्तार अधिकारी श्री. पंकज बोरसे यांनी श्रीमती अलकाबाई वळवी यांना त्रास दिल्यामुळे व त्यांचे मानधन न दिल्यामुळे त्यांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी दि.७ फेब्रुवारी, २०२३ रोजी केलेली आत्महत्या, या घटनेमुळे तेथील नागरीकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, श्रीमती. अलकाबाई वळवी यांना वेळेत मानधन दिले असते व मानसिक त्रास दिला नसता तर त्यांनी आत्महत्या | श्रीमती सरोज आहिरे, श्री. प्राजक्त तनपूरे,श्री. लहू कानडे वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | केली नसती, जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे मयत झालेल्या पत्नीच्या पतीने केलेला असणे, संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करुन मृत्यूमूखी पडलेल्या महिलेच्या कुटूंबियांस आर्थिक मदत देणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | | |
| (५३१) | "राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दि. २० फेब्रुवारी, २०२३ पासून आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप सुरु केला असणे, या संपकरी अंगणवाडी सेविकांच्या काही न्याय मागण्या असणे, त्यात प्रामुख्याने त्यांना शासन सेवेत सामावून घेणे, मानधन वाढ गॅज्युअटी लागू करणे, नवीन मोबाईल देणे, पोषण ट्रकर मराठीत करणे, आहार व इंधनाचे दर वाढविणे, अंगणवाडीचे भाडे वाढविणे, आहार, इंधन अंगणवाडी भाडे, टी.ए.डी.ए. चे थकीत देयके देणे इत्यादी मागण्या असणे, या मागण्यांच्या सोडवुणकीसाठी या अंगणवाडी सेविका सलग २ वर्षे शासनाकडे सातत्याने मागणी करीत असणे, परंतू शासन फक्त आश्वासन देत असणे, आता या अंगणवाडी सेविकांनी बेमुदत संप सुरु केला असतानाही, शासनाने हस्तक्षेप करुन सर्व मान्य तोडगा काढलेला नसणे, या अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शासनाची एकात्मिक बालविकास योजना प्रभावित होऊन कुपोषित मुलांसाठी पोषण आहार योजना ठप्प होणे, त्यामुळे राज्यातील दुर्गम, ग्रामीण भागात बालकांचे कुपोषण वाढविण्याची भिती निर्माण होणे, तसेच बालमृत्युच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे, यामुळे समाजमनात चिंता व्यक्त होत असतानाही, याबाबत कार्यवाही शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सदर विषय गंभीर व महत्वाचा विषयावर करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया." | श्री. नानाभाऊ पटोले,कुमारी प्रणिती शिंदे,श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स. | कित्ता |
| (५३२) | "एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय व कनिष्ट महाविद्यालय, मुंबई (इयत्ता ८ वी ते १२ वी) ही सरकारी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असणे, या शाळेचा बहुतांश भाग इतर कार्यालयीन कामांकरिता वापरला जात असणे, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्व.श्री. प्रमोद नवलकर यांच्यासह अनेक आदरणीय व्यक्तींनी या शाळेत शिक्षण घेतलेले असणे, अशा शाळेला व वास्तुला अखेरची घटका मोजत असल्याची अवकळा आलेली असणे, आज जागतिक स्तरावर तांत्रिक शिक्षणाला मोठी मागणी असताना या शाळेची अधोगती व्हावी यासारखे दुर्दैव नसणे, केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० | श्री. छगन भुजबळ,डॉ. जितेंद्र आव्हाड वि. स. स. | कित्ता |

| अ.क्र<br><br>(१) | थोडक्यात विषय<br><br>(२) | सदस्यांची नावे<br><br>(३) | चर्चा झाल्याचा दिनांक<br><br>(४) |
|---|---|---|---|
| | अंतर्गत व्यवसाय शिक्षणाला महत्व देण्यात आले असणे, त्या अनुषंगाने इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत शालेय शिक्षणासोबत व्यवसाय शिक्षण देण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणापूर्वीच महाराष्ट्र राज्याने व्यवसाय शिक्षणाला महत्व दिले असणे, शालेय शिक्षणाला तांत्रिक व्यावसायिक विषयांची जोड देऊन ६ वी ते ८ वी प्रास्ताविक व्यवसाय अभ्यासक्रम (Introductory Vocational Course) व ९ वी ते १२ वी अभ्यासक्रमांतर्गत एकात्मिक व्यावसायिक शिक्षणाची (Integrated Vocational Course) जोड देवून हे नवीन अभ्यासक्रम एल्फिन्स्टन तांत्रिक शाळेमध्ये सुरु करण्याची मागणी असणे, या शाळेच्या इमारतीमधील इतर शासकीय कार्यालये अन्य ठिकाणी स्थलांतरित करावे आणि आगामी शैक्षणिक वर्षापासून एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय व कनिष्ट महाविद्यालय, मुंबई येथे पूर्णवेळ विविध नवीन तांत्रिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करून या शाळेला गतवैभव मिळवून देण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि मंत्री कौशल्य विकास यांचेकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |

# विवरण क्रमांक – ३९

## लक्षवेधी सूचनेवर अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

## (म.वि.स. नियम 105 अन्वये )

| अ.क्र. | विषय | उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | "महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे सर्व कामकाज प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पध्दतीने सुरु असणे" | श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांची दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चेच्या दरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती | दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली. |

## विवरण क्रमांक ४०

(म.वि.स. नियम ११० अन्वये).

निरंक

***

# विवरण क्रमांक – ४१

## अशासकीय ठराव ( म.वि.स. नियम १०६ )

(१) एकूण आलेले ठराव - २८४

(२) अमान्य झालेले ठराव - २२४

(३) मान्य झालेले ठराव - ०६०

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नांव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १. | "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. प्रताप अडसड, वि.स.स. | ३ व १७ मार्च, २०२३ | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |
| २. | "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका व त्यामुळे होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा | श्री. चेतन तुपे, वि.स.स. | -- " -- | -- " -- |

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नांव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| | प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | | | |
| ३. | "राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. | -- " -- | -- " -- |
| ४. | "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या विशेषतः यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. | -- " -- | -- " -- |
| ५. | "दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा | श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. | -- " -- | -- " -- |

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नांव (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| | ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | | | |
| ६. | "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. | -- " -- | -- " -- |

# विवरण क्रमांक - ४२

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव

(म.वि.स. नियम १९४ अन्वये).

निरंक

****

# विवरण क्रमांक -४३

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव (सर्वसाधारण)

(म.वि.स. नियम १६३ अन्वये).

निरंक

***

# विवरण क्रमांक -४४

## महाराष्ट्र विधानसभा

**विधानसभेच्या सन २०२३ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र.**

| अ.क्र.<br>(१) | सूचना क्रमांक<br>(२) | सूचना देणारे सदस्य<br>(३) | सूचनेचा विषय<br>(४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक<br>(५) | सद्यःस्थिती<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२६ | श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. दिनांक ०१/०३/२०२३ | **श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य तसेच दैनिक सामनाचे संपादक** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक व राज्यसभा खासदार श्री. संजय राऊत यांनी टिव्ही चॅनेलच्या माध्यमातून "विधानमंडळ नव्हे चोर मंडळ आहे." असे वक्तव्य करून विधानमंडळाच्या समस्त लोकप्रतिनिधींचा अपमान करुन, विधानमंडळाच्या उज्वल परंपरा पायदळी तुडवून व त्याद्वारे सभागृहाच्या घटनात्मक कार्यवाहीवर प्रतिकूल परिणाम होऊन विधानमंडळातील सन्माननीय सदस्यांचा, संपूर्ण सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकारभंग हा होय. | दिनांक १/३/२०२३ | सूचना पूढील कार्यवाहीसाठी राज्यसभेकडे सुपूर्द करण्यात आली. दिनांक ६/०४/२०२३ |
| २. | १२७ | श्री. भरत गोगावले, वि.स.स. दिनांक ०१/०३/२०२३ | **श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य तसेच दैनिक सामनाचे संपादक** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक व राज्यसभा खासदार श्री. संजय राऊत यांनी टिव्ही चॅनेलच्या माध्यमातून "विधानमंडळ नव्हे चोर मंडळ आहे." असे वक्तव्य करून विधानमंडळाच्या समस्त लोकप्रतिनिधींचा अपमान करुन, विधानमंडळाच्या उज्वल परंपरा पायदळी तुडवून व त्याद्वारे सभागृहाच्या | दिनांक १/३/२०२३ | सूचना पुढील कार्यवाहीसाठी राज्यसभेकडे सुपूर्द करण्यात आली. दिनांक ६/०४/२०२३ |

| अ.क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | घटनात्मक कार्यवाहीवर प्रतिकूल परिणाम होऊन विधानमंडळातील सन्माननीय सदस्यांचा, संपूर्ण सभागृहाचा झालेला अवमान व विशेषाधिकारभंग हा होय. | | |
| ३. | १२८ | श्री.महेश संभाजीराजे शिंदे, वि.स.स. दिनांक ०२/०३/२०२३ | **सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.शशिकांत शिंदे व श्री. मिनाजी मुल्ला, उप विभागीय अधिकारी, सातारा यांच्याविरुध्द** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यांच्या कोरेगाव विधानसभा मतदार क्षेत्रामध्ये दि. २०.०२.२०२३ रोजी मौजे कारंडवाडी ता., जि. सातारा या गावाचे दि. २६.०२.१९७६ रोजी देगांव महसूल गावामधून वाढी विभाजन होऊन नैसर्गिक व भौगोलिक हद्द ठरविण्यात आलेली असतांनाही त्याबाबत अंमलबजावणी झाली नसल्याने नागरिकांना निर्माण होणाऱ्या अडचणीबाबत तसेच कारंडवाडी गावाशेजारील असलेल्या गटांना देगांवचे शिक्के मिळणेसंदर्भात तहसिलदार, सातारा यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर बैठकीचे स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने सन्माननीय सदस्यांना आमंत्रण देण्यात आले नाही. तसेच दि. १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी निगडी तर्फे सातारा आणि चिमणगांव येथील विविध विभागातील अधिकाऱ्यांसमवेत आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीचे निमंत्रण हि सन्माननीय सदस्यांना देण्यात न आल्यामुळे झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय. | | पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित |

| अ.क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४. | १२९ | श्री. रईस शेख, वि.स.स. दिनांक ११/०३/२०२३ | **श्री. मंगलप्रभात लोढा, पर्यटन, कौशल्य विकास आणि उद्योजकता, महिला व बालविकास मंत्री यांच्याविरुध्द** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "श्री. मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री **यांनी दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी विधानसभा सभागृहात महिला दिनाच्या अनुषंगाने मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर उत्तर देताना "लव जिहाद" या संबंधी महाराष्ट्र राज्यामध्ये एक लाख प्रकरणांची नोंद झाली असल्याची माहिती दिली आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती जाणून घेतली असता याविषयाशी संबंधित फार कमी प्रमाणात प्रकरणे असल्याची माहिती मिळाली आहे. मा. महिला व बाल विकास मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन, राज्यातील विशिष्ट घटकांच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करून सन्माननीय सदस्यांसह सभागृहाची जाणीवपूर्वक दिशाभूल केल्याने** झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित |
| ५. | १३० | श्री. अबू आझमी, वि.स.स. दिनांक १०/०३/२०२३ | **श्री. मंगलप्रभात लोढा, पर्यटन, कौशल्य विकास आणि उद्योजकता, महिला व बालविकास मंत्री यांच्याविरुध्द** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "श्री. मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री **यांनी दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी विधानसभा सभागृहात महिला दिनाच्या अनुषंगाने मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर उत्तर देताना "लव जिहाद" या संबंधी** | | पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित |

| अ.क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | **महाराष्ट्र राज्यामध्ये एक लाख प्रकरणांची नोंद झाली असल्याची माहिती दिली आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती जाणून घेतली असता याविषयाशी संबंधधित फार कमी प्रमाणात प्रकरणे असल्याची माहिती मिळाली आहे. मा. महिला व बाल विकास मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन, राज्यातील विशिष्ट घटकांच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करून सन्माननीय सदस्यांसह सभागृहाची जाणीवपूर्वक दिशाभूल केल्याने** झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | |
| ६. | १३१ | सर्वश्री. माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, वि.स.स. दिनांक १५/०३/२०२३ | **माननीय महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याविरुध्द** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, नांदेड शहर व जिल्ह्यातील हदगाव व हिमायतनगर येथील विविध विकास कामांसंदर्भात मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दि. १५ मार्च, २०२३ रोजी विधानभवन दालनात आयोजित केलेल्या बैठकीला नांदेड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीना निमंत्रित करण्यात आले होते. परंतु, स्थानिक लोकप्रतिनिधीं या नात्याने सन्माननीय सदस्यांना यासंदर्भातील सर्व बैठकीला निमंत्रित करणे व जिल्हयाच्या संदर्भात माहिती देणे आवश्यक असतानाही जाणीपूर्वक उक्त बैठकीला तसेच दि. १५ मार्च, २०२३ रोजीच्या बैठकीला मा, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सन्माननीय सदस्यांना जाणीपूर्वक निमंत्रित केलेले नसल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय. | | पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित |

| अ.क्र.<br>(१) | सूचना क्रमांक<br>(२) | सूचना देणारे सदस्य<br>(३) | सूचनेचा विषय<br>(४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक<br>(५) | सद्यःस्थिती<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| ७. | १३२ | श्रीमती जयश्री चंद्रकांत (अण्णा) जाधव, वि.स.स. दिनांक १५/०३/२०२३ | **राज्य नियोजन मंडळाचे विद्यमान अध्यक्ष, माजी विधानसभा सदस्य श्री. राजेश क्षिरसागर यांच्याविरुध्द** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यां यांच्या कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातील स्थानिक विकास निधी, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग व शासनाच्या विविध विभागाने मंजूर केलेल्या निधीमध्ये राज्य नियोजन मंडळाचे विद्यमान अध्यक्ष, माजी आमदार श्री. राजेश क्षिरसागर हे हस्तक्षेप करित असल्याचे निदर्शनास आले आहे. सन्माननीय सदस्यां यांच्या मतदार संघातील मंजूर झालेली कामे बदलण्याचा किंवा मंजूर निधीला स्थगिती देऊन स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये होणाऱ्या विकास कामांमध्ये सन्माननीय सदस्या यांना डावलून परस्पर अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन त्यांना आदेश देण्याचे काम श्री. राजेश क्षिरसागर यांचेकडून केले जात आहे. शासनाने कोल्हापूर जिल्ह्यासाठी मंजूर केलेल्या विकास कामांची प्रसिध्दी प्रसार माध्यमांसमोर करून मा. मुख्यमंत्री निधीतून मंजूर निधीचे श्रेय स्वतः घेऊन ते जाहिरात करीत असल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय. | | पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित |
| ८. | १३३ | श्री. सुहास (अण्णा) कांदे वि.स.स. दिनांक २३/०३/२०२३ | **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेविरुध्द** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्यांनी दिनांक ३०/११/२०२२ व दिनांक ०६/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा नियोजन समिती नाशिक अंतर्गत ३०५४१/५०५४ रस्ते व ल.पा बंधारे तसेच इतर योजनांच्या निधी वाटपात गैरकारभार झाल्याची बाब | | संबंधिताकडून खुलासा मागविण्यात आला. पत्र दिनांक १९/०४/२०२३ |

| अ.क्र. (१) | सूचना क्रमांक (२) | सूचना देणारे सदस्य (३) | सूचनेचा विषय (४) | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक (५) | सद्यःस्थिती (६) |
|---|---|---|---|---|---|
